गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था

प्रकाशन १

# आर्थिक घडामोडी

( १९३०–५० )

लेखक

ध. रा. गाडगीळ

नी. वि. सोवनी

१९५१

आठ रुपये

प्रकाशक
**गो. वि. सोवनी**, कार्यकारी संचालक,
गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था,
पुणें ४.

मुद्रक
**के. ग. शारंगपाणी**,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५/१ शिवाजीनगर,
पुणें ४.

# प्रस्तावना

"पुणें जिल्ह्यांतील फळांची विक्री" व "महाराष्ट्रांतील मोटरवाहतूक" हीं संस्थेचीं दोन्हीं मराठी प्रकाशनें १९३६ सालीं प्रसिद्ध झालीं. त्यानंतर आज १५ वर्षांनीं हें तिसरें प्रकाशन करण्याचा योग येत आहे. संस्थेमार्फत होणाऱ्या आर्थिक व सामाजिक पाहण्यांचे अहवाल जरी प्रथम इंग्रजींत प्रसिद्ध झाले तरी सामान्य जनतेच्या उपयोगासाठीं त्यांचीं मराठी भाषांतरें प्रसिद्ध करावीं असें संस्थेचें प्रथमपासूनच धोरण होतें व आहे. वर उल्लेखिलेलीं पहिलीं दोन प्रकाशनें त्याच उद्देशानें काढण्यांत आलीं होतीं. त्यानंतरच्या काळांत संस्थेच्या कामाचा व्याप व पसारा फार भराभर वाढला, परंतु त्यामानानें मनुष्यबळ मात्र अनेक कारणांमुळें वाढूं शकलें नाहीं. अपुऱ्या मनुष्यबळामुळें संस्थेतर्फे या काळांत केल्या गेलेल्या पाहण्यांचे इंग्रजी अहवालसुद्धां तयार होण्यास विलंब लागू लागला. त्यामुळें साहजिकच त्यांच्या मराठी भाषांतराकडे लक्ष देण्यास सवडच मिळाली नाहीं. तथापि त्याची उपयुक्तता व महत्त्व याची जाणीव आम्हांस सतत असल्यामुळें या काळांत सुद्धां संस्थेबाहेरील मंडळींकडून पैसे देऊन हें काम करवून घेण्याचे आम्ही प्रयत्न केले, परंतु ते समाधानकारक ठरले नाहींत.

पुणें विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून मराठी माध्यमाच्या प्रश्नास पुन्हां एकदां जोराची चालना मिळाली व त्यादृष्टीनें कांहींतरी करण्याची आवश्यकता पुन्हां एकदां जोरानें आमच्या प्रत्ययास आली. तथापि आमची पूर्वीची अडचण कायमच असल्यामुळें कांहीं नवीन लिहून अगर भाषांतर करून प्रसिद्ध करणें आम्हांस अशक्यच होतें. तेव्हां प्रा. गाडगीळ व मीं यांनीं वेळोवेळीं निरनिराळ्या आर्थिक घडामोडींसंबंधीं केलेलें स्फुट लिखाण एकत्र करून प्रसिद्ध करावें अशी जी सूचना यापूर्वीं पुष्कळांनीं केली होती ती स्वीकारावी असें आम्हीं ठरविलें. या दृष्टीनें प्रा. गाडगीळ यांनीं गेल्या २० वर्षांत व मी गेल्या ७–८ वर्षांत लिहिलेल्या लेखांची एक जुळणी तयार करण्यांत आली. ती सर्व कालवार लावल्यावर त्यांत एक अस्पष्ट अशी साखळी दिसूं लागली व एकमेकांशीं अगदींच असंबद्ध असे लेख एकत्र करून आपण आंवळ्यांची मोट वाचकांच्या पदरांत बांधूं अशी वाटणारी भीति निराधार आहे हें लक्षांत आलें. या लेखसंग्रहांत गेल्या २० वर्षांतील कांहीं महत्त्वाच्या आर्थिक घडामोडींचें विवेचन व स्थूलमानानें त्या कालाच्या आर्थिक इतिहासाचे कांहीं महत्त्वाचे भाग ग्रथित होतील अशी खात्री पटली व लगेंच हा संग्रह प्रसिद्ध करण्याचें नक्की करण्यांत येऊन तो आज प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

या संग्रहांत एकंदर १८ लेख व २ भाषणें यांचा समावेश केलेला आहे. वेळोवेळीं लोकशिक्षण, नवभारत, सह्याद्रि, इत्यादि मासिकांतून व दैनिक ज्ञानप्रकाशांतून ते

प्रसिद्ध झालेले आहेत. संग्रहाचे तीन भाग करण्यांत आले आहेत. १ ल्या भागांत १९३० ते १९३९ पर्यंतच्या कालखंडांत लिहिलेले व त्या काळांतील घटनांशीं संबद्ध असलेले लेख घातले आहेत. ते सर्वच प्रा. गाडगीळ यांचे आहेत. २ ऱ्या भागांत १९३९ ते १९५० पर्यंतच्या काळांतील घडामोडींसंबंधींचे लेख घालण्यांत आले आहेत. त्यांतील कांहीं प्रा. गाडगीळ यांचे व कांहीं माझे आहेत. प्रा. गाडगिळांचीं दोन्हीं भाषणें याच भागांत आलीं आहेत. ३ ऱ्या भागांत कांहीं महत्त्वाच्या संकीर्ण विषयावरील ३ लेखांचा संग्रह केला आहे.

येथें संग्रहित केलेले सर्व लेख लिहिले ते त्या त्या वेळच्या परिस्थितीस अनुलक्षून व त्या त्या वेळीं उपलब्ध असलेल्या माहितीवरून पुढच्या काळासंबंधीं अंदाज करून लिहिलेले आहेत. ते आज वाचतांना त्यांतील कांहीं गृहीत कृत्यें व भाकितें अगदींच चुकीचीं वाटतील. तथापि ते लिहिण्याच्या वेळीं त्यावेळच्या माहितीप्रमाणें तींच बरोबर वाटत होतीं हें निर्विवाद आहे. अशाप्रकारच्या चुका होण्याचा धोका सर्व समाजशास्त्रीय व विशेषत: अर्थशास्त्रीय, लिखाणांत सदैव असतो व ज्यास त्या विषयांत लिखाण करावयाचें आहे त्यास तो पत्करणें आवश्यकच असतें.

लेख कोठें प्रसिद्ध होण्यासाठीं लिहिला गेला याचाही लेखावर परिणाम होणें स्वाभाविक असतें. प्रा. गाडगिळांचीं दोन्हीं भाषणें सभेंत वाचण्यासाठीं लिहिलीं गेल्यामुळें त्यांतील भाषाशैली त्यास अनुरूप अशी वापरलेली दिसेल. त्याचप्रमाणें माझे जे लेख ज्ञानप्रकाशांत, बहुधा अग्रलेख म्हणून, प्रसिद्ध झाले त्यांवर थोडी फार वर्तमानपत्री लिखाणाची छाया पडलेली आढळेल. आर्थिक प्रश्नांचें मराठींतून विवेचन करतांना येणाऱ्या कांहीं अडचणींची या लेखसंग्रहावरून पुष्कळशी कल्पना येऊं शकेल.

येथें संग्रहित केलेले लेख जेथें प्रथम प्रसिद्ध झाले त्या मासिकांच्या व वर्तमानपत्रांच्या संपादकांनीं ते पुनर्मुद्रित करण्यास आम्हांस परवानगी दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था,
पुणें ४.
ता. ५ मे १९५१

नी. वि. सोवनी
कार्यकारी संचालक

# अनुक्रमणिका


| | लेखक | पान |
|---|---|---|
| प्रस्तावना | | |
| *भाग १ ( १९३०–३९ )* | | |
| १ सुवर्णमानपद्धति | ध. रा. गाडगीळ | १ |
| २ प्रचलित मंदीची कारणमीमांसा | ” | १८ |
| ३ चांदीच्या भावांतील चढउतार | ” | ३५ |
| ४ सार्वराष्ट्रीय आर्थिक संबंधांची सद्यःस्थिति | ” | ४४ |
| ५ हिंदी कंपन्यांची ‘ मॅनेजिंग एजन्सी ’ ऊर्फ व्यवस्थापक–मंडळपद्धति | ” | ५१ |
| ६ आर्थिक व्यवहाराचें नियोजन | ” | ६६ |
| *भाग २ ( १९३९–५० )* | | |
| ७ अर्थसचिवांची कोलांटी उडी | नी. वि. सोवनी | ९६ |
| ८ हिंदुस्थानांतील धान्यपरिस्थिति | ” | १०३ |
| ९ मुंबई प्रांतांतील धान्यपरिस्थिति कशी सुधारेल ! | ध. रा. गाडगीळ | १२१ |
| १० हिंदुस्थानांतील सोन्याची विक्री | नी. वि. सोवनी | १३१ |
| ११ सार्वराष्ट्रीय चलनपरिषद् व तिच्यापुढें मांडलेली योजना | ” | १४० |
| १२ स्टर्लिंग शिलकांचें भवितव्य | ” | १५१ |
| १३ अर्थशास्त्रज्ञांचा दुसरा गंभीर इशारा | ” | १६४ |
| १४ युद्धकालीन नियंत्रणें व युद्धोत्तर योजना | ध. रा. गाडगीळ | १६९ |
| १५ महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद, पुणें– अध्यक्षीय भाषण | ध. रा. गाडगीळ | १७७ |
| १६ आपलें आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य | ” | १९६ |
| १७ साखरेची कटु कहाणी | नी. वि. सोवनी | २२७ |
| *भाग ३ ( संकीर्ण )* | | |
| १८ हिंदी अर्थशास्त्राचा पाया | ध. रा. गाडगीळ | २४३ |
| १९ हिंदुस्थानची लोकसंख्या बेसुमार नाहीं काय ! | नी. वि. सोवनी | २५६ |
| २० कोल्हापूर येथील जननसंख्येसंबंधीं माहिती | नी. वि. सोवनी | २७३ |

# आर्थिक घडामोडी

## (१९३०–५०)

## भाग १ (१९३०–३९)

## १. सुवर्णमानपद्धति*

गेल्या महिन्यांत लंडनमध्यें घडून आलेल्या चलनपद्धतीच्या क्रांतीमुळें जिकडे तिकडे या विषयासंबंधीं अतिशय जिज्ञासा उत्पन्न झाली आहे. इंग्लंड-सारख्या बलाढ्य व संपन्न राष्ट्रालासुद्धां एकप्रकारचें दिवाळखोरीचें धोरण कां स्वीकारावें लागलें असा प्रश्न प्रत्येकजण विचारूं लागला आहे. शिवाय इंग्लंडच्या धोरणामुळें हिंदुस्थानांतील परिस्थितीवर जो परिणाम घडून आला आहे व रुपयाच्या भवितव्याबद्दल जो वादविवाद सुरू झाला आहे त्यामुळेंहि हिंदी लोकांस हा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा वाटणें साहजिक आहे. इंग्लंडमधली सुवर्णमानपद्धति सुटल्याबरोबर हिंदुस्थानासहि ती सोडून देणें आवश्यक होतें. परंतु पुढें कोणती पद्धति स्वीकारावयाची, रुपयाचा संबंध पुनः सोन्याशीं जोडावयाचा किंवा नाहीं, रुपयाचा संबंध कागदी पौंडाशीं जोडणें इष्ट आहे काय, आपल्या चलनपद्धतीचा संबंध कशाशींच जोडला नाहीं तर त्याचा परिणाम आपल्या राष्ट्राच्या पतीवर व आपल्या धारणीवर काय होईल हे सर्वच प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. एकंदर सुशिक्षित समाजांत यांची चर्चाहि फार जोरानें होऊं लागली आहे. तेव्हां या संधीचा फायदा घेऊन पैसा, चलनपद्धति व हल्लींची तत्संबंधीं जागतिक परिस्थिति याबद्दल थोडेसें विवेचन करण्याचा आमचा विचार आहे.

### पैसा व त्यासंबंधीं कांहीं सिद्धान्त

अगदीं मुळापासूनच विचार करावयाचा तर पैशाचें कार्य काय, याचें प्रथम थोडक्यांत दिग्दर्शन करूं. पैसा हें एक विनिमयसाधन आहे. म्हणजे सर्व-

---

* लोकशिक्षण, आक्टोबर १९३१

प्रकारच्या देवघेवींत पैशाचा उपयोग करण्यांत येतो व पैसा वापरल्यामुळें व्यवहारांत सुलभता येते. पैशाच्या मध्यस्थीशिवाय देवघेवींत अतोनात अडचण उत्पन्न होईल. मानव समाजाच्या अगदीं सुरुवातीपासून पैसा असें एखादें विशिष्ट विनिमयसाधन म्हणून कोणत्या तरी वस्तूचा उपयोग करण्यांत आलेला आढळतो. कोठें कवड्या, कोठें नारळ, तर कोठें कातड्याचे तुकडे इत्यादि वस्तू पैशाप्रमाणें वापरतांना कांहीं रानटी समाज आजहि आढळतात. अर्थात् पैशाची पात्रता अंगीं येण्यास कांहीं विशिष्ट गुण वस्तूच्या अंगीं असले पाहिजेत. वस्तु सर्वतोपयोगी असल्याशिवाय व ती सर्वांनाच हवीशी वाटल्याशिवाय तिचा पैसा म्हणून सार्वत्रिक प्रसार होणें शक्य नाहीं. तसेंच टिकाऊपणा, सुटसुटीतपणा व राशीच्या मानानें मूल्याधिक्य असणें वगैरे गुणहि या वस्तूंत हवेत. फार दिवसांपासून हे सर्व गुण धातूंत विशेषतः सोन्याचांदींत असतात असें आढळून आल्यामुळें धातूंचाच पैसा म्हणून उपयोग केला जात आहे. गेलीं बरींच शतकें मुख्यत्वें चांदीचा उपयोग जगभर करण्यांत येत होता; परंतु एकोणिसाव्या शतकांत हळूहळू सोन्याचें महत्त्व वाढून सोन्याच्या नाण्यावर अधिष्ठित झालेली चलनपद्धति सर्व संपन्न राष्ट्रांनीं महायुद्धापूर्वी स्वीकारली होती. तथापि विनिमयसाधन म्हणून निरनिराळ्या गोष्टींचा आजहि उपयोग केला जातो. तांब्याचा पैसा, निकलची आणेली, चांदीचा रुपया, कागदी नोट अथवा बँकेवरील चेक हे सर्व पैशाचेच प्रकार आहेत; हीं सर्व आर्थिक देवघेवीचीं विनिमयसाधनें होत.

परंतु पैशाचें आणखी एक निराळेंच जें कार्य आहे तें सर्वप्रकारचे पैसे करूं शकत नाहींत. त्याकरितां चलनपद्धतींतील एखाद्या विशिष्ट प्रकारच्या पैशाचाच उपयोग करण्यांत येतो. हें कार्य म्हणजे मूल्यमापनाचें. कोणताहि क्रयविक्रयाचा व्यवहार करण्यापूर्वीची पहिली क्रिया किंमत ठरविणें होय. म्हणजे पैसा हा विनिमयसाधन म्हणून प्रत्यक्ष योजण्यापूर्वी किती पैसे द्यावयाचे हें निश्चित होणें जरूर आहे. अर्थात् उपस्थित व्यवहार ज्या वस्तूसंबंधीं व्हावयाचा तिचें मोल काय हा प्रश्न येथें आला. सर्व आर्थिक व्यवहाराचें मूळ स्वरूप वस्तूंचें तुलनात्मक मोल ठरवून त्यांची परस्परांत अदलाबदल करणें हेंच होय. परंतु अमुक एक वस्तु जास्त किंवा कमी मूल्यवान अथवा ती अमक्या वस्तूच्या अमुक पट मूल्यवान या सर्व गोष्टी ठरविण्यास कांहीं तरी मोल मापण्याचें साधन आपणांस अवश्य आहे. येथें आपणास ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं विनिमयसाधन म्हणून ज्या गोष्टीचा उपयोग करण्यांत येतो, तिचाच मूल्यमापनाकडे उपयोग झाला पाहिजे असें नाहीं; किंबहुना मूल्यमाप-

जास अमुक एक जड वस्तुच पाहिजे असेंहि नाहीं. ज्याप्रमाणें लांबी मोजण्यास फूट अथवा इंच अशी एक लांबीसंबंधीं निश्चित कल्पना पाहिजे त्याप्रमाणें मूल्यमापनासहि मोलाबद्दलची निश्चित कल्पना बनवून तिचा व्यवहारांत उपयोग करणें शक्य झाल्यास तशीहि पद्धति पाडतां येईल. परंतु येवढें खरें कीं, बहुशः आजपावेतो देवघेवींत ज्या वस्तूचा पैसा म्हणून उपयोग केला जातो तिच्याच किंमतींचा मूल्यमापनांतहि उपयोग करितात. म्हणजे चलनपद्धतींत सोन्याचांदीच्या नाण्यांचा उपयोग झाल्यास सोन्यांत, अथवा चांदींत, अथवा दोहोंतहि सर्व पदार्थांच्या किंमती ठरविण्यांत येतात. अशा या धातुमय चलनपद्धतींत कोणत्याहि वस्तूची किंमत म्हणजे त्या वस्तूच्या मोबदला किती सोनें अथवा किती चांदी मिळेल हीच होय. अर्थात् येथें एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे ती अशी. लांबी, घनता, उष्णता इत्यादि गुणांचें मान ठरविण्यास आधिभौतिक शास्त्रज्ञ त्या त्या गुणाविषयीं कांहीं निश्चित कल्पना बसवून तिजवरूनच या गुणांचें जसें मापन करितात तशाप्रकारचें हें आपलें मूल्यमापन नाहीं. सोन्याचांदीच्या मोलावरून इतर किंमती ठरविल्या पण स्वतः सोन्याचांदीच्या मूल्याची निश्चिति आहे काय ? हें मूल्य फूट व डिग्री यांच्या कल्पनेसारखें कांहीं स्थिर, अचल नाहीं. यामुळें आर्थिक व्यवहारांत किंमतीसंबंधीं दोनप्रकारचे फरक होऊं शकतात व होत असतात. एक फरक म्हणजे कोणत्याहि विवक्षित गोष्टीची किंमत वाढणें अथवा कमी होणें. कोळसा, घरभाडें अथवा डॉक्टराची फी या व असल्या कोणत्याहि गोष्टीची किंमत त्या त्या गोष्टीच्या मागणी–पुरवठ्यांत फरक पडून वरखालीं होईल. हा एक प्रकार झाला. परंतु खुद्द मूल्यमापनास वापरलेल्या वस्तूच्या मागणी–पुरवठ्यांतच फरक पडल्यास आर्थिक व्यवहारांतील सर्वच किंमतींचें कोष्टक बदलणें साहजिक आहे. पहिला प्रकार म्हणजे विवक्षित गोष्टींच्या किंमती बदलण्याचा व दुसरा सर्वच किंमतींचें मान म्हणजे धारण बदलण्याचा.

सोन्यास अथवा चांदीस चलनपद्धतींत स्थान मिळून मूल्यमापनाकडे त्यांचा उपयोग होऊं लागला म्हणजे या धातूंच्या मागणीस दुहेरी स्वरूप येतें. एक तर इतर कोणत्याहि वस्तूप्रमाणें निरनिराळ्या प्रकारानें समाजांत या धातूंचा जो वापर होतो, त्यासंबंधीं उद्भवणारी मागणी व दुसरें म्हणजे पैसा म्हणून वापरण्यास जेवढें सोनें अथवा चांदी लागते तिची मागणी. विनिमयसाधनें व्यापारास अवश्य आहेत म्हणून वर सांगितलेंच आहे. जितका व्यवहार मोठा तितकी पैशाबद्दल मागणीहि अधिक असणार. तेव्हां व्यवहाराच्या व्याप्तीच्या मानानें

सोनें, चांदी कमीअधिक विपुल झाल्यास त्यांची किंमत चढणार किंवा उतरणार. येथेंच दुसरीहि एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही कीं, धातूंना कोणत्याहि चलनपद्धतींत जी मागणी येते तीहि दुहेरी प्रकारची असते. एक विनिमयसाधन या नात्यानें धातूचा उपयोग होतो म्हणून व दुसरा मूल्यमापनाकडे उपयोग होतो म्हणून. उदाहरणार्थ, पै—पैसे पाडण्याकरितां सरकार दरसाल बरेंचसें तांबें विकत घेतें, परंतु तांब्याचा मूल्यमापनास उपयोग होत नाहीं म्हणून या दृष्टीनें त्यास मागणी नसते. उलटपक्षीं हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें पाडलें जात नसे, परंतु मूल्यमापनाच्या कार्याकरितां सोनें लागत असे.

## महायुद्धापूर्वी सुवर्णमानपद्धतीचें स्वरूप :

### अंतर्गत व्यवहार

हे पैशासंबंधींचे कांहीं प्रास्ताविक सिद्धान्त मांडल्यावर आतां सुवर्णमानपद्धति म्हणून महायुद्धापूर्वी बहुतेक सर्व पाश्चात्य देशांत जी चलनपद्धति प्रचलित होती तिजबद्दल विवेचन करूं. या पद्धतींत सोन्याच्या नाण्याचा सार्वत्रिक प्रसार होत असून मूल्यमापनाचें साधन म्हणूनहि सोन्याचा उपयोग करण्यांत येत असे. परंतु सोन्याचें नाणें वापरलें म्हणजे सोन्याचा मूल्यमापनास उपयोग आपोआप झाला असें मुळींच नाहीं. हिंदुस्थानांत चांदीच्या रुपयाचा चलनपद्धतींत मुख्यत्वें उपयोग केला जातो. परंतु आपली पद्धति रौप्यमानाची खास नव्हे. विनिमयसाधनें म्हणून ज्यांना पैशाचें स्वरूप आहे अशा सर्व वस्तू सहसा प्रत्येक देशांत कायद्यानें ठरविल्या जातात आणि एकंदर चलनपद्धतीचें स्वरूपहि कायद्यानेंच ठरवितात. तसेंच चलनी नाणीं व बँकनोटा यांची संख्या कमीजास्त करणें हें विशिष्ट परिस्थितींत सरकार व सरकारनें चलनपद्धतीसंबंधीं विशेष अधिकार दिलेल्या मध्यवर्ती बँका यांच्यावर अवलंबून असतें. पैशाची किंमत ही पैशाचा पुरवठा व पैशाच्या नानास्वरूपी आर्थिक देवघेवीचें मान या दोन गोष्टींवर मुख्यतः अवलंबून असते. परंतु पैशाचा पुरवठा वाढविणें, न वाढविणें सरकारच्या हातांत आहे. तेव्हां नाण्याची किंमत व धातूची किंमत ही एकच असली पाहिजे असें नाहीं. सुवर्णमानपद्धतींत मात्र या दोन्ही किंमती एकच असल्या पाहिजेत.

सोनें अथवा चांदी यांचा प्रथम जेव्हां व्यवहारांत विनिमयसाधन म्हणून उपयोग होऊं लागला त्या वेळेस नाणें पाडण्याच्या कलेची विशेष प्रगति झालेली नव्हती. तेव्हां बरींच शतकें सोन्याचांदीच्या लडींचा पैसा म्हणून उपयोग करीत असत. या काळांत अर्थात् कस लावून धातु शुद्ध आहे किंवा नाहीं हें पाहणें क

कमी अशाप्रकारची परिस्थिति निर्माण झाल्यास नाणीं वितळवून त्यांच्या सोन्याच्या लडी करून विकण्याचा क्रम सुरू होईल. म्हणजे नाण्यांचा सांठा पुनः कमी होऊन त्यांची किंमत चढे. अशा रितीनें टांकसाळींत सोन्याचीं नाणीं पाडून घेण्याचा जो सार्वजनिक हक्क जिकडेतिकडे कायद्यानें प्रस्थापित करण्यांत आला होता त्यामुळेंच सोन्याचें नाणें व सोनें यांची किंमत सारखी राखण्यांत आली होती. अर्थात् सोन्याचा पुरवठा वाढून किंमत खालावली असतां एकंदर नाण्यांचा संग्रह वाढणें अथवा पुरवठा कमी झाला असतां चलनी नाण्यांची संख्या कमी होणें या क्रिया आपोआप घडून येत.

आतांपर्यंत पैसा म्हणून जें विनिमयसाधन वापरण्यांत येतें तें मुख्यत्वें-करून सोन्याचांदीचें नाणें होय असें आपण गृहीत धरून चाललों. परंतु वास्तविक तशी स्थिति महायुद्धापूर्वीहि नव्हती. बहुतेक संपन्न राष्ट्रांतसुद्धां कागदी नोटा व बँकेवरील चेक यांचा देवघेवींत बराच उपयोग केला जात असे. तेव्हां सुवर्णमान-पद्धतींत नोटा व चेक यांचा संबंध कसा जोडला जातो हें पाहणें आवश्यक आहे. नोटा काढण्याचा हक्क बहुधा सरकारकडे अथवा कांहीं विशिष्ट बँकांकडे राखून ठेवलेला असतो. परंतु हा हक्क कायद्यान्वयें देतांना त्यासंबंधीं कांहीं तरी नियंत्रण केलें जातें. सुवर्णमानपद्धतींत नोटा हें मूलभूत चलन नसून सोन्याचें नाणें हेंच असे. तेव्हां नोटांचा प्रसार व्यवहारांत होण्याकरितां वाटेल तेव्हां त्यांचें सोन्यांत रूपांतर करतां येईल अशी योजना करणें आवश्यक आहे. एरवीं व्यवहारांत नोटा वापरण्याऐवजीं सोन्याचीं नाणींच वापरण्याकडे लोकांची प्रवृत्ति होईल. म्हणून प्रत्येक नोट ही अमुक एक किंमतीची प्रॉमिसरी नोट ( कर्जरोखा ) असे असें म्हटल्यास चालेल. बँका अथवा सरकार यांपैकीं ज्यांनीं म्हणून नोट काढली असेल त्यांनीं त्या नोटेच्या मोबदला नोटेच्या किंमतीचीं सोन्याचीं नाणीं देण्याचें अभिवचन प्रत्येक नोटेवर छापलें जात असे. अर्थात् नोटांचा प्रसार बराच झाला व हा पैशाचा प्रकार सोईस्कर वाटून तो प्रचारांत आला म्हणजे कोणीहि नोटेचें नाणें करून घेण्याच्या भानगडींत पडत नाहीं. परंतु ही गोष्ट जोंपर्यंत बँकेवर अथवा सरकारवर जनतेचा पूर्ण विश्वास आहे तोंपर्यंतची झाली. हा विश्वास उडाल्यास प्रत्येकास कागदी नोटेच्या ऐवजीं सोनेंच जवळ असावें असें वाटणें साहजिक आहे. या पद्धतींत नोटेस किंमत येते ती केवळ तिचें नाण्यांत केव्हांहि रूपांतर करून देण्याची जबाबदारी आहे म्हणून. ही जबाबदारी पार पाडण्यास नोटांच्या एकंदर संख्येच्या मानानें सोन्याचा कांहींतरी संग्रह बाळगणें अवश्य असतें. हा संग्रह किती बाळगावा याबद्दलचे नियम कांहीं निश्चित नाहींत. निरनिराळ्या देशांच्या कायद्यांत निरनिराळ्या प्रकारचे

निर्बंध घातले जात असत. कांहीं ठिकाणीं नोटांच्या किंमतीचा अमुक एक हिस्सा तरी सोनें किमानपक्षीं बाळगलें पाहिजे असा निर्बंध असे. कांहीं ठिकाणीं एकंदर नोटांच्या किंमतीच्या विशिष्ट यत्तेपर्यंत इतकें सोनें व त्यापुढें कांहीं जास्त प्रमाणांत अशा प्रकारची योजना असे. आपणांस लक्षांत घेण्याचा मुद्दा हाच कीं, या सुवर्णमानपद्धतींत जरी पैसा म्हणून नोटांचा उपयोग होत असे तरी या नोटांच्या रकमेचा व त्यांस तारण म्हणून ठेवलेल्या सोन्याच्या संग्रहाचा एक ठराविक संबंध असे. नोटा वाढविल्यास सोन्याचा संग्रह वाढविणें आवश्यक असे व सोन्याचा संग्रह कमी झाल्यास नोटांची संख्याहि कमी करावी लागत असे. बँकांच्या व्यवहारांतसुद्धां हाच नियम साधारणपणें लागू होता. अर्थात् या व्यवहारासंबंधीं बहुतेक देशांतून कांहीं कायदेशीर निर्बंध नसत. परंतु व्यापाऱ्यांस कर्ज देणें, हुंडी मोडणें वगैरे जो पतीचा सर्व व्यवहार बँका करीत त्याचा पाठपुरावा करण्यास एकंदर व्यवहाराच्या मानानें त्याचा कांहीं अंश सोनें आपल्या संग्रहीं राखणें त्यांस जरुरीचें होतें. एकंदर जनतेस बँकेच्या शहाजोगपणाबद्दल खात्री पटवण्यास व प्रत्यक्ष व्यवहारांत आकस्मिक अडचणी उत्पन्न झाल्यास मदत म्हणून हें सोनें ठेविलें जात असे. या सोन्यावर कांहीं व्याज सुटत नसल्यामुळें त्याचा संग्रह कमी करण्याकडे बँकांची प्रवृत्ति असली तरी बँकेच्या ठेवीदारवर्गांत अविश्वास उत्पन्न होऊं न देण्याची अत्यंत आवश्यकता असल्यामुळें प्रत्येक देशांत बँकांच्या एकंदर व्यवहाराचें व त्यांच्या सुवर्णसंग्रहाचें प्रमाण जवळजवळ ठरून गेल्यासारखें होतें. त्यामुळं बँकेच्या व्यवहारासंबंधींसुद्धां सुवर्णसंग्रह कमीजास्त झाल्यास व्यवहाराचें मान कमी जास्त होतें असा नियम दिसून येई.

महायुद्धापूर्वीं सुवर्णमानपद्धतीचें स्वरूप पुढीलप्रमाणें होतें. देवघेवींत वापरल्या जाणाऱ्या पैशाचे प्रकार मुख्यत्वेंकरून सोन्याचीं नाणीं, कागदी नोटा व बँकांचे चेक हे असत. परंतु या तिहींचीहि मदार सोन्यावर होती. टांकसाळींतून नाणीं पाडून घेण्याचा हक्क सार्वत्रिक असल्यामुळें एकंदर जगांतील सुवर्णसंग्रहांत फरक पडल्यास अथवा सोन्याचा भाव कमीजास्त झाल्यास सोन्याच्या नाण्यांच्या संख्येंत व किंमतींत फरक पडत असे. पण नवीन पैदाशीचें सोनें प्रत्यक्ष नाण्याच्या रूपानें चलनपद्धतींत बहुधा शिरत नसे. नवें सोनें बरेंचसें बँकांकडे जाई अथवा सरकारतिजोरींत जाई; व त्याचा परिणाम नोटांची संख्या आणि बँकांचा व्यवहार यांवर घडून येई. कांहीं झालें तरी सर्व प्रकारच्या एकंदर विनिमयसाधनांचा पुरवठा सुवर्णसंग्रहावर अवलंबून होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

ही पद्धति सर्व देशांत याप्रकारेंच प्रचलित होती असें नाहीं. देशादेशांतून फरक असत; पण ते सध्या महत्त्वाचे नाहींत. कारण सर्व देशांतून सुवर्णसंग्रहावर पूर्णपणें भिस्त ठेवणें आवश्यक होतें व जसा जगांतील सुवर्णसंग्रहांत फरक पडत जाई त्याप्रमाणें पैशाच्या पुरवठ्यांतहि फरक पडे, आणि एकंदर किंमतींचें मान बहुतांशीं पैशाच्या पुरवठ्यावर अवलंबून असल्यामुळें धारणींतील चढउतार बराचसा सोन्याचे पैदाशीवर अवलंबून असे. आर्थिक व्यवहाराचें क्षेत्र व मान हीं सारखीं वाढतच होतीं तेव्हां हा व्यवहार करण्यास लागणाऱ्या विनिमयसाधनांची मागणी जास्त जास्त होणें अपरिहार्य होतें. या वाढीच्या मानानें सोन्याचा संग्रह कमीजास्त झाल्यास धारणींत आपोआप चढउतार घडून येत असे. एकंदर किंमतींच्या चढउतारावर बँकांचा अथवा सरकारचा ताबा फारसा चालत नव्हता; आणि म्हणून या प्रकारच्या मूल्यमापनपद्धतीस *स्वाधीन-गतिक* ( automatic ) *म्हणण्याचा अर्थशास्त्रज्ञांचा* परिपाठ आहे.

## सुवर्णमानपद्धतीचें सार्वराष्ट्रीय स्वरूप

आतां सुवर्णमानपद्धतीच्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या अंगाकडे वळूं. महायुद्धापूर्वी जवळजवळ सर्व प्रमुख राष्ट्रांनीं या पद्धतीचा अंगीकार केला होता. चीन व मेक्सिको या देशांत रौप्यमानपद्धति प्रचलित होती; परंतु हे देश अपवादादाखल समजावयाचे. हिंदुस्थानसारखा एखादा देश वगळल्यास जिकडेतिकडे सोन्याच्या नाण्याचा प्रचार होता. सर्व जगभर मूल्यमापनास एकच प्रमाण वापरलें जात होतें व तें प्रमाण म्हणजे सोनें या धातूची किंमत. आर्थिक व्यवहारांत वेगवेगळ्या देशांत पौंड, डॉलर, मार्क, रुबल वगैरे निरनिराळ्या नाण्यांच्या रूपानें किंमती मापल्या गेल्या तरी त्या सर्व सोन्यांतच मापल्या जात असत. कारण हीं निरनिराळीं नाणीं म्हणजे सोन्याचे लहान मोठे तुकडे होतें. अर्थात् प्रत्येक देशांत निरनिराळ्या वजनांचे तुकडे वापरले म्हणून मापनपद्धतींत मूलतः कांहींच फरक पडला नाहीं हें उघड आहे. सर्व जगभर सुवर्णमानाचा स्वीकार झाला असल्यामुळें निरंनिराळ्या देशांत किंमतींचें मान सहजच सारख्या प्रमाणांत कमीअधिक होत असें. कोणत्याहि एका देशांतील किंमतींच्या चढउतारांत इतर देशांच्या मानानें विशेष फरक पडणें शक्य नव्हतें. हें कसें याचा थोडक्यांत विचार करूं.

प्रत्येक देशांतिल मुख्य नाण्याचें वजन कायद्यानें ठरलेलें असें. तेव्हां कोणत्याहि दोन देशांतील हुंडणावळीचा भाव म्हणजे त्या देशांतिल मुख्य

नाण्यांच्या वजनांतील परस्पर प्रमाण हें असे. एका पौंडांत जर पांच डॉलर इतकें सोनें असलें तर अर्थात् पौंडास पांच डॉलर हा हुंडणावळीचा भाव ठरेल. आतां कोणत्याहि एका देशांत इतर देशांपेक्षां किंमती वाढल्या तर त्याचा राष्ट्रांतील व्यापारावर असा परिणाम होतो कीं, परदेशाहून त्या देशांत आयात फार होते. कारण मालाच्या विक्रीपासून तेथें विशेष फायदा होण्याचा संभव असतो. उलट त्या देशांतून मालाची निर्गत कमी होते. कारण तेथील किंमती विशेष वाढल्यामुळें परदेशांतील गिऱ्हाइकांस त्या देशाचा माल वाजवीहून अधिक महाग वाटतो. याप्रमाणें परदेशांशीं होत असलेल्या व्यापारांत फरक पडल्यामुळें त्या देशाचें परदेशी व्यापाऱ्यांचें देणें वाढेल. हें देणें देण्याचा मार्ग एकच; व तो म्हणजे सोनें परदेशीं पाठविणें. मग वर दर्शविल्याप्रमाणें कोणत्याहि देशांत सोन्याचा संग्रह कमी झाल्यास पैशाचा पुरवठा कमी होऊन किंमती उतरतात; व इतर देशांत संग्रह वाढल्यामुळें त्या वाढतात. अशा रितीनें जरी एखाद्या देशांत किंमती तात्पुरत्या चढल्या तरी सोन्याच्या आयातनिर्गतीवर जोंपर्यंत कांहीं निर्बंध नाहीं, तोंपर्यंत हुंडणावळणीचा भावहि साधारणपणें स्थिरच असे. साधारणपणें म्हणण्याचें कारण एवढेंच कीं, त्यांत अत्यंत अल्प प्रमाणांत फरक होणें शक्य होतें. राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापारांत मालाची किंमत चुकती करणें हें हुंड्या अथवा बॅंकेवरील ड्राफ्ट यांच्याच द्वारें सहसा होत असतें. प्रत्यक्ष सोनें पाठविण्याच्या भानगडींत व्यापारी स्वतः पडत नाहींत. अर्थात् हुंड्या अथवा ड्राफ्ट यांना हंगामाच्या मानानें एका बाजूकडून कमीअधिक मागणी असते व त्यामुळें जिकडून पैसे परदेशीं पाठविण्याची मागणी जास्त तिकडचा हुंडणावळीचा भाव उतरणें साहजिक आहे. परंतु हा भाव कांहीं मर्यादेपलीकडे उतरणें शक्य नाहीं. तो फार उतरल्यास प्रत्यक्ष सोनें विकत घेऊन तें परदेशीं पाठविण्याचा खर्च व दगदग सोसण्यास व्यापारी तयार होतील. तेव्हां परदेशांत सोनें पाठविणें व परदेशाहून सोनें आणणें यास जो खर्च लागेल तो मिळवून अथवा वजा करून ज्या मर्यादा निश्चित होतील त्या मर्यादेंतच हुंडणावळीच्या भावांत फरक पडणें शक्य आहे. उदाहरणार्थ, एक पौंडास जर पांच डॉलर असा हुंडणावळीचा नेहमींचा भाव असला व सोन्याची न्यूयार्कहून लंडनला ने-आण करण्यानें पौंडामागें जर पांच सेंट खर्च आला तर चार डॉलर पंचाण्णव सेंट व पांच डॉलर पांच सेंट एवढ्या मर्यादेंत डॉलर-पौंड हुंडणावळ बसली पाहिजे. चार डॉलर पंचाण्णव सेंटहून कमी भाव पडूं लागल्यास इंग्लंडमधून अमेरिकेंत सोन्याची निर्गत होत राहील, व पांच डॉलर पांच सेंटहून जास्त हुंडणावळ पडूं लागल्यास याच्या उलट निर्गतीचा प्रवाह सुरू

होईल. अर्थात् सोन्याची ने-आण करण्याचा खर्च जितका जास्त तितका हुंडणावळींत फरक पडण्यास वाव अधिक हें उघड आहे.

वरील विवेचनावरून सुवर्णमानपद्धतींत सर्वप्रकारचे फेरबदल हे सुवर्ण-संग्रहावर अवलंबून आहेत असें दिसून येईल. देशांतील धारण व परदेशींची हुंडणावळ यांत फेरबदल होणें हें सोन्याचा सांठा वाढणें किंवा कमी होणें यावर अवलंबून आहे. तेव्हां सुवर्णसंग्रहाची नीट काळजी घेणें ही गोष्ट प्रस्तुत पद्धति चालू राखण्यास अत्यावश्यक आहे. सुवर्णसंग्रहास धोका पोंचण्याचा दोनप्रकारें संभव असे. नोटा फार काढल्या असून लोकांचा त्यांच्यावरील विश्वास उडाला तर त्यांच्याऐवजीं नाण्यांची मागणी होऊन संग्रह खालावण्याचा संभव असतो. परंतु असें सहसा प्रत्यक्ष घडून आलेलें नाहीं. शिवाय कांहीं झालें तरी नाणें देशांतच राहणार, तेव्हां अशा प्रकारें संग्रह कमी झाला तर तें विशेष धोक्याचेंहि नाहीं. खरा धोका म्हणजे सोन्याची निर्गत फार मोठ्या प्रमाणावर होऊं लागली तरच आहे. वर दर्शविल्याप्रमाणें ही निर्गत हुंडणावळीचा भाव खालावला तरच होऊ लागते; व हुंडणावळीचा भाव खालावण्याचें मुख्य कारण कोणत्याहि देशास इतर देशांचें तात्कालिक देणें अवास्तव वाढणें हेंच होय, मग ही वाढ तात्पुरती असो अथवा नेहमींची असो.

## महायुद्ध व कागदी चलनपद्धति

येथपावेतों महायुद्धापूर्वी प्रचलित असलेल्या सुवर्णमानपद्धतीच्या सर्व-साधारण स्वरूपाचा विचार झाला. महायुद्ध सुरू झाल्याबरोबर त्यांत गुंतलेल्या सर्व राष्ट्रांनीं या पद्धतीचा एकदम त्याग केला. कारण त्यांस आपला सुवर्णसंग्रह पुढेंमागें खर्चावा लागेल अथवा कर्जास तारण म्हणून इतर राष्ट्रांस द्यावा लागेल हें उघड दिसूं लागलें. या कालांत अमेरिका व इतर कांहीं लहान लहान राष्ट्रें वगळलीं असतां बाकी सर्व देशांत कागदी पैशाचाच प्रचार झाला होता. विनि-मयसाधनांतून सोन्याचें नाणें लुप्त होऊन जिकडे तिकडे कागदी नोटाच दिसूं लागल्या व मूल्यमापनाचें प्रमाण म्हणजे कागदी नोटांची किंमत असें झालें. परंतु या किंमतीचा कोणत्याहि जड वस्तूच्या किंमतीशीं संबंध नव्हता. सोन्याच्या नाण्यास तें विनिमयसाधन म्हणून किंमत असेल; पण त्याची खरी किंमत तें सोन्याचें म्हणून. तशी कांहीं कागदी नोटांची स्थिति नव्हे. नाण्यास पैशाचें व धातूचें असें दुहेरी स्वरूप होतें. नोट हा केवळ पैसाच. विनिमयसाधन या नात्यानें नोटेस जी किंमत येईल तेवढीच तिची बाजारांत किंमत ठरणार. नोटेची किंमत नोटांच्या

पुरवठ्यावर केवळ अवलंबून व नोटा किती छापावयाच्या हें सर्वस्वीं सरकारच्या ताब्यांत. तेव्हां ही कागदी पैशाची चलनपद्धति पूर्णपणें नियंत्रित (Managed) असते हें उघड आहे. लढाई संपल्यावरदेखील बरींच वर्षे कागदी चलनपद्धतिच बहुतेक राष्ट्रांत अमलांत होती. परंतु हळूहळू बऱ्याच राष्ट्रांनीं पुनः सोन्याच्या भावाशीं आपल्या चलन–पद्धतीची सांगड घालण्याचा विचार केला.

कागदी चलनपद्धतीस टिकून न राहण्याचा संकल्प सर्वच राष्ट्रांनीं कां केला या गोष्टीच्या प्रमुख कारणांचा विचार येथें केला पाहिजे. प्रथमच एक गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे ती अशी. सोनें, रुपें अथवा कोणतीहि जड वस्तु हिचा मूल्यमापनास उपयोग केला असतां या मूल्यमापनाच्या पद्धतींत एकप्रकारची निश्चिति असते. विशेषत: सोन्यासारख्या मूल्यवान धातूचा मूल्यमापनास उपयोग केला म्हणजे या मापनसाधनांत पडणारे फरक साधारणपणें मर्यादित असतील अशी खात्री बाळगतां येत असे. परंतु कागदी पैशाच्या किंमतीस इयत्ता अशी कांहींच नाहीं. फार कमी नोटा काढल्यास त्या अत्यंत मूल्यवान होऊन बसतील. उलट त्यांची संख्या अतोनात वाढल्यास त्या कवडीमोल होतील. हें नियंत्रणावर अवलंबून आहे; आणि हें नियंत्रण विशेषत: या पद्धतीचा स्वीकार महायुद्धासारख्या बिकट प्रसंगीं केल्यामुळें जितकें चोख असावें तितकें राहिलें नाहीं. या काळीं सरकारास चालू खर्चास लागणारा पैसा उभारणें अशक्य झाल्यास जास्तजास्त नोटा छापून वेळ मारून नेण्याचा मोह अनावर होतो. अशा रितीनें बऱ्याच राष्ट्रांत कागदी पैशाच्या चलनपद्धतीचा दुरुपयोग केला गेल्यामुळें एकंदर जनतेचा या पद्धतविरून विश्वास उडाला होता. हें एक कारण झालें. तथापि कागदी चलनपद्धति कितीहि सुनियंत्रित असली तरी सर्व व्यापाराच्या कामीं तिचा सुवर्णचलनपद्धतीइतका उपयोग होत नाहीं. देशांतल्या देशांत सरकारनें काढलेल्या कागदी नोटांचा सार्वत्रिक प्रसार होऊं शकेल; व अंतर्गत व्यवहारापुरता इतर कोणत्या विनिमय-साधनांचा उपयोग करावा लागणार नाहीं. पण या कागदी नोटांचा परदेशच्या व्यापाऱ्यांचें देणें देण्यास उपयोग काय ? साधारणपणें राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारांत निरनिराळ्या देशांचे आयात–निर्गतीच्या व्यवहाराचे हिशेब परस्पर तुटतात. परंतु कोठेंहि बाकी निघाल्यास ती भरून काढण्याचें सोनें हें एकच साधन होय. या कामीं कोणत्याहि देशांत प्रचलित असलेल्या कागदी नोटांचा उपयोग होणें शक्य नाहीं. तेव्हां जोंपावेतों एखादी सार्वराष्ट्रीय बँक प्रस्थापित होऊन तिच्या नोटा जगभर मान्यता पावत नाहींत, तोंपावेतों निदान परदेशी व्यापाराकरितां तरी आपल्या संग्रहीं सोन्याचा बराच सांठा बाळगणें प्रत्येक राष्ट्रास अवश्य आहे.

एकवटलें होतें; त्यामुळें आतां त्यापैकीं बरेंचसें परदेशीं गेलें तरी अमेरिकेस काळजी वाटण्याचें कांहींएक कारण नव्हतें. आणि १९२५ नंतर अमेरिकेंतून होणाऱ्या सोन्याच्या निर्गतीस फेडरल रिझर्व्ह बोर्डानें अनुकूल असेंच धोरण स्वीकारलें. सोन्याचें देशांदेशांतून स्थलांतर कसें होतें हें मागें दर्शवितांना लहान मुदतीच्या ठेवींचें याबाबत महत्त्व काय आहे हें समजावून सांगितलें. या ठेवी जशा एका शहरांतून दुसऱ्या शहरीं जातात तसें सोनेंहि इकडून तिकडे पाठवावें लागतें; आणि या ठेवींचा प्रवाह व्याजाच्या दरांवर अवलंबून असतो.

आतां येथें एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे ती ही कीं, हुंडणावळीचा दर कायम राखणें व सोन्याच्या आयात-निर्गतीचें नियंत्रण करणें हें कार्य मध्यवर्ती बँका व्याजाचा दर खाली-वर करून करीत असतात. या व्याजाच्या दराच्या चढउतारामुळें देशांतील अंतर्गत व्यवहारावर फार महत्त्वाचे परिणाम घडून येतात आणि व्याजाच्या दराचें नियंत्रण करतांना मध्यवर्ती बँकेस जसें परराष्ट्रिय परिस्थितीकडे पाहावें लागतें, त्याप्रमाणें अंतर्गत स्थितीवरहि लक्ष ठेवावें लागतें. एखादे वेळेस या दोन प्रकारच्या परिस्थितीस अनुरूप अशीं धोरणें परस्परविरोधी आढळून येतात आणि यामुळें एकंदर सुवर्णमानपद्धतींत घोटाळा उडण्याचा फार संभव असतो. हा असा घोटाळा उडण्याचा विशेष संभव अलीकडे उद्भवण्याचें एक कारण म्हणजे जगांतील एकंदर सोन्याचा पुरवठा हा फार मुबलक नाहीं. देशांदेशांतील कायद्यानें घालून दिलेली किमान मर्यादा लक्षांत घेतां बाकी फाजील सोनें फारसें संचयांत नाहीं. यामुळें सोन्याचें स्थलांतर बरेंचसें होऊं लागल्यास बहुतेक देशांतील मध्यवर्ती बँका लवकरच पेंचांत पडण्याचा संभव असतो. १९२७ सालीं मात्र अमेरिकेची अशी स्थिति नव्हती आणि त्यामुळें फेडरल रिझर्व्ह बोर्डानें सोन्याच्या निर्गतीस पूर्ण मुभा दिली, इतकेंच नव्हे तर आपला व्याजाचा दर कमी ठेवून या निर्गतीस उत्तेजनच दिलें. पण हें धोरण स्वीकारण्याच्या वेळेस एक बिकट प्रश्न उपस्थित झाला तो असा. १९२५ सालापासून १९२७ सालपावेतों फ्रान्समध्यें एकंदर चलनपद्धतीबाबत बरीच अनिश्चितता वाटत असल्यामुळें फ्रान्समधून बराच पैसा अमेरिकन बँकांत ठेवींच्या रूपानें आलेला होता; तेव्हां हीं दोनतीन वर्षें अमेरिकेंत सोन्याचा संचय आणखीच वाढला व पैशाचा पुरवठा मुबलक होऊन व्याजाचे दर कमी झाले. या कालांतच एकंदर भरभराट होऊन मोटारी, विजेचीं निरनिराळीं यंत्रें, रेडिओ वगैरेंची पैदास फार वाढून एकंदर कंपन्यांच्या शेअरांची किंमत वाढूं

लागली होती. ही वाढ एकंदरींत अशीच वाढत राहणार अशी बरेच जणांची अपेक्षाहि होती. या अपेक्षेमुळें व कमी व्याजाच्या दरानें पैशाचा पुरवठा न्यूयॉर्क-मध्यें मुबलक झाल्यामुळें शेअरबाजारांत बऱ्याचशा सट्टेबाजीस याच सुमारास सुरुवात झाली. आतां फेडरल रिझर्व्ह बोर्डाला पेच पडला तो असा कीं व्याजाचा दर कमी ठेवला तर या सट्टेबाजीस उत्तेजन दिल्यासारखें होतें, पण तो वाढविला तर सोन्याचें निर्गतीस व सर्वसामान्य आर्थिक व्यवहारास अडथळा होणार. या वेळेस फेडरल रिझर्व्ह बोर्डानें आपले व्याजाचे दर वाढविले नाहींत व फ्रान्समध्यें स्थिरस्थावर होऊन बँक ऑफ फ्रान्सनें न्यूयॉर्कमधून सोनें ओढण्यास सुरुवात केली. पण अशा प्रकारें जागतिक परिस्थितीच्या दृष्टीनें इष्ट परिणाम घडून आला तरी खुद्द न्यूयॉर्कमध्यें कांहीं महिन्यांतच बिकट परिस्थिति उत्पन्न झाली. वाढत्या सट्टेबाजीस वेळेवर आळा न घातल्यामुळें सर्व प्रकारच्या शेअरांच्या किंमती व खप बेसुमार वाढला. १९२८ सालचे सुरुवातीपासूनच फेडरल रिझर्व्ह बोर्डानें व्याजाचे दर हळूहळू वाढवून व बँकांना कर्ज देतेवेळेस शक्य तितका सट्टेबाजीस आळा घालण्याविषयीं सल्ला देऊन, हा फुगलेला व्यवहार कमी करण्याचा प्रयत्न सुरू केला परंतु त्यांत यावें तसें यश आलें नाहीं. प्रथम युरोपांतून पैसा अथवा सोनें ओढलें जाण्याच्या भीतीनें व्याजाचे दर फारसे वाढविले नाहींत आणि नंतर व्याजाचे दर जेव्हां बरेच वाढविले तेव्हां त्यांचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. याचें कारण असें कीं, आतां सट्टेबाजी इतकी वाढली होती कीं, तिचें नियंत्रण करणें बँकांच्या आंवाक्याबाहेर गेलें होतें. बँकांनीं जरी आपले व्याजाचे दर वाढविले व शेअर-बाजारास होत असलेला आपल्या पैशाचा पुरवठा अगदीं कमी केला, तरी शेअरांच्या सारख्या वाढत्या भावाकडे सर्व अमेरिकेंतील माणसांचें लक्ष इतकें वेधलें होतें कीं, जिकडूनतिकडून शेअरबाजारांत गुंतविण्याकरितां पैसा न्यूयॉर्कला येऊं लागला. इतकेंच नव्हे, तर अमेरिकेंतून दरवर्षी इतर देशांत पाठविल्या जाणाऱ्या कर्जाऊ रकमा कमी होऊन तें भांडवल असेंच शेअरबाजारांत गुंतलें गेलें व लहान मुदतीच्या ठेवी युरोपांतून न्यूयॉर्कला येण्याचाहि ओघ सुरू झाला. शेवटीं ऑक्टोबर १९२९ मध्यें या सट्टेबाजीचा फुगा नेहमींप्रमाणें एकदा फुटला. दोन तीन दिवसांत शेअरांच्या किंमती अर्ध्याहून अधिक उतरल्या व एकदम मंदीचे दिवस आले.

अमेरिकेंतील मंदीच्या दिवसास ऑक्टोबर १९२९ मध्यें जरी खरी सुरुवात झाली, तरी इतर देशांत याच्या आधींच व्यवहारास ओहोटी लागली होती. आर्थिक अडचणी प्रथम उत्पन्न झाल्या त्या अर्जेंटाईन, ऑस्ट्रेलिया, कानडा

इत्यादि देशांत. या सर्व देशांचें जीवित गहूं व कच्च्या मालाची पैदास व विक्री यांवर अवलंबून आहे. हे देश मुख्यतः कृषिप्रधान आहेत एवढेंच नव्हे, तर या देशांतील शेती बहुधा मोठ्या प्रमाणावर यंत्रांच्या साहाय्यानें करण्यांत येते व लोकसंख्या विरळ असल्यामुळें पैदाशीचा फार मोठा भाग परदेशीं पाठविण्यांत येतो. अलीकडे या देशांत उत्पादनाची वाढ फार सपाट्यानें झाली होती. त्यांतच १९२८ सालचें पीक फार चांगलें आलें आणि मालाच्या किंमती हळूहळू उतरूं लागल्या. या राष्ट्रांची स्थिति हिंदुस्थानापेक्षां फारच भिन्न आहे हें लक्षांत घेणें जरूर आहे. हिंदुस्थान देश कृषिप्रधान खरा, पण त्याची भरभराट परदेशी व्यापारावर तितकीशी अवलंबून नाहीं. कारण येथील बरीच निपज देशांतल्या देशांतच खपते. तसेंच अर्जेंटाईन व ऑस्ट्रेलिया या देशांस परदेशांचें जितकें देणें आहे तितकें हिंदुस्थानास नाहीं. परदेशी भांडवल नेहमीं कर्जाऊ मिळण्यावरच या देशांतील कारखानदार व मळेवाले विसंबून असतात. आतां मालाच्या किंमती एकदम खालावल्या व एकंदर व्यवहारांत मंदी आली म्हणजे या देशांची सर्व बाजूंनीं त्रेधा उडते. मालाच्या मोबदला पैसा कमी मिळतो तेव्हां आयातीच्या मालाची किंमत चुकविण्यास पैसा पुरत नाहीं. तसेंच पूर्वीं काढलेल्या कर्जावरील व्याज-मुद्दलाचे हप्ते वेळोवेळीं भरणें अशक्य होतें; व नेहमींप्रमाणें बाहेरून नवीन रकमा कर्जाऊ मिळत नाहींत. म्हणून मळेवाले व कारखानदार यांना आपले व्यवहार पूर्ववत् चालू ठेवणें मुष्किल जातें. त्यांतल्या त्यांत या खेपेस कच्चा माल व गहूं यांच्या किंमती पक्क्या मालाच्या किंमतीच्या मानानें जास्त उतरल्यामुळें या देशांचे फारच हाल झाले. येणेंप्रमाणें १९२८ सालींच कांहीं देशांची परिस्थिति कठीण होऊं लागली होती. त्यांतच न्यूयॉर्कमधील शेअर बाजार बसल्याचें निमित्त झालें व ऑक्टोबर १९२९ पासून सर्वच मालाच्या किंमती भराभर उतरूं लागल्या.

अर्जेंटाईन, ऑस्ट्रेलिया यांप्रमाणें जर्मनीची परिस्थितिहि विशेष लक्षांत घेण्याजोगी आहे. वर दर्शविल्याप्रमाणें १९२४ पासून १९२९ पावेतों जर्मनीनें मोठमोठीं कर्जें काढून आपला संसार थाटला होता. या अवधींत साडेसहा अब्ज रुपयांहून कांहीं अधिक रक्कम खंडणीरूपानें जर्मनीनें इतर राष्ट्रांस पोहोंचविली. तरीहि दरवर्षीं मालाच्या आयातीची किंमत निर्गतीपेक्षां अधिक असे. १९२६ सालीं जर्मन व्यापार कांहीं अंतर्गत कारणांमुळें बसला होता. हें वर्ष सोडल्यास १९२४ ते १९२९ हीं पांच वर्षें नवीन भांडवल बाहेरून सारखें जर्मनींत येत होतें. १९२९ सालच्या उत्तरार्धापासून ही स्थिति एकदम बदलली. भांडवलाचा ओघ एकदम थांबला व कांहीं काळानंतर हा उलट सुरू होतो कीं काय अशी भीति वाटूं लागली.

जर्मनी औद्योगिक राष्ट्र असल्यामुळें नवीन खालावलेल्या किंमती जर्मनीस एकदम भोंवल्या नाहींत. किंबहुना कच्चा माल विशेष स्वस्त झाल्यामुळें १९३० सालीं एकंदर मालाच्या आयात—निर्गतीच्या हिशेबांत जर्मनीच्या नांवें न निघतां बाकी निघाली. आणि या सालीं खंडणी देण्यास कर्जाची जरूरी प्रथमच भासली नाहीं. अर्थात् हें घडवून आणण्याला एकंदरीत प्रयास बरेच पडले. किंमती कमी झाल्याचे परिणाम जर्मनीस लगेच भासले नाहींत, तरी वर्ष दीड वर्षानें ते भासूं लागले. खंडणी द्यावयाची रक्कम सोन्याच्या स्वरूपांत ठरविलेली, म्हणून जसजशा मालाच्या किंमती कमी होऊं लागल्या, तसतसा खंडणीचा बोजा राष्ट्राला जास्त जास्त असह्य होऊं लागला. कारण कीं, आतां पूर्वीइतकी खंडणी देण्याला बराच जास्त माल परदेशांस विकणें अवश्य होतें. याकरितां जर्मन सरकारास आपल्या करांचा बोजा वाढवावा लागला, व त्यामुळें एकंदर सर्वच वर्गास ही परिस्थिति जाचक झाली. यांतच जसजशी मंदी जास्त वाढूं लागली तसतसें बेकारीचें मान वाढून कांहीं कारखाने बसूं लागले आणि इतर देशांतील विशेषतः ऑस्ट्रियांतील परिस्थिति अत्यंत बिकट झाली. Ersdi Anstalt या ऑस्ट्रियांतलि प्रमुख बँकेस १९३१ च्या मे महिन्यांत सर्व व्यवहार थांबवावे लागले तेव्हां तर वेळ अगदीं आणीबाणीची आली. १९३० सालीं जर्मनीनें जेमतेम खंडणीचे हप्ते भरले, पण या वर्षी ते भरणें अशक्य आहे असें स्पष्ट दिसूं लागलें. यामुळें राजकीय परिस्थितिहि अत्यंत नाजूक बनली व परदेशच्या ज्या ठेवीदारांनीं जर्मन बँकांत पैसे ठेवले होते ते काढून नेण्याकडे त्यांची साहजिक प्रवृत्ति होऊं लागली. आतां जर्मनीनें कर्जाऊ म्हणून ज्या रकमा घेतल्या होत्या त्या सर्वच लांब मुदतीच्या नव्हत्या. बरींचशीं लांब मुदतीचीं कर्जें जर्मन सरकार व कारखानदार यांनीं काढलेलीं होतीं. त्यांवर सालोसाल द्यावयाचें व्याज बरेंच होतें. परंतु या कर्जाचें मुद्दल एकदम परत मागणें हें परदेशी सावकारांस करितां येण्याजोगें नव्हतें. पण या कर्जाबरोबरच बऱ्याच लहान मुदतीच्या ठेवी परदेशी व्यापाऱ्यांनीं जर्मनींत ठेविल्या होत्या; कां कीं, जर्मनींतील व्याजाचा दर बरींच वर्षे तेजीचा होता. या अशा मुदतीच्या ठेवींची एकंदर रकम ही बाल कॉन्फरन्सच्या रिपोर्टांत जवळ जवळ साडेतीन अब्ज रुपये अशी दिली आहे. ( एकंदर लहान मुदतीच्या ठेवींची रक्कम सात अब्ज रुपये होती. पण जर्मन बँकांच्या परदेशच्या ठेवी जवळ जवळ साडेतीन अब्ज रुपये होत्या. तेव्हां या बाबींत ऐन देणें साडेतीन अब्ज निघालें ). अर्थात् एवढी मोठी रक्कम एकदम मागूं गेल्यास कोणत्याहि राष्ट्रास थोड्या अवधींत परत करणें अशक्य आहे. तेव्हां जर्मन

आणखीहि एक महत्त्वाचा मुद्दा आहे तो असा कीं, सुवर्णमापनपद्धतींत तिचा स्वीकार ज्या राष्ट्रांनीं केला असेल त्यांच्या मधील हुंडणावळीच्या दरांत स्थैर्य आपोआप येतें. हें कसें तें वर दर्शविलेंच आहे. कागदी चलनपद्धतीचें तसें नाहीं. प्रत्येक देशांत जरी सुनियंत्रित अशी कागदी चलनपद्धति प्रस्थापित झालेली असली, तरी या सर्व देशांत मिळून असें एकच मूल्यमापनसाधन प्रचलित नसल्यामुळें हुंडणावळीच्या दरांत स्थैर्य राहणार नाहीं. तर प्रत्येक देशाचा दुसऱ्या कोणत्याहि देशाशीं हुंडणावळीचा दर त्या देशांतील कागदी पैशाच्या किंमतीच्या प्रमाणांत बसेल. सुवर्णमानपद्धतींत हुंडणावळी अगदीं स्थिर राहून सोन्याच्या पुरवठ्याच्या मानानें सर्वच जगांतील किंमती खालींवर होतात; परंतु प्रत्येक देशांत कागदी चलन व मूल्यमापनपद्धति प्रस्थापित झाली असल्यास आपापल्या देशांतील किंमतींचें मान नियंत्रित करणें प्रत्येक राष्ट्रास जरी शक्य झालें तरी त्याला हुंडणावळीच्या दरांवर कांहीं ताबा चालवितां येत नाहीं. आतां हुंडणावळींचे दर जोंपावेतों स्थिर नाहींत तोंपावेतों राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारास थोडाबहुत अडथळा उत्पन्न होतो; व बँकांचे इतर देशांशीं जे व्यवहार असावयाचे त्यांत विशेष अडचणी उद्भवतात. याकरितां परदेशी व्यापारावर व परदेशांशीं होत असलेल्या पतपेढ्यांच्या व्यवहारावर भिस्त असणाऱ्या इंग्लंड सारख्या राष्ट्रास सुवर्णमानपद्धतीचा शक्य तितका लवकर पुनरुद्धार करणें श्रेयस्कर वाटल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं.

## महायुद्धानंतर सुवर्णमानपद्धतीचें स्वरूप

१९२४ सालच्या पुढील पांचसहा वर्षांत जवळजवळ सर्वच प्रमुख राष्ट्रांनीं सुवर्णमानपद्धति पुनः अमलांत आणिली; परंतु या पुनः स्थापित झालेल्या पद्धतीचें स्वरूप या कालांत कांहींसें बदललें होतें. तें कसें याचें दिग्दर्शन केलें पाहिजे. महायुद्धाच्या कालांत जेव्हां बहुतेक राष्ट्रांनीं सुवर्णमानपद्धति सोडून दिली तेव्हां सोन्यास एकंदर मागणी बरीच कमी झाली, व खाणींतून नवीन निघालेल्या सोन्यास अमेरिकेसारखें एखादेंच गिऱ्हाईक राहिलें. यामुळें सोन्याचा भाव उतरला, सोन्याची पैदास कमी झाली व अमेरिकेंतीलहि किंमती वाढल्या. बाकीच्या देशांतील किमती इतर कारणांमुळें अतोनात वाढतच होत्या. आतां जेव्हां सर्व राष्ट्रें पुनः सोन्याशीं संबंध जोडण्याचा विचार करूं लागलीं, तेव्हां एकंदर व्यवहाराचा वाढलेला पसारा व दरम्यान वाढलेल्या किंमती या दोहोंचा विचार करितां अखिल जगांतील सुवर्णसंग्रह पुरेसा पडणार नाहीं, हें उघड दिसूं लागलें. तसेंच महायुद्धांत भाग घेतलेल्या बहुतेक सर्व राष्ट्रांचा युद्धपूर्वकालीन

सुवर्णनिधि नष्टप्राय झाला होता अथवा बराच कमी झाला होता; तेव्हां पुनः सोनें सांठवूं लागणें त्यांस अवश्य होतें. यामुळें जरी सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार करणें असलें तरी असें करतांना सोन्याचा अत्यंत काटकसरीनें उपयोग करणें प्रत्येक राष्ट्रास प्राप्त झालें. महायुद्धाच्या काळांत सोन्याचें नाणें नाहींसें होऊन एकंदर जनतेस सर्रहा कागदी पैशाचा उपयोग करण्याची संवय झाली होती. नाणें मिळूं शकलें नाहीं तर सामान्य माणसाचा विश्वास कागदी चलनावरून उडतो, अशा प्रकारचे सिद्धान्त महायुद्धानें खोटे ठरविले; तेव्हां नाण्यांचा प्रसार करणें अनावश्यक आहे हें सर्व राष्ट्रांस पटून सोन्यांत ही एक मोठीच बचत आयती घडवितां आली. सोन्याचें नाणें पाडून चालू करणें हा मार्ग युद्धानंतर कोणत्याच राष्ट्रानें स्वीकारला नाहीं. नाणें नित्य व्यवहारांत येत नसल्यामुळें बैंकांना सोनें राखणें अनावश्यक झालें. गेल्या दहापंधरा वर्षांत बहुतेक सर्व राष्ट्रांनीं मध्यवर्ती बँका स्थापिल्या, आणि पतीच्या एकंदर व्यवहाराचें व चलनपद्धतीचें नियंत्रण त्यांजवर सोंपविलें. तेव्हां प्रत्येक खाजगी बँकेस आपला निराळा सुवर्णसंचय करण्याची कांहीं गरज नाहीं. मध्यवर्ती बँकेंत आपल्या खात्यांत जमा असलेली रक्कम ही सुवर्णनिधिसारखीच लेखण्यास हरकत नाहीं. यामुळें बहुतेक राष्ट्रांतील सर्व सोन्याचा सांठा एकाच ठिकाणीं— म्हणजे मध्यवर्ती बँकेच्या कोठारांत हल्लीं असतो. या दृष्टीनेंहि सोन्याचा अलीकडे काटकसरीनें उपयोग करितां येतो. पूर्वीं नाणें, निरनिराळ्या बँकांचा निधि व मध्यवर्ती बँकेचा निधि अशा तीन स्वरूपांत सोनें आढळत होतें तें आतां सर्व एकत्र झालें आहे; व या मध्यवर्ती बँकांतील सुवर्णसंचयावरच चलनपद्धतीची सर्व इमारत आज उभारलेली आहे.

सोन्याचें नाणें वापरांत नसल्यामुळें जुन्या पद्धतींतील एक महत्त्वाचें अंग नाहींसें झालें. आतां टांकसाळींत नाणें पाडून घेण्याचा हक्क कायद्यांत नमूद करितां येत नाहीं; व त्यामुळें चलनी पैशाची किंमत व सोन्याची किंमत सारखी राखण्यासंबंधीं जुनी योजना अमलांत आणणें शक्य नाहीं. याकरितां अलीकडे कायद्यांत नवीनच तरतूद केलेली असते, ती अशी. सोन्याचा मूल्यमापनाकडे उपयोग करण्यांत आला म्हणजे राष्ट्रांराष्ट्रांमधील घारण व देशांतील धारण यांत फरक पडणें शक्य नाहीं हें वर दर्शविलेंच आहे. तेव्हां चलनी पैशाचा जो सोन्याशीं संबंध जोडावयाचा तो अंतर्गत व्यवहारांत जोडला काय किंवा परदेशी व्यवहारांत जोडला काय त्याचा परिणाम एकच व्हावयाचा हें उघड आहे. सोन्याचें नाणें चलनांतून काढल्यावर अंतर्गत व्यवहारांत

बँकांस या ठेवी परत करितां आल्या नाहींत व त्यामुळें सर्वत्र व्यवहारांत आणखीच अनिश्चितता उत्पन्न झाली. प्रे. हूवर यांच्या जाहीरनाम्यानंतर जर्मनीस कोणत्या प्रकारें मदत करितां येईल याबद्दल बोलला प्रमुख प्रमुख युरोपीय बँका व अमेरिकेंतील फेडरल रिझर्व्ह बोर्ड यांच्या प्रतिनिधींची परिषद भरली. त्यांत त्यांनीं जर्मन बँकांत असलेल्या लहान मुदतींच्या ठेवी परदेशी बँकांनीं आणखी सहा महिने तरी काढणार नाहीं असें जर्मनीस आश्वासन द्यावें हा तात्कालिक उपाय सुचविला. त्याप्रमाणें जर्मनीस आश्वासन देण्यांत आलें व जर्मनीवर आलेलें गंडांतर सहा महिने पुढें ढकललें गेलें.

किंमती खालावून व्यवहार बसला कीं प्रथम कर्जदारांची धांदल उडते; पण कर्जदार दिवाळखोर बनल्यास सावकाराचीहि तीच अवस्था होणार. प्रथम ऑस्ट्रेलिया व दक्षिण अमेरिकेंतील बरींच राष्ट्रें यांची गाळण उडाली; नंतर जर्मनीस हात टेकावे लागले व शेवटीं पाळी आली इंग्लंडचीच. अमेरिका, फ्रान्स या इतर धनको राष्ट्रांच्या आधीं इंग्लंडचीच अशी स्थिति कां व्हावी याचें थोडक्यांत दिग्दर्शन आतां केलें पाहिजे. इंग्लंड हें महायुद्धापूर्वी सबंध जगाचें प्रमुख सावकार होतें व अजूनहि तें अमेरिकेच्या बरोबरीनें आहे. इंग्लंडची सावकारी किती मोठी आहे, याची कांहींशी कल्पना इंग्लंडच्या परदेशी व्यापारासंबंधीं दिलेल्या पुढील आंकड्यांवरून सहज येण्यासारखी आहे. १९२७ पासून १९३० पर्यंतच्या आंकड्यांची येथें सरासरी देत आहों. एकंदर मालाच्या आयात–निर्गतीचा हिशेब घेतल्यास युनायटेड किंगडममध्यें ३६ ते ३९ कोट पौंड किंमतीचा माल जास्त येत असे. म्हणजे आयात झालेल्या मालाची किंमत निर्गतीच्या मालाच्या किंमतीपेक्षां एवढी जास्त असे. पण यु. किं. चें इतर उत्पन्न यांत जमेस घेतलें नाहीं. हें उत्पन्न म्हणजे मालाच्या वाहतुकीबद्दलचें भाडें, बँका, विमा कंपन्या इत्यादींचें कमिशन आणि परदेशी कर्जाऊ दिलेल्या व भांडवल म्हणून घातलेल्या रकमांवरील व्याज व नफा. १९२७ सालापासून १९२९ पावेतों आंकडे घेतल्यास ब्रिटिश जहाज कंपन्यांचें उत्पन्न म्हणून १३ ते १४ कोट पौंड, परदेशी घातलेल्या भांडवल वगैरेंचें २७ ते २८ कोट पौंड, पेढ्यांच्या व्यवहाराबद्दल जवळ जवळ ६ कोट पौंड व इतर कांहीं किरकोळ उत्पन्न मिळून एकंदर सुमारें ५० कोट पौंड दरवर्षी इंग्लंडचें जादा उत्पन्न होतें. जादा आयात मालाची किंमत वजा जातां एंन बाकी ११ ते १५ कोट पौंडांची निघत असे व यांतील बहुतेक रक्कम म्हणजे दहाबारा कोट पौंड दरवर्षी पुन्हा परदेशांत यु. किं. मधून जात असत. मंदीचे दिवस आल्याबरोबर हें कोष्टक बदललें. १९३० सालीं या सर्वच

बाबींवरचें उत्पन्न कमी होऊन तें सुमारें ४३ कोट पौंड एवढेंच झालें. आयात-निर्गतींतील फरक त्या मानानें उतरला नाहीं व त्यामुळें १९३० सालची ऐन बाकी चार कोट पौंड एवढीच निघाली. १९३१ सालीं उत्पन्नाच्या बाबी अर्थात् याहून-हि कमी झाल्या आहेत. कांहीं जणांच्या अदमासाप्रमाणें या वर्षाच्या शेवटीं ऐन बाकी न निघतां ऐन देणेंच निघण्याचा संभव जास्त आहे. असें जरी झालें तरी यामुळेंच सुवर्णमानपद्धतीचा इंग्लंडला त्याग करावा लागला असें बिलकूल नाहीं. एवढेंच कीं, या सालीं नेहमींइतकी परिस्थिति निर्धास्त नव्हती.

सुवर्णमानपद्धतीचा त्याग करावा लागण्याचें कारण म्हणजे पौंडाच्या स्थैर्या-बद्दल उत्पन्न झालेला परदेशीयांच्या मनांतील गैरविश्वास हेंच होय. इंग्लंडवर जें हें अरिष्ट ओढवलें तें केवळ गैरविश्वासामुळें ओढवलें याबद्दल ऐकमत्य आहे. गैर-विश्वास उत्पन्न होण्याला एक कारण म्हणजे इंग्लंडची परदेशी व्यापाराबद्दलची परिस्थिति हें खरें; पण हें मुख्य कारण नव्हे. एखाद्या वर्षी परदेशी व्यापारांत देणें निघणें हें इंग्लंडसारख्या सावकार राष्ट्रास फारसें धोक्याचें नाहीं. हें देणें परदेशांत असलेल्या भांडवलाचा अगदीं अल्प भाग कमी करून सहज चुकवितां येण्यासारखें आहे. गैरविश्वास उत्पन्न होण्याइतकी नाजूक परिस्थिति मुख्यतः दोन कारणांमुळें घडून आली. एक जर्मनीची अडचण व दुसरें मे कमिटीचा रिपोर्ट. जर्मनीच्या परिस्थितीचा विचार वर केलाच आहे. हिचा इंग्लंडवर असा परिणाम झाला कीं, इंग्रज बँकांनीं ज्या बऱ्याच रकमा लहान मुदतीच्या ठेवी म्हणून जर्मन बँकांत ठेविल्या होत्या त्या एकाएकीं अडकून पडल्या. एकंदर जर्मनींत जुलै १९३१ मध्यें लहान मुदतीच्या जवळ जवळ ७ अब्ज रुपयांच्या ज्या ठेवी होत्या, त्यांपैकीं दीड अब्जावर रक्कम इंग्रज बँकांची होती. ही रक्कम आणखी निदान सहा महिने तरी मिळत नाहीं असें जेव्हां ठरलें तेव्हां इंग्रज बँकांत ज्या परदेशीयांनीं ठेवी ठेविल्या होत्या त्यांना आपल्या पैशाबद्दल साहजि-कच काळजी वाटूं लागली. लंडनमधील परदेशीयांच्या या ठेवींची रक्कम नेहमींच फार मोठी असते. लढाईपूर्वी राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापारांतील हुंड्यांचा व्यवहार, ऋणको राष्ट्रांचें कर्ज उभारणें, अशा प्रकारच्या सर्व महत्त्वाच्या पैशाच्या व्यव-हाराचें जगांतील मुख्य केंद्र म्हणजे लंडन हेंच होतें. महायुद्धानंतर न्यूयॉर्क बरेंच पुढें सरसावलें आहे व पॅरिसहि बरेंच महत्त्वास पावलें आहे. तरी लंडनचें प्रामुख्य फारसें कमी झालें नाहीं. यामुळें लंडनमधील बँकांत आपलीं खातीं उघडणें व बराचसा व्यवहार पौंडांत करणें या गोष्टींची जगांतील बहुतेक सर्व देशांच्या बँकांस संवय झाली आहे. तसेंच महायुद्धानंतरच्या सुवर्णमानपद्धतींत

सोनें देण्याऐवजीं परदेशी हुंड्या पटविण्याची कांहीं मुभा मध्यवर्ती बँकांस दिलेली असते. या हुंड्या पटविण्याकरितां या बँकांस परदेशांत बरीच मोठी रक्कम ठेवणें अवश्य आहे व अशी रक्कम साधारणपणें न्यूयॉर्क अथवा लंडनमध्येंच ठेवण्याचा विशेष प्रघात आहे. मॅकमिलन कमिटीनें एकंदर लहान मुदतीच्या ठेवी लंडनमधील बँकांत परदेशीयांनीं किती ठेविल्या होत्या याची माहिती दिली आहे. या माहितीवरून हुंड्यांचा व्यवहार व ठेवी यांत अल्प मुदतींत काढून घेण्यासारखा परकी पैसा १९३० व १९३१ या सालांत जवळ जवळ ४० ते ४५ कोट पौंड एवढा असे असें दिसतें. ही एवढी रक्कम लंडनमध्यें नेहमींचीच गुंतलेली असावयाची या समजुतीवरच लंडनमधील व्यवहार नेहमीं चालत असत. उलट लंडनमधून परदेशी लहान मुदतीच्या ठेवी जात असतच, पण त्यांची रक्कम लंडनमधील परक्या पैशाचे निम्म्यानेंसुद्धां नसे. आणि आतां या रकमेचा बराच मोठा भाग जर्मनींत अडकून बसल्यासारखा झाला होता. शिवाय आणखी एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे, ती अशी कीं, इंग्लंडमधून लांब मुदतीचें कर्ज परदेशांस पुरविण्याचा विशेष प्रघात महायुद्धापूर्वींपासूनचा पडलेला आहे. तेव्हां लंडनमधून इतर ठिकाणीं जें भांडवल व ज्या रकमा जात त्या लहान मुदतीच्या ठेवींच्या रूपानें नसून लांब मुदतीचें कर्ज अथवा उद्योग-धंद्यांत गुंतविलेलें भांडवल या स्वरूपाच्या असत. यामुळें कांहीं वेळेस लंडन-मधील या व्यवहारास अल्प मुदतीचें एकाचें कर्ज काढून दुसऱ्यास लांब मुद-तीनें देणें असें स्वरूप येई. जोंपर्यंत गैरविश्वास उत्पन्न झाला नाहीं, तोंपर्यंत यांत विशेष धोका नव्हता; पण जर्मनीची बिकट अवस्था झाल्यानंतर जिकडे तिकडे गडबड उडाली व लंडनमधील पैशाचीहि शाश्वती काय अशी सहजच शंका उत्पन्न झाली.

यांतच मे कमिटीच्या रिपोर्टानें भर टाकली. १९३१ सालच्या सुरुवातीस पार्लमेंटांतील विरोधी पक्षांनीं बरीच ओरड करून मजूर सरकारास ही काटकसर कमिटी नेमण्यास भाग पाडलें. यांत विशेषतः लंडनमधील कांहीं प्रमुख भांडवल-वाल्यांचा समावेश करण्यांत आला होता. या कमिटीनें जुलै महिन्यांत आपला रिपोर्ट सादर केला. या रिपोर्टांत इंग्लंडच्या एकंदर फडणिशी कारभाराबद्दलचें चित्र अगदीं भडक रंगांत रंगविलें होतें. राष्ट्रीय उत्पन्नाची उधळपट्टी चालली असून सालोसाल भयंकर तूट येत आहे असें यांत प्रतिपादन केलें आहे. एकंदर रिपोर्ट अतिशयोक्तिपूर्ण आहे व त्यांत जितकी परिस्थिति कठीण म्हणून वर्णन केलें आहे, तितकी ती नाहीं असें आतां बहुतेकजण कबूल करतात. परंतु

या रिपोर्टाचा तात्कालिक परिणाम फार झाला. मजूर सरकारास घाबरवून बेकार-वेतन कापविण्याचा यांत भांडवलवाल्यांचा डाव होता व त्यांत बँकाहि सामील होत्या असा मजूरपक्षीय पुढाऱ्यांचा आक्षेप आहे. तें कांहीं असलें तरी रिपोर्टा-मुळें मजूरपक्ष घाबरून त्यांत फूट पडली हें खरें, पण फक्त मजूरपक्षच घाबरला असें नाहीं तर परदेशीय ठेवीदारसुद्धां घाबरले. म्हणजे बँकांचा खरोखरच कांहीं डाव यांत असला तर मग त्यांच्या दृष्टीनें अगदीं विपरीत असाच परिणाम घडून आला; आणि एव्हांपासून ठेवी सारख्या भराभर निघण्यास सुरुवात झाली.

या लहान मुदतीच्या ठेवी विशेषतः फ्रेंच लोकांच्या होत्या. फ्रान्समध्यें जवळजवळ १९२७ सालापावेतों चलनाबाबत अस्थिरता असल्यामुळें या सार्व-राष्ट्रीय पैशाचे व्यवहारांत फ्रेंच बँका वगैरेंनीं फारसा महत्त्वाचा भाग घेतला नव्हता. तोंपावेतों फ्रेंच लोकांची बाहेर, विशेषतः न्यूयॉर्कमध्यें, पैसा ठेवावयाचीच प्रवृत्ति विशेष होती. १९२७ नंतर हा पैसा बराचसा सोन्याचे रूपानें फ्रान्स-मध्यें परत आला. १९२७ च्या पुढें फ्रान्समध्यें बरीच भरभराट होती व एकंदर राष्ट्रीय उत्पन्नांतून सालोसाल बरीच शिल्लक पडत होती. महायुद्धापूर्वी फ्रान्सनें इतर देशांत, विशेषतः रशियांत, बराच पैसा गुंतविला होता. हा रशियांतील पैसा तेथील राज्यक्रांतीमुळें साफ बुडून फ्रेंच भांडवलवाल्यांस चांगलीच ठोकर बसली. यामुळें पुनः लांब मुदतीचीं कर्जें देण्यास फ्रेंच लोकांचें मन घेईना. शिवाय 'बँक ऑफ फ्रान्स'नेंहि जरी तिच्याजवळ सोनें मुबलक झालें, तरी व्याजाचा दर पुष्कळ कमी करून अथवा इतर कोणत्याहि रीतीनें पैशाचा पुरवठा वाढविण्याची सोय केली नाहीं. म्हणून मालाच्या आयात-निर्गतीवर सोन्याच्या विपुलतेचा जो आपोआप परिणाम महायुद्धापूर्वी घडून आला असता तो घडून आला नाहीं. एकंदर फ्रेंच लोकांची प्रतिवार्षिक बचत गेलीं दोन तीन वर्षें भांडवल म्हणून उप-योगांत येण्याऐवजीं ही सर्व रक्कम लहान मुदतीच्या ठेवींच्या रूपानें निरनिराळ्या देशांत फिरत आहे. तेव्हां एक तर भांडवलाच्या तुटवड्यामुळें उद्योगधंद्यांस ओढ पडली; व दुसरें असें कीं, लहान मुदतीच्या ठेवी बेसुमार वाढल्यामुळें एकंदर चलनपद्धतींत अनिश्चितता उत्पन्न झाली. असो.

इंग्लंडनें केलेल्या सुवर्णमानपद्धतीच्या त्यागाची ही अशी कारणपरंपरा आहे. जर्मनींतील ठेवी परत मिळण्याची अडचण, एकंदर राष्ट्रीय उत्पन्नाच्या महत्त्वाच्या बाबींत येत असलेली तूट व त्यामुळें परदेशी व्यापाराचा झुकता हिशेब, व राष्ट्रीय फडणिशी कारभाराची मे-कमिटीनें चितारलेली चिंताजनक परिस्थिति या सर्वांचा परिणाम इतर ठेवीदारांवर साहजिक झाला आणि त्यांनीं आपले पैसे

पैशाचा व सोन्याचा संबंध जोडणें शक्य नाहीं, कारण या व्यवहारांत सोनें कोणत्याच स्वरूपांत आतां वापरांत येत नसतें. पण राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापारांत अद्यापि सोनें वापरावें लागतेंच; तेव्हां कोणासहि सोनें लागल्यास तें एका ठराविक भावानें नोटांच्या मोबदला देण्याचें अथवा जेथें सुवर्णमानपद्धति प्रचलित आहे अशा देशावर हुंड्या ठराविक भावानें विकण्याचें बंधन मध्यवर्ती बँकांवर अलीकडे कायद्यानें घातलेलें असतें. या दोन्ही प्रकारच्या बंधनाचा परिणाम एकच होतो. कारण व्यापारी लोक सोनें घेतात तें बहुधा परदेशांत पाठविण्याकरितांच होय. तेव्हां सोनें दिलें काय अथवा परदेशीं ठराविक भावानें हुंड्या पटविण्याची व्यवस्था केली काय दोहोंचा अर्थ एकच. या पद्धतींत मूल्य-मापनांत कांहीं फरक पडला नाहीं. मूल्यमापनाचें साधन सोन्याची किंमत हेंच अद्यापि आहे. कागदी पैशाचे ऐवजीं सोन्याचें नाणें मिळण्याचा हक्क आतां राहिला नसून प्रत्यक्ष सोनें अथवा परदेशांतील पैसा मिळण्याची व्यवस्था झाली एवढेंच. कागदी पैशाचा व सोन्याचा संबंध कायदेशीररित्या ठरविला गेला अस-ल्यामुळें पैशाची किंमत व धातूची किंमत यांत तफावत पडणें पूर्वीप्रमाणें आजहि अशक्य आहे.

मग या नवीन पद्धतींत सोन्याची बचत होण्यापलीकडे बदल कोणता झाला ? मुख्य बदल झाला तो हा कीं, आतां पूर्वीपेक्षां कितीतरी पटींनीं पैशाचा पुरवठा कमीजास्त करण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकांवर पडली. पूर्वी नाणें पाडून घेण्याचा हक्क सार्वत्रिक असल्यामुळें नवीन सोनें बाजारांतून आल्यास अथवा सोनें विशेष स्वस्त झाल्यास नाण्यांचा पुरवठा वाढविणें कोणासहि शक्य होतें. सर्व बँका सोनें बाळगीत असल्यामुळें आपला व्यवहार सुवर्णसंचयाच्या मानानें कमजास्त करीत; परंतु आज तशी स्थिति नाहीं. सर्व सोनें मध्यवर्ती बँकांच्या संग्रहीं आहे. तसेंच नोटा काढण्याचें कामहि बहुतेक ठिकाणीं या बँकांकडे सोप-विलेलें असतें. तेव्हां आपण ठरविलेल्या धोरणानुसार पैशाचा पुरवठा वाढविणें अथवा कमी करणें मध्यवर्ती बँकांस कांहीं अंशीं शक्य झालें आहे. म्हणजे ज्या गोष्टी महायुद्धापूर्वी बहुतेक आपोआप घडून येत असत त्या आतां तशा घडत नाहींत. सुवर्णमूल्यमापनपद्धति ही पूर्वीइतकी स्वाधीनगतिक ( automatic ) राहिली नसून ती बरीचशी मध्यवर्ती बँकांच्या नियंत्रणाखालीं आली आहे. मध्यवर्ती बँकांवर कायदेशीर निर्बंध आज आहेतच. चलनी नोटा व मध्यवर्ती बँकांचा एकंदर व्यवहार आणि सुवर्णसंचय यांचा किमानपक्षीं अमुक एक प्रका-रचा संबंध असलाच पाहिजे अशी तरतूद कायद्यानें सर्व देशांत केलेली आहे.

परंतु बहुतेक बँकांतून साधारणपणें कायद्यानें घालून दिलेल्या अत्यल्प मर्यादेहून जास्त सुवर्णसंचय करण्यांत येत असतो, त्यामुळें सोनें वाढलें अथवा कमी झालें तर त्याचा परिणाम पैशाच्या पुरवठ्यावर लागलीच दिसून येतो असें नाहीं. विशेषत: सोन्याचा संचय बराच वाढला असतांहि पैशाचा पुरवठा व पतीचे व्यवहार वाढविणें मध्यवर्ती बँकेस अनिष्ट वाटल्यास ते न वाढूं देणें ही बँकेच्या हातची गोष्ट आहे.

## सोन्याचें देशादेशांतून स्थलांतर

शेवटीं दुसऱ्या एका महत्त्वाच्या बाबीचा विचार करून हा लेख आटोपतां घेतों. राष्ट्राराष्ट्रांमधील व्यापाराचा व हुंडणावळीच्या दराचा काय संबंध आहे हें मागें दर्शविलेंच आहे. येथें लक्षांत घ्यावयाची गोष्ट म्हणजे ही कीं, मालाची खरेदी—विक्री ही जरी राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारांतील खरी महत्त्वाची बाब असली तरी हुंडणावळीच्या दरावर यांहिपेक्षां भांडवल व ठेवी यांच्या हालचालीचा परिणाम फार अधिक घडून येतो. वर्षाच्या शेवटीं ऐन देणें अथवा येणें जरी कांहीं निघालें नाहीं तरी हंगामा—हंगामाला देण्याघेण्याच्या ऐवजांत फरक पडून हुंडणावळींत फेरबदल होणें साहजिक आहे याचा उल्लेख मागें केला आहे. परंतु मालाची ने—आण जशी होते त्याप्रमाणेंच भांडवल व ठेवी यांतहि राष्ट्राराष्ट्रांत व्यवहार सारखा चालत असतो. कांहीं राष्ट्रें नेहमींचीं धनको तर कांहीं नेहमींचीं ऋणको असतात. देशाच्या आर्थिक वाढीस लागणारें पुरेसें भांडवल देशांत नसलें म्हणजे परदेशांतून कर्ज काढावें लागतें. या लांब मुदतीच्या कर्जाऊ व्यवहाराचा हुंडणावळींच्या दरावर फारसा परिणाम होत नाहीं. पण शेअर—बाजार, कापूस, गहूं वगैरे मालांत चालणारे मोठमोठे सट्टे, हुंड्यांची खरेदी—विक्री, असल्या व्यवहारांत जगांतील सर्व प्रमुख व्यापारी शहरांत पुष्कळच पैसा गुंतलेला असतो. हा पैसा कोणताहि कारखाना, शेतीभाती किंवा इतर अशा प्रकारच्या धनोत्पादक व्यवहारांत अडकून पडलेला नसून तो केवळ देवघेवींत सारखा खेळत राहिलेला असतो. तेव्हां ज्या व्यापारी केंद्रांत अशा पैशाला तात्कालिक मागणी जास्त व जेथें व्याजाचा दर वाढलेला तेथें हा पैसा चटकन वाहवण्याची सारखी प्रवृत्ति असते. मोठमोठे सावकार व मोठमोठ्या बँका लहान मुदतीच्या ठेवींच्या रूपानें पैसा कधीं या शहरीं तर कधीं त्या शहरीं, जेथें जास्त फायदा मिळण्याचा संभव अधिक तेथें, गुंतवीत असतात. अशा या मोठमोठ्या फिरत्या रकमा एक देशांतून दुसऱ्या देशांत नेल्या म्हणजे त्या देशांतील हुंडणावळीच्या दरांत अर्थात् फेरबदल घडून येणार. या फिरत्या पैशाचें स्थलांतर मुख्यत्वें व्याजाच्या दरावर अवलंबून असतें. व निरनिराळ्या

लंडनमधून परत नेण्यास सुरुवात केली. एखाद्या बँकेंतून पैसे काढण्याचा ओघ सुरू झाला म्हणजे जसा तो थांबतां थांबत नाहीं, त्याप्रमाणेंच लंडनची स्थिति झाली. इंग्रज सरकारानें २० कोटि पौंडांच्यावर रकमा न्यूयॉर्क व पॅरिस या शहरांमध्यें कर्जाऊ उभारल्या, तरीहि हा पूर ओसरण्याचीं कांहीं चिन्हें दिसेनात! 'बँक ऑफ इंग्लंड'मधील सोनें जास्त जास्त कमी होऊं लागलें व शेवटीं कायद्यानें ठरविलेल्या किमान मर्यादेहूनहि तें कमी होऊन कदाचित् सोनें पुरतेंच नाहींसें होईल कीं काय अशी बँकेस भीति वाटूं लागली; तेव्हां तिनें सुवर्णमानपद्धतीचा त्याग करण्याचा सल्ला इंग्रज सरकारास दिला - म्हणजे बँकेवर सोनें अमुक एका किंमतीस विकण्याचें व विकत घेण्याचें जें कायदेशीर बंधन होतें तें काढून घेण्यांत आलें. इंग्लंड दिवाळखोर नव्हतें; अजून अमेरिकेच्या खालोखाल सधन व सावकार राष्ट्र तेंच आहे. परंतु मोठ्या संपन्न बँकेवरहि वेळेपुरता पैसा एकदम हातीं नसल्यामुळें ठेवीदारांस नाहीं म्हणण्याची पाळी यावी तशापैकी प्रकार झाला. यामुळें मात्र पौंडाच्या हुंडणावळीच्या दरांतील स्थैर्य नाहींसें झालें व पौंड पुनः केवळ कागदी चलन बनलें. आतां सुवर्णमानपद्धति टिकवून धरणारीं प्रमुख धनको अशीं अमेरिका व फ्रान्स हीं दोनच राष्ट्रें राहिलीं आहेत; आणि पुढें काय होणार हें या राष्ट्रांच्या धोरणावर विशेष अवलंबून असल्यामुळें त्यांच्याकडे आज सर्व जगाचे डोळे लागून राहिले आहेत.

# ३ चांदीच्या भावांतील चढउतार*

गेल्या दोनतीन महिन्यांत चांदीच्या एकदम वाढलेल्या भावामुळें या धातूच्या किंमतीकडे सर्व लोकांचें पुनः लक्ष वेधलें गेलें आहे. सोन्याचांदीच्या किंमतींचे चढउतार अलीकडील वर्षांत फार झाले आहेत; व सोनेंचांदी बाळगणें हा द्रव्य-संचय करण्याचा आपल्याकडील सार्वजनिक आणि पूर्वापार चालत आलेला मार्ग असल्यामुळें या धातूंच्या किंमतींचें या देशांत सर्वांसच महत्त्व वाटतें. तेव्हां चांदीच्या वाढत्या भावाची कारणमीमांसा येथें थोडक्यांत करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

शंभर वर्षांपूर्वी जवळजवळ सर्व जगभर चांदीचींच नाणीं मूल्यमापनाकरितां मुख्यत्वें वापरलीं जात असत. सोनें फार महाग होतें व त्याचा पुरवठाहि अत्यल्प होता. १८५० पासून पुढें सोन्याच्या नवीन खाणी मोठ्या प्रमाणावर सांपडल्या-मुळें हा पुरवठा बराच वाढला व हळूहळू अनेक राष्ट्रें सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार करूं लागलीं. मध्यंतरीं बरींच वर्षें चलनपद्धतींत सोनें व चांदी या दोहोंचाहि दर्जा बऱ्याच देशांत सारखा होता. पण सोन्याचांदीच्या मागणी-पुरवठ्यांतील चढउतार सारख्या प्रमाणांत न झाल्यामुळें अशा प्रकारची द्वि-धातुमानपद्धति टिकविणें कठीण पडूं लागलें; व इंग्लंडसारख्या पुढारलेल्या राष्ट्रांनीं सोन्याचा जोराचा पुरस्कार केल्यामुळें सुवर्णमानपद्धति स्वीकारणें हें विशेष मानाचें समजलें जाऊं लागलें सारांश, महायुद्धापूर्वीच्या काळापर्यंत सुवर्णमानपद्धति कोणत्या ना कोणत्यातरी स्वरूपांत स्वीकारली आहे, अशी स्थिति चीनशिवाय इतरत्र बहुतेक जगभर येऊन पोहोंचली. याचा परिणाम अर्थात् असा झाला कीं, चांदीची मागणी फार मोठ्या प्रमाणांत घटली आणि महायुद्धानंतरहि अशीच घटत राहिली. मध्यंतरीं कांहीं विशिष्ट परिस्थितीमुळें महायुद्धाच्या काळांत चांदीचा भाव फार वाढला. हा अपवाद सोडून दिला तर चांदीचा भावहि सारखा उतर-ण्याचाच कल अलीकडे दिसून येत होता. रौप्यमानपद्धति जरी सोडून दिली तरी चांदीचीं नाणीं हरएक देशांत थोड्याबहुत प्रमाणांत वापरलीं जातातच. चीन, हिंदुस्थान, मेक्सिको इत्यादि देशांत त्यांचा प्रसार फारच मोठ्या प्रमाणांत आहे. चीन व हिंदुस्थान यांमध्यें चांदीचीं नाणींच विशेष महत्त्वाचीं; तेव्हां तेथें

---

* लोकशिक्षण, ऑगस्ट १९३५.

चांदीची सरकारी खरेदी बरीच मोठी असावयाची. पण हिंदुस्थानच्या बाबतींत असें झालें कीं, महायुद्धकाळीं हिंदुस्थान सरकारनें फारच मोठ्या प्रमाणावर चांदीची खरेदी करून ठेविली. या वेळेस नोटा प्रसृत होण्यास कठीण पडून रुपयांस मागणी फार येईल अशी सरकारची अटकळ होती; तसेंच एकंदर किंमतींचें मानहि फार वाढलेलें होतें. परंतु पुढें किंमती उतरल्या, नोटांचा प्रसार वाढूं लागला, नवीन रुपये पाडण्यास चांदी लागेनाशी होऊन जुने रुपयेच टांकसाळींत सांठूं लागले व हिंदुस्थान सरकारजवळचा रौप्यसंचय मोठा झाला. यामुळें गेल्या दहा वर्षांत हिंदुस्थान सरकार चांदीचें गिऱ्हाईक होण्याऐवजीं थोड्याबहुत प्रमाणांत चांदी विकीतच आहे. हिंदुस्थानांत चांदीची सरकारी खरेदी नसली तरी खाजगी खरेदी मात्र फार मोठ्या प्रमाणावर होते; आणि अलीकडील मंदीचीं कांहीं वर्षें सोडलीं तर चांदीची आयात हिंदुस्थानांत सारखी होत असते. भांडीं, दागिने वगैरे निरनिराळ्या प्रकारांत चांदी आपल्या देशांत वापरली जाते; व वर दर्शविल्याप्रमाणें धनसंचय करण्याचाहि तो एक राजमार्ग असल्यामुळें चांदीचा मामुली वार्षिक खप आपल्या देशांत फार मोठा आहे. चीन देशांतील परिस्थितीहि बहुतांशीं अशीच आहे व तेथील सरकारी मागणीहि मोठी आहे. तेव्हां चिनी सरकार व जनता, आणि त्याच्या खालोखाल हिंदुस्थानांतील जनता, हीं चांदीचीं महायुद्धोत्तर मुख्य गिऱ्हाइकें होतीं. याशिवाय वर दर्शविल्याप्रमाणें इतर देशांतूनहि किरकोळ नाणयांकरितां चांदी खपत असे आणि कलाकुसरीच्या कामांत व कांहीं औद्योगिक क्रियांतहि युरोप–अमेरिकेंत थोडीबहुत चांदी लागे. खालीं दिलेल्या कोष्टकावरून १९२९ व १९३२ सालीं चांदीचा खप जगभर कसा होता, हें दिसून येईल. ( आंकडे लक्ष औंसांचे आहेत. १ औंस = २॥ तोळे ).

| चांदीचा खप | १९२९ | १९३२ |
|---|---|---|
| चीन | १३७० | ४०० |
| हिंदुस्थान | ८२० | १२० |
| जर्मनी | १२० | २३० |
| युरोप-अमेरिका ( कलाकुसर व औद्योगिक क्रिया ) | ४४० | ३१० |
| नाणीं | २५० | ४८० |
| बिनहिशेबी | २९० | ५४० |
| एकूण औंस ( लक्ष ) | ३२९० | २०८० |

वरील माहितीवरून चीन व हिंदुस्थान येथील मागणी किती महत्त्वाची असे

हें सहजच ध्यानांत येईल. इतर देशांत किरकोळ नाणीं चांदीचीं असलीं तरी महायुद्धोत्तर काळांत त्यांची एतद्विषयक मागणी फार कमी झाली होती. कारण, या नाण्यांकरितां चांदीच्याऐवजीं जस्ताचा उपयोग करणें अथवा नाण्यांतील चांदीचा कस कमी करणें या उपायांचा अवलंब पैशाच्या अडचणीमुळें बहुतेक राष्ट्रांनीं केला होता. शिवाय इंडो-चीन वगैरे देशांनीं रौप्यमानपद्धति सोडून चांदीच्या नाण्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी करणें वगैरे गोष्टी या अवधींतच घडल्यामुळें एकंदर चांदीची गिऱ्हाइकी बरीच बसली. १९२९ सालपावेतों चीन-हिंदुस्थानमधील कृषिवर्ग अगदींच हलाखीच्या स्थितीला पोहोंचला नसल्यामुळें तेथें मागणी बरीच होती; आणि म्हणून चांदीचा बाजार अगदींच बसला नव्हता. १९२४ ते १९२९ या पांच वर्षांत एकंदर जगांत झालेल्या चांदीच्या विक्रीपैकीं दोनतृतीयांश चांदी चीन व हिंदुस्थान या देशांत विकली गेली. परंतु यापुढें मात्र जसजसें मंदीचें प्रमाण जास्त तीव्र होऊं लागलें, तसतशी हिंदी व चिनी मागणी कमी होऊन ती १९३२ पर्यंत जवळ जवळ नामशेष झाली. याचा परिणाम असा झाला कीं, १९२९ ते १९३२ या अवधींत चांदीची किंमत पूर्वी उतरली होती त्यापेक्षांहि झपाट्यानें उतरूं लागली.

चांदीची पैदास होते ती मुख्यत: अमेरिकेंत होते. मेक्सिको, संयुक्त संस्थानें व कॅनडा या देशांतील खाणींतून एकंदर जागतिक उत्पादनाच्या तीन-चतुर्थांश चांदी निघते. त्यांतल्या त्यांत मेक्सिकोचा क्रम पहिला व संयुक्त संस्थानांचा दुसरा लागतो. चांदीची किंमत घटली म्हणजे तोटा दोघांचा होतो. एक चांदीच्या उत्पादकांचा व दुसरा ज्यांनीं ज्यांनीं चांदीच्या रूपानें धनसंचय केला असेल त्यांचा. चांदीची किंमत घटूं लागल्यावर संयुक्त संस्थानांतील चांदीच्या खाणीवाल्यांनीं आपल्या सरकारकडे यासंबंधीं कांहीं तरी करण्याबद्दल सारखी मागणी सुरू केली. अमेरिकेंतील चांदीचे उत्पादक हे फार वजनदार लोक आहेत; आणि त्यांचा व तेथील डेमोक्रॅटिक पक्षाचा ऋणानुबंध पूर्वापार चालत आलेला आहे. पूर्वीपासून चांदी चलनपद्धतींत समाविष्ट करून तिची सरकारी गिऱ्हाइकी वाढविण्याची प्रथा त्या देशांत पडलेली आहे. त्यांतच १९३३ च्या मार्च महिन्यांत डेमोक्रॅटिक पक्षाचे अध्वर्यु प्रे. रूझवेल्ट यांची अध्यक्षाच्या जागीं निवडणूक झाली. तेव्हां चांदीची जागतिक मागणी वाढविण्याचा प्रयत्न सरकारनें करावा व चलनपद्धतींतहि चांदीचा पुरस्कार करावा याबद्दल जोरानें चळवळ सुरू झाली. याचा परिणाम असा झाला कीं, १९३३ च्या जागतिक आर्थिक परिषदेच्या वेळेस संयुक्त संस्थानांच्या प्रतिनिधींनीं चांदीचा प्रश्न प्रामु-

देशांच्या प्रमुख व्यापारी केंद्रांतील व्याजाचे दर तेथील मध्यवर्ती बँक ठरवीत असते. कोणत्याहि शहरांतील व्याजाचा दर इतर शहरांपेक्षां फार वाढला म्हणजे तिकडे पैसा लोटणें साहाजिक आहे; व हा प्रवाह असा बराच काळ टिकला म्हणजे त्या शहरीं इतर ठिकाणाहून सोनें पाठविणें अपरिहार्य होतें. यामुळें देशदेशांतरीं सोन्याची जी ने–आण होते तिचे दोन प्रकार कल्पितां येतात. एक तर परदेशी व्यापारांत जी ऐन बाकी राहते ती कर्जाच्या रूपानें अथवा सोन्याची ने–आण करून मिटवितां येते. परंतु या कारणामुळें सोन्याचें स्थलांतर फारसें होत नाहीं. सोन्याचें स्थलांतर होण्याचें मुख्य कारण म्हणजे लहान मुदतीच्या ठेवींच्या रूपानें फिरता पैसा एका देशांतून दुसऱ्या देशांत जातो हेंच होय. हा पैसा एके ठिकाणींच फार वेळ गुंतून राहात नसल्यामुळें सोन्याचें स्थलांतर एकीकडून दुसरीकडे बरेंच होत असतें. यावरून असें दिसून येईल कीं, जगांतील व्यापार व पतीचा व्यवहार फार मोठ्या प्रमाणावर करणारीं न्यूयार्क, लंडन, पॅरिस वगैरे जीं शहरें आहेत त्यांतील व्याजाच्या दरांत फारसा फरक कायमचा राहणें सुवर्णमानपद्धतींत शक्य नाहीं. एकीकडचा व्याजाचा दर वाढला तर दुसरीकडे त्याचे परिणाम चटकन भासल्याशिवाय राहात नाहींत. कारण वर दर्शविल्याप्रमाणें महायुद्धानंतर अलीकडे सर्व सुवर्णसंग्रह काय तो मध्यवर्ती बँकेंत असतो; व एकीकडून पैसा फार जाऊं लागला म्हणजे मध्यवर्ती बँकेच्या संग्रहांतून सोनें बाहेर पडूं लागतें. सोनें बाहेर पडलें म्हणजे मध्यवर्ती बँकेस व्याजाचे दर वाढवून आपला व्यवहार आखडतां घेणें अवश्य होतें. येणें-प्रमाणें लहान लहान मुदतीच्या ठेवींचें स्थलांतर, सोन्याची ने–आण व मध्यवर्ती बँकांचें व्याजाचे दर यांमध्यें अत्यंत निकट संबंध आहे असें दिसून येईल.

महायुद्धापूर्वी अशा तऱ्हेची सोन्याची ने–आण होत नसे असें नाहीं; परंतु अलीकडे तिचें मान फार वाढलें असून एकंदर पैशाचा पुरवठा व मध्यवर्ती बँकांचे धोरण यांच्याशीं तिचा जास्त निकट संबंध जडला आहे. याचीं कारणें अशीं. एकतर अलीकडे एकंदर सोन्याचा वाहतुकीचा खर्च पूर्वीपेक्षां कमी झाला आहे; शिवाय सोन्याचा सांठा तितकासा विपुल नसल्यामुळें थोड्याबहुत सोन्याचें स्थलांतर झालें तरी बँकांना आपल्या सुवर्णनिधीबद्दल काळजी वाटूं लागण्यास ती गोष्ट पुरेशी होते. गेल्या पांचसहा वर्षांत सर्वच राष्ट्रांनीं सुवर्णमानपद्धति स्वीकारली तेव्हां या राष्ट्रांना सोनें गोळा करावें लागलें; व हें करण्याकरितां व्याजाचा दर वाढवून पैसा आंत ओढणें याच योजनेचा अवलंब बऱ्याच राष्ट्रांनीं केला. परंतु सर्वांत महत्त्वाचें कारण म्हणजे गेल्या पांचसहा वर्षांतील एकंदर जागतिक परि-

रुप्यानें पुढें मांडला व त्याविषयीं या परिषदेनें कांहीं शिफारसवजा ठरावहि मान्य केले. याशिवाय याच परिषदेच्या वेळेस चांदीच्या प्रश्नाशीं विशेष निकट संबंध असलेल्या कांहीं राष्ट्रांची निराळी परिषद होऊन कांहीं करारमदार झाले. जागतिक आर्थिक परिषदेनें केलेल्या शिफारशींचें स्वरूप असें कीं, कोणत्याहि राष्ट्रानें आपल्या चलनपद्धतींतील रुप्याचीं नाणीं अथवा त्यांचा कस कमी न करतां तीं शक्य तोंवर वाढविण्याचा प्रयत्न करावा. अर्थात् या शिफारशींचा उद्देश हा कीं, नाण्याकरितां चांदीची मागणी शक्य तर वाढावी, निदान चांदीचीं नाणीं कमी झाल्यामुळें जागतिक चलनपद्धतींतून आणखी रुपें विकावयास बाजारांत येऊं नये.

खुद्द चांदी-परिषदेंत खालील राष्ट्रांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. अमेरिका, मेक्सिको, कॅनडा, हिंदुस्थान, चीन व स्पेन. पहिलीं तीन उत्पादक राष्ट्रें म्हणून, हिंदुस्थान व स्पेन या दोन्ही राष्ट्रांच्या सरकारांजवळ बरीच विकाऊ चांदी होती म्हणून, आणि चीन मोठें गिऱ्हाईक व रौप्यमानपद्धतीचें राष्ट्र म्हणून. पहिल्या तीन राष्ट्रांच्या सरकारांनीं दरवर्षी २५० लक्ष औंस चांदी चलनपद्धतीकरितां म्हणून विकत घेण्याचें कबूल केलें; व हिंदुस्थान, स्पेन आणि चीन या सरकारांनीं ठराविक मर्यादेपलीकडे आपण सरकारी सांठ्यांतून चांदीची विक्री करणार नाहीं, असें कबूल केलें. या वार्षिक मर्यादा हिंदुस्थानला ३५० लक्ष औंस व स्पेनला ५० लक्ष औंस अशा होत्या. या करारांत उत्पादन कमी करण्याबद्दल कांहींच ठरविण्यांत आलें नाहीं, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. अर्थात् चांदीचें उत्पादन कमी करण्यांत एक मोठी अडचण आहे ती अशी कीं, बहुतेक खाणी केवळ चांदीच्या अशा नाहींत. चांदी, जस्त व शिसें या धातु बऱ्याचशा एकत्र सांपडतात. त्यामुळें एकाच्या पैदाशीबरोबर दुसऱ्याची पैदासाहि साहजिकच होते. जगांतील एकंदर चांदीच्या उत्पादनापैकीं सारी एकचतुर्थांशच शुद्ध चांदी अशा खाणींतून निघते, असा अंदाज आहे. हें जरी खरें असलें तरी उत्पादक राष्ट्रांकडून उत्पादन-नियंत्रणाविषयीं थोडा तरी प्रयत्न होण्यासारखा होता व आहे. तो कांहीं अजून झालेला नाहीं. सरकारांत करारमदार झाले तरी एकंदर चांदीस मागणी फारशी वाढणें शक्य नव्हतें. १९३३ च्या करारामुळें चांदी-बाजारावर फारसा परिणाम झाला नाहीं. हिंदुस्थान सरकार जेवढी चांदी सालिना विकत असे त्यांत चांदी-परिषदेच्या मर्यादेमुळें कांहीं काट झाला नव्हता. तेव्हां अमेरिकन व इतर सरकारांनीं चांदी विकत घेण्याचें कबूल करण्यापलीकडे उत्पादकांस या कराराचा ज्यास्त फायदा झाला नाहीं; आणि १९३९

पासून पुढें चांदीची मागणी उतरतच राहिली. हिंदुस्थानामधील शेतकऱ्यांची दैना, परराष्ट्रीय व्यापारांतील उलटी बाकी व हिंदुस्थान सरकारनें चांदीच्या आयातीवर लादलेली जबर जकात या सर्व गोष्टींमुळें हिंदुस्थानांतील चांदीची मागणी अगदीं नाहींशीच झाली. चीनमधील स्थितिहि हिंदुस्थानसारखीच आहे व तेथेंहि खाजगी मागणी आज कांहीं उरली नाहीं.

खाजगी खप अत्यंत कमी झाला व परिषद्-करारांनींहि फायदा झाला नाहीं, तेव्हां अमेरिकेंतील चांदीवाल्यांनीं आपल्या सरकारावर वजन घालण्याकडे लक्ष वळविलें; आणि चांदीचा खप व चांदीची किंमतहि सरकारी प्रयत्नांनीं वाढवून घेण्यास सुरुवात केली. या प्रयत्नांत यश येण्यास प्रे. रूझवेल्ट हे डेमोक्रॅटिक पक्षाचे होते, हें एक बलवत्तर कारण होतेंच; पण त्याहून दुसरें जें महत्त्वाचें कारण होतें तें म्हणजे प्रे. रूझवेल्ट हे आपल्या अध्यक्षपदाच्या सुरुवातीपासूनच चलनविषयक प्रयोग करून किंमती वाढविण्याच्या खटपटींत होते हें होय. सरकारनें चांदी खरीदून तिच्या तारणावर नोटांचा प्रसार वाढविल्यास आपलें ध्येय साध्य होण्यांत कांहीं अंशीं मदत होईल, अशी प्रे. रूझवेल्ट व त्यांचे सल्लागार यांची समजूत झाली होती. तेव्हां चांदीवाल्यांच्या भिडेस मान देऊन चांदीचे भाव वाढविण्याचे अमेरिकेच्या सरकारचे प्रयत्न सुरू झाले. पहिली गोष्ट म्हणजे १९३३ डिसेंबरमध्यें अमेरिकेच्या खाणींतून निघालेली सर्व नवीन चांदी यापुढें सरकार ठराविक भावानें विकत घेईल, हा प्रे. प्रे. रूझवेल्ट यांनीं काढलेला जाहीरनामा होय. एका दृष्टीनें यांत नवीन कांहीं नव्हतें. कारण, चांदी-परिषदेंतील करारांप्रमाणें अमेरिकेच्या सरकारास चांदीची वार्षिक खरेदी करायची होतीच; व या वार्षिक खरेदीचें ठरलेलें प्रमाण हें अमेरिकेंतील नवीन चांदीच्या उत्पादनाइतकेंच होतें. तेव्हां हा जाहीरनामा रूझवेल्ट यांनीं चांदी-परिषद्-करारांस पुष्टिकारक म्हणूनच काढला. नवीन एवढेंच केलें कीं, चांदी खरीदण्याची किंमत ही त्यावेळच्या बाजारभावाच्या जवळजवळ दिडीनें ठेवली. पण एवढ्यानें एकंदर बाजारभावावर फारसा परिणाम झाला नाहीं, तेव्हां १९३४ च्या मे महिन्यांत एक महत्त्वाचा कायदा करण्यांत आला. या कायद्यानें कागदी नोटांस तारण म्हणून जो सरकारी धातुसंचय असावयाचा, तो केवळ सोन्याचा न ठेवतां त्यांत पाव हिश्यापावेतों चांदी ठेवण्यास सरकारास परवानगी देण्यांत आली. गेल्या वर्ष-सव्वावर्षांतील सर्व घडामोडी या कायद्याच्या आधारेंच होत आहेत. कायद्यानें चांदी अमुक प्रमाणांत विकत घेतलीच पाहिजे, अशी कांहींच सक्ति केलेली नाहीं. पण सरकारी विक्रीची जी कमाल मर्यादा ठरविली

ती फारच मोठी आहे. पुरती पाव हिस्सा चांदी घ्यावयाची म्हणजे संस्थानांच्या सरकारास जवळजवळ १३० ते १६० कोटी औंस चांदी विकत घ्यावी लागेल. म्हणजे १९२९ सालीं एकंदर जगभर जेवढा चांदीचा उठाव झाला, त्याच्या चारपांच पटीनें खरेदी होईल. अर्थात् ही सर्व खरेदी एकाच वर्षात होणे शक्य नाहीं व ती अमुक क्रमानें आणि अमुक इतकी होईल असा नेमहि नाहीं. पण केव्हांहि कितीहि चांदी विकत घेण्यास गेल्या वर्षापासून प्रे. रूझवेल्ट यांस कायद्याचा पुरेसा आधार झाला आहे.

१९३४ मेपासून सरकारी खरेदी अमेरिकेंत कमीजास्त प्रमाणांत सारखी सुरू आहेच. तेथील नवीन चांदीस जरी बाजारभावापेक्षां जास्त भाव ठरविण्यांत आला, तरी इतर खरेदी बाजारभावाप्रमाणें होत आली. नवीन गिऱ्हाईक उत्पन्न झालें व सरकार कांहीं तरी करील अशी अपेक्षा उत्पन्न झाली. यामुळें जी वाढ व्हावयाची त्यापलीकडे सरकारनें प्रत्यक्ष भाव वाढविण्याबद्दल कांहीं खटपट एकदम केली नाहीं. पण तसें पाहिलें तर प्रे. रूझवेल्ट यांच्या सर्व चलनविषयक घडपडींची अव्यवस्था मधूनमधून उसळीनें कांहीं करावयाचें अशीच आहे. मे १९३४ नंतर पुढला उपक्रम १९३४ ऑगस्टमध्यें झाला. या महिन्यांत प्रे. रूझवेल्ट यांनीं अमेरिकेंतील सर्व व्यक्ति, कंपन्या वगैरेजवळ असलेली चांदी त्यांनीं सरकारास तीन महिन्यांच्या आंत विकावी, असा जाहीरनामा काढला. ही चांदी विकत घेण्याचा भाव मात्र बाजारभावापेक्षां जास्त ठेविला नाहीं.

चांदीचा भाव १९३३ सालीं अतोनात उतरला होता. चांदी–परिषदेच्या वेळेस तो थोडासा सांवरला, पण वाढीस लागला नाहीं. अमेरिकन सरकारच्या चांदीसंबंधींच्या नवीन धोरणाची रूपरेषा दिसूं लागतांच मात्र तो चढूं लागला. अमेरिकन सरकारनें १९३४ सालीं जरी प्रत्यक्ष खरेदी फार मोठ्या प्रमाणावर केली नाहीं, तरी त्याची चांदीचा भाव वाढविण्याची इच्छा आणि त्यांच्या एकंदर चलनविषयक धोरणाचें स्वरूप यांची माहिती बाजारास असल्यामुळें व्यापारी लोक सारखा भाव चढवूं लागले व नोव्हेंबर १९३३ ते मार्च १९३५ च्या दरम्यान हा भाव जवळजवळ दिडीनें वाढला. मार्च १९३५ मध्यें नवीन चांदी घेण्याच्या ठरविलेल्या पहिल्या भावाजवळ तो येऊन पोहोंचतांच नवीन चांदीस सरकारनें जास्त किंमत ठरवावी अशी चळवळ सुरू झाली व त्यामुळें सरकारनेंहि भाव सात सेंटांनीं वाढविला; आणि तो आणखी वाढविण्याची तयारी दर्शविल्यामुळें या वाढीस विशेष उत्तेजन मिळालें. नवीन सरकारी भावापलीकडेहि तो जाऊन

पोहोंचला. तेव्हां सरकारनें आपला भाव पुनः सहा सेंटांनीं वाढविला व एका फडणिशीखात्याच्या जबाबदार अधिकाऱ्यानें याहून दिडी वाढविण्याची सरकारची इच्छा आहे असें जाहीर केलें. तेव्हां जिकडेतिकडे एकदम भाव वाढून सर्व जगभर चांदीबाजारांत व कांहीं देशांच्या चलनपद्धतींत गडबड उडून गेली.

चांदीच्या भावांतील चढउतारांचा परिणाम विशेष दिसून येतो तो तीन देशांत—चीन, हिंदुस्थान व मेक्सिको. मेक्सिकोंत चांदीच्या खाणी बऱ्याच आहेत व तेथील चलनपद्धति जरी सुवर्णमानाची असली, तरी तेथें हिंदुस्थानांतल्यासारखें मुख्य चलनी नाणें रुप्याचेंच आहे; आणि विशेष गोष्ट ही कीं, या चलनी नाण्यांतील चांदीची किंमत त्या नाण्याच्या किंमतीच्या मानानें बरीच आहे. तेव्हां मे १९३५ मध्यें जेव्हां किंमती वाढल्या, तेव्हां एका बाजूनें जरी मेक्सिकोंतील चांदी—उत्पादकांचा फायदा झाला असला, तरी उलट बाजूनें मेक्सिको सरकारपुढें मोठी अडचण उत्पन्न झाली. ती अडचण अशी कीं, चांदीच्या नवीन भावानें मेक्सिकी डॉलरमधील चांदीची किंमत डॉलरच्या चलनी किंमतीपेक्षां अधिक झाली. म्हणजे मेक्सिकी डॉलर, नाणें म्हणून वापरण्याऐवजीं तो वितळवून त्यांतील चांदी विकणें किफायतशीर होऊं लागलें. यामुळें मेक्सिकी सरकारास चांदीचे डॉलर चलनांतून शक्य तितके काढून घेऊन त्यांच्याऐवजीं केवळ कागदी नोटा व तांब्याचीं नाणीं यांचा जोराचा प्रसार करणें प्राप्त झालें. याप्रमाणें मेक्सिकी चलनपद्धतींत अमेरिकन सरकारच्या धोरणामुळें गोंधळ उडून गेला. हिंदुस्थानांत आजतागायत परिणाम झाला असेल तो एवढाच कीं, ज्यांच्याजवळ चांदीचा सांठा असेल त्यांच्या सांठ्याची किंमत वाढली. परंतु चांदीचा भाव हा असाच जर वाढत राहिला तर मात्र कांहीं काळानें मेक्सिकी डॉलरची जी आज अवस्था झाली आहे तीच आपल्या रुपयाची होण्याचा संभव आहे; आणि मग चलनपद्धतींत फेरबदल काय व कसा करावयाचा हा सरकारपुढें फारच बिकट प्रश्न उत्पन्न होणार आहे. गेल्या दीड वर्षांत अमेरिकन धोरणाचे प्रत्यक्ष परिणाम जर विशेष कोणावर घडून आले असतील तर ते चीनवर. चीनच्या व हिंदुस्थानच्या परिस्थितींतील फार मोठा फरक म्हणजे चीनमध्यें रौप्यमानपद्धति जारी आहे हा होय. यामुळें चांदीच्या भावांत जे फरक पडतात त्यांचा परिणाम चीनमधील एकंदर पदार्थांच्या किंमतीच्या मानावर होतो. जसजसा चांदीचा भाव वाढतो तसतसें हें मान खालावतें. आधींच जागतिक मंदीमुळें सर्व पदार्थांच्या किंमती बसल्या आहेत; व त्यांतच या नवीन कारणामुळें त्या आणखी खालावल्या, म्हणजे चिनी शेतकरी व व्यापारीवर्गाची किती हलाखी होईल याची

# २ प्रचलित मंदीची कारणमीमांसा*

रहाटगाडग्याप्रमाणें जगांतील आर्थिक व्यवहारांत सारखे चढउतार होत असतात. विशेषतः गेल्या पन्नाससाठ वर्षांत हें चक्र इतकें नियमित रीतीनें फिरत आलें आहे कीं, याचा सूर्यबिंबाच्या फेरबदलासारख्या नैसर्गिक दृश्यांशीं संबंध जोडण्याचा कांहीं अर्थशास्त्रज्ञांनीं मागें प्रयत्न केला. अर्थात् त्यांचें म्हणणें आज कोणी मान्य करीत नाहीं. पण एवढें खरें कीं, आर्थिक प्रगतीचा ओघ सारखा वाहात नसतो. त्यांत कधीं विशेष भरती येते तर कधीं विशेष खंड पडतो. यामुळें आर्थिक इतिहासांत दोन प्रकारचे प्रवाह स्पष्टपणें दिसून येतात. एकतर एकंदर समाजाची उन्नति अथवा अवनति होण्याचा व दुसरा तेजीमंदीच्या आंदोलनाचा. गेलीं शंभरदीडशें वर्षें यांत्रिक प्रगतीमुळें समाजाचें आर्थिक पाऊल सारखें पुढें पडत आहे. पण हें पाऊल वर्षोवर्षी सारख्याच प्रमाणांत पुढें पडत नाहीं, तर सातपासून दहा वर्षांच्या अवकाशांत त्यांतल्यात्यांत एक तेजीमंदीचें चक्र पूर्ण होऊन जातें. आज जगभर फार मंदीचे दिवस आले आहेत हें एकपरी पाहिलें तर नित्यक्रमानुसारच झालें. एवढेंच कीं महायुद्धानंतर उत्पन्न झालेल्या विशेष परिस्थितीमुळें हल्लींच्या आर्थिक अरिष्टाचें स्वरूप विशेष भीषण, विस्तृत व सर्वव्यापी असें बनलें आहे. तसेंच महायुद्धापूर्वीच्या व्यवहारांत चलनाबद्दलची जी एक प्रकारची निश्चितता बाळगतां येत असे व सुवर्णमानपद्धतींत जो निर्धास्तपणें व्यवहार चालत असे, तें आज राहिलें नसल्यामुळें अलीकडील परिस्थितींत विशेषच घोटाळा उत्पन्न झाला आहे.

गेल्या दहा वर्षांत झालेल्या आर्थिक घडामोडींचा विशेष तपशीलवार विचार आपणास आज करावयाचा नाहीं. केवळ आजच्या परिस्थितीचें स्वरूप नीट आकलन होण्यास जे कांहीं थोडे मुद्दे विशद केले पाहिजेत तेच येथें नमूद करितों. महायुद्धामुळें एकंदर सर्व प्रकारच्या उत्पादनास आळा बसला होता. लढाऊ सैनिक म्हणून कितीतरी माणसें लढत होतीं, दारूगोळा व इतर सामान तयार करण्याकडे बऱ्याच कारखान्यांना लक्ष पुरवावें लागत होतें, निरनिराळ्या अडचणींमुळें वाहतूक व व्यापार हीं फार कमी प्रमाणांत होऊं लागलीं होतीं. या कारणांमुळें सर्वच प्रकारच्या पदार्थांची निपज व व्यय हीं कमी झालीं होतीं.

---

* लोकशिक्षण, नोव्हेंबर १९३१.

महायुद्ध थांबल्याबरोबर चारपांच वर्षें बंद असलेल्या या सर्व प्रकारच्या मागणीस पुन्हा तोंड फुटलें. कागदी चलनपद्धतीचें नियंत्रण जवळ जवळ सर्वच राष्ट्रांत अशा प्रकारचें होतें कीं त्यामुळें किंमती सारख्या वाढत होत्या. एकदम बरीच नवीन मागणी व वाढत्या किंमती यांचा संयोग झाल्यामुळें १९१८ च्या पुढील दीडदोन वर्षें फार तेजीचीं गेलीं. पण ही व्यापारी भरभराट पोकळ होती. लढाई संपून शांतता प्रस्थापित झाल्याबरोबर जिकडे तिकडे महायुद्धापूर्वीप्रमाणें सर्व प्रकारचे व्यवहार सुरळीत चालू लागतील ही अपेक्षा या भरभराटीच्या बुडाशीं होती. पण ही अपेक्षा फोल ठरली. शांतता परिषदेचें काम अत्यंत रेंगाळत चाललें. नवीन निर्माण केलेलीं मध्ययुरोपांतील राष्ट्रें एकमेकांचें हिताहित पाहून आर्थिक व्यवहाराची बिघडलेली घडी पुन्हा बसवून घेण्याचे प्रयत्न करण्याऐवजीं एकंदर राष्ट्रसमूहास अनिष्ट अशा प्रकारचें धोरण स्वीकारूं लागलीं. जबर खंडण्या वसूल करून घेण्याच्या दोस्त राष्ट्रांच्या अट्टाहासामुळें एकंदर राजकीय परिस्थिति नाजूक बनली. जर्मनी व ऑस्ट्रिया या राष्ट्रांचीं सरकारें दिवाळखोर झालीं. रशियांतील धामधूम बंद होण्याचीं कांहींच चिन्हें दिसत नव्हतीं, म्हणून जरी पहिल्या उमेदींत माल बराच खपला व बाजारभाव बरे आले तरी ही परिस्थिति अशीच टिकणें शक्य नव्हतें. पहिल्या भरांत नवीन कारखाने व धंदे काढणाऱ्या कंपन्या पुष्कळ सुरू झाल्या, पण एकंदर आर्थिक व्यवहाराच्या चलतीस जगाची परिस्थिति अनुकूल नसल्यामुळें एकदोन वर्षांतच सर्वांची निराशा होऊं लागली व सर्व हालचालींस ओहोटी लागली. यानंतरचीं कांहीं वर्षें एकंदरींत कठीण अशींच गेलीं. साधारणतः १९२१ ते १९२४ या कालांत निरनिराळ्या युरोपिय देशांच्या चलनपद्धतींत भयंकर क्रांति घडून आली. कांहीं देशांनीं कागदी नोटा इतक्या भराभर छापल्या कीं त्या अगदीं कवडीमोल होऊन गेल्या व या देशांना आपल्या जुन्या चलनपद्धतीचा त्याग करून नवीन पद्धति प्रथमपासून बनवावी लागली. जर्मनी व ऑस्ट्रिया या देशांची ही स्थिति होती. या कालांतच खंडणी व दोस्त राष्ट्रांचीं परस्परांचीं कर्जें यांचें घोंगडें तसेंच भिजत पडलेलें होतें. त्याचा निकाल लागल्याशिवाय निरनिराळ्या राष्ट्रीय सरकारांचा फडणिशी कारभार सुरळीत चालणें व राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारांत निश्चितपणा येणें अशक्य होतें. १९२४ सालच्या सुमारास एकंदर वातावरण बरेंचसें निवळलें. जर्मनीनें नवीन चलनपद्धति सुरू केली व ती चालण्यास प्रथम कांहीं अडचणी उत्पन्न झाल्या नाहींत. राष्ट्रसंघानें मदत केल्यामुळें ऑस्ट्रियाचा कारभारहि कांहींसा बरा चालू लागला. डॉज योजनेमुळें खंडणीच्या प्रश्नाला बरेंचसें व्यवस्थित स्वरूप आलें. अशा प्रकारें तेजीचा काल सुरू

कल्पना सहज करतां येण्याजोगी आहे. एकीकडे इतर सर्व राष्ट्रें आपल्या चलनाची किंमत बसाविण्याचा प्रयत्न करीत असतां चीनमध्यें मात्र चिनी डॉलरची किंमत सारखी वाढत आहे, असें झालें आहे. एवढेंच नव्हे, तर चांदीची किंमत अमेरिकेंत वाढल्यामुळें चीनमधून अमेरिकेंत चांदीची निर्गत होण्याचा क्रम सुरू झाला व चिनी सरकारास देशांतील चांदी देशांत राखणें कठीण पडूं लागलें. देश रौप्यमान-पद्धतीचा असल्यामुळें चांदीचा पुरेसा सांठा असणें हें तर अत्यावश्यक आहे. या अडचणींत चिनी सरकारास चांदीच्या निर्गतीवर जबर जकात बसाविणें गेल्या वर्षींच भाग पडलें. पण जकात जरी बसविली तरी कांहीं अंशीं जकात भरून व बऱ्याच अंशीं चोरून, चांदी अमेरिकेंत पाठविली जात आहेच; आणि चिनी सरकारास चलनपद्धतीविषयीं व किंमतीच्या मानाविषयीं मोठाच पेंच पडला आहे.

आज चांदीचें मोठें गिऱ्हाईक असें एकच उरलें आहे; व तें म्हणजे अमेरिकेचें सरकार. हिंदुस्थानांत गेलीं दोनतीन वर्षें चांदीची आयात अतोनात कमी झाली आहे व चीनमधून तर १९३४ पासून निर्गतच होत आहे. चांदीचा भाव वाढल्यामुळें व एकंदर मंदीमुळें इतर देशांतील खपहि पुष्कळच कमी झाला आहे. तेव्हां अमेरिकेच्या सरकारनें चांदी मोठ्या प्रमाणावर विकत घेतली नसती तर तिचा भाव अतिशय उतरला असता. पण आज जरी चांदीची इतर सर्व गिऱ्हाइकी नाहींशी झाली असली, तरी एकट्या अमेरिकेच्या सरकारचा चांदी विकत घेण्याचा ठरलेला कार्यक्रम एवढा अफाट आहे व त्यांजवळ द्रव्यबळ इतकें भरपूर आहे कीं, चांदीची किंमत वाटेल तितकी वाढविणें हें त्या सरकारास शक्य आहे. आजचा प्रश्न एवढाच कीं, ही किंमत आणखी वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल किंवा नाहीं. गेल्या मे महिन्यांत किंमत वाढविली त्या वेळेस ती आणखी वाढविण्याचा आपला इरादा आहे असें अमेरिकन फडणिशी खात्याचे एक वरिष्ठ अधिकारी म्हणाले होते. पण त्यानंतर अलीकडे कांहीं नवीन उपक्रम करण्यांत आलेला नाहीं. यावरून निश्चित असें अनुमान कांहींच काढतां येत नाहीं. आपल्या धोरणामुळें चीन वगैरे कांहीं देशांस उपद्रव होत आहे असें आढळून आल्यावरून हें धोरण अमेरिकन सरकारनें बदलणें संभाव्य आहे. एके काळीं अशी समजूत होती कीं, चांदीचा भाव वाढल्यास ज्यांनीं चांदीचा संचय केला आहे अशा चिनी व हिंदी लोकांचा फायदा होऊन एकंदर जागतिक व्यापार वाढण्यास मदत होईल. पण तसा प्रकार फारसा घडून येत असल्याचें दिसत नाहीं; चिनी रौप्यमानपद्धतीमुळें त्या देशांत याच्या उलटच परिणाम होत आहे. दुसरें असें म्हणण्यांत येत असे कीं, सरकारी सांठ्यांतील चांदी वाढवून

त्याबद्दल नवीन नोटा काढल्या असतां एकंदर चलन वाढून पदार्थांच्या किंमतीहि वाढतील. परंतु गेल्या दोनतीन वर्षांच्या अनुभवावरून हें इतकें सहज होण्यासारखें नाहीं, हें अमेरिकन सरकारासहि कळून चुकलें असण्याचा संभव आहे. तेव्हां आतां चांदीची किंमत वाढविण्यास एकच कारण उरतें. तें म्हणजे चांदीच्या खाणीवाल्यांचा फायदा वाढवावयाचा व ज्या खाणी पूर्वी बंद पडल्या आहेत त्यांना पुनरुज्जीवित करावयाचें.

प्रे. रूझवेल्ट काय करतील अथवा काय करणार नाहींत हें सांगणें फार कठीण आहे. त्यांनीं गेल्या दोनतीन वर्षांत अनेक प्रकारचे नवीन अचाट उपक्रम केले; कांहीं गोष्टी तडीस नेल्या, कांहीं मध्येंच सोडल्या. त्यांचें धोरण हें राजकीय व आर्थिक या दोन्ही परिस्थितीवर अवलंबून असतें. आज चांदीचा भाव आणखी वाढविण्यास आर्थिक कारण जरी कांहींच उरलेलें दिसत नाहीं, तरी राजकीय वारा कसा वाहत आहे व पुढें वाहील हें सांगणें कठीण आहे. पुढील वर्षी अध्यक्षाची फेरनिवडणूक आहे व चांदी निघते तीं संस्थानें डेमोक्रॅटिक पक्षाचा नेहमीं पाठपुरावा करणाऱ्यांपैकीं आहेत. शिवाय एन्. आर. ए. संबंधींच्या वरिष्ठ कोर्टाच्या हुकुमामुळें प्रे. रूझवेल्ट यांच्या कार्यक्रमापैकीं मोठी महत्त्वाची बाजू लंगडी पडल्यासारखी झाली आहे. तेव्हां चलनविषयक घडपड सुरू ठेवण्याचा रूझवेल्ट यांनीं निश्चय केल्यास चांदीच्या भावांत आणखीहि वाढ होईल; आणि तसें न झाल्यास वाढला आहे हाहि भाव कांहींसा इतक्यांत घटेल. कारण, आजची वाढ ही केवळ संयुक्त संस्थानांच्या सरकारनें केलेल्या हालचालींमुळें व पुढें त्याजकडून आणखी उपक्रम होईल या अपेक्षेमुळें झालेली आहे; व या भावांचें भवितव्यहि केवळ त्या सरकारवरच अवलंबून आहे.

---

# ४ सार्वराष्ट्रीय आर्थिक संबंधांची सद्यःस्थिति

राष्ट्रसंघाच्या आर्थिक मंडळामार्फत 'सार्वराष्ट्रीय आर्थिक संबंधांची सद्यःस्थिति', या विषयावर एक लहानसें चोपडें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. यांत घेतलेला सद्यःस्थितीचा आढावा इतका विविध माहितीनें युक्त व उद्बोधक आहे कीं, त्यांतील मजकुराच्या अनुरोधानें कांहीं विचार या लेखांत मांडण्याचें आम्हीं योजिलें आहे. या चोपड्यांत विचारांत घेतलेला मुख्य विषय जगांतील प्रचलित मंदी आणि निरनिराळ्या राष्ट्रीय सरकारांचें तद्विषयक धोरण हाच आहे. कारण, आजच्या परिस्थितीचा विशेष हा आहे कीं, व्यापारी व औद्योगिक भरभराटीस सुरुवात होण्यास इतर सर्व गोष्टी अनुकूल असल्या तरी बहुतेक राष्ट्रांतील सरकारी धोरण या भरभराटीच्या आड येत आहे. प्रत्येक राष्ट्राचें सरकार आपल्या परीनें आपल्या देशाची व्यापारी व औद्योगिक वाढ होण्याकरितां खटपट करीत आहे. पण ही सर्व खटपट इतकी एकांगी आहे, कीं परिणामीं जगाच्या भरभराटीचा मार्ग खुंटला गेला आहे.

जगाच्या व्यापाराचें उतरतें प्रमाण हेंच जगांतील मंदीचें मुख्य कारण व मुख्य गमक होय; आणि हा व्यापार वाढल्याशिवाय कोणत्याच देशाची खरी भरभराट होणें शक्य नाहीं, यावर या राष्ट्रसंघाच्या चोपड्याचा मुख्य कटाक्ष आहे. प्रत्येक राष्ट्रीय सरकारचा जमाखर्च पाहिला तरी त्यावर जगांतील व्यापाराच्या उतरत्या प्रमाणाचा परिणाम झाल्याचें दिसून येईल. जगांतील या मंदीच्या काळांत बहुतेक सरकारांना आपल्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें अशक्य झालें आहे. परराष्ट्रीय व्यापार कमी झाला म्हणजे त्याचा परिणाम अंतर्गत व्यापारावर व देशाच्या उद्योगधंद्यांवर होतो; व्यापार कमी झाला म्हणजे आगगाड्यांचें उत्पन्न घटतें व त्यांत फायदा उरेनासा होतो; परकी प्रवासी देशांत येईनासे होतात; निरनिराळ्या उद्योगधंद्यांस व विशेषतः शेतकी व्यवसायास प्रत्यक्ष मदत करण्याची नवीन जबाबदारी सरकारावर पडते; परराष्ट्रांतून येणारें व्याज अथवा त्यांतून मिळणारें कर्ज हें कमी झाल्यामुळें सर्व प्रकारच्या भांडवलवाल्यांना अडचणी उत्पन्न होऊन त्यांची कर भरण्याची कुवत कमी होते. सारांश, निरनिराळ्या प्रकारांनीं सरकारचें उत्पन्न कमी होतें व खर्च वाढतो. तेव्हां प्रत्येक सरकारनें जरी अगदीं आपल्यापुरता संकुचित विचार केला

तरी जगाच्या व्यापाराची वाढ झाल्याशिवाय तरणोपाय नाहीं, असेंच त्यास प्रायः दिसून येईल.

जगाच्या व्यापाराची वाढ न होण्यास आज जीं दोन मुख्य कारणें आहेत तीं म्हणजे चलनविषयक अस्थिरता व प्रत्येक राष्ट्रानें परकी व्यापारावर लादलेले निर्बंध. बहुतेक सर्व राष्ट्रांनीं सुवर्णमानपद्धतीचा आतां त्याग केला आहे; त्यामुळें हुंडणावळीच्या दराची कांहीं शाश्वती राहिली नाहीं. आपला हुंडणावळीचा दर कमी करून व्यापारासंबंधीं तात्पुरता फायदा करून घेण्याचा प्रत्येक राष्ट्र प्रयत्न करितें कीं काय, अशी इतरांस सारखी भीति वाटत असते; आणि म्हणून चलन व हुंडणावळ यांसंबंधींच्या सर्व परदेशी व्यापारावर नियंत्रण घालण्याचा कित्येक राष्ट्रांनीं उपक्रम केला आहे. म्हणजे जगाच्या व्यापारांत आणखी एक नवीन अडथळा उत्पन्न झाला; कारण, व्यापाऱ्यांनीं जरी मालाची देवघेव केली तरी त्यांस परकीयांना देण्यासे अथवा त्यांजकडून वसूल करण्यास राष्ट्रीय सरकार हुंडणावळ पुरेशी मिळूं देईल अशी खात्री नाहींशी झाली. या हुंडणावळीच्या नियंत्रणास सुरुवात झाल्यामुळें साहजिकच राष्ट्रांराष्ट्रांतील हुंडणावळ देण्याबाबत दुहेरी करार आवश्यक झाले. म्हणजे एकमेकांच्या व्यापाऱ्यांस एकमेकांत दरवर्षीं कोणत्या रकमेपर्यंत व्यापार करूं द्यावयाचा याबद्दल करारमदार होऊं लागले. मालाच्या आयातनिर्यातीबरोबर चलन-हुंडणावळविषयक नवीन व्यवस्था करणें प्रत्येक व्यापाऱ्यास प्राप्त झालें व निरनिराळ्या राष्ट्रांशीं करण्याच्या व्यापाराच्या किंमतींची कमाल मर्यादा आगाऊ ठरलेली असल्यामुळें ही रक्कम निरनिराळ्या प्रकारच्या व्यवहारांत व व्यापारांत वांटून देण्याकरितां स्वतंत्र सरकारी खातीं निर्माण करणें भाग पडलें. त्याप्रमाणें सर्वच बाजूंनीं नियंत्रणें व निर्बंध वाढले आणि त्यामुळें परदेशी व्यापाराचा साहजिकच अधिकाधिक संकोच होऊं लागला. ज्या राष्ट्रांवर परराष्ट्रीय कर्जाचा बोजा विशेष होता; त्यांना हुंडणावळविषयक अडचणी फार भासल्या. कर्जफेड करायची व कर्जावरील व्याज भागवावयाचें या गोष्टी इतर देशांस आपला माल विकून आलेल्या पैशांतूनच करणें केवळ शक्य आहे. हिंदुस्थान-चीनसारखा खाजगी सुवर्णसंचय किंवा रौप्यसंचय बहुतेक राष्ट्रांनीं केलेला नसतो. तेव्हां जर इतर राष्ट्रांनीं आपला माल विकत घेतला नाहीं तर कर्जफेड करण्यास पैसा आणण्याचा मार्ग उरत नाहीं. अशा स्थितींत व्याज अथवा कर्ज यांचे हप्ते चुकविणें अपरिहार्य झालें व नवीन कर्ज उभारणें अशक्य झालें. ज्या राष्ट्रांची पत अशाहि रीतीनें कमी झाली त्यांच्या हुंडणावळीचे दर घसरूं लागले व त्यामुळें त्यांनीं

होण्यास परिस्थिति अनुकूल झाली. कागदी चलनपद्धतीमुळें बऱ्याचशा आपत्ती ओढवल्या या समजुतीमुळें राष्ट्रसंघामार्फत सुवर्णमानपद्धतीच्या पुनःस्थापनेची शिफारस झाली व विशेषत: इंग्लंडनें या बाबतींत पुढाकार घेऊन सुवर्णमानपद्धतीचा पुनरुद्धार शक्य तितक्या लवकर करण्याचा आपला निश्चय जाहीर केला.

जगांतील सर्व राष्ट्रांत हे फेरबदल सारख्याच प्रमाणांत व एकाच वेळेस घडून आले असें नाहीं. परंतु १९२४ सालापासून पुन्हा एकंदर व्यवहारास भरती येऊं लागली असें सर्वसाधारणपणें म्हणण्यास हरकत नाहीं. कांहीं देशांतील स्थिति विशिष्ट कारणांमुळें तितकीशी सुधारली नाहीं. उदाहरणार्थ, फ्रान्समध्यें चलन-पद्धतीची दुर्व्यवस्था १९२७ सालपावेतों चालू होती आणि म्हणूनच तेथील व्यवहार जोमानें वाढला नाहीं. उलटपक्षीं अमेरिका व जर्मनी या देशांत व्यापारास व उद्योगधंद्यांस विशेष भर आला. सर्वच प्रकारचें उत्पादन १९२४ पुढील चारपांच वर्षांत झपाट्यानें वाढलें. Rationalisation या नांवाखालीं ओळखल्या जाणाऱ्या औद्योगिक पुनर्व्यवस्थेचा विशेष प्रचार या कालांत झाला. इचा उगम जर्मनींत झाला; कारण कीं जर्मनीस आपल्या सर्वच आर्थिक जीवनाचा पाया नवीन बसवावयाचा होता. शक्य तितक्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणें, अगदीं नवीन नवीन यांत्रिक शोधांचा उपयोग करणें, मालखरेदीविक्री शक्य तितकी व्यवस्थित व सामुदायिक रीत्या करून किंमती कमी करणें अशीं Rationalisation चीं विविध अंगें होतीं. जर्मनींत या दृष्टीनें विशेष प्रयत्न केला गेल्यामुळें इतर औद्योगिक राष्ट्रांसहि जर्मनीचें अनुकरण करणें प्राप्त होतें. या तीनचार वर्षांत जगभर वीज व विजेच्या साहाय्यानें चालणाऱ्या निरनिराळ्या यंत्रांचा व उपकरणांचा प्रसार, मोटार, रेडिओ, ग्रामोफोन इत्यादि गोष्टींचा खप या गोष्टी प्रामुख्यानें दिसून येतात. सगळीकडे उत्पादन स्वस्त झालें व अधिकाधिक होऊं लागलें. हळूहळू Rationalisation चा प्रसार शेतकींतहि होऊं लागला. विशेषत: जेथें मोठ्या प्रमाणावर मळे अथवा कानडासारख्या देशांप्रमाणें यंत्रांच्या साहाय्यानें शेती होत होती तेथें तेथें Rationalisation लवकर करतां आलें; यामुळें ऊस, रबर, कॉफी, गहूं इत्यादि पदार्थांची निपज सपाट्यानें वाढूं लागली. सर्व प्रकारच्या मालाची पैदास सारखी जास्त जास्त होत होती; आर्थिक व्यवहाराचें मानहि सारखें वाढत होतें. या गोष्टी चालल्या होत्या तोंपावेतों तेजीचा काल होता. पण या आर्थिक व्यवहाराच्या चक्राचा नियमच हा आहे कीं, कांहीं काल तेजीचा गेला कीं, व्यवहाराचा फुगा प्रमाणाबाहेर फुगून तो केव्हां ना केव्हां तरी फुटावयाचा. किंमती वाढत आहेत, व्यापाऱ्यांकडून मागणी सारखी होत आहे, कारखानदारांस

फायदा चांगला पडत आहे हें पाहून सर्वच प्रकारच्या उद्योगधंद्यांत नवीन कारखाने निघणें, जुन्यांनीं आपल्या उत्पादनाचें प्रमाण वाढविणें या गोष्टी साहाजिकपणें घडून येतात. गिऱ्हाइकांच्या मागणीचें वाढतें प्रमाण व उत्पादनाचें वाढतें प्रमाण हीं जोंपावेतों सारखीं आहेत तोंपावेतों सर्व ठीक चालतें. पण असें सारखें चालत नाहीं. उत्पादन, निदान कांहीं विशिष्ट बाबींत तरी, फाजील वाढतें व मग असा प्रसंग येतोच कीं, तेव्हां मालाचा उठाव होण्यास कठीण पडूं लागतें. १९२४ पासून १९२९ पर्यंत एकंदर कच्च्या मालाची निपज व पक्क्या मालाची बनावट यांचें प्रमाण सारखें वाढत गेलें. मात्र धान्याची निपज फार वाढली नाहीं. परंतु धान्याखेरीज इतर कच्चा माल विशेष भारी प्रमाणांत पैदा होऊं लागला. पक्क्या मालाची पैदास सुद्धां वाढतच होती. पण ती या कच्च्या मालाच्या पैदाशीपेक्षां कमी प्रमाणांत होती. एकंदर जगांतील आर्थिक उत्पादनशक्तीची फाजील व कांहींशी एकांगी वाढ हें हल्लींच्या मंदीच्या बुडाशीं असलेलें एक महत्त्वाचें कारण आहे.

परंतु हल्लींच्या परिस्थितीस तिचें विशिष्ट स्वरूप प्राप्त होण्यास जीं इतर अनेक कारणें झालीं त्यांचा विचार करणें जरूर आहे. प्रथम राष्ट्राराष्ट्रांतील देण्याघेण्याच्या व्यवहाराचा विचार करूं. जगांतील जीं संपन्न राष्ट्रें आहेत त्यांचा सर्व खर्चवेंच जाऊन दरसाल ऐन बाकी म्हणून त्यांच्याजवळ मोठमोठ्या रकमा शिल्लक राहतात. त्या कर्जाऊ भांडवल म्हणून या राष्ट्रांतील व्यापारी इतर देशांत गुंतवितात. याप्रमाणें महायुद्धापूर्वीं इंग्लंडनें परदेशीं कर्जाऊ दिलेलें भांडवल व व्याजीं लावलेली रक्कम जवळ जवळ ६५ अब्ज रुपये एवढी मोठी होती. फ्रान्सनें जवळ जवळ २५ अब्ज रुपये असे गुंतविले होते. तर जर्मनीची सुमारें १७–१८ अब्ज रुपये रक्कम अशीच गुंतली होती. अमेरिकेंत देशांतल्या देशांत भांडवल गुंतविण्यास मुबलक वाव असल्यामुळें महायुद्धापूर्वी अमेरिकेचें भांडवल फारसें परदेशीं जात नसे. उलटपक्षीं परदेशांतूनच अमेरिकेंत भांडवल येई. महायुद्धानंतर ही परिस्थिति कांहींशी बदलली. जर्मनी साफ बुडाला व जर्मन नागरिकांचें परदेशांतील सर्व भांडवल खंडणीचा एक भाग म्हणून दोस्त राष्ट्रांच्या खात्यांत केव्हांच जमा झालें. रशियांतील क्रांतीमुळें फ्रान्सचे चांगलेच हात भाजले. कारण रशियन सरकारी कर्ज व रशियांतील आगगाड्या यांत फ्रेंच भांडवल विशेष गुंतलें गेलें होतें. शिवाय चलनपद्धतीच्या दृष्टीनें स्थिरस्थावर होण्यास फ्रान्सला बरींच वर्षें लागल्यामुळें इतर राष्ट्रांशीं सावकारी करण्यास फ्रान्स महायुद्धानंतर लागलीच समर्थ नव्हतें. राहतां राहून इंग्लंड हें एकटेंच राहिलें व इंग्लंडनें इतर राष्ट्रांस

सर्व हुंडणावळीच्या व्यवहारावर कडक नियंत्रण घालून आपली चलन-हुंडणावळ-पद्धति सावरण्याचा प्रयत्न केला. हल्लींच्या मंदीच्या काळांतून पुनः डोकें वर काढणें असल्यास परकीय चलनविषयक व्यवहारासंबंधीं निर्बंध कमी होणें आवश्यक आहे. पण हें सर्व याविषयीं राष्ट्रांराष्ट्रांचें ऐकमत्य झाल्याशिवाय होणार नाहीं. सुवर्णमानपद्धतीचा त्याग बहुतेक राष्ट्रांनीं आतां केलेला आहे; व ज्यांनीं सुवर्णमानपद्धति पूर्णपणें सोडली नाहीं अशांपैकीं कांहीं राष्ट्रांनीं निरनिराळ्या प्रकारांनीं आपल्या चलनाची किंमत कमी केली आहे.जे पूर्वीच्या पद्धतीस व दरास चिकटून राहिले त्यांची व्यापारी परिस्थिति आज सर्वांत वाईट आहे; व गेल्या दोनतीन वर्षांत जी थोडीबहुत व्यापाराची वाढ झाली आहे ती सर्व जवळजवळ सुवर्णमानपद्धतीचा त्याग करून हुंडणावळीचे दर उतरविणाऱ्या राष्ट्रांच्या व्यापारांत झाली आहे. यामुळें सुवर्णमानपद्धतीचा पुनः स्वीकार करण्याविषयीं या राष्ट्रांची वृत्ति साहजिकच साशंक आहे. गेल्या वर्ष-सहामाहींत सुवर्णमानपद्धति पूर्ववत् जगभर प्रस्थापित करणें जरूर आहे असें सर्व प्रमुख राष्ट्रांतील बहुतेक अर्थशास्त्रज्ञ व व्यापारी मंडळींचें मत बनूं लागलें आहे हें खरें; आणि या प्रकरणीं इंग्लंड, कांहीं युरोपीय राष्ट्रें व अमेरिका यांच्या दरम्यान निमसरकारी वाटाघाटीहि सुरू आहेत. पण इतक्यांत यांतून कांहीं निष्पन्न होईल असें दिसत नाहीं. कारण, या सर्व विचारविनिमयावरून दोन पक्षांत मतभेद बराच तीव्र आहे असें उघड झालें. सुवर्णमानपद्धतीस चिकटून राहिलेल्या फ्रान्स वगैरे राष्ट्रांचें मत असें कीं, या पद्धतीचा पुनः स्वीकार इतर राष्ट्रांनीं शक्य तितक्या लवकर करावा, म्हणजे आपोआप इतर परिस्थिति सुधारूं लागेल. याच्या उलट इंग्लंडचें मत म्हणजे सुवर्णमानपद्धति जारी करणें हें जरी आपणांस तत्त्वतः कबूल असलें, तरी तसें करण्यापूर्वी एक तर तिची घडी पुनः बिघडूं नये म्हणून पूर्वव्यवस्था करणें व चलनविषयक सुधारणेचा खरोखर लगेच उपयोग व्हावा म्हणून प्रथम व्यापारी निर्बंध सर्व राष्ट्रांनीं कमी करणें, या गोष्टी अवश्य झाल्या पाहिजेत.

इंग्रज व इतर तज्ज्ञांच्या मतें चलनविषयक सुधारणा होण्यापूर्वी व्यापारी निर्बंध कमी करणें व सुवर्णमानपद्धतीच्या पुढील स्वरूपाविषयीं कांहीं रूपरेखा निश्चित करणें आवश्यक असल्यामुळें, व्यापारी निर्बंध कमी करण्याची शक्यता हाच खरा महत्त्वाचा मुद्दा उरतो. आज इतके निर्बंध असूनहि कांहीं देशांत अंतर्गत व परदेशी व्यापाराची वाढ दिसूनहि येत आहे हें खरें. पण बहुतांशीं ही वाढ भ्रामक आहे; व कसेंहि असलें तरी या वाढीच्या प्रवृत्तीसहि लवकरच आळा बसेल असें दिसत आहे.

ही वाढ सर्व देशांत सारखीच दृष्टोत्पत्तीस येत नसून ती कांहीं देशांतच दिसून येते. शिवाय या वाढीचीं मुख्य कारणें म्हणचे शस्त्रास्त्रांची व युद्धसामुग्रीची वाढती मागणी, आणि सार्वजनिक इमारती, रस्ते इत्यादींवर कांहीं देशांतील सरकारांनीं केलेला बुद्धिपुरःसर खर्च हीं आहेत. या दोन प्रकारच्या वाढत्या मागणीमुळें कांहीं धंद्यांस तेजी आली आहे. ही तेजी लोखंड, पोलाद, रसायनें, इमारतकाम इत्यादि महत्त्वाच्या धंद्यांत झाल्यामुळें सकृद्दर्शनीं हिचें महत्त्व बरेंच वाटतें. परंतु या भरभराटीचा पाया फार डळमळीत आहे. नेहमींच्या तेजीचें कारण सर्व प्रकारच्या मालास सर्वसाधारण वाढती गिऱ्हाइकी हें असतें आणि याच्या बुडाशीं सुधारलेली आर्थिक परिस्थिति असते. पण ह्या नवीन मागणीच्या बुडाशीं असलेला वाढता खर्च बहुतेक राष्ट्रीय सरकारें कर्ज काढून भागवीत आहेत. या कर्जाचा बोजा अर्थात् प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें सामान्य नागरिकांवरच पडणार आणि परिणामीं त्यांची परिस्थिति सुधारण्याऐवजीं अधिकच बिघडणार, हें उघड आहे. कांहीं देशांत विशेषतः इंग्लंड आणि स्टर्लिंगशीं चलनविषयक संबंधांनीं संलग्न असलेले कांहीं देश यांत-वर दर्शविलेल्या प्रकारच्या फारशा खर्चावांचून व्यापार वाढीस लागलेला आहे. परंतु या वाढीला निश्चित मर्यादा आहे. इंग्लंड हें तर पूर्वींपासून परकी व्यापारावर अवलंबून; आणि ब्रिटिश व्यापाराची वाढ होऊन त्या देशांतील उद्योगधंदे भरभराटीस येणें हें केवळ अंतर्गत मागणीच्या जोरावर घडून येणें शक्य नाहीं.

सध्यां निरनिराळ्या राष्ट्रांनीं अवलंबिलेल्या नियंत्रणांत विशेष लक्षांत घेण्याजोगी गोष्ट ही कीं, परदेशी व्यापाराचें नियंत्रण आज फार बारकाईनें व तपशीलवार केलें जात आहे. आयात अथवा निर्यात मालावर केवळ जबर जकाती लावून हें नियंत्रण केलें जात नाहीं, तर कांहीं देशांत वर दर्शविल्याप्रमाणें प्रत्येक देशाशीं किती रकमेपावेतों व्यापार करायचा हें ठरविलें जातें; आणि शिवाय सर्व महत्त्वाच्या वस्तूंची प्रत्येक देशांतून आयात किती करावयाची हेंहि ठरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. १९२९ सालीं जकातीशिवाय दुसऱ्या प्रकारचे निर्बंध जवळजवळ अस्तित्वांतच नव्हते असें म्हटलें तरी चालेल. पण जगांतील व्यापारी मंदीस सुरुवात झाल्यावर सार्वराष्ट्रीय अशी एकसारखी उपाययोजना कोणतीच होऊं शकली नाहीं. तेव्हां प्रत्येक राष्ट्रानें आपापल्यापुरता विचार करण्यास आरंभ केला. कर्जदार राष्ट्रांस नवीन कर्ज मिळेनासें झालें व जुन्या कर्जाचा बोजा वाहण्यास त्यांच्यांत सामर्थ्य उरलें नाहीं. तेव्हां त्यांस हरतऱ्हेनें आपल्या मालाची निर्गत वाढविणें व परकी मालाची आयात

कमी करणें आवश्यक झालें. पण सावकार राष्ट्रांनींहि ऋणकोंकडून येणारें उत्पन्न घटणें व पुढील परिस्थितीसंबंधीं अनिश्चितता या दोन गोष्टींमुळें आपला परकी मालाच्या आयातीबाबतचा हात आंखडता घेतला. त्यांतच चलनविषयक भानगडी उत्पन्न झाल्या. अशा परिस्थितींत जर्मनीसारख्या राष्ट्रानें आपलें कर्ज अमुक अमुक अटींवरच हप्तेबंदीनें फेडण्यास आपण तयार आहों असें जाहिर केलें. आपला माल विकत घेतल्याशिवाय दुसऱ्याचें कर्ज फेडणें शक्य नाहीं, असें म्हणून जें राष्ट्र मालाच्या आयातनिर्यातीच्या प्रमाणासंबंधीं करार करण्यास तयार आहे त्याचें कर्ज विशेष लवकर फेडण्याची तत्परता जर्मनीनें दाखविली. याचेंच अनुकरण इतर ऋणको राष्ट्रांनीं केलें. "चोराच्या हातची लंगोटी" या न्यायानें धनकोंनीं त्यांतल्या त्यात बऱ्या अटी मिळतात हें पाहण्याचा प्रयत्न केला झालें. यापुढें राष्ट्राराष्ट्रांतील व्यापार जुन्या पद्धतीवर चालू न राहतां प्रत्येक राष्ट्रानें इतर राष्ट्रांशीं केलेल्या निरनिराळ्या करारानुसार बद्ध होऊं लागला. हे सर्व करार दोन दोन राष्ट्रांमधील आहेत. म्हणजे या करारांत प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या प्रत्येक विशिष्ट राष्ट्राशीं होणाऱ्या आपल्या आयातनिर्यातीचा मेळ घालण्याचा प्रयत्न करीत असतें. नेहमीं कोणत्याहि देशाच्या एकंदर सर्व आयातींत व निर्गतींत साधारण मेळ असतो; पण प्रत्येक राष्ट्राशीं असा निरनिराळा मेळ घालीत बसल्यास जगाच्या व्यापारास फारच निराळें वळण लागून तो संकुचित व्हावा हें साहजिक आहे. आपणाला लागणारा माल जेथून व जितका मिळतो तेथेंच व तितकाच आपला माल खपतो हें असंभाव्य; आणि असें मुद्दाम घडवून आणण्याचा प्रयत्न केला तर दोघांचीहि गिऱ्हाइकी कमी होणारच.

जसजशी मंदी वाढत चालली तसतसें शक्य तितकें स्वयंपूर्ण बनण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्र करूं लागलें; व राष्ट्रांचा व्यक्तिशः विचार केल्यास इतर राष्ट्रें निर्बंध लादून परकी मालावर बहिष्कार घालूं लागलीं तर कोणाहि एका राष्ट्राला तोच मार्ग पत्करणें श्रेयस्कर होतें. आयात-निर्गत मालाचें ठराविक प्रमाण (quotas), इतर राष्ट्रांशीं हुंडाणावळीसंबंधीं विशेष ठराव (clearing agreements) इत्यादि निर्बंधांचे नवीन नवीन प्रकार एकदां एका राष्ट्रानें अमलांत आणिल्याबरोबर ते लवकरच सगळीकडे प्रचारांत येऊं लागले. परिस्थिति बिकट आली म्हणून कोणी कांहींतरी तात्पुरती उपाययोजना करावी, व दुसऱ्यानें केलें म्हणून स्वसंरक्षणार्थ आपणांसहि तसें करणें भाग आहे असें म्हणून इतरांनीं त्याचें अनुकरण करावें, असा हा सर्व प्रकार घडून आला आहे. आतांहि सर्वांनीं मिळून बंधनें कमी करण्याचा प्रयत्न करणें अत्यावश्यक आहे असा जरी सर्व

विचारी माणसांचा अभिप्राय असला, तरी यास सुरुवात कोणीं व कशी करावयाची हा एक बिकट प्रश्न आहे. कारण, प्रत्येक राष्ट्रास असेंच वाटणार कीं आपण निर्बंध कमी करून इतरांनीं मात्र ते कायम ठेविले तर आपलें नुकसान अधिकच होणार. शिवाय निर्बंध कमी करावे असें जरी तत्त्वतः सर्वांनीं कबूल केलें तरी हें प्रत्यक्ष घडवून आणणें अतोनात कठीण आहे. गेल्या पांचसहा वर्षांत प्रत्येक राष्ट्रानें स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न केल्यामुळें सर्व प्रकारचे नवीन उद्योगधंदे जेथें तेथें स्थापिले गेले आहेत. या उद्योगधंद्यांचें जीवित केवळ व्यापारी निर्बंधांवर अवलंबून आहे. अर्थात् या सर्वांस आपल्यापुरते तरी हे निर्बंध निघूं नयेत असें वाटतें व त्याकरितां ते आटोकाट खटपट करीत असतात. लॉर्ड नफील्ड (मॉरिस मोटर कंपनीचे मालक) हे एकदा सार्वजनिकरीत्या इंग्रज पोलादकारखानदारांना ते संरक्षक जकाती मागतात म्हणून 'आळशी लुटारू' असें संबोधतात, तर दुसऱ्या प्रसंगीं ब्रि. वसाहतींत अमेरिकन मोटरींचा खप होऊं देण्याबद्दल उपाययोजना करणें सरकारचें कर्तव्य आहे, असें बजावून सांगतात. कारखानदार व व्यापारी एकमेकांशीं संगनमत करून वाटेल ते निर्बंध लादून घेतात व सामान्य जनतेचें हित मात्र कोणी पाहात नाहीं, हा अनुभव सार्वत्रिक आहे. स्वार्थसाधु व्यापारी व कारखानदार यांचें वजन जोंपावेतों सरकारावर आहे तोंपावेतों दूरवर विचार करून उदार धोरण स्वीकारणें अशक्य आहे.

राष्ट्रसंघाच्या चोपड्यांत स्वीकारलेली विचारसरणी येणेंप्रमाणें असून ती अर्थात् बहुतांशीं निर्दोष आहे. दोन वर्षांपूर्वीं यांत मांडिलेले सिद्धान्त बऱ्याच राजकारणी पुढाऱ्यांनीं मान्य केले नसते; पण अलीकडे आलेल्या कटु अनुभवामुळें निरनिराळ्या राष्ट्रांची एकजुटीनें काम करण्याची तयारी बरीच दिसून येऊं लागली होती. या कार्यांत मोठ्या व प्रमुख राष्ट्रांची जबाबदारी इतरांपेक्षां अर्थात् अधिक आहे. धनको व संपन्न गिऱ्हाईक राष्ट्र या दुहेरी नात्यानें अमेरिकेवर मदत करण्याची पात्रता व जबाबदारी विशेष आहे. इंग्लंड हें परवांपावेतों पूर्णपणें निर्बंधरहित राष्ट्र होतें. त्यानें १९३१ सालीं निर्बंधक जकातींचा स्वीकार केला व १९३३ सालीं ओटावा येथें आपलें साम्राज्य स्वयंपूर्ण करण्याचा घाट घातला. या दोन्ही गोष्टींमुळें इतर राष्ट्रांच्या व्यापारावर वाईट परिणाम होऊन त्यांच्या निर्बंधक धोरणास उत्तेजन मिळालें. शिवाय चलनविषयक धोरण आंखणारीं राष्ट्रें फार आहेत. एकंदर स्टर्लिंगसमूहाचा परकी व्यापार एकंदर सार्वराष्ट्रीय व्यापाराच्या तिसऱ्या हिश्याहून अधिक आहे, असा अंदाज केला जातो. तेव्हां कांहींहि नवीन उपक्रम करणें हें इंग्लंडच्या सहकार्यावांचून होणें

कर्जाऊ रकमा देणें व इतर देशांतील उद्योगधंद्यांत भांडवल घालणें हा व्यवहार महायुद्ध संपल्याबरोबर सुरू केला. अमेरिकेंतील परिस्थिति आतां पूर्णपणें बदलली होती. लढाई चालू असतांनाच दोस्तराष्ट्रांना अमेरिकेनें मोठमोठ्या रकमा कर्जाऊ म्हणून दिल्या होत्या व असें करतांनाच अमेरिकेंत जें जुनें परदेशी भांडवल आलें होतें त्याची परतफेड करून टाकली होती. अमेरिका आतां जें धनको बनलें तें यापुढें सारखा हाच व्यवहार करण्याकरितां. अमेरिकेंत नवीन भांडवल पूर्वीइतकें लागेनासें झालें व जसजसें राष्ट्र जास्त श्रीमान झालें तसतशी वर्षोवर्षींची ऐन शिल्की रक्कमहि वाढूं लागली. तेव्हां अमेरिकेनें परक्या राष्ट्रांस कर्जाऊ रकमा देणें, इतर देशांतील औद्योगिक व्यवहारांत भाग घेऊं लागणें हा नवीन उपक्रम गेल्या दहा वर्षांत सुरू केला. १९२४ सालच्यापुढें तर हा अमेरिकेचा व्यवहार इंग्लंडहूनहि कांहींसा अधिक प्रमाणांत होऊं लागला. इंग्लंड व अमेरिका यांनीं मिळून १९२४ ते १९२९ एवढ्या कालांत जवळ जवळ १५ अब्ज रुपये परदेशीं कर्जाऊ दिले. कर्ज काढणारीं प्रमुख राष्ट्रें म्हणजे जर्मनी व ऑस्ट्रिया हीं होतीं. त्यांतल्या त्यांत जर्मनीचा भाग खरा महत्त्वाचा; कारण जर्मनीनें या काळांत जवळ जवळ ११ अब्ज रुपयांचें कर्ज काढलें.

एकंदर जर्मन परिस्थितीचा जगाच्या व्यवहारावर विशेष परिणाम घडून आलेला असल्यामुळें तिचा विचार कांहींसा विस्तारानें करूं. १९२१ सालापासून १९२३ सालापावेतों जर्मन चलनपद्धतींतील दुर्व्यवस्थेमुळें आर्थिक व्यवहाराचें स्वरूप फार अनिश्चित बनून एकंदर काल हलाखीचा गेला. १९२३ मध्यें जुन्या नोटा कवडीमोल म्हणून काढून टाकून नवीन चलन जेव्हां सुरू करण्यांत आलें तेव्हां अर्थातच ज्यांच्या ज्यांच्या म्हणून जुन्या ठेवी व जुने कर्जरोखे होते ते साफ बुडाले. राष्ट्रीय सरकारचें जुनें कर्ज जवळ जवळ पूर्णपणें उतरलें व कारखानदार वगैरेंनींहि ज्या जुन्या रकमा कर्जाऊ घेतल्या होत्या त्यांचा बोजा अगदीं हलका झाला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जेवढें भांडवल म्हणून मार्कांच्या रूपानें सावकारींत किंवा उद्योगधंद्यांत गुंतलें होतें तेवढें नामशेष झालें व ऋणको वर्गाची चैन झाली. इमारती, यंत्रें वगैरे जी संपत्ति होती ती कायम राहिली, हा एका दृष्टीनें जर्मन कारखानदारवर्गाचा फायदा झाला; पण उलटपक्षीं सबंध राष्ट्रांतील फिरतें भांडवल या रूपानें जो पैसा उद्योगधंद्यांस लागतो तोहि नाहींसा झाला हें लक्षांत घेतलें पाहिजे. म्हणजे सबंध जर्मनींत सरकारास अथवा कारखानदारांस कर्जाऊ रक्कम देण्याची कोणाचीच ताकद उरली नाहीं हें उघड आहे. तेव्हां "नवी विटी नवें राज्य" या न्यायानें नवीन

चलनपद्धति प्रस्थापित करून जर्मनीच्या आर्थिक जीवनाच्या पुनरुद्धारास जेव्हां सुरुवात करावयाची तेव्हां मुळांत सरकारास अथवा उद्योगधंद्यांस लागणारा सर्वच पैसा बाहेरून आणणें प्राप्त होतें. हा पैसा अमेरिकेनें फार मोठ्या प्रमाणांत पुरविला व इंग्लंडमधूनहि बऱ्याच रकमा गेल्या. १९२४ सालाच्या पुढें अमेरिकेंत विशेष भरभराट असल्यामुळें परदेशीं कर्जाऊ रकमा देण्याच्या व्यवहारास तेजी आली होती व जर्मनीला अमेरिकेंत कर्ज उभारणें फारसें कठिण गेलें नाहीं. या कर्जाऊ रकमांच्या जोरावरच उद्योगधंदे पुन्हा पूर्ववत् चालू लागले व कर्जाऊ रकमांच्या साहाय्यानेंच इतकीं वर्षें जर्मनीनें खंडणीची भरपाई केली. जोंपर्यंत अमेरिकेंत तेजी होती तोंपर्यंत कर्ज काढण्यास फारशी अडचण नव्हती. पण अमेरिकेंत हळूहळू व्यवहारास ओहोटी लागणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. जर्मनीस एवढ्या मोठ्या रकमा दिल्या जातात त्या परत फेडण्याची व त्यावरचें सालोसाल व्याज देण्याची जर्मनीच्या अंगांत कितपत पात्रता आहे, याबद्दल अमेरिकन व इतर भांडवलवाल्यांस शंका येऊं लागली. तेव्हां कर्जाऊ रकमांचा ओघ बंद होणें साहजिक होतें. अशी परिस्थिति १९२९ सालीं उत्पन्न झाली. हिचा आर्थिक व्यवहारावर कसा परिणाम झाला हा विचार योग्य स्थळीं करूं.

वर निर्देशिलेले व्यवहार बहुधा लांब मुदतीचे आहेत. याशिवाय फार महत्त्वाचे व्यवहार म्हणजे लहान मुदतीच्या फिरत्या ठेवींचे होत. यांचा विचार करण्यापूर्वी १९२५ सालीं इंग्लंडनें सुवर्णमानपद्धति स्वीकारल्यापासून पुढील पांच वर्षांतील चलनपद्धतीच्या घडामोडींचें थोडक्यांत वर्णन करणें जरूर आहे. सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार करणें म्हणजे काय हें मागील लेखांत स्पष्ट केलें आहे. कागदी चलनपद्धति प्रचलित असली म्हणजे नोटांची किंमत पूर्णपणें नियमित असून ती मुख्यतः नोटांच्या पुरवठ्यावर अवलंबून असते. सुवर्णमानपद्धति आतां स्वीकारणें म्हणजे कागदी नोटांचा सोन्यांत भाव ठरवून तो सारखा कायम राखण्याचें आश्वासन देणें हें होय. महायुद्धानंतर सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार जेव्हां जेव्हां निरनिराळ्या राष्ट्रांनीं केला तेव्हां त्यांनीं आपणांस सोईस्कर पडतील असे नवीन सोन्याचे भाव कागदी चलनांत मुकर करून सुवर्णमानपद्धति पुन्हा स्वीकारली. जेथें शक्य असेल तेथें अर्थात् महायुद्धापूर्वी जी त्या त्या देशांतील मुख्य चलनाची किंमत होती ती ठरविण्याचाच प्रयत्न करण्यांत आला. परंतु हें बहुतेक राष्ट्रांस शक्य नव्हतें. फ्रान्स, इटली इत्यादि देशांत कागदी चलनाची किंमत महायुद्धानंतर इतकी उतरली होती कीं, फ्रँक व लिरा यांची महायुद्धापूर्वी जी सोन्यांत किंमत होती ती ठरविणें सरकारास

नाहीं. फ्रान्स हें सुवर्णमानपद्धतीचें केंद्र असें महत्त्वाचें राष्ट्र. या तीन राष्ट्रांनीं तरी एकजुटीनें कांहीं प्रयत्न केला तरच हल्लींच्या चमत्कारिक परिस्थितींतून वाट निघणें शक्य होईल. कांहीं महिन्यांपूर्वी या सर्व गोष्टी घडून येऊं शकतील अशी थोडी तरी आशा करण्यास जागा होती. पण आतां लढाईची नवी वावटळ सुरू झाल्यापासून ही आशा पूर्णपणें लयास गेली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. लढाई बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पेटल्यास युद्धसामुग्रीला मागणी फार मोठी येऊन आर्थिक व्यवहारास नवीनच वळण लागेल. पण तसें न झाल्यास हल्लींचीच अर्धवट परिस्थिति आणखी बराच वेळ टिकेल असा अंदाज दिसत आहे.

---

# ५ हिंदी कंपन्यांची 'मॅनेजिंग एजन्सी' ऊर्फ व्यवस्थापक-मंडळ पद्धति*

सर्वच गोष्टी मोठ्या प्रमाणावर व्हावयाच्या हा आधुनिक आर्थिक युगाचा एक विशेष आहे. उत्पादन-घटक मोठे, कारखान्यांत घातलेलें भांडवल मोठें व कंपन्यांचे मालकहि अनेक, अशी बहुतेक महत्त्वाच्या धंद्यांतील परिस्थिति आहे. भांडवल पुष्कळ लागतें म्हणून तें अनेकांकडून गोळा करणें आवश्यक असतें; आणि लहान लहान भाग देशभर विकून तें गोळा केलें जातें. पण सार्वजनिक कंपन्यांत जेवढे भाग धारण करणारे तेवढे सर्व कंपनीचे मालक. तेव्हां मालक अनेक व ते देशभर विखुरलेले, अशा परिस्थितींत कंपनीचा कारभार चालविण्याची व्यवस्था कशी लावावी हा एक महत्त्वाचा प्रश्न होऊन बसतो.

प्रातिनिधिक लोकशाहीच्या तत्त्वानुसारच या सार्वजनिक कंपन्यांचा कारभार चालवावा, अशी सर्वसाधारण कल्पना बांधतां येते व इंग्लंडमधील सार्वजनिक कंपन्यांच्या कारभाराची घटना अशाच प्रकारची असते. सर्व भागीदारांची प्रतिवार्षिक सभा होते. तींत चालक ( Directors ) मंडळाची अंशतः अथवा पूर्णपणें निवडणूक-फेरनिवडणूक होते. या वार्षिक सभेंतच कंपनीचा ताळेबंद मंजूर होऊन नफ्याची योग्य ती विल्हेवाट लाविली जाते. अर्थात् ही तात्त्विक कल्पना झाली. खरोखर पाहतां या वार्षिक सभेस फार थोडे भागीदार हजर असतात; व चालकमंडळाच्याच हातांत सर्व खरी सत्ता असून तेच आपल्या मताप्रमाणें सर्व कारभार चालवितात. कंपनीच्या कल्पनेचे उत्पादक आणि सुरुवातीस भांडवल जमविण्याकरितां खटपट करणारे यांतूनच चालक-मंडळ प्रथम बनतें; व भागांच्या मालकींत अथवा कंपनीच्या अंतःस्थ काराभारामुळें मुख्य चालक-मंडळाच्या महत्त्वांत विशेष फरक न झाला, तर सुरुवातीच्या चालक-मंडळाच्या हातांत व परंपरेंतच कंपनीची व्यवस्था चालू राहते. ही इंग्लंडांतील वस्तुस्थिति झाली. यांत लक्षांत घेण्याजोगी गोष्ट ही कीं तत्त्वतः सर्व सत्ता भागीदारांच्या हातीं असते आणि वस्तुतः चालकमंडळांतील प्रमुख लोक ती गाजवतात.

आपल्या देशांत मर्यादित जोखमीच्या सार्वजनिक कंपन्या निघाल्या त्या प्रथम इंग्रजांनीं काढल्या; व सार्वजनिक कंपन्यांविषयींचा हिंदी कायदा प्रायः इंग्रज कायद्याप्रमाणेंच बनत गेलेला आहे. परंतु प्रथमपासूनच आपल्याकडील सार्वजनिक

---

* लोकशिक्षण, सप्टेंबर–आक्टोबर १९३६.

कंपन्यांच्या कार्यपद्धतींचें स्वरूप इतर देशांतील पद्धतींहून अगदीं भिन्न असें झालें; व या भिन्न घटनेचाच विचार करण्याचें प्रस्तुत लेखांत योजिलें आहे. कंपनीच्या कारभारांत भागीदार व चालक-मंडळ यांहून निराळाच असा व्यवस्थापक अथवा व्यवस्थापक-मंडळ ( Managing Agents ) आपल्या देशांत आढळून येतें. व या व्यवस्थापक-मंडळाच्या पद्धतीमुळें एकंदर सार्वजनिक कंपन्यांच्या कार्यपद्धतींत आपल्याकडे कांहीं विशिष्ट प्रकार आढळून येतात व कांहीं विशिष्ट प्रश्न उद्भवतात. व्यवस्थापक-पद्धतींतील मुख्य विशेष हा कीं, यामुळें भागीदार व चालक-मंडळ या दोहोंचेहि अधिकार कमी होऊन कंपनीवरील बहुतेक सत्ता व्यवस्थापकांच्या हातींच केंद्रीभूत होते. व्यवस्थापक हे कंपनीचे उत्पादक, उत्पादकांचे वंशज किंवा कालांतरानें उत्पादकांचे अधिकार प्राप्त झालेले असे कोणीतरी असतात. कंपनीच्या सुरुवातीस कंपनी व व्यवस्थापक यांजमध्यें करारमदार होऊन व्यवस्थापकांचे हक्क ठरलेले असतात. बहुतेक ठिकाणीं या करारान्वयें कंपनीचा जवळजवळ सर्व कारभार चालविण्याची सत्ता लांब मुदतीनें किंवा कायमची व्यवस्थापकाकडे दिलेली असते. व्यवस्थापकांस मिळणारा खर्च, वेतन वगैरेहि करारान्वयेंच ठरविलें जातें. हा करार प्रथमच होऊन गेला असल्यामुळें भागीदारांस व्यवस्थापकांना कारभारावरून दूर करणें बहुतांशीं शक्य नसतें व इंग्लंडांतल्याप्रमाणें चालक-मंडळ जरी निवडलें अथवा नेमिलें गेलें तरी या चालक-मंडळावरहि हा कारभाराचा बोजा किंवा त्याबद्दलची जबाबदारी नसते. एकंदर मूळ कराराबरहुकूम बहुतेक सर्व अंतर्गत व्यवस्था व्यवस्थापकाकडे सोंपविलेली असल्यामुळें त्यांत ढवळाढवळ करण्याचा चालक-मंडळास कांहीं हक्क नसतो. आणि दुसरें असें कीं, चालक-मंडळावर कांहींएक सभासद नेमण्याचा हक्क व्यवस्थापकांस असून शिवाय व्यवस्थापक स्वत: भागीदार या नात्यानें चालक-मंडळाच्या निवडणुकींत प्रामुख्यानें भाग घेतात. तेव्हां चालक-मंडळ हें व्यवस्थापकांच्या विरुद्ध जाईल किंवा त्यांच्या कारभारांत विशेष ढवळाढवळ करील, अशी कधीं भीति नसते. एकंदर चालक-मंडळ हें खरोखर इंग्लंडमधल्याप्रमाणें कारभारी-मंडळ नसून तें आपल्याकडे केवळ सल्लागार-मंडळ अथवा देखरेख-मंडळ असतें; आणि तेंहि नामतःच.

व्यवस्थापक म्हणून कोणी निराळे असण्याची पद्धति हिंदुस्थानांत उद्भवण्याचें कारण काय व या पद्धतीचे परिणाम औद्योगिक घटनेवर काय घडून येतात हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. हिंदुस्थानांत व्यवस्थापक-पद्धतीचा उगम अर्वाचीन भांडवलशाहीच्या उगमाप्रमाणेंच बंगाल्यांत ब्रिटिश भांडवलवाल्यांत झाला.

याची कारणमीमांसा आज लावण्यांत येते ती अशी: पाटाच्या गिरण्या, कोळशाच्या खाणी किंवा चहाचे मळे हे सर्व प्रथम हिंदुस्थानांत ब्रिटिश भांडवलाच्या जोरावर निघाले. हें भांडवल ब्रिटिश सार्वजनिक कंपन्यांना ब्रिटिश लोकांनीं पुरविलेलें असे. परंतु त्या काळांत येथें भांडवल जरी मुबलक आलें तरी ब्रिटिश व्यापारी मंडळी अशी केव्हांहि थोडीच असे. या सर्व कंपन्या इंग्लंडमध्यें नोंदल्या गेलेल्या असत आणि तेथें त्यांचें रीतसर चालक-मंडळ असे. पण त्या चालक-मंडळास येथील कारभारावर देखरेख ठेवणें हें निदान त्या काळीं तरी अशक्यप्राय होतें. बरें, हिंदुस्थानांत असणारी ब्रिटिश व्यापारी मंडळी ही अगदीं मूठभर असल्यामुळें या निरनिराळ्या कारभारावर लक्ष ठेवण्याकरितां त्यांचीं हिंदुस्थानांत चालक-मंडळें करणें हेंहि अशक्य होतें. तेव्हां या ब्रिटिश कंपन्यांस आपला येथील सर्व प्रत्यक्ष कारभार एखाद्या व्यवस्थापकावर पूर्णपणें सोंपविणें अपरिहार्य असे. ब्रिटिश कंपन्यांसंबंधीं तरी ही सुरुवातीची परिस्थिति बहुतांशीं आजहि बदललेली नाहीं. तेव्हां त्यांचा सर्व कारभार या व्यवस्थापकांमार्फत चालतो. यांतील कांहीं व्यवस्थापक ( आतां त्या व्यवस्थापक कंपन्या झाल्या आहेत ) फार जुने असून त्यांच्या हातीं निरनिराळ्या अनेक सार्वजनिक कंपन्यांचा कारभार आहे. नवीन व्यवहार हातीं घेणें व नवीन कंपन्या उभारणें हा या व्यवस्थापक कंपन्यांचा उद्योग सारखा चाललेला असतो; व आपण आणि नवीन उभारलेल्या कंपन्या व आपल्या ताब्यांत आलेल्या जुन्या कंपन्या यांचे व्यवस्थापक म्हणून या व्यवस्थापक कंपन्या स्वतःस नेमून घेत असतात. या व्यवस्थापक कंपन्यांच्या पतीमुळें त्यांनीं नवीन काढलेल्या कंपन्यांसहि भांडवल मिळण्यास कांहीं प्रयास पडत नाहींत. या व्यवस्थापक कंपन्यांच्या विस्ताराची थोडीशी कल्पना श्री. लोकनाथन् यांच्या उत्कृष्ट पुस्तकावरून घेतलेल्या खालील तपशिलावरून येईल. कांहीं प्रमुख व्यवस्थापक कंपन्या किती व कोणत्या प्रकारच्या कंपन्या चालवितात हें दर्शविणारा तक्ता येणेंप्रमाणें :—

| व्यवस्थापक कंपनीचें नाव | एकंदर कंपन्या | पाट-गिरण्या | चहाचे मळे | कोळशाच्या खाणी | रेल्वे इ. | वीज व एंजि-नियरिंग | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अँड्र्यू यूल आणि कं. | ५४ | १० | १८ | १४ | ३ | ... | ९ |
| डंकन ब्रदर्स आणि कं. | २५ | १ | २४ | ... | ... | ... | ... |
| मार्टिन आणि कं. | २[illegible] | ... | ... | ७ | ८ | ६ | १ |
| ऑक्टेव्हियस स्टील कं. | २० | ... | १३ | १ | १ | ५ | ... |
| बेग्, डनलॉप आणि कं. | १९ | ४ | १३ | ... | ... | १ | १ |
| बर्ड आणि कं. | २० | ८ | ... | ३ | ५ | २ | २ |

अशक्य होतें. यामुळें सुवर्णमानपद्धति स्वीकारावयाची ठरलें असेल त्या वेळेस सोन्याची कागदी चलनांत साहजिक जी किंमत चालू असेल तिच्या जवळपास एखादा सोईस्कर आंकडा घेऊन नवीन कायद्यांत तो ठरविला जाई. इंग्लंडनें सुवर्णमानपद्धतीचा स्वीकार केला तेव्हां कागदी पौंडाची किंमत सोन्याच्या जुन्या पौंडाच्या जवळ जवळ होती. तेव्हां सहजच पौंडाच्या जुन्या किंमतीवरच नवीन पद्धति बसवावी असें ठरविण्यांत आलें. पण असें करण्यापूर्वी कागदी पौंडाचा भाव थोडासा कृत्रिम रीतीनें वाढविणें अवश्य होतें. कोणत्याहि चलनाचा भाव कृत्रिम रीतीनें वाढविणें याला उपाय म्हणजे त्या चलनाचा पुरवठा कमी करणें हा होय. चलनाचा पुरवठा कमी करावयाचा असल्यास व्याजाचे दर वाढवून, एकंदर व्यापारी व आर्थिक व्यवहार आंखडता घेणें अवश्य आहे. व्याजाचे दर वाढविले व बँकांस आपलें कर्ज देण्याचें मान कमी करण्यास सांगितलें, म्हणजे साहजिकच व्यापारी व कारखानदार यांस आपला प्रपंच आवरता घ्यावा लागतो व एकंदर जिनसांच्या किंमती उतरूं लागतात. पण असें करणें म्हणजे कृत्रिम रीतीनें आर्थिक व्यवहारास खीळ घालून व्यापारी मंदी उत्पन्न करणें आलें. इंग्लंडमध्यें बँका वगैरेंचा सुवर्णमानपद्धति पुन्हा स्वीकारण्याचा विशेष आग्रह होता आणि किंमती थोड्याशा कृत्रिम रीतीनें खालावल्या गेल्या तरी फारसा तोटा होणार नाहीं असा बहुतेक जणांचा समज झाला होता. १९२५ सालानंतर एकंदर सुवर्णमान-पद्धतींत किंमती जर वाढल्या असत्या तर इंग्लंडनें सुवर्णमानपद्धति कांहींशा चढत्या भावावर स्वीकारली याचे परिणाम फारसे अनिष्ट झाले नसते. परंतु एकंदर किंमती वाढल्या नाहींत आणि इंग्लंडमधील मालाच्या किंमती कांहींशा उतरविल्या गेल्या; मजुरीचे दर त्या प्रमाणांत उतरविणें मजूरसंघांच्या विरोधामुळें अशक्य झालें. यामुळें इंग्रज कारखानदारांचा तोटा झाला. विशेषतः कोळसा, कापड इत्यादि मुख्यतः निर्गतीवर अवलंबून असलेल्या धंद्यांत विशेष नुकसान येऊं लागलें. यामुळें १९२४ ते १९२९ या कालांत अमेरिका, जर्मनी इत्यादि राष्ट्रांत ज्या मानानें भरभराटीचे दिवस गेले तितके इंग्लंडमध्यें गेले नाहींत.

जी स्थिति इंग्लंडची तीच हिंदुस्थानची झाली. कारण हिंदुस्थान सरकारनें १८ पेन्सांचा हुंडणावळीचा भाव ठरविण्यांत असलीच चूक केली. हिंदी व्यापारी मंडळी व इतर हिंदी पुढारी यांचें हेंच म्हणणें होतें कीं, रुपयाचा भाव साहजिकपणें सोळा पेन्स हा बसत आहे. म्हणजे अमेरिका वगैरे इतर देशांतील किंमती व हिंदुस्थानांतील किंमती ताडून पाहिल्यास रुपयाची किंमत सोन्यांत सोळा पेन्स आहे असें दिसून येईल. अठरा पेन्स ही किंमत ठरविली तर रुपयाची किंमत कृत्रिम

रीतीनें वाढविली असें होईल व ही वाढलेली किंमत कायम राखण्याकरितां रुपयाचा पुरवठा कमी करून कृत्रिम व्यापारी मंदी उत्पन्न करणें अवश्य होईल. आणि अनुभवांतीं हें हिंदी पुढाऱ्यांचें म्हणणें खरेंहि ठरलें. पण ही इंग्लंड व हिंदुस्थान यांची विशिष्ट परिस्थिति झाली. इतर बहुतेक देशांत १९२५ पासून पुढील चार वर्षें चांगलीं गेलीं हें खरें. कारण इतर देशांत सुवर्णमानपद्धति स्वीकारतांना कागदी चलनाचा जो सोन्यांत भाव बसविण्यांत आला तो कृत्रिम रीतीनें चढविलेला नव्हता.

सुवर्णमानपद्धति कोणत्याहि देशानें स्वीकारण्यापूर्वी तेथील मध्यवर्ती बँकेनें सोन्याचा बराचसा संचय करून ठेवला पाहिजे हें उघड आहे. कारण सोनें अमुक एका भावानें विकणें अथवा विकत घेणें याबद्दल घातलेलीं कायदेशीर बंधनें बँकेला पाळणें जरूर असतें व हुंडणावळीचा दर खालावण्याचा संभव दिसल्यास जरूर ती सोन्याची निर्गत होऊं देऊन व्याजाचा दर वाढवून त्या हुंडणावळीच्या दराचें स्थैर्य राखण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकेवरच असते. सुवर्णमानपद्धति स्थापन करण्याच्या वेळेसच प्रत्येक देशांत कायद्यानें कागदी चलनाची एकंदर रक्कम व तिला तारण म्हणून ठेवण्याचा किमान सुवर्णनिधि यांचा संबंध ठरवून दिलेला असतो. त्यामुळें १९२५ च्या पुढें युरोपमधील निरनिराळ्या राष्ट्रांची सोन्याबद्दलची मागणी बरीच वाढली. कांहीं देशांतून सोन्याच्या ऐवजीं परदेशीं विशेषतः न्यूयॉर्क अथवा लंडन येथें हुंड्या पटविण्याची व्यवस्था केली असतां सुवर्णसंचय प्रत्यक्ष करण्याची जरुरी नव्हती. तेव्हां या देशांतील मध्यवर्ती बँका न्यूयॉर्क व लंडन येथें लहान मुदतीच्या ठेवी बँकांतून राखीत असत. पण इतर देशांत प्रत्यक्ष सोनेंच बँकेंत बाळगलें पाहिजे असा निर्बंध घालण्यांत आला. आणि विशेषतः फ्रान्समध्यें सोन्याचा संचय व एकंदर नोटांची रक्कम यांचें प्रमाणहि बरेंच मोठें ठरविण्यांत आलें. यामुळें १९२७ ते १९२९ सालपावेतों पॅरिसमधील मध्यवर्ती बँकेस सोनें फ्रान्समध्यें ओढून घेण्याचें धोरण स्वीकारावें लागलें. जगांतील सोन्याचा एकंदर संचय हा मर्यादित आहे व त्याची प्रतिवार्षिक वाढ अलीकडे फार झपाट्यानें होत नाहीं. यामुळें कोणत्याहि एका देशांत सोन्याचा संचय वाढविणें म्हणजे इतर देशांतील संचय कमी करणें प्राप्त आहे. याप्रमाणें फ्रान्सांतील व इतर देशांतील सुवर्णनिधि वाढूं लागल्याबरोबर अमेरिका, इंग्लंड या देशांतून बरेंचसें सोनें बाहेर जाऊं लागलें. मागील लेखांत दर्शविल्याप्रमाणें महायुद्धानंतर सुवर्णमानपद्धतीचें स्वरूप कांहींसें पालटलेलें आहे. यांत सोन्याची निर्गत अथवा आयात सुरू झाल्याबरोबर पैशाच्या पुरवठ्यांत पूर्वीइतका आपो-आप फरक घडून येत नाहीं. महायुद्धकाळीं जगांतील बहुतेक सर्वच सोनें अमेरिकेंत

पूर्व हिंदुस्थानांतील सर्व औद्योगिक वाढ ब्रिटिश भांडवलवाल्यांनींच केलेली आहे व तेथील सर्व उद्योगधंदे आजतागायत बहुतांशीं ब्रिटिशांच्याच हातांत आहेत. इकडील धंद्यांत असलेल्या स्थैर्याचे व सुसंघटितपणाचें श्रेय बहुतांशीं या मोठमोठ्या ब्रिटिश व्यवस्थापक कंपन्यांसच देणें रास्त आहे.

पश्चिम हिंदुस्थानांतील परिस्थिति मात्र याच्या उलट आहे. पश्चिम हिंदुस्थानांत झालेली औद्योगिक वाढ स्वदेशी भांडवलवाल्यांच्या प्रयत्नांमुळेंच झाली; व पश्चिम भागांत ब्रिटिश भांडवलवाल्यांच्या हातांत असलेल्या कंपन्या अगदीं थोड्या आहेत. खरें पाहतां व्यवस्थापक म्हणून निराळी योजना करण्याची या हिंदी भांडवलवाल्या कंपन्यांस अगदींच प्रयोजन नव्हतें. परंतु हिंदुस्थानांत व्यवस्थापक अथवा व्यवस्थापक कंपन्यांचा प्रसार पूर्व भागांत जितका आहे तेवढाच पश्चिम भागांत आहे; व आज जे बिकट प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यांचें मूळ बहुतांशीं पश्चिम भागांतील व्यवस्थापकांच्या कारभारांतच आहे. मुंबईस व्यवस्थापक पद्धति येण्याचें मुख्य कारण ती कलकत्त्यास पूर्वीं होती एवढेंच दिसतें. इकडे जेव्हां सार्वजनिक कंपन्यांचा कारभार प्रथम सुरू झाला, तेव्हां त्याची घटना आपल्या देशांत इतरत्र पूर्वींच प्रचलित असलेल्या पद्धतीप्रमाणें व्हावी हें साहजिक होतें. प्रथम प्रथम जे उद्योगधंदे निघाले ते एखाद्दुसऱ्या मोठ्या व्यापाऱ्यानें किंवा कांहीं थोड्याजणांनीं मिळून भागीनें असे काढले. पुढें यांचें सार्वजनिक कंपनींत रूपांतर झालें तेव्हां चालक-मंडळ निवडून कंपनीचा सर्व कारभार त्यांजकडे व भागदारांकडे सुपर्त न करितां तो आपणांकडे व्यवस्थापक म्हणून राखून ठेवणें, हें केव्हांहि कंपनीच्या संस्थापकांस श्रेयस्कर वाटणार. बरें, देशांत हीच पद्धति प्रथम चालू असल्यामुळें इकडच्या कंपन्यांच्या संस्थापकांनीं ती स्वीकारण्यांत विशेष चलाखी किंवा लबाडी केली, असेंहि म्हणतां येत नाहीं. परंतु एकदा व्यवस्थापकांकडे कारभार सोंपविण्याची पद्धति पडल्यानंतर ती बदलणें, हें इकडील भांडवलवाल्यांसाहि हितावह न वाटावें हें साहजिक होतें. व्यवस्थापक-पद्धति उत्पादकांच्या व संस्थापकांच्या फायद्याची हें उघड आहे. त्याकारणानें नवीन कंपन्या निघतांना जिकडेतिकडे तिचाच स्वीकार होत गेला यांत नवल नाहीं. एवढें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, मुंबईत या पद्धतीचा स्वीकार झाला नसता तरी प्रथमपासून चालण्यासारखें होतें. हिंदी भागदार हे ब्रिटिश भागदारांप्रमाणें हजारों मैल दूर नव्हते. हिंदी कंपन्यांचें मुख्य ठिकाणहि देशांतल्या देशांतच होतें. ब्रिटिश कंपन्यांस व्यवहारज्ञ ब्रिटिश व्यापाऱ्यांचा चालक म्हणून काम करण्यास

जशी वाण भासत होती, तशी ती हिंदी कंपन्यांस वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. धूर्त व व्यवहारज्ञ भांडवलवाले मुंबईत हवे तितके होते. १८६०-६६ च्या दरम्यान मुंबईतील व्यापाऱ्यांनीं केलेल्या अचाट उलाढालींचा व सट्टेबाजीचा इतिहास पाहिला म्हणजे या विधानाची यथार्थता लक्षांत येईल.

येथें एक गोष्ट नमूद करणें जरूर आहे ती ही कीं, आपल्याकडे आधुनिक पद्धतीच्या पेढ्यांची ( Banking ) उशीरां झालेली वाढ हें मुंबईसहि व्यवस्थापकांची पद्धति जारी होण्याचें म्हणून एक निराळें कारण सांगितलें जातें. एखाद्या इसमानें अथवा खाजगी मंडळीनें व्यवहार केला तर त्यास वेळोवेळीं लागणारें भांडवल ते आपल्या पतीवर किंवा मालमत्तेच्या तारणावर उभारतात. सार्वजनिक कंपन्यांच्या बाबतींतहि असेंच व्हावयास पाहिजे व बहुतेक देशांत होतेंहि. पण हिंदुस्थानांत सार्वजनिक कंपन्या जेव्हां नव्यानें निघाल्या तेव्हां त्या नवीन पद्धतीच्या पेढ्या देशांत अगदीं थोड्या होत्या; आणि ज्या कांहीं होत्या त्या परकीय असून त्या हिंदी सार्वजनिक कंपन्यांस भांडवल पुरविण्यास तयार नव्हत्या. तेव्हां या एकंदर कंपन्यांस लागणारें खेळतें भांडवल त्यांस जुन्या पद्धतीनें व्यवहार करणारे सावकार व पेढ्या यांजपासून घेणें प्राप्त होतें. पण या एतद्देशीय पेढ्यांस सार्वजनिक कंपन्यांच्या व्यवहाराची माहिती नसून त्यांच्या स्थैर्याबद्दल किंवा पतीबद्दल खात्री वाटत नसे. यामुळें सार्वजनिक कंपन्यांकरितां जें कर्ज काढावयाचें तें कोणातरी वजनदार व्यक्तीच्या किंवा पेढीच्या नांवावरच काढावें लागे. अर्थात् कंपनीचे व्यवस्थापक हे बहुधा वजनदार असामी असत व ते स्वतःच्या नांवावरच आपल्या व्यवस्थेखालीं असलेल्या कंपन्यांस कर्ज मिळवून देत. म्हणून सार्वजनिक कंपन्यांना जोंपावेतों प्रत्यक्ष कर्ज मिळणें शक्य नव्हतें, तोंपावेतों त्यांस व्यवस्थापकांचा आसरा धरण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. व्यवस्थापक-पद्धति निघून ती टिकण्यास ही कर्ज मिळण्याची अडचण किती कारणीभूत झाली हें सांगणें कठीण आहे. व्यवस्थापक हे स्वतः मूळ व्यापारांत पैसा कमावलेले आणि व्यापारांत दुसऱ्यांचा पैसा घेऊन गुंतविणारे असत. यांपैकीं कांहींच्या पेढ्यांवर बऱ्याच ठेवी लांब मुदतीनें ठेविल्या जात. तेव्हां त्यांस स्वतःस आपल्या कंपन्यांस कर्ज देणें शक्य असे. अशा रीतीनें व्यवस्थापकांस कंपन्यांना कर्ज देण्याची अनुकूलता असली, तरी व्यवस्थापक पद्धति नसती तर सार्वजनिक कंपन्यांस हळूहळू माल वगैरेच्या तारणावर जुन्या पेढ्यांकडून कर्ज मिळूं शकलें नसतें, असें वाटत नाहीं. परंतु एकदा मालाच्या ..रणाशिवाय व्यवस्थापकाची सही गुंतवावयाची प्रथा पडल्यावर ती पेढ्या

सोडीनात; आणि सार्वनिक कंपन्यांस व्यवस्थापकाच्या ओंजळीनें पाणी नेहमींच पीत राहावें लागलें. यांत विशेष लक्षांत घेण्याजोगी गोष्ट ही आहे कीं, अलीकडे दहाबारा वर्षें कांहीं व्यवस्थापकांच्या पतीविषयींच बँकांस शंका येऊं लागल्या-मुळें मुंबईस तरी प्रत्यक्ष कंपन्यांसच कर्ज देण्याची वहिवाट बँकांनीं सुरू केली आहे.

आणखी एका गोष्टीचा थोडक्यांत निर्देश केला पाहिजे. गिरण्या वगैरे नवीन यांत्रिक उद्योगधंदे ज्या एतद्देशीयांनीं सुरू केले ते बहुतेक मूळचे व्यापारी, सराफ किंवा सावकार होते. मालाची देवघेव किंवा पैशाचा व्यवहार यांत पिढ्यान्‌पिढ्या मुरलेल्या जातींनींच आपलें भांडवल या नवीन धंद्यांत घातलें. जुन्या पद्धतीचे कार-खानदार किंवा कारागीर या नव्या मंडळींत कोणी नव्हते. यांस पार्शी हे अपवाद समजावयाचे. हे केवळ व्यापारी नसून यांपैकी कांहींनीं जहाजें बांधणें इत्यादि नवीन धंद्यांत बरीच प्रगति केलेली होती. बाकी भाटिया, वाणी, खोजे, बोहरी हे सर्व लोक कोणत्याहि व्यवहाराकडे व्यापारी अथवा सराफी दृष्टीनेंच पाहणारे होते. उत्पादनकौशल्य व उत्पादनसौकर्य यांकडे त्यांचें लक्ष नसून व्यापारी फायद्याकडे होतें. याचा परिणाम असा झाला कीं, प्रथमपासूनच हिंदी उद्योग-धंदे हे उत्पादनसामग्री व पद्धति यांसंबंधीं अप्रगतिपर राहिले. सार्वजनिक कंपन्या ज्या काढल्या त्या सर्व व्यापारी व सावकारी परंपरेंतील ज्ञातींनीं काढल्या. हे प्रमुख भांडवलवाले म्हणून त्यांजकडेच त्या व्यवस्थेकरितां राहिल्या. व्यवस्थापक म्हणून यांचा नेहमींचा ताबा कंपन्यांवर राहिल्यामुळें इतर कोणाचा शिरकाव या धंद्याच्या चालक-मंडळांत होऊं शकला नाहीं; आणि यांचा डोळा व्यवस्थापक म्हणून व्यापारी फायद्यावर सारखा असावयाचा. व्यापारी उलाढाली, सट्टेबाजी व कमिशनें यांकडे विशेष लक्ष राहिल्यामुळें आपल्या गिरण्या किंवा कारखाने उत्पादनक्षम करणें ह्या महत्त्वाच्या प्रश्नाची उपेक्षा झाली. हिंदुस्थानांत कापडाच्या गिरण्या जपानच्या पूर्वीं कितीतरी वर्षे निघाल्या. परंतु यंत्रसामग्री वगैरे बाबतींत जपान्यांची सुधारणाप्रवृत्ति सारखी दिसून आली व येत आहे, तर हिंदी गिरण्यांनीं परकी ( इंग्रज म्हणा, जपानी म्हणा ) यंत्रसामग्री जशीच्या तशी विकत घेण्यापलीकडे कांहींच कधीं केलें नाहीं. व्यापारी किंवा सराफी वृत्तीची ही पकड आमच्या उद्योगधंद्यांवर कायमची बसण्याचें एक कारण व्यवस्थापक-पद्धति हें निश्चित आहे.

व्यवस्थापक-पद्धतीचे कांहीं म्हणण्याजोगे फायदे आहेत किंवा काय? हिंदुस्थानच्या पूर्वभागासंबंधीं बोलावयाचें म्हणजे, ब्रिटिश भांडवलवाल्यांस या

किंवा अशा कांहीं तरी इतर व्यवस्थेपेक्षां दुसरी व्यवस्था करणेंच शक्य नव्हतें हें उघड आहे. पण यापलीकडे या पद्धतीनें अमुक कांहीं विशेष साधलें असें म्हणतां येत नाहीं. व्यवस्थापक-पद्धतीमुळें सेळत्या भांडवलाचा पुरवठा सार्वजनिक कंपन्यांस होऊं शकला, या मुद्याचा विचार वर केलेलाच आहे. शिवाय असेंहि म्हणतात कीं, एकाच व्यवस्थापक कंपनीच्या हातांत बऱ्याच गिरण्या किंवा कारखाने असल्यामुळें मालाची खरेदी-विक्री आणि एकंदर व्यवस्था यांसंबंधीं खर्चांत पुष्कळ बचत होते; व मंदीच्या काळांत या मोठ्या व्यवस्थापक कंपन्या आपल्या ताब्यांतील सार्वजनिक कंपन्यांस लागेल ती मदत करून त्यांस तगवितात. या दोन्ही मुद्यांचा विचार एकेच ठिकाणीं करतां येईल. यांतील अर्थ एवढाच कीं, व्यवस्थापक कंपनीच्या पद्धतीमुळें जरी निरनिराळ्या सार्वजनिक कंपन्या सकृद्दर्शनीं वेगळ्या दिसल्या, तरी एकाच व्यवस्थापकाच्या हातांतील कंपन्यांचा एक गट होऊन सबंध गटाचा कारभार एकत्रित चालवितां येतो. साधारणपणें गट जेवढा मोठा असेल त्या मानानें गटाची कार्यक्षमता आणि त्याचें आर्थिक बल वाढतें; व आपला खर्च कमी करणें किंवा आर्थिक संकटांस तोंड देणें हें त्यांस साधतें. परंतु हा फायदा जो उद्भवतो तो व्यवस्थापक-पद्धतीनें उद्भवतो असें नाहीं. त्याचें कारण निरनिराळ्या व्यवहारांचें एकसूत्रीकरण ( Combination ) हें होय. असें एकाच धंद्यांतील किंवा बऱ्याच घटकांचें एकसूत्रीकरण प्रत्येक देशांत घडून आलेलें आहे. आपल्या देशांत हें एकसूत्रीकरण व्यवस्थापकांच्या द्वारा अप्रत्यक्षपणें घडून येतें तर इतर देशांत तें प्रत्यक्ष कंपन्याकंपन्यांतच होतें. हरएक देशांतील या प्रवृत्तीचे प्रकार व परिणाम यांत फरक आढळून येतातच. आमचा मुद्दा एवढाच कीं, या प्रवृत्तीचा व तिजमुळें झालेल्या नफातोट्याचा व्यवस्थापक-पद्धतीशीं कांहीं संबंध नाहीं. ही पद्धत नसती तरी एकसूत्रीकरण जेथें जेथें परिस्थिति अनुकूल आहे तेथें तेथें हिंदुस्थानांतहि घडून आलें असतें. बरें, हिंदुस्थानांतहि जें विशेष एकसूत्रीकरण आज झालेलें आहे, तें वर दर्शविलेल्या पूर्व भागांतील ब्रिटिश व्यवस्थापकांच्या हातांतच. पश्चिम हिंदुस्थानांत ही प्रवृत्ति अत्यल्प प्रमाणांत दिसून येते. श्री. लोकनाथन् यांनीं आपल्या पुस्तकांतील तक्त्यांत एकंदर २९ व्यवस्थापक कंपन्यांचा समावेश केला आहे, त्यांतील फक्त पांचच पश्चिम भागांतील आहेत. या पांचांतहि एतद्देशीय दोनच—करीमभाई इब्राहिम आणि कं. व ताता आणि कं०. इब्राहिम करीमभाइ यांच्या व्यवस्थेखालीं १४ व तातांच्या व्यवस्थेखालीं १२ कंपन्या दाखविल्या

आहेत. आतां करीमभाई इब्राहिम आणि कं. चें दिवाळें निघाल्यामुळें त्यांच्या ताब्यांतील गिरण्याहि पांगल्या गेल्या आहेत. अहमदाबादच्या गिरण्यांत विशेष मोठा गट असा कोणाच्याच हातांत नाहीं. मुंबईसहि सारून, ब्रँडी असें नांव घेण्यासारखे अगदीं थोडे गट आहेत. यावरून एकसूत्रीकरण व व्यवस्थापक-पद्धति यांचा कांहीं परस्परसंबंध नाहीं, हें स्पष्ट दिसून येईल.

व्यवस्थापक पद्धतीच्या सुरुवातीस तिचे दुष्परिणाम फारसे दिसून आले नाहींत. याचीं कारणें अनेक होतीं. एक तर या काळांत व्यवस्थापक स्वतःच आपण काढत असलेल्या सार्वजनिक कंपनीचे बरेच भाग विकत घेत. सार्वजनिक कंपन्या किफायतशीर होतील या अपेक्षेनें हे भाग ते आपणांकडे ठेवीत. शिवाय सार्वजनिक कंपन्यांचे भाग खपविणें हें आजच्याइतकें त्या काळांत सोपेंहि नव्हतें. खुद्द व्यवस्थापकच कंपनीचे प्रमुख भागदार असल्यामुळें कंपनीस फायदा होणें हें व्यवस्थापकांच्या हिताचेंच असें. कंपन्यांचे उत्पादक व संस्थापक हें कांहीं झाले तरी कर्तबगार व धडाडीचे असत आणि आपण काढलेली कंपनी यशस्वी करून दाखविण्याची त्यांच्या मनांत ईर्षा असे. शिवाय या जुन्या काळांत एकंदर भांडवल अपुरें असून तें चटकन मिळविण्याची सवडहि नव्हती, त्यामुळें सार्वजनिक कंपन्यांस व्यवस्थापकांचा प्रत्यक्ष उपयोग बराच होता. कालांतरानें या सर्वच परिस्थितींत पुष्कळ बदल झाला. निरनिराळ्या कारणांमुळें कंपन्यांतील मूळचे सर्व भाग व्यवस्थापकांकडे राहिले नाहींत व जसजसें वेळोवेळीं कंपनीचें भांडवल वाढविलें गेलें, तसतसा दरवेळेस व्यवस्थापकांनीं नवीन भागापैकीं मोठा हिस्सा विकत घेतला असेंहि झालें नाहीं. सारांश, सुरुवातीस व्यवस्थापक हे कंपनीचे जसे प्रमुख भागीदार असत तसे ते पुढें राहिले नाहींत; व यामुळें कंपनीचें हित व व्यवस्थापकांचें हित याचा जो एके काळीं निकट संबंध होता तो टिकला नाहीं. तसेंच कंपनीच्या मूळ संस्थापकांची पिढी गेल्यानंतर त्यांच्या दुसऱ्या पिढींतील कार्यकारी माणसें तशींच कर्तबगार निपजतील याची कांहींच खात्री नसते. या बाबतींतहि पूर्व व पश्चिम हिंदुस्थानांतील फरक लक्षांत घेण्याजोगा आहे. कलकत्त्याच्या ब्रिटिश व्यवस्थापक कंपन्यांतील परंपरा संस्थापकांच्या वंशजांच्या हातांतच कारभार रहावा अशी नाहीं. बऱ्याच वेळां संस्थापकाचे वारस हिंदुस्थानांत येऊं चाहत नाहींत व कंपनींतील चलाख अधिकाऱ्यांपैकींच माणसें पार्तीत घेऊन कारभार चालू ठेवावयाचा, अशी तिकडील परंपरा आहे. तेव्हां कंपनीचें नांव "जार्डिन व स्किनर," पण आज व्यवस्थापकांत जार्डिन किंवा स्किनर एकहि

नाहीं, अशी परिस्थिति असूं शकते. एतद्देशीय कारभाराचीं सूत्रें वंशपरंपरा चालू राहण्याचा आग्रह फार. यामुळें मूळ व्यवस्थापक नेमतांना जरी कर्तबगार माणसें कंपन्यांस लाभलीं तरी त्यांची परंपरा टिकली नाहीं. अगदीं शहाजोग कंपन्या दुसऱ्या पिढींतील कर्तृत्वशून्य माणसांच्या हातीं गेल्यामुळें डबघाईस आल्याचीं उदाहरणें कितीतरी दाखवितां येतील. कर्जाऊ लागणाऱ्या भांडवलाबद्दलहि परिस्थिति बदलली. सांप्रत सार्वजनिक कंपन्यांस कर्ज मिळण्यास पूर्वींइतक्या अडचणी भासत नाहींत; व बऱ्याच वेळां व्यवस्थापकांनीं कंपन्यांस कर्ज देण्याच्या ऐवजीं ते स्वतःच कंपन्यांकडून कर्ज घेतात असें आढळतें.

आज एतद्देशीय कंपन्यांविषयीं असें हमखास म्हणतां येतें कीं, व्यवस्थापक-पद्धतीची जरुरी कांहीं एक उरलेली नाहीं. पण कंपनीच्या उत्पादकांस व्यवस्थापक म्हणून आपणांस अधिकार मिळविण्याची लागलेली चटक सोडविणें कठीण आहे. व्यवस्थापक कोठेंच नसावेत, अशा तऱ्हेची सरसकट बंदी केवळ कायद्यानें करणें अव्यवहार्य वाटतें. तेव्हां व्यवस्थापक पद्धतीचें नियंत्रण तरी व्हावें, अशी ओरड आज बरींच वर्षें चालू आहे. या चळवळींत मुंबई भागदारमंडळ ( Bombay Shareholders' Association ) यानें प्रामुख्यानें भाग घेतला. व्यवस्थापक-पद्धतींत आज पुढील दोष ठळक प्रमाणांत आढळतात. व्यवस्थापकांचे कंपन्यांशीं झालेले बहुतेक करार अशा प्रकारचे असतात कीं, कंपनीच्या भागदारांस अथवा चालकमंडळास व्यवस्थापकास व्यवस्थापकत्वावरून सहसा दूर करतां येत नाहीं. बहुतेक करार लांब मुदतीचे असून ही मुदत संपल्यावर कंपनीची दुसरी व्यवस्था लावणें हें भागदारांच्या प्रचंड बहुमताशिवाय होऊं नये, अशी सोय केलेली असते. कांहीं करारांत तर वंशपरंपरा कायम व्यवस्था आपणाकडे व्यवस्थापकानें राखून ठेविलेली असते. व्यवस्थापक, व्यवस्थापक मंडळ, व्यवस्थापक कंपनी यांत कोणताहि फरक घडून आला तरी कंपनीस कांहीं करतां येत नाहीं. व्यवस्था कितीहि नादान झाली तरी कंपनीस ढवळाढवळ करण्याचा हक्क नसतो. इतकेंच नव्हे, तर व्यवस्थापकास आपले हक्क दुसऱ्या कोणासहि कंपनीच्या सल्ल्याशिवाय विकून टाकतां येतात. करीमभाई इब्राहिम कं. च्या दिवाळ्यामुळें त्यांच्या व्यवस्थापकत्वाचे हक्क त्यांच्या निरनिराळ्या ऋणकोंच्या हातांत गेलेले आहेत. सुरुवातीस जरी कंपनीच्या व्यवस्थापकाच्या सचोटीकडे किंवा कर्तृत्वाकडे बघून लोकांनीं तिचे भाग घेतले, तरी हल्लींच्या व्यवस्थापकांच्या ऐवजीं पुढें केव्हां, कोण व कसा येईल याची कांहींच शाश्वति नसते.

व याविषयीं भागदारांस कांहीं विचारण्यांतहि येत नाहीं. हा एक मुद्दा झाला. दुसरा मुद्दा व्यवस्थापकांचें वेतन व नफा याबद्दलचा. वर दर्शविल्याप्रमाणें व्यवस्थापक हे कंपनीचे जोंपावेतों प्रमुख भागदार आहेत, तोंपावेतों दोघांच्या हितांत तफावत पडत नाहीं. परंतु कंपनीचे फार थोडे भाग जर व्यवस्थापकांच्या मालकीचे राहिले तर कंपनीस फायदा थोडा झाला अथवा तोटाहि झाला, तरी व्यवस्थापकास काळजी करण्याचें कारण नसतें. त्याचा मुख्य रोख आपणांस व्यवस्थापक म्हणून मिळणाऱ्या उत्पन्नावर राहतो. हें उत्पन्न निरनिराळ्या प्रकारानें निश्चित केलें जातें. जुन्या बऱ्याचशा करारांत हें उत्पादनावर ठरविलेलें असतें. कारखान्याचें उत्पादन जसें वाढेल तसें हें उत्पन्न वाढतें. याचा उघड परिणाम असा होतो कीं, व्यवस्थापकाची दृष्टि फायदेशीर उत्पादन करण्याकडे न राहतां केवळ उत्पादनाची कमाल मर्यादा गांठण्याकडे राहते. मंदीच्या दिवसांतहि मुंबईस व इतर ठिकाणीं कापडाच्या गिरण्यांचें उत्पादन फारसें कमी होत नाहीं, याचें हें एक महत्त्वाचें कारण समजलें जातें. याशिवाय व्यवस्थापकास मिळकतीचे अनेक मार्ग—कायदेशीर आणि बेकायदेशीर—मोकळे असतात. मालाची खरेदीविक्री, विमा उतरणें वगैरे सर्व प्रकारचे व्यवहार केवळ व्यवस्थापकाच्या हातीं असतात; आणि या सर्व बाबींत दलाली खाण्याची प्रथा व्यवस्थापकांत सार्वत्रिक आहे, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. आरंभींच्या यंत्रसामग्रीवरील दलाली-पासून तों नेहमींचा विमा, कच्चामाल खरेदी ते पक्का मालविक्रीपावेतों दलाली व्यवस्थापकांच्या पदरांत सारखी पडत असते. सर्व व्यवहारांत वशिलेबाजीस भरपूर वाव असतो; आणि बऱ्याच ठिकाणीं व्यवहार या प्रकारचा होतोहि. कंपनी जेमतेम चालूं ठेविली तरी व्यवस्थापकास पुरें असतें. व्यवस्थापक—पद्धतीचे कांहीं चाहते असें म्हणतात कीं, मंदीच्या दिवसांत व्यवस्थापक आपलें वेतन न घेतां कंपन्या चालवितात हा त्यांचा मोठेपणा आहे; आणि असे व्यवस्थापक कंपन्यांस लाभतात म्हणूनच त्या टिकून राहतात. थोडा विचार केला असतां या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें दिसून येईल. मुंबईच्या गिरण्यांचे कांहीं व्यवस्थापक जें वेतन गिरण्यांकडून तोटा झाला असतां घेत नाहींत, तें केवळ उत्पादनावर किंवा नफ्यावर ठरलेल्या टक्केवारीच्या प्रमाणाबरहुकूमचें वेतन होय. पण बहुतेक व्यवस्थापकांच्या उत्पन्नाचा मोठा भाग खरेदी—विक्री इत्यादींवरील दलालींतच असतो. ही दलाली व्यवस्थापक सोडण्यास कधींहि तयार नसतात. आणि व्यवस्थापक कंपन्या जगवतात हें कांहीं त्यांच्या मोठेपणाचें लक्षण समजावयाचें नाहीं. हा त्यांच्या स्वतःच्या

हिताचाच प्रश्न आहे. त्यांनीं असें न केलें तर इसापनीतींतील सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या हंसीला मारणाऱ्याइतकेच ते मूर्ख ठरतील.

येथवर सांगितलेल्या गोष्टी अगदीं सामान्य व सार्वत्रिक अशा समजावयाच्या. कांहीं ठिकाणीं व्यवस्थापक हे कंपनीस निराळ्या प्रकारांनींहि लुबाडतात. कंपनीचे देण्याघेण्याविषयींचे सर्व व्यवहार व्यवस्थापकांच्याच ताब्यांत असतात. तेव्हां कंपनीकडन आपण स्वतः कर्जाऊ रकमा काढणें, किंवा आपल्या ताब्यांत असलेल्या संपन्न कंपन्यांकडून स्वतःच्या ताब्यांतील इतर घाईस आलेल्या कंपन्यांस रकमा कर्जाऊ देवविणें, आपल्या निरनिराळ्या व्यवहारांत ऋणको अथवा भागदार म्हणून, कंपनीचा पैसा गुंतविणें अशा रीतिनें व्यवस्थापकांस कंपन्यांचा फायदा घेतां येतो. प्रत्येक कंपनीची स्वतंत्र व्यवस्था न राहतां एका व्यवस्थापकाच्या ताब्यांतील सर्व कंपन्यांचे व्यवहार परस्परांवर अवलंबित होतात; व हें इतर देशांतील कंपन्यांच्या एकसूत्रीकरणाप्रमाणें प्रत्यक्ष निरनिराळ्या कंपन्यांचे परस्परसंबंध पाहून होत नाहीं, तर केवळ एका व्यवस्थापकानें निरनिराळे व्यवहार हातीं घेतले म्हणून घडून येतें. आणि बहुतेक कंपन्यांच्या भागीदारांस या देण्याघेण्याच्या व्यवहाराबद्दल कांहींच माहिती नसते. याचा परिणाम असा होतो कीं व्यवस्थापक बुडाल्यास असल्या अंतर्गत व्यवहारांमुळें त्याच्या ताब्यांत असलेल्या वाईट कंपन्यांबरोबर चांगल्या कंपन्याहि बुडतात. करीमभाई इब्राहिम कंपनीच्या अथवा लाला हरिकिसनलाल यांच्या दिवाळखोरीचे परिणाम निरनिराळ्या कंपन्यांस कां भोवले हें यावरून कळून येईल. याशिवाय आपल्या ताब्यांतील कंपनीच्या भागांत सट्टेबाजी करणें, आपण व्यक्तिशः केलेला व्यवहार अंगाशीं आला तर त्याचा बोजा कंपनीवर टाकणें वगैरे इतर अनेक प्रकार संभवतात व प्रत्यक्ष घडून येतात. प्रत्येक व्यवस्थापक लबाडच असतो असें नाहीं. कांहीं फार सच्चेहि असतात. मुद्दा एवढाच कीं, व्यवस्थापकांच्या हातांत हल्लींच्या पद्धतीनें कंपनीची शेंडी इतक्या पूर्णपणें राहते कीं, कारभारांत हलगर्जीपणा अथवा लबाडी नानातऱ्हेनें व्यवस्थापकांस बिनदिक्कत करतां येते; आणि इतकी सत्ता हातांत असल्यावर तिचा बऱ्याच वेळेस दुरुपयोग झाल्यास नवल नाहीं.

हिंदुस्थान सरकारनें कंपनी-कायद्याची दुरुस्ती करण्याचा प्रश्न जेव्हां हातीं घेतला, तेव्हां व्यवस्थापकांचें काय करावयाचें हा प्रश्न त्यांजपुढें प्रामुख्यानें उभा राहिला. इतर सर्व महत्त्वाच्या बाबतींतील दुरुस्त्या इंग्रज कायद्याकडे पाहूनच

सुचविल्या गेल्या. परंतु व्यवस्थापक–पद्धतीचें नियंत्रण कसें करावयाचें हें केवळ आपल्याकडील अनुभवावरूनच ठरविणें आवश्यक होतें. व्यवस्थापक–पद्धतीचें समूळ उच्चाटन करण्यास हिंदी व ब्रिटिश या दोन्ही व्यापारी मंडळांचा विरोध होता; एवढेंच नव्हे, तर राष्ट्रसभापक्षाचे नेते श्री. भुलाभाई देसाई यांनींहि आपल्या असेंब्लींतील भाषणांत व्यवस्थापकांचे .गोडवे गाइले. तेव्हां व्यवस्थापक–पद्धति नष्ट न करितां तिचें नियमन कसें करावें हेंच कंपनी-कायदा-दुरुस्तीनें ठरवावयाचें होतें. नुकत्याच मंजूर झालेल्या दुरुस्ती–बिलांत व्यवस्थापक–पद्धतीच्या नियंत्रणाबद्दल अनेक कलमें आहेत व असेंब्लींतील एकंदर वादविवादांत या कलमांचाच विचार प्रामुख्यानें झाला. हें नियंत्रण घडवून आणण्याचें बरेंचसें श्रेय 'मुंबई भागदारमंडळ' व इतर तत्सदृश चळवळ्या संस्था आणि व्यक्ती यांस आहे; तसेंच सर नृपेंद्रनाथ सरकार व त्यांचे हस्तक श्री. सुशील सेन यांसहि आहे. पण याचा थोडा तरी वांटा ब्रिटिश भांडवलवाल्यांसहि द्यावा लागेल. कारण, वर दर्शविल्याप्रमाणें व्यवस्थापक–पद्धतींतील बरेचसे दोष व बरेचसे दोषास्पद व्यवहार हे बहुतांशीं हिंदी कंपन्यांतच आढळून येतात. तेव्हां त्यांचें निवारण करण्याकरितां घालण्यांत येणाऱ्या निर्बंधांस ब्रिटिश भांडवलवाल्यांनीं बिलकुल हरकत घेतली नाहीं. इतकेंच नव्हे, तर कांहीं प्रसंगीं हे निर्बंध विशेष कडक असावेत, असें स्वतः सुचविलें. उदाहरणार्थ, सरकारतर्फे प्रसिद्ध झालेल्या बिलाच्या मूळ मसुद्यांत कंपनीनें व्यवस्थापकांस शक्यतोंवर कर्जाऊ रकमा देऊं नयेत म्हणून निरनिराळ्या प्रकारचे निर्बंध सुचविण्यांत आले होते. यावर मुंबई चेंबर ऑफ कॉमर्स ( ब्रिटिश ) यांनीं कोणत्याहि प्रकारचें कर्ज देण्यास स्पष्ट मनाई असावी अशी दुरुस्ती सुचविली. ही दुरुस्ती सिलेक्ट कमिटींत मान्य होऊन त्याप्रमाणें आतां कलम घालण्यांत आलें आहे. हिंदी व ब्रिटिश भांडवलवाल्यांकडून एकजुटीनें मुळांतच विरोध झाला असता तर हिंदुस्थान सरकार कडक निर्बंध करण्याच्या भानगडींत पडलें नसतें, हें उघड आहे. म्हणूनच ब्रिटिश ( विशेषतः मुंबईकर ) भांडवलवाल्यांची तटस्थता अथवा सहानुभूति बिलास उपकारक झाली हें लक्षांत घेण्याजोगें आहे.

तथापि इतर बाबतींत ब्रिटिश भांडवलवाल्यांनीं सहानुभूति दाखविली, तर एका महत्त्वाच्या बाबतींत त्यांनीं हिंदी भांडवलवाल्यांहूनहि जास्त कसून विरोध केला. ही बाब व्यवस्थापकांच्या करारांच्या मुदतीबद्दलची. हल्लींचे करार जवळजवळ बिनमुदत असतात व त्यांचा फेरविचार करण्याची भागदारांस संधि

कधींच मिळत नाहीं, हें वर दर्शविलेंच आहे. बिलांत यापुढील होणारा कोणताच करार वीस वर्षांहून लांब मुदतीचा असूं नये, असा निर्बंध सुचविण्यांत आला. हें भावी करारांविषयीं झालें. पण आजतागायत होऊन गेलेल्या करारांवर नियंत्रण जर केव्हां ना केव्हां घालावयाचें, तर ते कधीं तरी पुरे होतील अशी सोय केली पाहिजे. म्हणून कायदा मंजूर झाल्यानंतर वीस वर्षांनीं जुने सर्व करार आपोआप रद्द समजून भागदारांस पुनः करार करण्यास हक्क प्राप्त व्हावा असें एक कलम बिलांत घातलें होतें. म्हणजे, आज कराराप्रमाणें जुन्या व्यवस्थापकांस कितीहि कालपावेतों व्यवस्थापकत्व भोगतां येत असलें तरी त्याची कमाल मर्यादा या कायद्याप्रमाणें आजपासून वीस वर्षें अशी ठरविण्यांत आली. या कलमांत विशेष अन्यायमूलक असें कांहीं नव्हतें. आणखी वीस वर्षें भोगवटा दिल्यावर जुन्या व्यवस्थापकांची कांहीं तक्रार राहणार नाहीं, असा सरकारचा समज होता. पण तो चुकीचा ठरला; आणि या कलमास अत्यंत जोराचा जो विरोध झाला तो युरोपीयांकडून. इतर निर्बंध त्यांस फारसे जाचक वाटले नाहींत; पण दूरवर दृष्टि ठेवतां हें कलम त्यांस भयानक वाटलें. याचें कारण असें कीं, आज जरी चहा, ताग व कोळसा या धंद्यांतील सर्व व्यवस्था ब्रिटिशांच्या हातांत असली तरी या धंद्यांतील कंपन्यांचे बरेचसे भाग हिंदी लोकांच्या हातांत जाऊं लागले आहेत. भाग हिंदी लोकांच्या हातांत जाणें जर असेंच चालू राहिलें, तर आणखी पंधरा वीस वर्षांत तरी हिंदी भागीदार बहुतेक कंपन्यांत खात्रीनें बहुसंख्याक होतील असें दिसतें. अर्थात् वीस वर्षांनीं व्यवस्थापक मंडळींचे सर्व करार पुनः करावयाचे ठरल्यास, त्यापुढें आपल्याकडे व्यवस्था राहील अशी युरोपीयांस खात्री वाटत नाहीं; व युरोपीयांच्या हातांतील व्यवस्था गेली तर त्यांचें येथून समूळ उच्चाटन केल्यासारखें व्हावयाचें. ही भीति वाटल्यामुळें कलकत्त्याच्या ुरोपीय मंडळानें या कलमानें "करारांच्या पावित्र्यावर" ( sanctity of contracts ) आघात होत आहे अशी ओरड सुरू केली; व एकदा कायद्यानें जुने करार फिरवितां येऊं लागले म्हणजे बेबंदशाहीच माजेल, असा कांगावा सुरू केला. या त्यांच्या ओरडीला यशहि आलें. हिंदी व्यापारी मंडळींनीं प्रस्तुत कलमाविरुद्ध तक्रार केली नव्हती, तरी त्यांनीं सिलेक्ट कमिटींत युरोपीयांच्या हातास साहाजिकच हात लावला. परिणामीं, कलम जर सिलेक्ट कमिटींत निघालें नाहीं तर वीस वर्षांनंतरहि करार पुरा पाडल्यास नुकसानभरपाई करण्यांत यावी, अशी पुस्ती त्यास जोडण्यांत आली. जबर नुकसानभरपाई देण्यापेक्षां जुन्या व्यवस्थापकांस कायम करणें हेंच

कंपनी पत्करणार असाच या पुस्तीचा परिणाम व्हावयाचा आणि जुन्या व्यवस्थापकांची मिरास कायम टिकावयाची. सुदैवानें याविरुद्ध बराच गाजावाजा झाल्यावर असेंब्लींत ही पुस्ती काढून टाकण्याचें सरकारनें कबूल केलें. आणि आतां हें कलम मुळाप्रमाणेंच राहिलें आहे.

व्यवस्थापकांवर कंपनी-कायद्याच्या नवीन दुरुस्तीप्रमाणें घालण्यांत आलेले निर्बंध अनेक आहेत. त्या सर्वांचें तपशीलवार विवेचन करणें शक्य नाहीं. त्यांतील प्रमुख निर्बंध कोणते हें थोडक्यांत दर्शावावयाचें एवढेंच येथें योजिलें आहे. यापुढें व्यवस्थापक व कंपनी यांजमधील व्यवस्थेबद्दलचा करार वीस वर्षांहून अधिक मुदतीचा केव्हांहि असूं शकणार नाहीं. यामुळें व्यवस्थापकाकडे वंशपरंपरा व्यवस्था बिनमुदत चालू राहण्याचे दोष टळतील अशी अपेक्षा आहे. तसेंच व्यवस्थापकानें कंपनीच्या व्यवस्थेंत अफरातफर केल्यानें त्याला शिक्षा झाल्यास त्याला काढून टाकण्याचा हक्क कंपनीस देण्यांत आला आहे. आजपर्यंत हें देखील कंपनीस करतां येत नसे. व्यवस्थापकाची मुदत मर्यादित झाली इतकेंच नव्हें, तर यापुढें व्यवस्थापकांस आपले व्यवस्थापकीय हक्क गहाण टाकणें किंवा विकणें हें सुद्धां भागीदारांच्या संमतीशिवाय करतां येणार नाहीं. याप्रमाणें व्यवस्थापकांच्या करारावर मुख्य निर्बंध आहेत. व्यवस्थापकांच्या वेतनाचेंहि नियमन करण्यांत आलें आहे. कचेरीखर्च व कांहीं मर्यादित किमान रकमेपलीकडे व्यवस्थापकांचें वेतन हें केवळ नफ्याच्या टक्केवारींतच ठरविलें जावें, असें कलम या कायद्यांत घालण्यांत आलें आहे. म्हणजे, कंपनीस नफा झाल्याशिवाय व्यवस्थापकास कांहीं विशेष उत्पन्नाची बाब राहणार नाहीं असा निर्बंध घातल्यामुळें, नफ्याकडे न पाहतां व्यवहार करण्याच्या कांहीं व्यवस्थापकांच्या प्रवृत्तीस आळा बसेल असें वाटतें. तसेंच व्यवस्थापकानें कंपनीबरोबर इतर कोणतेंहि खाजगी व्यवहार करणें झाल्यास त्यास चालक मंडळाच्या विशेष बहुमताची परवानगी घ्यावी लागावी, अशीहि तरतूद कायद्यांत करण्यांत आली आहे. व्यवस्थापकांचें हुकमी बहुमत चालकमंडळावर नेहमींच राहूं नये याकरितां, व्यवस्थापकांतर्फे चालकमंडळावर येणारे चालकमंडळाचे सभासद सर्व सभासदांच्या संख्येपेक्षां एकतृतीयांशाहून अधिक केव्हांहि असूं नयेत असा निर्बंध घालण्यांत आला आहे. याबरोबरच भागदारांनीं निवडावयाचे चालक एकंदर मंडळाच्या दोनतृतीयांश तरी निदान असावेत असेंहि ठरविण्यांत आलें आहे. व्यवस्थापकानें आपल्या ताब्यांतील कंपनीकडून कर्ज काढूं नये किंवा एकाच व्यवस्थापकाच्या व्यवस्थेखालील निरनिराळ्या कंपन्यांनीं एकमेकांस कर्ज देऊं

नये, अशी कायदेशीर योजना आतां करण्यांत आली आहे. या मुख्य बाबी झाल्या. याशिवाय व्यवस्थापकानें आपल्या व्यवस्थेखालीं असलेल्या कंपनीशीं चढाओढ होईल अशा कोणत्याहि व्यवहारांत खाजगी रीतीनें भाग घेऊं नये, त्याला स्वतःला कंपनीकडून सर्व प्रकारची एकंदर आवक किती झाली याची माहिती त्यानें भागदारांस पुरवावी, कंपनीशीं होणाऱ्या निरनिराळया व्यवहारांत आपला व्यक्तिशः ( किंवा पार्तीत ) भाग काय आहे हें त्यानें चालकमंडळास व भागदारांस कळवावें, तसेंच चालकमंडळानें कंपनीच्या भागांच्या खरेदी-विक्रीच्या उलाढालींत पडूं नये, अशा प्रकारच्या अनेक इतर बाबीहि कायद्यांत घातलेल्या आहेत. या सर्वांचा रोख काय आहे व त्यानें कोणते प्रकार टळतील अशी अपेक्षा आहे, हें व्यवस्थापकपद्धतीच्या दोषांचें वर विवेचन करण्यांत आलें आहे त्यावरून स्पष्ट होईल. एवढे निर्बंध पुरे पडतील कीं अपुरे पडतील, व्यवस्थापक यांतूनहि कांहीं पळवाट काढतील कीं काय, या गोष्टी अर्थात् अनुभवानेंच कळण्याजोग्या आहेत. शेवटीं भागदारच जर झोंपले तर कायदा तरी त्यांस किती तारणार हा विचार राहतोच.

# ६. आर्थिक व्यवहाराचें नियोजन*

मानवसमाजांतील इतर सर्व व्यवहारांप्रमाणें आर्थिक व्यवहारहि समाजरचनेनुसार नियंत्रित झालेला असतो. व्यवहारावरील समाजनियंत्रणाचें प्रमाण हें सर्व स्थळीं व काळीं सारखेंच नसतें. एखाद्या ऐतिहासिक कालांत व्यवहारांवरील बंधनें बरींच कडक असतात, तर अन्य वेळीं व्यक्तिस्वातंत्र्याचें माहात्म्य विशेष मानिलें जातें. ज्या समाजांत केवळ अराजक नाहीं, त्यांत व्यक्तिस्वातंत्र्य कितीहि वाढलें तरी समाजनियंत्रण हें थोड्याबहुत प्रमाणांत कायमच असतें. नियंत्रण (Control) वाढतां वाढतां त्याचें नियोजनांत (Planning) पर्यवसान होतें. स्थूल मानानें असें म्हणतां येईल कीं, जेथें आर्थिक व्यवहारावर केवळ निर्बंध घालण्याचें कार्य राजसत्ता करिते तेथें तें नियंत्रण झालें. परंतु आर्थिक व्यवहारांचा कांहीं भाग प्रत्यक्ष आपणांकडे घेऊन एकंदर आर्थिक व्यवहारांचें किंवा त्यांतील प्रमुख अंगांचें स्वरूप व प्रमाण ठरविण्याचा प्रयत्न जेथें केला जातो, तेथें नियोजनास आरंभ होतो. ज्या राष्ट्रांत समग्र आर्थिक व्यवहारपद्धति व निरनिराळ्या व्यवहारांचें परिमाण हें सर्वच राजसत्ता ठरविते, तेथील आर्थिक व्यवस्था पूर्णपणें नियुक्त असते.

जेथें केवळ नियंत्रण असतें तेथें नियोजनाची कल्पनाच नसते असें मानण्याचें कारण नाहीं. अगदीं अनिर्बंध आर्थिक व्यवहाराच्या बुडाशींहि योजना आहे. येथें योजनाच अशी कीं नियंत्रण अत्यल्प असावें. राजसत्तेची आर्थिक व्यवहारांतील ढवळाढवळ शक्य तितकी कमी करणें व यासंबंधींचें व्यक्तिस्वातंत्र्याचें क्षेत्र शक्य तितकें वाढविणें याचेंच महत्त्व या योजनेखालीं मानिलें जातें. प्रत्येक व्यक्तीनें आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला असतां त्यापासून समाजाची हानि न होतां हितच होतें. समाजानें प्रत्येक व्यक्तीच्या सर्व व्यवहारांची दिशा निश्चित करणें हें वेडगळपणाचें व दुर्घट कार्य आहे. यापेक्षां योग्य समाजरचना घडवून प्रत्येक व्यक्तीस शक्य तितकें स्वातंत्र्य मिळाल्यास त्यापासून समाजांतील बहुसंख्य व्यक्तींचें हित साधलें जाईल. केवळ आर्थिक व्यवहाराविषयीं पाहिलें तर व्यक्तिस्वातंत्र्यवादाची विचारसरणी कांहींशी अशी मांडतां येईल : आपली संपत्ति व आपले श्रम यांचा विनियोग कसा करावा

---

* लोकशिक्षण मार्च, एप्रिल व सप्टेंबर १९३७.

आणि त्यांजपासून कोणत्या व्यवसायांत फलप्राप्ति सर्वांत जास्त होईल हें जितकें प्रत्येक व्यक्तीस स्वत:पुरतें कळतें तितकें दुसऱ्या कोणासहि ठरवून सांगतां येणार नाहीं, हा पहिला सिद्धान्त. दुसरा सिद्धान्त असा कीं, सर्व व्यवहार पूर्णपणें अनिर्बंध असला म्हणजे समाजांतील उत्पादनसाधनांचा उपयोग सर्वोत्कृष्ट रीतीनेंच केला जाईल. कारण, प्रत्येकजण ज्या दिशेनें आपल्या साधनापासून फलप्राप्ति सर्वांत अधिक तिकडे तें गुंतविण्याचा यत्न करणार; व अशा रीतीनें अनेक व्यक्तींचे सारखे प्रयत्न चालू असले म्हणजे अनुभवजन्य ज्ञानानुरोधानें प्रत्येक साधनाचा ज्यापासून सर्वांत फलप्राप्ति अधिक त्याच व्यवसायांत व व्यवहारांत उपयोग होणार. विवक्षित व्यवहारांतील किंवा उत्पादनांतील प्राप्ति साधारण सरासरीपेक्षां कमी किंवा अधिक झाल्यास त्या व्यवहारांतून कांहींजणांनीं आपलें अंग काढून घेणें किंवा तिकडे नवीन उद्योगाचा ओढा लागणें हें सहजच होत राहणार. अशा रीतीनें सर्व प्रकारचें उत्पादन आणि व्यवहार हीं योग्य त्या प्रमाणांत वाढत राहतील. बरें, व्यापार अनिर्बंध असल्यामुळें निरनिराळ्या पदार्थांच्या किंमती या उत्पादनखर्च व मागणीची तीव्रता यांवरून केवळ ठरविल्या जातील. म्हणजे, अनिर्बंध व्यापार व अनिर्बंध उत्पादन असलें म्हणजे वस्तूंबद्दलची व्यक्तींची मागणी व समाजाची उत्पादनक्षमता यांचा अत्युत्तम मेळ बसून कोणत्याहि परिस्थितींत सर्वांत आर्थिक हित साधलें जाईल. ही विचारसरणी स्वीकारल्यास सामान्यपणें नियंत्रण व निर्बंध हीं शक्य तितकीं कमी घालणें शहाणपणाचें ठरतें. वरील विचारांत अर्थात् अनेक गोष्टी गृहीत धरल्या आहेत. अनिर्बंध व्यापार व बाजारभाव मागणी-पुरवठ्याच्या तंत्रानुसार ठरणें, हें केवळ एका बाजूस असंख्य उत्पादक एकमेकांशीं चढाओढ करून विक्रीची खटपट करीत आहेत, व दुसऱ्या बाजूस असंख्य ग्राहक स्वतंत्रपणें खरेदी करीत आहेत असें असेल तरच शक्य आहे. तसेंच प्रत्येकास आपले श्रम व संपत्ति यांचा वाटेल तसा विनियोग करण्याची पूर्ण मुभा आहे एवढेंच नव्हे, तर कोणत्याहि एका व्यवहारांतून काढून कोणत्याहि दुसऱ्या व्यवहारांत तीं नेणें हें शक्य व सुलभ आहे असेंहि समजावें लागतें.

नियोजनाचा पूर्ण अभाव असा कधींच नसतो. निरनिराळे कायदे व समाजव्यवस्थेचीं निरनिराळीं अंगें हीं आर्थिक व्यवहारास विवक्षित वळण देण्याचें कार्य सदैव करीतच असतात. म[illegible]च्या खाजगी मालकीची व्यवस्था व ती वंशपरंपरा एका कुटुंबांत राहण्याची [illegible] साहुकाची व्यवस्था या गोष्टी-

मुळें आर्थिक व्यवहारास विशिष्ट प्रकारचें वळण लागतें, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. परंतु आर्थिक उत्पादन व उत्पन्नाची विभागणी यांच्याविषयीं तटस्थ वृत्ति स्वीकारून प्रचलित समाजव्यवस्थेच्या अनुरोधानें आर्थिक व्यवहारास जें वळण लागेल तें लागूं देणें यांत व उत्पादनव्ययाचा तपशील ध्यानांत घेऊन आर्थिक व्यवहाराचें स्वरूप व परिणाम हीं पूर्ण विचारानें ठरविणें यांत फार फरक आहे. थोडच्या अंशीं कां होईना, जेथें दुसऱ्या प्रकारचा विचार येतो तेथें नियोजनास प्रारंभ होतो. असल्या प्रकारच्या नियोजनाचाहि पूर्ण अभाव जरी केव्हांच आढळत नाहीं, तरी १९व्या शतकांत विशेषतः त्याच्या उत्तरार्धांत इंग्लंड-अमेरिकेंत अनिर्बंध आर्थिक व्यवहाराची पराकाष्ठा झाली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. या देशांतील त्या काळांतील परिस्थिति अनिर्बंध व्यवहाराला पुष्कळ अंशीं अनुकूल होती. औद्योगिक क्रांतींत इंग्लंड प्रथमपासून आघाडीवर होतें. १९ व्या शतकाच्या अगदीं शेवटपर्यंत इंग्लंडचें श्रेष्ठत्व निर्विवाद होतें. पृथ्वीवरील सर्व खंडांत पाश्चात्य व्यापाऱ्यांच्या नवीन नवीन आटोक्यांत येणाऱ्या व झपाट्यानें विस्तार पावणाऱ्या सर्व गिऱ्हाइकींत इंग्लंड अग्रभागीं होतें. तेव्हां हा सर्व व्यवहार निर्बंधरहित वाढत राहावा व आपणांस सदैव खुला राहावा अशी त्या देशाची अपेक्षा व प्रयत्न. या अनिर्बंध म्हणून वाढत्या व्यवहारावर इंग्लंडच्या भरभराटीची मदार व याच्या जोरावर इंग्रजांची लोकसंख्या, श्रीमंती व राजसत्ता यांचा अलोट प्रसार तीनचार पिढ्यांच्या अवधींत झाला. अमेरिकेंतील लोकांच्या दृष्टीनें सार्वराष्ट्रीय व्यवहाराचें महत्त्व फारसें नव्हतें. सार्वराष्ट्रीय व्यवहारांत अनिर्बंध व्यापाराचें तत्त्व त्यांनीं स्वतःच्या बाबतींत अमलांतहि आणिलें नाहीं; परंतु त्यांच्या देशांतील अंतर्गत व्यवहारांत अनिर्बंधत्वाची भूमिका रुजणें व फोफावणें साहजिक होतें. सुपीक परंतु निर्जन असा अफाट देशविस्तार, निसर्गदत्त साधनांची विविधता व विपुलता, सुशिक्षित व धाडसी प्रजा अशा सर्व बाजूंनीं तो देश समृद्ध होता. कोणाहि माणसाच्या कर्तबगारीस तेथें भरपूर वाव होता. अशा या दोन्ही देशांत एकोणिसाव्या शतकांत व्यवहाराच्या वाढीस मर्यादा नव्हती; व जोंपावेतों व्यवहारांत व्यक्तिगत प्रयत्नांचें महत्त्व कमी झालें नव्हतें तोंपर्यंत आर्थिक नियंत्रण, निर्बंध व नियोजन यांची जरूरी भासली नाहीं. इंग्लंड-अमेरिकेच्या मानानें इतर देशांतील परिस्थिति अनिर्बंध व्यवहारास कमी अनुकूल होती व त्यामुळें या तत्त्वाचा प्रभाव इतर देशांत तितकासा दिसून आला नाहीं. महायुद्धपूर्व कालापावेतों सर्वत्र अनिर्बंध व्यापारी तत्त्वज्ञानाचा पगडा जरी बळकट बसला होता, तरी इंग्लंड-अमेरिकेंत ही परि-

स्थिति हळूहळू बदलून या तत्त्वज्ञानाच्या यथार्थतेबद्दल साशंक वृत्ति उत्पन्न होऊं लागली होती. एकतर जर्मनीसारख्या राष्ट्रांच्या प्रगतीमुळें इंग्लंडच्या गिऱ्हाइकीचा संकोच होऊं लागला व अमेरिकेंत वाढत्या लोकसंख्येनें बहुतेक सर्व देश व्यापून तेथेंहि आर्थिक व्यवहाराच्या वाढीस मर्यादा भासूं लागली; आणि या दोन्ही देशांत एकंदर परिस्थिति अनिर्बंध व्यवहाराच्या पुरस्कर्त्यांस तितकीशी अनुकूल राहिली नाहीं. परंतु खरा महत्त्वाचा फरक झाला असा आर्थिक घटनेच्या मूळ स्वरूपांतच. लहान लहान कारखानदार व व्यापारी हे पृथक्‌पणें व्यवहार करीत असतां रचिलेले सिद्धान्त त्यांची जागा मोठमोठे समूह व संघ यांनीं घेतली असतां टिकून कसे राहावे? विसाव्या शतकाच्या प्रारंभीं लोखंड-पोलाद, रॉकेल, कोळसा इत्यादि महत्त्वाच्या धंद्यांत प्रचंड संघ निर्माण होऊन अगदीं थोड्या संघांच्या हातांत यांसंबंधींचें बहुतेक उत्पादन-सामर्थ्य केंद्रीभूत झालेलें होतें. ही प्रवृत्ति कमी न होतां दिवसेंदिवस तिची व्याप्ति आणि प्रमाण हीं वाढूंच लागलीं. संघशक्तीचा प्रभाव किरकोळ विक्रींतहि दिसूं लागला व विवक्षित धंद्यांतील कारखानदारांचें एकीकरण जगद्व्यापी होऊं लागलें. जुन्या काळीं उत्पादनाची जबाबदारी व उत्पादनाचें सूत्रचालकत्व हीं दोन्ही कारखानदाराच्या हातांत असून तीं सावकारांचें महत्त्व वाढून हळहळू पेढीवाल्यांच्या हातांत जाऊं लागलीं. समाईक भांडवली मंडळ्यांचा ( Joint-stock Companies ) अतोनात विस्तार झाला. याबरोबर मजुरांचे संघ व या संघांचें बळ हीं दोन्ही वाढून मजुरीच्या दरांबद्दलहि एकदेशीय करार होऊं लागले. सारांश, अनिर्बंध व्यापाराच्या तत्त्वास आवश्यक असलेली परिस्थिति नाहींशी झाली. बाजारभाव केवळ चढाओढीनें ठरेनासे झाले. मागणी-पुरवठा बदलला असतां योग्य त्या प्रमाणांतच अथवा अल्पावधींत किंमतींत फेरबदल होतील अशी खात्री उरली नाहीं. असें जरी झालें तरी आर्थिक व्यवस्थेंत उत्पन्न झालेला हा ताठरपणा अनिष्ट, पण तो व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारसरणीस मूलतः बाध आणण्याइतका वाढलेला नाहीं, असें मानण्याची महायुद्धापूर्वीची प्रवृत्ति होती. कांहीं जाणत्या लोकांच्या शंका जरी बळावल्या तरी १९१४ पावेतों सनातनी आर्थिक परंपरेस इंग्लंड-अमेरिकेंत तरी विशेष जोराचा धक्का बसला नव्हता.

आर्थिक नियोजनाचा आधुनिक युगाचा पहिला खरा अनुभव म्हणजे महायुद्धकालांतील होय. महायुद्ध सुरू होतांच स्वतंत्र आर्थिक व्यवहारावरील नियंत्रण व निर्बंध साहजिकच एकदम पुष्कळ वाढले; व जसजसें युद्ध अधिक निकराचें होऊं लागलें तसतसें युद्धाकडे सर्व राष्ट्रीय शक्ति एकवटणें अधिका-

धिक अवश्य होऊं लागलें. सैनिकांची हालचाल, युद्धसामुग्रीचें उत्पादन आणि आघाडीवर रसदीचा योग्य पुरवठा या गोष्टी प्रमुख समजून सर्व राष्ट्रीय आर्थिक व्यवहाराचा रोख युद्धबल वाढविण्याकडे करावयाचा, असें धोरण प्रत्येक राष्ट्र स्वीकारूं लागलें. साहजिकच प्रमुख धंद्यांतील उत्पादनसाधनें व सर्व वाहतुकीचीं साधनें यांचें नियंत्रण अत्यावश्यक झालें. लवकरच साधें नियंत्रणहि अपुरें पडलें. दारूगोळा तयार करण्याचे जे कारखाने युद्धपूर्वकालीं अस्तित्वांत होते त्यांची उत्पादनशक्ति आतां फार संकुचित वाटूं लागली. हिचा झपाट्यानें विस्तार करण्यावर युद्धांतील यशापयश अवलंबून होतें. तेव्हां सरकारनें स्वतः या प्रकारचें उत्पादन हातीं घेणें व त्याकरितां जे जे इतर तत्सदृश उत्पादनांत गुंतलेले कारखाने तेहि आपल्या ताब्यांत घेऊन त्यांचा उपयोग युद्धसामुग्रीच्या तयारीस करणें हें क्रमप्राप्तच होतें. पुढें एकंदर उत्पादनसामुग्री व वाहतुकीचीं साधनें यांचा युद्धाच्या कामीं उपयोग फार होऊं लागल्यामुळें व परराष्ट्रीय व्यापारांत निरनिराळ्या प्रकारचे अडथळे उत्पन्न झाल्यामुळें नित्याच्या व्यवहारांत लागणाऱ्या खाद्यपेयादि वस्तूंचा पुरवठा हाहि कमी होऊं लागला. अशा परिस्थितींत व्यापारावर कांहीं निर्बंध न घालावे तर किंमती बेसुमार वाढून गरिबांची उपासमार व बंडाळी होण्याचा संभव फार, म्हणून प्रथम किंमतीवर सरकारी नियंत्रण घातलें. परंतु एवढ्यानें भागेना, तेव्हां पुरवठा व गिऱ्हाइकी किती, विक्री कशी आखली पाहिजे याचा पूर्व विचार करून व्यक्तीमागें दर कालखंडांत प्रमुख वस्तूंचें मिळूं शकणारें प्रमाण व तें मिळविण्याची व्यवस्था या सर्व गोष्टी नियोजित झाल्या. अशा तऱ्हेनें क्रमाक्रमानें नियोजित व्यवहाराचें क्षेत्र वाढून जर्मनीसारख्या देशांत तर महायुद्धाच्या शेवटीं जवळजवळ सर्वत्र आर्थिक व्यवहार पूर्णपणें नियुक्त झाला. महायुद्धकालांतील आर्थिक नियोजन बरेंचसें यशस्वी झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. जसजशा अडचणी उद्भवल्या तसतसें नियोजनाचें क्षेत्र वाढलें व नियोजनाचा प्रकार जास्त गुंतागुंतीचा झाला. प्रथम चुका बऱ्याच घडल्या. श्रमाचा व सामुग्रीचा अपव्यय झाला. परंतु या चुका चटकन् सावरण्यांत येऊन एकंदर नियोजनाला विवक्षित परिस्थितींत तरी बरेंच व्यवस्थित स्वरूप येऊं शकतें हें सिद्ध झालें. अर्थात् एका दृष्टीनें महायुद्धकालीं नियोजन करणें फार सोपें होतें. कारण, यावेळेस नियोजनाचें उद्दिष्ट अगदीं सरळ व निश्चित होतें. युद्धबल वाढविणें एवढें एकच उद्दिष्ट डोळ्यांपुढें असल्यामुळें नियोजनाच्या निरनिराळ्या पायऱ्या आखतांना त्या सर्वांचा या एकाच दृष्टीनें विचार करावयाचा होता. शिवाय युद्ध चालूं असतां

निरनिराळे त्रासदायक निर्बंध अथवा खाद्यपेयांची कमतरता या गोष्टी बहुजन-समाज विशेष कुरकुर न करितां सोसण्यास तयार होता.

महायुद्धकालांतील हा नियोजनाचा प्रयोग पुढें युद्ध लवकरच संपल्यामुळें फार दिवस चालू नव्हता; आणि केवळ विवक्षित अडचणीमुळें आर्थिक व्यवहारास ही नवी दिशा द्यावी लागली अशीच सर्वसाधारण समजूत होती. तेव्हां युद्धसमाप्तीनंतर शक्य तितक्या लवकर पूर्वीप्रमाणें अनिर्बंध व्यवहारास प्रारंभ व्हावा या दृष्टीनें प्रयत्न होऊं लागले. परंतु अनेक स्थित्यंतरांमुळें व्यवहाराची ही घडी पूर्ववत् बसविणें कठीण आहे असें लवकरच आढळून आलें. महायुद्धामुळें जगाच्या आर्थिक व राजकीय परिस्थितींत अनेक महत्त्वाचे फरक घडून आले. निरनिराळ्या राजसत्तांखालील प्रदेशांची फेरविभागणी झाली; आणि आर्थिक गोष्टींतहि वेगवेगळ्या प्रदेशांच्या व राजसत्तांच्या महत्त्वांत फरक पडला. महायुद्धसमाप्तीनंतर कित्येक वर्षें रशिया—जर्मनी-सारख्या महत्त्वाच्या देशांतील राजकीय परिस्थिति अतिशय अनिश्चित होती. या अनिश्चिततेंतच कांहीं राष्ट्रांत चलनविषयक अव्यवस्थेची भर पडली. यामुळें सर्व आर्थिक व्यवहाराचा संकोच झाला व कित्येक राष्ट्रांचें पुनरुज्जीवन राष्ट्रसंघ या संस्थेच्या साहाय्यानें, सहकारानें आणि देखरेखीनें करावें लागलें. ही अनिश्चितता व अव्यवस्था एका दृष्टीनें तात्कालिक होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु जित राष्ट्रांवर लादलेल्या खंडण्या व त्या देण्यांत उत्पन्न झालेल्या अडचणी १९२९ सालपावेतों सार्वराष्ट्रीय व्यवहारांत जाचक भासत होत्या. शिवाय राष्ट्राराष्ट्रांच्या राजकीय व आर्थिक संबंधांहून निराळ्या क्षेत्रांतहि महायुद्धकालांत फार महत्त्वाचे फरक घडून आले होते. यांतील दोन अत्यंत महत्त्वाचे फरक म्हणजे कांहीं राष्ट्रांत—विशेषतः कॅनडा, अर्जेंटाईन, ऑस्ट्रेलिया इत्यादिकांत यांत्रिक साहाय्यानें शेतकी उत्पन्नास आरंभ आणि बऱ्याच पौरस्त्य राष्ट्रांतील उद्योगधंद्यांची वाढ हे होत. यांत्रिक शेतकी उत्पादनामुळें धान्य, विशेषतः गहूं स्वस्त झाला; व युरोपीय शेतकऱ्यांस या स्वस्त धान्याची आयात भोवूं लागली. तसेंच नवीन राष्ट्रांतलि उद्योगधंद्यांच्या वाढीमुळें जुन्या औद्योगिक राष्ट्रांतील कारखान्यांस धक्का बसला. तात्पर्य, उत्पादनव्यवस्थेंत एवढ्या मोठ्या उलाढाली घडून येत होत्या कीं, आपोआप सुरळीत कारभार चालण्यासारखी परिस्थिति कोठेंच जुळून आली नाहीं. प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांत आपले शेतकरी व कारखानदार यांच्या हिताचें संरक्षण कसें करावें हा प्रश्न उद्भवूं लागला व परराष्ट्रीय व्यापारावर निर्बंध घालण्याची प्रवृत्ति वाढूं लागली.

याप्रमाणें महायुद्धोत्तर दशकांत राजकीय अथवा आर्थिक परिस्थिति स्थिरावूं शकली नाहीं. १९२४ ते १९२९ या वर्षांत कांहीं अंशीं आर्थिक व्यवस्थेस निश्चित वळण लागल्यासारखें वाटत होतें. पण हा केवळ पोकळ देखावा होता, हें १९२९ च्या नंतर पूर्णपणें कळून आलें. १९२९ नंतर परिस्थिति कशी झपाट्यानें बदलत गेली हें सर्वश्रुत आहे. सार्वराष्ट्रीय व्यवहाराचा संकोच, हुंडणावळीच्या दरांची अनिश्चितता, पदार्थांच्या किंमतींतील उतार, शेतकऱ्याची निकृष्ट स्थिति, सर्व व्यवसायांतील वाढती बेकारी यांचा अंमल सर्वत्र सारखाच सुरू झाला; आणि या मंदीच्या काळांत प्रत्येक राष्ट्रीय सरकारास या सर्व आपत्तींस तोंड देण्याकरितां निश्चित धोरण आंखणें प्राप्त झालें. नियोजनाचें आजचें स्वरूप व व्याप्ति हीं दोन्ही बहुतांशीं १९२९ सालानंतरची परिस्थिति व धोरण यांच्या अनुरोधानें ठरलीं गेलीं आहेत.

नियोजनाचा हा पूर्वेतिहास लक्षांत घेतला म्हणजे आजचें त्याचें स्वरूप आकलणें सोपें होईल. कारण, आजची कोणत्याच देशांतील नियोजनपद्धति सुसंगत अथवा एकसूत्री नाहीं. शेतकी पैदाशीच्या विक्रीसंबंधींची मि. ईलियट यांची इंग्लंडमधील योजना वगळली तर इतर कोणत्याच योजना पूर्वी अभ्यासून किंवा अनुभवून अमलांत आणिल्या गेल्या असें आढळणार नाहीं. आजचें नियोजनाचें क्षेत्र व स्वरूप या सहजगत्या घडून आलेल्या गोष्टी आहेत. मंदीची तीव्रता जसजशी निरनिराळ्या दिशेनें भासूं लागली तसतसे आर्थिक निर्बंध वाढले. केवळ निर्बंधांनीं आर्थिक व्यवहारास इष्ट तें वळण त्या प्रमाणांत लागण्याचा संभव नाहीं असें आढळलें, तेव्हां प्रत्यक्ष राजसत्तेनें आपल्या हातीं कारभार घेऊन विवक्षित दिशेनें तो नियुक्त करण्यास आरंभ केला. हल्लींचें नियोजन बहुतांशीं तात्कालिक उपाययोजनेच्या स्वरूपाचें असल्यामुळें त्यांत विस्कळितपणा व विसंगति हे दोष प्रामुख्यानें दिसून येतात. याचा अर्थ १९२९ सालापूर्वी यापैकीं कशाचाच अनुभव आला नव्हता अथवा तत्पूर्वीच्या एकंदर प्रवृत्तींहून निराळेंच कांहींतरी मंदीच्या दिवसांत घडून आलें असा घ्यावयाचा नाहीं. नेहमींप्रमाणेंच असें म्हणतां येईल कीं, १९२९ सालापूर्वी अस्फुट असलेल्या प्रवृत्ति मंदाच्या दिवसांतील परिस्थितीच्या जोरामुळें विशेष ठळक रीतीनें दिसूं लागल्या व पूर्वी एखाद्याच क्षेत्रांत प्रसृत असलेल्या कल्पना सगळीकडे फैलावल्यामुळें त्यांची पकड विशेष बसली.

गेल्या सहासात वर्षांत निरनिराळ्या राष्ट्रांत अमलांत आणिलेल्या नियोजनाचे प्रकार अनेक आहेत. आणि आर्थिक व्यवहाराच्या प्रत्येक

क्षेत्राचें जगांतील कोणत्या ना कोणत्या तरी देशांत नियोजन झाल्याचें आढळून येतें. परराष्ट्रीय कर्ज देण्याच्या अडचणीपासूनच प्रत्येक देशास मंदीची झळ लागण्यास आरंभ झाल्यामुळें परकीय देणें व परराष्ट्रीय व्यापार यांजवरील निबंध वाढण्यास प्रथमच प्रारंभ झाला व या क्षेत्रांतील व्यवहारावर सरकारी हुकमत आजपावेतों विशेष आहे. परराष्ट्रीय व्यापाराशीं हुंडणावळीच्या दरांचा व चलनपद्धतीचा अत्यंत निकट संबंध. तेव्हां परराष्ट्रीय व्यापाराबद्दलच्या योजनेस साह्य करणें हें चलनविषयक धोरणाचें एक प्रमुख अंग झालें आणि हुंडणावळीच्या दरांतील फरकामुळें परराष्ट्रीय व्यवहारावर परिणाम घडवून आणण्याचा व त्याबरोबरच चलनव्यवस्थेनें अंतर्गत व्यवहारांत पदार्थांच्या किंमती वाढविण्याचा प्रयत्न होऊं लागला. ह्या उपाययोजनेचा परिणाम व्हावा तितका चटकन दिसून आला नाहीं तर प्रत्यक्ष कृषिविषयक व औद्योगिक उत्पादनाचें नियंत्रण हातीं घेणें, पदार्थांच्या किंमती तपशीलवार ठरवून ठेवणें, मजुरीच्या दरांत फरक करणें, बेकारी-निवारणार्थ सरकारी बांधकामांस आरंभ करणें इत्यादि अनेक गोष्टी हातांत घेण्यांत आल्या. या सर्वांचा परस्परसंबंध व नियोजनाचें खरें स्वरूप हीं कांहीं प्रमुख देशांतील नियोजनाचा तपशीलवार विचार केल्यास नीट विशद होतील.

आर्थिक नियोजनाचें सांप्रतचें स्वरूप तीन देशांतील सद्यःस्थितीच्या वर्णनावरून विशद करण्याचें आम्हीं योजिलें आहे. हे तीन देश म्हणजे जर्मनी, अमेरिका व इंग्लंड हे होत.

**जर्मनी:**—रशियांतील संपूर्ण नियुक्त व्यवहार जर सोडून दिला तर ज्या देशांत नियोजनाची परमावधि झाली आहे अशांपैकीं जर्मनी हा एक आहे. इटली व जर्मनी या दोन्ही देशांतील सत्तारूढ पक्ष स्वतःस समाजवादी म्हणवितो हें लक्षांत ठेविलें पाहिजे. मार्क्सपंथीयांचा समाजवाद चुकीचा असला तरी निर्भेळ व्यक्तिस्वातंत्र्यवादहि तितकाच चुकीचा आहे असें फासिस्ट व नाझी या दोन्ही पक्षांचें म्हणणें आहे. वर्गकलहाची कल्पना ही समाजाच्या दृष्टीनें हानिकारक आहे; परंतु प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्रपणें वाटेल तसा व्यवहार करूं देणें हेंहि बरोबर नाहीं. राष्ट्रहित हेंच खरें व अंतिम उद्दिष्ट. तें साधण्याकरितां व्यक्तीवर नियंत्रण घालणें आवश्यक आहे. सर्व वर्ग व व्यवसाय यांचें योग्य पोषण करणें व त्यांना अवश्य ती दिशा लावणें हें प्रत्येक राष्ट्रीय सरकारचें कर्तव्य आहे अशी यांची विचारसरणी आहे. तेव्हां आर्थिक व्यवहारांत नाझी सरकारनें विशेष ढवळाढवळ केली तर त्यांत आश्चर्य वाटण्या-

सारखें कांहीं नाहीं. शिवाय महायुद्धोत्तर जर्मनींतील आर्थिक व्यवहाराचा इतिहासच असा आहे कीं, त्यांत ढवळाढवळ करणें कोणत्याहि सरकारास भाग पडावें. १९२४ सालापर्यंतची चलनविषयक अव्यवस्था व अनिश्चितता संपल्यावर चारपांच वर्षें परकीय भांडवलाच्या साहाय्यानें जर्मनींत बरीं गेलीं; पण या अवधींतहि भांडवल मिळवून देणें व उद्योगधंद्यांची सुव्यवस्था लावणें यांत सरकारचा हात होताच. सकृद्दर्शनीं १९२४ ते १९२९ सालांत सुबत्ता होती. खरें पाहिलें तर खंडणीचा बोजा जर्मन राष्ट्रास असह्य होता व परकीय कर्जामुळें तात्पुरती अडचण भागली तरी अंतीं त्यामुळें परकीय देण्याचा बोजा आणखी जबर वाढला. मंदी सुरू झाल्याबरोबर ही परिस्थिति उघडी पडली. एकीकडे जर्मन मालाचा परदेशांतील खप कमी झाला, तर दुसरीकडे कर्जदार आपल्या देण्याबद्दल तगादे करूं लागले. तेव्हां धनकोंकडून मुदत मागून घेऊन तोंडमिळविणी करण्याचा आटोकाट प्रयत्न करणें आवश्यक झालें. अशा परिस्थितींत सरकारी नियंत्रण-नियोजनाचें क्षेत्र सारखें वाढलें व एकंदर निकृष्टावस्थेमुळें नाझी पक्षाचें घोडें पुढें सरकलें. नाझी पक्षानें राजसत्ता बळकावल्यावर आर्थिक व्यवहारावरील सरकारी हुकमत झपाट्यानें वाढली हें सांगावयास नको.

आर्थिक स्वावलंबन हें नाझीपक्षाचें ध्येय. ध्येयाचीं साधनें हरएक प्रकारचें नियंत्रण व नियोजन. आजची पद्धति पूर्वविचारानें बनलेली नसून हळूहळू परिस्थितीप्रमाणें बनलेली आहे. नियंत्रण व नियोजन यांची परंपरा एकामागून एक साहजिकच कशी लागत येते हें येथें अभ्यासण्याजोगें आहे. परंतु नियोजनाचें ऐतिहासिक स्वरूप अभ्यासणें हा आपला मुख्य उद्देश नसल्यामुळें साधारणपणें आजची परिस्थिति काय आहे इकडेच लक्ष वळवूं. नाझी-सरकारनें आर्थिक व्यवहाराच्या एकंदर क्षेत्राचे पांच विभाग पाडले असून प्रत्येक विभागाचें निराळें संस्थानच ( Estate ) निर्माण केलें आहे. हे विभाग म्हणजे ( १ ) शेतकी, ( २ ) कारखाने व व्यापार, ( ३ ) कारागिरी, ( ४ ) वाहतूक व ( ५ ) मजूरवर्ग. या सर्व अंगांचें नियोजन आज सारख्याच प्रमाणांत झालेलें नाहीं. नियोजनाचें प्रमाण सर्वांत अधिक शेतकीमध्यें आढळून येतें. कच्च्या मालाच्या बाबतींत जर्मनी बऱ्याच अंशीं परावलंबी आहे. तेव्हां हें परावलंबित्व कमी करण्यास शेतकी पैदास वाढविण्याची व ती योग्य दिशेस लावण्याची तजवीज केली पाहिजे. याकरितां शेतकींत केवळ नियंत्रणावर भागत नाहीं. शेतकी अंग किंवा शेतकी संस्थान व इतर संस्थानें यांची घटना साधारणपणें एकसारखीच आहे.

शेतकी संस्थानांत राष्ट्रांतील एकूण एक शेतकरी व शेतकी मालाचे व्यापारी यांचा समावेश होतो. या संस्थानाची घटना सकृद्दर्शनीं स्वतंत्र बिनसरकारी आहे. म्हणजे, सर्व शेतकऱ्यांचे प्रांत आणि जिल्हानिहाय गट असून या सर्वांचें मिळून राष्ट्रिय शेतकी संस्थान बनतें. पण या संस्थेचें सभासदत्व हें वैकल्पिक नाहीं. प्रत्येकानें सक्तीनें सभासद झालेंच पाहिजे व एकंदर संस्थानाची सत्ता ही सरकारी सत्तेच्या पाठबळावरच चालते हें उघड आहे. येथें दुसरेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे तें असें कीं, नाझी जर्मनींत सर्व संस्था किंवा सरकारी खातीं यांच्या घटनांच्या बुडाशीं एक प्रमुख तत्त्व अथवा पद्धत आहे. या पद्धतीस 'नेता' पद्धति म्हणतां येईल. नाझीपक्षाच्या म्हणण्याप्रमाणें प्रातिनिधिक सत्ता ही नेहमीं दुबळी व कर्तव्यशून्य असते व असणार. प्रातिनिधिक लोकशाही हें एक थोतांड आहे. प्रत्येक संस्था, सभा किंवा खातें यावर एक 'नेता' पाहिजे आणि त्याच्या हुकमतीनें व त्याच्या जबाबदारीवर सर्व गोष्टी व्हावयाच्या. हेर हिटलर हा राष्ट्रनेता; इतर दुय्यम नेते त्यानें नेमिलेले; व त्यांच्या सर्व सत्तेचा उगम त्याजपासून. या तत्त्वाचा विचार आपणांस प्रस्तुत करणें नाहीं. येथें एवढेंच लक्षांत ठेवावयाचें कीं, हीं निरनिराळीं आर्थिक संस्थानें जरी बिनसरकारी उत्पादकाचे संघ म्हणून समजलीं गेलीं, तरी प्रत्येक संस्थानाचा 'नेता' त्या त्या सरकारी खात्याचा मंत्री हाच असतो. म्हणजे या संस्थानांचें सर्व धोरण सरकारी धोरणाप्रमाणेंच पूर्णपणें ठरविलें जातें.

प्रत्येक शेतकरी हा शेतकी संस्थानाचा एक घटक असतो व प्रत्येक शेतकऱ्याच्या हरएक व्यवहाराचें नियंत्रण करण्याची सत्ता शेतकी संस्थानास पूर्णपणें आहे. कित्येक गोष्टींत हें नियंत्रण फार तपशिलवार केलें जातें. धान्यपुरवठा ही कोणत्याहि राष्ट्रांत सर्वांत महत्त्वाची गोष्ट. जर्मनी धान्याच्या बाबतींत पूर्णपणें स्वावलंबी व्हावयास पाहिजे म्हणून धान्याची पैदास वाढविणें अत्यावश्यक. धान्याची किमान पैदास कोणत्याहि वर्षी किती झाली पाहिजे हें ठरवून प्रत्येक शेतकऱ्यानें किती गहूं व इतर धान्य विक्रीस आणिलें पाहिजे हें ठरविलें जातें. गहूं, राय ( rye ) इत्यादि प्रमुख धान्यांचा पुरवठा पहिल्या प्रतीच्या महत्त्वाचा म्हणून त्यांच्या पैदाशीचा नक्की आंकडा आगाऊ ठरविला जातो; आणि त्याचा आपल्या वांटणीस आलेला भाग प्रत्येक शेतकऱ्यास उचलावा लागतो. इतर पैदाशीच्या बाबतींत विक्रीस आणण्याचें परिमाण आगाऊ ठरविलेलें नसतें. येथें पैदाशीस वळण लावणें हें जरा निराळ्या प्रकारानें होतें. सर्व शेतकी पैदाशीची विक्री ही शेतकी संस्थानाद्वारेंच होते.

याकरितां संस्थानानें निरनिराळीं विक्री-मंडळें स्थापिलीं आहेत. प्रत्येक मध्यवर्ती मंडळाकडे एकेक पैदाशीचा प्रकार सोंपविला आहे. उदाहरणार्थ (१) धान्यें, (२) गुरें व मांस, (३) दूध, व (४) बटाटे वगैरे. किंमती विभागवार ठरविल्या जातात; आणि सर्व विक्री मंडळाकडून व ठराविक किंमतीप्रमाणें झाली पाहिजे. येथेंहि धान्याच्या बाबतींत जितकी तपशिलवार व कडक योजना आहे तितकी इतरत्र नाहीं. शेतकऱ्यांवरील गहूं व राय यांच्या ठराविक ( quota ) आंकड्याप्रमाणें पिठाच्या गिरण्या व पावाच्या भट्ट्या यांच्या किंमती व पुरवठा यांबद्दल नियंत्रण आहे. धान्यापासून पावाच्या किंमती पायरीपायरीनें ठरविलेल्या आहेत. पावांचे निरनिराळे प्रकार, त्यांची प्रत, पुरवठा व किंमत या सर्व गोष्टी धान्यविक्रीमंडळ व सरकारी खातें यांच्या नियंत्रणाखालीं इतकी तपशिलवार नसली तरी अशा धर्तीची योजना इतर पैदाशींतहि आढळून येते. जेथें नवीन वळण लावण्याची अथवा पुरवठा वाढविण्याची आवश्यकता विशेष नाहीं, तेथें विक्रीमंडळामार्फत विक्री केल्यानें पैदाशीचें परिमाण व प्रत यांवर जेवढी देखरेख होते तेवढी पुरेशी मानली जाते. जेथें पैदास वाढविणें जरूर असेल तेथें किंमती वाढविणें हा पैदाशीस उत्तेजन देण्याचा एक मार्ग झाला. पण मालाचा उठाव करणें हें तितकेंच आवश्यक आहे. तेव्हां निरनिराळ्या धंद्यांत स्वदेशी माल वापरण्याचा आंकडा ( quota ) ठरविला जातो. उदाहरणार्थ, चॉकोलेट तयार करतांना स्वदेशी ( म्ह. जर्मन ) साखर व दूध हीं वापरण्याचें ठराविक किमान प्रमाण निश्चित केलेलें आहे. जर्मनींत लोकर फार कमी उत्पन्न होते. तिचें उत्पादन वाढावें म्हणून खटपट चालू आहे आणि जर्मन लोकरीची किंमत परदेशाहून आयात केलेल्या लोकरीच्या जवळजवळ चौपट ठरविलेली आहे. याबरोबरच सरकारी खात्यांस लोकरीचा माल पुरविणाऱ्या कारखानदारांनीं आपल्या कारखान्यांत कांहीं विवक्षित प्रमाणांत जर्मन लोकर वापरलीच पाहिजे, असाहि निर्बंध आहे. या सर्व प्रकारच्या निर्बंधांप्रमाणेंच शेतीसुधारणा, पैदास वाढविणें व पैदाशीची प्रत सुधारणें यांकडेहि शेतकी संस्थान लक्ष देत असतें. या नियोजनाचें जास्त तपशिलवार वर्णन करणें येथें शक्य नाहीं. लक्षांत ठेवण्याचा मुद्दा एवढाच कीं, ठराविक किंमती, पैदाशीचा ठोक ठराविक आंकडा, विक्रीमंडळाची सत्ता अशा अनेक प्रकारांनीं जर्मन शेतकीव्यवसाय आज पूर्णपणें बांधला गेला आहे. काय व किती पेरावें, कोठें व कसें विकावें, या सर्व बाबतींत शेतकऱ्यास बहुतांशीं पूर्वनिश्चित योजनेनुसार चालावें लागतें.

इतर संस्थानांतील योजना इतकी तपशिलवार नाहीं. परंतु यांतीलहि कांहीं गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या आहेत. नाझी समाजवाद खाजगी मालमत्तेच्या विरुद्ध नाहीं, किंबहुना खाजगी उद्योगास उत्तेजन द्यावें असें त्याचें मत आहे. तथापि याबरोबरच सरकारी ढवळाढवळीसहि कांहीं मर्यादा नसावी. कारण कीं, जेथें राष्ट्रहित व व्यक्तिहित यांत फरक पडतो तेथें राष्ट्रहिताप्रमाणें गोष्टी घडवून आणणें सरकारचें कर्तव्य आहे. शेतीप्रमाणेंच उद्योगधंद्यांच्या संस्थानांचीहि घटना आहे. परंतु अजूनपावेतों ही सुव्यवस्थित झालेली दिसत नाहीं. यांत प्रत्येक मालक व कारखानदार हाच घटक. मजुरांस येथें कांहीं स्थान नाहीं. कारण, कल्पना अशी कीं, प्रत्येक कारखाना हा जरी घटक असला, तरी कारखानदार अथवा मालक हाच कारखान्याचा 'नेता.' तेव्हां अनुयायांस निराळें स्थान मिळण्याचें कांहीं कारण नाहीं. कारखानदारांचे धंदानिहाय संघ निघणें हें जर्मनींत पूर्वींपासूनच आहे. बहुतेक प्रमुख धंद्यांत विक्रीसंघ ( cartels ) हे जुने आहेत; व त्यांस सरकारी मान्यता मिळून त्यांचें नियंत्रण करणें होंहि आधींच झालेलें आहे. यांचें प्रमाण व क्षेत्र हीं थोडीं अलीकडे वाढलीं असें म्हणतां येईल. अलीकडे नियंत्रण नवीन सुरू झालें असें कोठें असेल तर तें कच्च्या मालाचा वापर, कारखाने नवीन सुरू करणें, बंद करणें अथवा वाढविणें या बाबतींत. कांहीं धंद्यांत नवीन कारखाने काढणें अथवा चालू कारखान्यांची उत्पादनसामुग्री वाढविणें यावर निर्बंध आहे. जेथें नवीन उद्योगधंदे वाढविण्याची परवानगी आहे, तेथेंहि कारखाने कोठें काढावे हें सरकारी योजनेनुसार व्हावें लागतें. जर्मनींत लोखंड भरपूर असलें तरी तांबें, शिसें, जस्त, अल्युमिनियम् इ. धातूंचें उत्पादन फार कमी आहे. तेव्हां या धातूंचा उपयोग निरनिराळ्या उद्योगांत कमी व्हावा म्हणून त्यांचा पुरवठा व विक्री नियमित प्रमाणांत एका स्वतंत्र खात्यामार्फत केली जातात. तसेंच स्वावलंबनाच्या दृष्टीनें सर्व प्रकारच्या कापडाच्या बाबतींत जर्मनी फार मागसलेला आहे. कापूस, ताग, पाट, रेशीम, रबर इत्यादि तंतुद्रव्यांचा देशी पुरवठा जर्मनींत जवळजवळ मुळींच नाहीं. लोकरीची पैदास ही एकंदर खपाच्या एकदशांशाहून कमी आहे. तेव्हां सर्व प्रकारच्या कापडाच्या अथवा कातड्याच्या उपयोगांत शक्य तितकी काटकसर करणें आणि शास्त्रीय शोध लावून कृत्रिम तंतुद्रव्यांचा पुरवठा वाढविणें या दोन्ही दिशांनीं प्रयत्न चालू झाले आहेत. आयात कराव्या लागणाऱ्या सर्व तंतुद्रव्यांचा पुरवठा सरकारी खात्यामार्फत नियमित केला जातो. सार्वजनिक व सरकारी खात्यांस

लागणाऱ्या कापड–कातड्यांच्या वस्तूंच्या खरेदीस सरकारी परवानगी लागते. किंमती अर्थात् सगळ्या नियंत्रितच आहेत. नवीन कारखाने घालतां येत नाहींत व जुन्यांनीं आठवड्यांत किती तास काम करावयाचें हें वेळोवेळीं ठरविलें जातें. उद्देश हा कीं, शक्य तितक्या थोडक्या कच्च्या मालावर भागवावें; व हा सर्व कच्चा माल सध्या अस्तित्वांत असलेल्या सर्व कारखान्यांत असा वांटावा कीं कोठेंहि बेकारी वाढूं नये. परिस्थितीमुळें कृत्रिम रेशमाच्या पैदाशीस अर्थात् अत्यंत उत्तेजन मिळालें आहे; आणि कापसाच्याऐवजीं एक प्रकारच्या नवीन कृत्रिम तंतूचाहि ( staple fibre ) उपयोग देशांत शक्य तितका वाढविण्यांत येत आहे.

कृषि–उद्यमांप्रमाणें इतर सर्व अंगांचें नियमन सरकार आज असेंच करीत आहे. राहिलेल्यापैकीं फक्त मजुरांच्या नियंत्रणाकडे थोडें लक्ष पुरवूं. नियोजन करावयाचें असलें म्हणजे नियोजनाचें उद्दिष्ट प्रथम निश्चित करणें अवश्य असतें. जें आपोआप घडून येईल तें चांगलें असें स्वातंत्र्यवादास म्हणतां येतें तसें नियोजनवादाचें नाहीं. वर्गकलहाची कल्पना चुकीची व अनिष्ट असें प्रतिपादल्यानंतर मजूरवर्गाच्या हितांचें संरक्षण कसें करावयाचें हा मुद्दा नाझी सरकारापुढें प्रामुख्यानें उपस्थित झाला. कलह अनिष्ट, त्याअर्थीं कारखानदार–संघ व मजूर–संघ असे परस्परविरोधी गट निर्माण होऊं देणें योग्य नाहीं, हें ओघानेंच आलें. खाजगी उत्पादन चालू ठेवावयाचें म्हणून क्रय–विक्रय–उत्पादनव्यवस्था या सर्व गोष्टींत मजुरांचा कांहीं संबंध नाहीं. या बाबतींत कारखानदार हाच कारखान्याचा 'नेता' असें ठरलें. परंतु मजुरीचे दर, कामाचा नियमितपणा व त्याची निश्चितता, कारखान्यांतील परिस्थिति, या गोष्टींत मजूरवर्गाचें हितसंरक्षण करणें हें कार्य कसें व्हावयाचें? नाझी–पक्षाच्या विजयानंतर लगेच सर्व जुने मजूरसंघ रद्द करण्यांत आले. त्याबद्दल नाझी–पक्षानें मजूरपंथ अथवा मजूर-फळी (Labour Front) निर्माण केली. प्रथमतः यांत फक्त मजूरवर्गाचाच समावेश करण्यांत आला होता. पण पुढें त्यांत मालक, कारकून इत्यादि सर्वांनाच घेण्यांत आलें. सभासदत्व वैकल्पिक असलें तरी सभासदांना देण्यांत आलेले फायदे इतके आहेत कीं, जवळजवळ सर्वच लोक सभासद होतात. जुन्या मजूरसंघाचा सर्व पैसा या नवीन संस्थेस मिळाला आहे; आणि मजूरसंघांचे विमे, बेकारवेतन वगैरे सर्व कार्य या नवीन संस्थेनेंच आपणाकडे घेतलें आहे. नाझी–पक्षाशीं या मजूर संस्थेचा निकट संबंध असून

मजुरांचें राजकारणविषयक शिक्षणहि या संस्थेकडूनच केलें जातें. अशा रीतीनें मजुरांच्या सामाजिक संघटनेची सोय झाली; परंतु मालकांशीं वाटाघाटी करणें अथवा भांडणें हें काम कांहीं नवीन मजूरफळी करूं शकत नाहीं. याकरितां स्वतंत्र कायदेशीर योजना झालेली आहे. १९३४ च्या कायद्याप्रमाणें यासंबंधीं दोन निरनिराळ्या योजना करण्यांत आल्या आहेत. सर्व मोठ्या कारखान्यांतून मजूर–मालकांचीं जोडमंडळें निर्माण करण्यांत आलीं असून त्यांजकडे मजूर-वर्गाचीं गाऱ्हाणीं ऐकणें व रजा, दंड इत्यादिविषयक नियम बनविणें हें काम दिलेलें आहे. परंतु मजूरसंघाचें मुख्य काम मालकांशीं मजुरीचे दर वगैरे-विषयीं वाटाघाट करणें, हें अर्थात् जोडमंडळावर सोपविलेलें नाहीं. याकरितां मजूर-विश्वस्त ( Labour Trustees ) म्हणून अगदीं निराळेच अधिकारी नेमण्यांत आलेले आहेत. वरील जोडमंडळाच्या कामावर हे मजूर-विश्वस्त देखरेख करितात. परंतु यांचीं खरीं महत्त्वाचीं कामें म्हणजे आपापल्या टापूंत एकंदर कार्यपद्धति व कामकऱ्यांसंबंधीं नियम हीं साधारण मानानें ठरविणें, प्रसंग पडल्यास मजुरीच्या दरांचें नियमन करणें व कोणाहि कारखानदारास कामावरून बरेचसे मजूर एकदम कमी करणें असल्यास त्याविषयीं त्यास परवानगी देणें वा न देणें हीं होत. जर्मनीचे एकंदर १४ औद्योगिक विभाग पाडण्यांत आले असून त्या प्रत्येकावर एक मजूर-विश्वस्त नेमिलेला आहे. मजूरवर्गावर याहून मोठें नियंत्रण म्हणजे अलीकडे प्रत्येक कामकऱ्यास एक नोकरी–पुस्तक ( Employment Book ) बाळगावें लागतें. या पुस्तकांत त्याच्या आजतागायत नोकरीचा आणि कामाचा तपशील नमूद केलेला असतो. ज्याचें पुस्तक आजतागायत व्यवस्थित भरलेलें नाहीं अशा कोणासहि कारकुनी, मजुरी अशा कोणत्याहि कामावर कोणींहि लावूं नये, असा गतवर्षापासून कायदा झाला आहे. वरील विवेचनांत जर्मनींतील आजच्या परिस्थितीचें तपशीलवार वर्णन करणें हा हेतु नसून केवळ नियोजन–नियंत्रण कितीं निरनिराळ्या मार्गांनीं होतें हें दिग्दर्शित करणें एवढाच आहे.

**अमेरिका**—संयुक्त संस्थानांतील नियोजनाचा इतिहास व स्वरूप हीं जर्मनींतील नियोजनाहून अगदीं भिन्न अशीं आहेत. दोहींच्या पूर्वेतिहासांत जमीन – अस्मानाचें अंतर आहे. जर्मनींत सरकारी हुकुम-तीचा प्रथमपासून प्रभाव फार, तर अमेरिका व्यक्तिस्वातंत्र्यवादाचें माहेरघर; सरकारनें विमा वगैरेसंबंधीं सामाजिक जबाबदाऱ्या उचलण्यांत जर्मनीनें पुढाकार घेतलेला, तर अमेरिकेंत कोणत्याहि प्रकारची सरकारी मदत

अथवा ढवळाढवळ याविरुद्ध फार कटाक्ष. महायुद्धोत्तर परिस्थिति ही जर्मनींत फार अनिश्चिततेची, निकृष्टावस्थेची, तर अमेरिकेंत १९१९ ते १९२९ हीं वर्षें कमालीच्या भरभराटीचीं गेलीं. इतकीं कीं, अमेरिकेनें आपल्यापुरते तरी आर्थिक प्रश्न पूर्णपणें सोडविले असें तेथील कांहीं अतिआशावादी लोक म्हणूं लागले होते. परंतु जितकें वर चढावें तितका अधःपातहि अधिक होतो, या न्यायानें १९२९ नंतर मंदीचे परिणाम अमेरिकेंत अतोनात भासले. बेकारी अकल्पित प्रमाणांत वाढली, शेतकरी ठार बुडाले, बँकांवर दिवाळखोरीची पाळी आली; तात्पर्य, १९२९ नंतर अमेरिका भरभराटीच्या अत्युच्च शिखरापासून मंदीच्या खोल दरींत एकदम घसरली. प्रे. हूवर यांच्या कारकीर्दीचीं शेवटचीं वर्षें हीं या मंदीचीं वर्षें होत. प्रे. हूवर व्यक्तिस्वातंत्र्यवादाचे खरेखुरे प्रतिनिधि व सरकारी ढवळाढवळीच्या विरोधकांचे कट्टे पुरस्कर्ते. त्यांच्या अमदानींत व त्यांच्या धुरीणत्वाखालीं परिस्थिति दिवसेंदिवस बिघडत चालली व कांहीं केल्या मंदी कमी होण्याचा संभव दिसेना. या आपत्तीच्या खडतर अनुभवामुळें परंपरागत कल्पना व समजुती यांस भयंकर जोराचा धक्का बसला आणि स्वस्थ बसून, तटस्थ वृत्ति स्वीकारून संकटनिवारण होणें शक्य नाहीं, सरकारनें सर्व बाजूंनीं जोराची धडपड केली पाहिजे, ही प्रे. रूझवेल्ट यांची घोषणा जनतेस पटली. त्याच्या जोरावर प्रचंड बहुमतानें प्रे. रूझवेल्ट १९३२ सालीं निवडून आले; आणि त्यांची कारकीर्द व तेजीची सुरुवात ही एकत्र आल्यामुळें फेरनिवडणुकीच्या वेळेसहि अमेरिकी जनतेनें रूझवेल्ट यांस पूर्वीपेक्षांहि मोठ्या बहुमतानें कौल दिला. अमेरिकी तेजीचें श्रेय रूझवेल्ट यांच्या धोरणास खरोखर आहे किंवा नाहीं असल्या प्रकारच्या प्रश्नांचा विचार आपणांस प्रस्तुत कर्तव्य नाहीं. अमेरिकेसारख्या देशांतहि परिस्थितीमुळें सरकारास ढवळाढवळ किती करावी लागली व नियोजन कोणत्या थरास गेलें हें थोडक्यांत दर्शविणें आहे. इतर देशांत प्रसृत असलेल्या बऱ्याच गोष्टी अमेरिकेच्या सरकारनें १९२९ सालपर्यंत केलेल्या नव्हत्या. यामुळें प्रे. रूझवेल्ट यांच्या 'नव्या डावांतील' अनेक बाबी केवळ अमेरिकेपुरत्या नव्या मानतां येतील. उदाहरणार्थ, बेकारांस कांहीं मदत करणें ही जबाबदारी बहुतेक युरोपीय राष्ट्रांनीं आज बरींच वर्षें पत्करलेली आहे. परंतु अमेरिकेंतील बहुतेक संस्थानांत याविषयीं कांहींएक तरतूद केलेली नव्हती. १९२९ सालानंतर बेकारी झपाट्यानें वाढल्यावरहि बेकारमदतीचें कार्य खाजगी व्यक्ति व मंडळ्या यांच्या द्वारेंच होत होतें. प्रे. रूझवेल्ट यांच्या कारकीर्दींत हें

सरकारामार्फत प्रत्यक्ष हातीं घेण्याचें प्रथम ठरलें. हीच गोष्ट नैसर्गिक संपत्तिसंरक्षणाची. लोकसंख्येच्या मानानें देशविस्तार एवढा मोठा व हरतऱ्हेचीं नैसर्गिक साधनें येथें इतकीं विपुल कीं, यांचा विनियोग कसाहि केला तरी त्याबद्दल पर्वा बाळगण्याचें कारण कोणास वाटलें नव्हतें. परंतु ही बेपर्वाईची वृत्ति घातक आहे असें मत अलीकडे बनत चाललें व प्रे. रूझवेल्ट यांनीं निरनिराळ्या बाबतींत या संपत्तीचें संरक्षण करण्याचें योजिलें. उदाहरणार्थ, जंगलांच्या उपयुक्ततेवर विशेष जोर देऊन जंगलें राखावीं व त्यांच्या वाढीचें व योग्य जोपासनेचें प्रयत्न करावे असें धोरण त्यांनीं स्वीकारिलें; आणि हें काम प्रारंभीं फार मोठ्या प्रमाणावर हातीं घेऊन त्यांत बेकारीनिवारणहि थोडेसें साधून घ्यावें, असा कार्यक्रम आखण्यांत आला. बेकारीनिवारणार्थ बेकारांस वेतन देण्याची जबाबदारी पत्करण्यापूर्वी त्यांना काम देणें हा जास्त श्रेयकर मार्ग, ही प्रे. रूझवेल्ट यांची समजूत; व म्हणून जंगलखात्यांतील विशेष कामाप्रमाणें इतर सरकारी बांधकामाचीं वगैरे कामें त्यांनीं मोठ्या प्रमाणावर सुरू केलीं आणि त्याकरितां बरेंचसें कर्ज काढण्याची परवानगीहि कायदेमंडळाकडून मिळविली. मोठ्या प्रमाणावर सरकारी कामें हातीं घेण्याचें हें धोरण केवळ अमेरिकेचेच आहे असें समजण्याचें कारण नाहीं. बहुतेक सर्व देशांत याचा स्वीकार करण्यांत आला आहे; व अर्थशास्त्रज्ञहि खाजगी अर्थव्यवहार मंदावला असतां सार्वजनिक कामें हातीं घेऊन सरकारानें व्यवहाराचें क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न करणें या गोष्टींवर अलीकडे विशेष भर देत आहेत. इतर देशांपेक्षा असल्या सार्वजनिक कामांप्रीत्यर्थ अमेरिकेंत पुष्कळच जास्त पैसा खर्च करण्यांत आला म्हणून याचा उल्लेख येथें केला आहे.

प्रे. रूझवेल्ट यांचे नियोजनव्यवस्थेंतील दोन नवीन उपक्रम म्हणजे उद्योगधंदे व शेती यांच्या पुनर्घटनेसंबंधींचे. राष्ट्रीय उद्योग-पुनरुज्जीवनाचा कायदा ( N. I. R. A. ) व शेतकीपुनर्घटनेचा-कायदा ( A. A. A. ) यांविषयीं येथें तपशीलवार लिहिण्याची आवश्यकता नाहीं. एकदोनच गोष्टी ठळकपणें निर्देशितों. प्रे. रूझवेल्ट यांच्या कार्यक्रमांत काम वाढविणें, किंमतींचें नियंत्रण करणें व मजुरांची स्थिति सुधारणें या गोष्टी प्रामुख्यानें होत्या. जर्मनीसारखा सर्व पदार्थांच्या किंमतींचें प्रत्यक्ष नियंत्रण करण्याचा प्रयत्न रूझवेल्ट यांनीं कधींच केला नाहीं. उद्योगधंद्यांतील चढाओढीच्या अनिष्ट प्रकारास आळा घालणें हा किंमती स्थिरावण्याबद्दलचा त्यांचा मुख्य उपाय; व हें करावयाचा

त्यांचा मार्ग म्हणजे प्रत्येक उद्योगधंद्यानें आपणापुरतें योग्य ते नियम करून ते सर्वांकडून पाळले जातील हें पाहणें. प्रत्येक धंद्यांत त्या त्या धंद्यापुरती नियंत्रणसंस्था निर्माण करावी व या संस्थेकडे नियमनाचें कार्य द्यावें असें ओघानें ठरलें; रा. उ. पु. कायद्याच्या अंमलबजावणीकरितां दोन वर्षांच्या आंत लहानमोठ्या ५४६ नियंत्रक संस्था अस्तित्वांत आल्या. या नियंत्रक संस्थांचें कार्यक्षेत्र व घटना हीं सगळीकडे सारखींच नव्हतीं. ठराविक सांच्यांत सुसंगत घटना होण्यास खरोखर फारसा अवधीच मिळाला नाहीं. परंतु मजुरांच्या कामाचे तास, त्यांचें वेतन व इतर परिस्थिति, उत्पादनाची प्रत, विक्रीची पद्धति, मालाच्या किंमती ठरविण्यासंबंधींचें धोरण इत्यादि अनेक बाबींत या औद्योगिक नियंत्रकसंस्थांस महत्त्वाचे अधिकार देण्यांत आले होते.

औद्योगिक पुनरुज्जीवनाच्या बाबतींत अनेक गोष्टी साधावयाच्या होत्या व म्हणून उपाययोजना विविध व गुंतागुंतीची झाली. शेतकीसंबंधीं जवळजवळ एकच उद्दिष्ट प्रे. रूझवेल्ट यांनीं आपणापुढें ठेविलें होतें; तें म्हणजे शेती मालाच्या किंमती शेतकऱ्यास किफायतशीर होतील इतक्या वाढविणें. या किंमती वाढविण्याचा उपाय शेतीच्या मालाची पैदास कमी करणें हा त्यांनीं योजिला. शेतकऱ्यांस जवळजवळ सक्तीनें शेतकी पैदास-विशेषतः कापूस, तंबाखू असल्या पिकांची-कमी करण्यास लाविली आणि यामुळें त्यांचें नुकसान होऊं नये म्हणून त्यांस पडित टाकलेल्या एकरामागें कांहीं मदत दिली; आणि याकरितां लागणारा पैसा शेतकी मालाच्या बनावटीवर ( म्हणजे कांडणें, दाबणें इत्यादि क्रिया करणाऱ्या कारखान्यांवर ) कर लादून उभारला. किंमती अमुक एका प्रमाणांत वाढविल्या असतां शेती किफायतशीर होईल, अमुक एका प्रमाणांत पैदास कमी केली असतां किंमती हव्या तितक्या वाढतील, इतकी पैदास कमी करण्याकरितां नुकसानभरपाईसाठी शेतकरी-वर्गास अमुक खंडणी दिली पाहिजे व ही खंडणी अमुक कर लादला असतां जमा होईल, असे हिशेब करून प्रस्तुत संपूर्ण योजना आंखली गेली. हें नियोजन जरी तात्पुरतें होतें तरी त्यानें सबंध राष्ट्र व्यापिलें होतें व त्यामुळें अगदीं नवीन तऱ्हेचें आर्थिक धोरण अंमलांत आणिलें गेलें

औद्योगिक व शेतकी पुनरुज्जीवन या जरी दोन प्रमुख गोष्टी तरी प्रे. रूझवेल्ट यांच्या धोरणास इतरहि बरींच अंगें होतीं. उदाहरणार्थ, कर्जबाजारी शेतकरी व सर्व देशभर कर्ज काढून घरें बांधलेले लहान लहान घरमालक यांची मंदीमुळें फारच त्रेधा उडाली. तेव्हां त्यांस सरकारी कर्जाची मदत देऊन

ऋणमुक्त करण्याकडे रूझवेल्ट यांनीं विशेष लक्ष पुरविलें. पण याहूनहि विशेष उल्लेखण्यासारखी योजना म्हणजे सरकारी वीजपुरवठ्याची. प्रे. रूझवेल्ट यांच्या कारकीर्दींत टेनेसी नदीवर मोठमोठीं धरणें बांधून वीज उत्पन्न करण्याची एक प्रचंड योजना हातीं घेण्यांत आली आहे. आजपावेतों सरकारानें प्रत्यक्ष उत्पादकाचें कार्य हातीं घेण्याचें अमेरिकेला वावडें होतें. सर्व व्यवहार खाजगी व्यक्ति आणि मंडळ्या यांच्या हातांतच असावयाचा. फार झालें तर कांहीं प्रमुख सार्वजनिक उपयुक्ततेच्या व्यवहारांत—उदा. आगगाड्या, वीज, पाणीपुरवठा इत्यादींत सरकारी नियंत्रण असावें एवढें तत्त्व मान्य झालें होतें. प्रत्यक्ष सरकारी मालकी व व्यवस्था ही गोष्ट आजपावेतों माहीत नव्हती. टेनेसी खोऱ्यांतील वीजयोजनाहि एकंदर उत्पादनाच्या राष्ट्रीभवनाची पहिली पायरी असें समजण्याचें कारण नाहीं. योजनेचे पुरस्कर्तेहि खाजगी वीजवाल्यांच्या कार्यपद्धतीचा व हिशेबाचा पडताळा पाहणें व त्यांवर कांहीं नियंत्रण ठेवणें एवढाच टेनेसी योजनेचा मुख्य उद्देश समजतात. परंतु ही योजना एकदां सरकारानें हातीं घेतल्यावर तिच्या अनुरोधानें टेनेसी-खोऱ्याच्या आर्थिक व्यवहाराच्या नियोजनाच्या निरनिराळ्या प्रांतांत सरकाराला सहजच लक्ष घालावें लागेल, असें आतांच दिसूं लागलें आहे; व एका प्रदेशांत सरकारी योजना यशस्वी झाल्यास दुसरीकडेहि तिचा फैलाव व्हावा हें ओघानेंच येणार. या दृष्टीनें प्रे. रूझवेल्ट यांच्या इतर सर्व उपक्रमांहूनहि टेनेसीखोऱ्याच्या योजनेचें महत्त्व कांहींजण जास्त कां मानतात हें कळून येईल.

**इंग्लंड**—अमेरिकेंत व्यक्तिस्वातंत्र्याचें बंड फार, तर इंग्लंडांत खुल्या व्यापाराचें. आणि ज्याप्रमाणें रूझवेल्ट यांच्या नव्या डावानें अर्थव्यवहारांतील निर्भेळ व्यक्तिस्वातंत्र्यवादास मूठमाती मिळाली, त्याप्रमाणें इंग्लंडनें संरक्षक जकाती लादल्यामुळें निर्भेळ खुला व्यापार हासुद्धां नामशेष झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रज परराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणांतील ही क्रांति १९३१ सालीं घडून आली. पण यापूर्वीच नियोजित आर्थिक व्यवहाराच्या दिशेनें इतर क्षेत्रांत इंग्लंडनें प्रवेश केला होता. महायुद्धांतील कटु अनुभवानें कांहीं औद्योगिक मर्मस्थानांचें ( key industries ) संरक्षण करण्याचें महत्त्व इंग्लंडला पटलें होतें. यांत रासायनिक धंद्यासारखे प्रत्यक्ष युद्धोपयोगी धंदे होते एवढेंच नव्हे, तर बीट-साखरेसारख्या इतरहि धंद्यांचा समावेश झाला होता. पण युद्धाचा विचार मनांत न बाळगतांहि नियोजनाची आवश्यकता कांहीं क्षेत्रांत भासूं लागली होती. यांपैकीं सर्वांत महत्त्वाचें क्षेत्र म्हणजे

शेतकी पैदाशीच्या विक्रीचें. महायुद्धोत्तर काल हा स्थूलमानानें इंग्रज शेतकऱ्यास एकसारखा हलाखीचाच गेला. १९ व्या शतकांत जेव्हां असाच हलाखीचा काल येत असे, तेव्हां श्रम–विभागाच्या तत्त्वानुसार परिस्थितींत फेरबदल होत असतां असें व्हावयाचेंच असें समजण्याची लोकांची व सरकारची प्रवृत्ति होती. परंतु महायुद्धानंतर शेतकी व्यवसायाचें महत्त्व पटलें व प्रचलित विचारसरणी बदलली आणि या दोन्ही कारणांमुळें सरकारी मदत शेतकऱ्यांस कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत झाली पाहिजे असें मत बळावलें. या मतपरिवर्तनाचा व शेतकी खात्याच्या एकंदर हळुहळू बनत चाललेल्या धोरणाचा दृश्य परिणाम गेल्या पांचसहा वर्षांत निर्माण झालेलीं विक्रीमंडळें हा होय. शेतकऱ्यांची परिस्थिति सुधारावयाची तर उत्पादकांचें संघटन केलें पाहिजे व हें संघटन विशेषतः मालविक्रीविषयीं होणें अवश्य आहे, असा सिद्धान्त शेतकीखात्यानें बसविला. इंग्लंडमधील विक्रीमंडळें म्हणजे उत्पादकांचे संघ होत. एखादें विक्रीमंडळ स्थापण्याच्या पूर्वी एकंदर उत्पादकांपैकीं तीनचतुर्थांशांची तरी अनुकूलता लागते. एवढ्यांची अनुकूलता मिळाली म्हणजे इतरांवर विक्रीमंडळांत समाविष्ट होण्यास कायद्यानें सक्ति करतां येते. विक्रीमंडळ स्थापन झालें म्हणजे देशांतील कोणत्याहि लहानमोठ्या शेतकऱ्यास या मंडळाच्या देखरेखीखालींच आपल्या मालाची विक्री करावी लागते. विक्रीमंडळाचे अधिकार व कार्यपद्धति हीं सर्वत्र सारखीच नाहींत. विशिष्ट परिस्थितीप्रमाणें त्यांत फेरबदल होत असतो व अजूनहि या योजना प्रयोगावस्थेंतच आहेत असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. परंतु आजच विक्रीमंडळाचा व्याप फार मोठा आहे; आणि बाजारांतील चढाओढ व पदार्थांच्या किंमती यांचें त्यांनीं केलेलें नियंत्रण सगळीकडे दिसून येतें. उदाहरणार्थ, दूध-विक्रीची गोष्ट घ्या. सबंध ग्रेट-ब्रिटनचें मिळून एक दूध-विक्रीमंडळ स्थापण्यांत आलें आहे. दुधाची पैदास करणारे सर्व देशभरचे लोक या मंडळाचे घटक आहेत. प्रादेशिक संघटना व निवडणुकी होऊन विक्रीमंडळाचें अधिकारीमंडळ बनतें. शेतकीखात्यातर्फेंहि कांहीं प्रतिनिधि या मंडळाच्या वरिष्ठ अधिकारीमंडळावर नेमले जातात. सर्व देशभरच्या सर्व प्रकारच्या दुधाच्या किंमती विक्रीमंडळ ठरवितें. दरवर्षी हें उत्पादकांचें विक्रीमंडळ दूध-विक्रेत्यांच्या संघांशीं करारमदार करून दुधाच्या किंमतींचें तपशीलवार नियोजन करितें. निरनिराळ्या प्रादेशिक विभागांत, तसेंच निरनिराळ्या हंगामांत, मागणीपुरवठ्याच्या फरकाप्रमाणें किंमतींत कसे फेरबदल करावयाचे हें

अगाऊ ठरवितात. पिण्याकरितां विकाऊ दूध व चीज वगैरे करण्याकरितां कारखानदारांस विकण्याचें दूध यांच्या किंमतींत किती व कसा फरक ठेवावयाचा हेंहि निश्चित केलें जातें. कोणाहि उत्पादकास विक्रीमंडळाच्या बाहेर किंवा मंडळानें ठरविलेल्या किंमती सोडून विक्री करतां येत नाहीं. निरनिराळ्या प्रादेशिक विभागांत व निरनिराळ्या प्रकारें उपयोगांत आणिलेल्या दुधाच्या किंमतींत जरी फरक असला, तरी विक्रीपासून होणारा फायदा एकत्रित केला जाऊन तो कांहीं ठराविक प्रमाणांत निरनिराळ्या प्रदेशांतील उत्पादकांत वांटतात. अशा रीतीनें सर्व देशभरच्या उत्पादकांची दृढ संघटना होऊन किंमतींचें नियोजन महिनेच्या महिने आधीं केलें जातें. शेतकी व्यवहारांस सरकारी मदत विक्रीमंडळस्थापनेनेंच केवळ होतें असें नाहीं; तर कांहीं शेतकी पैदाशीच्या आयातीचें परिमाण ठरविणें आणि देशी पैदास मालबनावटींत वापरण्याबद्दल सक्ति करणें ( उदा. पिठाच्या गिरण्यांवर ) अशा प्रकारचे निर्बंधहि इंग्लंडमध्यें अंमलांत आलेले आहेत.

नियोजन शेतीसंबंधीं विशेष दिसून आलें तरी इतर क्षेत्रांतहि थोड्याबहुत प्रमाणांत तें आढळतें. कापसाच्या गिरण्या व कोळसा या धंद्यांतील अंतर्व्यवस्थेंत सरकारनें ढवळाढवळ केली असून त्यांच्या पुनर्घटनेच्या दिशेचें स्थूलस्वरूप कायद्यानें नियोजित करण्यांत आलें आहे. लोखंड-पोलादाच्या कारखान्यांना संरक्षक जकाती म्हणून मदत करतेवेळींच धंद्यांत पुनर्घटना करणें आणि सुव्यवस्था लावणें यासंबंधीं कारखानदारांकडून सरकारानें आश्वासन घेतलें व याविषयीं दिरंगाई दिसतां जकाती काढून घेण्याची धमकी देऊन घाई करण्याचा लकडा लाविला. दुसरीकडे १९३१ सालानंतर परदेशांत कर्ज देण्याची अथवा भांडवल गुंतविण्याची मनाई केली इतकेंच नव्हे, तर स्वदेशी कंपन्यांसहि भांडवल अथवा कर्ज उभारणें तें फक्त बँक ऑफ इंग्लंडच्या देखरेखीखालींच करतां येऊं लागलें. इंग्लंडमधील विजेचें सर्व उत्पादन आज कित्येक वर्षें एका सरकारी मंडळीकडूनच होत असतें. अशा नाना तऱ्हांनीं व विविध बाजूंनीं सरकारी ढवळाढवळ व तपशीलवार नियोजन याचा प्रसार झालेला दिसून येतो; आणि आज तर विशेष अवनत प्रदेशांत ( Depressed Areas ) सरकारानें याहूनहि चढाईचें धोरण स्वीकारावें याविषयीं सर्व पक्षोपपक्षांचें एकमत आहे. नवीन कारखाने येथेंच काढावयास लावावे, येथील उद्योगधंद्यांस विशेष आश्रय द्यावा, या प्रदेशांत सर्व प्रकारच्या व्यवहारविस्तारास विशेष सवलती द्याव्या, त्यांची स्थिति सुधारेल अशा प्रकारें कारखान्यांच्या

व व्यापाराच्या वाढीस वळण यावें आणि हें होण्याकरितां तपशीलवार योजना तयार करण्यास पैसा खर्च करावा अशी मागणी चोहींकडून होत आहे. सारांश, पूर्वेतिहास कांहींहि असला व आजहि कांहीं अर्थशास्त्रज्ञांची साशंक वृत्ति कायम असली, तरी नियोजनास तत्त्वतः विरोध इंग्लंडमध्यें उरला नाहीं; एवढेंच नव्हे, तर नियोजनाचें प्रत्यक्ष पाऊल कांहीं क्षेत्रांत तरी या देशांत बरेंच पुढें पडलें आहे यांत शंका नाहीं.

आर्थिक नियोजनाचें सांप्रतचें स्वरूप व क्षेत्र हीं किती विविध आहेत हें मागील वर्णनावरून कळून येईल. जसजशी परिस्थिति बदलली व उपाय-योजना सुचली, तसतसा नियोजनाच्या अनेक प्रकारांचा निरनिराळ्या राष्ट्रांनीं अवलंब केला. पूर्वविचारानें संगतवार योजना अशी कोठेंच झाली नाहीं; आणि आजचें नियोजन हें बहुतांशीं विवक्षित क्षेत्रें व व्यवहार यांपुरतेंच मर्यादित आहे.

पूर्वी दर्शविल्याप्रमाणें नियोजनाचा उगम महायुद्धोत्तर आर्थिक व राजकीय परिस्थितींतच आहे. महायुद्धोत्तर आर्थिक परिस्थिति विशेष अनिश्चित व अस्थिर होती. हळूहळू घडून येणारे फेरबदल अनिर्बंध व्यवहाराच्या काळांत फारसे त्रासदायक भासत नाहींत; आणि आर्थिक जीवन व व्यवहार-पद्धति हीं लवचिक असलीं म्हणजे मोठमोठे फेरबदल क्रमाक्रमानें व सावकाशपणें घडून आल्यास क्रांति घडून आल्याशिवाय समाज त्यांस पचवूं शकतो. महायुद्धोत्तर काळांत घडलेले फरक हे फार झपाट्यानें घडून आले. अनिर्बंध व्यवहाराखालीं दर बदलास युक्त असेल त्याप्रमाणें परिस्थितीची घडी बसत जाते हें जरी खरें असलें तरी याला नेहमीं कालावधि लागतो; आणि ज्या मानानें बदल मोठा त्या मानानें हा कालावधि अधिक असतो. व्यवहाराची घडी विस्कटल्यानंतर ती पुनः बसेपावेतों समाजांतील कांहीं कांहीं व्यक्तींस व समूहांस आपत्तींत दिवस काढावे लागतात. फरक फार मोठे झाले म्हणजे या आपत्तींचें क्षेत्र फार मोठें होतें; आणि त्यांतून लवकर मार्ग दिसेनासा झाला म्हणजे सरकारनें कांहीं तरी करावें अशी निकडीची मागणी चोंहींकडून होऊं लागते; आणि सरकारासहि या मागणीस नकार देणें जड जातें. तेजीमंदीच्या चक्राचे हेलकावे शक्य तितके कमी करण्याबद्दल प्रयत्न करणें हें एक सरकारचें कर्तव्य होय, हें मत अलीकडीलच काळांत दृढ झालें आहे. आर्थिक व्यवहाराचें नियोजन १९२९ पावेतों फार अल्पच होतें आणि नंतरच्या प्रचंड मंदीच्या काळांतच तें वाढलें, हें वर विस्तारानें दाखविलेंच आहे.

आर्थिक फेरबदलाबरोबर राजकीय परिस्थितीचें महत्त्वाहि आकळणें अवश्य आहे. आजच्या एकंदर सार्वराष्ट्रीय व्यवहारांत निरनिराळया लहान-मोठ्या सार्वभौम राष्ट्रांची एकमेकांविषयींची साशंक वृत्ति आणि स्पर्धा ठळकपणें दिसून येत आहेत. आज आर्थिक अथवा राजकीय धोरणाचें महत्त्व जगाच्या दृष्टीनें कोणीहि मापीत नसून त्यांत केवळ एकांगी राष्ट्रीय दृष्टि तेवढी असते. १९ व्या शतकांतील परिस्थिति कांहींशी निराळी होती. याचा अर्थ त्यावेळचीं प्रबल राष्ट्रें स्वार्थाकडे दुर्लक्ष करून जगाचें हित साधण्याकरितां झटत होतीं असा नव्हे. एवढेंच कीं, बलवान् राष्ट्रेंच फार थोडीं होतीं आणि तींहि सर्व युरोप व अमेरिका या दोन खंडांतच. थोड्या बलाढ्य साम्राज्यांची जगभर हुकमत चालत होती. या साम्राज्यांचा विस्तार होण्यास वाव बराच असल्यामुळें एकमेकांच्या व्यवहारांत अडथळे उत्पन्न करण्याची त्यांस विशेष आवश्यकता भासत नव्हती. यामुळें एका दृष्टीनें—म्हणजे या साम्राज्याच्या विस्ताराच्या दृष्टीनें— जगाचा व्यवहार बहुतांशीं अनिर्बंध होता. महायुद्धानंतर राष्ट्रांची संख्या वाढली इतकेंच नव्हे, तर दोनचार प्रमुख राष्ट्रांची पकड पूर्वींइतकी टिकली नाहीं; यामुळें राष्ट्रीय वृत्ति बळावून तिचे जगाच्या व्यवहारावर स्पष्ट परिणाम दिसूं लागले. म्हणजे, राष्ट्रीय भावना अलीकडे बळावल्या असा अभिप्राय नव्हे. कोणत्याहि राष्ट्रानें जगभर साम्राज्य पसरविणें हें आत्यंतिक स्वराष्ट्रीय महत्त्वाकांक्षेचेंच द्योतक होय. आजच्या व पूर्वींच्या परिस्थितींत फरक एवढाच कीं, ज्या आकांक्षा तृप्त करण्याचा प्रयत्न करणें पूर्वी फार थोडयांस साधत होतें, तें आज अल्पांशानें तरी अनेकांस शक्य झालें आहे. राष्ट्राराष्ट्रांतील बलाबलाचा कांहींसा स्थिरावलेला कांटा महायुद्धानंतर हेलकावे खाऊं लागला व तो अद्यापि समतोल स्थितीप्रत पावलेला नाहीं. तो अद्यापि हेलकावत असून राजकीय परिस्थिति अत्यंत नाजूक बनलेली आहे. असें असल्यामुळें पूर्वीपेक्षांहि आपापल्या राष्ट्राचें केवळ लढाऊ सामर्थ्य वाढविण्याकरितां प्रत्येक राष्ट्राचे प्रयत्न चालूं आहेत. महायुद्धांतील अनुभवावरून परराष्ट्रीय व्यापारावर अवलंबून राहणें फार धोक्याचें आहे हें सर्व देशांस कळून चुकलें; आणि राष्ट्रीय स्वावलंबनाचें आर्थिक धोरण जिकडे तिकडे स्वीकारण्यांत आलें. अर्थात् राष्ट्राला स्वावलंबी बनवावयाचें असल्यास त्याला सरकारी नियोजनाशिवाय गत्यंतर नाहीं. याप्रमाणें आर्थिक व्यवहाराच्या नियोजनाच्या मुळाशीं राजकीय व आर्थिक परिस्थिती आहे हें कळून येईल. त्यांतल्यात्यांत राजकीय परिस्थि-

तींचा व नियोजनाचा अतिशय निकट संबंध आहे. जगांत जोंपावेंतो अशांततेचें वातावरण प्रसृत आहे, तोंपावेतों खुला व्यापार व अनिर्बंध व्यवहार यांची कांस धरणें राष्ट्रीय सरकारांस शक्य नाहीं. प्रत्येक राष्ट्र आपल्यापुरतें पाहणार आणि सार्वराष्ट्रीय श्रमविभागाकडे दुर्लक्ष करून आपल्यापुरतें आर्थिक व्यवहारांचें नियोजन करणार.

आर्थिक तेजीमंदीच्या चक्राचें निवारण, बेकारीस मदत इत्यादि गोष्टी जोंपावेतों सरकारांचें आवश्यक कर्तव्य मानिल्या जातात आणि जोंपावेतों राष्ट्रीय स्वावलंबन हें बहुतांशीं प्रत्येक राष्ट्राचें ध्येय बनून राहिलें आहे, तोंपावेतों आर्थिक नियोजनाचा भावी काळांत संकोच न होतां विस्तारच होत जाणार हें अगदीं उघड आहे. नियोजनाच्या क्षेत्राचा विस्तारच होत जाणार असें मानण्याचें दुसरें महत्त्वाचें कारण म्हणजे, एका क्षेत्रांत नियोजनास आरंभ केला असतां त्याचें उद्दिष्ट पुरें पाडण्याकरितां आजूबाजूच्या क्षेत्रांतहि नियोजन अवलंबावें लागतें असा अनुभव आहे हें होय. या प्रवृत्तीचीं कांहीं मोठीं गमतीदार उदाहरणें देण्यासारखीं आहेत. उदाहरणार्थ, जर्मनींत दूध व तज्जन्य पदार्थांच्या पुरवठ्यावर कडक नियंत्रण घालणें भाग आहे. कारण, विशेषतः लोण्याचा तुटवडा त्या देशांत फार भासतो. प्रथम दूध, लोणी इत्यादींचा पुरवठा-मागणी पाहून त्यांच्या उत्पादनाचें व किंमतींचें नियोजन-नियंत्रण करण्यांत आलें. लोण्याची किंमत फार जबर ठेवावी लागली. यामुळें लोण्याचा खप मर्यादित झाला. परंतु इतर बाबतींत फार अनपेक्षित प्रकार घडून आला. तो असा कीं, अंड्यांची मागणी अतिशय वाढली व नियोजित किंमतीस अंडीं मिळेनाशीं होऊन त्यांच्या पुरवठ्यावर फार ताण पडला. कारण, लोणी खाण्यास न मिळाल्यामुळें त्याच्याऐवजीं कांहींतरी हवें म्हणून त्या मानानें स्वस्त मिळणारीं अंडीं लोक बऱ्याच अधिक प्रमाणांत विकत घेऊं लागले, म्हणून पुढील वर्षीं लोण्याच्या किंमतीच्या कडक नियंत्रणाबरोबर अंड्यांच्या किंमतींचें नियंत्रणहि विशेष प्रमाणांत करणें सरकारास भाग पडलें. रूझवेल्ट यांच्या प्रयत्नांत अशाच रीतीनें पूर्वापेक्षेच्या पलीकडे नियोजनाचें क्षेत्र—विशेषतः उद्योगधंद्यांच्या बाबतींत—वाढत गेलें, असा अनुभव आहे.

नियोजन हें एक केवळ साधन आहे. याचा सर्वच राष्ट्रें आपापल्या तऱ्हेनें आपापलीं उद्दिष्टें साधण्याकरिता उपयोग करीत असतात. साम्यवादी, समाजवादी, राष्ट्रवादी असे अनेक निरनिराळे मतानुयायी नियोजनाची कांस

धरितात. समाजाची घटना बदलावयाची असली, एखादें मोठें सामाजिक किंवा आर्थिक स्थित्यंतर बळेंच घडवून आणावयाचें असलें म्हणजे आर्थिक व्यवहाराच्या नियोजनाची आवश्यकता भासते. परराष्ट्रांशीं खुलें दळणवळण असलें म्हणजे आर्थिक परिस्थितीवर होणारे या दळणवळणाचे परिणाम टाळतां येत नाहींत; आणि हे परिणाम अमुक एका प्रकारचेच होतील अथवा असतील याबद्दल खात्री सांगतां येत नाहीं. राष्ट्रीय उन्नतीकरितां अमुक एका प्रकारची परिस्थिति उत्पन्न होणें आवश्यक आहे असें वाटणाऱ्या सर्व सरकारांस परराष्ट्रांशीं असलेला संबंध शक्य तितका कमी करण्याचें धोरण स्वीकारावें लागतें. बोल्शेव्हिकांचें धोरण निदान प्रथमारंभीं तरी जगव्यापी होतें; तथापि रशियापुरती सामाजिक व आर्थिक क्रांति घडवून आणण्याकरितां त्यास जगाशीं आपला संबंध बहुतांशीं तोडावा लागला. जर्मनी–इटलींना स्वावलंबी व्हावयाचें म्हणून आर्थिक नियोजनाच्या एकामागून एक अनेक पायऱ्या चढाव्या लागल्या. इतकेंच काय, पण श्री. केन्ससारख्या अर्थशास्त्रज्ञासहि व्याजाच्या कमी दराचें महत्त्व इंग्लंडपुरतें फार वाटूं लागल्यामुळें, राष्ट्रीय स्वयंपूर्णतेचें समर्थन करून नवीन भांडवल गुंतविण्यावर नियंत्रणें घालून तें नियोजित करावें, असा आग्रहाचा सल्ला देणें योग्य वाटलें. सारांश, ज्याला ज्याला आर्थिक व्यवहारास प्रचलित प्रवृत्तीहून भिन्न असें विशेष वळण लावणें हिताचें वाटतें त्याला त्याला नियोजनाचा मार्ग पसंत पडतो.

तसेंच राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहाराचा संकोच कोणत्या ना कोणत्या कारणानें होऊं लागला म्हणजे स्वावलंबनाचा मार्ग सर्वच राष्ट्रांत स्वीकारावा लागतो. परराष्ट्रीय व्यवहाराच्या मार्गांत एकदा अडथळे उत्पन्न होऊं लागले म्हणजे त्यांचा परिणाम सगळीकडे कसा दिसूं लागतो व त्यांचें स्वरूप क्रमशः अधिकाधिक विविध व व्यापक कसे होत जातें याचा उहापोह मागें एका लेखांत आम्हीं केलाच आहे. या ठिकाणीं लक्षांत घेण्यासारखी गोष्ट एवढीच कीं अनिर्बंध व्यवहाचा अंमल चालूं राहण्यास बहुतांशीं सर्व प्रमुख राष्ट्रांचें सहकार्य लागतें; हें सहकार्य मिळत नसल्यास इतर राष्ट्रांचा प्रतिकार करण्याच्या बुद्धीनें तरी प्रत्येकासच निर्बंध घालण्याचा मार्ग स्वीकारावा लागतो; निर्बंध बरेच झाले म्हणजे पुढची पायरी म्हणून नियोजन ओघानेंच येतें.

या अनेक गोष्टींचा विचार केला म्हणजे सर्व आर्थिक व्यवहार पुनः अनिर्बंध होणें निदान इतक्यांत तरी संभवनीय वाटत नाहीं. अनिर्बंध व्यव-

हाराचें तत्त्वज्ञान रुजण्यास योग्य भूमिका—परिस्थितीची अथवा विचाराची— आज उरलेली नाहीं. या तत्त्वज्ञानाचा निर्भेळ पुरस्कार करणारा प्रो. रॉबिन्स-सारखा एखादाच आग्रही अर्थशास्त्रज्ञ आज आढळतो. इतर सर्वांनीं या भूमिकेचा त्याग करून निर्बंध, नियंत्रण व नियोजन यांची कमीअधिक प्रमाणांत आवश्यकता प्रतिपादिली आहे.

आतां नियोजनाच्या मार्गांतील प्रमुख अडचणींचा विचार करून ही लेखमाला संपवितों. सकृद्दर्शनीं एकदां नियोजनाचा स्वीकार केला म्हणजे, हळूहळू त्याचें क्षेत्र वाढून लवकरच पूर्ण नियुक्त व्यवहारापर्यंत पाळी येण्यास कांहींच हरकत नसावी असें वाटतें. खुला व्यवहार म्हणजे अनिर्बंध, अनियोजित, यदृच्छेनें घडून येणारा व त्याअर्थीं अव्यवस्थित; उलट, नियोजित व्यवहार हा पूर्ण पूर्वविचारान्ती ठरविला गेला असल्यामुळें व्यवस्थित व इष्ट; असा युक्तिवाद बऱ्याच वेळां करण्यांत येतो. परंतु हा प्रश्न इतका सरळ नाहीं. अनिर्बंध व्यवहारहि कांहीं मर्यादित कक्षेंत व ठराविक सांच्यांत चालतो आणि त्यांत बाजारभावाच्या मुख्य सूत्रामुळें व्यवहारास एकप्रकारचें वळण सारखें लागत असतें. उलट नियोजन करणें फार गुंतागुंतीचें व भानगडीचें असतें. तेव्हां नियोजनाचें श्रेष्ठत्व वाटतें तितक्या चटकन् प्रस्थापित करणें शक्य नाहीं. अनिर्बंध व्यवहाराच्या गुणदोषांचा विचार येथें करावयाचा नसून केवळ नियोजनाच्या मार्गांतील अडचणी पाहावयाच्या आहेत. या अडचणी अनेक प्रकारच्या आहेत. नियोजन करावयाचें म्हणजे नियोजनाचें उद्दि॰ ठरविणें व तें ज्या मार्गांनीं साध्य होईल ते मार्ग निश्चित करणें होय. मागें सांगितल्याप्रमाणें महायुद्धासारख्या काळांत उद्दिष्ट ठरविणें सोपें असतें. युद्ध जिंकण्याचा प्रयत्न करणें ही एकच गोष्ट त्यावेळेस डोळ्यांपुढें असते. इतर काळांत नियोजनाचें उद्दिष्ट इतक्या सोप्या रीतीनें मांडतां येत नाहीं. राष्ट्रीय स्वावलंबन, राष्ट्रीय संपत्ति वाढविणें, भांडवलवाल्यांचें वर्चस्व कमी करून आर्थिक विषमता कमी करणें, असलीं अनेक उद्दिष्टें नियोजन अवलंबिणाऱ्या सरकारापुढें असतात; पण उद्दिष्ट साधतांना कोणत्या साधनांची निवड करावी आणि उद्दिष्टें व साधनें भिन्न असतां त्यांचा एकमेकांशीं मेळ कसा बसवावा, हे प्रश्न सोडविणें फार बिकट आहे.

आर्थिक व्यवहारांचे परस्पर संबंध फार गुंतागुंतीचे असल्यामुळें कोणत्याहि नियोजनाचा परिणाम सर्व बाजूंनीं काय होईल हें ठरविणें फार कठीण असतें. कारण, अनेक गोष्टींचा पूर्वानुभव कांहीं नसल्यामुळें बऱ्याच काळां-

तरानें अमुक केल असतां काय होईल याचें अनुमान करतां येतें. विस्तारभयास्तव या मुद्याचा उदाहरणें देऊन विचार करतां येत नाहीं. परंतु शेतकऱ्यास कर्जमुक्त कसें करावें यासंबधीं हिंदुस्थानांत निरनिराळ्या कल्पनांनीं करण्यांत आलेले कायदे व त्यांचे प्रत्यक्ष व्यवहारांत झालेले परिणाम अशा एखाद्याच अनुभवाचा जरी विचार केला, तरी या मुद्याचें महत्त्व लक्षांत येईल. ऋणविषयक कायद्यापेक्षांहि नियोजनाचा व्याप व बारकावा अधिक आणि त्यानें साधावयाच्या गोष्टीहि अनेक; तेव्हां नियोजनाच्या अनेकविध प्रकारांचा परिणाम परस्परविरोधी होणार नाहीं अथवा साध्य तेवढेंच ते साधतील याची खात्री बाळगणें नेहमींच कठीण असणार.

नियोजनाविषयीं लक्षांत घेण्याचा दुसरा मुद्दा म्हणजे, तें घडविण्याकरितां लागणाऱ्या व्यवस्थेसंबंधींचा होय. नियोजन करावयाचें म्हटलें म्हणजे सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांविषयीं इत्थंभूत माहिती अगदीं बारकाव्यानें गोळा करणें कसें आवश्यक आहे हें वर दर्शविलेंच आहे. ही माहिती सतत गोळा करून तिचें क्रमाक्रमानें संकलन करावयाचें व मागील प्रत्यक्ष संकलित अनुभव व पुढील अनुमान यांचा विचार करून नियोजनाचा आराखडा तयार करावयाचा. हा आराखडा तयार झाल्यावर त्यास तपशीलवार स्वरूप देऊन त्याची गटवार विभागणी करून देणें हें दुसरें काम होतें. या पद्धतीनें कोणतीहि राष्ट्रीय योजना सिद्ध झाल्यावरहि तिची अंमलबजावणी करण्याचें काम उरतेंच. या कामाकरितां स्वतंत्र सरकारी खातीं निर्माण करून सरकारी अंमलदार व तपासनीस नेमणें आवश्यक होतें. म्हणजे योजना तयार करणें व ती अंमलांत आणणें या दोनहि कार्यांकरितां एक मोठी नोकरशाही निर्माण करणें आवश्यक असतें. नियोजन हें अर्थात् खर्चाचें होतें. अनिर्बंध व्यवहारांत प्रत्येकानें आपापल्याकरितां विचार व योजना केल्यानें या कार्याचा निराळा असा खर्च पडत नाहीं. नियोजन केलें असतां हा खर्च फार भारी येतो. प्रे. रूझवेल्ट यांच्या उद्योगधंद्यांचें नियंत्रण करणाऱ्या संस्था ( Code Authorities ) अथवा जर्मनींतील निरनिराळ्या आर्थिक संस्थानांच्या व्यवस्था पाहिल्या म्हणजे नियोजनाकरितां निर्माण करावीं लागणारीं खातीं किती मोठीं व किती विविध असावीं लागतात, हें स्पष्ट कळून येईल. नियोजनाची यशस्विता या नोकरशाहीच्या सचोटीवर व कार्यक्षमतेवर अवलंबून राहाणार हें उघड आहे. म्हणजे, जरी नियोजन तत्त्वतः श्रेयस्कर वाटलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत तें कितपत व कोठें आणावयाचें याचा

विचार करतांना सरकारी नोकरवर्ग—कनिष्ठ व वरिष्ठ—यांजकडून कोणत्या प्रकारच्या कामाची अपेक्षा करणें शक्य आहे याचा विचार काळजीपूर्वक झाला पाहिजे. जितकें अधिक तपशीलवार नियोजन होईल, तितका हा प्रश्न अधिक महत्त्व पावेल. रशियांतील योजना अनेक बाजूंनीं नीट पार न पडण्याचें एक कारण तेथील तें काम नोकरशाहीच्या कांहींसें आंवाक्याबाहेरचें झालें हेंहि असूं शकेल. तसेंच हीं निरनिराळीं खातीं निर्माण करून त्यांजकडून व्यवस्थितपणें काम करून घेणें आणि सर्व बाजूंनीं योग्य अंमलबजावणी व तपासणी होण्याची योजना करणें हेंहि काम सोपें नाहीं. प्रे. रूझवेल्ट यांनीं कांहीं कामापुरते संघटित नियम करण्याचे व वेळेस किंमतहि ठरविण्याचे अधिकार कारखानदारांस दिले आणि मजुरांच्या परिस्थितीसंबंधीं ते कांहीं बंधनें स्वतःवर घालून घेतील अशी त्यांनीं आशा धरली. परंतु प्रत्यक्ष आचरणांत कारखानदारांनीं सवलतीचा फायदा घेतला, पण मजुरांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केलें. या प्रकरणीं कारखानदारांच्या स्वराज्यसंस्थांत मजुरांच्या प्रतिनिधींचा समावेश कसा केला जावा आणि वैयक्तिक कारखानदारावर सर्व नियम पाळण्याची सक्ति कशी करावी यासंबंधीं अनेक अडचणी उपस्थित झाल्या व त्यांचें निराकरण नीटसें करतां आलें नाहीं. इंग्लंडमधील विक्री-मंडळांच्या व्यवस्थेविषयीं असलाच एक कूट प्रश्न आहे. हीं विक्री-मंडळें म्हणजे उत्पादक-संघच होत. यांना आपल्या मालाच्या किंमती निश्चित करण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. या किंमती ठरवितांना गिऱ्हाईक लुबाडलें न जाईल अशी व्यवस्था कशी करावी हा तो प्रश्न होय. उत्पादकांचें संघटन होतें तसें गिऱ्हाइकांचें होऊं शकत नाहीं; आणि नफातोट्यासंबंधीं उत्पादक जसा आंकडेशीर विचार करूं शकतो तसा गिऱ्हाइकांस करतां येत नाहीं.

नियोजनविरुद्ध अर्थशास्त्रज्ञांचा सर्वांत मोठा आक्षेप म्हणजे नियुक्त अवस्थेंत अर्थव्यवहारांतील किंमतींचें सुकाणूं नाहींसें होतें हा होय. खुल्या बाजारांत अनिर्बंध व्यवहार चालूं असला म्हणजे मागणी व पुरवठा यांतील फेरबदलांप्रमाणें किंमतींत चढउतार होत असतो. या चढउतारावरून गिऱ्हाइकांस खरेदी व उत्पादकांस उत्पादन यांचें नियंत्रण करतां येते. सर्व प्रकारच्या किंमती या आर्थिक परिस्थितीमधील फेरबदलाच्या सूचक होत व त्यांनीं दिलेल्या सूचनांप्रमाणें व्यवहाराचें क्षेत्र बदलत राहिलें म्हणजे आर्थिक व्यवहार हा सुसंबद्ध राहतो व सर्व साधनांचा विनियोग योग्य प्रमाणांत होतो. यासंबंधीं

कांहींसें विस्तृत विवेचन पहिल्या लेखांकांत केलेलेंच आहे. नियोजनाचे आक्षेपक असें म्हणतात कीं, जेथें उत्पादनाचें व किंमतींचें नियोजन होतें, तेथें किंमतींचें वरील अर्थाचें सूचकत्व नष्ट होतें. नियुक्त किंमत ही कांहीं खुल्या बाजारांत निरनिराळ्या उत्पादकांच्या स्पर्धेमुळें व व्यापारी आणि गिऱ्हाईक यांमधील घासाघिशीनें ठरलेली किंमत नव्हे. नियोजित किंमती या सत्ताधिकाऱ्यांनीं ठरविलेल्या किंमती. अधिकाऱ्यांची माहिती व अधिकाऱ्यांच्या कल्पना या त्या किंमतींत प्रतिबिंबित झालेल्या असतात. परंतु प्रत्यक्ष परिस्थितीचें गमक असें त्यांस मानतां येत नाहीं. पुढील वर्षीं दुधाची अथवा बटाट्यांची किंमत काय असावी हें ठरवितांना विक्रीमंडळानें जरी आगाऊ कांहीं आंकडेमोड केलेली असली, तरी या किंमती एकदां ठरल्या की निश्चित झाल्या. असें असल्यानें खुल्या बाजारांतील किंमतींच्या हेलकाव्यावरून जसें बदलत्या परिस्थितीचें अनुमान काढतां येतें, तसें नियोजित किंमतींवरून काढतां येणें मुळींच शक्य नाहीं. नियोजित किंमती व प्रत्यक्ष परिस्थिति यांचा मेळ न बसला तर पुरवठा अगदीं अपुरा पडणें अथवा मालाचा अगदींच उठाव न होणें येथपर्यंत मजल गेल्याशिवाय हा गैरमेळ लक्षांतहि येऊं शकत नाहीं. बरें, असें लक्षांत येणें हें सुद्धां नियोजनाचें क्षेत्र फार आकुंचित असलें तरच होऊं शकतें. म्हणजे, एखादाच व्यवहार नियोजित आहे व व्यवहाराशीं निकट संबंध असलेले इतर व्यवहार नियोजित नाहींत असें असलें, म्हणजे नियुक्त किंमतहि परिस्थितीस फारशी सोडून अशी ठरवितां येत नाहीं. अशाहि उत्पादक-संघास गिऱ्हाइकांतील एखाद्या वर्गावर बराच अन्याय करतां येतो. उदाहरणार्थ, इंग्लंडमधील दूध-विक्री-मंडळाचें धोरण याअर्थी बरेंच टकिाई आहे असें मत अलीकडील एका समितीनें नमूद केलें आहे. पण जसजसें नियोजनाचें क्षेत्र वाढतें, तसतशी नियोजित किंमतींचे फेरबदल वाटेल तसे करतां येण्याची शक्यताहि वाढते; आणि किंमतींच्या नियोजनाबरोबर खरेदी-विक्रीचें नियोजनहि आलें म्हणजे आर्थिक व्यवहारांतील सूत्रबद्धता अगदींच नाहींशी होते; अथवा किंमतींची सूत्रबद्धता नाहींशी होऊन सूत्रबद्धता आणणें हें केवळ नियोजक-मंडळावर अवलंबून राहतें. हा प्रश्न केवळ नियोजक मंडळास उपलब्ध असलेल्या माहितीच्या अपुरेपणासंबंधींच नाहीं. ही माहिती आज कमी असल्यास ती पुढेंमागें भरून काढणें शक्य आहे. अर्थात् कांहीं विवक्षित प्रकारची माहिती ( उदाहरणार्थ, किंमतींच्या लहान लहान फरकांमुळें गिऱ्हाइकांच्या खरेदींत होत असलेले फरक ) जमविणेंहि दुरापास्त आहे.

परंतु मुख्य मुद्दा हा कीं, नियोजक-मंडळानें जरी सर्व माहिती जमविली, तरी बाजारभावाचा मानदंड नाहींसा झाल्यावर पद्धतशीर निर्णय करणें हेंच कठीण होतें. उदाहरणार्थ, उत्पादन वाढवावयाचें तें कापडाचें, लोखंडाचें कीं फळांचें, अशा प्रकारच्या प्रश्नांचा विचार करावयाचा असल्यास पुरवठा वाढविणें कितपत कठीण किंवा सोपें आणि जास्त गिऱ्हाइकी किती, हें ठरविणें अवश्य आहे. पण हें ठरवावयाचें तर इमारती, यंत्रें, कच्चा माल, वाहतूक इत्यादि सर्व गोष्टींत तपशीलवार किंमतींची माहिती एका बाजूस व दुसऱ्या बाजूस निरनिराळ्या दर्जाच्या पदार्थांची निरनिराळ्या किंमतींस हुकमी मागणी यांविषयींची माहिती समग्र प्रथम उपलब्ध पाहिजे. पण जेथें सर्व किंमतीच नियोजक-मंडळानें नियोजिलेल्या, तेथें त्यांचा स्वतंत्र अनुमानें काढण्यास उपयोग कसा होणार ?

वरील युक्तिवादास अद्यापि नीटसें उत्तर मिळालेलें नाहीं. परंतु सर्वच प्रकारच्या नियोजनास याची वाटते तितकी अडवणूक होऊं शकत नाहीं. एक तर जेथें सर्व आर्थिक व्यवस्था पूर्णपणें नियुक्त आहे, तेथेंच वर दर्शविलेली अडचण विशेष भासते. कांहीं विवक्षित क्षेत्रापुरत्या होणाऱ्या नियोजनाविरुद्ध हा आक्षेप जोरानें घेतां येत नाहीं. आणि दुसरें म्हणजे, नियोजनाच्या अभावींहि किंमती या नेहमींच खऱ्या मागणीचें अथवा पुरवठ्याचें गमक असतात असें मुळींच नाहीं. समाजांत श्रीमंत व गरीब वर्गांत जोंपावेतों संपत्तीची अत्यंत विषम विभागणी झाली आहे, तोंपावेतों गरिबांच्या अतृप्त मागणीचा बाजारभावांवर कांहीं परिणाम होत नाहीं; तर श्रीमंतांच्या व चैनीच्या जिनसांच्या उत्पादनास उत्तेजन मिळतें. तसेंच मागें दर्शविल्याप्रमाणें अलीकडे उत्पादनाच्या अनेक क्षेत्रांत उत्पादकांची संख्या फार मर्यादित झाली आहे व या मूठभर उत्पादकांच्या संगनमतानें अनेक महत्त्वाच्या पदार्थांच्या किंमती ठरविल्या जातात. असें झालें म्हणजे, या उत्पादकांनीं ठरविलेल्या किंमती व एखाद्या विक्रीमंडळानें किंवा नियोजक मंडळानें ठरविलेल्या किंमती यांच्या सूचकत्वांत तत्त्वतः कांहींच फरक उरत नाहीं. सारांश, एकंदर राष्ट्रहित व समाजहित साधलें जात असतां खुल्या व्यवहाराचें क्षेत्र शक्य तितकें मोठें असणें हें जरी इष्ट वाटलें तरी आर्थिक व्यवहारास अथवा व्यवस्थेस अनिष्ट वळण लागलें असतां किंवा त्यास कांहीं विवक्षित मर्यादा घालणें इतर दृष्टीनें आवश्यक झाल्यास नियोजनाचा अवलंब करणें गैर ठरत नाहीं. या नियोजनाच्या मर्यादा काय असाव्या ही प्रत्येक

देशाच्या परिस्थित्यनुरूप अनुभवान्तीं ठरणारी गोष्ट आहे. गेल्या पांचसहा वर्षांतील अनुभव हा त्या मानानें अत्यल्प व एकांगी आहे. निरनिराळ्या नियोजनकार्यक्रमांत एकसूत्रता आणून तें कोठवर नेणें शक्य व अवश्य आहे, हें प्रत्येक देशांत हळूहळू ठरवावें लागेल. पूर्ण अनिर्बंध व्यवहार पुनः चालू होणें जेवढें अवश्य तेवढेंच या नियोजनांतून पूर्ण नियुक्त व्यवहार निघणें असंभाव्य वाटतें. पूर्ण नियुक्त व्यवहारांतहि आज कांहीं गोष्टींपुरता तरी बाजारभावाचा पडताळा पाहावा असा सूर वाहत आहे, तर प्रो. रॉबिन्ससारखे नियोजन-विरोधक प्रत्यक्ष सूचना करतांना खाजगी मंडळीनें ( company ) आपल्या नफ्यापैकीं किती नफा शिलकींत टाकावा यावर सरकारी नियंत्रण असावें, येथपर्यंत ढवळाढवळ ग्राह्य समजतात. आर्थिक व्यवहारांतील सरकारी नियोजन ही घटना आतां नित्याची झाली, असें समजण्यास चिंता नाहीं. कांहीं महत्त्वाच्या क्षेत्रांत कांहीं विवक्षित गोष्टींपुरतें नियोजन-नियंत्रण व इतर खुला व्यवहार ही अवस्था जरी कोणत्याच तात्त्विक भूमिकेस जुळण्यासारखी नसली, तरी ती आतां निदान कांहीं काळ सार्वत्रिक फैलावणार असें वाटतें; व नियोजन हें मूलतः इष्ट किंवा अनिष्ट असें कांहींच नसून प्रत्येक विवक्षित नियोजनाची इष्टानिष्टता ही निरनिराळी अजमावली पाहिजे, एवढाच या लेखमालेचा निष्कर्ष सांगतां येईल.

# भाग २ ( १९३९–१९५० )

## ७. अर्थसचिवांची कोलांटी उडी*

**अथ वाऽभिनिविष्टबुद्धिषु ।**

**व्रजति व्यर्थकतां सुभाषितम् ॥**

—माघ

या वर्षीच्या अंदाजपत्रकावरील आपल्या भाषणांत हिंदुस्थान सरकारचे अर्थसचिव सर जेरेमी रेसमन यांनीं 'हिंदुस्थानांत होणारी चलनाची वाढ ही चलनवृद्धीच्या ( Inflation ) स्वरूपाची नाहीं' असें सिद्ध करण्यासाठीं एक लांबलचक वक्तव्य केलें होतें तें वाचकांच्या स्मरणांत असेलच. त्या भाषणांत व गेल्या आठवड्यांत त्यांनीं सर झियाउद्दिन यांच्या चलनवाढीसंबंधाच्या ठरावाला उत्तर देतांना केलेल्या भाषणांत परस्परविरोधी विधानें असल्याचें कोणासहि दिसून येईल. मार्चमध्यें अंदाजपत्रकावर भाषण करतांना अर्थसचिवांचा मुख्य उद्देश हिंदुस्थानांत चलनवृद्धीची परिस्थिति नाहीं असें सिद्ध करण्याचा होता. गेल्या आठवड्यांतील भाषणाचा सूर अगदींच वेगळा होता. त्यावेळीं त्यांनीं असें सांगितलें कीं, चलनवृद्धीचें अस्तित्व मे महिन्याच्या सुरवातीस हिंदुस्थान सरकारास तीव्रतेनें जाणवलें. परंतु सरकारनें त्यावर कडक उपाययोजना त्यावेळींच केली व त्यामुळें चलनवृद्धीस आतां पूर्णपणें आळा बसलेला आहे. या दोन्ही वेगवेगळ्या वेळीं केलेल्या भाषणांची तुलना करून त्यांतील विधानांची गोळाबेरीज केल्यास एक गोष्ट स्पष्टपणें नजरेस येते ती अशी कीं, आपल्या आर्थिक धोरणाचे काय परिणाम होतात व ते तसे होणें आपल्या फायद्याचें आहे कीं नाहीं या गोष्टी एक तर अर्थसचिवांच्या ज्ञानकक्षेंत येत नाहींत, किंवा या लेखारंभींच्या सुभाषितांत सुचविल्याप्रमाणें त्यासंबंधीं त्यांचीं मतें, विवेचनें व निदानें इतकीं पूर्वग्रहदूषित आहेत कीं त्यांना देशांतील खऱ्या परिस्थितीची जाणीवच होत नाहीं. या

---

* ज्ञानप्रकाश, १७–१८ ऑगस्ट १९४३

दोन्हीपैकीं कुठलीहि गोष्ट याच्या मुळाशीं असो, त्यामुळें हिंदुस्थानांतील गरीब जनतेचें दुर्दैव ओढवलें आहे हें खास. कारण चलनवृद्धीमुळें अर्धपोटी राहणाऱ्या गरीब जनतेकडे अर्थसचिवांनीं आजपर्यंत डोळेझांकच केली आहे. परंतु त्याच चलनवृद्धीमुळें ज्यांची पोळी पिकली आहे, त्या धनिक–व्यापारी सट्टेबाजवर्गाशीं मात्र अर्थसचिवांपेक्षां नर्मसचिवास शोभेल असेंच वर्तन त्यांनीं आजपर्यंत केलेलें आहे.

"मार्च महिन्यांत हिंदुस्थानांत चलनवृद्धि नव्हती; मे महिन्याच्या सुरुवातीला ती एकदम प्रादुर्भूत झाली; लगेच हिंदुस्थान सरकारनें कडक उपाय योजून ती आपल्या काबूंत आणली," हीं अर्थसचिवांचीं विधानें किती तर्कदुष्ट आहेत, हें एकाद्या सामान्य बुद्धीच्या मनुष्यासहि कळण्यासारखें आहे. मार्च व मे महिन्याची सुरवात यांच्या दरम्यान जो काळ गेला त्यांत अशा कोणत्या गोष्टी नवीन–पूर्वीं नसलेल्या–घडल्या कीं ज्यांमुळें मार्च महिन्यांत ज्या चलनवृद्धीचा मागमूससुद्धां नामदार अर्थमंत्र्यांना सांपडत नव्हता, तिनें अकस्मात् प्रगट होऊन त्यांना घाबरें करून सोडावें? मार्च ते मे महिन्याच्या सुरवातीपर्यंतच्या मध्यंतरांत चलनविस्तार पूर्वीपेक्षां भरमसाट प्रमाणांत वाढला कीं काय? त्याचप्रमाणें पदार्थांच्या किंमतीहि पूर्वीपेक्षां अधिक भरमसाट प्रमाणांत याच दोन महिन्यांत वाढूं लागल्या कीं काय? चलनाऐवजीं वस्तू सांठविण्याची जनतेची प्रवृत्ति या दरम्यानच्या काळांत द्विगुणित वा शतगुणित झाली कीं काय? असे कित्येक प्रश्न अर्थसचिवांच्या वरील विवेचनावरून सुचतात. त्यांच्यासंबंधीं सरकारी अहवालांतून प्रसिद्ध झालेल्या आंकड्यांच्या आधारानें आणखी विचार करणें आवश्यक आहे.

चलनविस्तार हीच गोष्ट प्रथम घेऊं. युद्धाच्या सुरवातीस हिंदुस्थानांत एकंदर चलन १७९ कोटी रुपयांचें होतें. १९४२ च्या नोव्हेंबर महिन्यांत तें ५५१ कोटी रुपयांपर्यंत वाढलें होतें. १९४३ च्या मार्च महिन्याच्या शेवटीं तें ६५५ कोटी रुपये होतें. व १३ ऑगस्ट १९४३ रोजीं तें ७६० कोटी रुपयांपर्यंत वाढलेलें आढळेल. मार्चपूर्वीच्या चार महिन्यांत चलन १०४ कोटी रुपयांनीं वाढलें व मार्चनंतरच्या चार महिन्यांत तें १०५ कोटींनीं वाढलें असें या आंकड्यांवरून दिसून येईल. चलनवाढ कमी होऊन चलनवृद्धीस आळा मे नंतर बसला, असें अर्थसचिवांना हे आंकडे पाहातां म्हणतां येईल असें वाटत नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे पदार्थांच्या किंमतींत झालेली वाढ.

हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक सल्लागारांनीं प्रसिद्धिलेला घाऊक किंमतींचा सूचकांक लढाईचे सुरवातीस १०० होता. तो १९४२ च्या शेवटच्या तिमाहींत २१८ पर्यंत वाढला व १९४३ च्या पहिल्या तिमाहीच्या शेवटीं २५८ वर गेला. तेथून तो जूनपर्यंत दर महिन्याला चढत गेला व जुलै महिन्यांत त्याच पातळीवर चढता स्थिर झाला. १९४१ च्या दुसऱ्या तिमाहीपासून १९४३ च्या जूनपर्यंत किंमती एकसारख्या वाढत असतां, फक्त जुलैमध्यें किंमतींचा सूचकांक स्थिर राहिला याबद्दल हिंदुस्थान सरकार जर स्वतःची पाठ थोपटून घेऊन म्हणत असेल कीं, " पहा ! आम्ही चलनवृद्धीला पायबंद घातला कीं नाहीं ? " तर त्यांच्या शहाणपणाची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे.

आज हातीं असलेल्या आंकड्यांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास असें स्पष्ट दिसून येतें कीं, चलनवाढ, किंमतवाढ वगैरे वर उल्लेखिलेल्या प्रवृत्ति गेलीं दोन वर्षें सतत दृग्गोचर होत आहेत. १९४२ च्या ऑक्टोबरपासून त्या विशेष जोरास लागल्या व त्यांनीं चलनवृद्धीची द्वाही फिरविली. या प्रवृत्ति १९४३ च्या एप्रिल महिन्यांत एकदम फोफावल्या व त्यांनीं चलनवृद्धीचें उग्र स्वरूप तेव्हांच धारण केलें असें म्हणण्यास कोणताहि बळकट पुरावा नाहीं. या सर्वांहूनहि महत्त्वाची दुसरी गोष्ट अशी कीं या प्रवृत्तींना अजूनहि प्रभावी आळा बसलेला नाहीं. याच्या उलट समजूत करून घेणें म्हणजे स्वतःची फसवणूक करून घेणें किंवा स्वतःचें अज्ञान प्रगट करणेंच होय. मे महिन्याच्या सुरुवातीस चलनवृद्धि एकदम प्रादुर्भूत होऊन लुप्त झाली अशी खरी वस्तुस्थिति नसून १९४२ च्या द्वितीयार्धापासूनच तिनें हिंदुस्थानांत थैमान घालण्यास सुरवात केली, अशी कटु परिस्थिति आहे. ही चलनवृद्धीची परिस्थिति सध्यां बदललेली आहे असें म्हणण्यास कोणताहि आधार नाहीं, हें येथें स्पष्ट सांगणें आवश्यक आहे. हिंदुस्थान सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं चलनवृद्धीच्या आगमन-प्रत्यागमनाची जी 'अरबी भाषेतील सुप्रसिद्ध आणि चमत्कारिक गोष्ट' सांगितली, ती त्यांच्या जागृत मनाची खास निदर्शक नाहीं; तो एक दृष्टिभ्रमाचाच प्रकार म्हणावा लागेल.

२

कालच्या लेखांत निदर्शिल्याप्रमाणें जी चलनवृद्धि हिंदुस्थान सरकारास मे महिन्याचे सुरवातीस जाणवली व ज्या उपायेंकरून हिंदुस्थान सरकारनें ती

आटोक्यांत आणून तिला पायबंद घातला असें नामदार रेसमन फुशारकीनें सांगतात, ते उपाय तरी कोणते याचा थोडा विचार करूं !

चलनवृद्धीवर हिंदुस्थान सरकारनें जे उपाय योजले त्यामुळें चलन-विस्तारास प्रतिबंध झालेला नाहीं, हें कालच्या लेखांत दिलेल्या आंकड्यांवरून सिद्धच आहे. किंबहुना 'चलनवृद्धीस काबूंत आणण्यास अशा तऱ्हेचा प्रतिबंध आवश्यकच आहे असें नाहीं' असेंच अर्थसचिवांचें मत दिसतें. यासंबंधीं त्यांनीं केलेल्या विवेचनावरून त्यांच्या अर्थशास्त्राच्या ज्ञानावर मात्र विदारक प्रकाश पडतो. चलनविस्ताराच्या अप्रतिबंध धोरणाचें समर्थन करतांना नामदार रेसमन यांनीं सांगितलें कीं, "हिंदुस्थानांतील सध्यांचें चलन ७५० कोटी रुपयांपर्यंत वाढलें आहे या गोष्टीचा बाऊ करण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानच्या विस्तीर्णतेचा व त्यांतील लोकसंख्येचा विचार करतां ७५० कोटीच काय, परंतु १,००० कोटी रुपयांचें चलनसुद्धां त्या मानानें फाजील आहे, असें म्हणतां येणार नाहीं. शिवाय चलनाच्या विस्तारामुळें आपोआप किंमती वाढतात ही भीति निराधार आहे, असें हिंदुस्थान सरकारनें त्यासंबंधीं कडक उपाय योजून दाखवून दिलेलें आहे."

वरील वक्तव्यासंबंधीं दोन प्रश्न उद्भवतात. पहिला, चलनविस्ताराचें जें समर्थन अर्थसचिवांनीं केलें तें कितपत बरोबर आहे ? व दुसरा, चलनविस्तार व किंमतींची वाढ यांच्यामधील नैसर्गिक व अन्योन्य संबंध तोडण्याइतकीं हिंदुस्थान सरकारचीं आर्थिक नियोजनें प्रभावी आहेत काय ? या दोन्ही प्रश्नांसंबंधीं अनुक्रमें विचार करूं.

युद्धाच्या सुरवातीस हिंदुस्थानांतील चलन १७६ कोटी रुपये किंवा हलींच्या चलनाच्या एक चतुर्थांश होतें. त्यावेळीं हिंदुस्थानच्या विस्तीर्णतेच्या व लोकसंख्येच्या मानानें सर्व आर्थिक व्यवहार योग्य रीतीनें पार पाडावयास तेवढें चलन पुरेसें होतें हें खासच. युद्ध सुरू झाल्यामुळें लोकांची नाणीं किंवा मोड जवळ बाळगण्याची वृत्ति बळावली व त्यामुळें त्यांना जास्त चलनाची आवश्यकता वाटूं लागली. त्यामुळें युद्धाच्या प्रारंभीं झाला तो चलनविस्तार या मागणीस अनुलक्षूनच झाला. परंतु त्यानंतर लोकांची चलन जवळ बाळगण्याची वृत्ति आरंभीं जेवढी वाढली होती, तेवढीच राहिली व चलनविस्तार मात्र चालूच राहिला. युद्धजन्य परिस्थितीमुळें हिंदुस्थानांत जादा चलनाची आवश्यकता उत्पन्न झाली आहे ही गोष्ट कबूल. परंतु किती झाली आहे याला कांहीं

मर्यादाहि आहेच. ती दुप्पट होईल, फार तर तिप्पट होईल; परंतु सारखीच अशी वाढत राहील हें सुतराम् अशक्य आहे. मात्र ती तशी वाढत आहे अशी सोईची समजूत अर्थसचिवांनीं करून घेतली आहे. विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांतील हिंदुस्थान सरकारच्या चलनविस्ताराच्या धोरणासंबंधीं लिहितांना लॉर्ड केन्स या सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञानें असें म्हटलें होतें कीं "हिंदुस्थान सरकार ज्या वेगानें चलनविस्तार करीत आहे त्यावरून लोकांची चलनाची मागणी बीअर ( Beer ) च्या मागणीसारखीच सदोदित वाढणारी असते अशी त्यांची समजूत झालेली दिसते. जणूंकांहीं चलन म्हणजे एखादा खाद्यपदार्थच आहे." ही समजूत निखालस चूक आहे हें सांगावयास नकोच. लॉर्ड केन्स यांनीं हें लिहिल्याला आज ३० पेक्षां जास्त वर्षें झालीं, परंतु अजूनहि हिंदुस्थान सरकारास अर्थशास्त्रांतील या साध्या तत्त्वाचेंहि आकलन होऊं नये ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

वास्तविक पहातां ब्रिटिश व दोस्तराष्ट्रें यांच्यासाठीं १९४० च्या द्वितीयार्धात हिंदुस्थानांत कच्च्या मालाच्या खरेद्या सुरू झाल्यापासून चलनविस्तार व जनतेची त्यासंबंधींची मागणी यांचा संबंध संपूर्णपणें तुटलेला आहे. दोस्त राष्ट्रांच्या खरेद्यांसाठीं जे स्टर्लिंग हिंदुस्थानला दिले जातात, त्यांच्या तारणावर येथील चलनविस्तार चालू आहे. हिंदुस्थानांतील चलनविस्तार दोस्तांच्या येथें होणाऱ्या खरेद्यांशीं निगडित आहे. त्याचा जनतेच्या मागणीशीं कांहींहि संबंध नाहीं. चलनवाढ करून जो माल हिंदुस्थान सरकार या देशांत खरेदी करतें व दोस्त राष्ट्रांना देतें त्यामुळें हिंदुस्थानांतील जनतेस मिळणाऱ्या मालाचा पुरवठा कमी होतो. दोस्त राष्ट्रांच्या या खरेद्यांसाठीं जी चलनवाढ होते तिजमुळें हिंदी जनतेच्या तोंडचा घास वाढत्या प्रमाणांत तोडला जातो. या गोष्टीची जाणीव तर राहोच पण याची बातमीहि नामदार अर्थमंत्र्यांना नसावी असें त्यांच्या एकंदर वक्तव्यावरून वाटतें.

दुसरा प्रश्न चलनवाढ व किंमतींची वाढ यांचा अन्योन्य संबंध तोडण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें जे उपाय योजिले आहेत ते कितपत यशस्वी वा प्रभावी झाले आहेत हा होय. या दृष्टीनें सरकारनें मे महिन्यापासून अंमलांत आणलेले उपाय म्हणजे जादा नफ्यावरील कराची वाढ, कापडनियंत्रण, सोनें, रुपें, व धान्य यांच्या तारणावर कर्ज देण्याची बंदी, सोनें व रुपें यांच्या वायद्याच्या व्यवहारावरील नियंत्रण इत्यादि. चलनवृद्धीला ( Inflation ) आळा घालण्याच्या दृष्टीनें यापैकीं पहिले दोनच उपाय विशेष महत्त्वाचे समजले

पाहिजेत. बाकीचे सर्व दुय्यम प्रकारचेच उपाय होत. जादा फायद्यावरील करासंबंधींचा वटहुकूम व कापडनियंत्रण हे उपाय म्हणजे हिंदुस्थान सरकारनें योग्य दिशेनें टाकलेलीं पावलें होत, यांत मुळींच शंका नाहीं. परंतु या दोनच नियंत्रणाच्या योजनांमुळें चलनवृद्धीला प्रभावी व कायमचा आळा बसेल, असें कोणत्याही सुज्ञ व विचारी मनुष्यास पटणार नाहीं. चलनाच्या वाढीची परिणति चढत्या बाजारभावांत होऊं नये यासाठीं सर्वव्यापी भावनियंत्रण व सर्व पदार्थांचें नियंत्रित वांटप हाच रामबाण व एकमेव उपाय होय. परंतु हीं दोन्हीं प्रकारचीं नियंत्रणें अंमलांत येऊन सुद्धां चलनाची वाढ सारखी होतच राहिली, तर तीं नियंत्रणें यशस्वी न होतां कुचकामाचीं ठरतात, हा या व गेल्या महायुद्धांतील कित्येक देशांचा अनुभव आहे. हिंदुस्थानांत सर्वव्यापी भावनियंत्रण व वांटप सरकारनें अंमलांत आणलेलें नाहीं व चलनाची वाढ, अप्रतिहत गतीनें चालू आहे. धान्यपरिस्थिति कोणत्या टोंकाला गेली आहे याची सर्वांना कल्पना आहेच. अशा परिस्थितींत "वाढत्या चलनाची व चढत्या बाजारभावांची गट्टी तोडण्यास हिंदुस्थान सरकार समर्थ आहे" अशा प्रकारचीं अर्थसचिवांनीं केलेलीं विधानें 'पोकळ फुशारकी' याच सदरांत पडतात. याच मुद्यावर लंडन येथील अिकॉनॉमिस्ट पत्रानें हिंदुस्थान सरकारास नुकताच आहेर केला आहे. सोनें, रुपें वगैरेंचे तारणावर कर्ज देण्याची बंदी करणाऱ्या व वायद्याचे व्यवहार करण्यास बंदी करणाऱ्या हिंदुस्थान सरकारच्या वटहुकुमावर टीका करतांना या पत्रानें म्हटलें आहे कीं, "हीं व अशा प्रकारचीं नियंत्रणें हिंदुस्थान सरकार प्रत्यहीं वाढवीत आहे. परंतु या सर्वांचें मूळ कारण जी चलनाची वाढ, त्यासंबंधीं मात्र कांहींहि करत नाहीं; ती चालूच आहे. त्यामुळें कॅन्यूट राजाप्रमाणें हिंदुस्थान सरकार चलनवाढीच्या भरतीला अशीं तकलादी नियंत्रणें घालून मागें हटण्याबद्दल हुकूम करीत आहे! कॅन्यूटच्या हुकूमाप्रमाणेंच त्यांचाहि हुकूम अवमानिला जाईल, याबद्दल आम्हांस मुळींच शंका नाहीं."

गेल्या आठवड्यांत केलेल्या भाषणांत अर्थसचिवांनीं जी कोलांटी उडी मारली, त्यावरून असें दिसतें कीं, त्यांचीं आर्थिक विवेचनें, निदानें व वक्तव्यें हीं मूलगामी व खऱ्या परिस्थितीस अनुलक्षून केलेलीं नसतात. तीं अशा तऱ्हेचीं असतीं, तर मार्च महिन्यांत ज्या चलनवृद्धीचा अभाव ते आवेशानें प्रतिपादीत होते तेंच स्वतःचें प्रतिपादन मेमध्यें आपलें आपणच गिळून टाकण्याची त्यांच्यावर पाळी आली नसती. त्यांच्या वेळोवेळच्या

भाषणांतील ताळमेळ पाहूं जातां असें वाटतें कीं, कदाचित आणखी दोन महिन्यांनीं लुप्त झालेली चलनवृद्धि पुन्हां त्यांच्या 'परित्राणासाठीं' अवतार घ्यावयाची व अर्थसचिव पुन्हां त्यावर वक्तव्य करूं लागावयाचे; परंतु या त्यांच्या वागणुकीनें सामान्य जनतेचा फार बुद्धिभेद होतो. 'न बुद्धिभेदं जनयेत्' हें तत्त्व लोकशाहीचे पुरस्कर्ते म्हणविणाऱ्या राज्यकर्त्यांनीं व विशेषत: अर्थसचिवांनीं अगदीं कटाक्षानें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. जनतेच्या सक्रिय सहानुभूतीचा जो संपूर्ण अभाव हिंदुस्थान सरकारास आज सर्वच क्षेत्रांत भासत आहे, तो जनतेचा वारंवार बुद्धिभेद करण्याच्या या धोरणामुळें कमी न होतां वृद्धिंगतच होईल असें म्हटलें पाहिजे.

---

# ८ हिंदुस्थानांतील धान्यपरिस्थिति*

या देशांतील धान्यपरिस्थिति गेल्या वर्षापासून बरीच चिंताजनक झाली आहे. बंगालमध्यें थोड्याच महिन्यांपूर्वी उत्पन्न झालेली भीषण परिस्थिति व तशा प्रकारची परिस्थिति पुन्हां उत्पन्न होण्याची अलिकडे व्यक्त करण्यांत येणारी भीति यांमुळें या प्रश्नावर जनतेचें लक्ष केंद्रित झालें आहे. आधींच अर्धपोटी राहणाऱ्या हिंदी जनतेवर युद्धजन्य महागाईमुळें खडतर प्रसंग आलेला आहे; त्यांतूनच निर्माण झालेल्या ह्या धान्याच्या कृत्रिम दुष्काळापायीं तिला भुकेनें मरण्यापलीकडे गत्यंतर उरलेलें नाहीं. परंतु ही परिस्थिति अशीच बिघडूं देतां उपयोगी नाहीं हें उघड आहे; त्यावर योग्य उपाययोजना त्वरित होणें आवश्य आहे.

या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीं तीन लेख लिहिण्याचें योजिलें आहे. पहिल्या लेखांत हिंदुस्थान सरकारनें या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या ग्रेगरी समितीच्या अहवालाचा थोडक्यांत सारांश दिलेला आहे. या लेखांतील सर्व विधानें अर्थातच या अहवालांतीलच आहेत. त्यांतील सत्यांश, निदानें व शिफारशी यांचें परीक्षण, त्यांची अपूर्णता व योग्य धोरण यांसंबंधींची चर्चा दुसऱ्या व तिसऱ्या लेखांत येईल.

समितीच्या मतें हिंदुस्थानांतील धान्यपरिस्थिति विकट होण्याचीं कारणें धान्याचा पुरवठा व धान्याची मागणी या दोहोंशीं निगडित आहेत. १९४२ सालाचे शेवटीं व १९४३ सालीं धान्यपुरवठ्यावर दोन गोष्टींमुळें विशेष परिणाम झाला. (१) ब्रह्मदेशांतून दर वर्षी आयात होणारा तांदूळ बंद झाल्यामुळें त्यावर बव्हंशीं गुजराण करणाऱ्या मुंबई व मलबार या सामान्यतः नेहमींच्याच तुटीच्या प्रदेशांतून धान्याचा पुरवठा फारच कमी झाला. (२) ऑक्टोबर १९४२ मधील भीषण वादळामुळें व पश्चिम बंगाल्यांतील हिंवाळी आमण तांदुळाच्या पिकावर रोग पडल्यामुळें बंगालसारख्या सामान्यतः जादा धान्य उत्पन्न होणाऱ्या प्रदेशांतील धान्याचें उत्पादन घटलें व त्यामुळें पुरवठा कमी झाला. परंतु याच काळांत मागणी मात्र जास्त वाढली. त्याचीं कारणें खालीलप्रमाणें:—(१) बंगाल प्रांतांतील तांदुळाचें

---

* ज्ञानप्रकाश—२५, २९ फेब्रुवारी, १९४४

पीक रोगानें नाहींसें झाल्यामुळें व पूर्व आघाडीवरील रणक्षेत्राच्या सान्निध्यामुळें, बंगाली जनता धान्याच्या उपलब्धतेबद्दल साशंक झाली व मिळेल त्या किंमतीनें धान्य घेऊन तें सांठवून ठेवण्यास उद्युक्त झाली. त्यामुळें मागणी वाढली. ( २ ) सामान्यतः हिंदुस्थानांत धान्य खेड्यांतूनच शहरांत येतें. खेडयांतील गरज भागून उरणारें धान्यच शहरांत येतें हें उघड आहे. वर उल्लेखिलेल्या काळांत अशा धान्याचा सांठा दोन प्रकारें कमी झाला. एक तर एकसारख्या चढणाऱ्या धान्यांच्या किमतींमुळें शेतकरी जास्त भाव येईल या आशेनें स्वतःजवळचें धान्य न विकतां तें सांठवून ठेवूं लागला. दुसरें म्हणजे नेहमींपेक्षां कमी धान्य जादा किंमतीला विकून शेतकऱ्याला आपल्या दैनंदिन गरजा भागवितां येऊं लागल्यामुळें तो नेहमींपेक्षां जास्त धान्य खाऊं लागला. जागतिक मंदीच्या दिवसांत धान्याच्या किंमती कमालीच्या उतरल्यामुळें शेतकऱ्यास आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठीं स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन नेहमींपेक्षां जास्त धान्य विकावें लागत होतें. अलीकडे जास्त खाऊन तो जणूं त्याची भरपाईच करीत आहे ( ३ ) हिंदुस्थानांतील युद्धप्रयत्नामुळें पुष्कळ लोकांना नवीन रोजगार लागून त्यांच्या हातीं जादा पैसा खेळूं लागला. त्यामुळें त्यांचा आहार नेहमींपेक्षां जास्त वाढला व त्या प्रमाणांत मागणीहि वाढली. ( ४ ) सामान्यतः दरवर्षी ठेवण्यांत येणाऱ्या तांदुळाच्या सांठ्यांत घट झाली. ( ५ ) " काळ्या बाजारांत " जास्त किंमतीनें विकण्यासाठीं सांठे करण्याची प्रवृत्ति वाढल्यामुळें सामान्यतः बाजारांत येणारा धान्याचा पुरवठा कमी झाला. ( ६ ) स्वतःची व कुटुंबाची अनिश्चित धान्यपुरवठ्यामुळें गैरसोय होऊं नये म्हणून धान्याचे सांठे करून ठेवण्याची प्रवृत्ति लोकांत निर्माण झाली व त्यांची मागणी दर वेळीं पुरी न झाल्यामुळें धान्याचे भाव वाजवीपेक्षां ज्यास्तच कडाडले.

हिंदुस्थानांतील धान्यपरिस्थिति या बहुविध कारणांमुळें बिकट झाली आहे. समितीचें असें स्पष्ट मत आहे कीं, हिंदुस्थानांतील धान्य-उत्पादनांत घट झाल्यामुळें वरील बिकट परिस्थिति निर्माण झालेली नाहीं. ब्रह्मदेशांतून होणारी तांदुळाची आयात बंद झाल्यामुळें हिंदी धान्यपुरवठ्यांतली नेहमींची माया नाहींशी झाली आहे. एक गोष्ट मात्र खरी कीं आजपर्यंत या तांदुळाच्या आयातीचें महत्त्व नजरेंत भरलें नव्हतें. प्रतिवर्षाच्या धान्याच्या उत्पादनाच्या मानानें आयात धान्य फारच थोडें ( २ ते ४ टक्के ) असल्यामुळें मुख्यतः त्याच्याकडे दुर्लक्ष होत असे. परंतु ही आयात आतां बंद झाल्या-

मुळें त्यावरच बव्हंशीं अवलंबून असणाऱ्या मुंबई व मलबार सारख्या प्रदेशांत या आयातीचें वास्तविक महत्त्व किती आहे हें दृग्गोचार होऊं लागलें. हिंदुस्थानांतून धान्य बाहेर पाठविल्यामुळें व येथेंहि सैन्यासाठीं पुष्कळ प्रमाणांत तें सांठवून ठेवल्यामुळें धान्यपरिस्थिति बिकट झाली आहे असा समज जनतेंत दृढमूल झाला आहे. तो चुकीचा आहे असें ग्रेगरी समितीनें आंकडेवार सिद्ध केलें आहे. १९४२-४३ सालीं हिंदुस्थानांत प्रतिवर्षी निर्माण होणाऱ्या धान्यापैकीं शेंकडा एक टक्का धान्य निर्यात करण्यांत आलें होतें व सैन्याच्या उपयोगासाठीं फक्त १ ते २ टक्के धान्य घेण्यांत आलें होतें. या दोन्हींमुळें धान्याचा सांठा फारसा घटण्याचा संभव नव्हता व नाहीं ही गोष्ट उघड आहे.

हिंदुस्थानांतील सध्यांची धान्याची तूट फार नाहीं. तूट मुख्यतः तांदुळाची आहे व तांदुळावर जगणारे लोक या देशांत फार असल्यामुळें ती विशेष जाणवत आहे. आरंभींच सांगितलेल्या बहुविध कारणांमुळें जनतेस सामान्यतः उपलब्ध असणारा धान्याचा सांठा बराच घटला आहे व त्यामुळें धान्याच्या किंमती सर्व देशभर भडकल्या आहेत. धान्याच्या जबर किंमतींमुळें गरीब जनता अन्नास मोताद झाली आहे. परंतु धान्याच्या या किंमती इतक्या वाढण्याचें कारण चलनवृद्धि असें जे कित्येक लोक म्हणतात तें मात्र अगदीं चूक आहे असें या समितीचें विचारपूर्वक ठरविलेलें मत आहे. कारण अर्थशास्त्राच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे जनतेची धान्याची मागणी लवचिक नसते व त्यामुळें धान्याचा पुरवठा थोडा जरी कमी झाला तरी तदनुषंगानें धान्याच्या किंमती त्या प्रमाणापेक्षां कितीतरी जास्त पटीनें वाढतात असें सिद्ध आहे. चलनवृद्धीचा व धान्याच्या किंमती वाढण्याचा कोणताहि प्रत्यक्ष संबंध नाहीं.

सध्यांच्या बिकट धान्यपरिस्थितीवर तोडगा म्हणून ग्रेगरी समितीनें ज्या शिफारशी केल्या आहेत, त्या पांच सदरांत विभागतां येतील. (१) सध्यांचा उपलब्ध धान्याचा सांठा वाढविणें (२) देशांत तयार होणारें जास्तींत जास्त धान्य शेतकऱ्याकडून हल्लीं बाजारांत येत नाहीं तें आणण्याची अगर धान्यप्राप्तीची योजना (३) उपलब्ध होणाऱ्या धान्याचें समान व न्याय्य वांटप करण्याची व्यवस्था अथवा शिधापद्धति (४) धान्याचे भाव सरकारी कायद्यानें ठरवून त्यांच्या वाढीस आळा घालणें व (५) अन्नखात्याची सुधारणा व प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांच्या संबंधांत सुधारणा.

या शिफारशी एकमेकांशीं संलग्न व एकमेकींस पूरक आहेत, म्हणून त्या सर्वांचीच अंमलबजावणी एकदम झाली पाहिजे. कारण धान्याची पैदास वाढली पण तें धान्य जनतेस उपलब्धच झालें नाहीं तर त्याचा काय उपयोग? धान्याचें न्याय्य व योग्य वांटप जनतेंत व्हावयासाठीं जनतेची क्रयशक्ति थोडी तरी मर्यादित केली पाहिजे; म्हणजेच नियंत्रित वांटप केलें पाहिजे. पण तें करावयाचें म्हणजे धान्याचा पुरवठा खात्रीचा व भरपूर झाला पाहिजे; म्हणजेच उत्पन्न होणारें धान्य शेतकऱ्याकडून बाजारांत आलें पाहिजे. म्हणजे धान्यप्राप्तीची सरकारी योजना हवी! रेशनिंग केल्यावर सुद्धां धान्याच्या किंमती इतक्या वाढल्या कीं रेशनिंगचें धान्यहि गरिबांना घेणें परवडेनासें झालें तर रेशनिंगचा तरी काय उपयोग? म्हणून धान्याच्या भावांचें नियंत्रण पाहिजे आणि या सर्व योजना उत्तम रीतीनें सिद्धीस जाव्या म्हणून अन्नखात्याची व्यवस्था चांगली पाहिजे व प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांचे व देशी संस्थानांचेहि संबंध सलोख्याचे व सहकार्याचे पाहिजेत, हें उघड आहे. त्यामुळें समितीच्या या शिफारशी गटानें अंमलांत न आणतां एकदमच अंमलांत आणल्या पाहिजेत. त्यासंबंधीं आतां जास्त तपशिलांत शिरूं.

( १ ) लढाईच्या काळांत हिंदुस्थानांतून सर्व धान्यांची निर्गत बंद करावी व तांदुळाची निर्गत तर मुळींच करूं नये. हिंदुस्थान सरकारनें पहिल्या वर्षीं ( म्हणजे यंदां ) १५ लक्ष टन धान्य परदेशांहून आणावें, व पुढें दर वर्षीं १० लक्ष टन धान्य आणवावें. पहिल्या वर्षाच्या १५ लक्ष आयातीपैकीं १० लक्ष टन जनतेच्या योगक्षेमासाठीं खर्च करावें व उरलेल्या ५ लक्ष टनांचा मध्यवर्ती सरकारच्या धान्यनिधींत समावेश करावा. या धान्यनिधीचा उपयोग धान्याचें भावनियंत्रण यशस्वी व परिणामी होण्यासाठीं करावयाचा आहे. अन्न खात्यानें लष्करी खात्याशीं विचारविनियम करून सैन्याला लागणाऱ्या धान्याचा अंदाज करून त्याप्रमाणें धान्यपुरवठा करण्याची व्यवस्था करावी.

देशांतील धान्याची पैदास वाढविण्यासाठीं ( अ ) सरकारनें २,५०,००० टन ( अमोनियम सल्फेट ) खत प्रतिवर्षीं तयार करणारी यंत्रसामुग्री परदेशांतून आयात करण्यासाठीं येथील उद्योग–धंदेवाल्यांस मदत करावी. ( ब ) शेतकऱ्यांना शेतीसाठीं लागणारीं हत्यारें दुरुस्त करण्यासाठीं व नवीन घेण्यासाठीं लोखंड व पोलाद जास्त प्रमाणांत उपलब्ध करावयाची

सरकारनें व्यवस्था करावी. त्याचप्रमाणें मद्रासमध्यें असडिक तांदूळच वापरण्याची केलेली सक्ति सर्व देशांत जारी करावी. शेतकी खात्यांतून निवडक बीबियाणें शेतकऱ्यांना देण्याची व्यवस्था करावी.

( २ ) उत्पन्न झालेलें अधिकांत अधिक धान्य जनतेस उपलब्ध करण्यासाठीं दोन उपाय सुचविण्यांत येतात. ते म्हणजे ( अ ) खुला व्यापार, ( ब ) सर्व धान्यावर मध्यवर्ती सरकारची अप्रतिहत सत्ता. हे दोन्ही त्याज्य आहेत असें समितीनें ठरविलें. खुल्या व्यापारामुळें धान्याचे भाव चढतात पण त्यामुळें जास्त धान्य बाजारांत येत नाहीं, हें १९४२ च्या उन्हाळ्यांतील अनुभवावरून आतां पक्कें सिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणें मध्यवर्ती सरकारनें सर्व धान्य आपल्या ताब्यांत घ्यावें व त्याचें योग्य वांटप करावें ही योजना जरी अत्यंत उत्तम व अंमलबजावणीस अशक्य नसली तरीसुद्धां सध्यांच्या निकडीच्या वेळीं त्याच्या अंमलबजावणीसाठीं लागणारी व्यवस्था इतक्या थोड्या वेळांत करतां येणें अशक्य आहे.

धान्य शेतकऱ्याकडून प्राप्त करून घेण्याच्या पद्धति या निरनिराळ्या प्रांतांत तेथील देशकालपरिस्थिति यांना अनुरूप असल्या पाहिजेत असें समितीचें मत आहे. म्हणून सार्वदेशिक अशा प्रकारची योजना या बाबतींत मध्यवर्ती सरकारनें अंमलांत आणू नये. ज्या त्या प्रांतिक सरकारांनाच त्यांना अनुरूप अशी पद्धति अंगिकारण्याचें स्वातंत्र्य देण्यांत यावें. यासंबंधीं समितीनें दोन मुख्य तत्त्वें उद्घोषिलीं आहेत. एक म्हणजे धान्य-प्राप्तीची योजना यशस्वी होण्यासाठीं नेहमींच्या व्यापारी चढाओढीस बंदी केली पाहिजे. यासाठीं जरी प्रांतिक किंवा संस्थानी सरकारांना आपापल्या हद्दींतील सर्वच धान्याच्या पुरवठ्यावर अप्रतिहत सत्ता चालविण्याची इतक्यांतच गरज नाहीं. धान्यप्राप्ति अयोग्य तऱ्हेनें होत नसल्यास मध्यवर्ती सरकारनें त्या क्षेत्रांत हस्तक्षेप करूं नये. आणि दुसरें म्हणजे सरकारी धान्यखरेदी यशस्वी होण्यासाठीं त्यास वहातुकींत अग्रहक्क मिळाला पाहिजे.

धान्यप्राप्तीची योजना म्हणजे देशांतील सर्व भागांतून जास्तींत जास्त धान्य शेतकऱ्याकडून घेऊन जनतेस उपलब्ध करणें; यांत तुटीचे अगर जादा उत्पन्नाचे प्रांत असा फरक करतां येणार नाहीं. वरील योजना अंमलांत आणण्याचे दोन मार्ग आहेत. ( अ ) शेतकऱ्याकडून धान्य सक्तीनें घेणें, ( ब ) शेतकऱ्यास धान्यविक्री फायदेशीर करून त्यास धान्य विकण्यास उत्तेजन देणें. यांपैकीं पहिला मार्ग जरी कांहीं अतिशय तुटीच्या प्रदेशांतून

अनुसरल्याखेरीज गत्यंतर नाहीं तरी सर्व देशभर तीच पद्धति अंमलांत आणण्याचा काळ आला आहे असें समितीस वाटत नाहीं. दुसऱ्यासंबंधीं लक्षांत ठेवावयाची गोष्ट म्हणजे धान्याच्या किंमती वाढून शेतकऱ्यास जरी जादा पैसा मिळाला तरी त्याच्या गरजेच्या वस्तु महाग व दुर्मिळ झाल्यामुळें त्यांत तो पैसा खर्च होतो त्यामुळें शेतकऱ्यास खरा फायदा न मिळतां अधिक किंमतीच्या आशेनें जवळचें धान्य न विकतां तें सांठविण्याकडे त्याचा कल झुकतो. यासाठीं त्याला लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा वाढविला पाहिजे व त्यांचें उत्पादन युद्धसामुग्रीच्या उत्पादनाच्या खालोखाल महत्त्वाचें असें मानलें गेलें पाहिजे. या वस्तूंचा पुरवठा कदाचित् वाढवितां येणें शक्य नसल्यास शेतकऱ्यांना सोनें, चांदी विकत मिळेल अशी सरकारनें व्यवस्था करावी ( किंवा धान्य शेतकऱ्यांकडून विकत घेण्यासाठीं त्यांना सोनें, चांदी द्यावी ).

( ३ ) एक लक्ष किंवा त्याहून जास्त वस्ती असलेल्या शहरांतून ताबडतोब शिधापद्धतीचा अवलंब करण्यांत यावा. यासाठीं धान्यखरेदी व धान्याची वाहतूक यांची व्यवस्था काळजीपूर्वक व योजनापूर्वक केली पाहिजे. यासाठीं अन्नखात्यांत धान्याच्या वहातुकीची व्यवस्था पाहाणारा एक स्वतंत्र अधिकारी नेमण्यांत यावा.

दर माणशीं शिध्याचें प्रमाण दिवसास अर्धा शेर धान्याहून कमी असतां उपयोगी नाहीं. देशांत पैदा होणाऱ्या धान्याच्या पुरवठ्यांत हें शक्य नसेल तर त्यांतील तूट परदेशाहून धान्य आयात करून भरून काढणें आवश्यक आहे. सुव्यवस्था व दक्षतेचा कारभार हीं शिधापद्धति यशस्वी होण्यासाठीं आवश्यक आहेत. यासाठीं कायद्याची कडक अंमलबजावणी करावी व सरकारी नियम मोडणारास कडक शिक्षा देण्यांत यावी. या बाबतींत जनतेस योग्य सूचना देण्यासाठीं व मार्गदर्शन करण्यासाठीं प्रांतिक व संस्थानी सरकारांनीं समित्या नेमाव्या. त्याचप्रमाणें जनतेचें सहकार्य मिळविण्यासाठीं शिधा-अधिकाऱ्यांनींहि बिनसरकारी समित्यांची आपल्या कामासाठीं नित्य मदत घेत जावी.

जनतेस धान्य मिळण्यांत दिरंगाई व घोटाळा होऊं नये यासाठीं किरकोळ विक्रीच्या हल्लींच्या दुकानांतूनच शिधा-वांटपाची व्यवस्था करावी. किरकोळ दुकानदारांकडून या बाबतींत अडथळा आल्यास त्यांचें योग्य तें शासन व्हावें.

शिधापद्धतीसंबंधीं अन्नखात्यानें आहारतज्ज्ञांचा वारंवार सल्ला घेत जावा. अन्नखात्यानें साखर व दूध यांचें नियंत्रित वांटप करण्याबद्दल चौकशी करून माहिती जमवावी.

सर्व ग्रामीण भागांतून सर्वसामान्य शिधापद्धति अवलंबणें अशक्यप्राय आहे, असें समितीचें मत आहे. परंतु पूर्ण अगर साधारण तुटीच्या ग्रामीण विभागांतून धान्याचें वांटप नेहमींच्या व्यापारी मार्गांनींच होऊं नये. त्यासंबंधांत सरकारनेंच व्यवस्था केली पाहिजे.

( ४ ) सर्व महत्त्वाच्या धान्यांच्या किंमतींचें कायदेशीर नियंत्रण करावें, अशी समितीनें बहुमतानें शिफारस केली आहे. धान्यांचे भाव जर सारखे वाढते राहिले तर शेतकरी धान्य सांठवून ठेवतात त्यामुळें बाजारांत धान्य येत नाहीं असें समितीपुढें आलेल्या पुराव्यावरून अगदीं निःसंशयपणें सिद्ध झालें. या उलट जेव्हां भाव पडत असतात त्यावेळीं धान्यप्राप्ति सुलभतेनें व भरपूर प्रमाणांत होते असेंहि सिद्ध झालें. सध्यांच्या काळीं धान्याच्या किंमतीवर कांहीं ना कांहीं नियंत्रणें असल्यामुळें नियंत्रण कोणत्या प्रकारचें असावें एवढेंच समितीस ठरवावयाचें होतें व या बाबतींत तिचें मत वर दिलेलेंच आहे.

गव्हाच्या भावनियंत्रणाच्या सरकारी योजनेचा बोजवारा झाल्यामुळें अशा नियंत्रणाच्या उपयुक्ततेसंबंधीं साशंकता उत्पन्न झाली आहे. धान्याच्या भावांचें नियंत्रण परिणामकारक व यशस्वी होण्यासाठीं कमींत कमी खालील तीन गोष्टींची गरज आहेः ( १ ) परिणामकारक धान्यप्राप्तीची योजना, ( २ ) वाहतुकीवर योग्य नियंत्रण, ( ३ ) धान्याचे सांठे कळविण्यासंबंधींच्या कायद्याची कसोशीनें अंमलबजावणी. याशिवाय प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांनीं जर आपले धान्यनिधी निर्माण केले तर धान्यनियंत्रण अत्यंत परिणामकारक होईल यांत संशय नाहीं.

धान्याच्या ठरविलेल्या किंमती कमीजास्त करण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारास असावा; संस्थानें व प्रांतिक सरकारें यांच्या सहकार्यानें शक्य तर प्रादेशिक भाव ठरवून त्यांचें नियंत्रण करावें. यांतून निर्माण होणारे मतभेद अगर वाद मध्यवर्ती, प्रांतिक व संस्थानी सरकारें यांच्या प्रतिनिधींच्या एका समितीकडे निर्णयासाठीं सोंपवावेत. धान्यांच्या प्रादेशिक किंमती ठरवितांना शेतकऱ्यांना तीं तीं धान्यें उत्पन्न करण्यासाठीं येणारा वाढ खर्च लक्षांत घेण्यांत यावा. जनतेंतील विशिष्ट गटास इतरांपेक्षां कमी किंमतीनें धान्य विकण्यास

जरी समितीचा विरोध नाहीं तरी तेवढ्यानेंच धान्यपरिस्थिति काबूंत ठेवतां येईल असें तीस वाटत नाहीं. त्यासाठीं सर्वंकष योजनेचीच जास्त जरूर आहे.

(५) समितीनें हिंदुस्थान सरकारच्या अन्नखात्यांतील व्यवस्थेसंबंधीं बऱ्याच सूचना केल्या आहेत. तथापि त्या विस्तृतपणें देऊन जागा अडविण्याचें कारण नाहीं. प्रांतिक सरकारें व मध्यवर्ती सरकार यांच्या परस्परसंबंधांची चर्चा करून खालील गोष्टींत मध्यवर्ती सरकारचा अधिकार अबाधित असावा असें समितीचें मत आहे. त्या म्हणजे (अ) भावांची चढउतार, (ब) धान्यपुरवठ्याची वांटणी (क) मध्यवर्ती धान्यनिधीची व्यवस्था (ड) कांहीं विशेष प्रसंगीं एखाद्या भागांतलि दुष्काळनिवारण अगर मदत करावयाच्या इतर पद्धतींचें तंत्र व कारभार आणि (इ) कारभारांतील पद्धति, कार्यक्रम वगैरे. उत्पन्न होणाऱ्या मतभेदांत अगर वादांत लवाद म्हणून नेमावयाच्या समितीचा उल्लेख वर आलाच आहे.

हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या ग्रेगरी समितीच्या अहवालांतील सध्यांच्या धान्यप्रश्नासंबंधींची निदानें व शिफारशी यांचा गोषवारा गेल्या लेखांत दिलाच आहे. त्याचें परीक्षण करावयाच्या आधीं सध्यांचा प्रश्न कोणता व कशाप्रकारचा आहे व त्यावर योग्य उपाययोजना कोणती हें प्रथम ठोकळ मानानें सांगितलें पाहिजे. नंतर त्याच्याच अनुषंगानें ग्रेगरी समितीच्या अहवालाचें परीक्षण करतां येईल.

धान्याच्या प्रश्नासंबंधीं विचार करतांना प्रथमतः कांहीं गैरलागू गोष्टी बाजूस काढल्या पाहिजेत. धान्य–तुटवड्याचा हा प्रश्न युद्धकालापुरताच मर्यादित आहे असें गृहीत धरावयास पाहिजे. म्हणजे युद्धोत्तरकालीन धान्याच्या धोरणासंबंधींचे प्रश्न त्या चर्चेंत समाविष्ट होत नाहींत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील जनतेचा आहार सामान्यतःहि युक्ताहारशास्त्राच्या कसोटीस उतरत नाहीं; तरी सुद्धां सध्यांचा प्रश्न युक्ताहाराचा नसून आहे या धान्यपुरवठ्यांतच शक्य तितका युक्ताहार कसा साधतां येईल हा आहे. तेव्हां युक्ताहाराच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील धान्यपुरवठा पुरेसा आहे किंवा नाहीं ह्या प्रश्नाची चर्चाहि त्यांत अंतर्भूत होत नाहीं. शिवाय युद्धकालांत झालेल्या

* ज्ञानप्रकाश, ३ मार्च १९४४

लोकसंख्येच्या वाढीमुळें एकंदर धान्याच्या पुरवठ्यावर होणारे परिणाम इतके क्षुल्लक आहेत कीं, त्यांचाहि त्या प्रश्नासंबंधीं चर्चा करतांना उल्लेख करण्याचें कारण नाहीं. या गोष्टी आपआपल्यापरी महत्त्वाच्या नाहींत असें नाहीं. परंतु प्रस्तुत चर्चेच्या दृष्टीनें त्या दुय्यम व गौण आहेत. मुख्य प्रश्नाचें नीट आकलन होण्यासाठीं त्या तात्पुरत्या तरी गैरलागूच समजल्या पाहिजेत. त्या सोडून दिल्या म्हणजे सध्यांच्या धान्यप्रश्नाचें स्वरूप कसें दिसतें तें आतां पाहूं.

ग्रेगरी समितीनें आंकडेवार सिद्ध केल्याप्रमाणें हिंदुस्थानांतील धान्याच्या उत्पादनांतील घट व आयातबंदी या दोहींमुळें एकंदर वट्ट धान्यपुरवठ्यांत पडलेली तूट ५-६ टक्क्यांहून अधिक नाहीं. नेहमींच्या धान्योत्पादनांत अवर्षणामुळें वगैरे ७०–८० टक्के घट येऊन उत्पन्न होणाऱ्या दुष्काळी परिस्थितीशीं वरील परिस्थितीचें साम्य फारच दूरान्वयाचें आहे ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे.

धान्याचा एकूण पुरवठा व त्यांतून जनतेस मिळूं शकणारा किंवा उपलब्ध होणारा पुरवठा यांत फार तफावत पडल्यामुळें प्रस्तुतचा धान्यप्रश्न निर्माण झाला आहे. नेहमींच्या परिस्थितींत उत्पन्न झालेल्या धान्यांतील बहुतेक विकाऊ धान्य बाजारांत येतें व व्यापाऱ्यामार्फत जनतेस उपलब्ध होतें. परंतु हल्लीं शेतकरी धान्य सांठवतो व त्यामुळें विकाऊ धान्यांत घट होते. त्यांतूनहि जें विकाऊ धान्य व्यापाऱ्यांकडे येतें त्यांतील बराचसा भाग ते जादा फायद्यासाठीं सांठवूं लागल्यामुळें जनतेस उपलब्ध होणारा धान्याचा पुरवठा एकंदर धान्याच्या उत्पादनाच्या मानानें फारच घटला आहे. धान्याचा एकंदर पुरवठा व त्यांतून जनतेस उपलब्ध होणारा पुरवठा यांतील हा महत्त्वाचा फरक लक्षांत ठेवला पाहिजे.

वर सांगितल्याप्रमाणें सध्यांचा प्रश्न धान्याचें उत्पादन फार घटल्यामुळें निर्माण झालेला नसून त्यांतील उपलब्ध धान्याचें प्रमाण फारच घटल्यामुळें निर्माण झाला आहे. उपलब्ध सांठा घटल्यामुळें धान्याच्या किंमती फारच वाढल्या व त्या जनतेच्या आंवाक्याबाहेर गेल्यामुळेंच प्रस्तुतची परिस्थिति बिकट झाली आहे. हा उपलब्ध पुरवठा घटण्याचें मुख्य कारण म्हणजे चलनवृद्धि होय. चलनवृद्धीमुळें धान्याचे व इतर वस्तूंचे भाव एकसारखे चढूं लागले व ते चढत राहतील या अपेक्षेनें जवळचें धान्य जादा नफ्यानें विकण्यासाठीं शेतकरी बाजारांत न आणतां सांठवूं लागला. त्याचप्रमाणें धान्यपुरवठ्याबद्दल खात्री व त्याच्या किंमतीबद्दल मर्यादित अपेक्षा असतांना धान्याची थोडी माया ठेवून व्यापार करणारे व्यापारी पुरवठ्याबद्दल थोडी साशंकता व भाव एकसारखे चढण्याची अपेक्षा निर्माण

झाल्याबरोबर नेहमींच्या मर्यादेपेक्षां किती तरी पटीनें जास्त धान्य न विकतां सांठवून ठेवण्यास उद्युक्त झाले. धान्यपुरवठ्याबद्दल साशंकता निर्माण झाल्यामुळें साधारण सुखवस्तु गिऱ्हाईकहि धान्याचे सांठे करूं लागले. त्यामुळें धान्याचा कृत्रिम दुष्काळ निर्माण झाला व जनता अन्नास मोताद झाली.

हीं कारणें नीट लक्षांत घेतलीं तर धान्याचा प्रश्न सोडविण्याचे तीन मार्ग स्पष्टच आहेत. ( १ ) धान्याचे भाव चलनवृद्धीस आळा घालून स्थिर व जरूर त्या प्रमाणांत कमी करावयाचे. ( २ ) धान्यपुरवठ्यासंबंधींची साशंकता काढून टाकण्यासाठीं जादा पैदाशीनें वद्द उत्पादनांतील तूट भरून काढावयाचा प्रयत्न करावयाचा व कार्यक्षम असें धान्यप्राप्तीचें धोरण आंखावयाचें व ( ३ ) अशा प्रकारें प्राप्त झालेल्या धान्याचें योग्य व न्याय्य वांटप करावयाचें व त्यासाठीं वाहतुकीच्या साधनांवर फार बोजा न पडेल असें करावयाचें. धान्याचा प्रश्न सोडविण्याच्या योजनेची ही प्रस्थानत्रयी आहे आणि याच्यांत धान्याच्या भावाचें स्थिरीकरण हा पाया, धान्याची प्राप्ती व पैदास हा मध्य व त्यांचें योग्य व न्याय्य वांटप हा कळस होय. या प्रत्येकासंबंधीं आणखी विस्तृत चर्चा ओघानें पुढें येईलच.

धान्याच्या भावांचें यशस्वी नियंत्रण ही मूलभूत गोष्ट कशी हें थोडेसें विस्तारानें सांगितलें पाहिजे. धान्याचे भाव स्थिर न राहिल्यास इतर सर्व उपाययोजना विफल होतील. भाव सारखे वाढत राहिले तर जास्त फायद्याच्या आशेनें धान्याचे सांठे करण्याची प्रवृत्ति बलत्तर होईल व त्यामुळें कोणतीहि धान्यप्राप्तीची योजना फलदायी होणार नाहीं. त्याचप्रमाणें चढत्या बाजारांत नुसतें स्वतःजवळ असलेलें धान्य सांठवून ठेवून व अधिकांत अधिक किंमतीनें विकून शेतकऱ्यास हवा तेवढा फायदा मिळवतां येईल व चलनवृद्धीमुळें तो पिकवीत असलेल्या सर्वच पदार्थांच्या किंमती वाढत असल्यामुळें फायदा मिळविण्यासाठीं अधिक धान्य पिकविण्याची त्याला यातायात करावी लागणार नाहीं. त्यामुळें पैदास अधिक वाढणार नाहीं व विद्यमान तूटहि भरून येणार नाहीं. तसेंच धान्याचे भाव चढत गेल्यास त्यांच्या हक्काचें शिध्याचें धान्य विकत घेणें गरीब जनतेस परवडणार नाहीं ( हल्लीं पुणें शहरांतच ही स्थिति आहे. ) व तिला उपास काढावे लागतील. शिवाय सध्यांच्या धान्यपरिस्थितीचें निराकरण करण्यासाठीं जो सलोखा व सहकार्य मध्यवर्ती, प्रांत व संस्थानी सरकारें यांच्यामध्यें नांदलीं पाहिजेत, तींहि सर्वंकष भावनियंत्रणावर पुष्कळ अंशीं अवलंबून आहेत. मध्यवर्ती सरकारशीं सहकार्य करीत नसल्या-

बद्दल ज्याचें नांव बद्दू झालें आहे त्या पंजाबचेंच आपण उदाहरण घेऊं. पंजाबमध्यें धान्य गरजेपेक्षां जास्त निर्माण होतें व तें जादा धान्य तुटीच्या प्रदेशांत तेथून निर्यात होतें. परंतु पंजाबास लागणारें कापसाचें कापड जवळजवळ सर्वच्या सर्व बाहेरून आयात करावें लागतें. धान्यनिर्यातीबद्दल पंजाबांत बाहेरून पैसे येतात व कापडआयातीमुळें त्याला पैसे बाहेर पाठवावे लागतात. धान्याच्या किंमतींपेक्षां कापडाच्या किंमती जास्त प्रमाणांत वाढल्यास पंजाबास जास्त पैसे बाहेर पाठवावे लागून त्याचें नुकसान होईल, हें उघड आहे. धान्याच्या किंमती नियंत्रित करण्यास ज्या ज्या वेळीं पंजाब सरकारनें विरोध केला त्यावेळीं त्यांचें म्हणणें असें होतें कीं, 'हिंदुस्थान सरकार फक्त धान्याच्या किंमती स्थिर करण्याचा आम्हांवर जोरा करतें, परंतु जे इतर कापडासारखे पदार्थ आम्हांस विकत घ्यावे लागतात त्यांच्या किंमती मात्र वाटेल तितक्या चढूं देतें. ह्याला आम्ही विरोधच करणार.' ही विचारसरणी सूज्ञांस पटण्यासारखी नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. त्यावर कोणताही आक्षेप विचारी माणसास घेतां येणार नाहीं. हिंदुस्थान सरकारनें जर अर्थशास्त्रज्ञांनीं कंठशोष करून सांगितलेलें सर्वंकष भावनियंत्रण योग्य वेळींच केलें असतें तर हा प्रश्नच उद्भवला नसता व जोंपर्यंत तसें नियंत्रण झालेलें नाहीं तोंपर्यंत अन्नमंत्री व भारतमंत्री यांनीं कितीहि सनदशीर दडपशाही केली तरी या प्रांतिक सरकारास नमविणें शक्य होणार नाहीं. सर्वंकष भावनियंत्रणाखेरीज या बिकट परिस्थितींतून पार पडण्यास दुसरा मार्गच नाहीं. हाच या सर्व चर्चेचा निष्कर्ष होय. तेव्हां ग्रेगरी समितीनें या बाबतींत कोणत्या शिफारशी व योजना पुढें मांडल्या आहेत व त्या कितपत यशस्वी होण्याचा संभव आहे याचा आतां विचार करूं.

धान्याचे भाव नियंत्रित व स्थिर करण्यासाठीं ते कां व कसे भडकले याची अचूक कारणमीमांसा करून त्याप्रमाणें उपाययोजना केली पाहिजे. धान्याचे भाव वाढण्याचीं खरीं कारणें आकलन झालीं नाहींत व त्यांच्या परिहाराची कांहीं तरतूद झाली नाहीं तर, भावनियंत्रण म्हणजे निव्वळ आभासात्मक होईल हें उघड आहे. ग्रेगरी समितीच्या अहवालांत या प्रश्नासंबंधींची चर्चा इतकी दोषपूर्ण, अपुरी व अशास्त्रीय आहे कीं तिला या प्रश्नाचें पूर्ण आकलन आलें असावें असें वाटत नाहीं. धान्याच्या तुटीच्या मानानें धान्याचे भाव फारच वाढतात, कारण जनतेची तद्विषयक मागणी लवचिक नसते, असा एक

अर्थशास्त्रीय सिद्धांत या प्रश्नाच्या माथीं चिकटवून समिति मोकळी झाली आहे व अट्टाहासानें चलनवृद्धीशीं याचा कांहीं संबंध नाहीं असा पुकाराहि तिनें केला आहे. चलनवृद्धीमुळें किंमती प्रथम वाढूं लागतात, व त्या अधिक वाढतील या आशेनें धान्याचे सांठे करण्याची प्रवृत्ति निर्माण होते. त्यामुळें तुटवडा आणखी वाढतो व किंमती आणखी चढतात, व अशा तऱ्हेनें उत्पन्न होणारा भोंवरा अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या परिचयाचा आहे. तूट पडल्यावर किंमती चढतात कीं आधीं किंमती चढून तूट पडते हा महत्त्वाचा प्रश्न! येथें किंमतीच प्रथम चढल्या होत्या व नंतरच धान्याचा तुटवडा पडला हें खात्रीपूर्वक सिद्ध करतां येईल. १९४२ च्या डिसेंबर महिन्यांत समितीच्या मतें धान्यपरिस्थिति फारशी बिघडलेली नव्हती. तरी त्यावेळीं सुद्धां तांदुळ व गहूं यांच्या घाऊक भावांचा सूचक अंक ( १९ ऑगस्ट १९३९=१०० ) अनुक्रमें २३२ व २१८ या पातळींत वावरत होता.

सन १९४२ च्या सुरवातीपासूनच धान्याचे भाव इतर वस्तूंच्या भावाप्रमाणेंच एकसारखे वाढत होते. दोस्त राष्ट्रांच्या खरेदीमुळें झालेल्या प्रचंड चलनविस्तारामुळें मोकाट चलनाचें दडपण सर्वच वस्तूंच्या भावावर पडत होतें व तें एकसारखें वरवर रेटलें जात होतें.

परंतु या सर्व वस्तुस्थितीकडे ग्रेगरी समितीनें डोळेझांक केली व धान्याच्या किंमती फक्त तुटीमुळें वाढल्या असें निदान केलें. या मीमांसेचा एकमेव आधार म्हणजे वर उल्लेखिलेली जनतेची धान्याबद्दलची बिनलवचिक मागणी. परंतु या बाबतींत एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, हिन्दुस्थानांतील जनता नेहमींच अर्धपोटी असल्यामुळें तिची धान्यासंबंधींची मागणी युरोप, अमेरिकेंतील जनतेइतकी बिनलवचिक खास नाहीं व ही गोष्ट समितीनेंच निराळ्या पण चुकीच्या कारणासाठीं मान्य केली आहे. आर्थिक मंदीच्या दिवसांत शेतकरी कमी खातो व तेजीच्या दिवसांत तो जास्त खातो असें बिनबुडाचें व बिन आधाराचें विधान समितीनें केलें आहे. जनतेच्या आहारांत जर समितीच्या मतें इतका सारखा फेरफार होऊं शकतो तर तिची धान्याची मागणी लवचिक नसते असें परस्परविरोधी विधान कसें करतां येईल? व त्या आधारावर धान्याच्या किंमती वाढण्याची मीमांसा तरी कशी करतां येईल? वास्तविक पाहतां समितीच्या या आहारविषयक विधानास काडीचाहि आधार नाहीं. जनतेच्या मागणीसंबंधीं तिचें आधीं केलेलें विधानहि इतर पुराव्यावरून संपूर्णतः बरोबर नाहीं हें निःसंशय. धान्याच्या किंमती भरमसाट वाढ-

ण्याचीं हीं समितीनें दिलेलीं कारणें तोकडीं, अपुरीं व वस्तुस्थितीशीं न जुळणारीं आहेत हें यानंतर वेगळें सांगावयास नको.

कोणाहि सूज्ञ निरीक्षकास धान्याच्या किंमती वाढण्याचें मूळ या देशांत निर्माण झालेल्या चलनवृद्धींत अगदीं स्पष्टपणें आढळून येईल. चलनवृद्धीशीं याचा कांहीं संबंध नाहीं असें समितीनें जरी कंठशोष करून सांगितलें तरी त्यावर अभ्यासकांचा कसा विश्वास बसेल ? फार काय हिन्दुस्थान सरकारनें सुद्धां त्यांचा अन्योन्य संबंध कबूल केला आहे. ९ नोव्हेंबर १९४३ रोजीं मध्यवर्ती विधिमंडळांत हिन्दुस्थान सरकारचे अर्थसचीव म्हणाले कीं " धान्याचा प्रश्न व चलनवृद्धीचा प्रश्न हे एकमेकांशीं अगदीं निगडित आहेत व ते एकएकटे सोडवतां येणार नाहींत; ते दोन्हीहि एकदमच सोडविले पाहिजेत ". भारत-मंत्र्यांच्या श्वेतपत्रिकेंतहीं हीच गोष्ट मान्य करण्यांत आली आहे. समितीची मींमांसा व निदानें चूक आहेत हें सिद्ध करण्यास या घरच्या आहेराशिवाय आणखी कोणता पुरावा पाहिजे ?

२*

ह्या चुकीच्या मींमांसेचे समितीच्या शिफारशिंवर फार घातुक परिणाम झाले आहेत. आपण केलेल्या सर्व शिफारशींची यशस्विता व त्यामुळें देशांतील धान्यप्रश्न सुटण्याची शक्यता धान्याचें भावनियंत्रण यशस्वी होण्यावर सर्वस्वी अवलंबून आहे, ही गोष्ट समितीच्या तितकीशी ध्यानांतच आली नाहीं. धान्याची जादा पैदास, धान्यप्राप्तीची योजना, त्याचें योग्य व न्याय्य वांटप आणि मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचा सहकार व सलोखा हे सर्वंकष भावनियंत्रणावर कसे अवलंबून आहेत याचें वर एके ठिकाणीं विवेचन केलेलेंच आहे. धान्याचे व इतर वस्तूंचे भाव सारखे चढूं लागले तर यापैकीं कोणतीहि योजना फलद्रूप होणें शक्य नाहीं हें उघड आहे. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, समितीनें ज्या प्रकारचें धान्याचें भावनियंत्रण सुचविलें आहे त्यामुळें नेमकी अशाच प्रकारची परिस्थिति निर्माण होण्याचा दृढतर संभव दिसतो. कारण समितीच्या शिफारशीप्रमाणें धान्याचें कायद्यानें ठरवून दिलेले भाव इतर वस्तूंच्या भावाबरोबर वारंवार मिळते करून घ्यावयाचे आहेत. चलनवृद्धीला जोंपर्यंत आळा बसलेला नाहीं तोंपर्यंत सर्व वस्तूंचे भाव वाढतच जाणार हें निर्विवाद. अर्थात्‌च धान्याचे नियंत्रित

* ज्ञानप्रकाश, १९ मार्च १९४४

भावहि वाढतच जाणार व समितीच्या शिफारशींचा व योजनांचा बोजवारा होणार हें स्पष्टच आहे. धान्याच्या भावांचें नियंत्रण हा सर्वंकष भावनियंत्रणाचा एक भाग होय. इतर भाव तसेच मोकळे सोडून नुसत्या धान्याचे भावनियंत्रित करणें कधींहि शक्य होणार नाहीं हा सर्व देशांतील अनुभव आहे. त्याचप्रमाणें सर्व किंमतींचें नियंत्रण करून तें यशस्वी करावयाचें तर प्रथम चलनवृद्धीला आळा घातला पाहिजे हा धडाहि इतर देशांच्या अनुभवावरून शिकण्यासारखा आहे. कायद्यानें ठरविलेले धान्याचे भाव टिकविण्यासाठीं ज्या चार गोष्टींची जरूरी आहे असें ग्रेगरी समितीनें म्हटलें आहे, त्या निर्दिष्ट गोष्टींत चलनवृद्धीस आळा घालणें याचा समावेश केलेला नाहीं. त्या चारी गोष्टी असून सुद्धां चलनवृद्धीच्या वावटळींत धान्याच्या भावनियंत्रणाची वावडी कोठल्या कोठें उडून जाईल ही महत्त्वाची गोष्ट समितीच्या ज्ञानकक्षेपलीकडील होती कीं काय हें समजत नाहीं ! या सर्व चर्चेचा निष्कर्ष स्पष्ट आहे.

सर्वंकष भावनियंत्रण केल्याखेरीज धान्याचे भाव स्थिर होणार नाहींत व धान्यपरिस्थिति सुधारणार नाहीं व सर्वंकष भावनियंत्रण यशस्वी रीतीनें करावयाचें असल्यास चलनवृद्धीला प्रथम आळा घातला पाहिजे. थोडक्यांत म्हणजे चलनवृद्धीचा प्रश्न सुटल्याखेरीज धान्याचा प्रश्न सुटणें जवळजवळ अशक्य आहे.

भावनियंत्रणासंबंधींच्या समितीच्या शिफारशींचा फोलपणा पाहिल्यावर आतां उरलेल्या दोन बाबींकडे वळूं. त्या म्हणजे धान्याची जादा पैदास करून तूट भरून काढण्याची योजना व धान्यप्राप्ति व वांटप यासंबंधींच्या योजना. याहि बाबतींत समितीनें केलेल्या शिफारशी अपुऱ्या आहेत असेंच परीक्षणाअंतीं दिसून येईल.

'अधिक धान्य पिकविण्याची मोहीम' यशस्वी झाली आहे असा आशीर्वाद देऊनच समितीनें या चर्चेस सुरुवात केली आहे. परंतु ही मोहीम अगदींच ढेपाळली असें तज्ज्ञ निरीक्षकांचें मत आहे. उपलब्ध होणारे पिकांचे आंकडे व अंदाज हीच गोष्ट प्रामुख्यानें दर्शवितात. त्याचीं कारणें शोधावयासहि फार लांब जावयाचें कारण नाहीं. बहुतेक प्रांतांतून 'अधिक धान्य पिकवा' ही फक्त प्रचारात्मक मोहीमच होती. त्याबद्दल शेतकऱ्यास कांहीं आमीष दाखविण्यांत आलेलें नव्हतें. विशेषतः आंखूड धाग्याच्या

कापसास जपानी मागणी संपूर्णपणें बंद झाल्यामुळें त्या जमिनींत धान्याची पैदास करावयास पुष्कळच वाव होता. परंतु जमिनींत कापसाऐवजीं धान्य पेरल्यास आपल्याला जास्त फायदा मिळेल, निदान नुकसान होणार नाहीं, येवढें तरी शेतकऱ्याला आश्वासन द्यावयास हवें. अमेरिकेंत युद्धापूर्वी कापूस-लागवड कमी करण्याच्या योजनेंत, जो शेतकरी कापसाऐवजीं इतर पीक लावील त्यास त्या प्रत्येक एकरामागें कांहीं ठराविक रकम उत्तेजन म्हणून देण्याची सोय केलेली होती. हिंदुस्थानांत फक्त मध्यप्रांतांत कपाशीऐवजीं धान्य पिकवणारास दर एकरीं दोन रुपये देण्यांत आले. एकरीं दोन रुपये हें प्रमाण जरी फार अल्प असलें तरी त्याच्या मागची विचारसरणी अगदीं शुद्ध व फलदायी आहे. इतर प्रांतांतून असा कोणताच प्रकार नव्हता. या मोहिमेची यशस्विता सिद्ध करण्यासाठीं १। कोटी एकर नवी जमीन धान्याच्या लागवडीखालीं आली असें सरकारी गोटांतून सांगण्यांत येतें. परंतु ज्यांना हे आंकडे कोणत्या पद्धतीनें एकत्र केले जातात याची माहिती आहे ते यामुळें फसणार नाहींत. हे आंकडे अगदीं कुचकामी आहेत. कारण जादा धान्य पिकविण्याची जबाबदारी खेडेगांवांतील पाटील-तलाठ्यांवर टाकण्यांत आली होती आणि ती त्यांनीं कितपत पार पाडली हें त्यांनींच दिलेल्या पिकांच्या लागवडीच्या आंकड्यावरून ठरवावयाचें. त्यामुळें त्यांनीं आपली कर्तबगारी दाखविण्यासाठीं आंकडे चढवून दिले कीं इकडे धान्यपिकांच्या लागवडींत भरमसाठ वाढ झालीच असें सरकार समजतें. अशा प्रकारें दिसणारी वाढ किती बेभरंवशाची असते हें आतां हळू हळू सरकारी अधिकाऱ्यांच्या नजरेस येऊं लागलें आहे. तेव्हां जादा धान्य पिकविण्याची मोहीम पुष्कळच अयशस्वी झाली ही गोष्ट स्पष्ट आहे.

ग्रेगरी समितीनें धान्याचें उत्पादन वाढविण्यासाठीं ज्या इतर सूचना केल्या आहेत त्या तहान लागल्यावर विहीर खणण्याइतक्याच शहाणपणाच्या आहेत. अमोनियम सल्फेट तयार करण्यासाठीं परदेशाहून यंत्रसामुग्री आणावी, ट्यूब वेल्स खोदाव्या, विजेच्या पंपांनीं नद्यांतील पाणी शेतांना देण्याची तजवीज करावी, अशा प्रकारच्या या सूचनांचा सध्यांची धान्यपरिस्थिति सुधारण्यास कसा उपयोग होईल तें एक समितिच जाणे! अमोनियम सल्फेट तयार होऊन बाजारांत यावयास निदान दोन वर्षे तरी लागतील. त्याचप्रमाणें बाकीच्या सूचनाहि कालगत लागणाऱ्या आहेत. सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांनीं या अहवालास जोडलेल्या आपल्या भिन्न मतपत्रिकेंत हीच गोष्ट स्पष्ट-

पणें मांडली आहे. इतर गोष्टी करण्यास सध्यांच्या परिस्थितींत वेळ नाहीं असें म्हणणाऱ्या समितीनें या कालगत लागणाऱ्या शिफारशी कराव्या हें वदतो व्याघातांचेंच उदाहरण नव्हे काय?

धान्यप्राप्तीचें धोरण यशस्वी झाल्याखेरीज त्याच्या वांटपाची योजना यशस्वी होणें शक्य नाहीं. असें असूनसुद्धां त्या बाबतींत अगदीं सर्वसामान्य व उथळपणाचे चार विचार मोठा झोंक आणून सांगण्यापलीकडे समितीनें कांहींहि केलेलें नाहीं. आपापली धान्यप्राप्तीची योजना करण्याचें स्वातंत्र्य तिनें प्रांतिक सरकारांना दिलें आहे व प्रांतिक सरकारकडून हें काम अगदींच अयशस्वी होईपर्यंत त्यांत मध्यवर्ती सरकारनें हात घालूं नये असेंहि तिनें म्हटलें आहे. 'गतायां वरयात्रायां किमानीतेन वाजिना' या म्हणीप्रमाणेंच मध्यवर्ती सरकारची अवस्था होईल अशी तरतूदच अशा शिफारशी करून समितीनें केली आहे. आणि याचीं कटु फळें आजच बंगाल प्रांतांत दृश्यमान होऊं लागलीं आहेत.

धान्यपरिस्थितीची मीमांसा करतांना वर एके ठिकाणीं धान्यपुरवठा कृत्रिम कारणानें कसा घटतो याबद्दल विवेचन केलें आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं धान्यप्राप्तीच्या व वांटपाच्या योजनेनें मुख्यत: दोन गोष्टी साधावयास हव्यात. (१) शेतकऱ्यांच्या निर्वाहास (यांत बीं-बियाण्यांचा अन्तर्भाव होतो.) आवश्यक तेवढें धान्य सोडून बाकीचें धान्य सरकारच्या ताब्यांत आलें पाहिजे. व (२) त्याच्या वांटपाची व्यवस्था सरकारनेंच केली पाहिजे. या दोन्ही गोष्टी साधावयाच्या तर शेतकऱ्याकडे त्याच्या निर्वाहापुरतें धान्य ठेवून बाकीचें सर्व धान्य सरकारनें सक्तीनें विकत घेतलें पाहिजे व तें जनतेस उपलब्ध करण्यासाठीं योग्य व नियंत्रित प्रमाणांत व्यापाऱ्यास देऊन गिऱ्हाइकांस मिळेल अशी व्यवस्था केली पाहिजे. नेहमींच्या व्यापारी मार्गांनीं या योजना यशस्वी होणार नाहींत. यासाठीं सरकारनेंच धान्यपुरवठ्याची व वांटपाची सर्वस्वीं जबाबदारी घेतली पाहिजे. एका ठराविक रकमेपेक्षां जास्त पट्टी देणाऱ्या शेतकऱ्याकडून सक्तीनें धान्य घेऊन व बाकीच्यांवर साऱ्याच्या प्रमाणांत कांहीं ठराविक धान्य देण्याची सक्ति करून लहान शेतकऱ्याचें संरक्षण व जादा धान्य पैदास हीं दोन्हींहि साधतां येतील.

धान्यप्राप्तीचें धोरण हा सर्व प्रश्नाचा मध्य किंवा गाभा असल्यामुळें त्याच्या यशस्वितेवर बऱ्याच प्रमाणांत परिस्थिति सुधारण्याची शक्यता

अवलंबून आहे. वरील गोष्टी लक्षांत घेतां मध्यवर्ती सरकारनें सर्व प्रांतांना लागू होणारी धान्यप्राप्तीची योजना आंखल्याखेरीज यांत यश येणें कठीण आहे. उत्पन्न होणारा धान्याचा पुरवठा सर्व देशांत विभागून त्याचा शक्य तितका उपयोग केला पाहिजे व त्यासाठीं देशाच्या सर्वच भागांतून सक्तीचें धान्य खरेदीचें धोरण अवलंबिणें आवश्यक आहे. यांत तुटीचे प्रांत व जादा उत्पादनाचे प्रांत असा भेद करतां येणार नाहीं. कारण धान्यप्राप्तीच्या धोरणाच्या अंमलबजावणींत कुचराई झाली किंवा ती चुकीच्या पद्धतीनें झाली तर धान्याचा उपलब्ध सांठा कमीच होणार हें उघड आहे. यासाठीं धान्यप्राप्तीची सविस्तर योजना आंखून ती सर्व देशभर सक्तीनें जारी करण्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारास टाळतां येणार नाहीं. ग्रेगरी समितीनें याच्या अगदीं विरुद्ध प्रकारच्या शिफारशी कराव्या हें पाहून आश्चर्य वाटतें!

यामुळें कदाचित् प्रांतिक स्वायत्ततेचा लोप होईल, अशी शंका समितीस आली असावी. परंतु या गोष्टीस इतकें घाबरण्याचें कारण नाहीं. सध्यां प्रांतिक स्वायत्तता हिंदुस्थानांतील फक्त चारच प्रांतांत अस्तित्वांत आहे. शिवाय प्रांतिक स्वायत्तता ७।८ वर्षांहून जुनी नाहीं व मध्यवर्ती सरकारनें आपल्या अखत्यारांत सर्व महत्त्वाचा राज्यकारभार हाकण्याची परंपरा गेल्या १०० वर्षांची आहे. तेव्हां नियंत्रणसौकर्यासाठीं व त्याच्या यशस्वितेसाठीं प्रांतिक स्वायत्ततेचा अंशतः लोप झाल्यास त्याबद्दल विशेष बाऊ करण्याची जरूरी नाहीं. युद्धकालीन नियंत्रणें, विशेषतः आर्थिक नियंत्रणें, मध्यवर्ती सरकारकडूनच यशस्वी रीतीनें अंमलांत आणलीं जातात असा अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, दक्षिण आफ्रिका इत्यादि संयुक्त घटना असणाऱ्या देशांचा अनुभव आहे. युद्ध सुरू झाल्याबरोबर नियंत्रणसौकर्यासाठीं व त्याच्या यशस्वितेसाठीं वर उल्लेखिलेल्या सर्व देशांतून प्रांतिक व प्रादेशिक सरकारांचे अधिकार मध्यवर्ती सरकारनें आपणाकडे घेतले आहेत ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. अशा परिस्थितींत या देशांतील नियंत्रणें यशस्वी व सुकर करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारास प्रांतिक सरकारांचे कांहीं अधिकार आपल्या हातांत घेण्यास कोणतीहि हरकत असण्याचें कारण नाहीं. मध्यवर्ती सरकारास धान्यप्राप्तीच्या धोरणासंबंधीं इतकें उदासीन ठेवण्याचें ग्रेगरी समितीनें कां ठरविलें हें कळत नाहीं.

धान्यवांटपाचे संबंधीं सर्व मोठ्या शहरांतून (१ लाखावर वस्ती असलेल्या) शिधापद्धति अंमलांत आणावी अशी समितीनें शिफारस केली आहे. कांहीं तुटीच्या प्रदेशांतन ग्रामीण भागांतहि अशा तऱ्हेचें कांहींतरी करावें लागेल

असें गुळमुळीत बोलून समितीनें वांटपाचा प्रश्न तेथेंच सोडला आहे. धान्यप्राप्ति झाल्यावर त्याचें वांटप करण्याच्या योजनेसंबंधीं कोणत्याहि प्रकारची चर्चा अगर मार्गदर्शन समितीनें केलेलें नाहीं, याचें आश्चर्य वाटतें. त्याचप्रमाणें वाहतुकीचें योग्य नियंत्रण करून वाहतुकीच्या साधनांवरील बोजा आवांक्याबाहेर कसा जाणार नाहीं यासंबधींहि समितीनें एक अधिकारी अन्नखात्यांत नेमण्यापलीकडे कोणतीच सूचना अगर शिफारस केलेली नाहीं.

एकदां सर्वव्यापी अशी धान्यप्राप्तीची योजना अंमलांत आणावयाचें ठरलें म्हणजे त्या प्राप्त धान्याचें वांटप व वाहतूक करणें अनुषंगानेंच येतें. त्यामुळें शहरांतून शिधापद्धति अंगिकारून तेवढ्यावरच सुटणारा हा प्रश्न नाहीं. ग्रामीण भागांतूनाहि संपूर्ण अगर थोडें वैकल्पिक असें रेशनिंग करणें अगदीं जरूर आहे. यांत पुन्हां तुटीचे प्रांत व जादा धान्य पैदास करणारे प्रांत असा फरक करतां येत नाहीं. शहरांत रेशनिंग झाल्यानें फार तर हिंदुस्थानांतील १५ टक्के लोकांचा प्रश्न सुटूं शकेल. परंतु खेडेगांवांतून आज काय स्थिति आहे याची ज्यास यत्किंचितहि माहिती असेल त्याला बाकीच्या ८५ टक्के लोकांचा प्रश्न तसाच सोडणें हा किती भयंकर हलगर्जीपणा होईल याची कल्पना येईल. पोटापुरतें धान्य न पिकविणारे असंख्य शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार वगैरे लोकांचे त्यामुळें काय हाल होतील याची कल्पनाच केलेली बरी. परंतु या सर्व गोष्टींबद्दल समितीस जाणीव सुद्धां नसावी या दुर्दैवास काय म्हणावें ?

या प्रश्नाशींच निगडित असलेल्या वाहतुकीच्या प्रश्नासंबंधीं या दृष्टीनें पुष्कळच सुचवितां येण्यासारखें होतें. युद्धकालांत वाहतुकीच्या साधनांवरील बोजा वाढला आहे. त्यामुळें धान्याची नेहमींप्रमाणें वाहतूक होण्याच्या मार्गांत पुष्कळच अडचणी निर्माण झाल्या आहेत. तेव्हां त्या सर्व लक्षांत घेऊनच धान्याच्या वांटपाची वगैरे योजना आंखली पाहिजे. या दृष्टीनें पाहतां सर्वांत उत्तम व सोपा मार्ग म्हणजे धान्य व वाहतुकीचीं साधनें या दोन्ही दृष्टीनें स्वयंपूर्ण असे प्रादेशिक विभाग करणें. जवळच्याच प्रदेशांतून धान्याची तूट भरून काढण्याची विस्तृत व परिपूर्ण योजना आंखल्यास वाहतुकीच्या साधनांवरील बोजा पुष्कळच कमी होईल. एक लहानसें उदाहरण घेऊन हा मुद्दा अधिक स्पष्ट करतां येईल. कोंकणांतील तांदुळाची तूट पंजाबमधून बाजरी अगर गहूं आणून भरून न काढतां देशावरून तेथें जोंधळा अगर बाजरी न्यावी व देशावरची तूट शेजारच्या निजाम हैद्राबादेंतून भरून काढावी हा जास्त श्रेयस्कर मार्ग होय.

# १ मुंबई प्रांतांतील धान्यपरिस्थिति कशी सुधारेल?*

मुंबई प्रांतांतील धान्यपरिस्थिति हा हिंदुस्थान देशभर बिघडलेल्या धान्यपरिस्थितीचा एक भाग आहे. त्यामुळें या प्रश्नाची चर्चा करण्याआधीं देशांतील सर्वसाधारण धान्यपरिस्थितीबाबत कांहीं प्रास्ताविक विवेचन करणें आवश्यक आहे.

आज सर्व देशभर खुल्या बाजारांत धान्य दुर्मिळ झालें आहे. किंमती भरमसाट वाढून जनतेच्या आंवाक्याबाहेर गेल्या आहेत. यामुळें जनता अन्नास मोताद झाली आहे. तथापि वट्ट धान्यपुरवठ्यांत मोठी घट झाल्यामुळें वरील परिस्थिति निर्माण झालेली दिसत नाहीं. सर्व देशाचा साकल्यानें विचार केल्यास एकंदर धान्यपुरवठ्यांत पांचसहा टक्क्यांहून जास्त घट झालेली नसावी. वट्ट धान्यपुरवठा जरी फार घटलेला नाहीं तरी जनतेस उपलब्ध होणारा माल फार कमी झाला आहे हें उघड आहे. सामान्यतः देशांत पैदा होणाऱ्या एकंदर धान्यापैकीं कुटुंबाच्या योगक्षेमासाठीं व शेतीच्या कामासाठीं लागणारें धान्य ठेवून बाकीच धान्य शेतकरी विकतो. हें विकाऊ धान्य खेडेगांवांतून शहरांत येतें व व्यापाऱ्यांमार्फत जनतेस उपलब्ध होतें. हा नित्यक्रम झाला. परंतु १९४२ सालच्या सुरुवातीपासून धान्याच्या किंमती एकसारख्या वाढूं लागल्या व त्या अशाच चढत राहतील अशी अपेक्षा निर्माण झाली. यामुळें जादा फायदा मिळविण्याच्या आशेनें शेतकरी व व्यापारी धान्य नेहमींपेक्षां जास्त प्रमाणांत सांठवूं लागले व साहजिकच विकाऊ धान्याचा पुरवठा कमी झाला. गिऱ्हाइकांच्या मागणीपेक्षां हा पुरवठा बराच कमी पडला, किंमती अधिकच चढल्या व पुरवठ्याबद्दल जनतेंत तीव्र साशंकता निर्माण झाली. याचा परिणाम असा झाला, कीं गिऱ्हाईकहि आपापल्या ऐपतीप्रमाणें धान्याचा जास्त सांठा करण्यास प्रवृत्त झालें; त्यामुळें त्याची मागणीहि वाढली. तदनुषंगानें धान्याचे भावहि आणखी वर चढले व सांठे करण्याची सार्वत्रिक वृत्ति आणखीच बळावली. असें हें पुरवठा-किंमतीचें चक्र सुरू झालें व उपलब्ध धान्य भोंवऱ्यांत सांपडल्याप्रमाणें सांठे व काळा बाजार यांत शोषून जाऊं लागलें. धान्याच्या

* किर्लोस्कर मासिक, एप्रिल १९४४

किंमती सारख्या चढत असल्या म्हणजे त्यांचे धान्याच्या उपलब्ध पुरवठ्यावर असे अनिष्ट परिणाम होतात म्हणून किंमती वाढण्याचें बंद झालें नाहीं तोंपर्यंत केवळ उत्पादन अगर पुरवठा वाढविल्यामुळें सध्यांची बिकट परिस्थिति सुधारेल असें म्हणतां येत नाहीं. "हिंदुस्थानांतील धान्यपरिस्थिति ही चलनवृद्धीचीच दुसरी बाजू आहे व हे दोन प्रश्न निरनिराळे सोडवितां येणें शक्य नाहीं," असे उद्‌गार खुद्द अर्थसचिवांनीं विधिमंडळांत काढले आहेत. मूळ चलनवृद्धीला पायबंद घालणें ही मध्यवर्ती सरकारच्या अधिकारांतील गोष्ट आहे. या लेखांत मुंबई प्रांतांतील परिस्थितीचा विचार करावयाचा असल्यानें त्या विषयांत येथें शिरत नाहीं; परंतु प्रांतिक सरकारास साधेल तेवढें किंमतींचें नियंत्रण करून त्या स्थिरावण्याचा प्रयत्न करणें हा धान्यधोरणाचा पाया आहे हें येथवरच्या विवेचनावरून स्पष्ट होईल.

मुंबई प्रांत मुळांतच तुटीचा प्रांत आहे. ग्रेगरी समितीच्या हिशेबानुसार प्रतिवर्षीं या प्रांतांत अंदाजें ४६ लक्ष टन धान्य पैदा होतें. तें येथील जनतेच्या निर्वाहास अपुरें पडत असल्यानें साधारणपणें ७ ते ८ लक्ष टन धान्य प्रतिवर्षी बाहेरून येतें. स्थूल मानानें यापैकीं ४ लक्ष टन तांदूळ व २ लक्ष टन गहूं असतो. पुष्कळसा तांदूळ कोंकणपट्टीसच लागतो. युद्धकालांत बाहेरून किती धान्य आयात करतां येईल हें सर्वस्वी मध्यवर्ती सरकार व इतर शिलकीचे प्रांत यांच्या धोरणावरच अवलंबून आहे. त्यांतच वाहतुकीच्या साधनांचा तुटवडाहि लक्षांत घेतला पाहिजे. एकंदरींत बाहेरून धान्याची आयात पुरेशी होईल अशी सद्यःस्थितींत अपेक्षा करतां येत नाहीं. मुंबई प्रांतांतील धान्यविषयक धोरण मुख्यतः येथील उत्पादन वाढविणें व पैदा होणारें धान्य जनतेस उपलब्ध करून पुरविणें या दृष्टीनेंच आंखलें पाहिजे.

उत्पादन वाढविण्याच्या धोरणाबाबत विशेष चर्चा या लेखांत केलेली नाहीं. कारण आतां उत्पादनहंगामाचा शेवट असल्यामुळें यंदापुरतें तरी पीक जें काय आलें तेवढेंच हातचें असें धरून चाललें पाहिजे. तात्कालिक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे हें पीक शेतकऱ्याच्या हातून निघून गरजू जनतेस कसें मिळेल हाच होय. कांहीं जणांच्या मतें सर्व घोटाळा नियंत्रणामुळें निर्माण झाला आहे. पैदा झालेलें धान्य उपलब्ध करण्यासाठीं

खुल्या व्यापाराचें धोरण स्वीकारावें असें हे प्रतिपादतात. खुल्या व्यापारांत मागणी व पुरवठा यांचें समीकरण किंमतींच्या चढउतारामुळें होतें. चढीच्या किंमतीचा परिणाम पुरवठा वाढविण्यांत होतो असें यांत गृहित आहे. परंतु बाहेरून पुरवठा येणें अशक्य झाल्यामुळें कितीहि किंमती वाढल्या तरी पुरवठा आजच्या परिस्थितींत वाढूं शकत नाहीं. उलट चलनवृद्धीमुळें पुरवठा वाढण्याऐवजीं धान्य बाजारांतून अजिबात नाहींसें होतें हा अनुभव आहे. पुरवठ्यांत अशी तूट पडूं लागली म्हणजे मागणी व पुरवठा यांचें समीकरण होणें याचा अर्थ एवढाच, कीं किंमती बहुजनांच्या आंवाक्याबाहेर जाऊन गरीब जनतेची उपासमार होणें. आज पुरवठा वाढत नाहींच. मग मागणी कमी होण्याचा एकमेव मार्ग लाखों माणसें भुकेनें मरणें. या सर्वांचें दृश्य चित्र बंगालमध्यें स्पष्ट दिसलेलेंच आहे. तेव्हां खुल्या व्यापाराचें तत्त्व येथें निदान उघड्या डोळ्यांनीं अंमलांत आणणें शक्य नाहीं, हें निश्चित मानून पुढें विवेचन करण्यास हरकत नाहीं.

आजच्या परिस्थितींत पूर्ण अनियंत्रित व्यापार स्वीकारतां येत नाहीं. एवढेंच नव्हे, तर अर्धवट नियंत्रणानेंहि काम भागण्यासारखें नाहीं. धान्याच्या किंमती स्थिरावणें हा प्राथमिक उद्देश केवळ सरकारी फर्मानानें साध्य होणार नाहीं हें उघड आहे. याकरितां सरकारच्या हातांत कांहींतरी धान्य पाहिजे. शिलकी प्रांतांत सरकारच्या हातांतील धान्याचा सांठा फार मोठा नसला तरी चालण्यासारखें आहे. कारण एकंदर प्रांतांतील पैदास भरपूर असल्यामुळें तेथील सर्व सांठेबाजांस आपल्या विवक्षित सांठ्याच्या अभावीं जनतेचें अगर सरकारचें नडेलच अशी खात्री नसते. यामुळें सरकारी खरेदी ठराविक प्रमाणांत झाली तरी भावनियंत्रण करतां येतें. तुटीच्या प्रांतांची परिस्थिति निराळी आहे. पैदाशीपैकीं कांहीं थोडा भागहि सांठेबाजांनीं अडकविला तरी तूट फार वाढून भावनियंत्रण कठीण होतें. म्हणून अशा प्रांतांत सरकारनें सर्वच उपलब्ध पीक आपल्या ताब्यांत घेणें महत्त्वाचें आहे.

मुंबई प्रांत हा तुटीचा असल्यामुळें येथील धान्यप्राप्तीचें धोरण या दृष्टीनेंच आंखलें पाहिजे. तुटीच्या प्रांतांत सरकारी धान्यखरेदी कांहीं प्रमाणांत तरी अटळ आहे असें आजवरच्या अनुभवावरून ठरल्यामुळें मुंबई सरकारनें यंदाच्या खरीप हंगामापासून सरकारी सांठा निर्माण करण्याच्या उद्देशानें धान्याची प्राथमिक खरेदी करण्याचें धोरण स्वीकारलें. ही खरेदी प्रत्यक्षपणें

सक्तीची नव्हती. परंतु सर्वसाधारणपणें जोंधळा-बाजरीच्या एकंदर पिकापैकीं १० टक्के व तांदुळाच्या पिकापैकीं २५ टक्के सरकारास विकत घेणें आहे असें जाहीर करण्यांत आलें होतें व सरकारी खरेदी पुरी होईपावेतों प्रत्येक गांवांत पैदा झालेलें धान्य तेथून बाहेर नेणें अगर त्याबाबत इतर व्यवहार करणें यास बंदी करण्यांत आली. या नाकेबंदीमुळें निश्चित सक्ति पुरवली असें वाटूं लागलें. जिल्ह्यांतून खरेदी करावयाच्या धान्याचा एक इष्टांक ठरवून तो भरून काढण्याच्या धोरणानें ह्या खरेद्या झाल्या. या योजनेचा तपशील प्रांतिक सरकारनें न ठरवितां त्याबाबतींत जिल्हाधिकाऱ्यांना बरेंच स्वातंत्र्य देण्यांत आलें होतें. त्यामुळें प्रत्येक जिल्ह्यांतील खरेदीच्या योजनेचें स्वरूप निरनिराळें राहिलें. परस्परांत कांहींच मेळ राहिला नाहीं. कांहीं जिल्ह्यांतून सरसकट सर्व शेतकऱ्यांकडून ठरलेल्या प्रमाणांत धान्य घेण्यांत आलें व त्यामुळें ज्या शेतकऱ्यांचें धान्याचें वार्षिक उत्पादन त्यांच्या पोटापुरतेंच अगर त्याहूनहि कमी होतें, त्यांच्याकडूनहि खरेदी झाली. उलट कांहीं जिल्ह्यांतून अशा शेतकऱ्यांवर सक्ति होऊं नये अशी योजना करण्यांत आली होती. पुणें जिल्ह्यांत वार्षिक सहा रुपये सारा भरणाऱ्या शेतकऱ्यावर धान्य विकावयाची सक्ति नसावी असें धोरण जाहीर झालें होतें. खेडेगांवांतील बलुतेदार व मजूर यांना नेहमींप्रमाणें धान्यांत मुशाहिरा देऊं नये असा हुकमहि कांहीं जिल्ह्यांतून जारी केला गेला होता; तर कांहीं जिल्ह्यांत असें कोणतेंच बंधन घालण्यांत आलें नव्हतें. याशिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे या खरेदीच्या योजनांच्या तपशिलांबाबत कोणत्याहि प्रकारची जाहीर माहिती मिळूं नये व गुप्तपणें सर्व काम व्हावें अशी विना-कारण व्यवस्था सरकारी अधिकाऱ्यांनीं केली होती. या विसंगत धोरणाच्या गोंधळामुळें लहान शेतकरी व अलुते-बलुते यांची परिस्थिति पुष्कळ ठिकाणीं कठीण झाली. त्याचप्रमाणें या खरेदीच्या योजनेबद्दल गुप्तता बाळगल्यामुळें अन्याय व जुलूम होण्यास अधिकच वाव मिळाला व सरकारी धोरणाबद्दल एकप्रकारचें संशयास्पद वातावरण निर्माण झालें.

सरकारी खरेदीच्या आजवरच्या अनुभवावरून बऱ्याच गोष्टी निश्चित सांगतां येण्यासारख्या आहेत. एक तर सक्ति नसून कुचंबणा होण्यापेक्षां प्रत्यक्ष सक्तीनें साऱ्यासारखी धान्यवसुली जास्त श्रेयस्कर. दुसरें म्हणजे ही वसुली निश्चित प्रांतिक योजनेनुसार झाली पाहिजे. ही योजना जनतेस समजावून दिली पाहिजे. तींत स्थानिक फेरबदल करण्याची शक्यता असूं

नये. केवळ शेतकऱ्याचें विकाऊ धान्य शक्य तितकें सरकारच्या हातांत यावें या उद्देशानें योजनेची आंखणी झाली पाहिजे. अर्थात् स्वतःच्या गरजे-पुरतेंच अगर त्याहून कमी धान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेंतून वगळलें पाहिजे. त्याचप्रमाणें सर्व शेतकऱ्यांकडून एका ठराविक प्रमाणांत धान्यखरेदी न करतां कमीजास्त पैदाशीच्या श्रेणीप्रमाणें चढत्या अगर पडत्या प्रमाणांत धान्याची खरेदी झाली पाहिजे. ही धान्यखरेदी मुलकी अधि-काऱ्यांनीं केलेलीच उत्तम.

ही प्राथमिक सक्तीची खरेदी झाली. या खरेदीमुळें मोठे सरकारी सांठे एकदम निर्माण होतील. पण एवढ्यानें काम भागणार नाहीं. प्रत्येक शेतकऱ्याचा शिलकी माल किती हें पूर्णपणें कळणें अशक्य आहे व निर-निराळा वैयक्तिक हिशेब सक्तीच्या योजनेंत करतां येणार नाहीं. तेव्हां सर्व विकाऊ माल एकदमच सरकारच्या ताब्यांत येणार नाहीं. याकरितां प्राथमिक खरेदीनंतरहि धान्य-विक्रीवरचें नित्याचें बंधन चालू राहिलें पाहिजे. निर्बंधांचे प्रकार दोन. एक तर सरकार अगर विविक्षित परवाना असलेले व्यापारी अगर संस्था यांखेरीज धान्यखरेदीचा कोणासहि अधिकार नसावा; व दुसरें म्हणजे धान्यवाहतूक नियंत्रित असावी. गांवांतून धान्य बाहेर नेण्यासंबंधीं जो निर्बंध घालण्यांत आला आहे तो तसाच कायम ठेवला पाहिजे. कारण हा निर्बंध उठविल्यास हें धान्य खुल्या बाजारांत न जातां काळ्या बाजारांत नाहींसें होण्याचा संभव फार. गांवांतल्या गांवांत खाण्यास गिऱ्हाइकास किरकोळ विक्री करण्यास हरकत असूं नये. याव्यतिरिक्त धान्य विकावयाचें असल्यास तें सरकारी परवानगीनें सरकारी खरेदीकेंद्रास अगर सरकारच्या अधिकृत अशा व्यापाऱ्यांस विकावयासच हालवितां यावें. सरकारी केंद्रांत अगर व्यापाऱ्यांनीं करावयाची अशा प्रकारची धान्यखरेदी हंगामापुरतीच न करतां सर्व वर्षभर अखंडित केली पाहिजे.

धान्यखरेदी सक्तीनें होतें असें दिसल्यास शेतकरी अगदीं जरुरी-पुरतेंच धान्य पिकवून धान्याव्यतिरिक्त पिकें जास्त लावूं लागेल असा संभव आहे. याकरितां सक्तीच्या योजनेंत धान्य किती द्यावयाचें याचा एकंदर साऱ्याशीं संबंध जोडला पाहिजे. म्हणजे धान्य कमी पेरण्याची भीति राहणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर आज कमी प्रमाणांत धान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना जास्त धान्य पिकवावें लागेल व त्यामुळें एकंदर धान्यपैदासहि वाढेल.

आणि यापुढचा प्रश्न म्हणजे धान्यवांटपाचा. सक्तीच्या धान्य-खरेदीचें धोरण सरकारनें आंखलें कीं जनतेस लागणाऱ्या धान्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी सरकारवर आलीच. यासाठीं धान्यखरेदीची योजना तदुत्तर होणाऱ्या वांटपास अनुलक्षून केली पाहिजे. शेती, धंदा व कुटुंबपोषण एवढ्यापुरतेंच धान्य-उत्पादन होणाऱ्या शेतकऱ्यांना सक्तीच्या धान्यखरेदीं-तून माफी दिली म्हणजे त्यांना धान्य पुरविण्याच्या जबाबदारींतून सरकार मुक्त होतें. त्याचप्रमाणें अलुत्याबलुत्यांचे व मजुरांचे नेहमींचे मुशाहिरे धान्य-रूपानें देण्यावर सरकारनें निर्बंध घातला नाहीं म्हणजे त्यांना धान्य पुर-विण्याच्या जबाबदारींतून सरकार अंशतः तरी मुक्त होतें. खरेदीची योजना आंखतांनाच या गोष्टींची तरतूद केली म्हणजे वांटपाच्या कामाचा त्या त्या बाबतींतील प्रश्न सुटतो व एकंदर कामाचा बोजाहि कमी होतो. परंतु यांतून वगळलेल्या जनतेस व योगक्षेमास लागतें त्याहूनहि कमी धान्य पिकणाऱ्या शेतकऱ्यास व गरजेहून कमी धान्य वांट्यास येणाऱ्या अलुत्याबलुत्यास व मजुरास धान्य पुरविण्याची जबाबदारी सरकारवर पडते. ती कशी पार पाडतां येईल इकडे आतां वळूं.

कांहीं मोठ्या शहरांतून शिधापद्धति अंमलांत आलेली आहे व तेथें धान्याच्या वांटपाची जबाबदारी सरकारनें घेतलीच आहे. परंतु लहान शहरां-तून सध्यां धान्याच्या बाबतींत फार हलाखीची स्थिति झाली आहे. तेथें सरकारनें शिधापद्धति तावडतोब अमलांत आणणें आवश्यक आहे. बहुतेक शहरांतून गहूं, साखर, रॉकेल वगैरे पदार्थांच्या रेशनिंगसाठीं कुटुंबांची मोजदाद, त्यांच्या याद्या वगैरे तयार झालेल्या आहेत. त्यामुळें तेथें शिधापद्धती-साठीं लागणारी सर्व पूर्वतयारी झाली आहे. म्हणून तेथें शिधापद्धति तावडतोब अमलांत आणणें सुलभ होईल.

परंतु येथेंच न थांबतां ही घरटी वांटपाची पद्धति अंशमानानें तरी ग्रामीण भागांतूनहि अमलांत आणली पाहिजे. ही गोष्ट सकृतदर्शनीं दिसते तितकी अवघड नाहीं. आजसुद्धां साखर, रॉकेल वगैरे पदार्थांच्या वांटपासाठीं खेडोपाडीं विशिष्ट प्रकारची व्यवस्था पुष्कळ ठिकाणीं चालू आहे. बहुतेक आठवड्याचा बाजार जेथें भरतो तेथून अशा वांटपाची व्यवस्था करतां येईल. प्रत्येक मध्यवर्ती दुकानांतून भोंवतालच्या आठदहा खेड्यांतील रहिवाशांस पुरवठ्याची व्यवस्था करतां येईल. खेड्यास एक वार नेमून देऊन आठव-

ढ्यास त्या वारींच तेथील कुटुंबांची खरेदी होईल. कुटुंबें व त्यांतील माणसें यांची यादी करून धान्य ठराविक प्रमाणांत यादीबरहुकूम विकतां येईल. धान्य-खरेदीच्या योजनेच्या वेळीं प्रत्येक उत्पादक कुटुंबाची यादी व त्यांचें उत्पादन यांची यादी प्रत्येक गांवीं तयार करावीच लागेल. या यादीस बिगर उत्पादक कुटुंबांची यादी जोडून घरटी धान्य केव्हां, कसें व किती द्यावयाचें हें ठरवितां येईल. या पद्धतीचा अवलंब केल्यास वांटपाचा प्रश्न सुकर व सोईस्कर रीतीनें सुटणार आहे. अर्थात्च हीं वांटप-केंद्रें शक्यतोंवर सरकारी अगर सहकारी पेढ्या, बँका अशांसारख्या संस्थांनीं चालविलेलीं असावींत. खरेदीचें व वांटपाचें दुकान सोयीसाठीं एकच असावयास हरकत नाहीं. परंतु खरेदीखातें व विक्रीखातें हीं अगदीं स्वतंत्र व अलग असलीं पाहिजेत. ही व्यवस्था स्वतंत्र नसल्यास घोटाळे उत्पन्न होतील व संधिसाधू लोक त्याचा अनिष्ट प्रकारें फायदा घेतील. यासाठीं खरेदीखात्यानें सरकारच्या लेखी हुकुमाशिवाय विक्रीखात्यास धान्य पुरवितां कामा नये असाहि निर्बंध घालावयास हवा.

जिल्ह्याजिल्ह्यांतील धान्याच्या वांटपाची जबाबदारी खुद्द प्रांतिक सरकारनेंच स्वीकारली पाहिजे. सध्यां प्रत्येक जिल्ह्यांतील कलेक्टरवर त्या त्या जिल्ह्याला इतर जिल्ह्यांतून धान्य आणविण्याची अगर पाठविण्याची जबाबदारी टाकलेली आहे. त्याचे परिणाम फार अनिष्ट होतात. आज हिंदुस्थानांत धान्यतुटीचे व शिलकीचे प्रांत यांच्यांत जो लढा निर्माण झाला आहे तशाच प्रकारचा लढा एकाच प्रांतांतील तुटीचे व शिलकीचे जिल्हे यांच्यांत वरील पद्धतीमुळें होतो व त्यामुळें सर्व घोटाळा व गोंधळ निर्माण होतो. यासाठीं सरकारी केंद्रांनीं किती धान्य खरेदी केलें, कोठें किती धान्याची गरज आहे व तेथें तें सोयिस्कर रीतीनें कोठून पाठवितां येईल याबद्दल प्रांतिक सरकारनें अगदीं तपशीलवार माहितीचा आराखडा नेहमीं तयार ठेवला पाहिजे व त्याच्या अनुरोधानें धान्याची नेआण वगैरे गोष्टी केल्या पाहिजेत. या गोष्टी जिल्हाधिकाऱ्यांवर सोंपवून भागणार नाहीं.

वरील सर्व चर्चेंत धान्यखरेदी कोणत्या भावानें करावी व धान्य-वांटपाच्या वेळीं कोणती किंमत लावावी यांसंबंधीं कांहींच लिहिलें नाहीं. याचें कारण तो प्रश्न संपूर्णपणें प्रांतिक सरकाराच्या अखत्यारांतील नाहीं. शेतकऱ्याकडून ज्या भावानें धान्यखरेदी करावयाची त्या भावाच्या अनुरोधानेंच इतर जनतेकडून त्याची किंमत घेणें न्याय्य आहे. परंतु खरेदी करतांना

शेतकऱ्यास द्यावयाचा भाव कसा ठरवावा? ज्या मानानें इतर वस्तूंच्या किंमती वाढलेल्या आहेत त्या मानानें वाढलेल्या धान्याच्या भावानें खरेदी केल्यास शेतकऱ्यांचें नुकसान होणार नाहीं. परंतु इतर वस्तूंचे भाव कमी न करतां फक्त धान्याचे भाव कमी ठेवून तदनुसार खरेदी करणें म्हणजे शेतकऱ्याला पिळून काढणेंच होय. तेव्हां ठरविलेल्या धान्याच्या भावामुळें शेतकऱ्यावर अन्याय होऊं नये यासाठीं इतर वस्तूंचे भावहि नियंत्रित केले पाहिजेत. धान्याचें भावनियंत्रिण हा सर्वकष भावनियंत्रणाचा एक भाग आहे ही गोष्ट स्पष्टच आहे. सर्वकष भावनियंत्रण चलनवृद्धीस आळा घातल्याखेरीज यशस्वी होणें शक्य नाहीं. परंतु या दोन्ही गोष्टी मध्यवर्ती सरकारनें करावयाच्या आहेत.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भावनियंत्रण संस्थानांतूनहि होईल अशी व्यवस्था करणें. मुंबई प्रांताच्या सरहद्दींत बरींचशीं लहानसहान संस्थानें आहेत. परंतु ब्रिटिश मुलुखांतील भावनियंत्रण व संस्थानांतील भावनियंत्रण यांचा परस्परसंबंध राखण्याची कोणतीहि व्यवस्था नाहीं. यामुळें सभोंवतालच्या खालसा भागापेक्षां या संस्थानांतून धान्यांचे व इतर वस्तूंचे भाव कांहीं प्रसंगीं पुष्कळच जास्त होण्याचा संभव आहे. असें झाल्यास खालसांतील धान्य हीं संस्थानें आपल्याकडे ओढून घेतील व त्यामुळें खालसांतील धान्याचा पुरवठा कमी होईल. यासाठीं लगतच्या सर्व प्रदेशांत एकसारखें धोरण स्वीकारलें जाईल हेंहि पाहाणें फार महत्त्वाचें आहे.

सरकारी अधिकाऱ्यांच्या हातीं इतक्या विस्तृत स्वरूपाचें नियंत्रण करण्याचें काम द्यावें कीं नाहीं याबद्दल पुष्कळांस शंका वाटते. लांचलुचपत वगैरे गोष्टींमुळें अशा नियंत्रणापासून फायद्याऐवजीं तोटाच जास्त होईल असें त्यांस वाटतें. परंतु ही शंका अनाठायीं नसली तरी एकंदर परिस्थितीचा विचार करतां फारशी योग्य नाहीं असें दिसून येईल. अनिर्बंध व्यवहार व लांचलुचपत घेणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांकडून होणारें नियंत्रण यांपैकीं जास्त फायद्याचें कोणतें हें आपल्यास ठरवावयाचें आहे. सध्यांच्या दोषयुक्त नियंत्रणामुळें अगदीं अनिर्बंध व्यवहारापेक्षां आपला जास्त फायदा होत आहे ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. अनिर्बंध व्यवहारामुळें होणारे हाल बंगाल्यांत स्पष्ट झाले आहेत. आजचें अपुरें व दोषयुक्त नियंत्रणहि अनिर्बंध व्यवहारापेक्षां केव्हांहि जास्त चांगलें.

दोषयुक्त नियंत्रणाची जबाबदारी फार मोठ्या प्रमाणांत जनतेवरच येते हेंहि विसरून चालणार नाहीं. सर्व सरकारी योजनेंत व्यत्यय आणण्यांत शहाणपणा मानणें, सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रमादाबाबत जागरूक नसणें व स्वार्थाकरितां स्वतः नियंत्रणभंग करून व्यापाऱ्यांस व अधिकाऱ्यांस मोह पाडणें हें सर्वसामान्य लोकांकडून होतें. नियंत्रणासंबंधीं प्रत्येक नागरिकाचें प्रथम कर्तव्य म्हणजे सरकारी योजनांशीं संपूर्ण सहकार्य. याच्यांत परकी सरकारास मदत करून देशद्रोही म्हणून शिक्का बसण्याचा प्रश्न नाहीं. जनतेवर आलेलें भीषण संकट टाळण्यासाठीं आप्तजनांसंबंधींचें हें प्रत्येक नागरिकाचें प्राप्त कर्तव्यच आहे. त्याचप्रमाणें विशेषतः सुखवस्तु नागरिकांचें दुसरें कर्तव्य म्हणजे त्यांच्याजवळ सुदैवानें असलेल्या थोड्याफार फाजील क्रय-शक्तीचा दुरुपयोग न करणें. रेशनपेक्षां जास्त धान्य काळ्या बाजारांत खरेदी करणें व सांठवून ठेवणें, मोठमोठ्या मेजवान्या देणें हीं सध्यांच्या काळीं प्रतिष्ठेचीं अगर श्रीमंतीचीं लक्षणें कांहीं मानीत असतील. परंतु धान्य सांठविणें अगर मेजवानी देणें ही गोष्ट आतां पूर्वीसारखी वैयक्तिक राहिली नाहीं. स्वतःच्या गरजेपेक्षां जास्त धान्य सांठवून ठेवणें अगर पांचपन्नास लोकांस जेवावयास घालणें म्हणजे तेवढें धान्य अगर शिधा अनाठायीं फुकट घालविणें होय. आणि धान्य फुकट घालविण्यापेक्षां त्याचा घोर परिणाम म्हणजे काळ्या बाजारांतील व्यापारी व लांचखाऊ अधिकारी यांस त्यामुळें उत्तेजन मिळतें. असलें वर्तन म्हणजे सध्यांच्या काळांत सर्वांत मोठा जनताद्रोह व पर्यायानें देशद्रोह होय.

ता. १ मार्च १८९२ च्या 'केसरींत' लोकमान्य टिळक त्यावेळच्या दुष्काळास उद्देशून लिहितात– "दुष्काळाच्या वर्षीं लग्नादिकांसारखे फाजील खर्चाचे समारंभ कमी होतात असा जगाचा साधारण नियम आहे. पण आम्हीं सर्वच साधारण नियमांना अपवाद आहोंत. तेव्हां यंदा येथें ( पुण्यांत ) लग्नकार्यांचें कमी तर नाहींच, पण उलट दर वर्षीपेक्षां थोडेंबहुत जास्ती प्रमाण आहे, ह्यांत आश्चर्य नाहीं ! खेड्यापाड्यांतून हजारों गरीब लोक धान्याच्या टंचाईमुळें एव्हांपासून निवडुंगांवर उपजीविका करूं लागले आहेत. पोटाकरितां घरदार सोडून बाहेर जाणारांची संख्या उत्तरोत्तर वाढत आहे व ह्याहून अधिक वाढत जाण्याचा संभव दिसत आहे. यंदाचें साल सुखरूप कसें पार पडतें व पुढील वर्षीं काय स्थिति होते ह्याची सर्वांत मोठी काळजी

लागली आहे. असें असूनहि मोतीचूर-जिलब्यांचीं प्रयोजनांवर प्रयोजनें झोडण्यांत मंडळी गर्क झाली आहेत!... ह्यापेक्षां आमच्या परदुःखशीतलतेचें, अदूरदर्शित्वाचें व बेअकलेचें आणखी दुसरें निदर्शक कोणतें पाहिजे? आणि खरेंच, पंचपक्वान्नांनीं ढेकर देत पोटावर हात फिरवितांना ज्यांच्या कष्टावर आपणाला फुकट खावयास मिळतें त्या बिचाऱ्या शेतकऱ्यांची व मजूरदारांची कशी अन्नान्नदशा झाली आहे किंवा लवकरच होण्याची भीति आहे त्याची आठवण आम्हांस कशानें होणार?"

लोकमान्यांनीं कांहींशा भिन्न परिस्थितींत ओढलेले कोरडे आजहि अनाठायीं आहेत असें म्हणण्याचें धाडस निदान आमच्यानें तरी करवत नाहीं.

# १० हिंदुस्थानांतील सोन्याची विक्री*

**सस्यं सुदुर्लभमभूत् स्वर्ण तु सुलभं तदा**

—शिवभारत

दोन आठवड्यांपूर्वी सोन्याच्या भावांत एकदम तेजी झाली. सोनें विकत घेणाऱ्यांची ठिकठिकाणीं झुंबड लागली. गेल्या ऑगस्टपासून रिझर्व्ह बँकेमार्फत होणारी सोन्याची विक्री व त्यासंबंधीं दक्षिण आफ्रिकेच्या पार्लमेंटांत नुकतीच झालेली चर्चा आणि विचारले गेलेले प्रश्न, या सर्वच गोष्टींमुळें या प्रश्नासंबंधीं जनतेंत कुतूहल निर्माण झालें आहे, व त्यासंबंधीं निरनिराळ्या ठिकाणीं चर्चा होत आहेत. अर्थशास्त्रांतील अगदीं किचकट विषयांपैकीं हा विषय असल्यामुळें त्यासंबंधीं गैरसमज होण्याचा फार संभव आहे. म्हणून यांतील खरी वस्तुस्थिति काय आहे याचा उहापोह येथें करण्याचें योजिलें आहे.

गेल्या ऑगस्टपासून हिंदुस्थानाप्रमाणेंच इजिप्त, इराक, चीन, मेक्सिको वगैरे दोस्त राष्ट्रांतूनहि सरकारी संस्थांमार्फत सोन्याची विक्री होत आहे. दोस्तराष्ट्रांनीं युद्धकालांत या देशांतून प्रचंड प्रमाणावर माल खरीदला. या खरेदीसाठीं लागणारी रक्कम या देशांतील सरकारास कर व कर्जें या रूपानें न उभारतां आल्यामुळें त्यासाठीं त्यास चलनविस्तार करावा लागला. या देशांतून दोस्तराष्ट्रांच्या खरेद्यांच्या अनुषंगानें बराच चलनविस्तार झाला व कांहीं ठिकाणीं त्यास चलनवृद्धीचेंहि स्वरूप प्राप्त झालें. चलनवृद्धीमुळें या देशांतील युद्धप्रयत्नांना अडथळा येऊं लागला. ही परिस्थिति सुधारावयाची तर या देशांतून चलनवृद्धीला आळा घातला पाहिजे असें दोस्तराष्ट्र-धुरीणांच्या प्रत्ययास आलें. दोस्तराष्ट्रांच्या खरेद्या थांबविणें युद्धप्रयत्नाच्या दृष्टीनें अशक्यच असल्यामुळें त्यांच्यासाठीं कर व कर्जें या रूपानें उभारलेल्या रकमेपेक्षां जास्त लागणारी रक्कम चलनविस्तार करून न उभारतां सोन्याची विक्री करून उभारल्यास त्या प्रमाणांत चलनविस्तार टळतो व जनतेच्या हातीं असलेलें चलनहि सरकारी तिजोरीकडे आकर्षित करतां येतें आणि त्यामुळें चलनवृद्धीस आळा बसतो. चलनवृद्धीला आळा घालण्यासाठीं या देशांतून सोन्याची विक्री करावी असें दोस्तराष्ट्र-धुरीणांनीं ठरविलें. या ठरावाप्रमाणें

---

* ज्ञानप्रकाश, २५ एप्रिल १९४४

इंग्लंड व अमेरिका यांनीं आपल्या सुवर्णभांडारांतून या देशांत सोनें पाठवून त्याची विक्री चालू केली. यासंबंधीं आणखी विवेचन करण्यापूर्वी युद्ध-कालांतील सोन्याचे भाव व त्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठ याबद्दल थोडेंसें लिहिलें पाहिजे.

सोन्याचें उत्पादन बऱ्याच मोठ्या प्रमाणावर ब्रिटिश साम्राज्यांतील दक्षिण आफ्रिका वगैरे देशांतून होतें. परंतु जगांत अस्तित्वांत असलेल्या सोन्याच्या सांठ्याचा बराच मोठा भाग, जवळजवळ ७० टक्के, अमेरिकेपाशीं आहे. शांततेच्या काळांत कोणत्याहि राष्ट्राला लागेल त्या प्रमाणांत सोनें विकत घेतां येत असे, तसेंच विकतां येत असे. सोन्याची बाजारपेठ खुली होती व सोन्याचे भाव जगभर साधारणपणें सारखेच असत. प्रस्तुत युद्ध सुरू झाल्यापासून सोन्याच्या खरेदीविक्रीवर व आयातनिर्यातीवर बहुतेक ठिकाणीं नियंत्रण घालण्यांत आलें. सोन्याची निर्यात किंवा आयात करणें असल्यास सरकारची परवानगी लागते. युद्धकालांत सोन्याची बाजारपेठ पूर्वींप्रमाणें खुली राहिली नाहीं व त्यामुळें आज सोन्याचे भाव निरनिराळ्या देशांत वेगळे वेगळे आहेत. १९४० सालीं दक्षिण आफ्रिका व इंग्लंड यांच्यामध्यें एक करार होऊन त्याअन्वयें दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला लागेल त्याखेरीज उरणारें सर्व सोन्याचें उत्पादन इंग्लंडनें एक औंसास १६८ शिलिंग या भावानें विकत घ्यावें असें ठरलें. अमेरिका गेलीं कित्येक वर्षें औंसास ३५ डॉलर या भावानें सोनें विकत घेत आहे.

चलनवृद्धीस आळा घालण्याच्या उद्देशानें रिझर्व्ह बँक ऑगस्ट १९४३ पासून सोन्याची विक्री करूं लागली. ऑगस्टपासून जानेवारी १९४४ पर्यंत सुमारें ३५ लाख तोळे सोनें रिझर्व्ह बँकेतर्फे विकण्यांत आलें. या काळांत सोन्याचा भाव तोळ्यास रु. ७२ ते रु. ८० पर्यंत चढत उतरत असे. ३५ लाख तोळे सोनें विकून रिझर्व्ह बँकेनें सरासरीनें रु. ३० कोटींचें चलन जनतेपासून खेचलें. सोन्याची विक्री कमीजास्त प्रमाणांत होई. कधीं आठवड्यांत २० हजार ते ३० हजार तोळे सोनें विकलें जाई, तर कधींकधीं एका दिवसांतच बँकेनें ४ ते ५ लाख तोळे सोनें विकलें. रिझर्व्ह बँकेनें सोनें विकावयास सुरवात केली त्यावेळीं सोन्यांचा दर तोळ्यास रु. ७१ आ. ४ होता, तो नोव्हेंबरच्या सुमारास रु. ८४ पर्यंत चढला व तेथून पुन्हां खालीं आला. या काळांत रिझर्व्ह बँक ज्या दरानें सोनें विकत असे तो दर सोन्याच्या बाजारभावाप्रमाणेंच

कमीजास्त होत असे, आणि कित्येक वेळीं ठराविक दरापेक्षां बाजारभाव कमी असल्यास रिझर्व्ह बँक सोनें विकावयाचें नाकारीत असे. मात्र परवां परवांपर्यंत ठरलेल्या भावांत जितकी मागणी येईल तितकें सोनें रिझर्व्ह बँक विकीत होती. त्यामुळें आरंभींच्या सुभाषितांत वर्णिल्याप्रमाणें धान्य पाहिजे तितकें मिळत नव्हतें पण सोनें मात्र लागेल तेवढें मिळत होतें. दोन आठवड्यांपूर्वी सोन्याचा भाव एकदम चढला व सोन्याला अतोनात मागणी येऊं लागली. तेव्हांपासून रिझर्व्ह बँकेनें दररोज फक्त १ लक्ष तोळे सोनें विकावयाचें धोरण अवलंबिलें आहे. गेल्या पंधरवड्यांत जवळजवळ १५ लक्ष तोळे सोनें विकलें गेलें असावें असा अंदाज आहे

हिंदुस्थानांत अशा प्रकारें विकलें जाणारें सोनें कोणाचें आहे व तें कोठून येतें याबद्दल बरेचसे तर्क लढविण्यांत आले. दक्षिण आफ्रिका जो माल हिंदुस्थानांत खरेदी करते त्याबद्दल त्या देशानें हें सोनें दिलेलें असावें असें मत सर चुनीलाल मेहता यांनीं प्रथम प्रसिद्ध केलें. दुसऱ्या कांहींच्या मतें हिंदुस्थान सरकारच विलायतेंत सांठत असलेल्या स्टर्लिंगचा उपयोग करून सोनें खरेदीत आहे व येथें रिझर्व्ह बँकेमार्फत विकत आहे. यासंबंधीं हिंदुस्थान सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं फेब्रुवारींत विधिमंडळांत खुलासा करतांना सांगितलें कीं, "हिंदुस्थानांत विकलें जाणारें सोनें इंग्लंड व अमेरिका यांचें आहे व तें रिझर्व्ह बँकेमार्फत त्यांच्यासाठीं विकलें जात आहे. या विक्रीपासून येणाऱ्या पैशांतून या दोन्ही सरकारांस येथें जो खर्च करावयाचा असतो, तो भागविण्यांत येतो."

हा खुलासा प्रसिद्ध झाल्याबरोबर ही विक्रीची पद्धति इतर देशांतील पद्धतीहून भिन्न आहे हें स्पष्ट झालें; कारण इजिप्तमध्यें होणाऱ्या सोन्याच्या विक्रीसाठीं लागणारें सोनें इजिप्तच्या नॅशनल बँकेनें लंडनमधील आपल्या स्टर्लिंग शिलकींतून खरीदलेलें आहे. त्याचप्रमाणें चीननेंहि आपल्याला मिळालेलें डॉलर कर्ज खर्चूनच सोनें खरीदलें आहे. त्यामुळें या दोन्ही देशांतील सरकारांना सोनें विकत घेतांना सोन्याची स्टर्लिंग व डॉलरमध्यें चालू असलेली किंमत द्यावी लागली. ती किंमत अर्थातच त्या दोन्ही देशांतील अन्तर्गत सोन्याच्या किंमतीपेक्षां पुष्कळच कमी होती. त्यामुळें सोन्याची विक्री करून येणारा फायदा या दोन देशांतील सरकारांच्या तिजोरींत जमा होत आहे. परंतु हिंदुस्थानांत होणाऱ्या सोन्याच्या विक्रीवरील नफा हिंदुस्थान

सरकारास न मिळतां तो इंग्लंड व अमेरिका या देशांच्या सरकारांना मिळत आहे. दर २॥ तोळ्यास १६८ शि. किंवा ११२ रु. किंवा ३५ डॉलर्स या भावानें सोनें विकत घेऊन तें हीं सरकारें हिंदुस्थानांत सरासरी रु. २३०-४० या भावानें विकत आहेत.

वास्तविक पाहतां २॥ तोळ्यास १६८ शिलिंग किंवा ३५ डॉलर दरानें खरेदी केलेलें सोनें वहातुकीचा खर्च धरून हिंदुस्थानांत तोळ्यास रु. ४५ या दरानें विकावयास पाहिजे. परंतु चलनवृद्धीमुळें सोन्याचा भाव तोळ्यास रु. ७२ ते ८४ पर्यंत असल्यामुळें त्याच दरानें हें सोनें विकलें जात आहे. याचा अर्थ असा कीं दर तोळ्यामागें इंग्लंड व अमेरिका ह्यांना रु. २७ ते रु. ३९ पर्यंत फायदा होतो. हा फायदा हिंदी सरकारास होत असता तर त्यांत अयोग्य असें कांहींच नव्हतें. परंतु तो फायदा इंग्लंड व अमेरिका यांचेच पदरांत पडतो. यंदा मध्यवर्ती विधिमंडळांत अंदाजपत्रकावर चर्चा करतांना अनेक लोकपक्षीय सभासदांनीं हिंदी जनतेस भरमसाट भावानें सोनें विकून अमेरिका व इंग्लंड या देशांना भरपूर फायदा मिळविण्यास वाव दिल्याबद्दल हिंदुस्थान सरकारवर प्रखर टीकास्त्र सोडलें व कांहीं सभासदांनीं रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती नियंत्रण मंडळासहि दोषी ठरविलें.

त्यावेळीं सरकारी धोरणाचें समर्थन करतांना फडणिशी खात्याचे चिटणीस म्हणाले कीं, इंग्लंड व अमेरिका हिंदुस्थानांत सोनें विकून फायदा मिळवितात यांत गैर असें कांहीं नाहीं. कारण सध्यां हिंदुस्थानांत असलेल्या इंग्लिश व अमेरिकन सैनिकांस महर्गतेमुळें जरूरीच्या वस्तूंस जास्त किंमती द्याव्या लागून त्यांचा खर्च फार होतो व नुकसान होतें. हें नुकसान भरून काढण्यासाठीं इंग्लंडनें व अमेरिकेनें सोनें विकून फायदा घेतला तर त्यांत अयोग्य असें काय आहे? हा कोटिक्रम किती उथळपणाचा आहे हें दाखविणें अगदीं सोपें आहे. जर या देशांत महागाई चलनवृद्धीनेंच झाली व ही चलनवृद्धि दोस्त राष्ट्रांच्या हिंदुस्थानांतील प्रचंड खरेदीमुळेंच झाली, तर मग त्या चलनवृद्धीचा त्रास इंग्लिश व अमेरिकन सैनिकांना झाला तर त्याबद्दल हिंदी जनतेस भरमसाट किंमतीस सोनें विकणें हें कसें न्याय्य ठरतें? हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवून त्याबद्दल हलवायासच दोषी ठरविणें हा न्यायाचा अजब मासला म्हटला पाहिजे. दोस्त राष्ट्रांच्या युद्धप्रयत्नामुळें हिंदुस्थानांत चलनवृद्धि होणें अपरिहार्य असलें तरी त्या परिस्थितीचा फायदा अशा रीतीनें

परकीय सरकारांनीं घेणें व एतद्देशीय सरकारनें तो घेऊं देणें हें दृश्य प्रक्षोभकारक आहे.

आपल्या जवळून कमी भावानें सोनें घेऊन आणि तें जास्त भावानें हिंदुस्थानांत विकून इंग्लंड व अमेरिका भरमसाट फायदा मिळवीत आहेत हें पाहून दक्षिण आफ्रिकेंतील लोकांनाहि सुवर्णविक्रीची ही पर्वणी साधावी असें वाटूं लागल्याचें तेथील विधिमंडळांतील चर्चेवरून स्पष्ट दिसतें. दक्षिण आफ्रिकेचे अर्थमंत्री हॉफमायर यांनीं या चर्चेस उत्तर देतांना सांगितलें कीं, "हिंदुस्थानांत सोन्याची विक्री करून त्याबद्दल मिळणाऱ्या रुपयांतूनच दक्षिण आफ्रिकेनें तेथें खरेदी केलेल्या मालाचे पैसे द्यावे अशी योजना केलेली असून त्यास ब्रिटिश सरकारची अनुमति आहे. मात्र आपल्यास जरूर असलेल्या रुपयांपेक्षां सोनें विकून जास्त रुपये मिळविणें दक्षिण आफ्रिकेच्या फायद्याचें नाहीं. कारण त्या रुपयांचा आपल्यास उपयोग होणार नाहीं. उलट त्यामुळें येथें चलनविस्तार मात्र होईल व चलनवाढि निर्माण होण्याचा संभव उत्पन्न होईल." येथील सोन्याच्या चढलेल्या भावाचा कसा फायदा घ्यावा यासंबंधीं इंग्लंड व दक्षिण आफ्रिका यांच्यांत चर्चा व्हावी व करारमदार व्हावेत व त्यासंबंधीं येथील सरकारास कांहींच मत नसावें हें चित्र किती दुःखदायक आहे! हिन्दुस्थान सरकारनें याबाबत स्वस्थ बसून इंग्लंड अमेरिकेनें केलेल्या सर्व योजनांस नंदीबैलाप्रमाणें मान हालवून पाठिंबा द्यावा, हें अत्यंत गर्हणीय होय. जणूं हिंदी लोकांना कोणी वालीच नाहीं? हिंदुस्थान सरकारच्या परप्रत्ययनेय धोरणाचें अधिक घृणास्पद उदाहरण कोणतें असेल?

२

हिंदुस्थानांत सांप्रत चालू असलेल्या सोन्याच्या विक्रीची पद्धति इतर देशांहून कशी निराळी आहे व ती कशी अनिष्ट आहे, हें कालच्या लेखांत दाखविले आहे; परंतु तिचीं करंट लक्षणें एवढ्यानेंच संपत नाहींत. या विक्रीचे होणारे आर्थिक दुष्परिणाम लक्षांत घेतल्यास ती नुसती त्याज्य नसून अनर्थकारक आहे असें दिसून येईल. हे परिणाम कोणते? ते कां व कसे होतात? यासंबंधीं आज विवेचन करावयाचें आहे.

सोन्याची विक्री सध्यां रिझर्व्ह बँक व इंपीरियल बँकेच्या शाखा ज्या गांवीं आहेत तेथें होते. अर्थातच जास्त प्रमाणावरील विक्री मुंबईसारख्या मोठ्या शहरांतच होते. तेथें सोनें विकत घेणारे गिऱ्हाईक म्हणजे मुख्यतः

सोन्याचा व्यापार करणारे चोक्षी व सट्टेबाज हे लोक. स्वतःच्या उपयोगासाठीं ते सोनें विकत घेत नाहींत; इतरांना तें विकण्यासाठीं घेतात. सोन्याच्या भावांतील तेजीमंदीचा फायदा घेऊन नफा मिळवणें, हाच त्यांचा उद्योग. त्यामुळें सध्यां विकल्या जाणाऱ्या सोन्याचें खरें गिऱ्हाईक ( म्हणजे शेवटीं ज्यांच्याकडे तें जाईल व ज्यांच्याजवळ तें राहील असे गिऱ्हाईक ) हे व्यापारी नाहींत. सोन्याचें खरें गिऱ्हाईक म्हणजे शेतकरी. सोन्याच्या व्यापाऱ्यांकडून देशाच्या निरनिराळ्या भागांतील लहान लहान व्यापारी सोनें खरेदी करतात व त्यांच्या जवळून तें सोनें शेतकरी विकत घेतो. रिझर्व्ह बँकेमार्फत विकलें जाणारें सोनें अशा प्रकारें ग्रामीण भागांकडे जाऊं लागल्याचें निरनिराळ्या ठिकाणच्या अहवालांवरून स्पष्ट दिसूं लागलें आहे. याचा अर्थ असा होतो कीं, सध्यांच्या तेजीच्या दिवसांत जो थोडाफार पैसा शेतकऱ्यांच्या हातीं खेळत आहे, तो खर्च करून आज शेतकरी सोनें विकत घेत आहे. अशा प्रकारें सोन्यांत पैसा गुंतविण्याची शेतकऱ्याला सरकारनें जी संधी दिली आहे, ती अनिष्ट आहे. कारण त्यामुळें एक तर शेतकऱ्याची फसवणूक होत आहे; आणि दुसरें म्हणजे सरकारनें स्वतःच चालविलेल्या 'बचतीच्या मोहिमेस' त्यामुळें अडथळा येत आहे. प्रथम दर्शनीं हें मत पटणार नाहीं, पण त्याचा जास्त खुलासा केला म्हणजे हेंच मत बरोबर आहे असें दिसून येईल.

हिंदुस्थातांनील जनतेची फार पूर्वीपासून सोन्याच्या भुकेबद्दल प्रसिद्धि आहे. सोन्याची ही अशमनीय भूक मुख्यतः दोन कारणांमुळें उत्पन्न झालेली आहे. त्यांपैकीं एक म्हणजे सोन्याची किंमत सर्व काळीं सारखीच असते व ती कधींहि घटत नाहीं अशी असलेली सर्वसामान्य पण चुकीची समजूत. या समजुतीमुळें थोडासा पैसा हातांत आला कीं सोन्यांत गुंतवावयाचा, अशी हिंदुस्थानांतील सामान्य जनतेस संवयच लागून राहिली आहे. आणि या संवयीस येथील धार्मिक व सामाजिक चालीरीतींनीं अधिकच पुष्टि देऊन तीस एक प्रकारें समाजघटनेंत अनुस्यूतच केलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. वर्षप्रतिपदेच्या दिवशीं सोनें कितीहि महाग असलें तरी घ्यावयाचें ही चाल आपल्याकडे आहे. या व अशाच प्रकारच्या दागिन्यासंबंधींच्या वगैरे सामाजिक व आर्थिक चालीरीती ध्यानांत आणल्यास वरील विवेचनाचा अर्थ जास्त स्पष्ट होईल. वर उल्लेखिलेलीं हीं दोन्हीं कारणें परस्परांशीं इतकीं संलग्न झालेलीं आहेत कीं, प्रत्येक वेळीं तीं वेगवेगळीं दाखवितां येतीलच असें नाहीं. याशिवाय

ही सोन्याची भूक उत्पन्न होण्याचीं इतरहि कारणें आहेत, परंतु त्यांची चर्चा करावयाचें येथें प्रयोजन नाहीं.

सामान्य हिंदी जनतेच्या हातांत असलेला अगर गरज भागून उरलेला पैसा सोन्यांत गुंतवून ठेवण्याची परंपरागत चाल आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें फार अनिष्ट आहे. कारण अशा प्रकारें सोन्यांत गुंतून पडणारा पैसा खेळता रहात नाहीं व त्यामुळें त्याचा संपत्तीच्या उत्पादनासाठीं कोणत्याहि प्रकारें उपयोग होत नाहीं. सोन्यांत अशा प्रकारें गुंतविलेली रक्कम जर उद्योगधंद्यांत भांडवल म्हणून आली तर या देशांत नेहमीं भासणारा भांडवलाचा दुष्काळ पुष्कळ प्रमाणांत कमी होईल यांत संशय नाहीं. सोनें विकत घेण्यासाठीं खर्च केलेला पैसा अगदीं अनुत्पादक रीतीनें गुंतविला जातो. यासाठीं अर्थशास्त्रीय दृष्टीनें सोन्याचे सांठे करून ठेवण्याची ही चाल अनिष्ट आहे, याबद्दल सर्व विचारी माणसांचें ऐकमत्य आहे. गेल्या आर्थिक मंदीच्या दिवसांत हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांनीं अशा प्रकारें सांठविलेलें सोनें विकलें व त्यावेळच्या आर्थिक अडचणींतून आपली सोडवणूक करून घेतली. यापैकीं पुष्कळ सोनें देशाबाहेर गेलें व सामान्य जनतेस प्रत्यक्ष लक्ष्मीचा पायच घराबाहेर पडत आहे असें वाटलें. “ अनुत्पादक रीतीनें सांठून राहिलेलें हें सोनें बाहेर आलें आहे व सध्यांच्या आर्थिक तंगीच्या काळीं तरी शेतकऱ्यास उपयोगी पडत आहे. नुसतें सांठून राहण्यापेक्षां त्याचा असा उपयोग होत आहे हें सर्वस्वीं इष्ट आहे,” असें अर्थशास्त्रज्ञांनीं त्यावेळींहि प्रकटपणें सांगितलें होतें व सुवर्णनिर्गतीस आळा न घालण्याच्या आपल्या धोरणाचें हिंदुस्थान सरकारनेंहि याच कारणास्तव समर्थन केलें होतें.

ही पार्श्वभूमि ध्यानांत घेतली म्हणजे सध्यांच्या सोन्याच्या विक्रीचे परिणाम कसे होतील, याची स्थूलमानानें कल्पना येईल. वर सांगितल्याप्रमाणें सोन्याचे सांठे करण्यानें देशांतील संपत्तीच्या उत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो. यासाठीं असे सांठे करण्यास उत्तेजन मिळणार नाहीं, असें धोरण सरकारनें ठेवणें आवश्यक आहे. परंतु सध्यांच्या सोन्याच्या विक्रीमुळें सरकार सामान्य जनतेस सोन्यांत पैसा गुंतविण्यापासून परावृत्त तर करीत नाहींच पण उलट उत्तेजनच देत आहे. ग्रेगरी समितीनें याहीपुढें जाऊन धान्य मिळविण्यासाठीं शेतकऱ्यांना सोनें–रुपें पुरविणें हें सरकारचें कर्तव्यच आहे, असें म्हटलें आहे. अर्थात् सरकारचें हें धोरण आर्थिक दृष्ट्या अनिष्ट आहे, हें

सहज समजण्यासारखें आहे. येथील लक्ष्मीधर संस्कृतीस अशा प्रकारें उत्तेजन देणें हें सरकारच्या बौद्धिक दिवाळखोरीचेंच उदाहरण आहे, असें म्हटलें पाहिजे. आणि हें धोरण सध्यांच्या चलनवृद्धीच्या काळांत तर अधिकच अनिष्ट आहे किंबहुना अधमपणाचें आहे. चलनवृद्धीमुळें शेतकी व इतर सर्वच पदार्थांचे भाव वाढले आहेत. त्यामुळें आज शेतकऱ्यांच्या हातीं थोडाफार पैसा खेळूं लागला आहे. सध्यां पैसा विपुल व इतर सर्व वस्तू त्या मानानें तुटपुंज्या झाल्या आहेत. पैसा सर्वांत स्वस्त व इतर सर्व वस्तू महाग अशी परिस्थिति आहे. परंतु ही परिस्थिति नित्याची नसून नैमित्तिक आहे. युद्ध संपल्याबरोबर याच्या उलट परिस्थिति होईल. पैशाची किंमत वाढून इतर वस्तू स्वस्त होतील. यासाठीं आजमितीस पैसा ही एकच वस्तु अशी आहे कीं जी स्वस्त आहे व युद्धानंतर जिची किंमत वाढण्याची खात्री आहे. इतर सर्व वस्तूंबाबत याउलट परिस्थिति आहे. अशा प्रसंगीं पैसा हा पैसा म्हणूनच कोणत्याहि रूपांत जवळ अगर शिलकींत न ठेवतां इतर वस्तू विकत घेण्यासाठीं खर्च करणें किंवा इतर वस्तूंत गुंतविणें हा तोट्याचा व्यवहार आहे, हें वेगळें सांगावयास नको. आणि या सर्व इतर वस्तूंपैकीं विशेषतः सोन्यांत पैसा गुंतविणें सर्वांहून जास्त अहितकारक आणि तोट्याचें आहे. कारण सोन्या-व्यतिरिक्त वस्तूंत (उदाहरणार्थ घरें, जमीन यांत) पैसा गुंतविल्यास तोटा होईल, पण निदान कांहीं प्रमाणांत तरी त्याचा उत्पादक असा उपयोग होईल. परंतु हा पैसा सोन्यांत गुंतला कीं तो नुसता अनुत्पादक रीतीनें सांठून राहील व आर्थिक दृष्टीनें अगदीं निरुपयोगी ठरेल.

सध्यां आर्थिक मंदीच्या नुकसानींतून शेतकरी थोडेंफार डोकें वर काढीत आहे. चलनवृद्धीमुळें थोडाफार पैसा त्याच्या हातीं येत आहे. ही संधि साधून त्याचा योग्य उपयोग न केल्यास तो निरर्थक फुकट जाईल आणि आलेली ही संधिहि वायां जाईल. यासाठीं या पैशानें शेतकऱ्यानें आपलीं जुनीं कर्जें फेडणें व दैनंदिन गरजा भागून उरणारा पैसा न उधळतां त्याची बचत करणें व ती पैशाच्या रूपांत करणें, हेंच त्याच्या कल्याणाचें आहे. ही गोष्ट अर्थातच शेतकऱ्यास कळत नाहीं. यासाठीं ती त्याच्या निदर्शनास आणणें व त्याचा पैसा सहकारी संस्थांमार्फत वगैरे इतर वस्तूंत गुंतला न जातां पैशाची ठेव या स्वरूपांत कसा राहील यासंबंधीं योजना करणें, हें सरकारचें या प्रसंगीं कर्तव्य ठरतें. हिंदुस्थान सरकारनेंहि मोठ्या प्रमाणावर बचतीची मोहीम आंखली आहे व ग्रामीण भागांतून सरकारी कर्जरोख्यांतून पैसा गुंतविण्याची योजनाहि चालू केली

आहे. “सोन्याचांदींत पैसे गुंतवूं नका. त्यांच्या किंमती लढाईनंतर एकदम पडतील,” असा सरकार सर्वत्र प्रचार करीत आहे, आणि त्याच वेळीं दुसरीकडे सोन्याची विक्री करून याच्या विरुद्ध वर्तन करीत आहे. पैसा सोन्यांत गुंतविण्याची संधि मिळाली कीं तो कर्जरोख्यांत गुंतविला जाणार नाहीं, व त्या प्रमाणांत सरकारी बचतीची मोहीम थंडावेल. सोनेंविक्री आणि बचतीची मोहीम, हीं अगदीं परस्पर विरोधी धोरणें एकाच वेळीं अंमलांत आणून बुद्धि-भेद करणाऱ्या सरकारच्या शहाणपणाची तारीफ करावी तेवढीच थोडीच होणार आहे. त्याचप्रमाणें आजच्या सोन्याच्या भावांत सोन्यांत पैसा गुंतविणाऱ्यांच्या त्या पैशाची किंमत युद्धानंतर सोन्याचे भाव घसरल्यावर जागच्या जागीं निमपट किंवा त्याहूनाहि उतरेल व युद्धकालांत मिळालेला पुष्कळ पैसा वायां जाईल, हें स्पष्ट दिसत असूनहि हिंदुस्थान सरकारनें हें जनतेच्या हितास अनर्थकारक असलेलें सोन्याच्या विक्रीचें धोरण चालू ठेवावें ही दुर्दैवाची गोष्ट नाहीं काय ?

याहूनहि दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, या सोन्याच्या विक्रीसंबंधीं येथील जनतेमध्यें व सुशिक्षितांमध्येंहि अगदीं चुकीच्या कल्पना प्रसृत आहेत. रिझर्व्ह बँक बरेंच सोनें विकीत आहे, ही मोठी पर्वणी असून तिचा जास्तींत जास्त फायदा घ्यावा या दृष्टीनें सोनें विकत घेण्यासाठीं लोक अगदीं उत्सुक झाले आहेत. थोड्याच दिवसांपूर्वीं मुंबईस रिझर्व्ह बँकेच्या कचेरीजवळ सुवर्णबुभुक्षितांची रीघ लागून राहिली होती. जणूं काय हे लोक बरेच दिवस उपाशी असल्या-मुळें अन्नासाठीं कासावीस झाले होते. कांहीं मंडळींना असें वाटतें कीं, पूर्वीं सुवर्ण निर्गत होत होती त्या वेळीं घराबाहेर गेलेली लक्ष्मी आतां पुन्हा घरांत येत आहे व त्यामुळें हिंदी जनता संपन्न होत आहे. ही कल्पना सर्वस्वीं चुकीची आहे, हें वरील विवेचनानंतर कोणाच्याहि ध्यानांत येईल.

# सार्वराष्ट्रीय चलन परिषद व तिच्यापुढें मांडलेली योजना.*

## १

आजपासून वॉशिंग्टन येथें सार्वराष्ट्रीय चलन परिषदेस सुरुवात होणार आहे. या परिषदेसाठीं हिंदुस्थानातर्फे पाठविलेले प्रतिनिधी अमेरिकेंत पोंचल्याचेंहि वृत्त आलें आहे. या परिषदेस बहुतेक सर्व दोस्त राष्ट्रांचे प्रतिनिधी येणार आहेत व युद्धोत्तरकाळीं चलनव्यवहारासंबंधी जी योजना अमेरिकन व इंग्रज अर्थशास्त्रज्ञांनीं एकमतानें सुचविली आहे, तिच्यासंबंधी तेथें चर्चा होणार आहे. म्हणजे एका दृष्टीनें युद्धोत्तर पुनर्रचनेच्या मार्गावर दोस्त राष्ट्रांनीं टाकलेलें हें पहिलें पाऊलच आहे असें मानावयास हरकत नाहीं. 'फलानुमेयाः प्रारंभाः' या नात्यानें युद्धोत्तर पुनर्रचनेच्या कामीं दोस्त राष्ट्रांत किती सहकार्य व सलोखा नांदेल अगर तें काम किती एकजुटीनें होईल याची या परिषदेच्या निकालावरून कल्पना बांधणें चुकीचें ठरणार नाहीं. या दृष्टीनें या प्रश्नाचें महत्त्व आजच्या क्षणीं फार आहे यांत शंका नाहीं.

या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीं जनतेस माहिती देण्याचें काम जितकें आवश्यक आहे तितकेंच तें दुर्घट आहे. कारण चलन हा अर्थशास्त्रांतील अत्यंत किचकट व शास्त्रीय असा विषय आहे व वर्षानुवर्षे त्याचा अभ्यास करणारास सुद्धां तो विषय पूर्णपणें आटोक्यांत येईल असें नाहीं. प्रस्तुतचा विषय तर त्यांतल्या त्यांत विशेष अवघड. यासाठीं इंग्रज व अमेरिकन तज्ज्ञांनीं सुचविलेल्या सार्वराष्ट्रीय चलनासंबंधींच्या योजनेच्या खोल चर्चेच्या भानगडींत न पडतां तिची स्थूल मानानें कल्पना देणें व हिंदुस्थानच्या दृष्टीनें तिचा थोडाफार विचार करणें एवढाच या विषयावर लिहिण्यांत आमचा उद्देश आहे. गेल्या व प्रस्तुतच्या महायुद्धाच्या दरम्यानच्या काळांत आर्थिक व विशेषतः सार्वराष्ट्रीय चलनव्यवहारांत जे घोटाळे माजले व त्यामुळें सर्व राष्ट्रांतील लोकांना जे खडतर दिवस काढावे लागले त्यांची या लढाईनंतर पुनरावृत्ति होऊं नये या उद्देशानें निरनिराळ्या आर्थिक योजना दोस्तराष्ट्रांतील तज्ज्ञ आतांपासून

* ज्ञानप्रकाश, १ जुलै १९४४

तयार करूं लागले आहेत. वर उल्लेखिलेल्या काळांत सार्वराष्ट्रीय चलनव्यवहारांत कोणते व कशा प्रकारचे घोटाळे माजले व ते कां निर्माण झाले यांसंबंधीं थोडी कल्पना दिल्यास प्रस्तुतच्या योजनांचे उद्देश व ध्येय यांवर पुष्कळच प्रकाश पडेल.

गेल्या युद्धांत युरोपमधील पुष्कळ देशांत फार मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानि व वित्तहानि झाली व त्या देशांतील उत्पादनाचें प्रमाण पुष्कळच कमी झालें. युद्धापूर्वी या देशांतील जनतेस लागणाऱ्या पुष्कळ वस्तू इतर निरनिराळ्या देशांतून आयात केल्या जात असत व तेथें उत्पन्न होणाऱ्या वस्तू इतर देशांत पाठवून या आयात मालाची फेड केली जात असे. आयातनिर्यातींतन हा व्यवहार पुरा न झाल्यास हीं राष्ट्रें एकमेकांस अल्प अगर दीर्घ मुदतीचीं कर्जें देऊन व्यवहार पुरा करून घेत असत. परंतु गेल्या महायुद्धापासून ही सर्वच स्थिति पालटली. युद्धाच्या नुकसानभरपाईबद्दल दोस्तराष्ट्रांनीं जर्मनीवर बेसुमार खंडणी लादली व त्यापैकीं बराचसा भाग सोन्यांतच फेडला पाहिजे असा आग्रह धरला. युद्धामुळें जर्मनी व युरोप खंडांतील बरेच देश यांमध्यें वित्तहानि व मनुष्यहानि फार मोठ्या प्रमाणावर झाली होती. या सर्वच देशांतून भांडवलाचा फार मोठ्या प्रमाणावर नाश झाला होता व त्यामुळें तेथील उत्पादनाची शक्ति खच्ची झालेली होती. याचा परिणाम म्हणून या देशांच्या अंदाजपत्रकांतून खर्च व उत्पन्न यांची तोंडमिळवणी होणें अशक्य होऊन बसलें. ही तोंडमिळवणी करण्यासाठीं त्या राष्ट्रांनीं व विशेषतः जर्मनीनें फार मोठ्या प्रमाणावर चलनविस्ताराचा मार्ग स्वीकारला. त्यामुळें या सर्व देशांतून भयंकर स्वरूपाची चलनवृद्धि निर्माण झाली व सर्व आर्थिक व्यवहाराचा पायाच ढांसळला आणि सार्वराष्ट्रीय चलनव्यवहारांत फारच घोटाळा माजला.

या सर्वच देशांतून उत्पादनाची शक्ति फार घटली असल्यामुळें त्यांना तेथें उत्पादन केलेला माल बाहेर पाठवून जरूर तेवढी साधनसामुग्री बाहेरच्या देशांतून आयात करणें अशक्य झालें. अशा स्थितींत बाहेरून बरेंचसें कर्ज मिळाल्याखेरीज या देशांना आपली आर्थिक व्यवहाराची विस्कटलेली घडी पुन्हां बसवितां येणें शक्य नव्हतें. युरोपीय राष्ट्रांचीही गरज अमेरिकेनें युद्धानंतरच्या १० वर्षांत पुष्कळच प्रमाणांत भागविली आणि जर्मनी व इतर देशांना वारंवार कर्जें दिलीं. या कर्जांच्या सतपाण्यानें आर्थिक परिस्थिति

१९२४ नंतरच्या चारपांच वर्षांत थोडीफार सुधारली. युद्धाच्या सुरुवातीसच संपुष्टांत आलेलें सुवर्णमान पुन्हां अंगिकारण्यांत आलें. इंग्लडनें १९२५ मध्यें सुवर्णमानाचा पुन्हां अंगिकार केला. परंतु या कालांत झालेलें आर्थिक पुनरुज्जीवन फारसें यशस्वी झालें नाहीं. सार्वराष्ट्रीय व्यापारांत फारशी वाढ झाली नाहीं व आर्थिक व्यवहारहि फारशा जोमानें वाढूं शकले नाहींत. याचें कारण म्हणजे मूलतःच बिघडलेली आर्थिक व राजकीय परिस्थिति. जर्मनीवर लादलेली युद्धखंडणी इतकी मोठी होती कीं, तिची हप्त्यानें फेड करणेंसुद्धां जर्मनीच्या आंवाक्याबाहेरचें होतें. इतर देशांतूनहि फारशी आर्थिक सुस्थिति निर्माण होऊं शकली नाहीं. या परिस्थितीनेंच जागतिक मंदीचा अनर्थ कोसळला व सर्वच जगांतील आर्थिक व्यवहार आकुंचन पावले. अमेरिकेनें परराष्ट्रांना कर्ज देण्याचें बंद केलें. मुख्य धनको राष्ट्रानें आपल्या पिशवीचें तोंड बंद केल्याबरोबर त्या कर्जाच्या खतपाण्यावर जगणाऱ्या देशांची फारच हलाखीची स्थिति झाली. या राष्ट्रांना जीवनासाठीं आवश्यक असलेली साधनसामुग्री इतर देशांतून आणविण्यासाठीं लागणारें परराष्ट्रीय चलन मिळण्याचें बंद झाल्याबरोबर आपले सार्वराष्ट्रीय व्यापारांतील व्यवहार पुरे करण्यासाठीं आयात कमी करणें अगर निर्यात वाढविणें याशिवाय दुसरा मार्गच उरला नाहीं. आयात कमी करण्यासाठीं कित्येक राष्ट्रांनीं संरक्षक जकातींसारखे नाना प्रकारचे निर्बंध आपल्या परराष्ट्रीय व्यापारावर घालण्याचा उपक्रम केला व त्याचा प्रतिकार म्हणून इतर राष्ट्रांनींहि तोच मार्ग अनुसरिला. सार्वराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंध अशा चुरशीमुळें वाढतच गेले व परराष्ट्रीय व्यापाराचा सर्वत्र संकोच झाला. निर्यात वाढविण्यासाठीं कांहीं राष्ट्रांनीं आपल्या हुंडणावळीचे दर कमी केले व त्यांना त्याचा फायदा मिळूं नये म्हणून त्यांच्या प्रतिस्पर्धी राष्ट्रांनींहि आपल्या हुंडणावळीचे भाव घटविले. त्यामुळें जगभर हे भाव कमी करण्याची चढाओढ सुरू झाली. त्याचा परिणाम म्हणून हुंडणावळीच्या भावांत भयंकर अस्थिरता निर्माण झाली व त्यामुळें व्यापार अधिकच घटला.

याच सुमारास राजकीय परिस्थितीहि फारच अस्थिर झाली. त्यामुळें स्वल्प मुदतीच्या ठेवी या देशांतून त्या देशांत व तेथून आणखी दुसरीकडे सुरक्षिततेच्या शोधांत फिरूं लागल्या. त्यांचाहि हुंडणावळीवर अनिष्ट परिणाम झाला. या काळांत अमेरिकेनें आपलें व्यापारविषयक धोरण इतर राष्ट्रांप्रमाणेंच आकुंचित केलें. अमेरिकेसहि आर्थिक मंदीची झळ लागून तें

धनको राष्ट्र असल्यामुळें, याच काळांत जगांतील सोन्याचा ओघ त्याच्याकडे वाहूं लागला व जगांतील जवळ जवळ ६० टक्के सोनें तेथें जाऊन बसलें.

अशा प्रकारें बिघडलेल्या या परिस्थितींत सार्वराष्ट्रीय व्यापार, चलन इत्यादि सर्वच गोष्टींत गोंधळ व घोटाळा माजला. राष्ट्राराष्ट्रांतील आर्थिक सहकार्याचा संपूर्णतया अस्त झाला. जें तें राष्ट्र आपापल्यापुरतेंच पाहूं लागलें. आपापसांत निरनिराळे गट करून आपला जास्तींत जास्त फायदा साधण्याची कारवाई कित्येक देशांनीं केली. ओटावा करार, स्टर्लिंग गटाची स्थापना इत्यादि गोष्टी याच प्रवृत्तीच्या द्योतक होत्या.

## २ केन्स व व्हाइट योजनांतील साम्य*

गेल्या युद्धानंतर चलनव्यवहारांत निर्माण झालेले घोटाळे वर निर्देशिले आहेत त्यावरून प्रस्तुत प्रसंगीं कोणते धडे शिकतां येतील हें स्पष्ट होईल. स्थूलमानानें सार्वराष्ट्रीय चलनव्यवहारांतील गोंधळ व घोटाळा टाळावयाचा असेल तर त्यासाठीं करावयाच्या योजनेमुळें खालील गोष्टी किमान पक्षीं साध्य झाल्या पाहिजेत:

( १ ) हुंडणावळीचे दर राष्ट्रें चढाओढीनें कमी करतात व त्यामुळें त्यांस अस्थिरता प्राप्त होते. यासाठीं हे दर सुस्थिर ठेवण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणें राष्ट्रें आपापले निरनिराळे गट करून त्या गटाबाहेरील देशांच्या हुंडणावळीवर निर्बंध लादतात व त्यामुळें सार्वराष्ट्रीय व्यापाराची वाढ खुंटते. या व्यापाराची अभिवृद्धि व्हावी व सर्व राष्ट्रांचे एकमेकांशीं व्यवहार निर्बंधरहित व्हावेत यासाठीं हुंडणावळीवर घालण्यांत येणारीं निरनिराळ्या प्रकारचीं बंधनें नाहींशीं करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

( २ ) सार्वराष्ट्रीय व्यापारांत येणाऱ्या आर्थिक अडचणींमुळें व तंगीमुळें निरनिराळे देश व्यापारावर निर्बंध लादतात असें आढळून आलें आहे. या निर्बंधांमुळें सार्वराष्ट्रीय आर्थिक सुस्थितीवर अनिष्ट परिणाम होतात. या राष्ट्रांना वेळोवेळीं व योग्य प्रमाणांत आर्थिक मदत मिळाल्यास हा प्रश्न पुष्कळच सुलभ रीतीनें सोडवतां येईल. यासाठीं अशा प्रकारची आर्थिक मदत राष्ट्रांना मिळण्याची कांहींतरी व्यवस्था केली पाहिजे.

---

*ज्ञानप्रकाश, २ जुलै १९४४

(३) सार्वराष्ट्रीय व्यापारावरील बंधनांमुळें तो आकुंचित होतो व त्याचा परिणाम म्हणून कांहीं देशांवर आर्थिक मंदीची आपत्ति येते. माणसें व यंत्रें फार मोठ्या प्रमाणावर बेकार होतात हें टाळण्यासाठीं उद्योगधंदा जास्तींत जास्त वाढविणें अगर ज्याला सर्वोद्योगी अवस्था म्हणतात ती निर्माण करणें व प्रत्येक माणसाचें खरें उत्पन्न ( नुसतें पैशाचें नव्हे ) जास्तींत जास्त वाढविणें याच हेतूनें आर्थिक धोरण आंखलें पाहिजे. हें साध्य होण्यासाठीं सार्वराष्ट्रीय व्यापाराची जास्तींत जास्त पण समतोल वाढ कशी होईल व तो आर्थिक बंधनांतून कसा मुक्त होईल याकडे लक्ष दिलें पाहिजे. सार्वराष्ट्रीय चलनव्यवहाराच्या योजनेंत यासंबंधीं योग्य व समर्पक तरतूद केली पाहिजे.

( ४ ) राष्ट्राराष्ट्रांतील चलनव्यवहारांत सर्व राष्ट्रांनीं सहकार्य केलें पाहिजे व त्या दृष्टीनें त्यांनीं एकमेकांशीं विचारविनिमय व माहितीची देवघेव केली पाहिजे. हें सौकर्यानें व्हावें यासाठीं सर्व राष्ट्रांची एक प्रातिनिधिक व कायम स्वरूपाची संस्था असली पाहिजे.

( ५ ) आर्थिक तेजीमंदीच्या चक्रांतील आंदोलनें शक्य तेवढीं कमी करण्याच्या दृष्टीनेंहि प्रयत्न होणें आवश्यक आहे.

( ६ ) गेल्या युद्धानंतर निर्माण झालेल्या युद्धकर्जांमुळें आर्थिक व्यवहारांत आणखी एका अडचणीची भर पडली अगर त्यामुळें बिघडलेली आर्थिक परिस्थिति अधिकच चिघळली हें स्पष्ट आहे. ऋणको व धनको राष्ट्रांनीं एकमेकांच्या सवडीनें व सोयीनें हे व्यवहार पुरे केले असते तर या कर्जफेडीचे परिणाम इतके वाईट झाले नसते. या युद्धांतही युध्यमान राष्ट्रांनीं निरनिराळ्या राष्ट्रांकडून कर्जें घेतलीं आहेत. कांहीं ऋणको होण्याच्या पंथांत आहेत. लढाई संपल्याबरोबर आपलीं कर्जें परत मिळण्याबद्दल धनको तगादा करतील तर कर्जें शक्य तितक्या लांबीच्या मुदतीनें कशीं परत द्यावीं याचा ऋणको विचार करतील व त्याप्रमाणें वागतील हा साधा व्यवहार आहे. परंतु तसें झाल्यास गेल्या महायुद्धानंतरचीच परिस्थिति पुन्हां निर्माण होईल. या कर्जांची फेड व विल्हेवाट लावण्याची योजना करावयाची ती धनको राष्ट्रांचें नुकसान होणार नाहीं व ऋणको राष्ट्रांवर एकदम बोजा पडल्यामुळें त्यांचेंहि फार नुकसान होणार नाहीं अशी आंखली पाहिजे.

आतांपर्यंत ज्या चलनविषयक योजना तयार केल्या गेल्या आहेत त्यांत वर उल्लेखिलेल्या गोष्टी उद्दिष्टांत स्पष्टपणें अन्तर्भूत केल्या आहेत.

हे उद्देश साध्य करण्यासाठीं आंखण्यांत येणाऱ्या योजनांसंबंधीं आतां जास्त माहिती देणें योग्य होईल.

१९४३ च्या एप्रिलमध्यें इंग्रज व अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांनीं सार्वराष्ट्रीय चलनव्यवहारासंबंधीं प्रत्येकीं एक याप्रमाणें दोन योजना प्रथम प्रसिद्ध केल्या. ब्रिटिश योजना ही मुख्यतः इंग्लंडमधील नामांकित अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड केन्स यांनीं तयार केली व त्यांच्या नांवानें ती योजना ओळखली जाते. त्याचप्रमाणें अमेरिकन योजना तिच्या निर्मितींत प्रमुख असलेले डॉ. व्हाइट यांच्या नांवावरून व्हाइट योजना म्हणून ओळखतात. या दोन्ही योजनांचें एकमेकांशीं पुष्कळच साम्य होतें. परंतु दोहोंत महत्त्वाचे फरकहि होते. या दोन योजनांवरून तयार केलेली योजनाच प्रस्तुत चलन परिषद्रेसमोर मांडली जाणार आहे. म्हणून या दोन मूलभूत योजनांतील साम्यभेदांसंबंधीं थोडेसें लिहिलें पाहिजे.

या योजनांतील कांहीं महत्त्वाचीं साम्यें प्रथम पाहणें इष्ट होईल. चलनव्यवहारासंबंधीं कोणतीहि सार्वराष्ट्रीय स्वरूपाची योजना करावयाची म्हणजे प्रत्येक राष्ट्राचें आपलें आर्थिक धोरण आपणास पाहिजे तसें ठेवण्याचें स्वातंत्र्य थोडेंतरी कमी होणारच व जी सार्वराष्ट्रीय संस्था निर्माण करण्यांत येईल तिच्याकडून सभासद राष्ट्रांवर कांहींतरी निर्बंध घातले जाणारच हें उघड आहे. अंतर्गत आर्थिक अगर राजकीय धोरणांत अशा संस्थेमार्फत जर ढवळाढवळ होऊं लागली तर कोणतींच राष्ट्रें अशा योजनेशीं सहकार्य करणार नाहींत. यासाठीं केन्स व व्हाइट योजनांच्या निर्मात्यांनीं आपापल्या योजनानुसार निर्माण केल्या जाणाऱ्या सार्वराष्ट्रीय संस्थेकडून अगदीं जरूर त्यापेक्षां जास्त प्रमाणांत सभासद राष्ट्रांच्या अंतर्गत आर्थिक व राजकीय व्यवहारांत ढवळाढवळ केली जाणार नाहीं, त्याचप्रमाणें या संस्थेचें सभासदत्व कोणत्याहि राष्ट्रास तेथें अमुक एक प्रकारची राज्यव्यवस्था आहे या कारणास्तव नाकारण्यांत येणार नाहीं, असें प्रथमच स्पष्ट म्हटलें आहे.

वर उल्लेखिलेले हेतू साध्य करण्यासाठीं केन्स व व्हाइट योजनांत प्रत्येकानें निराळ्या प्रकारची सार्वराष्ट्रीय संस्था स्थापन करण्यांत यावी असें सुचविलें होतें. केन्स योजनेंत सुचविलेली संस्था देवाण-घेवाण मंडळाच्या स्वरूपाची होती तर व्हाइट योजनेंत एका सार्वराष्ट्रीय निधीचा आराखडा मांडण्यांत आला होता. परंतु या दोन्ही योजनांनीं आपापल्यापरी सुचविलेल्या संस्था मूलतः सारख्याच होत्या. दोन्ही संस्था सार्वराष्ट्रीय पेढीच्या स्वरूपा-

च्या होत्या. प्रत्येक राष्ट्राला त्यांत एक ठराविक वांटा अगर भाग दिलेला होता. सार्वराष्ट्रीय व्यापारांतील देवाण-घेवाणीचे व्यवहार राष्ट्रांनीं या संस्थे-मार्फत करावयाचे होते. ज्या राष्ट्रांना नेहमींच्या व्यापारासाठीं कर्ज लागेल तें या संस्थेमार्फतच त्यांना त्यांच्या वांट्याच्या कांहीं प्रमाणांत मिळावयाचें होतें. ऋणको व धनको राष्ट्रांनीं कर्ज घेणें व कर्ज देणें हे व्यवहार एकमेकांशीं न करतां ते या संस्थेशीं करावयाचे, यामुळें कोणताहि देश दुसऱ्या देशाचा धनको अगर ऋणको न होतां सर्वच देश या सार्वराष्ट्रीय संस्थेचे ऋणको अगर धनको व्हावयाचे होते. त्याचप्रमाणें कर्जें देण्याच्या व घेण्याच्या प्रमाणा-वर त्यांच्या वांट्याच्या प्रमाणांत या संस्थेमार्फत कांहीं निर्बंध घालण्यांत आले होते. एका ठराविक प्रमाणापेक्षां एकाद्या देशानें कर्ज घेतलें अगर कर्ज दिलें तर ही परिस्थिति समतोल करण्यासाठीं अशा देशांनीं काय करावें हें सांगण्याचा अधिकार मध्यवर्ती सार्वराष्ट्रीय संस्थेस देण्यांत आला होता. प्रत्येक देशांतील चलनाचे दर सोन्याच्या प्रमाणांत या संस्थेनें ठरवावयाचे होते व त्यांच्या आंदोलनांची मर्यादाहि तिनेंच घालून द्यावयाची होती. त्याचप्रमाणें प्रत्येक देशानें केव्हां व किती प्रमाणांत हुंडणावळीचे दर कमीजास्त करावे हें ठरविण्याचा तिला अधिकार होता; अल्प मुदतीचीं व दीर्घ मुदतीचीं कर्जेंहि या संस्थेनेंच नियं-त्रित करावयाचीं होतीं. प्रत्येक देशांत सोन्याच्या खरेदीचा व विक्रीचा भाव काय असावा हेंहि या संस्थेनेंच ठरवावयाचें होतें. सार्वराष्ट्रीय व्यवहारा-साठीं सार्वराष्ट्रीय स्वरूपाचें एकादें चलन असावें म्हणून केन्स योजनेंत बँकॉर व व्हाइट योजनेंत युनिटास या नांवाचीं चलनें सुचविण्यांत आलीं होतीं.

केन्स व व्हाइट योजनांतील फरकांकडे आतां वळूं. ब्रिटिश योजनेच्या उद्दिष्टांतून एक महत्त्वाची बाब वगळण्यांत आली होती. विशिष्ट तऱ्हेचे गट केल्यानें व्यापार आकुंचित होतो व सार्वराष्ट्रीय आर्थिक सुस्थितीस असे गट विघातक ठरतात हें मागें सांगितलेंच आहे. व्हाइट योजनेंत हे गट सर्वस्वीं नाहींसे करण्याचें उद्दिष्ट ठेवलें गेलें होतें, परंतु केन्स योजनेंत ह्या मुद्याची उद्दिष्टांतून उचलबांगडी करण्यांत आली होती. याचें कारण केन्स योजनेंत स्टर्लिंग गटाच्या अस्तित्वाची व अभिवृद्धीची योजना अनुस्यूत होती. सार्वराष्ट्रीय दृष्टीनें विचार केल्यास ब्रिटिश योजनेंत हें मोठें न्यून होतें व इंग्लंडचा स्वार्थ त्यांतून स्पष्टपणें बाहेर डोकावत होता असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

युद्धकर्जांचा प्रश्न सोडविण्यासाठीं व्हाइट योजनेंत एक निराळी व ल्हानशी योजना सुचविण्यांत आली होती. या योजनेप्रमाणें एकाद्या देशास दुसऱ्या देशानें दिलेलें कर्ज हळूहळू फेडण्याची योजना आंखण्यांत आली होती. उदाहरणार्थ, एकाद्या देशानें जर रु. १००० कोटी कर्ज दुसऱ्या देशास दिलेलें असेल तर त्यांतील ४० टक्के कर्ज धनको राष्ट्रानें ऋणको राष्ट्राचा माल आयात करून फेडून घ्यावयाचें, उरलेल्यापैकीं ४० टक्के कर्ज धनको राष्ट्रानें ऋणकोशिवाय इतर राष्ट्रांकडून माल आयात करून फेडून घ्यावयाचें. मात्र त्यासाठीं धनकोस लागणारी हुंडणावळ ऋणको राष्ट्रानें पुरवावयाची. म्हणजे ऋणको राष्ट्रानें धनको राष्ट्र ज्या देशांकडून माल घेईल त्यांस तितक्या किंमतीचा आपला माल निर्यात करावयाचा. उरलेल्या २० टक्यांचा विनियोग कसा करावयाचा या तांत्रिक चर्चेंत येथें शिरण्याचें कारण नाहीं. ही कर्ज-फेडीची योजना लढाई संपल्यावर तीन वर्षांनीं अंमलांत यावयाची होती व दर वर्षी ४ टक्के या प्रमाणांत २० वर्षांच्या मुदतींत कर्जफेड व्हावयाची होती. केन्स योजनेंत अशा तऱ्हेची योजना नव्हती. फक्त युद्धकर्जांचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे व तो सोडवला पाहिजे वगैरे सर्वसाधारण विचार मोठ्या झोकदार भाषेंत मांडले होते. प्रत्यक्षांत त्यासंबंधीं फारशी तरतूद केलेली नव्हती.

हे दोन महत्त्वाचे व इतर बारीकसारीक कित्येक फरक या दोन योजनांत होते. बँकॉर व युनिटास यांच्या संबंधींच्या सूचना, त्यांचे सोन्याशीं संबंध वगैरे गोष्टींत असे पुष्कळच फरक या दोन योजनांत होते. परंतु त्यासंबंधानें येथें चर्चा करण्याचें प्रायेजन नाहीं. साधारणतः असें सांगतां येईल कीं, अमेरिकन योजना जास्त रेखीव, तर्कशुद्ध व कार्यक्षम होती. केन्स योजनेंत प्रस्तावना व मल्लीनाथी पुष्कळ, परंतु एकंदर कारभार बोंगळ व थोडाफार स्वार्थीपणाचा. उदाहरणार्थ, अल्प व दीर्घ मुदतीच्या कर्जांचें कडक व प्रभावी असें नियंत्रण अमेरिकन योजनेंत सुचविलें होतें, परंतु केन्स योजनेंत त्यासंबंधीं कांहीं विचार दिग्दर्शित करून तो प्रश्न तसाच सोडला होता. प्रत्येक देशाचा वांटा एकंदर परराष्ट्रांशीं होणाऱ्या त्याच्या व्यापारावरून ठरवावा, असें केन्स योजनेंत सुचविलें होतें, तर अमेरिकन योजनेंत प्रत्येक देशाचें राष्ट्रीय उत्पन्न, त्याच्या परराष्ट्रीय व्यापारांतील चढउताराचें प्रमाण व त्या देशापाशीं असलेल्या सोन्याचा व इतर हुंडणावळींचा निधि यावरून ठरवावें असें सुचविलें होतें. केन्स योजनेंत बहुतेक सर्व निर्णय बहुमतानें व्हावेत अशी सूचना होती, तर पुष्कळसे निर्णय

चार पंचमांश मताधिक्यानेंच व्हावेत असें मत व्हाइट योजनेंत प्रविष्ट करण्यांत आलें होतें.

या दोन्ही योजना एप्रिल १९४३ मध्यें ब्रिटिश व अमेरिकन सरकारांमार्फत प्रथम प्रसिद्ध करण्यांत आल्या हें वर सांगितलेंच आहे. त्या प्रसिद्ध झाल्यावर त्या दोन्ही योजनांवर टीका झाली व त्यांत निरनिराळ्या सुधारणा सुचविण्यांत आल्या. या दोन्ही योजनांचा विचार करून कॅनडामधील तज्ज्ञांनीं जून १९४३ मध्यें एक नवीनच योजना पुढें मांडली. ही योजना पुष्कळशी व्हाइट योजनेच्या धर्तीवरच होती. त्यानंतर कांहीं कालानें अमेरिकन सरकारनें व्हाइट योजनेची एक सुधारून वाढविलेली आवृत्ति प्रसिद्ध केली. या दुसऱ्या व्हाइट याजनेंत राष्ट्रांनीं सार्वराष्ट्रीय निधीसाठीं द्यावयाच्या वर्गणीपैकीं निम्मी वर्गणी सोन्याच्याच स्वरूपांत दिली पाहिजे असा नवीन निर्बंध सुचविलेला होता व त्याशिवाय इतरहि कांहीं फरक केलेले होते. याच सुमारास फ्रेंच तज्ज्ञांनींहि एक योजना प्रसिद्ध केली. परंतु यासंबंधीं पुढें फारसें ऐकं आलें नाहीं. यानंतर ब्रिटिश व अमेरिकन तज्ज्ञांची एक परिषद् अमेरिकेंत भरली व तींत या सर्व व विशेषतः केन्स व व्हाइट योजनांचा विचार करण्यांत आला. या विचारविनिमयांतून ब्रिटिश-अमेरिकन तज्ज्ञांच्या एकमतानें सध्यां चर्चेचा विषय झालेली योजना बाहेर पडली आहे. सध्यां अमेरिकेंत भरणाऱ्या सार्वराष्ट्रीय चलन परिषदेंत याच नवीन योजनेचा विचार होणार आहे.

ही नवीन योजना पुष्कळशी मूळच्या व्हाइट योजनेवरच आधारलेली आहे, तरी त्या योजनेंतील तर्कशुद्धता, कांटेकोरपणा व रेखीवपणा या योजनेंत पुष्कळच कमी प्रमाणांत उतरला आहे. दोन योजनांची तडजोड करून दोघांना मान्य होणारी नवीन योजना करतांना असें होणें अटळ होतें हें उघडच आहे. परंतु जर या तडजोडीच्या भानगडींत कोणत्याहि सार्वराष्ट्रीय योजनेच्या यशस्वितेसाठीं आवश्यक असणाऱ्या कांहीं गोष्टींना बगल मिळाली तर नवीन होणारी योजना कितपत कार्यक्षम होईल हा प्रश्न स्वाभाविकपणें उद्‌भवतो. या दृष्टीनें ही नवीन योजना तपासली पाहिजे. नवीन योजनेंतून दोन गोष्टी गळल्या आहेत. अल्प व दीर्घ मुदतीच्या भांडवलाच्या देवाणघेवाणीचा बहुतेक सर्व व्यवहार या योजनेंतून वगळण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें युद्धकर्जें व त्यांची फेड हा प्रश्नहि या योजनेच्या कक्षेच्या बाहेर ठेवला गेला आहे. या योजनेंत युद्धानंतरच्या संक्रमणाच्या काळांतील व्यवस्थेकडे पूर्वीपेक्षां जास्त लक्ष पुरविलें आहे. नवीन योजनेचे हे तीन प्रमुख विशेष

आहेत व त्यांचा परिणाम तिच्या यशस्वितेस फार विघातक होईल असें निश्चितपणें वाटतें म्हणून त्यासंबंधीं थोडें विवेचन करणें आवश्यक आहे.

युद्धानंतरच्या संक्रमणकाळांत धनको राष्ट्रें या योजनेनुसार निर्माण होणाऱ्या सार्वराष्ट्रीय निधीचे तावडतोब सभासद होतील व सभासदांवर येणारीं सर्व नियंत्रणें त्यांना पाळावीं लागतील. परंतु ऋणको राष्ट्रें हळूहळू संपूर्ण सभासदत्व पावतील व जोंपर्यंत त्यांस संपूर्ण सभासदत्व प्राप्त झालेलें नाहीं तोंपर्यंत त्यांच्या आर्थिक व्यवहारावर सार्वराष्ट्रीय निधीतर्फे कोणतेंहि बंधन घालण्यांत येणार नाहीं. याचा अर्थ असा होतो कीं, या योजनेंत ऋणको राष्ट्रांना अर्थव्यवहारांत संपूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे. शिवाय ऋणको राष्ट्रांनीं अमूक एका मुदतींत पूर्ण सभासदत्वास पोंचलेंच पाहिजे असेंहि बंधन त्यांच्यावर घातलेलें नाहीं. त्या राष्ट्रांना आपण सभासदत्वास पोंचण्यास लायक झालों आहों असें वाटल्यासेरीज त्यांनीं सभासदत्वाचा बोजा घ्यावयाचा नाहीं अशी त्यांस सवलत आहे व त्यांची त्या दृष्टीनें कितपत लायकी आहे हें समजण्यास दृश्य असें कोणतेंच गमक या योजनेंत नाहीं. ऋणको राष्ट्रांना दिलेल्या या सवलतीचा त्यांनीं गैरफायदा घेतल्यास ही योजना नामशेष होईल यांत संदेह नाहीं.

त्याचप्रमाणें अल्प मुदतींचे सर्व राष्ट्रीय देवाणघेवाणीचे व्यवहार या योजनेंतून वगळले गेले म्हणजे हुंडणावळींचें स्थैर्य या योजनेनुसार साधतां येणार नाहीं. कारण युद्धपूर्वकाळांत मुख्यतः त्यांच्यामुळेंच हुंडणावळीला अस्थिरता प्राप्त झाली होती. मूळच्या व्हाइट योजनेंत भांडवलाच्या या देवघेवीच्या व्यवहारावर कडक व प्रभावी नियंत्रणें सुचविण्यांत आलीं होतीं व तीं इष्टच होतीं. हीं सर्व नियंत्रणें घालण्याची सत्ताच नवीन योजनेस आधारभूत असलेल्या संस्थेला देण्यांत आलेली नाहीं, त्यामुळें या सर्वच व्यवहारांत घोटाळे माजतील असें समजल्यास तें फारसें चूक ठरणार नाहीं. त्याचप्रमाणें युद्धकर्जांचा प्रश्नहि नवीन योजनेंत डावलला आहे. हा प्रश्न सोडविण्याची कांहीं योजना असल्यासेरीज इतर प्रश्नहि सुटणें मुष्कील आहे, हें उघड आहे. या योजनेंत स्टर्लिंग गटाच्या अस्तित्वास स्पष्टपणें संमति दिलेली आहे. यामुळें नवीन योजना कितपत यशस्वी होईल याबद्दल जबरदस्त शंका वाटते.

हिंदुस्थानच्या दृष्टीनें या चलनयोजनेचा विचार करतांना एकदोन गोष्टींसंबंधीं विशेष बारकाईनें विचार करणें जरूर आहे. युद्धानंतर हिंदुस्थानच्या आर्थिक उन्नतीस पोषक असें धोरण अंगिकारूं शकेल असें सरकार

राजकीय दृष्ट्या अस्तित्वांत येईल असें गृहीत धरल्यास या सरकारच्या अंतर्गत आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांत कोणत्याहि सार्वराष्ट्रीय संस्थेकडून ढवळाढवळ होणार नाहीं असें आश्वासन मिळणें आवश्यक आहे. मूळच्या केन्स व व्हाइट योजनेंत व नवीन योजनेंतहि अशा तऱ्हेचें आश्वासन देण्यांत आलेलें आहे. तेव्हां या योजनेंत गेल्यानें या बाबतींत तरी हिंदुस्थानच्या हितास धक्का पोचणार नाहीं. त्याचप्रमाणें युद्धानंतरच्या काळांत कांहीं दिवस तरी येथें निर्माण होणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या कच्च्या मालाच्या निर्यातीवर हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराची अभिवृद्धि व भरभराट अवलंबून राहील. या दृष्टीनें परराष्ट्रीय व्यापारांतील चढउतार व आंदोलनें यांची तीव्रता कमी करण्याचेंहि ज्या सार्वराष्ट्रीय संस्थेचें ध्येय व उद्दिष्ट असेल तिचे सभासद होणें व तिच्याशीं सहकार्य करणें हें केव्हांहि हिंदुस्थानच्या हिताचें ठरणार आहे.

हिंदुस्थानच्या दृष्टीनें यासेरीज महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हिंदुस्थानच्या खात्यावर सध्यां सांठत असलेल्या स्टर्लिंग कर्जाचा व त्याच्या फेडीचा प्रश्न होय. हिंदुस्थानच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें त्यास फार महत्त्व आहे. या स्टर्लिंग शिलकीचा हिंदुस्थानांत आपल्या मर्जीनुरूप उपयोग करावयास मिळण्यावरच आपली आर्थिक उन्नति अवलंबून आहे. जर ह्या कर्जाचा प्रश्न हिंदुस्थान व इंग्लंड यांच्या दरम्यान करार होऊन सुटावयाचा असेल तर या स्टर्लिंग रकमा वापरण्याच्या कामीं हिंदुस्थान परतंत्र होईल. त्या सर्वच रकमेची फेड फक्त इंग्लंडचाच माल व तो सुद्धां इंग्लंडच्या सवडीनुसार घेऊनच हिंदुस्थानला करून घ्यावी लागेल हें सर्वथा अनर्थावह आहे. म्हणून युद्ध-कर्जासंबंधीं कांहीं सार्वराष्ट्रीय योजना होऊन त्यामुळें त्यांची कालांतरानें कां होईना परंतु व्यवस्थित रीतीनें फेड होईल व त्या व्यवहारांत धनको राष्ट्रांचें त्या रकमा खर्च करण्याचें स्वातंत्र्य जास्तींत जास्त राहील अशा योजना निर्माण होण्यांत व तिच्याशीं सहकार्य करण्यांत हिंदुस्थानचें हित आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. मूळच्या व्हाइट योजनेंत अशा तऱ्हेची तरतूद होती हें विस्तृत-पणें मागें सांगितलेंच आहे.

या नवीन योजनेंतील जे दोष वर दाखविले आहेत त्यामुळें ती कितपत कार्यक्षम होईल याबद्दल शंका वाटते. या दृष्टीनें हिंदुस्थाननें तिच्या चर्चेंत भाग घेऊन तींत अवश्य त्या सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

# १२ स्टर्लिंग शिलकांचें भवितव्य

## १*

अमेरिकेंतील ब्रेटन वुड्स् येथें सध्यां भरलेल्या सार्वराष्ट्रीय चलन परिषदेपुढें मांडण्यांत आलेल्या योजनेचें आम्हीं नुकतेंच विवेचन केलें होतें. या योजनेंत युद्धकर्जाच्या फेडीची कांहींच तरतूद केलेली नाहीं; हिंदुस्थानच्या दृष्टीनें अशी तरतूद तींत करणें इष्ट आहे व अशा तऱ्हेची सुधारणा या योजनेंत घडवून आणणें जरूर आहे असें आम्हीं त्या लेखाच्या शेवटीं प्रतिपादिलें होतें. या परिषदेच्या कामकाजासंबंधीं ज्या ताज्या बातम्या आल्या आहेत, त्यांवरून असें समजतें कीं, आम्हीं सुचविलेल्या प्रकारची सुधारणा घडवून आणण्यासाठीं या परिषदेंत हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं एक ठराव मांडला, परंतु तो नापास झाला. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांच्या फेडीची योजना परिषदेपुढें असलेल्या योजनेंत घालण्यांत यावी अशा अर्थाचा ठराव हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं मांडला. कांहीं राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं त्याला पाठिंबाहि दिला; परंतु त्याला बहुमत मिळूं शकलें नाहीं. त्या ठरावास विरोध करणाऱ्या प्रतिनिधींनीं असें मत मांडलें कीं, हा प्रश्न महत्त्वाचा आहे याबद्दल दुमत नाहीं, परंतु सार्वराष्ट्रीय योजनेच्या चर्चेच्या प्राथमिक अवस्थेंतच हा प्रश्न उपस्थित केल्यास बराचसा घोटाळा होण्याचा संभव आहे. शिवाय युद्धकर्जाची रक्कम आतां इतकी मोठी झाली आहे कीं, सार्वराष्ट्रीय निधीच्या भांडवलाकडे पाहतां हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी या निधीवर टाकणें योग्य होणार नाहीं.

सार्वराष्ट्रीय योजनांतून स्टर्लिंग शिलकांच्या फेडीचा प्रश्न अशा प्रकारें वगळला गेला ही गोष्ट हिंदुस्थानच्या दृष्टीनें फार अनिष्ट झाली. त्यामुळें हिंदी लोकांची तीव्र निराशा होईल यांत शंका नाहीं. कारण या शिलकांवर येथील लोकांच्या पुष्कळच आशा–आकांक्षा केन्द्रित झाल्या आहेत. आतांपर्यंत मांडण्यांत आलेल्या हिंदुस्थानच्या आर्थिक अभ्युदयाच्या टाटा–बिर्ला अगर रॉय योजनांतून या स्टर्लिंग शिलकांचा बराचसा भाग हिंदुस्थानला थोड्या काळांत वापरावयास, म्हणजे यंत्रसामुग्री वगैरे खरेदी करण्यास मिळेल

* ज्ञानप्रकाश, ११ जुलै १९४४

या अपेक्षेवरच पुष्कळ भर देण्यांत आला होता. या योजनांत अपेक्षिल्याइतक्या थोड्या वेळांत या शिलका मिळणें शक्य होतें किंवा नव्हतें हा प्रश्न मतभेदाचा असू शकेल; परंतु तो येथें गैरलागू आहे. युद्धोत्तर कालीं हिंदुस्थानच्या औद्योगीकरणाचा प्रश्न सोडविण्यांत स्टर्लिंग शिलकांचा फार मोठा उपयोग होईल या अपेक्षेमुळें त्या हिंदी लोकांचें आशास्थान झाल्या आहेत, येवढाच मुद्दा येथें प्रस्तुत आहे. सार्वराष्ट्रीय योजनेंत त्यांच्या फेडीचा प्रश्न डावलला गेल्यामुळें या आशा–आकांक्षांवर विरजण पडल्यासारखें झाल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. परंतु या तात्पुरत्या पराजयामुळें नुसतें निराश होऊनच चालणार नाहीं; त्यांतून कांहींतरी मार्ग हा काढलाच पाहिजे.

या दृष्टीनें प्रथमंतः आतां उत्पन्न झालेल्या नवीन परिस्थितीचा साकल्यानें विचार करणें आवश्यक आहे. सार्वराष्ट्रीय योजनेंत युद्धकर्जाचा प्रश्न अंतर्भूत केला जात नाहीं ही गोष्ट आतां स्पष्ट झाली. याचा अर्थ असा कीं ह्या कर्जाचा प्रश्न राष्ट्राराष्ट्रांनीं आपापसांत उभयपक्षीं करार करून सोडवावयाचा आहे. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांची फेड हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामध्यें करार होऊनच होणार आहे असें यावरून स्पष्ट झालें. तेव्हां अशा तऱ्हेचा करार करतांना घ्यावयाची काळजी, त्यांत येणाऱ्या अडचणी, त्यांत टाळावयाचे धोके ह्या गोष्टींचा विचार करणें ओघानेंच आलें.

इंग्लंड व हिंदुस्थान या दोन राष्ट्रांत व्हावयाच्या कराराची कल्पना बांधतांना दोन्ही राष्ट्रांच्या बलाबलाचा थोडासा विचार केला पाहिजे. इंग्लंड देश जरी ऋणको झाला आहे तरी हिंदुस्थानच्या मानानें तो केव्हांहि पुष्कळच प्रबल आहे व युद्धोत्तर कालींहि राहील यांत शंका नाहीं. त्या मानानें पाहतां हिंदुस्थान हा धनको खरा, परंतु दुर्बल आहे. आणि बलवान् व सामर्थ्यशाली ऋणको राष्ट्र दुर्बल धनको राष्ट्रास सुद्धां धाब्यावर बसवूं शकतें, याचें प्रत्यंतर जर्मनीनें पूर्व युरोपांत शास्त्रप्रणीत व्यापाराचें तंत्र अवलंबून अगदीं अलीकडे दाखविलें आहे. हा इतिहास अगदीं ताजा आहे. इंग्लंड–हिंदुस्थानांत जो करार व्हावयाचा, तो करार करणारे दोन पक्ष तुल्यबल नाहींत. त्यामुळें हिंदुस्थानाची बाजू अशा तऱ्हेचा करार करतांना पुष्कळच लंगडी पडेल. इंग्लंडला आपल्या फायद्याच्या व हिंदुस्थानच्या तोट्याच्या अटी या करारांत हिंदुस्थानवर लादतां येतील. किंबहुना ही गोष्ट टाळण्यासाठींच हा प्रश्न सार्वराष्ट्रीय योजनेंत अंतर्भूत होणें हिंदुस्थानच्या दृष्टीनें इष्ट आहे असें आम्हीं प्रतिपादिलें होतें. दुर्दैवानें अशा तऱ्हेची

व्यवस्था होत नाहीं असें दिसतें. परंतु त्यामुळें निराश न होतां प्राप्त परिस्थितीस तोंड देण्याची तयारी केली पाहिजे. त्यासाठीं या परिस्थितीचें मोजमाप अगदीं निष्ठुरपणें व कांटेकोर रीतीनें केलें पाहिजे.

स्टर्लिंग शिलकांच्या फेडीसंबंधीं हिंदुस्थानशीं करार करतांना इंग्लंड आपल्या फायद्याच्या कोणत्या गोष्टी त्यांत घालण्याचा प्रयत्न करील यासंबंधीं थोडीफार कल्पना करतां येण्यासारखी आहे. मुख्यतः तीन गोष्टी इंग्लंड हिंदुस्थानावर लादूं पाहील. (१) स्टर्लिंग शिलकांपैकीं कांहीं भाग मुद्दलांतच कमी करणें; युद्धखर्चाची पुनर्विभागणी वगैरे गोष्टी यांत येतात. (२) स्टर्लिंग व रुपया यांच्यामधील हुंडणावळीचा भाव १८ पेन्स आहे, तो कमी करण्यास विरोध करणें व रुपया हल्लीं जसा कायदेशीरपणें स्टर्लिंगवर आधारलेला आहे, तसाच तो ठेवण्याची खटपट करणें; हिंदुस्थानच्या सार्वराष्ट्रीय व्यवहारांतील देण्याघेण्याचे व्यवहार लंडनमधूनच हल्लींप्रमाणें पुरे करण्याची हिंदुस्थानवर सक्ती करणें. (३) स्टर्लिंग शिलकांची फेड करतांना फेडीच्या प्रतिवार्षिक हप्त्याइतक्या किंमतीचा जादा ब्रिटिश माल हिंदुस्थानास घेणें भाग पाडणें. या तिन्हींतून आपलें फारसें नुकसान न होऊं देतां कसा मार्ग काढायचा, हा महत्त्वाचा प्रश्न हिंदुस्थानसमोर आहे. यासाठीं या प्रत्येकाबद्दल स्वतंत्र व जरासा विस्तृत विचार करणें आवश्यक आहे.

(१) स्टर्लिंग शिलका कां व कशा निर्माण झाल्या यासंबंधीं आम्हीं पूर्वीं पुष्कळ वेळां येथें विवेचन केलेलें आहे. इंग्लंड व दोस्त राष्ट्रें यांच्या वतीनें युद्धकालांत हिंदुस्थानांत फार प्रचंड प्रमाणावर मालाच्या खरेद्या करण्यांत आल्या. त्यांचा प्रत्यक्ष खर्च हिंदुस्थान सरकारनें अगर पर्यायानें हिंदी लोकांनींच केला. परंतु त्यासाठीं हिंदुस्थान सरकारास या राष्ट्रांनीं स्टर्लिंग दिले व ती रक्कम लंडनमध्यें हिंदुस्थानच्या खात्यावर जमा करण्यांत आली. त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या खर्चापैकीं किती भाग इंग्लंडनें सोसावयाचा याबद्दल युद्धाच्या सुरवातीसच इंग्लंड-हिंदुस्थान यांच्या दरम्यान करार झाला होता. या करारान्वयें या खर्चापैकीं जो भाग इंग्लंडनें सोसावयाचा होता, त्याबद्दलहि हिंदुस्थानास इंग्लंडनें स्टर्लिंगच दिले व प्रत्यक्ष खर्च हिंदुस्थान सरकारनें केला. इंग्लंडनें दिलेली ही रक्कमहि वर उल्लेखिल्याप्रमाणें लंडनमध्यें हिंदुस्थानच्या खातीं जमा झाली. हिंदी जनतेच्या पोटाला चिमटा बसून त्यांतूनच या स्टर्लिंग शिलका निर्माण झाल्या आहेत.

या स्टर्लिंग शिलका अजून वाढतच आहेत व जपानशीं चाललेल्या युद्धाचा हिंदुस्थान हा तळ झालेला असल्यामुळें दोस्त राष्ट्रांना येथें पुष्कळच खर्च करावा लागेल व त्यामुळें या शिलका अधिकच वाढतील हें उघड आहे. स्टर्लिंग शिलका मुदलांतच कमी करण्याची म्हणजे त्या आणखी वाढूं न दण्याची ही संधि होय. दोस्त राष्ट्रांना व विशेषतः इंग्लंडला करारप्रमाणें या युद्धासाठीं कराव्या लागणाऱ्या खर्चांपैकीं बराचसा भाग हिंदुस्थानावर लादतां आला तर इंग्लंडला त्याबद्दल स्टर्लिंग द्यावे लागणार नाहींत व पर्यायानें हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलका जास्त वाढणार नाहींत हें उघड आहे. या दृष्टीनेंच इंग्लंड व हिंदुस्थानमधील युद्धखर्चाच्या वांटणीचा करार बदलून घ्यावा अशा तऱ्हेचा सूर इंग्लंडमधील वर्तमानपत्रें काढूं लागलीं आहेत. लंडनच्या 'इकॉनॉमिस्ट' पत्रानें या बाबतींत आघाडी मारली. इकॉनॉमिस्ट पत्राचा युक्तिवाद असा कीं, 'युद्धखर्चाच्या वांटणीचा करार झाला त्यावेळची म्हणजे युद्धाच्या सुरवातीची परिस्थिति आतांच्या परिस्थितीहून फार निराळी होती. त्या वेळीं जपानमुळें हिंदुस्थानांत इतका खर्च करावा लागेल अशी अपेक्षा नव्हती. आतां हिंदुस्थानावरचें जपानी आक्रमण थोपविण्यासाठीं इंग्लंडलाच बराचसा खर्च करावा लागत आहे. यासाठीं या नवीन परिस्थितींत हिंदुस्थाननें स्वसंरक्षणासाठीं होणाऱ्या खर्चाचा जास्त वांटा उचलणें हें न्याय्य होईल व त्या दृष्टीनें युद्ध-खर्चाच्या वांटणीचा जुना करार रद्द करून नवीन केला पाहिजे. यावर हिंदुस्थानतर्फे असें सांगण्यांत येईल कीं, इतका खर्च सोसण्याची त्या देशाची कुवत नाहीं. परंतु प्रत्यक्ष युद्धखर्च हिंदुस्थान सरकारनेंच केलेला असल्यामुळें वास्तविक पाहतां हिंदुस्थाननें तो सोसलाच आहे. तेव्हां तो सोसण्याची कुवत हिंदुस्थानला नाहीं या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं.'

ही विचारसरणी मूलतः चुकीची आहे. परंतु हिंदुस्थाननें या युद्धाचा कोणताच खर्च सोसण्याचें कारण नाहीं; पण तें या युद्धांत हिंदुस्थानास ओढण्यांत आलें आहे असें म्हणणारे म्हणतात त्या दृष्टीनें मात्र नव्हे. कारण हिंदुस्थानानें कोणताच खर्च सोसूं नये हें म्हणणें टिकणारें नाहीं. ब्रिटिश येथें नसते तर जपाननें हिंदुस्थानवर हल्ला केला नसता ही विचारसरणी चुकीची तर आहेच, पण घातकीहि आहे. इकॉनॉमिस्ट पत्राच्या वर उल्लेखिलेल्या विचारसरणीस पुढीलप्रमाणें उत्तर देतां येईल. प्रत्यक्ष खर्च जरी हिंदुस्थाननें सोसला असला तरी त्यामुळें हिंदुस्थानला खर्च सोसण्याची कुवत आहे असें

सिद्ध होत नाहीं. हा खर्च सोसला खरा, पण त्यांतून उद्भवलेल्या चलनवृद्धीनें येथें काय हा:हा:कार केला व अजून चालविलेला आहे हें कोणासहि दिसून येईल. या गोष्टीवरून हा खर्च सोसण्याची हिंदुस्थानची ताकद नाहीं हें स्पष्टच आहे. गेल्या बजेटाच्या भाषणांत अर्थमंत्र्यांनीं याच्या अगदीं उलट बाजू मांडली व तीच वस्तुस्थितीस जास्त धरून आहे. अर्थसचिवांच्या या भाषणामुळें विलायतेंत गैरसमज पसरला आहे यांत शंका नाहीं. तेव्हां या बाबतींत इंग्लंडबरोबर करार करतांना हिंदुस्थाननें असें म्हणावें कीं, "आमच्या कुवतीप्रमाणें युद्धखर्च सोसण्यास आम्ही तयार आहों. परंतु आमची खरोखर किती खर्च सोसण्याची शक्ति आहे हें प्रथमतः निःपक्षपातीपणानें ठरवावें व तेवढा खर्च आमच्यावर लादावा. त्याचप्रमाणें ऑस्ट्रेलिया वगैरे देशांनीं यासंबंधीं इंग्लंडबरोबर कोणत्या प्रकारचे करार केले आहेत हें पाहून त्याप्रमाणेंच करार करण्याची हिंदुस्थानाला मोकळीक देण्यांत यावी." अशा सुज्ञ रीतीनेंच या प्रश्नाचा विचार करून तो सोडविण्याचा प्रयत्न करणें आवश्यक आहे व या मार्गानेंच हिंदुस्थानचें सर्वांत कमी नुकसान होईल.

२*

हुंडणावळीच्या दरासंबंधींच्या चर्चेस सुरवात करतांना प्रथमतः ते दर नेहमींच्या व्यवहारांत कसे ठरवतात, याबद्दल अगदीं स्थूल मानानें थोडी माहिती दिली पाहिजे. दोन देशांच्या चलनांच्या हुंडणावळींचे दर त्या देशांतील अन्तर्गत किंमतींच्या पातळ्यांवर बऱ्याच अंशीं अवलंबून असतात असा अगदीं सामान्य व ठोकळ नियम सांगतां येईल. यांत पुष्कळच बारकावे व विकल्प आहेत. परंतु त्यांत येथें शिरण्याचें कारण नाहीं. फक्त येथें करावयाच्या विवेचनासाठीं हा ठोकळ नियम पुरे आहे. या नियमान्वयें पाहतां दोन देशांपैकीं एका देशांत जर किंमतींचें मान दुप्पट वाढलें व दुसऱ्या देशांत पूर्वींच्याच किंमती कायम राहिल्या तर पहिल्या देशाच्या चलनाची दुसऱ्या देशाच्या चलनांतील किंमत सामान्यतः निम्यानें होईल. म्हणजे सामान्यतः दोन देशांतील अन्तर्गत किंमतींत ज्या प्रमाणांत फरक पडेल, त्याच प्रमाणांत थोड्याबहुत फरकानें त्या दोन देशांतील हुंडणावळीच्या दरांतहि बदल होईल. या सूत्रान्वयें आतां हिंदुस्थानांतील प्रश्नाचा विचार करूं.

* ज्ञानप्रकाश, १२ जुलै १९४४

सध्यां या देशांतील सर्वच किंमती जवळजवळ तिपटीनें वाढल्या आहेत व रुपयाची किंमत त्याच प्रमाणांत उतरली आहे. इतर देशांतहि युद्धकालांतील किंमती इतक्या नसल्या तरी थोड्याफार प्रमाणांत वाढल्याच आहेत. खुद्द इंग्लंडमध्यें किंमती युद्धाच्या सुरवातीपेक्षां साधारणत: ३० ते ४० टक्क्यांनीं वाढल्या आहेत. सार्वराष्ट्रीय व्यापार व देवाण-घेवाणीचे व्यवहार नेहमींप्रमाणेंच चालू असते व हुंडणावळींचे भाव कायद्यानें अमकेच ठेवावयाचे असें बंधन नसतें तर हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यांतील अन्तर्गत किंमतींच्या प्रमाणांत रुपया—स्टर्लिंग यांच्या हुंडणावळीचा दर बदलला असता. म्हणजे रुपयाची किंमत अन्तर्गत व्यवहारांत जशी सध्यां कमी झाली आहे, त्यापेक्षां थोड्या कमी प्रमाणांत (कारण इतर देशांतहि किंमती वाढल्या आहेत) सार्वराष्ट्रीय व्यवहारांतहि झाली असती. परंतु हल्लीं रुपयाची सार्वराष्ट्रीय व्यवहारांतील किंमत त्याच्या अन्तर्गत किंमतीच्या मानानें कमी झालेली नाहीं. त्या दोहोंत बराच फरक पडला आहे व युद्धकालांतील व्यापार व व्यवहार यांवरील बंधनांमुळें व त्यांतील अडचणीमुळें तो टिकूनहि राहिला आहे. युद्धानंतर असा फरक फार वेळ टिकवितां येणार नाहीं. याचा अर्थ असा कीं, रुपयाच्या अंतर्गत व सार्वराष्ट्रीय किंमतींत लवकर मेळ घालावा लागेल. म्हणजेच अन्तर्गत किंमतींच्या प्रमाणांत हुंडणावळीचा दर कमी करावा लागेल.

परंतु ही गोष्ट हिंदुस्थानच्या दृष्टीनें इष्ट असली तरी इंग्लंडला अनिष्ट आहे. कारण रुपया व स्टर्लिंग यांच्या हुंडणावळीचा भाव कमी झाल्यास हिंदी बाजारपेठेंतील इंग्लिश मालाच्या किंमती चढतील व उलट पक्षीं इंग्लंडमधील हिंदी पदार्थांच्या किंमती उतरतील. असें झाल्यास इंग्लंडला आपला माल हिंदुस्थानांत चढाओढीनें खपवितां येणार नाहीं व त्यामुळें हिंदस्थानच्या कर्जाची त्यास फेडहि करतां येणार नाहीं. कारण कर्जाची फेड सामान्यत: जादा माल निर्यात केल्यानेंच होते हें उघड आहे. त्यामुळें रुपया-स्टर्लिंग हुंडणावळीचा भाव कमी करण्यास इंग्लंड मुळींच तयार होणार नाहीं.

युद्धसमाप्तीनंतर रुपयाच्या अन्तर्गत व सार्वराष्ट्रीय किंमतीचा मेळ न घातल्यास काय परिणाम होतील, हें गेल्या महायुद्धाच्या अनुभवावरून अजमावतां येण्यासारखें आहे. गेल्या महायुद्धानंतर हुंडणावळीचा भाव कायद्यानें रुपयास २ शिलिंग ठरविण्यांत आला होता. परंतु अन्तर्गत किंमतीच्यापेक्षां

त्तो कितीतरी जास्त होता. रुपयाची अन्तर्गत व्यवहारांतील किंमत दोन शिलिंगपेक्षां पुष्कळच कमी होती. त्यामुळें हुंडणावळीच्या या सरकारप्रणीत भावाचा फायदा सट्टेबाजांनीं घेतला व हा भाव टिकविण्याच्या इरेला पडून तो टिकविण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें त्यावेळीं सांठलेल्या ५५ लक्ष पौंड स्टर्लिंग शिलकांचा चुराडा केला आणि अन्तर्गत व्यवहारांत चलनक्षयाच्या धोरणाचा अवलंब करून देशाच्या आर्थिक प्रगतीस पायबंद घातला. या महायुद्धानंतरहि अशा प्रकारची परिस्थिति उत्पन्न होण्याची वरील चर्चेवरून शक्यता दिसते. युद्धाच्या शेवटीं रुपया–स्टर्लिंग हुंडणावळीचा भाव इंग्लंडच्या विरोधामुळें कमी न करतां आल्यास तो फाजील वाढलेला दर टिकविण्यासाठीं स्टर्लिंग शिलकांच्या बऱ्याचशा भागाचा चुराडा उडेल व त्याबरोबरच अवलंबाव्या लागणाऱ्या चलनक्षयाच्या धोरणामुळें हिंदुस्थानची आर्थिक वाढहि खुंटेल. त्याचमुळें हिंदुस्थानच्या आर्थिक घटनेवर कायम स्वरूपाचे अनिष्ट परिणाम घडतील. यासाठीं कांहींतरी उपाययोजना करणें जरूर आहे.

या विशिष्ट प्रश्नाचा विचार आपण अधिक व्यापक दृष्टीनें केला पाहिजे. तात्कालिक फायदा अगर तोटा यापेक्षां दीर्घकालीन नफा–नुकसानीकडे आपण जास्त लक्ष दिलें पाहिजे व देवाण–घेवाणीची वृत्ति ठेवली पाहिजे. कारण हा प्रश्न सोडवितांना पुष्कळच अडचणी येणार आहेत. रुपया–स्टर्लिंगच्या हुंडणावळीचा भाव कमी होणें इंग्लंडला नको आहे. कारण त्यामुळें हिंदी बाजारपेठेंतून इंग्लंडचा माल खपणार नाहीं व त्यामुळें स्टर्लिंग शिलकांची फेड करणेंहि कठीण होईल. याउलट हा भाव कमी न झाल्यास हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांपैकीं कांहीं भागाचा चुराडा उडणार आहे व येथील आर्थिक प्रगतीस पायबंद बसणार आहे. या दोन विरोधी बाजूंत तडजोड घडवून आणणें फार कठीण आहे. या हुंडणावळीच्या दरांच्या अनुरोधानेंच इंग्लंडकडून स्टर्लिंग कर्जापैकीं कांहीं भागाच्या सुटीची मागणी करण्यांत येईल.

"हिंदुस्थानांतील किंमती तिप्पट वाढल्यामुळें येथें माल खरेदी करण्यास. इंग्लंडला दुप्पट तिप्पट पैसे द्यावे लागले. त्यावेळीं हुंडणावळीचा दर अन्तर्गत किंमतीप्रमाणें कमी झाला नाहीं व त्या दरानेंच इंग्लंडला हिंदुस्थानकडून कर्ज घ्यावें लागलें. हुंडणावळीचा भाव कायम राहिल्यानें इंग्लंडला दुप्पट तिप्पट खर्च करावा लागला व त्यामुळेंच हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलका इतक्या फुगूं शकल्या. यासाठीं यांपैकीं कांहीं रकमेची सूट आम्हांला मिळणें

आवश्यक आहे," असें इंग्लंडला न्यायत: म्हणतां येईल व हिंदुस्थानला या मागणीला साफ नाहीं म्हणतां येणार नाहीं.

तथापि या निरनिराळ्या अडचणी तपशिलाच्या आहेत. त्या कशा प्रकारच्या असतील हें दाखविण्यासाठींच वरील चर्चा केली. परिस्थिति स्पष्ट आहे. रुपयाच्या अन्तर्गत व सार्वराष्ट्रीय व्यवहारांतील किंमतींत सध्यां पडलेला फरक युद्धोत्तर कालीं आम्हांस फार जाचक होणार आहे. हुंडणावळीच्या संबंधीं काय व्यवस्था पुढें होईल त्याविषयीं आतांच कांहीं तर्क बांधतां येणार नाहीं. परंतु रुपयाच्या अन्तर्गत किंमतीबद्दल मात्र आपल्याला अजूनहि पुष्कळ करतां येण्यासारखें आहे. रुपयाची अन्तर्गत व्यवहारांतील किंमत आपल्याला वाढवितां आली, म्हणजेच हल्लींच्या किंमती कमी झाल्या, तर रुपयाच्या अन्तर्गत व सार्वराष्ट्रीय किंमतींत सध्यां पडलेला फरक पुष्कळच कमी होईल व त्यामुळें युद्धोत्तर कालीं येणाऱ्या पुष्कळशा अडचणी आतांपासूनच दूर होण्याच्या मार्गाला लागतील. यासंबंधीं पुढें आणखी चर्चा केली आहे.

रुपया व स्टर्लिंग यांच्या कायदेशीर संबंधाबद्दलहि आपणांस येथें थोडासा विचार करणें आवश्यक आहे. युद्धोत्तर काळांत सध्यांचा स्टर्लिंग गट कायम ठेवून किंवा प्रसंगविशेषीं वाढवून लंडनचेंच सार्वराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांतील प्रमुख स्थान कायम ठेवण्याच्या दृष्टीनें इंग्लंडचे प्रयत्न असणें स्वाभाविक आहे. हिंदुस्थान आतांपर्यंत स्टर्लिंग गटाचाच सभासद आहे. या गटाच्या सभासदाला दोन अटी पाळाव्या लागतात. एक तर, त्यानें आपलें चलन व पौंड स्टर्लिंग यांमधील हुंडणावळीचा दर ठरवून तो कायम राखला पाहिजे. दुसरें म्हणजे त्यानें सार्वराष्ट्रीय व्यापारांतील देण्याघेण्याचे सर्व व्यवहार स्टर्लिंगच्या साह्यानें म्हणजे लंडनमार्फत केले पाहिजेत व त्या व्यवहारांतून उरणारी स्टर्लिंग शिल्लक लंडनमध्यें ठेविली पाहिजे. स्टर्लिंग गटाच्या सभासदत्वामुळें हिंदुस्थानचें आजपर्यंत पुष्कळच नुकसान झालेलें आहे. स्टर्लिंग-रुपयाच्या हुंडणावळीचा भाव कायम राखण्याच्या निर्बंधामुळें अन्तर्गत आर्थिक परिस्थितीस आवश्यक असलेले हुंडणावळीचे फरक हिंदुस्थानला युद्धापूर्वीच्या दहाबारा वर्षांत करतां आले नाहींत व त्यामुळें या देशास जागतिक आर्थिक मंदीची झळ अधिक तीव्रपणानें लागली. युद्धोत्तर कालीं स्टर्लिंगचें हें कायदेशीर लोढणें हिंदुस्थानास आर्थिक सुस्थितीच्या दृष्टीनें नको आहे. यासाठीं हिंदुस्थानला आपलें चलन स्टर्लिंगवर आधारावयाचें नाहीं म्हणजेच

त्याला स्टर्लिंग गटांत रहावयाचें नाहीं. याचा अर्थ हिंदुस्थान स्टर्लिंगमध्यें कोणताहि व्यवहार करणारच नाहीं असा नव्हे. फक्त त्याला आपलें आर्थिक व चलनविषयक धोरण स्टर्लिंगछंदानुवर्ती ठेवावयाचें नाहीं.

ही गोष्ट इंग्लंडला मुळींच नको आहे. स्टर्लिंग–रुपयाचा कायदेशीर संबंध नसावा असें जरी हिंदुस्थानला वाटत असलें तरी युद्धांत त्याच्या खात्यावर स्टर्लिंग शिलकाच सांठल्या आहेत व युद्धोत्तर कालांत त्यांचा प्रत्यक्ष उपयोगहि हिंदुस्थानला लंडनमार्फतच करावा लागेल हें उघड आहे. प्रत्यक्ष व्यवहार करण्याच्या सौकर्याच्या व फायद्याच्या दृष्टीनें रुपयाचा स्टर्लिंगशीं ‘व्यवहारी’ संबंध ठेवावाच लागेल. पण असा ‘व्यवहारी’ संबंध ‘कायदेशीर’ संबंधापेक्षां केव्हांहि जास्त श्रेयस्कर. इंग्लंडलाहि असा कायदेशीर संबंध हिंदुस्थानवर लादतां येणार नाहीं याची जाणीव आहे म्हणूनच हिंदुस्थाननें स्टर्लिंगशीं निदान ‘व्यवहारी’ संबंध तरी ठेवावा व सार्वराष्ट्रीय देवाण–घेवाणीचे व्यवहार लंडनमार्फत करावेत, एवढ्याच गोष्टीवर इंग्लंड सध्यां तरी समाधान मानावयास तयार आहे असें दिसतें. अर्थात् असा ‘व्यवहारी’ संबंध ठेवण्यांत व लंडनमार्फत व्यवहार करण्यांत हिंदुस्थानचें फारसें नुकसान नाहीं. इंग्लंडची ही मागणी त्याला मान्य करतां येईल.

३*

स्टर्लिंग शिलकांची फेड इंग्लंडकडून माल घेऊनच केव्हांहि करून घ्यावी लागेल. स्टर्लिंग शिलका खर्च करून इतर देशांकडून, विशेषतः अमेरिकेकडून, माल घेण्याचें स्वातंत्र्य हिंदुस्थानास मिळालें असतें तर पाहिजेच होतें. मूळच्या अमेरिकन सार्वराष्ट्रीय चलनयोजनेंत निम्म्यापेक्षां कमी रक्कम तरी अशा रीतीनें खर्च करतां येण्याची तरतूद केलेली होती. पण ती तरतूद व हा सर्वच प्रश्न नवीन योजनेंतून वगळण्यांत आल्यामुळें ती गोष्ट बरीचशी कठीण झाली आहे. प्राप्त परिस्थितींत इंग्लंडकडूनच सर्व माल घेऊन हें कर्ज फेडून घेतलें पाहिजे ही गोष्ट आतां अटळ आहे व हिंदुस्थाननें त्यास मान्यता देण्यास तयार झालें पाहिजे. मात्र त्यांत कांहीं धोके आहेत, ते टाळण्याचा आपल्याला प्रयत्न करतां येईल.

युद्धोत्तर कालीं हिंदुस्थानला मुख्यतः यंत्रसामुग्रीची बऱ्याच मोठ्या प्रमाणावर गरज लागेल व ती इंग्लंडकडून घ्यावी लागेल. या दृष्टीनें विचार

* ज्ञानप्रकाश, १५ जुलै १९४४.

करतां युद्धोत्तर काळांत इंग्लंड अशा तऱ्हेचा माल किती प्रमाणांत पुरवूं शकेल याकडे लक्ष दिलें पाहिजे. अर्थात्‌च ही गोष्ट इंग्लंडच्या युद्धोत्तर काळांतील उत्पादनसामर्थ्यावर व विशेषतः त्याच्या निर्यात करण्याच्या कुवतीवर सर्वस्वीं अवलंबून राहील. युद्ध संपल्याबरोबर चारपांच वर्षांतच इंग्लंडची उत्पादनशक्ति फारशी वाढेल असें वाटत नाहीं. या महायुद्धांत झालेल्या मनुष्य व वित्तहानीमुळें इंग्लंडला पूर्वस्थितीस येण्यास निदान सहासात वर्षें तरी लागतील. तेव्हां या काळांत इंग्लंडकडून हिंदुस्थानास फारशी यंत्र-सामुग्री अगर माल मिळण्याची आशा नाहीं. हिंदुस्थानांतील भांडवलवाल्यांच्या भाषणांवरून व वक्तव्यांवरून असें दिसतें कीं, त्यांना लढाई संपल्याबरोबर दोनचार वर्षांत भराभर स्टर्लिंग शिलका खर्चून यंत्रसामुग्री वगैरे माल हिंदु-स्थानांत आणण्याची घाई झाली आहे. ही गोष्ट अनिष्ट आहे. आपल्या स्टर्लिंग शिलका खर्च करून याच काळांत यंत्रसामुग्री वगैरे खरेदी करण्याची आपण घाई केल्यास अगर आग्रह धरल्यास या युद्धानंतर ज्या यंत्रसामुग्रीची अगर मालाची इंग्लंडला जरूर नाहीं व जो माल त्याला नवीन उत्पादनांतून द्यावा लागणार नाहीं तेवढाच इंग्लंडकडून आपल्यास मिळूं शकेल. उदाहर-णार्थ युद्धकालांत बांधलेल्या जहाजांपैकीं बरींचशीं जहाजें इंग्लंडला युद्धोत्तर कालीं लागणार नाहींत; तीं हिंदुस्थानला विकत मिळूं शकतील. किंवा रणगाडे, तोफा वगैरे युद्धोपयोगी सामानहि व थोडी यंत्रसामुग्रीहि मिळूं शकेल आणि तें फुगलेल्या भावांत मिळेल. ही यंत्रसामुग्री अर्थात्‌च युद्धोत्तर कालांत ज्या तांत्रिक सुधारणा होतील त्यांनीं युक्त असणार नाहीं, म्हणजे हल्लींच्या पद्धतीची असेल. अशा तऱ्हेनें आपण माल खरेदी केल्यास आपलें दुहेरी नुकसान होईल. एक तर जुन्या पद्धतीची उत्पादन-सामुग्री आपल्याला मिळेल व इतर देशांत नवीन पद्धतीनें तयार केलेल्या मालाबरोबर आपल्याला टिकाव धरतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें युद्ध संपल्या-बरोबर हा माल विकत घेतल्यास तो त्यावेळच्या फुगलेल्या भावानें घ्यावा लागेल व त्यामुळें आपलाच तोटा होईल. या बाबतींत थोडी सबूर केल्यास हे दोन्ही धोके टाळतां येण्यासारखे आहेत. या दृष्टीनें स्टर्लिंग शिलकांची फेड हळूहळू व थोड्याथोड्या रकमेनेंच होणें इष्ट व आपल्या फायद्याचें आहे. इंग्लंडच्या दृष्टीनें हें सोईचें आहे. म्हणून या प्रश्नावर उभयपक्षीं समाधानकारक तडजोड होऊं शकेल, असें मानण्यास हरकत दिसत नाहीं.

युद्धोत्तर कालीं इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या दरम्यान जो करार करावा

लागेल, त्यांतील अडचणी व धोके यांची येथवर चर्चा झाली. 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः' या सूत्राप्रमाणें वागल्यास आपल्या मार्गांतील अडचणी व धोके पुष्कळ प्रमाणांत टाळतां येतील, असाच वरील चर्चेचा निष्कर्ष आहे. परंतु हे धोके युद्धोत्तर कालांतील आहेत व त्यावेळीं त्याच्याकडे लक्ष देतां येईल असें म्हणून चालण्यासारखें नाहीं. आतांपासून त्या दृष्टीनें आपणांस येथील आर्थिक धोरण आंखणें भाग आहे. कारण तसें न झाल्यास युद्धाच्या अन्तापर्यन्त येथील अन्तर्गत आर्थिक परिस्थिति इतकी बिघडेल कीं वर उल्लेखिलेले सर्व धोके व नुकसान टाळणें आपणांस अशक्य होईल. यासाठीं आपलें अन्तर्गत आर्थिक धोरण कसें असलें पाहिजे याची थोडी चर्चा करणें आवश्यक आहे.

युद्धोत्तर कालीं हिंदुस्थानला मुख्यतः दोन धोके टाळावयाचे आहेत. हुंडणावळीच्या जादा भावामुळें होणारा स्टर्लिंग शिलकांचा नाश टाळणें व आर्थिक प्रगतींत येणारे अडथळे टाळणें. या दोन गोष्टी टाळावयाच्या दृष्टीनें आपलें आर्थिक धोरण आंखावयास पाहिजे.

आणि हीच गोष्ट हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीस पायबंद न बसण्यासाठीं करणें आवश्यक आहे. युद्ध संपल्याबरोबर सरकारी मालाची मागणी एकदम कमी होईल व सरकारी तिजोरींतून वाहणारा पैशाचा ओघहि आटेल. शेतकी मालाच्या किंमती व त्यांच्या मागोमाग औद्योगिक बनावटीच्या मालाचे भाव एकदम ढांसळतील. सरकारी मागणी कमी झाल्यामुळें पुष्कळ माल गिऱ्हाइकांच्या शोधार्थ बाजारपेठेंत येईल, परंतु त्याच वेळीं गिऱ्हाइकांची आर्थिक शक्तिहि कमी होईल. बहुसंख्य शेतकऱ्यांच्या हातांतील पैसे शेतकी मालाच्या किंमती पडल्यामुळें एकदम कमी होतील व त्या प्रमाणांत या देशांतील सार्थ गिऱ्हाइकीहि घटेल. अन्तर्गत किंमती सध्यां वाढलेल्या असल्यामुळें औद्योगिक बनावटीच्या मालाचा उत्पादनखर्चहि पुष्कळ वाढलेला आहे. युद्ध संपल्यावर हा खर्च वाढलेलाच राहील व मालाच्या किंमती मात्र उतरतील. गिऱ्हाइकांच्या हातांतील पैसा कमी झाल्यामुळें पूर्वीच्या भावानें हा माल कोणीहि विकत घेणार नाहीं. या देशाच्या बाजारांत किंमती वाढल्या कीं मालाचा उठाव कमी होतो, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. त्यामुळें युद्धानंतरच्या कालांत आतांपासून काळजी न घेतल्यास आर्थिक मंदीची प्रचंड लाट या देशावर येण्याचा सुतराम् संभव दिसतो. आणि मग आर्थिक प्रगतीची

गोष्ट तर राहीच, पण आर्थिक दुर्गतीच होण्याचा संभव जास्त. हें टाळावयाचें असेल तर अंतर्गत किंमती कमी करण्याचें व पर्यायानें त्याच प्रमाणांत उत्पादनखर्च कमी करण्याचें धोरण आपणांस आतांपासून अंगिकारलें पाहिजे.

सध्यां रुपयाच्या अन्तर्गत व सार्वराष्ट्रीय किंमतींत फरक पडला आहे-यासंबंधीं मागें विवेचन केलेलेंच आहे. हा फरक कमी करण्याच्या दृष्टीनें युद्धानंतर रुपयाच्या हुंडणावळीचा भाव कमी करावा लागेल हेंहि पूर्वीं सांगितलेंच आहे. हा भाव किती प्रमाणांत खालीं आणतां येईल ? सध्यां जी सार्वराष्ट्रीय चलन-योजना सर्व राष्ट्रांकडून स्वीकारली जाण्याचा रंग दिसत आहे, त्या योजने-नुसार विचार केल्यास रुपयाच्या हुंडणावळीचा दर आपल्याला युद्धोत्तर कालीं फार मोठ्या प्रमाणावर खालीं आणतां येणार नाहीं. याचा अर्थ असा होतो कीं, रुपयाच्या या दोन किंमतींत सध्यां असलेला फरक युद्धाच्या शेवटीं कायम राहिल्यास त्याच्या प्रमाणांत हुंडणावळीचा भाव आपल्याला कमी करतां येणार नाहीं आणि त्यामुळें तो भाव टिकविण्यासाठीं स्टर्लिंग शिलकांचा कांहीं प्रमाणांत नाश होईल. हा नाश टाळावयाचा असल्यास रुपयाच्या या दोन किंमतींतील फरक शक्य तितका कमी करण्याचा आपण आतांपासून प्रयत्न केला पाहिजे. हा फरक कमी करावयाचा म्हणजे अन्तर्गत व्यवहारांत सध्यां पडलेली रुपयाची किंमत वाढवावयाची, म्हणजेच सध्यांचे भरमसाट वाढलेले सर्व भाव खालीं आणावयाचे.

देशांत सध्यां भरमसाट प्रमाणांत वाढलेले भाव कमी करण्याचा एक-मेव मार्ग म्हणजे चलनवृद्धीस आळा घालणें हा होय. हिंदुस्थान सरकारचें धोरण हळूहळू बदलत बदलत आतां याच मार्गावर आलेलें आहे. त्या दृष्टीनें नाना प्रकारचीं नियंत्रणें हिंदुस्थान सरकार लादीत आहे, हें सर्व दृष्टींनीं इष्टच आहे. परंतु एवढ्यानेंच आपणांस हवा असलेला कार्यभाग होणार नाहीं. चलनवृद्धीस निरनिराळ्या नियंत्रणांमुळें थोडाफार आळा बसेल यांत शंका नाहीं; परंतु तिचें जें मूळ, चलनविस्तार, त्यास कांहीं आळा नसल्यास हीं नियंत्रणें कांहीं काळानें फोल ठरतील. यूरोप-अमेरिका वगैरे देशांचा गेल्या व या महायुद्धांतील हा अनुभव आहे. हिंदुस्थान सरकारनें चलन-विस्तारास पायबंद तर घातलेला नाहींच, परंतु तो अविरत चालू ठेवला आहे.

अन्तर्गत किंमतींचें मान कमी करण्यासाठीं प्रथमतः चलनविस्तार बंद करून चलनसंकोचाचा उपक्रम केला पाहिजे. हें करण्याचा रामबाण उपाय

म्हणजे चलनी नोटांच्या संख्येवर कायदेशीर बंधन घालणें. अमुक एका ठराविक रकमेपेक्षां जास्त चलन कायद्याप्रमाणें रिझर्व बँकेस काढणें अशक्य केलें पाहिजे व ही ठरविलेली रक्कम हळूहळू आपोआप कमी करण्याचीहि त्या कायद्यांत तरतूद केली पाहिजे. चलनसंकोचामुळें उद्योगधंद्यांवर व शेतीवर अनिष्ट परिणाम होईल व त्यांतून आर्थिक मंदी उत्पन्न होईल ही भीति निराधार आहे. लढाई चालू आहे तोंपर्यंत सर्वच पदार्थांना निकडीची मागणी आहे. त्यामुळें किंमती कितीहि उतरल्या तरी यंत्रें व माणसें बेकार होण्याची भीति नाहीं. चलनविस्तारास अशी अखेरची मर्यादा घालण्यानें आपल्याला इष्ट अशा पुष्कळच गोष्टी होणार आहेत, हें वर विवेचन करून दाखविलेंच आहे. या सर्व चर्चेची ही फलश्रुति आहे. ही गोष्ट घडवून आणण्यासाठीं सर्वांनीं प्रयत्न करावे असें आम्ही आग्रहानें सुचवितों व या प्रदीर्घ चर्चेचा समारोप करतों.

---

# १३ अर्थशास्त्रज्ञांचा दुसरा गंभीर इशारा*

" स्वस्त्यस्तु ते निर्गलितांबुगर्भं
शरद्घनं नार्दति चातकोऽपि। "–रघु.

युद्धकालांतील हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणाबद्दल वीस हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं १९४३ सालीं एक पत्रक काढलेलें वाचकांच्या स्मरणांत असेलच. या पत्रकाप्रमाणेंच इशारेवजा असें दुसरें एक पत्रक त्याच अर्थशास्त्रज्ञांनीं नुकतेंच काढलें आहे. तें कालच्या अंकांत देण्यांत आलें होतें; त्याकडे आम्ही वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. त्या पत्रकामध्यें या मान्यवर हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं हिंदुस्थान सरकारच्या सध्यांच्या आर्थिक धोरणाच्या दुष्परिणामाविषयीं जो गंभीर इषारा दिला आहे तो अत्यंत समयोचित व योग्य असाच आहे, हें तें पत्रक वाचून कोणाच्याहि ध्यानांत येईल. त्यासंबंधीं चार शब्द येथें लिहिण्याचें योजिलें आहे.

युद्धकाळामध्यें हिंदुस्थान सरकारनें जें चलनवृद्धीचें धोरण स्वीकारलें होतें, तें किती निर्घृणपणाचें व परिणामीं किती भयंकर स्वरूपाचें होतें यासंबंधीं या ठिकाणीं आम्हीं अनेकवार लिहिलें आहे. नुकतेंच संपलेलें जागतिक महायुद्ध चालविण्यासाठीं लागणारा माल हिंदुस्थान व इतर देशांतून खरेदी करण्यासाठीं त्या देशांच्या खात्यावर इंग्लंडनें स्टर्लिंग जमा केले व त्यामुळें या देशांच्या सध्यांच्या स्टर्लिंग शिलका निर्माण झाल्या. परंतु प्रत्यक्ष खरेदी करतांना त्या त्या देशांतील चलनच वापरावयाचें असल्यामुळें या सर्वच देशांतून स्टर्लिंग शिलकांच्या वाढीबरोबरच चलनाचीहि बेसुमार वाढ झाली आणि या चलनविस्तारास चलनवृद्धीचें उग्र स्वरूप प्राप्त झालें. चलनाची बेसुमार वाढ करून या देशांतून प्रचंड प्रमाणावर निरनिराळ्या प्रकारच्या मालाची वेचाण इंग्लंडतर्फे करण्यांत आली व त्या प्रमाणांत तेथील जनता त्या वस्तूंना व मालाला मुकली. थोडक्यांत त्या देशांतील गरीब जनतेच्या तोंडचा घास काढून व त्याच्या पोटावर पाय आणूनच हा माल इंग्लंडला द्यावा लागला. त्याच्या मोबदल्यांत मिळालेल्या स्टर्लिंग शिलका ह्या या गरीब

---

* ज्ञानप्रकाश, ६ फेब्रुवारी १९४६.

जनतेच्या तोंडून जुलमानें काढलेल्या घासाचेंच प्रतीक आहेत, हें नेहमीं लक्ष्यांत बाळगलें पाहिजे.

युद्धकाळांतील आर्थिक धोरणाचा हा सांवळा गोंधळ युद्ध संपल्यानंतर तरी बंद होईल अशी सर्व हिंदी जनतेस आशा होती. परंतु प्रत्यक्ष परिस्थिती-वरून ती आशाहि आतां नष्ट झाली आहे. कारण युद्ध संपून जवळ जवळ ५ महिने झाले तरी सुद्धां हिन्दुस्थान सरकारचें आर्थिक धोरण पूर्वीच्या नमुन्या-बरहुकम चालू आहे. इंग्लंडतर्फे हिंदुस्थानांत अजूनहि खरेदी चालू असून त्याबद्दल हिंदुस्थानच्या खात्यावर स्टर्लिंग जमा होत आहेत व त्यांच्या वाढीच्या प्रमाणांत हिंदुस्थानांतील चलनाचीहि वाढ चालू आहे, ही गोष्ट रिझर्व्ह बँकेच्या ताळेबंदावरून आंकड्यानिशीं सिद्ध करतां येते. ऑगस्ट महिन्याच्या शेवटापासून फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हिन्दुस्थानां-तील एकंदर चलन रु. ८२ कोटींनीं वाढलें व रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांत त्याच मुदतींत स्टर्लिंग रोखे रु. ८६ कोटींनीं वाढले असें आढळतें. आणि पार्लमेंटमध्यें ब्रिटिश अर्थसचिव डॉ. डॉल्टन यांनीं नुकत्याच झालेल्या अँग्लो-अमेरिकन आर्थिक करारासंबंधीं जें भाषण केलें, त्यावरून हा प्रकार असाच अनंत काळपर्यंत चालणार कीं काय अशी शंका भेडसावूं लागली आहे. डॉ. डॉल्टन म्हणाले कीं, स्टर्लिंग शिलकांची वाढ अद्याप थांबलेली नाहीं. ती आणखी तशीच चालू राहणार आहे. कारण इंग्लंडला या देशांच्याकडून माल मिळणें अत्यंत आवश्यक आहे व त्या मालाबद्दल अजून रोख दाम मोजणें इंग्लंडला अशक्य आहे. या घोषणेवरून युद्धकालीं ज्या राष्ट्रांनीं स्टर्लिंग रोखे स्वीकारून इंग्लंडला आपला माल कर्जाऊ दिला त्यांना युद्धोत्तर काळींहि तसेंच कर्ज इंग्लंडला देत बसावें लागणार.

ब्रिटिश सरकारनें अशी अपेक्षा ठेवणें व हिन्दुस्थान सरकारनें परिणा-माचा विचार न करतां ती पुरी करण्यास झटणें हें अत्यंत गर्हणीय आहे. हिन्दुस्थानसारख्या दारिद्र्यपीडित देशाकडून इंग्लंडसारख्या श्रीमान् राष्ट्रांनीं सक्तीनें कर्ज घ्यावें, हेंच वास्तविक अयोग्य. युद्धकालामध्यें या प्रकाराला युद्धनीतीच्या सदरांत घालून इंग्लंडला आपणांवरील दोष टाळतां आला असता. परंतु युद्ध संपल्यानंतर हा प्रकार चालू ठेवणें हें अत्यंत दोषार्ह होय. युद्धकालांतील मदत निराळी व त्यावेळची परिस्थितिहि निराळी. युद्धोत्तर परिस्थि-ति याहून अगदींच भिन्न. अमेरिकेसारख्या जगांतील सर्वांत संपत्तिमान् राष्ट्रानें

युद्ध संपल्याबरोबर उधारउसनवार कायद्याप्रमाणें देण्यांत येणारी युद्धकालीन मदत तावडतोब बंद केली, यांतलें मर्म हेंच होतें. जे नियम अमेरिकेसारख्या संपन्न देशांना लागू, तेच नियम हिंदुस्थानसारख्या दरिद्री देशांना अधिक प्रकर्षानें लागू पडतात. प्रस्तुतचें धोरण अवलंबिण्यापूर्वी किंवा तें तसेंच चालू ठेवण्याचें ठरविण्यापूर्वी युद्धोत्तर काळीं इंग्लंडला कर्ज देण्याची हिंदुस्थानची कुवत आहे कीं नाहीं यासंबंधीं विचार करणें, हें हिंदुस्थान सरकारचें कर्तव्य होतें. परंतु तसा विचार झालेला दिसत नाहीं. कारण या बाबतींत थोडा जरी विचार केला तरी हिंदुस्थानची तशी कुवत नाहीं, हें सहज समजण्यासारखें आहे. युद्धकालांत हिंदुस्थानच्या नैसर्गिक संपत्तीवर फार ताण पडलेला आहे. जनतेच्या जीवनाचें मान लढाईपूर्वीपेक्षांहि खालावलें आहे. युद्धयंत्राला आहुति देण्यासाठीं शेतीच्या व दुभत्या जनावरांचा व जंगलाचा फार मोठ्या प्रमाणावर संहार झालेला आहे. अशा परिस्थितींत हिंदुस्थानांत पुष्कळ जीवनोपयोगी पदार्थ देशाबाहेरूनच येण्याची आवश्यकता आहे. येथील वस्तु दुसऱ्यांना कर्जाऊ देण्याचा प्रश्न सुद्धां उद्भवण्याचें कारण नाहीं. त्यांतहि या वर्षी या दुर्दैवी देशावर फार मोठ्या दुष्काळाची आपत्ति कोसळली आहे. देशांतील धान्याचें उत्पादन यंदाच्या गरजेच्या मानानें फारच अपुरें पडणार असल्यामुळें अमेरिका, कानडा वगैरे देशांतून धान्य मिळविण्यासाठीं प्रयत्न चालू आहेत. आणि अशा स्थितींत हिंदुस्थान सरकार एका बाजूस जास्त धान्य वगैरे बाहेरून आणण्यासाठीं धडपडत आहे व दुसरीकडे इंग्लंडला येथील माल कर्जाऊ देत आहे. 'वदतो व्याघाता' चें याहून उत्तम उदाहरण सांपडणें कठीण आहे. दुर्दैवानें त्यांतील विनोदाचा आस्वाद घेणें सध्यां हिंदी जनतेला शक्य नाहीं. कारण त्यांच्या नशिबींचे हाल त्यामुळें अनेक पटींनें वृद्धिंगत होत आहेत.

युद्ध संपून पांच महिने होऊन गेले तरी हिंदुस्थान सरकारनें युद्धोत्तर काळच्या चलनविषयक व एकंदर आर्थिक धोरणाची अजून कोणतीच आंखणी केलेली नजरेस येत नाहीं. येरे माझ्या मागल्या या न्यायानें युद्धकालीन व्यवस्थाच त्यानें अजून चालू ठेवली आहे. परवांच मोठ्या नोटा रद्द करण्यासंबंधीं वटहुकूम निघाला. परंतु त्या वटहुकुमाचे वट्टपरिणाम लक्षांत घेतल्यास हें हिंदुस्थान सरकारच्या नवीन आर्थिक धोरणाचें महत्त्वाचें अंग आहे असें दिसत नाहीं. कारण या वटहुकुमामुळें हिंदुस्थान सरकारला थोडाफार जादा प्राप्तीवरील कर मिळेल. तसेंच ज्या नोटा शिक्षेच्या भयानें लोक वटावून घेणार नाहात

त्या व्यवहारांतून जातील व तेवढ्या प्रमाणांत चलन कमी होईल हें खरें. यामुळें फारांत फार रु. २५–३० कोटींच्या नोटा व्यवहारांतून कमी होतील. परंतु एकंदर व्यवहारांतील चलनाच्या मानानें ही संख्या फारच अल्प आहेत हें उघड आहे. शिवाय स्टर्लिंग रोखे घेऊन हिंदुस्थान सरकार जोंपर्यंत प्रत्येक आठवड्यांत सरासरीनें रु. ५ कोटींनीं चलनांत वाढ करीत आहे तोंपर्यंत या वटहुकुमामुळें होणाऱ्या चलनसंकोचाचा प्रत्यक्ष उपयोग कांहींच होणार नाहीं हें स्पष्ट आहे. काळ्या बाजारावरहि या वटहुकुमामुळें नियंत्रण बसणार नाहीं. कारण काळ्या बाजाराचा जन्म व जीवन चलनवृद्धीवर अवलंबून असल्यामुळें जोंपर्यंत चलन-विस्तार अप्रतिहत चालू आहे तोंपर्यंत काळा बाजार थांबविणें शक्य नाहीं. याच्या उलट या वटहुकुमाप्रमाणेंच रु. १०० च्या नोटा कदाचित् व्यवहारांतून सरकार कमी करील, या भीतीनें आतांपर्यंत काळा बाजारवाल्यांच्या खिशांत ' सुप्त ' असलेलें चलन बाजारांत येईल व त्यामुळें काळा बाजार, सट्टेबाजी यांना अधिकच तेजी येण्याचा संभव आहे. मोठ्या नोटा रद्द करणें हें शस्त्र प्रभावी खरें, परंतु तें एकदांच वापरतां येतें. हा वटहुकूम काढल्यावर चलनविस्तार चालू ठेवून सरकार जर काळा बाजार अधिक माजवणार असेल तर हें प्रभावी शस्त्र अकालीं वापरून सरकारनें आपलेच हातपाय बांधून घेतले आहेत हें उघड आहे. वास्तविक चलनविस्तार थांबविल्यावरच हिंदुस्थान सरकारनें हे वटहुकूम काढावयास हवे होते. म्हणजे ते खरोखरीच प्रभावी झाले असते.

याचा अर्थ हे वटहुकूम अन्यायाचे अगर कुचकामाचे आहेत असा मात्र नव्हे. त्यामुळें कांहीं काळा बाजारवाल्यांचें व नफेबाजांचें टाळकें चांगलेंच सडकलें आहे, याविषयीं दुमत नाहीं. परंतु हे वटहुकूम काढले म्हणजे आपण कृतकृत्य झालों व त्याव्यतिरिक्त इतर कांहींच करण्याची गरज नाहीं, असा हिंदुस्थान सरकारनें आपला ग्रह करून घेणें चुकीचें आहे, एवढेंच आम्हांस म्हणावयाचें आहे. वटहुकुमामुळें तात्पुरती लोकप्रियता मिळूं शकेल, परंतु देशाच्या आर्थिक कल्याणाच्या दृष्टीनें त्याचा फारसा उपयोग होणार नाहीं. कदाचित् त्यामुळें खऱ्या आर्थिक धोरणाकडे दुर्लक्षहि होण्याचा फार संभव आहे.

हिंदुस्थान सरकारनें आपलें आर्थिक धोरण आंखण्यांत अशा प्रकारें निष्काळजीपणा करूं नये व हल्लींचें घातक धोरण सोडून द्यावें असा जो इशारा अर्थशास्त्रज्ञांनीं दिला आहे, त्याकडे सरकारनें दुर्लक्ष करूं नये. दरिद्री देशाकडून श्रीमंत राष्ट्रानें आपल्या राजकीय सत्तेच्या बळावर जबरदस्तीनें

कर्ज घ्यावें ही गोष्ट सर्वथा दूषणीयच होय व तसा इशारा देणें हें या देशांतील अर्थशास्त्रज्ञांचें कर्तव्यच आहे. अशी जबरदस्ती तर राहोच, पण याचना करणें सुद्धां किती अयोग्य आहे, हें रघूकडे गुरुदक्षिणा मागण्यासाठीं गेलेल्या परंतु यज्ञ केल्यामुळें त्याला आलेल्या दारिद्र्याकडे पाहून खट्टू झालेल्या कौत्सानें ज्या शब्दांत सांगितलें, ते शब्द या लेखारंभींच्या अवतरणांत ग्रथित केले आहेत. हिंदुस्थानच्या बाबतींत सुद्धां ही गोष्ट किती अन्याय्य व परिणामीं भीषण आहे, हें सांगण्याचा अधिकारहि कौत्साप्रमाणें 'विचक्षण' असलेल्या अर्थशास्त्रज्ञांचाच आहे व तो त्यांनीं यावेळीं उपयोगांत आणला हें योग्यच झालें. याबद्दल त्यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे.

---

# १४ युद्धकालीन नियंत्रणें व युद्धोत्तर योजना*

स्वतंत्र हिंदुस्थानांत कोणतें आर्थिक धोरण आंखलें जाणार हा प्रश्न आज प्रामुख्यानें सर्वांपुढें उभा आहे. या प्रश्नाचें उत्तर अर्थात्, राज्यकर्ते कोणत्या वर्गांतील व कोणत्या योग्यतेचे आहेत यावर अवलंबून राहणार. बहुतेक राजकीय पुढाऱ्यांनीं आजवर केलेल्या निवेदनांत वेळोवेळीं शेतकरी —कामगारांचें राहणीचें मान वाढविणें हा सरकारी धोरणाचा मुख्य उद्देश असल्याचें सांगितलें आहे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या गेल्या वर्षांतील कारभारामुळें या दिशेनें फारशी प्रगति झाली नसली तरी सामान्य जनतेच्या राहणीचें मान वाढविण्यास आर्थिक नियोजन आवश्यक आहे, हें निर्विवाद आहे. नियोजनासाठीं नियंत्रणाचा उपयोग केला पाहिजे. म्हणून युद्ध-कालीन नियंत्रणाचा या कामीं कितपत व कसा उपयोग करतां येईल, हा विचार आज महत्त्वाचा ठरतो.

युद्धकालीन नियंत्रणाचा सुरवातीचा इतिहास बहुतेकांच्या स्मरणांत असे-लच. हिंदुस्थानांतील युद्धकालीन नियंत्रणाचें मुख्य वैशिष्ट्य हेंच कीं, त्याची निर्मिति व प्रगति ही इतर देशांच्या मानानें फारच कमी विचारपूर्वक झाली. या देशांत युद्धकालीं लोकशाही सरकार नव्हतें. आणि तत्कालीन हिंदी सरकारास कांहीं एका पक्षाचा विरोध सहन करून राज्यकारभार चाल-वावा लागला. तसेंच युद्धाचीं पहिलीं कांहीं वर्षें हिंदुस्थान प्रत्यक्ष समरांगणा-पासून बरेंच दूर राहणार अशी सरकारची कल्पना होती. युरोपीय व इतर पुढारलेल्या देशांत युद्धकालीन नियंत्रणांची घडण पहिल्या महायुद्धांतील अनुभव पूर्णपणें जमेस धरून करण्यांत आली व या नियंत्रणांची तयारी युद्धाच्या पूर्वकालांत किंबहुना युद्धाच्या पूर्वींच केली गेली. हिंदुस्थानांत यांपैकीं कांहींच घडलें नाहीं. पहिल्या महायुद्धांत इतर देशांनीं जो मार्ग स्वीकारला त्याच मार्गानें हिंदुस्थान याही कालीं गेलें. म्हणजे केवळ प्रसंगोपात तांत-डीची गरज भागविण्याकरितां नियंत्रणें बसविलीं व नवीन अडचणींमुळें तीं वाढविलीं. निरनिराळ्या नियंत्रणांत एकसूत्रीपणा आणण्याचा प्रयत्न कधींच

---

* नवभारत मासिक, आक्टोबर १९४७

केला गेला नाहीं. हा अनुभव सर्वच नियंत्रणांच्या बाबतींत आला. उदाहरणार्थ, अन्नाची प्रत्यक्ष टंचाई हिंदुस्थानांत कधींच भासणार नाहीं, असा समज युद्धाच्या पूर्वकालीं सरकारचा होता. ब्रह्मदेशांतून तांदुळाची आयात थांबणार अशीं चिन्हें दिसूं लागल्यावरच या प्रश्नाकडे सरकारचें लक्ष वेधलें. अन्नप्रश्नाकडे झालेलें हें दुर्लक्ष धान्याचें सुरुवातीचें भावनियंत्रण व मव्हाचें वांटप याबाबतच्या ढिलाईच्या धोरणावरून स्पष्ट होतें. आणि देशाची धान्यपुरवठ्याबाबतची दुःस्थिति सरकारच्या लक्षांत येण्याच्या आधींच बंगालच्या दुष्काळाची भीषण आपत्ति आपणांवर कोसळली. युद्धकार्याप्रीत्यर्थ लागणाऱ्या पैशाच्या व इतर वस्तूंच्या पुरवठ्याबाबत अशीच अनास्था दिसून येते. १९४२ पर्यंत युद्धासाठीं लागणारा खर्च फारसा वाढला नव्हता, आणि एकंदर किंमतीचें मानहि माफक राहिलें होतें. परंतु जेव्हां १९४२ नंतर जपानी युद्धाकरितां माल पुरविणें व हिंदुस्थान आणि इतर देशांचा युद्धाच्या वाढत्या खर्चाचा बोजा उचलणें आवश्यक झालें तेव्हां ही जबाबदारी नीटपणें पार पाडण्यास सरकार असमर्थ ठरलें. इतर देशांप्रमाणें मूलगामी योजना अंमलांत आणण्यांत हिंदुस्थानांत कांहीं विशेष अडचणी होत्या. असें असलें तरी आपल्या युद्धकालीन राजकर्त्यांस परिस्थितीच्या बिकटपणाची यथार्थ जाणीव अगर इतरत्र सदृश परिस्थितींत योजलेल्या उपायांचें पुरेसें ज्ञान नव्हतें, हेंहि निर्विवाद आहे. किंबहुना १९४२-४३ पावेतों हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशांत तपशीलवार नियंत्रणें अमलांत आणणें बहुतेक वरिष्ठ अधिकाऱ्यांस अशक्यप्रायच वाटत होतें.

नियंत्रणांच्या पूर्वतयारीचा अभाव व त्यांची योजना घाईनें करण्याची आवश्यकता यांचे जोडीस आणखी एका गोष्टीची भर पडली. विशिष्ट महत्त्वाच्या वर्गास दुखविण्याचें सामर्थ्य सरकारांत नव्हतें, या गोष्टीचा एकंदर किंमतीच्या मानावर फार परिणाम झाला. अन्नधान्याचे भाव ठरवितांना मध्यवर्ती सरकारला प्रांतिक सरकारांस तोंड द्यावें लागलें. राजकीय कारणांसाठीं पंजाबसारख्या जादा धान्योत्पादन करणाऱ्या प्रांतांतील जमीनदारांच्या अवास्तव मागण्यांना आळा घालतां आला नाहीं. यामुळें धान्याचें भावनियंत्रण व धान्यवसुली या बाबी बहुतेक प्रांतांत कधींच समाधानकारक होऊं शकल्या नाहींत. कारखानदार व खाणीवाले यांच्या मागण्याहि त्यांच्या मालांच्या किंमतीबाबत मान्य कराव्या लागल्या. १९४२ सालीं व नंतरहि बहुतेक महत्त्वाच्या पदार्थांचे भाव सरकारनें स्वतःच्या खरेदीपुरतेच नियंत्रित

केले. उदाहरणार्थ कापड, कोळसा, इत्यादि अति महत्त्वाच्या पदार्थांच्या किंमती सरकारनें आपल्यापुरत्या जरी कांहीं प्रमाणांत नियंत्रित केल्या तरी बिनसरकारी व्यवहारांत त्या १९४२–४३ पावेतों पूर्णपणें अनियंत्रित ठेवल्या. पुढें चलनवृद्धि व तज्जन्य किंमतींची वाढ यामुळें युद्धप्रयत्नास धोका पोंचण्याची जेव्हां वेळ आली तेव्हांच भावनियंत्रण सरकारनें हातीं घेतलें. युद्धपूर्वकालीन किंमतींच्या पांचपटींनें कापडाच्या किंमती वाढल्यावरच त्या किंमती नियंत्रित करण्याचें सरकारास सुचलें. आणि नियंत्रण योजिलें तेंहि कारखानदारांना पटेल व मानवेल असेंच. कापडाच्या किंमतींचें नियंत्रण कापडनियंत्रणमंडळाच्या एका उपसमितीवर सोपविलें; आणि या उपसमितींत गिरणीमालक बहुसंख्येनें असावेत, अशी योजना केली. कोळशाच्या नियंत्रित किंमतीहि खाणीमालक बहुसंख्य असलेल्या सल्लागारमंडळाच्या विचारानेंच ठरविल्या. कोणत्याहि किंमती ठरवितांना उत्पादनखर्च, नफ्याचें प्रमाण इत्यादि मापनांचा उपयोग केला नाहीं. या किंमती कारखानदारांशीं वाटाघाटी करून ठरविलेल्या म्हणजे त्यांना अमान्य नसलेल्या अशाच होत्या. म्हणजे हिंदुस्थानांतील भावनियंत्रणाबाबतचें धोरण कॅनडा, इंग्लंड व अमेरिका या देशांतील धोरणांहून अगदीं भिन्न होतें.

युद्धाच्या शेवटीं आपल्या देशांतील नियंत्रणें जवळजवळ इतर देशां-इतकीं बहुविध होतीं. शिधावांटपाच्या योजनेचा अंमल विस्तृत क्षेत्रांत चालू होता आणि धान्यवसुलीच्या मोहिमेकडे बहुतेक इतर देशांपेक्षांही जास्त लक्ष पुरवावें लागत होतें. भांडवल उभारणें, आयात–निर्यात व्यवहार, मुख्य मुख्य शेतकी व औद्योगिक उत्पादनाच्या किंमती या सर्व नियंत्रित होत्या. तरीहि हिंदुस्थानांतील किंमतींचें मान तत्सम नियंत्रणें असलेल्या इतर देशांपेक्षां पुष्कळच अधिक होतें. सामान्य जनतेच्या राहणीचें मान बरेंच जास्त खालावलें. नफेबाजी इतर कोठेंहि होती त्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक झाली. आणि एकंदर नियंत्रणपद्धतींतील विस्कळितपणा हा विशेष उत्कटत्वानें दिसून येत होता. या सर्वांचें कारण म्हणजे आपल्या युद्धकालीन नियंत्रणाच्या उगमाचा व विकासाचा उपरिनिर्दिष्ट इतिहास. आपली नियंत्रणपद्धति बाह्यात्कारी इतर देशांसारखीच असली तरी तिची अंमलबजावणी निराळ्या तऱ्हेनें झाल्यामुळें इतरत्र आढळून न येणारी निष्पत्ति तिच्यामधून झाली.

या देशांतील जनतेचा नियंत्रणाकडे पाहण्याचा दृष्टिकोण समजण्यासाठीं वरील विवेचन विस्तृतपणें केलें आहे. अजूनहि बहुसंख्य जनतेची अशी समजूत

आहे कीं नियंत्रणें उठविल्यानें सध्यांची हलाखी दूर होईल. सामान्य लोकच नव्हे तर उच्चपदाधिष्ठित लोकनेत्यांचाहि असाच समज असल्याचें आढळून येतें. आपल्या देशांत असा सार्वत्रिक समज असणें एकप्रकारें फार आश्चर्यकारक आहे. कारण या देशांत सर्वच आर्थिक नियोजनाची आवश्यकता जोरानें प्रतिपादितात. आर्थिक व्यवहार पूर्णपणें खुले असावे असें कोणाचेंच—व्यापारी व कारखानदार यांचेंहि मत नाहीं. नियंत्रणपद्धति व आर्थिक नियोजन यांतील निकट संबंध मात्र कोणाच्या लक्षांत येत नाहीं.

नियोजित आर्थिक प्रगति सर्वव्यापी नियंत्रणाशिवाय शक्य नाहीं हा अर्थशास्त्राचा एक प्राथमिक सिद्धान्त आहे. उदाहरणार्थ, 'मुंबई योजना' अमलांत आणण्याचें मनांत आणल्यास काय काय करावें लागेल हें पाहूं. ही योजना उदाहरणादाखल घेण्याचें कारण या योजनेच्या उत्पादकांवर समाजसत्तावादाचा किंवा सरकारी नियंत्रणाच्या पुरस्काराचा आरोप कोणी करणार नाहीं. राष्ट्रीय उत्पादन व सार्वजनिक राहणीच्या मानाची वाढ हीं मुंबई योजनेचीं उद्दिष्टें आहेत. ही योजना अमलांत आणावयाची असेल तर प्रथमतः आर्थिक उत्पादनाच्या वाढीकरितां वार्षिक उत्पादनापैकीं किती बचत करावयाची हें निश्चित ठरवावें लागेल. नंतर निरनिराळ्या प्रकारच्या मालाच्या उत्पादनाच्या मर्यादा ठरवाव्या लागतील आणि या मालाच्या वांटपाची योजनाही निश्चित करावी लागेल. 'मुंबई योजने'-प्रमाणें ठरविलेल्या उत्पादनाच्या मर्यादा पाळणें व मालाचें योग्य वांटप करणें हें सर्वव्यापी नियंत्रणाखेरीज शक्य होणार नाहीं. उत्पादनाची वाढ नियोजित रीतीनें व्हावयाची तर भांडवल उभारणें व गुंतविणें या गोष्टींवर नियंत्रण ठेवणें आवश्यक आहे. तसेंच नवीन कारखान्यांची स्थापना, जुन्यांची वाढ व त्यांची योग्य स्थळीं उभारणी याचेंहि नियंत्रण करावें लागेल. औद्योगिक वाढीच्या साधनांसाठीं आपण बहुतांशीं परदेशांवर अवलंबून आहोंत. म्हणून आर्थिक नियोजन करण्याकरितां आयात व्यापाराचें कडक नियंत्रण करणेंहि आवश्यक आहे. इंग्लंडवर ओढविलेल्या अलीकडील अरिष्टावरून परकी देशांत उपलब्ध असलेल्या पैशाचा विनियोग श्रीमंत देशासहि किती काळजीपूर्वक करावा लागतो, हें दिसून येईल. हिंदुस्थानसारख्या गरीब देशाला तर दीर्घकालीन योजना पूर्ण करण्याकरितां परदेशांतील आपलें सांठलेलें भांडवल आणि परराष्ट्रीय व्यवहारांतील प्रतिवार्षिक बचत यांचा कांटेकोरपणें उपयोग करणें विशेषच

आवश्यक आहे. परदेशांतून यंत्रसामुग्री व पक्का माल यांची कोणत्या प्रमाणांत आयात करावयाची एवढेंच ठरवून भागणार नाहीं. तर विशिष्ट उद्योगधंद्याच्या सर्वांगीण वाढीसाठीं यांत्रिक व इतर साधनांच्या तपशीलवार याद्या कराव्या लागतील. यंत्रसामुग्री वाढल्यावरहि प्रत्यक्ष उत्पादनावर देखरेख ठेवावी लागेल. मोटारींचे कारखाने स्थापन करण्याबाबतच नव्हे तर त्यांतून उत्पादन कोणत्या प्रकारचें करावयाचें याबद्दलहि योजना व नियंत्रण करावें लागेल.

आर्थिक योजना म्हणजे केवळ उत्पादन–योजना नव्हे. उत्पादनाचें नियोजित वांटप हें गरीब देशांत उत्पादनापेक्षांहि महत्त्वाचें आहे. दर माणशीं कापडाचें सालीना उत्पादन पंधरापासून अठरा वारापर्यंत वाढवावयाचें असल्यास वाढत्या उत्पादनासाठीं लागणारी यंत्रसामुग्री उपलब्ध आहे एवढेंच पाहून भागावयाचें नाहीं. केवळ यंत्रसामुग्री वाढवून रहाणीचें मान वाढावयाचें नाहीं. सामान्य जनतेस हव्या असलेल्या कापडांत वाढ झाली आहे व तें त्यांस परवडणाऱ्या किंमतीस मिळत आहे हें पाहणें तितकेंच जरुरीचें आहे.

युद्धोत्तर आर्थिक नियोजन हें युद्धकालीन आर्थिक नियंत्रणापेक्षां जास्त गुंतागुंतीचें आहे. युद्धकालीन आर्थिक धोरणाचें एकमेव उद्दिष्ट म्हणजे युद्ध जिंकणें. युद्धकालांत कोणत्या पद्धतीनें नियंत्रण करावयाचें व कशांस प्राधान्य द्यावयाचें हें ठरविणें फारसें कठीण नसतें. युद्धोत्तर कालांतील गोष्ट अशी नाहीं. कोणतीं उद्दिष्टें आधीं साधावयाचीं व कोणत्या उद्दिष्टांस जास्त महत्त्व द्यावयाचें, हे प्रश्न युद्धोत्तर कालांत जास्त गुंतागुंतीचे होतात. तात्त्विक दृष्ट्या राष्ट्रीय संपत्तीची वाढ व जनतेच्या राहणीच्या मानांतील वाढ यांत परस्परविरोध नाहीं. परंतु यांपैकीं एकावरच विशेष भर दिल्यास तात्कालिक परिणामांत फार फरक दिसून येतो. राष्ट्रीय उत्पादन त्वरेनें वाढवावयाचें कीं जनतेच्या राहणीच्या मानांत वाढ करण्याकडे प्रथम लक्ष द्यावयाचें, हा प्रश्न क्रांतीनंतर रशियन राज्यकर्त्यांपुढें प्रामुख्यानें उभा होता. रशियांतील जनतेच्या राहणीचें मान क्रांतीनंतर बरींच वर्षें १९१४ सालापेक्षांहि कमी होतें असें म्हणतात. याचें मुख्य कारण रशियांतील आर्थिक नियोजनांत उत्पादनवाढीस दिलेलें प्राधान्य. यांत्रिक उत्पादनास आधारभूत असलेल्या प्रमुख उद्योगधंद्यांची संस्थापना व वाढ हेंच नियोजनाचें प्रमुख उद्दिष्ट मानल्यामुळें रशियन जनतेस राहणीचें निकृष्ट मान पत्करावें

लागलें. हिंदी नियोजकांसही याच प्रश्नाचा विचार करावा लागेल. मात्र तो रशियापेक्षां जास्त कठीण भासेल. उद्योगधंद्यांस लागणारी नैसर्गिक साधनसंपत्ति व लागवडीस न आणलेलें फार मोठें क्षेत्र हीं रशियांत उपलब्ध होतीं. या सर्व नैसर्गिक संपत्तीचा योग्य उपयोग करून घेण्यास भांडवलाचीच काय ती वाण होती. याकरितां पोटास चिमटा घेऊन रशियन लोकांनीं आवश्यक भांडवल त्वरेनें उभारण्याचें योजिलें. हिंदुस्थानांतील नैसर्गिक संपत्तिसाधनें रशियापेक्षां कमी विपुल आहेत आणि बचत करण्यास वाव जवळ जवळ नाहींच. येथील बहुसंख्य जनतेचें राहणीचें मान किती निकृष्ट आहे हें बंगालच्या दुष्काळांतील मृत्युसंख्येवरून स्पष्ट दिसून आलें आहे.

अमेरिकेसारख्या अत्यंत संपन्न देशांतच खुल्या व्यवहाराचें धोरण स्वीकारून विशेष आर्थिक हानि होत नाहीं. इतर कमी संपन्न देशांत सुव्यवस्थित नियंत्रणपद्धतीखेरीज शांततामय मार्गानें प्रगति होणें अशक्य आहे. स्वतंत्र हिंदुस्थानच्या आर्थिक योजनेचा विचार करतांना ती पार पाडण्यासाठीं आपणांस युद्धकालीन नियंत्रणें कायम ठेवावीं लागतील; एवढेंच नव्हे तर वाढवावींहि लागतील हें लक्षांत ठेविलें पाहिजे. नियंत्रणपद्धतींत लादलीं जाणारीं बंधनें बहुतेकांस जाचक वाटतात. परंतु हल्लींच्या काळांत शांतता व सुरक्षितता प्रस्थापिणें एवढेंच शासनसंस्थेचें कर्तव्य नसून सामाजिक व आर्थिक उन्नतीचीहि तिजवर जबाबदारी आहे, असें मानल्यास सामान्य जनतेच्या राहणीच्या मानांत अल्पहि वाढ होण्यासाठीं बंधनें पत्करलीं पाहिजेत.

हिंदुस्थानांतील पांढरपेशा वर्गावर या बाबतींत फार मोठी जबाबदारी आहे. आपल्या देशाची प्रगति शांततामय मार्गानें व्हावयाची कीं वर्गकलह अधिक तीव्र होऊन रक्तपात व्हावयाचा हें या वर्गाच्या त्यागाच्या तयारीवर व समजूतदारपणावर अवलंबून आहे. आर्थिक योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी बहुतांशीं या वर्गांतील व्यक्तींवरच पडणार. सध्यां सर्वसामान्य सरकारी नोकरवर्ग कार्यक्षमहि नाहीं व प्रामाणिकहि नाहीं असें सर्वजण म्हणतात. त्याबरोबर आपल्या व्यापारी वर्गास नीतिमत्तेची चाड नाहीं आणि जनतेस जबाबदारीची जाणीव नाहीं याबद्दलहि दुमत नाहीं. सरकारी नोकर व व्यापारी लबाड आणि जनता दुबळी, हें मान्य केल्यास आपणांस आशेस जागा उरणार नाहीं. आजची परिस्थिति जरी अशी दिसली तरी तिचा संबंध आपल्या मूळ स्वभावाशीं नाहीं. पुढारी आणि बुद्धिमान् वर्गाच्या

विचारांतील गोंधळ व त्यामुळें जनतेची झालेली दिशाभूल यांचा हा परिपाक आहे. म्हणून आपणांपुढील आर्थिक प्रश्नांचें स्वरूप व तें सोडविण्याचे मार्ग यांचें यथार्थ ज्ञान मध्यम वर्गानें करून घेतलें पाहिजे व त्यांचा जनतेंत प्रसार केला पाहिजे.

आज आपण बहुतेक स्वतःस समाजवादी व समतावादी म्हणवितों. पूर्ण समाजवाद अंमलांत आणणें तर राहोच परंतु आत्यंतिक विषमता किंचित् कमी करण्याकरितां केलेल्या प्रयत्नांचा प्रत्यक्ष परिणाम काय होईल याचा कितीजण विचार करतात? आर्थिक विषमता कमी करण्याच्या प्रयत्नाचे परिणाम युद्धकालीन नियंत्रणांच्या अनुभवांवरून स्पष्ट झालेले आहेत. जीवनावश्यक वस्तूंचें वांटप युद्धकालांत इंग्लंड व अमेरिकेंत सामान्यतः सुलभपणें होऊं शकलें याचें कारण त्या देशांत युद्धपूर्वकालांतहि मूलभूत जीवनावश्यक गोष्टींचा खप सर्व वर्गांत सामान्यतः सम प्रमाणांत होता. उलट हिंदुस्थानांतील परिस्थिति अगदीं भिन्न असल्यामुळें वांटपपद्धति बसविणें व चालविणें अवघड झालें. उदाहरणार्थ, साखर-वांटपाचा प्रश्न घ्या. निरनिराळ्या प्रांतांत हा प्रश्न वेगवेगळ्या रीतीनें हाताळला आहे. मध्य-प्रांतांत साखरेच्या वांटपाचें प्रमाण उत्पन्नावर अवलंबून असतें. ही पद्धत समतेच्या तत्त्वाशीं विसंगत आहे. मुंबई प्रांतांत साखरेचें वांटप उत्पन्नावर अवलंबून नाहीं, तर निवासस्थलावर म्हणजे लहान अगर मोठ्या शहरांत किंवा खेड्यांत राहण्यावर. ही पद्धत तितकी उघडउघड अन्यायाची नाहीं. परंतु ती पूर्णपणें तर्कशुद्धहि नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, आपल्या-कडील दर माणशीं साखरेच्या खपाचें प्रमाण अत्यल्प असून बहुसंख्य गरीब वर्गांत तिचा उपयोग युद्धपूर्वकालीं जवळ जवळ नव्हताच. अशा परिस्थि-तींत साखरवांटपाची कोणतीहि पद्धत अन्याय्य तरी ठरणार किंवा अव्यवहार्य तरी होणार. कापड वांटपाची हीच तऱ्हा. माणशीं दर सहा महिन्यास मिळणारें दहा वार कापडहि मध्यमवर्गीय कुटुंबास अत्यंत अपुरें वाटतें. परंतु युद्धापूर्वीं माणशीं कापडाचा वार्षिक खप एकंदर हिंदुस्थानांत सोळा वारच होता. याचें कारण असें कीं, आपल्या देशांतील किती तरी माणसांस वर्षास एक वारहि कोरें कापड विकत घेणें शक्य नव्हतें. एवंच जीवनावश्यक वस्तूंचें वांटप समाधानकारक होण्यापूर्वीं उत्पन्नाच्या विभागणींतील आत्यंतिक विषमता नाहींशी होणें जरूर आहे. मध्यम वर्गीयांनीं आपल्या गरजा पुष्कळ कमी केल्या तरच गरीब वर्गाच्या राहणींत थोडी तरी सुधारणा होऊं शकेल.

मध्यम वर्गावरील आजची जबाबदारी दोन प्रकारची आहे. या देशांतील आर्थिक विषमता युद्धपूर्व इंग्लंडांत होती तितकी तरी कमी झाली पाहिजे. याकरितां मध्यम वर्गानें आपल्या मागण्या व आकांक्षा यांस पायबंद घातला पाहिजे. मध्यवर्ती पे–कमिशनपुढें पगाराबाबतच्या ज्या मागण्या केल्या गेल्या व ज्या त्या कमिशननें बहुतांशीं स्वीकारल्या, तितकें पगाराचें मान आपल्या देशास क्षेपणें शक्य नाहीं. शिवाय नियंत्रण–नियोजनास लागणारा सुबुद्ध व प्रामाणिक नोकरवर्ग पुरविणें आणि सरकारी योजनांशीं मनापासून सहकार्य करणें हेंहि मध्यम वर्गीयांचें कर्तव्य ठरतें. या जबाबदाऱ्यांची योग्य जाणीव हिंदी मध्यम वर्गानें दाखविली नाहीं तर तो सध्यां संपत्ति व सत्तेच्या शिखरावर असलेल्या प्रतिगामी भांडवलदारांचा हस्तक ठरेल.

# १५ महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद, पुणें*

## अध्यक्षीय भाषण

सहकारी बंधुभगिनींनो—

महाराष्ट्र सहकारी परिषदेचें अध्यक्षस्थान देऊन आपण जो माझा गौरव केला त्याबद्दल मी आपले मनःपूर्वक आभार मानतों. महाराष्ट्रांतील सहकारी संस्था व कार्यकर्ते ह्यांची मला असावयास हवी तेवढी दीर्घकालीन अगर दाट ओळख नाहीं. तरी, केवळ आपली सहानुभूति व सहकार्य यांवर विसंबून मीं आज अध्यक्षस्थानाची जबाबदारी पत्करण्याचें धाडस केलें आहे.

महाराष्ट्र सहकारी परिषदेचें यापूर्वीचें अधिवेशन बरेच वर्षांपूर्वी झालें असल्यामुळें सहकारी चळवळीच्या अलीकडील इतिहासाचा प्रथम आढावा घेणें हें आवश्यक आहे. मी आपल्या भाषणांत या बाबतींत फार तपशीलवार विचार करणार नाहीं. सहकारी चळवळीच्या सर्वांगीण प्रगतीचे अगदीं अलीकडील जिल्हावार आंकडे प्रसिद्ध झाले नसल्यामुळें महाराष्ट्राबाबत असें कांहीं निराळें आंकडेसिद्ध सांगणें शक्य नाहीं. थोड्याच महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या नानावटी समितीच्या अहवालाच्या परिशिष्टांत कांहीं जिल्हावार आंकडे दिले आहेत, ते १९४५–४६ सालाचे आहेत. हे जिल्हावार आंकडे जिल्हा मध्यवर्ती बँका, प्राथमिक मॉर्ट्गेज बँका व खरेदी-विक्री संघ याबाबतचे आहेत. प्राथमिक पतपेढ्यांबाबत जिल्हावार फोड या परिशिष्टांत दिलेली नाहीं. तरी, मुंबई प्रांतांतील निरनिराळ्या भागांची परिस्थिति फारशी भिन्न नाहीं, असें मानल्यास नानावटी समितीच्या पांचव्या परिशिष्टांत प्राथमिक पतपेढ्यांबाबत दिलेल्या आंकड्यांवरून कांहीं ठोकळ विधानें करतां येतील. लढाईचे काळांत प्राथमिक पतपेढ्यांची संख्या, त्यांच्या सभासदांची संख्या, पेढ्यांचें स्वतःचें भांडवल, त्यांची प्रतिवार्षिक कर्जवसुली या सर्वांत वाढ झाली असून थकबाकी पुष्कळ अंशीं कमी झाली आहे. हीं सर्वच प्रगतीचीं चिन्हें समजलीं पाहिजेत. याबरोबरच सबंध कालखंडाचा विचार करतां सभासदांच्या ठेवींच्या रकमेंत कांहीं वाढ झालेली नाहीं हें लक्षांत

*१७–१८ जानेवारी १९४८

घेण्याजोगें आहे. हे आंकडे आणि मला उपलब्ध असलेली इतर आंकडेवार माहिती यांवरून प्रगतीबाबत अभिप्राय द्यावयाचा तर तो असाः युद्धकाळाचा पतपेढ्यांवरील मुख्य परिणाम म्हणजे थकबाकी पुष्कळ वसूल होऊन पतपेढ्यांचें कार्य बरेंच सुरळीतपणें चालण्याची शक्यता निर्माण झाली. तसेंच सरासरीनें पाहतां दर सभासदावरील कर्जाचा बोजा कांहींसा कमी झाला. मात्र हें कर्ज कमी होण्याचें सरासरी प्रमाण अल्पच आहे व तें सगळीकडे सारखेंच कमी झालेलें नाहीं ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. कर्जाची रकम सर्वत्र कमी झाली नसली तरी आज तरी कर्जाचा बोजा सर्वांवरीलच पूर्वीच्या मानानें पुष्कळ उतरला आहे. याचें कारण एकंदर किंमतवाढ. जोंपावेतों चालू शेतीमालाच्या किंमती किफायतशीर आहेत तोंपावेतों आजचा शेतकऱ्यावरील बोजा सर्व-साधारण वाढलेल्या किंमतीच्या मानानें दहा वर्षांपूर्वीपेक्षां फार कमी झाला आहे हें निर्विवाद आहे. याच घटनेची दुसरी बाजू म्हणून पुढील विचार येथेंच मांडला पाहिजे. शेतकऱ्यानें काढलेल्या कर्जाच्या रकमेंत वाढ झाली नाहीं याचा अर्थ त्यास तितकीशी कर्जाची वस्तुतः नड नाहीं असा दिसतो. पूर्वीप्रमाणें कर्जाची नड लागूं लागली म्हणजे खर्च सगळेच फार वाढल्यामुळें या कर्जाची रकम पूर्वीपेक्षां कितीतरी पटीनें जास्त होईल. आवक व जावक दोन्ही आंकडे सारखेच फुगीर असल्यास वाढत्या रकमेच्या कर्जाची परतफेड शेतकरी करूं शकेल. परंतु आवक घटण्याचा, एकदम किंमती उतरल्यामुळें जर प्रसंग आला तर मात्र एकंदर चक्राचें परिभ्रमण पुरें झाल्यावर शेतकऱ्याचें कर्ज त्याच्या परतफेडीच्या ऐपतीच्या मानानें जादा झालेलें दिसेल; म्हणजे युद्धपूर्वकालीन परिस्थितिच पुन्हां प्राप्त होईल. या भविष्यांतील संभाव्य घडामोडींकडे लक्ष वेधण्याचें कारण हें कीं यथाक्रम प्राप्त होऊं पहाणाऱ्या मंदीच्या दिवसांकरितां कांहींहि तरतूद सहकारी मंडळ्यांच्या सभासदांनीं करून ठेवलेली दिसत नाहीं. शेतकऱ्यास युद्धकालांत इतर म्हणतात तितका फायदाच झाला नाहीं म्हणा, अगर त्या फायद्याचा उपयोग त्यानें योग्य रीतीनें करून घेतला नाहीं म्हणा, युद्धकालांतील तेजीच्यामुळें महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांचें आर्थिक सामर्थ्य बरेंच वाढलें आहे असें सहकारी पतपेढ्यां-बाबतचे अगर इतर कोणतेच आंकडे दर्शवीत नाहींत.

प्राथमिक पतपेढ्यांचा कारभार युद्धकालांत फार वाढला नसला तरी एकंदर जास्त सुस्थितींत आला. प्राथमिक मॉर्ट्गेज बँकांचा व्यवहार याच काळांत इतका रोडावला कीं, कांहीं जिल्ह्यांत त्या चालू ठेवण्याचें प्रयोजनच

काय, असा प्रश्न उद्‌भवला. खरेदी–विक्री संघांनीं मात्र गेल्या दहा वर्षांत फार मोठी प्रगति करून दाखविली. सकृद्दर्शनीं याबाबतचे आंकडे फार समाधानकारक वाटतात. पण ही सर्व वाढ नियंत्रित व्यवहार व सरकारी पुरस्कार यामुळें झाली आहे, हें आपणा सर्वांस पक्कें माहीत आहे व आज नियंत्रणें उठल्यामुळें या खरेदी–विक्री संघव्यवस्थेचें पुढें काय होणार याच्या विवंचनेंत आपण सर्वजण आहों. तेव्हां हे आंकडे भविष्यकालीन परिस्थिति अजमावण्यास उपयोगी नाहींत हें उघड आहे. याचबरोबर या आंकड्यांवरून जी एक गोष्ट सिद्ध झाली आहे तिजकडे सहकारी कार्यकर्त्यांनीं सर्व जनतेचें प्रामुख्यानें लक्ष वेधणें जरूर आहे. अनुकूल परिस्थिति व उचित सरकारी पाठिंबा मिळाला असतां, सहकारी संस्था, वाहतूक व व्यापार (घाऊक-किरकोळ) फार मोठ्या प्रमाणावर थोड्या अवधींत हातीं घेऊं शकतात. पद्धतशीर, नियंत्रित व्यापारी व्यवहारांत सहकारी संस्थांस प्रगति फारच लवकर करतां येते, एवढेंच नव्हे तर असल्या परिस्थितींत त्यांचें कार्य खाजगी व्यवहारापेक्षां जास्त चोख व कमी खर्चिक होऊं शकतें. अर्थात् हें शेवटचें विधान सिद्ध करण्यास आंकडे लगेच देतां येणार नाहींत. पण ज्यांना युद्धकालीन व्यवहाराचा दोन्ही पक्षीं अनुभव आहे ते त्रयस्थदेखील हें विधान चटकन् मान्य करतील, एवढी याची बाजू बळकट आहे. शिवाय सहकारी संस्थांचा व्यवहार आणखी थोडा अवधि व स्वस्थपणा मिळाला तर याहूनहि पुष्कळसा सुधारून दाखविणें सोपें आहे असें यांतील सर्व अनुभविक सांगू शकतील.

गेल्या कांहीं वर्षांचा आढावा घेतांना सहकारी संस्थांच्या प्रगतीबरोबर कांहीं सहकारी कायद्यांचा विचार करणेंहि जरूर आहे. मुख्यत: दोन कायदे सहकारी व्यवहारांशीं विशेष निगडित आहेत. पहिला ऋणविमोचन कायदा. हा कायदा अंमलांत येऊन जरी बरींच वर्षें झालीं तरी तो आलिकडेच सगळीकडे लागू करणेंत आला आहे. सहकारी पतपेढ्यांनीं सभासदांस दिलेल्या कर्जांवर या कायद्याचा विशेष परिणाम होईल अशी अपेक्षा नाहीं. तसेंच सहकारी पतपेढ्यांच्या ज्या सभासदांनीं ऋणविमोचन कायद्याखालीं अर्ज केलेले नाहीत त्यांच्या नित्याच्या व्यवहारांतहि कांहीं फरक होत नाहीं; परंतु अनेक सभासदांना व बिगरसभासद शेतकऱ्यांनीं या कायद्याखालीं अर्ज केलेले असून त्यांचा कायम निकाल होण्यास बराच अवधि लागण्याचा संभव आहे. अर्जदारांच्या अर्जांचा निकाल लागल्यावर त्यांची पत काय राहील व त्यांस कर्जे कोठून व कधीं मिळतील याचा अजून स्पष्ट विचार करणें शक्य नाहीं. आजचा मुख्य प्रश्न संक-

मणावस्थेचा आहे. या संक्रमणावस्थेंत अर्जदारांस जमीन तारण लावतां येत नाहीं, तेव्हां त्यांची पैशाची गरज भागविण्याची निराळी योजना करण्यास हवी. या योजनेंत सहकारी संस्थांनीं प्रामुख्यानें भाग घ्यावा अशी सरकारची अपेक्षा आहे. ऋणविमोचन कायद्याचे दूरवर परिणाम काय होतील ते होवोत; या कायद्याच्या अंमलामुळें तात्काळ शेतकी सावकारी व्यवहारांत तंगी निर्माण झाली असून ती निवारण्याचा प्रयत्न करणें सरकारदृष्ट्या अत्यावश्यक आहे. या प्रयत्नांत सहकारी संस्थांस मदत करून आपलें कार्यक्षेत्र पुष्कळच वाढविण्याची शक्यता आहे. तसेंच हें करीत असतां कांहीं नवीन प्रकारची व्यवहारपद्धतिहि स्वीकारावी लागेल. यामधून उद्भविलेले प्रश्न आज फार महत्त्वाचे होऊन बसले आहेत.

सावकार नियंत्रण कायदा, ऋणविमोचन कायद्याहूनहि जास्त महत्त्वाचा समजला पाहिजे. या कायद्यामुळें खाजगी सावकारीवर बऱ्याच प्रकारचीं नियंत्रणें घातलीं गेलीं आहेत. या सर्व नियंत्रणांचा येथें विचार करण्याची जरूरी नाहीं. सहकारी संस्थांचे दृष्टीनें महत्त्वाचें नियंत्रण व्याजाच्या दराबद्दलचें. याचे परिणाम दोन प्रकारचे आहेत. प्रत्यक्ष परिणाम सहकारी पतपेढ्यांच्या व्याजांच्या दराबाबतचा. सावकारी नियंत्रण कायद्यांतील दरांहून अधिक दर सहकारी कर्जांचे पडत नाहींत याबाबत आपण खबरदारी घेणें अर्थात् आवश्यक आहे. हें करण्याकरितां आपणांस पुढेंमागें सरकारी मदतहि कदाचित् मागावी लागेल; आजच परिस्थिति तशी आली नाहीं, त्यामुळें प्रत्यक्ष परिणाम फार महत्त्वाचा नाहीं. अप्रत्यक्ष परिणाम खाजगी सावकारीचा व्याप व तिचें भविष्यांतील स्वरूप याबाबतचा. सरकारनें कायद्यांत घातलेले व्याजाचे दर हे इतके कमी आहेत कीं यापुढें कायदेशीररीत्या चाललेल्या सावकारी व्यवहाराचें क्षेत्र महाराष्ट्रांत तरी फार संकुचित होईल याबद्दल मला खात्री वाटते. तेव्हां यापुढें सावकारी काळाबाजार माजून या कायद्यामुळें शेतकऱ्यांचा फायद्याऐवजीं तोटा होण्याचाच संभव अधिक. हा परिणाम टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे खाजगी सावकाराऐवजीं कोणत्यातरी संस्थेमार्फत शेतकऱ्यास आपल्या ऐपतीप्रमाणें कर्ज मिळण्याची व्यवस्था ताबडतोब झाली पाहिजे. सहकारी संस्थांवर होणारा हा सावकारी नियंत्रण कायद्याचा अप्रत्यक्ष परिणाम आहे. आतां सहकारी संस्थांस आपलें क्षेत्र वाढविण्याची मोठी संधि चालून आली आहे, एवढेंच नव्हे तर सहकारी व्यवहार सार्वत्रिक होऊं शकतो किंवा नाहीं हें पुढील

दोन तीन वर्षांत कायद्यांनीं निर्माण केलेल्या परिस्थितीमुळें प्रत्यक्ष अजमावलेंच जाणार आहे.

सहकारी संस्थांपुढील कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करण्यास उपयोग व्हावा म्हणून सद्यःस्थितीचें वरील त्रोटक वर्णन केलें आहे. सहकारी चळवळीची आजची परिस्थिति फारशी समाधानकारक नाहीं. तिची पुनर्घटना झाली पाहिजे हेंहि आज सर्वमान्य आहे. तसेंच ही पुनर्घटना योजनापूर्वक झाली पाहिजे असें सर्व म्हणतात. या प्रांताचे आजचे सहकारी मंत्री ना. वैकुंठभाई मेहता यांनीं सहकारी चळवळीच्या नियोजनाबद्दल आग्रहाची व मुद्देसूद मागणी पुणें येथेंच एका जाहीर व्याख्यानांत जवळ जवळ सहा वर्षांपूर्वी केली. अलीकडच्या काळांत आपल्या देशांत या मागणीस सर्वत्र दुजोरा मिळाला आहे, एवढेंच नव्हे तर एका सरकारी समितीकडून पुढील योजनेचा आराखडाहि तयार करण्यांत आला आहे. सहकारी प्रगतीच्या सर्व योजनांत एक अडचण सुरुवातीसच भासते. सहकारी संघटना ही स्वेच्छेनें सहकार्य करणाऱ्यांची संघटना. त्यांत सक्तीचा लेशहि नाहीं हें मूल तत्त्व. या तत्त्वानुसार वागावयाचें तर ठराविक काळांत अमुक क्षेत्रांत इतक्या नवीन सहकारी संस्था अस्तित्वांत आल्या पाहिजेत किंवा संस्थांची निश्चित मर्यादेनुसार प्रगति झालीच पाहिजे असें जरी म्हटलें तरी तें घडवून कसें आणावयाचें? नियोजन व सहकारी चळवळीचें सनातन तत्त्व यांतील विसंगति कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखी ढोबळ आहे.

हिंदुस्थानांतील सहकारी परिषदांनीं इकडे नेहमीं लक्ष दिलेंच असें मात्र नाहीं. बऱ्याच परिषदांतून नियोजनपूर्वक प्रगतीची मागणी आणि अंतर्गत सक्ति व बाह्य मार्गदर्शन व नियंत्रण यांपासून सहकारी चळवळीची अलिप्तता या सर्वच मद्यांवर निरनिराळ्या ठरावांतून भर दिलेला आढळतो. अर्थात्, परिषदांस हा प्रश्न जरी टाळतां आला तरी सहकारी प्रगतीची योजना करण्यास नेमलेल्या समितीस तो टावलणें शक्य नव्हतें. तेव्हां या समितीचे ( सरैय्या समिति ) अहवालांत याचें निराकरण करण्याचा अल्पसा प्रयत्न झाला आहे. कोणासहि संस्थेचे सभासद होण्यास भाग पाडूं नये या तत्त्वाची समितीनें पुनर्घोषणा केली आहे. परंतु कांहीं सरकारी सवलती अगर मदत सहकारी संस्थेचे सभासद झाल्याशिवाय न मिळाव्या अशा अप्रत्यक्ष सक्तीच्या योजनेस समितीची आडकाठी नाहीं.

याखेरीज नियोजित प्रगति करण्यास शिक्षण आणि प्रचार हींच मुख्य साधनें असा अभिप्राय आहे. शिक्षण व प्रचार यावर समितीची भिस्त किती व अप्रत्यक्ष सक्तीवर किती हें स्पष्ट कळणें कठीण आहे. परंतु नियंत्रित आर्थिक व्यवहार हें समितीचें एक गृहीत प्रमेय असल्यामुळें अप्रत्यक्ष सक्तीनें बराच कार्यभाग होईल असें समितीस वाटलें असण्याचा संभव आहे. या प्रश्नाचा विचार आणखी पुढें करण्यांत येईल. येथें सहकारी चळवळीची नियोजित प्रगति निश्चित कशी साधावयाची याचें धडसें उत्तर सरैय्या समिति, नानावटी समिति इ. सरकारी समित्यांनीं दिलें नाहीं एवढेंच नमूद केलेलें पुरे.

नियोजित पुनर्घटनेंत निश्चित प्रगति किती व कशी होईल हें जरी स्पष्ट नसलें तरी पुनर्घटनेच्या एकंदर उद्दिष्टांबद्दल बरीच एकवाक्यता आढळून येते. सहकार्याचा अवलंब केल्यानें आर्थिक प्रगति लोकशाहीच्या मार्गास अनुसरून साधतां येईल असाच सर्वांचा अभिप्राय आणि हेंच मुख्य उद्दिष्ट. अर्थात् हा फार व्यापक विचार झाला. प्रत्यक्ष कार्यकर्त्यांस याहून बऱ्याच तपशिलांत शिरणें आवश्यक आहे. सहकारी चळवळ सर्वव्यापी असल्यामुळें सर्वच तपशिलाचा मर्यादित अवधींत विचार करणें शक्य नाहीं; तरी मी आज आपणांपुढील निकडीच्या अशा दोनतीन मुद्यांकडे लक्ष देण्याचें योजिलें आहे. नागर प्रश्नांकडे दुर्लक्ष करून शेतकी व शेतकरी यांशीं निगडित असलेल्या प्रश्नांचाच मी आज सावकारी व्यवहार व व्यापारी व्यवहार या दोन दृष्टीनें विचार करणार आहे. शेतकीच्या सावकारी व्यवहाराबाबतच्या सद्यःस्थितीचें मीं थोडक्यांत दिग्दर्शन वर केलें आहे. गेल्या कांहीं वर्षांच्या विशिष्ट परिस्थितीमुळें शेतकऱ्यास कर्जाची नड पूर्वींइतकी तात्पुरती तरी राहिली नाहीं हें खरें असलें तरी, आजची गरज भागविणें व पुढील संभाव्य वाढत्या गरजांची तरतूद करणें हें क्रमाक्रमानें जास्त अवघड व महाग होत आहे हेंहि तितकेंच उघड आहे. या स्थितीस सरकारी कायदेच बहुतांशीं कारणीभूत आहेत. हे कायदे मूलतः वाईट नव्हेत, किंबहुना अशा प्रकारच्या कायद्यांच्या जरूरीबद्दल दुमत जवळ जवळ नाहींच. परंतु हे कायदे स्वयंपूर्ण नसून एकंदर पुनर्घटना—योजनेचा ते एक भाग आहेत व पुनर्घटना—योजना समग्र हातीं घेतल्याशिवाय केवळ कायद्यांच्या अंमलबजावणीचा फायदा होण्याऐवजीं दुष्परिणामच अधिक घडण्याचा संभव आहे. जुन्या कर्जाची हप्तेबंदी करून खाजगी सावकारीवर नियंत्रण घालण्याच्या वेळेसच शेतकऱ्यास

आवश्यक व योग्य कर्ज मिळण्याची तरतूद न केल्यास त्यास पुन्हां जुन्या सावकारांचा आसरा पाहावा लागणार, पण तो मिळणें बिकट होणार. खाजगी सावकारीची जागा सहकारी पेढीनें घ्यावी हें उद्दिष्ट पुढें ठेवून आपली चळवळ आज ३०–४० वर्षे सुरू आहे; या दिशेनें थोडीबहुत प्रगतीहि झाली आहे. परंतु नवीन कायद्यांचा अंमल सार्वत्रिक सुरू झाल्यानंतर कोणाहि व कोठल्याहि शेतकऱ्यास त्याच्या पतीप्रमाणें आवश्यक रकम सुलभतेनें मिळूं शकेल इतकी प्रगति सहकारी चळवळीची खास झालेली नाहीं. यामुळें शेतकऱ्याच्या सावकारी व्यवहाराबद्दलचा प्रस्तुतचा मुख्य प्रश्न उद्यां खाजगी सावकाराचें उच्चाटन केलें असतां, त्याची जागा कोण घेणार हाच आहे. खाजगी सावकाराचें पूर्णतया उच्चाटण न करितां त्याचे व्यवहार खरोखर नियंत्रित व व्यवस्थित करायचें म्हटलें तरी हाच मुख्य प्रश्न उभा राहतो. प्रत्येक शेतकऱ्यास खाजगी सावकाराचे ऐवजीं सरकार, निम–सरकारी संस्था किंवा सहकारी व्यवस्था यांपैकीं कोणाचा तरी आधार निश्चित असल्याशिवाय सावकारी नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी देखील नीट होऊं शकत नाहीं हा आजचा अनुभव आहे. आज शेतकरी अनन्यगतिक आहे. सावकाराशिवाय त्यास गत्यंतर नाहीं. ऋणविमोचन कायदा, सावकारी नियंत्रण कायदा हे अंमलांत आणण्याच्या वेळेस, किंबहुना त्याचे आधींच, या अडचणींचें निराकरण करणें सरकारचें कर्तव्य ठरतें. या परिस्थितींत सहकारी संस्थेची जबाबदारी काय हा आपल्यापुढील प्रश्न आहे.

येथें दोन पर्याय संभवतात. सहकारी संस्थांची कार्यपद्धति व प्रगतीची दिशा ही पूर्वापार ठरलेली आहे. यांत विशेष बदल केला असतां सहकारी तत्त्वांची हानि होण्याचा संभव फार. त्याअर्थी प्राप्त परिस्थितींत सहकारी संस्थांची संख्या व कार्यक्षेत्र वाढविण्याचा जरी निकरानें प्रयत्न झाला, तरी निश्चित सार्वत्रिक कर्जवांटपाची योजना सरकारनें स्वतंत्र अलग योजनेनुसार करणेंच इष्ट; इतकी मोठी व भानगडीची जबाबदारी सहकारी संस्थांनीं घेऊं नये. हा एक विचार झाला. दुसरा विचार असा कीं, सहकारी संस्था त्यांतल्या त्यांत पुष्कळ फैलावलेल्या, त्यांची कार्यपद्धति शेतकऱ्यांस बरीच परिचित, त्यांत कार्यकर्ते अनेक, एकंदर व्यवस्था अल्पखर्चिक, व पूर्ण सरकारी योजनेपेक्षां पुष्कळच लोकशाहीस जास्त पोषक. म्हणून ही सरकारवर पडलेली जबाबदारी सहकारी संस्थांनींच पार पाडण्याचें काम पत्करावें हें देशहितदृष्ट्या श्रेयस्कर. अर्थात् हें होणें म्हणजे बरीच सरकारी मदत आवश्यक;

तसेंच काम सार्वत्रिक व निश्चित करावयाचें तर कांहीं मार्गदर्शन व नियंत्रण पत्करून सहकारी तत्त्वांस मुरड घालणें अपरिहार्य.

याबाबत कोणता मार्ग पत्करावा हें मुंबई प्रांतांतील सहकारी कार्यकर्त्यांनीं गतवर्षींच ठरविलें. एखादी सरकारी संस्था शेतकऱ्यास पैसा पुरविण्याचें कार्य जितकें करील तितकें करण्याची सहकारी संस्थांची तयारी असून याप्रीत्यर्थ सहकारी संस्था –विशेषतः बँका– यांची पुनर्घटना किती व कशी करावी हें सरकारनें एक समिति नेमून निश्चित करावें असा मु. प्रां. स. बँकांच्या मंडळानें ठराव केला. या ठरावानुसार सरकारनें सर मणीलाल नानावटी यांचे अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली व या समितीचा अहवाल कांहीं महिन्यापूर्वी प्रसिद्ध झाला आहे. नानावटी समितीची मूलभूत शिफारस, मुं. प्रां. स. बँकेस मध्यवर्ती मानून पुढील व्यवस्था व कारभार करावा अशी आहे. सहकारी मंडळाचें कार्य व प्रगति, सहकारी मंडळ्या व जिल्हा बँकांचे संबंध, जिल्हा बँकांची कार्यपद्धति व विस्तार या सर्व बाबी प्रांतिक सहकारी बँकेचे अधिकारक्षेत्रांत आल्या म्हणजेच इष्ट कार्य घडून येईल असा या समितीचा अभिप्राय आहे. या नवीन धोरणानुसार प्रांतांतील सहकारी संस्थांची पुनर्व्यवस्था करतांना ज्या अनेक घडामोडी क्रमप्राप्त आहेत त्यांचा सांगोपांग तपशिलवार विचार नानावटी समितीनें दुर्दैवानें केला नाहीं. यामुळें नवीन जबाबदारी पत्करावयाची म्हणजे आपल्या सद्यःस्थितींत काय फरक करावा लागेल याची स्पष्ट कल्पना समितीचें कार्य चाललें असतां किंवा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतरहि जिल्हा बँका, अगर प्रां. बँक यांस आला नाहीं. या सर्व गोष्टींची आवश्यकता, नानावटी समितीच्या शिफारसींच्या विचाराप्रीत्यर्थ सहकारी मंत्र्यांनीं प्रां. बँकेच्या प्रतिनिधींशीं वाटाघाटी सुरू केल्यावरच पटली व आज सहकारी बँकांवरच पुनर्घटनेची तपशिलवार योजना करण्याचा प्रसंग आला आहे. या योजनेचा एक मसुदा सर्व बँकांकडे विचारार्थ पाठविलेला असून आपल्या परिषदेंत त्याचा सांगोपांग विचार होईल अशी माझी अपेक्षा आहे. माझ्या प्रास्ताविक भाषणांत या योजनेचा खल करणें मी अप्रस्तुत मानतों. मात्र परिषदेंत विचार करीत असतां तो कोणत्या दृष्टीनें मुख्यतः करणें आवश्यक आहे, याविषयींचें माझें मत येथें नमूद करणें अयोग्य नाहीं. सनातन सहकारी तत्त्वें व निरनिराळ्या सहकारी संस्थांचें अधिकारस्वातंत्र्य एवढ्याच भूमिकांवरून आपणांस या प्रश्नाकडे पाहणें शक्य नाहीं. सरकारी अगर

निम–सरकारी स्वतंत्र शेतकी बँक काढण्याऐवजीं सहकारी संस्थांमार्फत हें कार्य करावें असें म्हटलें म्हणजे त्यांतूनच यथाक्रम बिगरसभासदांशीं व्यवहार, ठराविक योजनेप्रमाणें प्रगति, निरनिराळ्या श्रेणींच्या सहकारी संस्थांच्या परस्परसंबंधांचें स्पष्टीकरण व दृढीकरण, प्रांतिक बँकेचें मध्यवर्ती स्थान, सरकारचें मार्गदर्शन व नियंत्रण या सर्व गोष्टी आल्या. अर्थात् कार्याच्या दृष्टीनें यांतील कोणत्या बाबी कितपत आवश्यक व अनावश्यक याचा तपशिलवार विचार करणें योग्यच. परंतु सरकारनें कार्य तर आमच्याकडे सोंपवावें, आम्ही मात्र पुनर्व्यवस्था करण्यास अगर नियंत्रण पत्करण्यास तयार नाहीं ही, अगर तपशिलाचा विचार आज कशाला जसा प्रश्न उद्भवेल तसें पाहून घेऊं ही, यापैकीं कोणतीच भूमिका आपणांस पत्करणें शक्य नाहीं, असें माझें स्पष्ट मत आहे.

सहकारी संस्थांची अंतर्व्यवस्था व परस्परसंबंध याबद्दल जरी कांहीं बोललों नाहीं तरी त्यांच्या व्यवहारपद्धतीबाबतच्या एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे मी आपलें लक्ष वेधणार आहे. सहकारी सावकारी व्यवहार परस्पर सहाय्यावर अवलंबून असून शेतकऱ्याच्या जिंदगीपेक्षां त्याच्या पतीवर तो चालतो ही मांडणी जुनी आहे. यास अनुसरून कर्ज जमिनीच्या तारणावर दिलें असतां सहकारी तत्त्वास सोडून व्यवहार होत आहे अशी टीका करण्याचा प्रघात पडला आहे. जोंपावेतों वाद शाब्दिक होता तोंपावेतों त्याकडे लक्ष देण्याचें विशेष कारण नव्हतें. जिंदगी पत्रकांकडे उघड लक्ष दिलें अगर न दिलें तरी अंतीं जमिनीवरच दृष्टी सर्वांची रहात होती. बरींच वर्षेंपावेतों सर्व प्रकारच्या मुदतींचीं कर्जेंहि एकाच संस्थेकडून दिलीं जात असल्यामुळें प्रत्यक्ष व्यवहारांत तात्त्विक वादामुळें कांहीं अडथळा उत्पन्न होत नव्हता. परंतु अलीकडील दहापंधरा वर्षांत लांब मुदतीचीं कर्जें जमिनीचे तारणावर देण्याकरितां अगदीं वेगळ्या सहकारी बँका काढण्यांत आल्या आहेत व दिवसेंदिवस सामान्य सोसायट्या व बँका यांचा व्यवहार छोट्या मुदतीचा व जमिनीवरील बोजावर अवलंबून नसलेला असा असण्याबद्दल आग्रह वाढला आहे. मुंबई प्रांतांत ह्यांतच ऋणविमोचन कायद्यानें निर्माण केलेल्या परिस्थितीची भर पडली जाहे. या कायद्याखालीं अर्ज केलेल्यास अर्जाचा कायम निकाल लागेपावेतों जमिनीवर बोजा उत्पन्न करितां येत नाहीं व नवीन कर्ज केवळ पतीवर अगर पिकावर बोजा ठेवूनच काढावें लागणार. पीककर्जाचा नवा प्रकार आतां सहकारी चळवळींत रूढ कर-

ण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे व त्याबाबत सरकार व सहकारी खातें यांजकडून जोरानें प्रचार चालू आहे. पीककर्जाचा अनुभव फार अल्पकालीन आहे. कांहीं जिल्ह्यांत या कर्जाची रकम मोठी आहे तर कांहींत अजून लहान आहे. तेव्हां याबाबत आजच निर्विवाद मत बनविणें कठीण आहे. हें जरी खरें, तरी याबाबत बरेच सहकारी कार्यकर्ते ज्या शंका काढतात त्यांकडे लक्ष देणें जरूर आहे. ज्या कर्जास जमिनीचें तारण कांहीं अंशीं होतें अशांचीहि वसुली अलीकडचीं कांहीं वर्षे सोडल्यास समाधानकारक होत नसे. थोडें दुर्लक्ष झालें तरी थकबाकी वाढे व मंदीच्या काळांत अगर लवादांत बरींच प्रकरणें गेल्यास जिंदगी भरपूर असूनहि सोसायटचांचा कारभार जवळ जवळ स्थगित होई. या अनुभवाकडे पाहतां पीककर्जाच्या वसुलीबाबत सहकारी मंडळ्यांच्या चालकांस भीति वाटल्यास नवल नाहीं. सालोसाल पूर्ण वसुली होण्यावरच पीककर्जाची पद्धति चालू राहण्याची शक्यता. सालोसाल पूर्ण वसुली महाराष्ट्रांतील शेतकींत कितपत शक्य आहे ? अर्थात् पीक कर्जाची मर्यादा फार आंखूड ठेवली तर गोष्ट निराळी. पण साधारण गरजेपुरतें कर्ज दिल्यास पिकांची पैदास व पिकांचे भाव हे दोन्ही जेथें अनिश्चित तेथें इच्छा असतांहि फेड करण्याची ऐपत व शक्यता दरवर्षी असेलच असें म्हणवत नाहीं. आणि एकदां पीककर्ज थकलें म्हणजे सर्वच अनवस्था प्रसंग. तसेंच पीककर्जाच्य सदरांत घातलेल्या सर्वच बाबी एका सालांत पूर्णपणें उत्पादक होऊन परतफेडीचें सामर्थ्य वाढवतील अशा नाहींत. बीं, अगर खताबाबत केलेला हंगामी पिकावरचा खर्च सालाचे अंत परत निघावयास पाहिजे हें खरें. पण ज्या शेतीचें उत्पन्न वर्षाहून अधिक काळांत निघतें तिजबाबत अडचण होणार. तसेंच बैल, आऊतें अशा बाबींकरितां कर्ज काढल्यास तें एका वर्षाच्या उत्पन्नांतून कसें फेडणार ? जोंपावेतों सावकार व सहकारी मंडळी या दोन्ही मिळूनच शेतकऱ्यांची गरज भागते असें मानलें जात होतें तोंपावेतों हा तपशिलाचा विचार फार महत्त्वाचा नव्हता. पण सर्व गरज सोसायटीमार्फत भागवायची म्हटल्यास तपशील अवश्य पाहिला पाहिजे. मोठ्या प्रमाणावर, सुरक्षित, बाजारभावांवर लक्ष ठेवून, एक किफायतशीर व्यवसाय म्हणून शेती चालते तेथें कर्जाची थोड्या मुदतींत व्यवस्थित उलाढाल होईल असें धरतां येतें. पण जेथें दरसाल तर नव्हेच पण लांब मुदतीवरहि जेमतेम तोंडमिळवणी होते तेथें इतक्या वक्तशीर व्यवहारावर अवलंबित असलेली पद्धति कितपत टिकेल याची शंका वाटते.

महाराष्ट्रासारख्या अनिश्चित शेतीच्या प्रदेशांत जमीन अगर ती कसण्याचा हक्क यावरच शेतकऱ्याची पत अंतीं आधारलेली असावयाची. अशा परिस्थितींत निरनिराळ्या मुदतींचीं कर्जें व त्यांच्या निरनिराळ्या पद्धतीच्या परतफेडीच्या योजना असा पोकळ डोलारा उभारणें माझ्या मतें अयोग्य आहे. एकाच पद्धतीच्या संस्थांमार्फत शेतकऱ्यांस लागणारीं सर्व सरकारचीं कर्जें पुरवून वाईट सालांत वसुली निश्चित घटणार हें लक्षांत धरूनच परतफेडीचा अंदाज बांधावा. निरनिराळ्या संस्थांत विभागलेला व्यवहार अशा प्रकारें होऊं शकणार नाहीं. हल्लींच्या पद्धतीनें परिणामीं शेतकऱ्याचें नुकसानच होईल असें माझें मत आहे. ज्या प्रदेशांत जमीनमहसुलाचे पद्धतींतहि सूट व तहकुबीचें महत्त्व फार मानलें जातें, तेथें पीक कर्जांच्या वसुलींत वेळोवेळीं निदान तहकुबी द्यावी लागेल हें गृहीत धरणें प्राप्तच आहे.

पीककर्जाचा विचार केला म्हणजे सावकारी व व्यापारी व्यवहाराची सांगड घालण्याचा प्रश्न साहजिकच उद्भवतो. पीककर्जाची वसुली बहुतांशीं ही सांगड नीट घालण्यावर अवलंबून आहे. छोट्या प्रमाणावर भुसार मालाचें उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याच्या मालविक्रीवर देखरेख ठेवणें फार कठीण व त्याच्या पीककर्जाची वसुली—विशेषतः यांतच बैलाकरितां लागणाऱ्या कर्जाचा समावेश झाला असल्यास—केव्हांहि कांहींशी दुरापास्तच होणार. पण जेथें पीक किफायतशीर, भरपूर व सुरक्षित तेथें सुद्धां कर्जवसुलीची सोय माल-विक्रीमधून परस्पर होणें हेंच आजकालच्या अनुभवावरून श्रेयस्कर समजलें जातें. केवळ सहकारी सावकारीची वाढ होऊन तादृश कांहीं फायदा नाहीं; त्याचे जोडीस खरेदी–विक्रीचा व्यवहारहि वाढला पाहिजे हा सिद्धांत फार जुना आहे. या सिद्धांताची अलीकडील सुधारलेली मांडणी म्हणजे सहकारी चळवळीचीं हीं दोन्हीं अंगें सारखींच वाढून भागणार नाहीं तर तीं परस्परा-वलंबी व एकमेकांस प्रत्यक्ष पूरक आहेत अशीहि योजना झाली पाहिजे. ही मांडणी अलीकडील सर्व समित्यांचे अहवाल, परिषदांचे ठराव इत्यादिकांतून समावेशलेली आढळते. हा सिद्धांत सर्वमान्य झाला आहे एवढेंच नव्हे तर युद्धकाळांत त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी मोठ्या प्रमाणांत अनेक प्रांतांतून झाली आहे, असें वारंवार म्हणण्यांत येतें. मद्रास प्रांतांतील प्रगति विशेष उल्लेखनीय समजली जाते; नुसते आंकडे पाहिले तर मुंबई प्रांतांतील वाढहि भरीव वाटते. आज आपणांस मान्य सिद्धांत अगर गत वाढीचे आंकडे यांजकडे पाहावयाचें नसून ही उभारणी भक्कम पायावर झाली आहे किंवा

नाहीं इकडे लक्ष द्यावयाचें आहे. सुरवातीस दर्शविल्याप्रमाणें सहकारी खरेदी-विक्रीव्यवहाराची आजची वाढ सरकारी मदत व नियंत्रित व्यवहार यांमुळें केवळ घडून आली. ही मदत व हा व्यवहार निदान कांहीं वर्षें असा टिकेल व तोंवर या नवीन संस्था आपले पाय मजबूत रोवूं शकतील असा सहकारी कार्यकर्ते व अधिकारी यांचा समज होता. हा समज निराधार ठरला आहे व दोन महिन्यांत परिस्थितींत कल्पनातीत बदल होऊन या सहकारी संस्था आज उघड्या पडल्या आहेत. यांना कसें व कितपत सांवरतां येईल याचा भरपूर उहापोह आपल्या परिषदेंत होईलच. या प्रयत्नाच्या ठळक मर्यादा मी थोडक्यांत दर्शविणार आहे. मर्यादा दोन प्रकारच्या मानतां येतील. एकतर संस्थांचें आजचें बळ काय व दुसरें आजची परिस्थिति त्यांस कितपत अनुकूल आहे. संस्था फार दुबळ्या असल्यास नवीन घटनेंत परिस्थिति साधारण अनुकूल असूनहि त्यांची फारशी प्रगति व्हावयाची नाहीं. पण या मुद्यावर मला कांहीं म्हणावयाचें नाहीं. नवीन परिस्थिति मूलतः या संस्थांस कितपत मानवेल ही बाब खरी महत्त्वाची आहे. ही नवी परिस्थिति सरकारच्या पालटलेल्या धोरणानें निर्माण झाली आहे. नियंत्रित व्यवहार सोडून अनिर्बंध व्यवहाराचें तत्त्व निदान व्यापाराचे बाबतींत हिंदुस्थान सरकारनें स्वीकारलें आहे. व्यापारी नियंत्रण फारसें प्रांतिक सरकारच्या कक्षेंत येत नसल्यामुळें प्रांतिक सरकारला हीं व्यापारी नियंत्रणें काढणें भाग पडलें आहे. अर्थात् ही गोष्ट कांहीं प्रांतिक सरकारांनीं कांहींशीं नाखुषीनें केली असेल, परंतु सर्व प्रांतिक सरकारांनीं साकल्यानें विचार करून नवीन धोरण मान्य केलें आहे, असें म्हणणें आज प्राप्त आहे. कारण प्रश्न अत्यंत महत्त्वाचा, सर्व आर्थिक जीवनाच्या रचनेचा असूनहि, कोणी प्रांतिक मंत्री सेवानिवृत्त झाले नाहींत.

नियंत्रित व्यवहार व नियोजित आर्थिक प्रगति यांचे अन्योन्यसंबंध निकटचे आहेत व सहकारी संस्थांचा स्वखुषीच्या व्यवहारावर कटाक्ष असला तरीहि सहकारी प्रगति व नियोजित अर्थव्यवस्था परस्परविरोधी नाहींत, असेंच प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांचें मत आहे. भांडवलशाहींतील खुल्या व्यवहाराबद्दल सार्वराष्ट्रीय सहकारी चळवळीचें मत सार्वराष्ट्रीय सहकारी समितीच्या अहवालांतील खालील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल. "स्वातंत्र्याचे सबबीखालीं राष्ट्रीय किंवा सार्वराष्ट्रीय व्यवहाराचीं मुख्य सूत्रें मोठ्या भांडवलदारांच्या हातीं देण्यास सहकारी कार्यकर्त्यांचा विरोध आहे. तसेंच

ज्या मोठ्या भांडवलदारांचें उद्दिष्ट खाजगी नफा आहे त्यांचा व्यवहार व केवळ जनसेवेसाठीं निर्माण झालेल्या लहानमोठ्या सहकारी संस्था यांचा व्यवहार या दोहोंमधील मूलभूत फरकाची दखल सरकारी धोरणांत घेतलेली जेव्हां दिसत नाहीं तेव्हां त्याचें त्यांना सखेदाश्चर्य वाटतें." [ I. L. O. : Co-operative Movement and Present-Day Problems (1945) पृ. १८७ ]

आपल्या दृष्टीनें याहूनहि महत्त्वाचा अभिप्राय सरैय्या समितीचा. आपल्या अहवालाच्या पहिल्या प्रकरणांत सरैय्या समितीनें सहकारी संस्थांच्या यशस्वितेला आवश्यक पार्श्वभूमि कल्पिली आहे. सहकारी चळवळीच्या वाढीस अनुकूल परिस्थितीचीं तीन लक्षणें समितीनें सांगितलीं आहेत. एक लोकशाही सरकार आणि दुसरें शैक्षणिक प्रगति; पण सर्वांहून महत्त्वाचें, विशेष विस्तारानें व आग्रहानें मांडलेलें तिसरें लक्षण म्हणजे अनिर्बंध व्यवहारांचा शेवट व शेतीमालाच्या किंमती इत्यादींबाबत सरकारचा सक्रिय पाठिंबा. सरैय्या समितीचा याविषयींचा परिच्छेद आजच्या परिस्थितींत इतका महत्त्वाचा आहे कीं त्याचें समग्र भाषांतर मी येथें उद्धृत करितों.

" हिंदुस्थान सरकारनें आजवर अवलंबिलेल्या व हिंदुस्थानच्या रहाणीचें मान वाढविण्यास असमर्थ ठरलेल्या खुल्या व्यापाराच्या धोरणाचा शेवट झाल्याखेरीज नियोजन शक्य नाहीं. म्हणजेच सरकारनें शिक्षण, वहातूक, आरोग्य, शेती, उद्योगधंदे इत्यादि क्षेत्रांत व्यापक प्रमाणावर कार्य हातीं घ्यावयास हवें. आजच्या परिस्थितींत खाजगी व्यक्तींना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व औद्योगिक योजना हातीं घेण्यांत बराच धोका पत्करावा लागत असल्यानें केवळ त्यावरच अवलंबून राहून चालणार नाहीं. सहकारी संघटनेचा अर्थच हा कीं पत्करावयाचा धोका व जबाबदारी विभागणीच्या पद्धतीनें कमी करणें. परंतु हें करण्याची संघटकाची शक्ति बरीच मर्यादित आहे. म्हणून आर्थिक व्यवहारांत खाजगी व्यक्तींना पत्करावा लागणारा धोका, त्यांना सहज अंगावर घेतां येईल इतका कमी करणें हें सरकारचें कर्तव्य आहे व यासाठीं सरकारनें आर्थिक प्रश्नांत लक्ष घालून आवश्यक ते उपाय योजिले पाहिजेत. उत्पादनाच्या सर्वच क्षेत्रांत धोका आहे हें खरें. परंतु शेतींत तर त्याचें प्रमाण विशेषच जास्त असतें. याला अनेक कारणें आहेत. पावसाचा भरंवसा नाहीं, उत्पादन मागणीनुसार चटकन् कमीजास्त करितां येत नाहीं, लहान प्रमाणावर शेती करणाऱ्यांची फार मोठी संख्या, व बाजारभावांतील विलक्षण चढउतार. शिवाय शेती उत्पादनाच्या बाजारभावांतील चढउतारींचा

एकंदर देशाच्या आर्थिक जीवनावर फार मोठा परिणाम होतो. कारण सत्तर टक्क्यांपेक्षां जास्त लोकसंख्येच्या उत्पन्नावर व त्यामुळें बहुतेक सर्व वस्तूंच्या मागणीवर यांचा परिणाम होतो. रहाणीच्या मानावर व कच्च्या मालाच्या किंमतीवर होणाऱ्या या चढउतारीच्या परिणामामुळें औद्योगिक उत्पादनाच्या किंमतींनाहि झळ लागल्याशिवाय रहात नाहीं. शेती उत्पादनाच्या किंमतींत मंदी झाल्यास शेतकऱ्यांची परिस्थिति विशेषच वाईट होते. जर पुढील कांहीं वर्षांत येणारी मंदी टाळावयाची असेल, एकंदर आर्थिक व्यवहारांत स्थैर्य आणावयाचें असेल, उत्पादन, व्यापार व शेतीच्या मालाच्या रूपांतरांतलि व्यवहारांत पत्कराव्या लागणाऱ्या धोक्याचें प्रमाण सह्य करावयाचें असेल व सहकारी चळवळीनें खाजगी उद्योगधंद्यांशीं चढाओढींत टिकून रहावयाचें असेल, तर सरकारनें शेतकरी व गिऱ्हाईक या दोहोंनाहि न्याय्य वाटेल अशा ठराविक प्रमाणांतच शेतकी उत्पादनाच्या बाजारभावांत चढउतार होतील असा कसून प्रयत्न केला पाहिजे. सहकारी चळवळीचें यश झपाट्यानें आर्थिक प्रगति करण्याकरितां सरकारनें स्वीकारलेल्या धोरणावरच अवलंबून राहील." ( पृ. ६–७ )

आजची निर्माण झालेली परिस्थिति भयावह आहे असें वारंवार आग्रहानें मी कां म्हणत असतों हें वरील उताऱ्यांत केलेल्या समर्पक विवेचनावरून स्पष्ट लक्षांत येईल. सहकारी संस्था रुजण्यास व वाढण्यास जो निवारा पाहिजे तो आतां पूर्णपणें नाहींसा झाला आहे. आर्थिक तेजीमंदीच्या झंझावातांत आपण तगून राहूं ही आशा फोल आहे. त्यांतल्या त्यांत महाराष्ट्रासारख्या उजाड मुलखांत तिला कांहींच धर नाहीं. गुजराथेसारख्या नजीकच्या प्रदेशाशीं तुलना केली असतांहि आपली आजची परिस्थिति फार खराब आहे असें आढळून येईल. शेती असुरक्षित व अल्प फायद्याची, शेतकरी अज्ञानी व गैरहिशेबी, मूळची फुटीर वृत्ति, त्यांतच सावकार व व्यापारी आमच्या समाजाशीं समरस न झालेले आणि म्हणून विशेष आक्रमक. अशा परिस्थितींत खरेदी–विक्री संघ टिकून राहतील, शेती मालाचा व्यापार सहकारी संस्थांचे हातीं जो थोडाबहुत आला आहे तो कायम राहील हें संभवत नाहीं.

अनिर्बंध व्यवहारांत केवढे धोके निर्माण होतात हें आजच्या गुळाच्या उदाहरणावरून दिसतच आहे. आमच्या सरकारला दिव्य दृष्टि प्राप्त होऊन

त्यांनीं लेखणीच्या फटकाऱ्यासरशीं व्यवहार खुला केला; पण त्याबरोबर खुला व्यवहार साधारण नीट चालण्यासहि जी परिस्थिति आवश्यक आहे ती निर्माण करणें त्यांस साध्य झालें नाहीं. पेठेंत माल येऊं लागला पण त्याचा उठाव नाहीं. सर्व कोठारें भरलीं तरी परगांवीं पाठविण्याची सोय कांहींच नाहीं. किंमती दोन आठवड्यांत भलतीकडे उतरल्या व माल मातीमोल झाला तरी त्याबद्दल दाद नाहीं. ही परिस्थिति अपवादात्मक मानावयाची नाहीं. ही भविष्यांतील नित्याची होण्याचा धोका आहे. खुल्या व्यापारांत दोन पैसे मिळाल्यामुळें तात्कालिक बरें वाटत असणाऱ्यांनीं गुळाच्या शेतकऱ्याची सद्यःस्थिति जरूर लक्षांत आणावी. अर्थात् परिस्थितीचा धोका खाजगी व्यापारी व सहकारी संस्था या दोहोंस सारखाच आहे हें खरें; परंतु खाजगी व्यापाऱ्यास उपलब्ध असलेलें भांडवल व मार्ग सहकारी संस्थांस उपलब्ध नाहींत. आणि खरा महत्त्वाचा विचार म्हणजे व्यवस्था कोणती शाश्वत राहणार याबाबतचा. खाजगी व्यापारी धोका पत्करून व्यक्तिशः कोणी बुडले अगर तरले तरी व्यवस्था खाजगी व्यवहाराचीच राहते व जितका धोका अधिक तितकी अडत्याची दलाली अधिक या न्यायानें धोका पत्करणाऱ्या भांडवलदार व व्यापाऱ्यांचे हातीं दिवसेंदिवस जास्त संपत्तीचा व सत्तेचा संचय होतो. याच्या उलट न्याय सहकारी संस्थांस लागू असतो. त्यांच्यापैकीं डोकें वर काढूं पाहात असलेल्या एका दोघांची जरी पिछेहाट झाली तरी परिणाम सर्वांवरच होतो. सहकारी संस्था काढणें व चालविणें हें मूलतःच अनिर्बंध व्यवहारी समाजांत धारेविरुद्ध पोहण्यासारखें आहे. त्यांतच लाटा मोठ्या, भोंवरे अनेक, हिंस्र जलचरांची गर्दी, म्हणजे पैलतीर गांठणारा भाग्यवान्च समजावयाचा.

शेतमालाचा व्यापार सहकारी संस्थांचे हातीं आला नाहीं अगर राहिला नाहीं म्हणजे त्याचा परिणाम सावकारी व्यवहारावरहि खचित होणार. पीक-कर्जें तर राहोतच पण पूर्वीचा सावकारी व्यवहारहि पूर्वीइतका टिकून राहणें शक्य नाहीं. म्हणजे जुन्या काळाप्रमाणेंच तेजीचा फायदा अशाश्वत, आळवावरील पाण्याप्रमाणें; मंदीच्या वेळचा बुडता पाय मात्र दर खेपेस जास्त खोल जाणार अशी स्थिति राहणार. यांतच नवीन कायद्यांच्या परिणामांची भर. आजचेंच धोरण कायम राहिल्यास आणखी चार पांच वर्षांत मराठी शेतकऱ्यावरचा कर्जाचा बोजा १९३५–३६ सालाइतकाच, निदान पूर्ववत् झाला आहे व तो जमिनीवरचे हक्क अधिकाधिक गमावून स्वतःच्याच

राज्यांत (?) परका ठरूं पहात आहे, असं घडून आल्यास मला तरी बिलकूल आश्चर्य वाटणार नाहीं.

असो, विवेचन लांबविण्याचें कारण नाहीं. माझें मतें आजच्या परिस्थितींत उत्पादक व व्यापारी संस्थांचा व्यवहार टिकून राहणें दुरापास्त आहे. अर्थात् सहकारी सावकारी व सहकारी व्यापार यांची फलदायी सांगड घालून सर्व सहकारी संस्था शाश्वत पायावर उभारणें हेंहि अशक्य. ब्रिटिश अमदानी असो कीं स्वराज्य येवो अनिर्बंध व्यवहाराचें तत्त्वज्ञान राज्यकर्त्यांस सारखेंच मानवतें, आणि म्हणून आमच्या सहकारी संस्था या राष्ट्रीय व्यवस्थेचा गाभा नसून पूर्वींप्रमाणेंच एका दिखाऊ चळवळीचें अंग आहेत असेंच मानलें पाहिजे. माझा सूर फाजिल निराशेचा आहे, असे आपणांपैकीं बरेच जणांस वाटेल हें मी जाणतों. मी माझ्याकडून आग्रह व अत्युक्ति हीं दोन्ही टाळण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे.

आजचें सरकारी धोरण कायम आहे तोंपावेतों सहकारी संस्थांची पायाशुद्ध उभारणी अशक्य व त्यांच्याकडून शाश्वत कार्य कांहीं होणार नाहीं हा वरील विवेचनाचा निष्कर्ष आहे. यामुळें सहकारी पुनर्घटनेचा व नियोजनाचा विचार करण्याचे ऐवजीं त्यांसाठीं लागणारी आवश्यक पूर्वस्थिति अस्तित्वांत आणणें हाच खरा महत्त्वाचा प्रश्न ठरतो. माझें भाषण संपविण्यापूर्वी सरकारी धोरण कसें बदललें पाहिजे व सहकारी नियोजनाच्या एकंदर प्रश्नाबद्दल आपली दृष्टि काय असावी याबद्दलचीं माझीं मतें मी थोडक्यांत आपणांपुढें मांडणार आहे. अनिर्बंध व्यवहार ही प्रकृति व नियंत्रण ही विकृति हें सरकारी धोरणाचें आजचें सूत्र दिसतें. सरैय्या समितीनें या धोरणाचा स्पष्टपणें निषेध केला आहे, तसाच सर्व सहकारी कार्यकर्त्यांनींहि तो केला पाहिजे.तसेंच सहकारी संस्था व खाजगी व्यापारी व भांडवलदार यांच्या व्यवहारांतलि खरा फरक सरकारनें ओळखून तो आपल्या धोरणांत ठळक रीतीनें दाखविला पाहिजे, याचीहि आपण आग्रहानें मागणी केली पाहिजे.या सर्वसाधारण बाबी झाल्या. यापुढें जाऊन महाराष्ट्रांतील सहकारी संस्थांच्या दृष्टीनें सरकारी धोरणाचा मूळ पाया कसा बसवावा याबद्दलहि आपण विचार केला पाहिजे. शेती मालाच्या किंमतीस स्थैर्य लाभावें व व्यापारी पद्धतीमुळें शेतकरी लुबाडला जाऊं नये हें उद्दिष्ट कोणासही पटेल. हें महाराष्ट्रापुरतें साधण्याचा एकच मार्ग म्हणजे शेती मालाचा घाऊक व्यापार, त्याचा सांठा व

त्यावरील प्राथमिक क्रिया यांचें राष्ट्रीयीकरण, असें माझें मत पूर्ण विचारांतीं बनलें आहे. राष्ट्रीयीकरण हा शब्द खाजगी नफ्यासाठीं होत असलेल्या व्यवहाराचें पूर्ण उच्चाटन होऊन विवक्षित क्षेत्रांतील सर्व व्यवहार समाजनियंत्रणाखालीं येणें या क्रियेस उद्देशून मी वापरीत आहे. या दृष्टीनें युद्धकाळांत अनेक प्रकारच्या व्यापारांचें व व्यवहारांचें राष्ट्रीयीकरण झालें होतें. राष्ट्रीयीकरण सर्वांशीं सहकारी संस्थांच्या सहाय्यानें होणें शक्य आहे, एवढेंच नव्हे तर इष्टहि आहे. शेती मालाच्या भावांत वारंवार अगर मोठा फेरबदल न होऊं देणें हें सरकारचें आद्य कर्तव्य समजल्यास शेती मालाची खरेदी, सांठा, रूपांतर व पुढें क्रमानें शेती मालाची कमी अधिक विक्री यांची जबाबदारी सरकावर येते. ही जबाबदारी पार पाडण्यास सहकारी संस्था हें एकच प्रभावी व समाजहितपोषक साधन आहे. सरकारनें घालून दिलेल्या किंमतीच्या मर्यादेंत सहकारी संस्थांनीं सर्व शेतमालाची खरेदी करावी, सरकारी सहाय्यानें बांधलेल्या कोठारांत या मालाचा आवश्यक संचय इष्ट काळापर्यंत करावा, ज्या कच्च्या मालाचें कांहीं रूपांतर आवश्यक आहे तें यंत्रसहाय्यानें किंवा इतर मार्गांनें घडवून आणावें आणि यथाक्रम त्याच्या विक्रीची व्यवस्था करावी. यापैकीं कोणत्याच व्यवहारांत खाजगी व्यापाऱ्याचा शिरकाव होणें अत्यंत अनिष्ट आहे. शेती मालाच्या व्यापारांतील खाजगी नफेबाजीचें स्थान हेंच माझ्या मतें मराठी शेतकऱ्यांचें दारिद्र्य व विघटना यांचें खरें कारण आहे. शेतमालाच्या किंमतींची हंगामांतील घट व तो पूर्णपणें व्यापाऱ्यांचे हातांत गेल्यावर भावांत होणारी मोठी वाढ हें वार्षिक चक्र खाजगी व्यापाऱ्यास जोंपर्यंत या व्यवहारांत स्थान आहे तोंपर्यंत थांबणार नाहीं. एका विवक्षित कालांतच सर्व शेती माल बाजारांत येतो याचा अनिष्ट परिमाण घालविण्यास मालकोठारांची तरतूद झाली पाहिजे. परंतु हीं मालकोठारें सरकारचे किंवा सहकारी संस्थांचे ताब्यांत राहिलीं तरच या योजनेचा खरा फायदा शेतकऱ्यांस होईल. नाहींतर इतर सरकारी योजनांप्रमाणें त्यामुळें खाजगी व्यापाऱ्यांचाच नफा जास्त वाढेल. हल्लीं मुंबई सरकारतर्फे जी कोठारयोजना पुढें मांडण्यांत आली आहे त्यांतील याबाबतचें धोरण अनिश्चित व गुळमुळीत वाटतें. नवीन सर्व कोठारें सरकारी मदतीनें बांधण्यांत येऊन तीं सर्व सहकारी संस्थांचे ताब्यांत देण्यांत येतील व एकादे वेळेस सहकारी संस्था उपलब्ध नसल्यास त्यांची व्यवस्था सरकारमार्फत होईल असें स्पष्ट धोरण सरकारनें स्वीकारणें अत्यावश्यक आहे. हाच न्याय शेती मालाचें रूपांतर करणाऱ्या अनेक व्यवसायांना लागतो. सडणें, दळणें, फोडणें इ. अनेक क्रिया करणाऱ्या व्यावसायि-

कांचें स्थान शेतीच्या अर्थव्यवस्थेंत फार महत्त्वाचें होऊन बसलें आहे. कांहीं अंशीं कोठारी व व्यापारी या दोहोंची भूमिका हे स्वीकारतात. अनेक टापूंत व व्यवसायांत यांची संख्या विशेष वाढलेली असूनहि एकमेकांशीं संगनमत करून, यंत्रसामुग्री बंद ठेवून आपलीं उत्पन्नें हे लोक फाजील वाढवितात अशी यांजबद्दल तक्रार आहे. याबाबतहि सहकारी संस्था कार्यक्षम बनूं शकतात; परंतु अनिर्बंध व्यवहारांत त्यांना डोकें वर काढणें दुरापास्त आहे हाच आजवरचा अनुभव आहे. कोठारें व शेती मालाचें रूपांतर करणारे कारखाने यांची संख्या व स्थलनिश्चिति या गोष्टी बहुतांशीं पिकांचे क्षेत्रावर अवलंबून असतात. पिकांच्या क्षेत्राबद्दलची परिस्थिति वारंवार बदलणारी नसते. यामुळें यांची तरतूद व वाढ ही खाजगी व्यक्तींच्या हातीं न ठेवितां ती नियोजित करणें हेंच सोय व खर्च या दोन्ही दृष्टीनें योग्य आहे. एवंच, अडाणी व गरीब शेतकऱ्यांस धूर्त व संपन्न खाजगी व्यावसायिकांच्या कचाट्यांतून सोडविणें आणि वहातूक व यांत्रिक साधनांचा यथायोग्य उपयोग होणें या दोन्ही दृष्टीनें या सर्व क्षेत्रांचें राष्ट्रीयीकरण झालें पाहिजे. ज्यावेळीं हा साधा व शुद्ध विचार राज्यकर्त्यांस पटेल तेव्हांच आपल्या समाजास स्थैर्य लाभेल व सहकारी संस्थांचें कार्य भरीव होईल व टिकून राहील.

सरकारच्या धोरणांत याप्रमाणें बदल घडवून आणण्याची खटपट करीत असतांनाच सरकारी नियोजनकार्यक्रमांत सहकारी संस्थांचें स्थान काय हेंहि आपण स्पष्ट केलें पाहिजे. याबाबत सहकारी कार्यकर्त्यांची भूमिका अजून सुस्पष्ट नाहीं, हें मी वर दाखविलेंच आहे. नियोजित व्यवस्थेंत कार्य करावयाचें तर विवक्षित कार्यपद्धति व निश्चित केलेले इष्टांक गांठण्याची तयारी व जबाबदारी आपणांस पत्करली पाहिजे. बिगर सभासदांशीं व्यवहार करणें व सभासद नांवापुरते करून घेणें इत्यादि गोष्टी आपण आधींच करूं लागलों आहों. पण याहि पलीकडे जाऊन बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या कार्याच्या अंतिम उद्दिष्टांबद्दलच्या कल्पनाहि आपण नव्या मांडल्या पाहिजेत. अगदीं थोडें कां होईना पण पूर्णपणें स्वतंत्र व स्वेच्छेनें घडून आलेलें कामच खरें महत्त्वाचें या जुन्या कल्पनेचा त्याग करून, सबंध समाजाचें परिवर्तन—आर्थिक व नैतिक—घडवून आणण्यांत मोठा भाग उचलण्याची आज केवढी निकड आहे, याची जाणीव आपण दाखविली पाहिजे. आज सोंवळी वृत्ति सोडून, व्यापक व लोकसंग्राहक दृष्टि स्वीकारणें अगत्याचें आहे. प्रत्येक संस्थेनें आपल्या क्षेत्रापुरतें पाहून आपला स्वयंभूपणा टिकविण्याचा अट्टहास न धरितां सहकारी संस्थांची

सर्व व्यवस्थाच जास्त बळकट व कार्यक्षम कशी होईल इकडे लक्ष दिलें पाहिजे. कोणत्याहि कार्यांत आपणांकडे माणसांची वाण फार भासते. तेव्हां नियोजित आर्थिक प्रगतीचें कार्य सरकारी, निमसरकारी अगर सहकारी कोणत्याहि मार्गांनीं होवो, जी मूठभर अनुभविक माणसें दर टापूंत आहेत त्यांनींच त्याचा भार उचलला पाहिजे. हें कार्य शक्य तितकें सहकारी मार्गानें होणें इष्ट अशी आमची श्रद्धा आहे, विश्वास आहे. सहकारी कार्यकर्त्यांनीं आपण होऊन त्यांत मोठा भाग उचलला तर नियोजनास योग्य वळण लागेल हेंहि उघड आहे. तेव्हां लोकशाहीच्या व सहकारी कार्यपद्धतीच्या तत्त्वांबाबत आग्रह धरूनहि आर्थिक नियोजनाचे सांच्यांत बसविण्यास आवश्यक इतका त्यांत बदल करण्याची तयारी दर्शविली पाहिजे. केवळ जुन्या सहकारी मांडणीच्या आग्रहास्तव आर्थिक प्रगतीचा सर्वमान्य मार्ग सोडणें शक्य किंवा इष्ट नाहीं. तेव्हां संकुचित वृत्तीनें, सोंवळेपणानें अगर स्वतःच्या संस्थेच्या स्वायत्ततेबद्दलच्या आग्रहानें आपण या वेळेस बाजूस राहिलों तर घरीं गंगा येऊनहि तींत स्नान न करण्याचें करंटेपण आपण पत्करूं. असा अविचार महाराष्ट्रांतील सहकारी कार्यकर्त्यांचे हातून होणार नाहीं याबद्दल मला भरंवसा वाटतो. सरकारनें योग्य तें धोरण स्वीकारलें, महाराष्ट्रजीवनाचा गाभा जो मराठी शेतकरी त्याच्या निश्चित, नियोजित उन्नतीची योजना आंखली म्हणजे सर्व पूर्वग्रह व संकुचित हितसंबंधाच्या कल्पना सोडून देऊन ही योजना यशस्वी करण्याकरतां महाराष्ट्रांतील सहकारी कार्यकर्ते अहोरात्र झटण्यास उत्सुक आहेत अशी ग्वाही या परिषदेच्या कार्यानें सर्वांस मिळो, अशी इच्छा प्रकट करून मी आपलें भाषण संपवितों.

---

# १६ आपलें आर्थिक धोरण व राजकीय भवितव्य*

मित्र हो,

आज जगांत दोन तट पडले आहेत. एक पश्चिम यूरोपीय व अमेरिकन राष्ट्रांचा व दुसरा रशिया, बाल्कन राष्ट्रें व कम्युनिस्ट चीन यांचा. या दोन तटांतील एके काळचे स्नेहसंबंध पूर्णपणें दुरावले आहेत. मतभेद सारखे वाढत आहेत व दोघांतहि एका जगांत मित्रत्वानें अगर एकोप्यानें नव्हे तर निदान, प्रत्यक्ष भांडणाशिवाय नांदतां येईल किंवा नाहीं, याबद्दल दिवसेंदिवस जास्त शंका वाटूं लागली आहे. समाजवादी वा साम्यवादी राष्ट्रें व व्यक्तिवादी भांडवलशाही राष्ट्रें यांचा केव्हांना केव्हां तरी जागतिक वर्चस्वासाठीं झगडा होणारच हा मार्क्स-लेनिन-स्टालिन वादी रुसी तत्त्वज्ञांचा ठाम सिद्धांत आहे. इंग्रज-अमेरिकन राष्ट्रांतूनहि याच सिद्धांताचा उलट्या बाजूनें पुरस्कार अलीकडे केला जातांना आढळतो. हा झगडा विश्वव्यापी आहे, त्यांतून कोणताहि देश अगर समाज वगळला जाणार नाहीं. तसेंच जो तात्त्विक वाद या झगड्याच्या मुळाशीं आहे, त्याचा समाजजीवनाच्या प्रत्येक अंगाशीं निकट संबंध आहे. त्याअर्थीं आज जगांतील कोणत्याहि समाजाच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक जीवनाचा विचार करूं म्हटलें तर या मूलभूत वादास धरूनच तो विचार करावा लागतो. हिंदुस्थानांतील राजकीय पुढाऱ्यांस एके काळीं आपण या कलहांत न पडतां तटस्थतेनें वागूं असें वाटत होतें. पण या भ्रमाचा निरास लवकरच झाला. आज हिंदुस्थानांतील सत्तारूढ पक्षानें इंग्रजांशीं आपल्या देशाचे संबंध दृढतर केले असून, अमेरिकेशीं आर्थिक संबंध उत्तरोत्तर वाढविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. तेव्हां आज तरी आपला देश यूरोपीय व अमेरिकन गटाचा सदस्य बनला आहे याबाबत शंका येण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थान सरकारचें आर्थिक व राजकीय धोरणहि अमेरिकन गटाच्या सभासदत्वास अनुरूप असेंच गेल्या दोन वर्षांत बनत गेलें आहे. या धोरणाचा विकास कसा होत गेला व त्याचा परिणाम काय होण्याचा संभव आहे याविषयीं कांहीं विचार आपणांपुढें मांडण्याचें मीं आज योजिलें आहे.

---

* मुंबई मराठी साहित्य संघांत २३ जुलै १९४९ रोजीं वाचलेला निबंध.

प्रचलित जागतिक वाद मूलतः अर्थव्यवस्थेबाबतचा आहे. एका पक्षाचें म्हणणें असें कीं व्यक्तिसाहसास पूर्ण वाव देऊन, शासनसंस्थेचें नियंत्रण अत्यल्प राखणें ही सर्वोत्कृष्ट योजना; तर दुसऱ्या पक्षाच्या मतें पूर्णपणें नियोजित अर्थव्यवहार समाजहिताच्या दृष्टीनें चालविणें हाच एक इष्ट मार्ग. यास जोडूनच एक राजकीय वाद आहे. पहिल्या पक्षाचे धुरीण आपणास व्यक्तिस्वातंत्र्याचे व लोकशाहीचे पुरस्कर्ते म्हणवितात, तर दुसऱ्या पक्षाच्या मतें व्यक्तिस्वातंत्र्याचें फाजील स्तोम खऱ्या लोकशाहीच्या प्रगतीस मारक असून निर्नियोजित अर्थव्यवस्थेंतलि लोकशाही बेगडी आहे. तात्त्विक वादांत शिरण्याचें हें स्थल नव्हे. परंतु कांहीं सूचक घटना व गोष्टी यांकडे लक्ष दिल्यास वादाचें खरें स्वरूप लक्षांत येऊं लागेल. नियोजित अर्थव्यवस्थेच्या आग्रहाच्या बुडाशीं व्यक्तिगत आर्थिक विषमता शक्य तों कमी करण्याचा आग्रह आहे. आर्थिक विषमता अनिष्ट आहे, प्रत्येक व्यक्तीच्या राहणीचें मान विविक्षित किमान मर्यादेहून कमी असूं नये, धनसंचय थोड्या हातीं झाला म्हणजे आर्थिक सत्ता अल्पसंख्याकांचे हातीं जाऊन ते आपल्या हिताचे दृष्टीनें अर्थव्यवस्था राबवितात, इत्यादि अनेक सिद्धांतांवर हा आग्रह आधारलेला आहे. उलट पक्षाची मूळ भूमिका अर्थविचारांत समाजविचार अप्रस्तुत आहे, असें मानण्याची होती. व्यक्तिसाहसाचे जोरावर समाजाची साहजिकच प्रगति होते व व्यक्तिव्यक्तींचे स्पर्धेंत प्रत्येकास योग्य तें स्थान अर्थव्यवस्थेंत प्राप्त होतें, असा या पक्षाचा विश्वास होता. हा विश्वास गेल्या पंधरावीस वर्षांत ढासळलेला दिसतो. आपोआप सर्व गोष्टी इष्टच घडून येतात ही श्रद्धा परिस्थितीनें पाश्चात्य देशांतहि भोळी ठरविली आहे. हिचा प्रकट उच्चार आज सहसा कोणी करतांना आढळत नाहीं. बहुजनसमाजाचे राहणीचें किमान मान गाठविणें व राखणें, हें शासन संस्थेच्या आद्य कर्तव्यापैकीं आतां समजलें गेलें असून, अटलांटिक सनदेच्या चतुःसूत्रींत दारिद्र्यापासून सर्वांस मुक्त करणें या उद्दिष्टाचा समावेश करण्यांत आला आहे. म्हणून आज निर्भेळ व्यक्तिसाहसावरील जोर कमी झाला आहे. १९२९ सालानंतर जागतिक मंदी व १९३९ नंतर युद्धकालीन परिस्थिति यामुळें सरकारचें आर्थिक कर्तव्य व व्यवहार यांची सीमा प्रत्येक देशांतच फार वाढली व ती युद्धोत्तर काळांत अजून तरी फारशी कमी होऊं शकली नाहीं. सरकारी आर्थिक व्यवहारक्षेत्र वाढविण्यास मुख्यतः दोन कारणें झालीं. मंदीच्या व युद्धाच्या काळांत सरकारला कांहीं गोष्टी त्वरेनें घडवून आणण्यास आर्थिक व्यवहारांत

ढवळाढवळ करणें, त्याचें मोठ्या प्रमाणावर नियंत्रण करणें, याशिवाय गत्यंतर नव्हतें. युद्ध संपल्यावरहि तेजीमंदीच्या चक्राची गति पुन्हा कशी व केव्हां सुरू होईल याची भीति व युद्धकालीन परिस्थितीचे, विशेषतः सार्वराष्ट्रीय व्यापारावर झालेले शेष परिणाम यांचें निराकरण करणें किंवा त्यांस निदान आटोक्यांत ठेवणें यांची आवश्यकता, यामुळें युद्धकाळांत सुरू केलेले उपक्रम व लादलेलीं नियंत्रणें यांत अद्याप फारसा फरक होऊं शकला नाहीं.

याहूनहि महत्त्वाचा फरक म्हणजे रुसी राज्यक्रांतीनंतर घडून आलेलें मत-परिवर्तन अगर मूल्यपरिवर्तन. आर्थिक विषमतेचें निर्मूलन करणें हें सरकारचें आद्य कर्तव्य व फाजिल धनसंचय ही अनिष्ट गोष्ट मानूं लागण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस बळावत आहे. श्रीमंत गरिबांचा, कारखानदार मजूरांचा उपकर्ता ही भाषा हास्यास्पद वाटूं लागली व श्रीमंतीचें प्रदर्शन, आर्थिक विषमतेचें प्रदर्शन, समाजस्वास्थ्याचे दृष्टीनें अहितावह ठरूं लागलें. ज्या देशांत दारिद्र्य अधिक त्या देशांत या प्रवृत्तींनीं सरकारी धोरण किंवा समाजमन यांत जास्त उत्कट फरक घडवून आणला. परिणामीं, व्यक्तिसाहसावर भर देणाऱ्या गटांतील अनेक देशांत सरकारी धोरणावर आज समाजवाद अगर साम्यवाद यांचा पगडा कमी अधिक प्रमाणांत बसलेला प्रत्यक्ष आढळून येतो. इंग्लंड-सारख्या देशांत खाजगी आर्थिक व्यवहाराचा संकोच मोठ्या प्रमाणावर झाला असून, खाजगी व्यवहारावर अनेक प्रकारचीं बंधनें घातलीं आहेत. शिवाय समाजवादाचें पाऊल या देशांतून आजच्यापेक्षांहि पुढें पडण्याची शक्यता आहे.

स्थूल मानानें यूरोपियन–अमेरिकन गटांत श्रीमंतीच्या प्रमाणांत, व परि-स्थितींत खालील फरक आढळून येतात. बहुजनसमाजाचें राहणीचें किमान मान राखणें हें सरकारी आद्य कर्तव्य मानून आजार, बेकारी, वृद्धापकाल या अवस्थेंत मदत म्हणून सार्वजनिक खर्चानें तरतूद करण्याच्या योजना सर्वांसच मान्य आहेत. तसेंच मंदीच्या काळांत विशिष्ट वर्गाचें ऐन उत्पन्न खालावूं नये याकरितां शेती मालाच्या पैदाशीच्या किंमती सांवरण्याची व्यवस्था करणें इ. धोरणें अमेरिकन सरकारासहि मान्य आहेत. अमेरिकेबाहेर अनेक देशांत यापुढें जाऊन प्रमुख आर्थिक व्यवसाय सरकारच्या मालकीचे करणें वा ताब्यांत घेणें व कांहीं बाबींत प्रत्यक्ष आर्थिक नियोजन अमलांत

आणणें हेंहि घडलें आहे. स्कँडिनेव्हियन देश व इंग्लंड यांसारख्या यूरोपांतील श्रीमंत देशांत समाजवादाचा अंमल मोठ्या प्रमाणावर होऊन व्यक्तिगत राहणीच्या मानांतील प्रत्यक्ष विषमता फार कमी झाली आहे. अखिल देशाचें अर्से, उत्पादन-उपभोग, क्रय-विक्रय, आयात-निर्यात इत्यादींचे ताळेबंद आगाऊ कल्पून पूर्वयोजनेनुसार नियंत्रणाच्या साहाय्यानें ते प्रत्यक्षांत उतरविणें येथ-पर्यंत सरकारी व्यवहाराचें क्षेत्र या देशांत पोंहोचलें आहे. आणि यामुळें या देशांतील लोकशाही राज्याचें बूड इतर कोणत्याहि देशांपेक्षां जास्त स्थिर दिसतें. प्रमुख धंद्यांचें राष्ट्रीयीकरण, खाजगी व्यवहारांचें कडक नियंत्रण, खाजगी उत्पन्नावर भारी कर व मजूर, शेतकरी इत्यादिकांच्या उत्पन्नांत प्रत्यक्षाप्रत्यक्ष भर टाकण्याच्या निरनिराळ्या योजना या सर्व धोरणाचा इष्ट परिणाम या देशांत साकल्यानें घडून आलेला दिसतो. परंतु हें धोरण यशस्वी होण्यास कांहीं किमान श्रीमंती व समाजस्वास्थ्य लागतात. हीं तितक्या प्रमाणांत फ्रान्स, इटलीसारख्या देशांत आज उपलब्ध नाहींत. म्हणून सारखवट आर्थिक धोरण असतांहि तितकी तुष्टि अगर शांति हे देश अनु-भवींत नाहींत.

पाश्चिमात्य देशांतील समाजस्वास्थ्याचा प्रमुख मानदंड कम्युनिस्ट पक्षाचें प्राबल्य हा मानल्यास गरीबीच्या मानानें या देशांची उतरण लागेल असें वाटतें. अगदीं गरीब देशांत इंग्रजी समाजवाद कितपत फलदायी होईल याबाबतचा प्रत्यक्ष प्रयोग अजून कोठें घडून आलेला नाहीं. खुद्द इंग्लंडमधील आर्थिक धोरणाच्या यशस्वितेचें श्रेय बऱ्याच अंशीं अमेरिकन मदतीस दिलें पाहिजे. फ्रान्स, इटली वगैरे देशांत कम्युनिस्ट पक्षाची अलीकडील पीछेहाट होहि मार्शल योजनेचें फळ मानिली पाहिजे. याचें तात्पर्यहि हेंच कीं, परकीय मदत अगर स्वतःची योजना या कशाचेहिमुळें आर्थिक विकास झपाट्यानें होऊन गरीबांची आर्थिक स्थिति उत्कटपणें सुधारूं लागल्यास आर्थिक असंतोष व कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार हीं कमी अधिक प्रमाणांत काबूंत ठेवतां येतात.

या विचाराचा विस्तार करण्यापूर्वी मार्शल योजनेच्या अंमलबजाव-णीच्या पोटीं जो एक विरोधाभास निर्माण झाला आहे त्याकडे लक्ष वेधलें पाहिजे. मार्शल योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे युद्धोत्तर संक्रमणावस्था सुकर-तेनें पार पाडण्यास यूरोपीय राष्ट्रांस मदत करून त्यांचें कम्युनिस्ट धोक्या-

पासून रक्षण करणें. कम्युनिस्टांपासून बचाव करणें याचा अर्थ म्हणजे व्यक्ति-साहसावर आधारलेल्या अर्थ व्यवहारास विरोधी असलेल्या तत्त्वज्ञानाचा या देशांत बीमोड करणें. हें करण्याचा मार्ग म्हणजे असंतुष्ट दरिद्र्यांचे पूर्वेकडे लागलेले डोळे, पश्चिमेकडून मोठ्या प्रमाणावर रसद पोहोंचवून तिकडे वळविणें हाच होता. पण यूरोपीय संकटांत, यूरोपास अमेरिकेनें देऊं केलेल्या मदतीचा पूर्ण उपयोग अल्पावधींत करून घ्यावयाचा तर याबाबत निश्चित पूर्व-योजना तयार केली पाहिजे व तिची तपशीलवार अंमलबजावणी प्रत्यहीं झाली पाहिजे; याकरितां आर्थिक व्यवहाराच्या प्रत्येक अंगाचें मापन, त्याच्या संकोच-विकासाच्या परिमाणाची निश्चिति व प्रत्येक अंगांतील योजना पार पाडण्या-करितां त्या त्या अंगाचें भागशः नियंत्रण हीं क्रमानुसार आलीं. सर्व घटनांचा परिपाक व सर्व योजनांचा हिशेब, यांचा अंदाज पूर्णपणें आधीं बांधतां येईलच असें नाहीं व सर्व योजना शंभर टक्के सर्वांकडून पार पडतील असेंहि नाहीं. याकरितां सर्व सहकारी राष्ट्रांच्या विचारविनिमयानें त्यांत वारंवार फेरबदल करण्याची तरतूद करणेंहि आवश्यक होतें. अशा रीतीनें मार्शल योजनेमुळें आज पश्चिम यूरोपीय अर्थव्यवस्थेचें नियोजन-नियंत्रण हें पूर्वीं केव्हांपेक्षांहि अधिक तपशीलवार, सर्वांगीण व बहुराष्ट्रीय होऊन बसलें आहे. मार्शल-योजना यशस्वी होऊन यूरोपची आर्थिक घडी लवकर स्थिरा-वल्यास कोणत्या पक्षास बळकटी येईल? अर्थव्यवहाराचा पाया अनियंत्रित व्यक्तिसाहसावर असावा या पक्षाच्या पुरस्कर्त्यांस, कीं पूर्वयोजनेनुसार आर्थिक प्रगति समाजहिताच्या दृष्टीनें शासनसंस्थेस घडवून आणतां येते व या उद्दिष्टानें नियंत्रण-नियोजन आवश्यक आहे असें म्हणणाऱ्यांस?

वरील त्रोटक विवेचनावरून असें दिसून येईल कीं, अर्थव्यवहारा-बाबतच्या वादांत यूरोपीय व अमेरिकन गटांत पूर्ण मतैक्य वा एकरूपता नाहीं. अमेरिकेंतील प्रभावी मत अजून बहुतांशीं व्यक्तिसाहसव्यवस्थेचा पुरस्कार करणारें आहे. तर बहुतेक यूरोपीय राष्ट्रांत कडक नियंत्रणें जारी असून स्वतःस समाजवादी म्हणविणारे पक्ष देशादेशांत सत्तारूढ आहेत. निर्भेळ अमेरिकन व्यवस्थेचे पुरस्कर्ते आज पश्चिम–युरोपांत प्रतिगामी गणले जातात. या देशांतील लोकशाह्यांपुढील मुख्य पेंच म्हणजे जुन्या अर्थव्यवस्थेचे पाठीराखे प्रतिगामी पक्ष व दुसऱ्या टोकाचे कम्युनिस्ट यांच्या दरम्यान समाजवादी सरकारचें तारूं कसें हाकारावें हा आहे. मधला मार्ग यशस्वी होण्याची शक्यता बऱ्याच अंशीं, देशाच्या श्रीमंती-गरीबीवर अवलंबून असते. इंग्लंड

व स्कँडिनेव्हियन देश आज बरेच सुस्थितींत आहेत; फ्रान्स, इटली सुधारण्याच्या मार्गावर आहेत अशी आशा तरी धरितां येते; पण ग्रीसमध्यें कोट्यावधी रुपयांची मदत अमेरिकेनें देऊनहि परिस्थिति सांवरण्याचीं चिन्हें निश्चित नाहींत.

जगांतील या घडामोडी लक्षांत धरून स्वदेशांतील परिस्थितीचा कांहींसा तपशिलवार विचार आतां करूं. आपणास स्वराज्य प्राप्त होऊन जवळ जवळ दोन वर्षें झालीं. एवढ्या अवधींत आपला आर्थिक कारभार आपणच पूर्णपणें चालविला आहे व हळूहळू हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणाचें स्वरूपहि सुस्पष्ट झालें आहे. सुरवातीचे कांहीं महिने संक्रमणावस्थेचे समजावयाचे. राज्ययंत्र हातीं घेणाऱ्या पुढाऱ्यांनीं गेलीं अनेक वर्षें वेळीं अवेळीं अनेक घोषणा केलेल्या होत्या व त्यांपैकीं बऱ्याच जणांस सत्तारूढ झाल्यावर घोषित केल्यापैकीं बऱ्याच गोष्टी आपण घडवून आणूं असें वाटत असावें. कांहीं घोषणा राज्यकारभार हातीं आल्यावरहि होत राहिल्या. उदाहरणार्थ, सर्व प्रमुख धंदे सरकारी मालकीचे अल्पावधींत करावे अशी शिफारस करणारा एक काँग्रेस समितीचा अहवाल, मुख्य प्रधानांचे सहीसकट १९४८ च्या सुरवातीस बाहेर पडला. जुन्या घोषणांप्रमाणेंच दुसरा वारसा, लियाकतअल्लीखानांच्या अंदाजपत्रकाचा, नूतन सरकारास पत्करावा लागला. यांतहि नवीन सरकारांतील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा कांहीं भाग होताच; म्हणून त्यांतील अभिप्रेत धोरण चालू राहील अशी सार्वजनिक अपेक्षा उत्पन्न झाली होती. असें असूनहि नवीन सरकारचें बदललेलें आर्थिक धोरण लवकरच प्रकट होऊं लागलें. हें नवीन धोरण तीन प्रकारें प्रकट झालें. पहिली पायरी विनियंत्रणाची; दुसरी राष्ट्रीयीकरण दहा वर्षांनें पुढें ढकललेल्या घोषणेची व तिसरी प्रत्यक्ष उत्पन्नावरील करांचा बोजा कमी करून अप्रत्यक्ष करांची सार्वजनिक वाढ करण्याच्या धोरणाची.

तसें पाहिलें तर विनियंत्रणाच्या धोरणांत इतर सर्वच गोष्टी आल्या. नियोजित अर्थव्यवस्थेचा, नियंत्रण हा आत्मा समजला पाहिजे. योजना कागदावर कितीहि मांडल्या तरी प्रत्यक्षांत उतरविण्यास सरकारी मालकी, सरकारी ताबा अथवा किमान पक्षीं खाजगी व्यवहारावर सर्वांगीण सरकारी नियंत्रण हवें. ज्या सरकारला खाजगी अर्थव्यवहाराचें नियंत्रण करावयाचें नाहीं किंवा करितां येत नाहीं त्याच्या नियोजनाच्या वल्गना पोकळ ठरणारच.

तेव्हां हिंदुस्थानचा पुढील आर्थिक विकास सरकारी योजनेनुसार होणार कीं तो व्यक्तिसाहसावर आधारलेला असणार याचें उत्तर नूतन सरकारनें विनियंत्रणाचें धोरण जाहीर करून एका अर्थी तावडतोब दिलें. विनियंत्रणाचा हा निर्णय अजाणता किंवा घाईनें दिला गेलेला नव्हता. याची नांदी श्री. राजगोपालाचार्य यांनीं १९४६ च्या ऑक्टोबरमध्यें गठित धान्यनियंत्रण परिषदेंत केली होती. तेथपासून सतत सव्वा वर्ष याबद्दल वाद सुरू होता. परंतु एका अर्थी सुरवातीपासूनच ही गोष्ट वादातीत होती असेंहि म्हणतां येईल. नियंत्रणाच्या बाजूचे सर्व दुर्बल होते. कांहीं अर्थशास्त्रज्ञ व सरकारी अधिकारी यांचा मुख्यत्वेंकरून विनियंत्रणास विरोध होता. तसेंच महाराष्ट्रासारख्या कांहीं गैरमहत्त्वाच्या भागांतील जनमतहि बरेंचसें नियंत्रणास अनुकूल होतें. कारखानदारांपैकीं कांहीं विशेष दूरदर्शी व जुन्या वळणाचे, विनियंत्रणाचे परिणाम फारसे बरे होणार नाहींत, असें सौम्यपणें सुचवीत होते. उलट पक्षीं बहुतेक सर्व कारखानदार व व्यापारी वर्ग विनियंत्रणाच्या मोहिमेच्या आघाडीवर होता व आजच्या सत्तारूढ पक्षांतील प्रमुख पुढारी जनतेनें विनियंत्रणाच्या बाजूनें कौल द्यावा असा उघड प्रचार करीत होते. विनियंत्रण झालें त्याहून लवकर तें घडून न येण्याचें कारण एकच; तें म्हणजे १९४७ पावेतों मंत्रिमंडळांत असलेले मुस्लिम लीग सदस्य. यांची अडचण दूर झाल्याबरोबर विनियंत्रण लवकरच होणार हें भाविष्य करण्यास ज्योतिषाची आवश्यकता नव्हती. विनियंत्रण झालें तें घाईनें किंवा भिडेनें झालें हें म्हणणें पूर्णपणें चुकीचें आहे. तें बुद्धिपुरःसर करण्यांत आलें व एका विशिष्ट कारखानदार—व्यापारी गटाचा प्रभाव राजकारणावर पडल्यामुळें तें घडून आलें.

विनियंत्रण ही प्रचलित हिंदी आर्थिक धोरणाची प्रकृति समजली पाहिजे. नियंत्रण ही विकृति ही गोष्ट गेले सालीं पुनर्नियंत्रणाचा स्वीकार ज्या प्रकारें झाला त्यावरून स्पष्ट होते. पुनर्नियंत्रण स्वीकारलें तें आपद्धर्म म्हणून. तात्कालिक परिस्थिति विकोपास गेली म्हणून कांहीं नियंत्रणें युद्धकालांतल्याप्रमाणें पुन्हां लादलीं. पण त्या वेळेस हीं शक्य तेवढ्या लवकर काढण्यांत येतील अशाहि घोषणा करण्यांत आल्या.

राष्ट्रीयीकरणाची पीछेहाट नियंत्रणाच्या मागोमाग ओघानेंच आली. ज्या सरकारला अर्थव्यवहार नियंत्रित करणें अशक्य वा अनिष्ट वाटतें, तें

सरकार प्रमुख धंदे आपल्या ताब्यांत घेऊन चालविणार कसें? राष्ट्रीयीकरण करावयाचें नाहीं याचा अर्थ उद्योगधंद्यांची सर्व वाढ खाजगी व्यक्ति व मंडळ्या यांस करूं द्यावयाची अगर यांच्या द्वारें करवावयाची; व या मूळ कल्पनेस अनुरूप असें सर्व आर्थिक धोरण आंखावयाचें. देशाची आर्थिक प्रगति घडवून आणण्याकरितां व्यक्तिसाहसास व खाजगी व्यवहारास संपूर्ण वाव देणें हा नवीन धोरणाचा विशेष समजला पाहिजे. हिंदुस्थान सरकारास देशाची आर्थिक प्रगति थोड्या काळांत पुष्कळ घडवून आणाव-याची आहे व याकरितां सरकारच्या योजनाहि अनेक आहेत. सरकारचें हें उद्दिष्ट, व या योजना व नवीन आर्थिक धोरण यांचा मेळ कितपत घालतां येईल? प्रत्यक्ष सरकारी हुकमतीखालीं किंवा नियंत्रणाखालीं नसली तरी खाजगी भांडवलदारांच्या करवीं एखादी सरकारी योजना पार पाडणें अशक्य नाहीं. किंबहुना असें करण्याचाच सरकारचा मानस असावा. तेव्हां सरकारी योजना व खाजगी व्यवहार यांची सांगड घालणें कसें व कितपत शक्य आहे याकडे आतां लक्ष देऊं.

सरकारी सर्वांगीण नियंत्रण कडक ठेवल्यास कोणतीहि सरकारी योजना खाजगी कारखानदार व व्यापारी यांमार्फत पार पाडतां येते असा नाझी जर्मनींतील अनुभव आहे. नाझी राजवटींत उद्योग अगर व्यापार सरकारी मालकीचे केल्याशिवाय मोठमोठ्या योजना केवळ सरकारी नियंत्रणा-नुसार घडवून आणल्या. पण हें नियंत्रण फार सूक्ष्म योजनापूर्वक केलेलें होतें आणि त्याची अंमलबजावणी फार कसोशीनें व करडेपणानें होत होती. नाझी राजवटीचें आर्थिक धोरण हिंदुस्थानांत अंमलांत आणणें तत्त्वतः अशक्य नाहीं. पण त्यास लागणारा विचार किंवा निश्चय हीं आपल्या सरकारजवळ नाहींत, हें विनियंत्रणाचे वेळेस उघड झालें. औद्योगिक विकासाच्या योजना मांडतांना राष्ट्रीय उत्पन्नाचा हिशेब काळजीपूर्वक काढावा लागतो. प्रत्येक व्यवसायांतील उत्पादनाचे व वट्ट उत्पन्नाचे इष्टांक ठरवून त्यांची विभागणी सर्व दृष्टीनें विचार करून करावी लागते. प्राथमिक विभागणी, चालू उपभोग्य वस्तूंचें उत्पादन किती करावयाचें व भांडवली उत्पादक वस्तूंचें उत्पादन किती करावयाचें याबाबतची असते. तपशिलवार महत्त्वाची विभागणी म्हणजे चालू उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाचा कोणता वांटा समाजां-तील निरनिराळ्या वर्गांस प्राप्त करून द्यावयाचा याबाबतची. हे सर्व इष्टांक स्थूलमानानें गोळाबेरजेवरून ठरवावयाचे नसून प्रत्येक महत्त्वाच्या वस्तूंचीं

किंमत व हरतऱ्हेचें व्याज, भाडें, मजुरी इत्यादिकांचे दर यांचा हिशोब जमेस धरून काढावयाचे असतात. असें केलें असतां कोणत्याहि योजनेच्या पोटीं सर्व महत्त्वाच्या किंमतींची व दरांची निश्चिती साहजिकच येते. नाझी राजवटींतील नियोजन–नियंत्रण या स्वरूपाचें होतें. मजुरीचे किमान व कमाल दर या राजवटीनें ठरविले तर त्याबरोबरच मजुरांच्या राहणीच्या मानाचे सूचकांक यत्किंचितहि न वाढतील याची खबरदारी घेतली. फार मोठ्या प्रमाणावर युद्धाची तयारी व कांहीं वर्षें प्रत्यक्ष युद्ध करूनहि आवश्यक उपभोग्य वस्तूंच्या किंमती नाझींनीं फार कौशल्यानें स्थिरावल्या. असें करतांना कारखानदारांच्या फायद्याला अनेकदां कात्री बसली, त्यांना आपली उत्पादनक्षमता सारखी वाढवावी लागली. ही वाढवूनहि वेळेस तोटे आले; पण या योजनेच्या यशस्वितेकडे पाहून त्यांच्या ओरडीकडे नाझी राजवटीनें कधीं लक्ष दिलें नाहीं. युद्धकाळांतील इंग्लंड, अमेरिका, कॅनडा वगैरे देशांतील अनुभवहि हाच होता. सरकारी योजनेनुसार उत्पादनाची वाढ करावयाची तर मजुरीचे दर, राहणीचें मान व निरनिराळ्या अवस्थेंतील वस्तूंच्या किंमती यांचे अन्योन्य संबंध निश्चित करून ते हरतऱ्हेनें कायम राखणें अत्यावश्यक असतें. मजूरवर्ग आणि कारखानदार व व्यापारी या दोन्ही पक्षांच्या मागण्या काबूत ठेवतां न आल्या तर हें नियंत्रण अशक्य होतें.

हिंदुस्थानांतील युद्धकालीन सरकारास कारखानदार–व्यापाऱ्यांना दुखविणें शक्य नव्हतें. यामुळें युद्धकाळीं ठरलेल्या अनेक प्रकारच्या मालांच्या किंमतींत भांडवली नफ्याची कूस सुरुवातीसच बेसुमार ठेवली गेली. सुरुवातीच्या बऱ्याच किंमती १९४३–४४ सालांत ठरल्या गेल्या. १९४६ साल पावेतों मजूरीचे दर व इतर किंमती चढल्यामुळें अनेक धंद्यांत फायदा थोडाबहुत घटला. आणि या सुमारास किंमती वाढवून मिळण्याची मागणी होऊं लागली. आर्थिक नियंत्रणांत किंमती ठरविणें ही बाब फार महत्त्वाची तशीच ती गुंतागुंतीची व निर्भीडपणें करावी लागण्याची. याकरितां निराळें भावनियंत्रण मंडळ नेमून तीं करून घेण्याचा १९४७ चे सुरुवातीस प्रयत्न करण्यांत आला. मुख्यतः कॉंग्रेस पक्षाच्या धुरीणांच्या आर्थिक धोरणामुळें तो अयशस्वी झाला आणि हिंदुस्थान सरकारला कारखानदार-व्यापारी यांच्या किफायतीवर नियंत्रण ठेवणें अशक्य आहे हें निर्विवाद ठरलें. कोळसा, लोखंड–पोलाद, सीमेंट इत्यादि मूलभूत उत्पादन-सहाय्यक वस्तूंच्या किंमती नियंत्रित असूनहि फाजील वाढविल्या. कापडाच्या किंमतीवरील नियंत्रणहि असेंच ढिलें ठेवलें.

मजुरी, कारखानदारांचा नफा व पदार्थांच्या किंमती यांचें सम प्रमाण टिकलें नाहीं व नियंत्रण पद्धतीचा बोजवारा व दुर्लौकिक झाला.

किंमतींत वाढावा करण्याच्या उत्पादकांच्या नित्य मागणीस नकार देण्याचें मनोधैर्य सरकारांत नसलें म्हणजे किंमतींची उतरंड ढासळून अर्थ-व्यवहारांत घोटाळे माजण्यास वेळ लागत नाहीं, हा हिंदुस्थानांतील ताजा अनुभव आहे. केवळ किंमतींचें नियंत्रण करूनहि आर्थिक योजना यशस्वी होतात असें नाहीं. अनेक प्रसंगीं कोणत्या किंमतीस वस्तू विकावयाच्या अगर मजुरीचे कोणते दर असावयाचे, याबरोबर कोणत्या तऱ्हेच्या वस्तूंचें उत्पादन कोणीं करावयाचें, कोणत्या कसबाचे किती कामकरी कोणत्या व्यवसायांत जावयाचे याहि गोष्टी तपशीलांत ठरवाव्या लागतात. इतर देशांच्या युद्धकालीन नियोजन–नियंत्रणांत हें नित्य परिचयाचें झालें होतें. आपल्या देशांतील याबाबतचा अलीकडील अनुभवहि अनेक दृष्टींनीं उद्बोधक आहे. सार्वजनिक जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा कमी पडूं लागला व त्यांचें उत्पादन ताबडतोबीनें वाढविणें शक्य नसलें म्हणजे त्यांच्या किंमतींचें व वांटपाचें नियंत्रण करावें लागतें. वस्तु विशेष महत्त्वाची अगर तुटवडा फार असल्यास त्या वस्तूच्या उत्पादनाचेंहि नियंत्रण करण्याची पाळी येते. कापडाबाबत अशी पाळी १९४२ सालच्या पुढें सारखी आलेली होती, ही गोष्ट हिंदुस्थान सरकारनें वेळोवेळीं मान्य केलेली आहे. सर्व कापड सरकारनें नियंत्रित किंमतीस विकत घ्यावयाचें ठरविल्यानंतर कोणत्या प्रकारचें, कोणत्या दर्जाचें व किती कापड गिरण्यांनीं काढावें हें ठरविणें क्रमप्राप्त होतें. किंबहुना असें केल्याखेरीज उत्पादन, अनावश्यक कापडाचें आणि शिवाय फाजील खर्चाचें, होतें ही गोष्ट पदोपदीं भासत होती. उत्पादित कापडांच्या तऱ्हांची संख्या मर्यादित करून, प्रत्येक गिरणीस विशिष्ट तऱ्हांचें उत्पादन करावयास भाग पाडून प्रत्येकाच्या कार्यक्षमतेचा उच्चांक गांठण्याचा प्रयत्न करावा याला कारखानदार प्रतिनिधींहि तत्त्वतः संमति देत होते. पण प्रत्यक्षांत या दिशेनें एक पाऊलहि आजवर पुढें पडूं शकलें नाहीं. समित्या व योजना अनेक झाल्या पण त्या सगळ्या वांझोट्या. कापडाच्या उत्पादनांत जितका गैरशिस्तपणा व अप्रमाणिकपणा आज चालू आहे तितका इतरत्र क्वचित्च सांपडेल. यांचें कारण नियंत्रण, भाव ठरविणें वगैरे सर्व बाबींची शेंडी खुद्द उत्पादकांचे हातींच ठेवण्यांत आली. कारखानदारांच्या इच्छेविरुद्ध वागण्याची सरकारची छाती नाहीं; वेळेस तसें करण्याचा आव आणल्यास

कारखानदार दोन पोकळ धमक्या देऊन तो ताबडतोड उतरवितात. या इतिहासाचा परिपाक आज असा झाला कीं, उत्पादनक्षमता वाढविण्यास ज्यांनीं मोठा नफा मिळत असतां कांहीं प्रयत्न केला नाहीं अशा गिरण्या आज ' आम्ही तोट्यांत आहोंत ' म्हणून ओरड करून उत्पादन थांबविण्याच्या धमक्या देत आहेत. अशा धमक्या दिल्या म्हणजे सरकार आपणांस तूट भरून देण्याचें आश्वासन देईल अशी त्यांची अपेक्षा असावी व ती खरी ठरल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

वरील विवेचनाचा सारांश असा: आर्थिक विकासाची कोणतीहि योजना अनेकांगी असते व तिच्या निरनिराळ्या अंगांचा परस्परांशीं निकट व प्रमाणबद्ध संबंध असतो. आर्थिक प्रगतीची मोहीम यशस्वी व्हावयाची तर तिची चाल ठराविक दिशांनीं, ठराविक मजलांनीं ठराविक वेळांत झाली पाहिजे. सरकारनियंत्रित आर्थिक योजनांतहि सर्व दिशांनीं अपेक्षित प्रगति होतेच असें नाहीं. पण तेथें बदललेल्या परिस्थितींत मोहिमेच्या योजनेंत इष्टावश्यक बदल करण्यास कोणीतरी जबाबदार सरसेनानी असतो. खाजगी व्यवहाराचें असें नाहीं. त्यास शिस्तवार फौजेपेक्षां अनेक एकांडे शिलेदार व कांहीं स्वतंत्र पथकें अशांच्या संमिश्र जमावाची उपमा अधिक शोभेल. वारा कसाहि सुटला व लाटा कशाहि आल्या तरी एका निश्चित स्थलाप्रत जाऊं पाहणाऱ्या नौकेसारखी नियंत्रित नियोजन-व्यवस्था मानली तर फायद्याच्या विलोभनाच्या दरेक झुळकीबरोबर निरनिराळ्या दिशेनें वळण घेणाऱ्या तारवासारखी व्यक्तिसाहसावर आधारलेली अर्थव्यवस्था असते. तात्कालिक फायद्याच्या जेवढ्या गोष्टी सरकारी योजनेंत बसत असतील तेवढ्याच खाजगी व्यक्ति घडवून आणतील; इतरांची उपेक्षा करतील. इतकेंच नव्हे तर सरकारी योजनाबाह्य किंवा विरोधी घटना किफायतशीर असल्यास त्याहि घडून येणें हें खाजगी अर्थव्यवस्थेच्या प्रवृत्तीस धरून होईल. मच्छरदाणीच्या कापडांत एखाद्या पैचा अधिक मुनाफा मिळत असल्यास, लोकांना धोतरांची वाण कितीहि भासत असली तरी, धोतरें काढण्याकडे कोणा व्यवहाऱ्याचें लक्ष जाईल अगर जावें ! अधिकतम नफा मिळविणें हा ज्या अर्थव्यवस्थेचा धर्म तेथें त्याविरुद्ध आचरण अपेक्षिणें योग्य नव्हे. खाजगी व्यापारी अगर कारखानदार यांना शिव्याशाप देण्यांत अर्थ नाहीं; त्यांचा धर्म माहीत असूनहि ते निराळें वर्तन करतील या अपेक्षेवर सरकारी आर्थिक धोरण बांधूं पाहणारे मात्र भोळे किंवा त्यापलीकडचे समजले पाहिजेत.

यावर कांहींजण असें म्हणतील कीं हा विचार तात्त्विक दृष्ट्या योग्य असला तरी व्यवहारांत मधला मार्ग काढतां येणें अशक्य नाहीं. आर्थिक नियंत्रण नाझी राजवटीसारखें किंवा पश्चिम यूरोपांतील युद्धकालीन नियंत्रणांसारखें कडक नसलें तरी चालण्यासारखें आहे. कांहीं अप्रत्यक्ष नियंत्रणें व कांहीं प्रत्यक्ष विलोभनें वापरून सरकारी योजना शंभर टक्के नाहीं तरी बहुतांशीं अंमलांत आणतां याव्या, असा कांहींसा प्रयत्न हिंदुस्थान सरकार आजहि करीत आहे; पण तो यशस्वी ठरेल असें वाटत नाहीं. परदेशाहून विशिष्ट प्रकारची यांत्रिक सामुग्री आणण्यास पैसा व परवानगी देणें व इतरांस नाहीं म्हणणें हें सरकार आज करीत आहे. तसेंच कांहीं प्रकारचें उत्पादन उच्च श्रेणीचें समजून त्यास लागणारा माल व वाहतूक यांचा पुरवठा सरकार करतें. पण यांत्रिक सामुग्री आणण्यास परवानगी व हुंडणावळ दिली तरी ती सर्व योग्य रीतीनें वापरून हवी ती सामुग्री येईल असेंच नाहीं; व ती आल्यावरहि तिचा उपयोग सरकारला हवा त्या दिशेनें व हवा त्या पद्धतीनें होईल असेंहि नाहीं. तसेंच सरकारी प्रत्यक्ष मदत देऊं केली तरी त्यामुळें विशिष्ट व्यवहारांचा विकास किंवा संकोच ठराविक प्रमाणांत निश्चित वेळांत होईल याचीहि खात्री नाहीं. तात्कालिक फायद्यांवर हेलकावणाऱ्या व्यवहारांस कोणत्याच प्रकारचा नियम लावतां येत नाहीं. जलद वाहतुकीकरितां उपलब्ध करून दिलेले मालाचे डबे, किंमतीच्या वाढीची अपेक्षा असल्यास, व्यापारी कोठारासारखे वापरून वाहतुकींत घोटाळे उत्पन्न करतात, अशी तक्रार वाहतुक मंत्र्यांनीं एका परिषदेंत केलेली मीं ऐकली आहे. कोळसा, पोलाद, सीमेंट यांचें वांटप सरकारनें विशिष्ट कार्याकरितां म्हणून केलें तरी त्यांचा उपयोग कशाकरितां होईल हें तात्कालिक परिस्थितीवर अवलंबून राहणार. आणि सरकारनें प्रत्यक्ष विलोभनें दाखविलीं तरी त्यांचा उपयोगहि एकंदर बाजारभावावर अवलंबून. कोणत्याहि विलोभनाचें सामर्थ्य तौलनिक दृष्ट्या मापावें लागतें. सरकारला इष्ट वाटत असलेल्या उत्पादन अगर इतर व्यवहारांपेक्षा दुसरा व्यवहार बाजारभावांनीं जास्त किफायतशीर ठरविला तर ही परिस्थिति कायम राहीपावेतों सरकारनें देऊं केलेली मदत फोल ठरेल.

आपल्या देशांतील अलीकडील परिस्थिति अपवादात्मक मानली तरी अप्रत्यक्ष नियंत्रण व अल्प मदत यांचे आधारावर सरकारी योजना कितपत यशस्वी होऊं शकते याचा इतर देशांतील अनुभव ग्राह्य मानला पाहिजे.

१९३० सालानंतरच्या मंदीच्या दिवसांत इंग्लंड व स्कॉटलंडमधील कांहीं उद्योगधंद्यांस विशेष हलाखीचे दिवस आले व हे धंदे जेथें केंद्रित होते त्या भागांतील एकंदर आर्थिक स्थिति फार खालावली. अशा निकृष्ट भागांस ऊर्जितावस्थेस आणण्याकरितां सरकारनें कांहीं योजना आंखल्या व त्या अंमलांत आणल्या जाव्या म्हणून कांहीं अप्रत्यक्ष नियंत्रणें व अल्पशी प्रत्यक्ष मदत यांचा अवलंब केला. त्यावेळचें ब्रिटिश सरकार हुजूर पक्षीय असल्यामुळें याहून प्रभावी आर्थिक धोरणाचें त्यास वावडें होतें. एक दोन ठिकाणीं या योजना अंशत: यशस्वी झाल्या; पण इतरत्र त्यांचा उपयोग झाला नाहीं. योजनाप्रसिद्धीनंतरच्या काळांत जेवढ्या बाबी खाजगी व्यक्ति अगर मंडळ्या यांस किफायतशीर वाटल्या तेवढ्या घडून आल्या; इतर तशाच राहिल्या.

एवंच सरकारी योजनेनुसार आर्थिक विकास घडवून आणावयाचा तर फार मोठें आर्थिक क्षेत्र सरकारच्या प्रत्यक्ष ताब्यांतलें तरी हवें किंवा सरकारच्या कडक नियंत्रणाखालील हवें. प्रमुख उद्योगधंदे सरकारच्या मालकीचे करावयाचे नाहींत अशी घोषणा झाल्यामुळें हिंदुस्थान सरकारच्या प्रत्यक्ष ताब्यांत मोठें आर्थिक क्षेत्र येण्याचा संभव दुरावला आहे. आपलें कोणतेंहि धोरण नियंत्रणाच्या सहाय्यानें खाजगी व्यक्तींकडून घडवून आणण्याची इच्छा अगर शक्ति आजच्या हिंदुस्थान सरकारास नाहीं हेंहि उघड आहे. विनियंत्रणाचें एकंदर धोरण स्वीकारलें असल्यामुळें भोग्य वस्तूंचें उत्पादन, वांटप व किंमती यांचें नियंत्रणहि सरकार करणार नाहीं. याचा अर्थ मुख्यत: कांहीं कारखानदार व व्यापारी यांच्या उत्पादनावर व किफायतीवर प्रत्यक्ष नियंत्रण सरकार ठेवणार नाहीं. इतर नियंत्रणांच्याबाबत हिंदी धनिकांचा पक्ष अतिरेकी नाहीं. आपण उत्पादन करीत असलेल्या वस्तूंच्या किंमतींवर अगर वांटपावर सरकारनें नियंत्रण ठेवूं नये असा त्यांचा आग्रह आहे; परंतु उत्पादनास लागणाऱ्या यंत्रसाहित्यापासून सर्व गोष्टी मिळवून देणें, मालाची वाहतुक सुकर व स्वस्त करणें आणि स्वदेशीची बाजारपेठ, आवश्यक तर गिऱ्हाइकांवर जादा बोजे लादूनहि आपणांकरितां सुरक्षित ठेवणें, हीं सर्व सरकारी विहित कर्तव्यें ते समजतात. म्हणून आर्थिक विकासाच्या योजना सरकारनें कांहीं आंखल्या तर सरकारी मदतीनें व स्वत:च्या मालकी हक्कानें त्या पार पाडण्याची त्यांनीं तयारी दर्शविली आहे. आजहि सर्व भोग्य, विशेषत: जीवनावश्यक वस्तूंखेरीज इतर भाव व वांटप यांचें नियंत्रण त्यांस हवें आहे.

मध्यंतरीं खुले आयात परवाने सरकारनें दिल्यामुळें बाजारांत किती गडबड उडाली व सरकारवर अनेक व्यापारी कसे रुष्ट झाले हें सर्वांच्या स्मरणांत असेलच.

यावर असें म्हणतां येईल कीं व्यक्तिसाहसावर आर्थिक प्रगति सोंपविल्यावर ती सरकारी योजनेप्रमाणेंच घडून न आली तर काय बिघडलें? एकंदर राष्ट्राची संपत्ति व उत्पादन वाढूं लागलें म्हणजे आर्थिक प्रगति विशिष्ट दिशेनें विशिष्ट प्रमाणांत झाली अगर न झाली तर विषाद मानण्याचें कारण नाहीं. ज्ञानी माणसासहि भविष्याचा अचूक अंदाज करितां येत नाहीं म्हणून योजनेविना यदृच्छया घडून आलेली प्रगतीच खरी हितावह व शाश्वत ठरते, हा पक्ष नवीन नाहीं; यूरोपीय अर्थशास्त्रज्ञांचा हा सनातन वाद आहे व व्यक्तिसाहसवाद्यांस तो अर्थातच पूर्णपणें मान्य नाहीं. हिंदी भांडवलवाले, फक्त परराष्ट्रीय स्पर्धा खुली ठेवूं नये एवढी मुरड घालून याच मताचा पुरस्कार करीत असत. हिंदी राजकीय पुढाऱ्यांच्या आजवरच्या घोषणा भिन्न धोरणाच्या होत्या; पण राज्ययंत्राची जबाबदारी अंगावर पडल्यावर त्यांस आपलीं मतें बदलावीं लागलीं असावीं.

प्रत्यक्ष या वादाबद्दल असें मला कांहींच म्हणावयाचें नाहीं. पण व्यक्तिसाहसावर आर्थिक प्रगतीची मदार ठेवली तर त्याच्या पाठोपाठ इतर कोणत्या गोष्टी येतात या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणें शक्य नाहीं. या प्रश्नाचें उत्तर देण्यास मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या करयोजनेंतील नवीन उपक्रमांनीं सूचक सुरुवात केली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आर्थिक विकासाचा आरंभ भांडवल गुंतविण्यापासून होतो. व्यक्तिसाहसानें आर्थिक प्रगति घडून येण्यास साहसी व्यक्तीस शिलकी भांडवल व तें किफायतशीर रीतीनें गुंतविण्याचे मार्ग हीं दोन्ही उपलब्ध हवींत; त्यांचे अभावीं सर्व प्रगति खचित खुंटणार. सरकारी करांच्या बोजाखालीं आमचा धनिकवर्ग इतका दडपला गेला आहे कीं अलीकडे त्याजजवळ गुंतवावयास उर्वरित पैसा नाहीं; व सरकारी नियंत्रणें आणि घोषणा, निर्बंध व कर यांचेमुळें उद्योगधंदे इतके खालावले व खचले आहेत कीं असलेला थोडाबहुत पैसा कोणत्याहि दीर्घकालीन योजनांत घालण्यास त्यांजला उत्साह उरलेला नाहीं. अशी बिकट परिस्थिति असल्याचें करुण निवेदन सर्व उद्योगपति आज दीड–दोन वर्षें वेळीं अवेळीं करीत आहेत. राजकारणपटूंस यांत तथ्यांश आहे असें पटलें असावें म्हणून ते, आम्हीं तुमच्या भांडवलास निदान दहा वर्षें तरी हात लावणार नाहीं असें सारखें

कळकळीचें आश्वासन देत असतात. पण केवळ आश्वासनांनीं भांडवलवाल्यांचें समाधान होईना. तेव्हां आतां भांडवलवाल्यांस पटण्यासारखी कांहीं प्रत्यक्ष कृति करण्यास ते उद्युक्त झाले असावे. ही कृति म्हणजे श्रीमंतांवरील व उद्योगमंडळयांवरील प्रत्यक्ष करांचा बोजा कमी करणें व नवीन उद्योगधंदे काढण्यास व चालविण्यास खास सवलती देणें.

व्यक्तिगत व उद्योगमंडळयांवरील करांचा प्रश्न विशेष बिकट होण्यास लियाकत अलीखानांचें अंदाजपत्रक कारणीभूत झालें; व आजच्या बऱ्याचशा घोटाळयांच्या बुडाशीं हेंच अंदाजपत्रक आहे. हिंदी धनिकवर्ग मूठभर लोकांचा आहे, त्याचे हातीं अवास्तव पैसा व अधिकार सांचला आहे, असें सांगून या वर्गाची आर्थिक सत्ता कमी करण्याच्या स्पष्ट व उघड इराद्यानुसार या अंदाजपत्रकाची रचना झाली. या अंदाजपत्रकास इतर कोणींहि विरोध केला असला तरी आजचे हिंदुस्थानचे मुख्य प्रधान व अर्थमंत्री या दोहोंचाहि त्यास पाठिंबा होता, अशी दिल्लीस त्या वेळेस वंदता होती. या अंदाजपत्रकाचे दूरगामी परिणाम होणार हें त्या वेळेसहि कळण्यासारखें होतें. धनिकांवर व मोठ्या धंद्यांवर अधिकाधिक कर लादले म्हणजे आजचे धंदे हळूहळू सरकारी मालकीचे करणें व आर्थिक विकासाच्या नवीन योजना बहुतांशीं सरकारमार्फत करणें हें ओघानें घडणारच. मार्च १९४७ मध्यें कॉंग्रेस पक्षाच्या कार्यक्रमांत उद्योगधंद्यांच्या सत्वर राष्ट्रीयीकरणाचा समावेश असल्यानें लियाकत अलींचें अंदाजपत्रक व कॉंग्रेस पक्षाचा आर्थिक कार्यक्रम यांचा तत्त्वतः विरोध आहे असें मानण्याचें कारण नव्हतें. पण आतां कार्यक्रम बदलल्यामुळें त्या अंदाजपत्रकानुसार केल्या गेलेल्या गोष्टींची अडचण भासूं लागली आहे. खासगी व्यक्तींकरवीं उद्योगधंदे वाढीस लावावयाचे तर त्यांस तसें करण्यास कांहीं वाव व विलोभन दिलें पाहिजे. हल्लींच्या करपद्धतीमुळें तसा वाव कर चुकविल्याखेरीज मिळत नाहीं आणि कर चुकवूनहि सांचलेला पैसा उघडपणें उद्योगधंद्यांत गुंतविण्यास तांत्रिक अडचणी अनेक येतात. ही कोंडी फोडण्याचा एक उपाय म्हणजे धनिकांवर व मोठ्या धंद्यांवर असलेला प्रत्यक्ष करांचा बोजा कमी करणें. करयोजनेंतील नवीन दृष्टि ही एकंदर नवीन धोरणांतच कशी अंगभूत आहे हें आतां कळून येईल.

विनियंत्रण, राष्ट्रीयीकरण न करण्याची घोषणा व धनिकांवरील कर कमी करणें या सर्व गोष्टी एका सूत्रांत गोंवलेल्या आहेत. हें सूत्र म्हणजे हेतुपूर्वक आर्थिक नियोजन करण्याकरितां अर्थव्यवहाराचें मोठें क्षेत्र सरकारी

मालकी अगर नियंत्रण याखालीं न आणतां, भविष्यांतील भिस्त बहुतांशीं खाजगी व्यवहारावर टाकावयाची. हें सूत्र व त्याचे पुढील धागेदोरे यांची आज सर्वांस नीटशी कल्पना आहे असें म्हणवत नाहीं. परंतु हें नवीन धोरण फारसें लोकप्रिय दिसत नाहीं; त्यांतल्या त्यांत करपद्धतीवरील त्याचे परिणाम हे अनिष्ट आहेत अशी सुप्त भावना जिकडे तिकडे दिसते. विनियंत्रणास सर्व थरांतील व्यक्तींचा पाठिंबा मिळूं शकतो व धंद्यांचें राष्ट्रीयीकरण केलें पाहिजे या मताचा आपल्या देशांत अजून फारसा प्रचार झालेला नाहीं. पण सरकारी आर्थिक धोरणाचा परिणाम श्रीमंतांवरील प्रत्यक्ष कर कमी करून गरिबांच्यावर पडणाऱ्या अप्रत्यक्ष करांच्या वाढींत झाला म्हणजे मात्र कांहींतरी खचित चुकतें असें बहुजनांस वाटूं लागतें. असो! आपणांस विचार करावयाचा तो तात्कालिक लोकमताचा नव्हे तर शाश्वत राष्ट्रहिताचा. याकरितां हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणाचा एका निराळ्या भूमिकेवरून विचार केला पाहिजे. ही भूमिका म्हणजे गरीब राष्ट्रास अनुरूप असणाऱ्या आर्थिक धोरणाची.

जसें व्यक्तींस तसें राष्ट्रांसहि दारिद्र्य पदोपदीं नाडतें. गरिबी जितकी अधिक, तितक्या अतृप्त आकांक्षा अधिक; पण त्या पुऱ्या करण्याचें सामर्थ्य व्यस्त प्रमाणांत. गरीब देशाच्या आर्थिक विकास–योजनेच्या मार्गांतील मुख्य अडचणी खालीलप्रमाणें आहेत: देश गरीब याचा अर्थ लोकसंख्येच्या मानानें वार्षिक उत्पादन कमी आणि सार्वजनिक राहणीचें मान निकृष्ट; त्यांतल्या त्यांत मजूर, शेतकरी इ. वर्गांची राहणी फार हलाखीची. असें असल्यामुळें राहणीचें मान वाढविणें हें आर्थिक योजनेचें एक प्रमुख उद्दिष्ट साहजिकच ठरतें. गरिबांच्या राहणीचें मान दोन प्रकारें वाढवितां येतें. एक राष्ट्रीय उत्पादन वाढवून व दुसरें सार्वदेशीय उत्पन्नाची वर्गावर्गांतील वांटणी जास्त सम करून. पहिला मार्ग शाश्वत व दूरदृष्ट्या खरा महत्त्वाचा. परंतु त्याचे परिणाम दिसूं लागण्यास बराच कालावधि लागण्याचा संभव असतो. याकरितां दुसऱ्या मार्गाचा अवलंब करणें आवश्यक असतें. हा मार्ग अवलंबण्याचे दोन मुख्य प्रकार; एक किंमतींचें योग्य नियंत्रण करून शेतकरी व मजूर यांस राष्ट्रीय उत्पन्नाचा भाग पूर्वीपेक्षां अधिक मिळवून देण्याचा प्रयत्न करणें व दुसरा गरिबांच्या आर्थिक अडचणी अंशतः भागविण्याकरितां, आजारपण, बेकारी, वृद्धावस्था इत्यादि प्रसंगीं सरकारी खर्चानें सार्वजनिक मदतीची तरतूद करणें.

आर्थिक विकासयोजनेचें अंतिम उद्दिष्ट देश संपन्न व बलवान् करणें

असल्यामुळें त्यांत राष्ट्रीय उत्पादन वाढविणें व गरिबांच्या राहणीचें मान वाढविणें यांचा सारखाच समावेश होतो. पण ही गोष्ट अंतिम ध्येयाची झाली. आर्थिक विकासयोजनेच्या सुरवातीपासूनच गरिबांच्या राहणीचें मान वाढतें अगर वाढूं शकतें असें नाहीं. किंबहुना एका अर्थी आर्थिक विकास-योजनेची शीघ्र प्रगति व गरिबांच्या राहणीचें मान तावडतोब वाढविणें या गोष्टी गरीब देशांत परस्परविरोधी भासतात. देश गरीब असण्याचीं कारणें सगळीकडे सारखींच नसतात. निसर्गसंपत्ति थोडी, लोकसंख्या फार, भांडवली साधनें कमी, आधुनिक तज्ज्ञ कामगारांचा अभाव यांपैकीं एक किंवा अनेक कारणांमुळें देश गरीब असतात वा राहतात. पण बहुतेक सर्व गरीब देशांत भांडवली साधनें व तज्ज्ञपणा यांचा अभाव विशेष भासतो. अलीकडील शास्त्रीय प्रगतीमुळें जवळजवळ सर्वत्र भांडवल गुंतविण्यामुळें, म्हणजे मुख्यत्वें करून आधुनिक यांत्रिक साधनें उपयोगांत आणूं लागल्यानें, उत्पादन झपाट्यानें वाढूं शकतें.

पण भांडवल गुंतविण्याकरितां तें उपलब्ध झालें पाहिजे. नवीन भांडवल तीन मार्गांनीं उपलब्ध होऊं शकतें. लूट, कर्ज व बचत. पहिला मार्ग संमत मानला तरी दुबळ्या देशांचे दृष्टीनें व्यवहार्य नाहीं. तेव्हां आर्थिक विकास-योजनेचा पाया कर्जाऊ भांडवल मिळवून किंवा राष्ट्रांतील बचत वाढवून उभारावा लागतो. अलीकडील कोणत्याच योजनेंत यांपैकीं केवळ एकाच मार्गाचा अवलंब केलेला आढळत नाहीं. प्रगति लवकर घडविण्याकरितां सर्वच देश कर्जाऊ भांडवल मिळविण्याचा प्रयत्न करतात. पण आज जगांत धनको अत्यल्प व ऋणको बहुसंख्य असल्यामुळें भांडवल परदेशांतून सहज किंवा पुष्कळ मिळण्याचा संभव कमी. तेव्हां आर्थिक विकासयोजनेकरितां स्वदेशींहि भांडवल बरेंच उभारावें लागतें. राष्ट्रीय बचत करणें किंवा भांडवल उभारणें याचा खरा अर्थ बऱ्याच जणांस माहित नसतो. आर्थिक प्रगतीसाठीं भांडवली खर्च करणें म्हणजे चालू उत्पादनापैकीं बराच भाग भोग्य वस्तूंचे ऐवजीं उत्पादक भांडवली वस्तूंच्या निर्मितीसाठीं योजणें हा आहे. गरिबी नडते ती मुख्यत्वें येथें. बहुजनसमाजास आवश्यक अशा अन्नवस्त्रादि वस्तूंचा किमान पुरवठा असल्याशिवाय जनतेच्या राहणीचें मान किमान दर्जाचें ठेवतां येत नाहीं. परंतु गरीब देशानें मोठ्या प्रमाणावर बचत करावयाची तर एवढा किमान पुरवठाहि करणें दुरापास्त होतें. अमेरिकेसारख्या संपन्न देशांत मोठ्या युद्धाचा खर्च चालविला तरी थोड्या गैरसोयी व कांहीं चैनींचा

त्याग, याहून अधिक परिणाम एकंदर जनतेवर झाला नाहीं. इंग्लंडमध्यें युद्धकालीं व युद्धोत्तरकालीं श्रीमंत व मध्यम वर्गास आपल्या राहणीच्या दृष्टीनें फार मोठा त्याग करावा लागला; पण बहुजनसमाजाची राहणी युद्ध-कालांतहि फारशी खालावली नाहीं. आपल्याकडे श्रीमंत व मध्यम वर्गाची राहणी उतरवूनहि भागेलच असें नाहीं. आपणांवर गरीब वर्ग धरून सर्वांचेंच पोट बांधण्याची पाळी आहे. पण ज्याचें पोट आधींच खपाटीस गेलेलें आहे त्याचें आणखी बांधणार तरी किती. राहणीचें मान वाढविणें व भांडवली बचत करणें यांमधील सुरवातीचा विरोध हा असा बिकट आहे.

गरीब देशांच्या आर्थिक विकासयोजनेंतील दुसरी अडचण योजना कोणातर्फे व कशी घडवून आणावयाची याबाबतची आहे. यांतील पर्याय स्थूलमानानें दोनच. विकासयोजना सरकारी मानणें किंवा ती खाजगी व्यक्ति व मंडळ्यांवर सोंपविणें. योजना सरकारमार्फत घडवून आणण्याचे फायदे उघड आहेत. योजनेंतील सर्व परस्परावलंबी अंगें यामुळें नियंत्रित व प्रमाणबद्ध राहूं शकतात. विशेषतः राष्ट्रास पोट बांधण्याचा प्रसंग आला तर त्याचे परिणाम विशिष्ट वर्गावरच घडून न येतां सर्वांस सारखे भासतील व असंतोष आणि वैषम्याची भावना न वाढेल अशी सरकारास खबरदारी घेतां येते व घ्यावी लागते. आर्थिक विकास इष्ट दिशेनें होईल व भोग्य वस्तु आणि उत्पादक वस्तु यांच्या उत्पादनांत नियोजित प्रमाणांत वाढ होईल अशी सरकारला काळजी घेतां येते. इतकेंच नव्हे तर भोग्य वस्तूंचें उत्पादन वाढवावयाचें तें चैनीच्या वस्तूंचें न वाढवितां प्राथमिक गरजा भागवितील अशांचें वाढवावें, व तसें वाढल्यावर त्यांचें वांटप सार्वजनिक व्हावें अशीहि योजना करितां येते. शेवटीं सरकारमार्फत आर्थिक विकासयोजना घडवून आणण्याचा सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे आर्थिक प्रगतीमुळें वाढणारें राष्ट्रिय उत्पन्न हें मुख्यतः सरकारच्या हातांत राहून या वाढत्या श्रीमंतीचा, बचतीच्या वाढत्या कुशीचा फायदा सरकारलाच म्हणचे पर्यायानें सर्व जनतेसच मिळतो. याचे उलट आर्थिक विकासयोजना सरकारमार्फत घडवून आणण्याइतकें सरकार कार्यक्षम नाहीं, सरकारी सेवक सचोटीचे नाहींत व जनता सहकारी नाहीं म्हणून ती सरकारनें हातीं घेणें धोक्याचें आहे असें सांगण्यांत येतें.

व्यक्तिसाहसावरील अवलंबित आर्थिक विकासाचा मार्ग अगदीं भिन्न दिशेनें जातो. सरकारच्या हातीं सर्व कारभार असला म्हणजे भांडवली बचत करणें व

आवश्यक वस्तूंचें उत्पादन व वांटप हीं एकाच योजनेचीं दोन अंगें असतात. खाजगी व्यवहारांत तसें नसतें. व्यक्तिसाहसानें प्रगति घडवून आणण्याकरितां साहसी व्यक्तींच्या हातांत धनसंचय झाला पाहिजे, किंवा धनिकांनीं तो त्यांचे हातीं दिला पाहिजे. जितका हा धनसंचय अधिक तितकें भांडवल गुंतवलें जाण्याचा संभव जास्त; व जितका साहसी व्यक्तींचा नफा अधिक तितका संचय वाढण्याची व त्याअर्थीं उद्योग धडाडीनें करण्याची शक्यता जास्त. खाजगी व्यक्ति अगर मंडळ्या यांचेमार्फत उद्योगधंद्यांची वाढ, त्यांचे हातांत भांडवल बरेंच सांठलें व त्यांस बरीच किफायत झाली म्हणजेच होणार. श्रीमंत देशांत वार्षिक ऐन बचत करण्याची ऐपत बहुसंख्य वर्गांची असूं शकते आणि उद्योगधंद्यांचे वाढीस लागणारा भांडवलाचा पुरवठा खाजगी व्यक्तींमार्फत होण्यास संपत्तीची फार विषम वांटणी असावीच लागते असें नाहीं. गरीब देशांत बहुसंख्य लोक भिकारी व मूठभर लोक फार मातबर असल्याखेरीज व्यक्तिसाहसावर आधारलेली अर्थव्यवस्था चालणें शक्य नाहीं. संपत्तीच्या पुरवठ्याबाबत नव्हे तर धान्यपुरवठ्याबाबतहि हाच नियम लागू पडतो. पिढ्यान्‌पिढ्या निकृष्टावस्थेंत असलेल्या शेतकऱ्यानें थोडें डोकें वर काढल्याबरोबर निर्यातीस पूर्वीं उपलब्ध असलेलें धान्य खावटींत जिरतें असा अनेक देशांचा अनुभव आहे.

गरीब देशांत भांडवल सांठविण्याचे दोनच मार्ग. सर्वांस जवळजवळ सारख्या राहणीच्या मानावर आणून सक्तीनें सार्वदेशीय बचत करणें व दुसरा बहुजनसमाजास विशेष निकृष्टावस्थेंत ठेवून मूठभर लोकांचे हातांतील धनसंचय व सत्ता सारखीं वाढतील अशी तरतूद करणें. पहिला मार्ग रशियानें चोखाळला आहे; दुसरा हिंदुस्थान चोखाळूं पाहात आहे. दुसऱ्या मार्गांत संपत्तीची व उत्पन्नाची विषम वांटणी सुरुवातीस असावी लागतेच; एवढेंच नव्हे तर ही विषमता सारखी वाढत जाणें या विशिष्ट परिस्थितींत अपरिहार्य आहे. ज्यांचे हातीं मुख्य उद्योग, व्यापार त्यांचेचकडे उत्पन्नाचा मोठा ओघ सारखा वाहणार; शिवाय बचत करण्याची खरी कुवत या मूठभर लोकांचे हातींच असणार. गरीब व मागासलेल्या देशांत सावकारी, व्यापार व कारखानदारी यांपासून मिळणारी आवकहि तौलनिक दृष्ट्या मोठी असते. तेव्हां मूळचा संचय मोठा व उत्पन्न मोठें आणि बचत करण्याची ऐपत व विशेष किफायतीचीं बहुतेक साधनें हीं दोन्हीं याच लहान वर्गाच्या हातीं केंद्रित; एवढें सगळें झाल्यावर आर्थिक विषमता सारखी वाढणें अपरिहार्य

आहे. हिंदुस्थानांत, विशेषतः गेल्या २५–३० वर्षांत ही गोष्ट प्रत्यक्ष घडून आली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या वाढत्या आर्थिक विषमतेला आळा दोन प्रकारें घालतां येईल. एक तर औद्योगिक मालाच्या किंमतींचें कडक नियंत्रण करून त्यांत अल्प फायदा राहील अशी मुळांतच व्यवस्था करणें किंवा धनिक लोकांच्या अवास्तव उत्पन्नांवर जबर कर लादून समाजस्वास्थ्य वाढविण्याच्या योजनांकडे करांचें उत्पन्न वापरणें. यांतील एकहि धोरण हिंदुस्थान सरकार स्वीकारण्यास तयार नाहीं हें आपण पाहिलेंच आहे. आणि आर्थिक विकासाच्या योजना या व्यक्तिसाहसाधिष्ठित ठेवावयाच्या म्हटल्यास हिंदुस्थान सरकारचें अलीकडील धोरण चुकलें नाहीं असेंच कबूल करावें लागेल. औद्योगिक मालाच्या किंमतींचें कडक नियंत्रण केल्यास नवीन उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्यास व जुनें उत्पादन वाढविण्यास उत्तेजक परिस्थिति उरत नाहीं व जबर करांनीं श्रीमंतांजवळचें द्रव्य शोषण केल्यास खाजगी धंदे चालविणाऱ्यांजवळ नवीन भांडवल पुरेसें सांचू शकत नाहीं. श्रीमंतांवरील प्रत्यक्ष करांचा बोजा कमी करण्याच्या नवीन प्रवृत्तीचा उगमहि सरकारच्या मळ आर्थिक धोरणापासून झाला आहे. जबर कर लादला असतां वा फायद्यांचें कडक नियंत्रण केलें असतां भांडवलवाले नवीन धंदे काढण्यास कचरले तर त्यांना दोष देण्यांत अर्थ नाहीं. अनियंत्रित खाजगी व्यवहार हा असाच चालावयाचा. “संप” करणारे भांडवलवाले स्वधर्मानें चालत आहेत; मात्र खासगी व्यवहाराधिष्ठित अर्थव्यवस्था व आर्थिक समता यांची सांगड घालूं पाहणारे किंवा घालतो म्हणणारे हे स्वतःची व जनतेची फसवणूक करीत आहेत.

मूठभर लोकांचे हातांत धनसंचय फाजील होईल अशी व्यवस्था करणें हीं खाजगी व्यक्ति व मंडळ्यांमार्फत आर्थिक प्रगति घडवून आणावयाच्या धोरणाची एक बाजू झाली. याचीच दुसरी बाजू म्हणजे समाजांतील इतर वर्गांचें उत्पन्न अगर त्यांची क्रयशक्ति फाजील न वाढेल याची काळजी घेणें. ज्या वर्गाकरवीं उद्योगधंद्यांची वाढ घडवावयाची त्यांच्या उत्पन्नावर (व पर्यायानें राहणीवर) नियंत्रण घालणें हें सयुक्तिक नाहीं. याचे उलट या वर्गाच्या हातीं धनसंचय होण्याकरितां इतरांचें उत्पन्न मर्यादित करणें हेंच आवश्यक; कारण एकंदर राष्ट्रीय उत्पन्न मर्यादित व तोकडें असल्यानें एकाचा संचय, दुसरीकडे तोकडेपणा आला तरच वाढूं शकतो. प्रत्यक्ष

करांचा बोजा उतरवूं पाहात असतां अप्रत्यक्ष करांचा बोजा सारखा वाढत आहे याचें मर्म वरील आवश्यकतेंत आहे; व जीवनावश्यक वस्तूंच्या वांटपाचें विनियंत्रण करणें याकरितांच श्रेयस्कर ठरतें. सर्वसाधारणपणें जीवनावश्यक वस्तु नियंत्रित दरांत वांटप केल्यानें गरिबांच्या राहणीचें मान स्थिरावतें असा अनुभव आहे. पण असें केल्यानें राष्ट्रीय उत्पादनाचा बराच भाग गरिबांस लागणाऱ्या भोग्य वस्तूंत जातो. विनियंत्रण केलें म्हणजे वांटपाची सरकारी जबाबदारी टाळतां येते आणि मग गरिबांच्या राहणीचें मान खालावलें किंवा नाहीं याकडे लक्ष देण्याचें कारण उरत नाहीं; किंबहुना खरें बोलावयाचें म्हणजे गरिबांच्या राहणीचें फाजील वाढलेलें मान उतरविण्याकरितां विनियंत्रण करावयाचें असतें. खाजगी व्यवहाराखालीं सर्व वस्तूंचें वांटप व्यक्तींच्या व वर्गांच्या ऐपतीप्रमाणें होतें. ज्याला जें परवडत नाहीं तें त्याला मिळत नाहीं. नियंत्रित वांटपांतहि वस्तूंच्या किंमती अवास्तव ठेवल्या तर हल्लीं कापड-नियंत्रणाची झाली तशी अवस्था होऊं शकते. पण अशा परिस्थितींत किंमती अवास्तव ठेवल्याबद्दल सरकार दोषी ठरण्याचा संभव असतो. विनियंत्रण केलें असतां कोणतीच अडचण भासत नाहीं. विनियंत्रण करून किंमती वाढूं दिल्या कीं बहुजनांच्या राहणीचें मान साहजिकच उतरतें व बहुजनांची पैशाची आवक वाढली असल्यास अप्रत्यक्ष करांमार्फत तिचें शोषण होतें. यांतील कांहीं अप्रत्यक्ष कर व्यापारी—कारखानदार यांचे हितार्थ लादले असल्यास तिकडूनहि आवश्यक आर्थिक विषमता निर्माण करण्यास मदत होते.

अप्रत्यक्ष करांची वाढ हा इतर वर्गांचें उत्पन्न कमी राखण्याचा एक मार्ग आहे. इतर दृष्टीनेंहि सरकारी आर्थिक धोरण या परिस्थितींत कसें असावें लागतें हें पाहिलें पाहिजे. आज सकृद्दर्शनीं तरी औद्योगिक मजूर वर्गाचें उत्पन्न व सुखसोई वाढविण्याचा विशेष प्रयत्न सरकार करीत आहे असें वाटतें. मजूरवर्गाबाबत हिंदुस्थान सरकारनें स्वीकारलेल्या धोरणाचे विशेष पुढीलप्रमाणें सांगतां येतील: संप टाळून मजुरीचें दर व इतर विवाद्य प्रश्न लवादामार्फत मिटविणें व मजुरांकरितां राहण्याच्या व इतर सोयीकरितां पैसा खर्च करणें. मजुरीचे दर योग्य वा चढीचे असतील किंवा नाहीं हें लवाद–निवाडे कोणत्या दृष्टीनें दिले जातात यावर अवलंबून आहे.' गेल्या कांहीं वर्षांतील तेजीच्या काळांत लवाद–निवाडे बरेच मजुरांच्या बाजूचे असे वाटले; किंवा ते तसे होते अशी तक्रार कारखानदार करीत आले. परंतु

मंदीची झळ भासूं लागल्यावर लवादपद्धतीचा उपयोग मजुरीचे दर टिकविण्यास कितपत होईल हें सांगणें कठीण आहे. खाजगी व्यवहारांत तोटा येऊं लागला म्हणून कारखाना बंद करण्याची धमकी देणें हें शेवटचें अस्त्र मालकांच्या हातीं असतें. तेव्हां तोटा भरून देण्याची अगर कारखाना स्वतःच्या हातीं घेण्याची सरकारची तयारी असल्यासेरीज मजुरीचे दर टिकविण्याकरितां सरकारला कांहीं करतां येत नाहीं.

लवादमार्फत मजुरीचे दर ठरविण्याऐवजीं मजुरीच्या योग्य दरांची कायमची शास्त्रीय बांधणी करणें व कारखानदाराच्या किफायतींत मजुरांस ठराविक प्रमाणांत भागी देणें, याहि मजूरवर्गास संतुष्ट ठेवण्याच्या उपायांचा बराच ऊहापोह अलीकडे होत असतो. मजुरीच्या दरांची शास्त्रीय बांधणीची कल्पना मुळांतच अशास्त्रीय आहे आणि कारखानदारांच्या फायद्यांतील पाती दिल्यानें मजुरांचा संतोष वाढतो असाहि आजवरचा अनुभव नाहीं. परंतु या दोन्ही उपायांबाबतची खरी अडचण निराळीच आहे. शास्त्रीय म्हणून मजुरीचे दर ठरविण्याची विशिक्षित पद्धति ठरविली तरी तिची अंमलबजावणी करण्यांत अनेक अडथळे येतात; या सर्वांतून मार्ग काढावयाचा तर सरकारला प्रत्येक धंद्याचे आणि प्रत्येक कारखान्याचे सर्व व्यवहार व हिशेब अत्यंत बारकाईनें तपासावे लागतील. परंतु हें करावयास सरकार असमर्थ आहे. उत्पादनाच्या किंमती ठरवितांनासुद्धां कारखानदारांकडून पुरेशी तपशीलवार माहिती ज्या सरकारला उपलब्ध होऊं शकत नाहीं तें सरकार मजुरीच्या बांधीव दरांची अगर फायद्यांच्या वाटणीची योजना कसोशीनें अंमलांत आणूं शकेल हें संभवत नाहीं. त्या गोष्टी साधण्याची शक्ति ज्या सरकारला असेल तें राष्ट्रीयीकरणास भ्यावयाचें नाहीं.

औद्योगिक मजूरवर्गास संतुष्ट राखण्याचा हर प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे व तेजीचे दिवस आहेत तोंवर त्यांत यश मिळण्यासहि हरकत नाहीं. मजूरविषयक धोरणाची खरी परीक्षा मंदीच्या काळांत होत असते. मंदीच्या काळांत खऱ्या आवश्यक असलेल्या बेकारी, आजार व वृद्धावस्था वेतनाच्या कोणत्याच योजना सरकारनें अजून हातीं घेतलेल्या नाहींत. मजुरीचे दर आज वाढलेले दिसले तरी विनियंत्रणाच्या धोरणामुळें राहणीचें मानहि बेसुमार वाढलें आहे व सरासरीनें, आजच्या राहणीच्या मानांतील वाढ मजुरीच्या दरांपेक्षा अधिक आहे. काम सर्वांस भरपूर आहे तोंपावेतों

राहणीच्या मानांतील वाढ तितकी जाचक नसते. परंतु एकदां मंदी आली कीं सर्व परिस्थिति बदलेल. मजुरीच्या दरांची घसरगुंडी व बेकारीची वाढ यांस आळा घालण्यास सरकारजवळ कोणतेंच साधन उपलब्ध नाहीं. आणि मंदी आली कीं, घरें आणि मजुरांच्या इतर सुखसोयींकरितां जो पैसा सरकार आज खर्च करीत आहे तोहि पुरवितां येणार नाहीं. अर्थात्, एकंदर औद्योगिक मजूरवर्गाची संख्या हिंदुस्थानांत कमी आहे व सरकारनें मनांत आणलेंच तर विशेष पैसा खर्च करून त्यांची अल्प सोय मंदींतहि करतां येईल. पण याचा अर्थ एवढाच होईल कीं कारखानदार, सरकार व औद्योगिक मजूर यांच्या संगनमतानें इतर वर्गांवर फार बोजा पडेल. ही केवळ कल्पना नाहीं. टाटा कंपनीनें दोन वर्षांपूर्वी पोलादाचे भाव वाढवून मिळण्याकरितां सरकारकडे अर्ज केला. अर्ज करतांना प्रचलित भावांमुळें तोटा सोसावा लागत आहे असें प्रत्यक्ष कंपनीसहि म्हणतां येत नव्हतें. परंतु आपणास दर वर्षी तीन महिन्यांच्या वेतनाइतका फायद्यांतील भाग म्हणून बोनस मिळेल अशी टाटा कामगारांची अपेक्षा पक्की बांधली गेली आहे; याबाबत त्यांची निराशा झाल्यास कारखाना बंदहि पडेल; त्याअर्थी, ज्यायोगें कामगारांस तीन महिन्यांच्या वेतनाइतका भाग म्हणून वांटतां येईल एवढें फायद्याचें प्रमाण कंपनीस पडलेंच पाहिजे व तें पडेल असे भाव सरकारनें बांधून दिले पाहिजेत असा युक्तिवाद करण्यांत आला; आणि भावनियंत्रण मंडळानें या युक्तिवादास विरोधी असा अभिप्राय नमूद केला असतांहि त्या मंडळाच्या विसर्जनानंतर कंपनीनें किंमतींत मागितली होती त्याहूनहि अधिक वाढ सरकारनें मान्य केली !

औद्योगिक मजुरांच्या संख्येपेक्षां कितीतरी पटीनें मोठी संख्या शेतकरी वर्गाची आहे. या वर्गाचें उत्पन्न शेती मालाच्या किंमतीच्या प्रमाणावर अवलंबून असतें. कृषि–उत्पादन व यंत्रोत्पादन यांच्या किंमतींचें परस्पर प्रमाण हें शेती उत्पादनाच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचें समजलें पाहिजे. यांत्रिक युगाच्या सुरुवातीपासूनचा सर्वसाधारण अनुभव असा कीं, कच्चा माल व पक्का माल यांच्या देवघेवींत पक्क्या मालाच्या उत्पादकाची किफायत बहुशः जास्त राहते. कच्च्या मालाचे उत्पादक गरीब, बहुसंख्य व असंघटित असतात. त्यांना बाजारभावाची अटकळ कमी, ओढून धरण्याची कुवत अल्प व आपल्या उत्पादनयोजनेंत फेरबदल करून उत्पादन लवकर वाढविणें अगर घटविणें दुरापास्त असतें. यामुळें तेजीच्या कांहीं वर्षांत त्यांची जरी तात्कालिक भरभराट झाली तरी ती शाश्वत नसते. अनियंत्रित व्यवहारांत पुढें मागें केव्हांतरी शेती मालाचे

भाव बुडीचे ठरावे व शेतकऱ्याची गतकाळांतील कमाई इतर वर्गांचे हातीं जावी, हा नियम अबाधित राहलेला आहे. गेल्या तीसचाळीस वर्षांतील जगभरचा अनुभव असा असल्यामुळें प्रत्येक देशांत पुढील मंदीच्या संभाव्य काळांत शेतकऱ्यांचें उत्पन्न कसें टिकवावें याचा विचार चालू आहे. आणि इतर व्यवहार अनियंत्रित असावे असा आग्रह धरणाऱ्या अमेरिकन सरकारासहि शेती मालाच्या भावाबाबत उपाययोजना करणें इष्ट वाटत आहे. हिंदुस्थानांत अलीकडील कांहीं वर्षें एकंदर शेतकरी वर्गास बरीं गेलीं; कांहीं भागांतील शेतकऱ्यांस तीं विशेष भरभराटीचीं गेलीं. आपल्या नागर धनिकवर्गानें तर आतां पैसा देशांत कुठें असेल तर शेतकऱ्याचे हातींच राहिला आहे, असा नवीन शोध लावला आहे. पण दूरवरचा विचार करतां आजवर झालेल्याप्रमाणें ही सुस्थितिहि क्षणभंगुरच ठरणार. कारण शेती मालाच्या पैदाशीच्या किंमती स्थिरावण्याचा सरकारचा विचार दिसत नाहीं. गेल्या दोन वर्षांत किंमतीच्या नियंत्रणाबाबत जो अविचार सरकारनें दाखविला त्यामुळें शेती मालाच्या किंमतींचें भवितव्य विशेषच कठीण होऊन बसलें आहे. शेती मालाच्या किंमती येत्या वर्षांत चट साऱ्या उतरल्याखेरीज आर्थिक परिस्थिति सुधारणार नाहीं, असें अनेक उद्योगपति बोलूं लागले आहेत. शेती मालाच्या किंमती व मजुरींचे दर उतरले म्हणजे आपणांस सार्वराष्ट्रीय स्पर्धेत टिकाव धरतां येईल अशीहि भाषा ऐकूं येऊं लागली आहे. पण शेती मालाच्या किंमती एकदां घसरूं लागल्या म्हणजे त्यांना कोठेंतरी निश्चित सांवरण्याची योजना मात्र कोणी विचारांत घेऊं इच्छित नाहीं. अर्थात् शेती मालाच्या किंमती स्थिरावणें हें सोपें नाहीं. याकरितां योजना दीर्घ विचारानें बसविली पाहिजे; व ती पार पाडण्यास बराच पैसा व बरेच व्यवहार नियंत्रित करण्याची तयारी हवी. हा विचार, हा पैसा व ही तयारी सरकारची नसल्यामुळें मंदीच्या काळांत शेतकरी अनियंत्रित खासगी व्यवहाराच्या वावटळींत पुन्हा सांपडणार हें खचित. हें सर्व खासगी व्यक्तिद्वारा आर्थिक प्रगति घडवून आणण्याच्या निर्णयांत अभिप्रेत आहे व त्यांत अटळ आहे हें लक्षांत आणलें पाहिजे.

हिंदुस्थान सरकारच्या गेल्या दोन वर्षांतील आर्थिक धोरणाच्या कांहीं विशेषांचा हा आढावा झाला. यावरून सुरुवातीस निर्देशिलेल्या जागतिक परिस्थितींत हिंदुस्थानचें स्थान कोणतें हें कळण्यास मदत होईल. रशियाचा साम्यवाद हिंदुस्थान सरकारला मान्य नाहीं हें उघड आहे. इतकेंच नव्हे तर

पश्चिम यूरोपीय राष्ट्रांनीं स्वीकारिलेला समाजवादहि हिंदुस्थानांत अंमलांत येण्याचा कांहीं संभव नाहीं. शेती मालाच्या किंमती वगैरे बाबतींत हिंदुस्थान सरकारचें धोरण अमेरिकेपेक्षांहि निष्क्रिय आहे. म्हणजे कितीहि कायदे केले व केवढ्याहि घोषणा केल्या, तरी आर्थिक प्रगति खासगी साहसी व्यक्तींमार्फत घडवून आणण्याचा निर्णय घेतल्यामुळें आधींच धनिक असलेल्यांचा धनसंचय वाढूं देणें, प्रत्यक्ष करांचा बोजा कमी करणें व इतर वर्गांस तौलनिक दृष्ट्या डोकें वर काढूं देण्यास वाव न देणें या सर्व गोष्टी अपरिहार्य झाल्या आहेत. इतर सर्व बाबींप्रमाणें आर्थिक व्यवहारांत स्वराज्यप्राप्तीनें कांहीं फरक झाल्यासारखा दिसत नाहीं. १९२० सालापासून आपल्या देशांतील व्यापारी-कारखानदार वर्गाच्या हातांतील आर्थिक बळ व राजकीय सामर्थ्य हीं सारखीं वाढत आहेत. हीं अशींच पदें वाढत राहणार; निदान तीं अशींच पुढें वाढत राहावीं असें धोरण सरकार स्वीकारणार.

सरकारचें आर्थिक धोरण कितपत यशस्वी व लोकमान्य होतें यावर आपलें राजकीय भवितव्य बहुंशीं अवलंबून आहे. प्रचलित अर्थव्यवहारहि कांहीं काळ धड चालू राहतात किंवा नाहीं या प्रश्नाचा प्रस्तुत निबंधांत विचार केलेला नाहीं. युद्धाच्या शेवटीं आर्थिक परिस्थिति साधारण बरी असतांहि हल्लींच्या सरकारनें ती स्वतःच्या हातानें इतकी बिघडविली आहे कीं लवकरच एखादें अरिष्ट येण्याची भीति अनेकांस आज वाटत आहे. मोठा आघात होऊन अर्थव्यवहाराचा गाडा लवकर मोडून पडेल, हें मला संभाव्य वाटत नाहीं; आर्थिक दुःस्थिति सारखी चिघळत राहून जास्त जास्त बिघडेल याची मात्र शक्यता फार आहे. असें झालें असतां हल्लींच्या सरकारला आपला दशवार्षिक कार्यक्रम पार पाडतां येईल काय व न आल्यास आर्थिक धोरण व राजकीय हवामान कोणत्या दिशेनें पालटण्याचा संभव आहे, हे प्रश्न खऱ्या महत्त्वाचे आहेत.

सरकारी धोरण टिकणें हें, हल्लींच्या दिवसांत, एकपक्षीं सरकारी सामर्थ्य व दुसऱ्या पक्षीं जनतेचें सहकार्य किंवा निदान संमति यावर अवलंबून असतें. आजच्या आर्थिक धोरणास जनतेची संमति मिळेल काय? कुळकायद्यांनीं कांहीं शेतकऱ्यांचें तात्पुरतें समाधान झालेंसें दिसेल. पण खरी परीक्षा मंदीच्या वेळीं त्याला आर्थिक स्वास्थ्य लाभतें किंवा नाहीं यावरच अवलंबून राहील. मजुराला तात्पुरती महागाई किंवा जादा वेतन कितीहि मिळालीं तरी त्याचा खरा अभिप्राय धनिकांच्या वाढत्या चलतीस किती आळा बसतो

असें त्यास वाटतें यावर अवलंबून राहील. एकंदर जगांतील अलीकडील इतिहास पाहिला तर राजकारण स्थिरावण्यास आर्थिक धोरण दोन प्रकारें यशस्वी व्हावें लागतें. एक तर सर्व वर्गांस किमान स्वास्थ्य लाभण्याच्या योजना सरकार अंमलांत आणीत आहे असें कळावें लागतें; व दुसरें म्हणजे, बहुजन हालअपेष्टेत असतां धनिकवर्गाच्या चैनीलाहि कांहीं आळा बसला आहे असें दिसावें लागतें. पहिलें स्वास्थ्य प्रत्यक्ष शारीरिक, दुसरें तितकेंच महत्त्वाचें मानसिक. इंग्लंड व स्कँडेनेव्हियन देशांत या दोन्ही दिशांनीं जास्तींत जास्त यशस्विता सरकारी धोरणास लाभली आहे. आपल्याकडे यांतील कोणत्याच दृष्टीनें आर्थिक धोरणाची आंखणी होण्याचा संभव नाहीं. समाजस्वास्थ्याच्या योजना खर्चिक व मागासलेल्या देशांत अवघड म्हणून सरकार हातीं घेऊं शकत नाहीं. उलटपक्षीं धनिकांवर आर्थिक धोरणाची सर्व मदार असल्यामुळें त्यांवर हुकमत चालविण्यापेक्षां त्यांची मनधरणी करणेंच सरकारला आवश्यक भासत आहे. तेव्हां बहुजनसमाज सरकारच्या आर्थिक धोरणाचा विचार करतांना 'कस्यार्थं' हा प्रश्न विचारणार व त्याचें, केवळ धनिकांच्या एवढेंच उत्तर विचारांतीं मिळणार हें स्पष्ट आहे.

आर्थिक वादास जोडून एक राजकीय वाद, व्यक्तिस्वातंत्र्याबाबतचा, सुरुवातीस निर्देशिला; परंतु त्याचें आपल्या देशांत खरोखर फारसें महत्त्व नाहीं. राज्यघटना मूलतः बदलल्याशिवाय समाजव्यवस्था अगर अर्थव्यवस्था यांत क्रांतिकारक फरक घडवून आणतां येतात असा अनुभव इंग्लंड देशाचा आहे; आणि म्हणून तेथें, व्यक्तिस्वातंत्र्याची पायमल्ली करून, रक्तपात घडवून तावडतोब क्रांति करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां, सनदशीर मार्गानें दडपण आणून इष्ट ते बदल घडवावे याकडे बहुजनांचा कल असणें स्वाभाविक आहे. पण इंग्लंडची परिस्थिति अपवादात्मक मानिली पाहिजे. सत्ताधाऱ्यांत समजुतदारपणा व बहुजनांत संयम या दोन्ही गोष्टी अनुकूल असल्याखेरीज इतिहासाचा ओघ असा वळत नाहीं. इंग्लंडमध्यें आज अमेरिकेपेक्षांहि जास्त खरें व्यक्तिस्वातंत्र्य पाहावयास मिळतें अशी ग्वाही सर्व देतात. इंग्लंडच्या जोडीस फक्त स्कँडेनेव्हियन देशांस बसवितां येतें. इतरत्र उदारमतवादी लोकशाही म्हणविणाऱ्या सरकारांची वागणूक फारशी स्पृहणीय नाहीं. यांतहि क्रम गरिबीप्रमाणें लावतां येतो. अमेरिकी गटाच्या यूरोपीय राष्ट्रांत हा क्रम फ्रान्स, इटली, ग्रीस असा लावतां येईल. इटली, ग्रीसमधील राजकीय व आर्थिक स्वातंत्र्याची परिस्थिति पाहतां स्वतःस उदारमतवादी म्हणविणाऱ्या

अनेक अमेरिकन मुत्सद्द्यांस मोठा पेंच पडला आहे. कम्युनिस्ट गटांत हीं राष्ट्रें जाऊं नयेत म्हणून त्यांस आर्थिक मदत करणें श्रेयस्कर हें खरें, पण ही आर्थिक मदत परिणामीं कर्मठ सनातनी, मोठ्या भांडवलवाल्यांचे गट व राजकीय हुकुमशाहीचे पुरस्कर्ते व चालक यांसच बलवान बनविते; व असें झालें म्हणजे अमेरिकी भांडवलशाही साम्राज्यवादी आहे या कम्युनिस्ट प्रचारास साहाजिकच बळकटी येते. आपल्या देशांतील सरकारनें गेल्या दोन वर्षांत जे अधिकार स्वतःस प्राप्त करून घेतले व जें व्यक्तिस्वातंत्र्य व संघ-स्वातंत्र्य याबद्दल धोरण ठेवलें त्यावरून त्यासहि उदारमतवादी म्हणतां येत नाहीं. तत्त्वतः करडा विरोध होऊं लागला म्हणजे सर्व राज्यकर्ते व्यक्ति-स्वातंत्र्याच्या हक्काच्या मर्यादा उल्लंघितात; जो आपणास योग्य वाटतो त्या पक्षाचें अस्तित्वच धोक्यांत आल्यास तें टिकविण्याकरितां सगळेच आपणांस उपलब्ध असलेलीं सर्व अस्त्रें योजतात. यांत साधु व असाधु निवडणें हें उडदा-माजीं काळेगोरे निवडण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच ठरतें. व्यक्तिस्वातंत्र्यास अमुक जास्त महत्त्व देतात, अमुक जास्त सहिष्णु अगर अहिंसात्मक आहेत, या दाव्यांकडे लक्ष न देतां, इष्ट फरक शांततामय मार्गानें घडवून आणण्याच्या प्रत्यक्ष संभाव्यतेचाच विचार करूं.

निर्विकार मनानें पाहिलें असतां सर्वच बाबतींत आपल्या देशाची परि-स्थिति ग्रीस, स्पेन व चीन अशा देशांशींच विशेष तुलनीय ठरते. या सर्व देशांत गेल्या वीस-पंचवीस वर्षांतील आर्थिक इतिहासांत एक चमत्कारिक विसंगति प्रत्ययास येत आहे. समाजवाद व साम्यवादाचा अंमल शांततेनें घडवून येण्यास परिस्थिति जेथें अनुकूल तेथें त्याची आवश्यकता कमी तीव्र व जेथें आवश्यकता विशेष तेथें बंडाळीशिवाय अर्थव्यवस्था बदलणें कमी संभाव्य, अशी ही विसंगति आहे. अत्यंत अल्पसंख्याकांचे हातीं राष्ट्रीय संपत्तीचा मोठा भाग केंद्रित होणें, थोड्या धनिकांचे हातीं सर्व अर्थव्यवस्थेची किल्ली असणें, भीषण गरिबी व बेसुमार श्रीमंतीचें साहचर्य राहणें, या गोष्टींच्या निराकरणांकरितां सर्व प्रमुख अर्थव्यवहार सरकारी करणें आवश्यक मानण्यांत येतें. परंतु जेथें खरोखर अशी परिस्थिति असते तेथें समाजवाद चटकन अंमलांत आणणें फार कठीण असतें. याचे उलट जेथें सार्वजनिक राहणीचें मान बरें, आर्थिक विषमता कमी, भांडवलवाल्यांत कार्यक्षम उत्पादनाची व सचोटीची परंपरा अधिक तेथें समाजवादाच्या दिशेनें प्रगतिहि अधिक लवकर होते.

आज इंग्लंडमधील राष्ट्रीयीकरणाच्या विरोधी अनेक लेखक इंग्लंडमध्यें राष्ट्रीयीकरण अनावश्यक आहे असें मुख्यतः प्रतिपादतात. त्यांचें मत आज इंग्लंडमधील सर्व मोठे उद्योगधंदे कोणा व्यक्तीच्या ताब्यांत राहिले नसून मोठ्या सार्वजनिक मंडळ्यांच्या मालकीचे आहेत. या मंडळ्यांतील भागीदार बहुसंख्य व देशभर पसरलेले आहेत, व त्यांचा कारभार कोणाहि एका व्यक्तीच्या अगर गटाच्या हुकमतीखालीं अगर हिताकरितां चालत नाहीं. मंडळींनें किफायतशीर व्हावें याकडे जरी लक्ष ठेवलें तरी मजुरांचें समाधान, राष्ट्रीय संपत्तीचा योग्य विनियोग व सुरक्षितता, उत्पादनाचा उच्च दर्जा, संशोधनाची प्रगति इत्यादि अनेक बाबी या मोठ्या मंडळ्या तितक्याच कसोशीनें सांभाळतात. तसेंच मंडळ्यांच्या भागावर वांटण्यांत येत असलेला नफा इतका अल्प व एकंदर करपद्धतीमुळें व जीवनावश्यक वस्तूंच्या वाटपाच्या नियंत्रणामुळें प्रत्यक्ष आर्थिक विषमता इतकी कमी कीं, राष्ट्रीयीकरणामुळें कोणत्याच दृष्टीनें इष्ट फरक घडून येण्याची शक्यता उरलेली नाहीं. इंग्लंडांत राष्ट्रीयीकरण इष्ट आहे किंवा नाहीं याचा आपणास विचार करावयाचा नाहीं. परंतु, तेथील विरोधकांच्या विधानांत कांहीं अंशीं तथ्य आहे, इतकेंच नव्हे तर विरोधकांची भूमिकाहि खाजगी व्यक्तीचे हातांत मोठा धनसंचय असणें, मूठभर साहसी व्यक्तींची हुकमत अर्थव्यवहारावर चालणें किंवा राहणीच्या मानांत मोठी विषमता असणें या गोष्टी समर्थनीय आहेत अशी नाहीं. त्यांचे मतें या दृष्टीनें आधींच इतकी प्रगति झाली आहे कीं जास्त घडवून आणण्यास राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता नाहीं.

याच्या उलट हिंदुस्थानांतील परिस्थिति आहे. येथें उद्योगधंदे फार थोड्यांच्या हातीं व हे सर्व कांहीं विशिष्ट गटांतले. "हरिजन" मध्यें कांहीं महिन्यांपूर्वी एका उद्योगपतीचें पत्र प्रसिद्ध करण्यांत आलें. त्यांत खाजगी भांडवलवाले प्रांतीयतेच्या विरुद्ध आहेत असें म्हटलें. एका दृष्टीनें हें खरेंहि आहे. कारण त्यांतील कोणाची दृष्टि आपलें कुटुंब, सगेवाले अगर भागीदार यांच्या पलीकडे जाऊं शकत नाहीं. निरनिराळ्या प्रकारें सार्वजनिक मदतीनें वाढलेल्या अगर चाललेल्या सर्व हिंदी उद्योगधंद्यांतील मुख्य फायदा, त्यांच्या व्यवहाराची सर्व मलई, किती थोड्या व्यक्तींना मिळते व ती सर्व विशिष्ट गटांत राखण्याचीं साधनें काय याबद्दल चौकशी करणें राष्ट्रीय धोरणाच्या दृष्टीनें आज खरोखर फार महत्त्वाचें आहे. अमेरिकेंत अशी चौकशी फार तपशीलवारपणें लढाईपूर्वींच करण्यांत आली. इंग्लंडांत एकाच धंद्यांत–

वर्तमानपत्राच्या–थोड्या व्यक्तींच्या हातीं हुकमत असल्याचें आढळतें. तेथेंहि या धंद्याबाबत नुकतीच चौकशी झाली. हिंदुस्थानांत असल्यापैकीं कोणतीच चौकशी होऊं घातल्याचें ऐकिवांत नाहीं. आर्थिक सत्ता फार थोड्यांचे हातीं आहे एवढेंच नव्हे तर तिचा उपयोगहि केवळ व्यक्ति–फायद्यावर व गटाच्या सामर्थ्याचे वाढीवर लक्ष ठेवूनच केला जातो. अर्थव्यवस्थेस किफायत व्यवस्था कांहीं अर्थशास्त्रज्ञ क्वचित् म्हणतात. हिंदुस्थानांत हें अक्षरशः खरें आहे. आपली व्यवस्था खरी उत्पादनव्यवस्था नाहीं. जास्तींत जास्त उत्पादन, चांगलें उत्पादन, कमी खर्चाचें उत्पादन, राष्ट्रीय संपत्तीच्या दृष्टीनें युक्त उत्पादनपद्धति ही दृष्टि आपणाकडे अभावानें दिसेल. उत्कृष्ट व प्रामाणिक कारखानदार म्हणून हिंदुस्थानांत कीर्ति मिळविणारे, बहुतेक उद्योगधंद्यांत, अजूनहि परकीयच आहेत. बाजार तेजीचा असला म्हणजे वाईट माल गिऱ्हाइकाचे माथीं मारून स्वतःच्या देशांतच नव्हे तर परदेशांतहि अनेकवार हिंदी कारखानदार व व्यापाऱ्यांनीं अप्रतिष्ठा मिळविलेली आहे. कर चुकविणें, सरकारी नियंत्रणें पद्धतशीर रीतीनें मोडणें, वजनामापांत, किंमतींत गिऱ्हाइकास फसविणें, सांठेबाजी–सट्टेबाजी करणें, एवंच सर्व तऱ्हेच्या लबाड्या करणारे प्रत्येक देशांत आढळतात. देशादेशांतील मुख्य फरक म्हणजे ते केवढ्या प्रमाणांत कोणत्या थरांत आढळतात याबद्दलचा. सध्या पुढारलेल्या देशांत हे अल्प असतात इतकेंच नव्हे धुरीण समजल्या जाणाऱ्यांच्यांत असे सहसा सांपडत नाहींत. चीन, हिंदुस्थानसारख्या देशांत लहान–मोठे सगळेच एका माळेचे मणि, किंबहुना जेवढा धनिक मोठा तेवढा त्याचा दुलौंकिकहि मोठा अशी बऱ्याच वेळेस परिस्थिति असते. आणि चीन हिंदुस्थानमधील आर्थिक धोरणाचे खरे सूत्रधार हेच. ज्यांना समाजकंटक म्हणून साक्षेपानें वगळावें ते आमच्या राजधानींत मोठे मानाचे सल्लागार म्हणून मिरवितात !

असें असतां शांततेनें बदल कसे घडून यावे ? आजचें सर्वच राजकीय–आर्थिक धोरण विशिष्ट वर्गाच्या हितांकरितां कसें आंखलें जात आहे याचा अनुभव मुंबईकडे दृष्टि फेकली असतांहि सहज येतो. खडकवासलें, वीर सारखीं धरणें उंच करण्यास पैसा नाहीं पण मुंबईत दूधवाडी व निर्वासितांचीं घरें याकरितां कोट्यवधि रुपये ओतले जातात. प्राथमिक उत्पादन व प्राथमिक उत्पादक यांचें महत्त्व सरकारच्या लक्षांत येण्याचें कारण नाहीं, निदान त्यांची खरी भरभराट हा आर्थिक धोरणाचा खरा उद्देश नाहीं. मुंबईची वाढ भरमसाट होऊं द्यावयाची, मग त्याचे अनिष्ट परिणाम सांवरण्याकरितां

कोटींनीं खर्च करूं पाहावयाचें. पण सार्वत्रिक प्राथमिक उत्पादन वाढेल व केंद्रांत फाजील सांचलेला उद्योग व पैसा देशभर कांहीं प्रमाणांत फैलावेल याचा विचार करावयाचा नाहीं. याचें कारण याबद्दल खरी कळकळच नाहीं. खरें विकेंद्रीकरण झालें तर दोनचार शहरांतल्या मूठभर लोकांची हुकमत कशी टिकेल ?

राजकीय मतौघ असाच वहात आहे. स्थानिक स्वराज्य संस्था नव्हे तर प्रांतिक सरकारेंहि दुर्बल करावीं, मध्यवर्ती सरकारची सत्ता हरतऱ्हेने वाढवावी, लढाईचीं रूपकें वापरून अंधश्रद्धा व अंधानुयायित्व यावर भर द्यावा हेच प्रकार सर्वत्र दिसतात. भांडवलवाल्यांची आर्थिक सत्ता व राजकीय हुकुमशाही यांचें साहचर्य सर्वत्रच असतें. त्यांत आतां या रूसी-अमेरिकी लढ्यानें आयतेंच फावलें आहे. आदिवासी असंतुष्ट झाले, लहान बागाइतदार चिडले, किंवा निर्वासित बिथरले तर सर्व कम्युनिस्टांमुळें. सरकारवर जबाबदारी कांहींच नाहीं. यापुढें हळूहळू सरकारचा प्रत्येक उघड अगर प्रच्छन्न टीकाकार कम्युनिस्टजमा आहे असें सरकारचे पोलिस समजूं लागणार हें उघड आहे. या परिस्थितीबाबत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. इतर सर्व तुल्य देशांत ती अशीच आहे. आणि आतां अमेरिकी मदत जास्त येऊं लागली म्हणजे ती एका दृष्टीनें आणखीच बिघडेल; कारण सत्ताधारी आज आहेत त्यापेक्षांहि कमी लोकाभिमुख होतील. मोठ्या राष्ट्रांच्या पाठबळानें सार्वराष्ट्रीय कम्युनिस्ट आघाडीच्या निमित्तानें त्यांचें लष्करी सामर्थ्य वाढेल व आसनहि पुष्कळ वर्षें स्थिरावूं शकेल.

कोणता पक्ष किती वर्षें आसनस्थ राहील हा विषय नाहीं ! त्याबद्दल बोलण्याचा माझा अधिकारहि नाहीं. गेल्या दोन वर्षांतील आर्थिक धोरणाच्या इतिहासावरून मला एवढेंच वाटतें कीं, या देशांत संक्रमण शांततेनें होण्याचीं चिन्हें दुरावूं लागलीं आहेत, किंबहुना दुरावलींच आहेत. दोन वर्षांपूर्वी मी याबाबत आशावादी होतों. व्यापारी–कारखानदारवर्गाकडून कांहीं समजूतदारपणा दाखविला जाईल असें मला वाटलें नव्हतें; परंतु राजकीय पुढारी, मोठे सरकारी अधिकारी व एकदर शिक्षित पांढरपेशांपैकीं महत्त्वाच्या व्यक्ति यांना परिस्थितीचें यथार्थ आकलन होऊं शकेल असें वाटत होतें. त्यांतल्या त्यांत युद्धकालीन नियंत्रणाचा गाडा मागील सरकारनें आयताच चालूं करून दिलेला असल्यामुळें विनायासें बऱ्याच गोष्टी करतां येण्यासारख्या होत्या. पण माझा आशावाद फाजील ठरला. कम्युनिस्ट म्हणतील कीं तो फाजील

नव्हे तर केवळ स्ववर्ग वृथाभिमानद्योतक होता. तें कांहीं असो. राजकारणावर निवडणुकींच्या आधीं पडलेला पैशाचा प्रभाव फार टिकाऊ ठरला; अर्थात् परिस्थिति इतकी विषम व बिकट असतां केवळ कांहीं राजकीय पुढाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या जोरावर तींत मूलभूत फरक घडून येऊं शकतील ही आशा फोल ठरली. दिवसेंदिवस ही परिस्थिति सुधारणें कठीण होऊं लागलें आहे. यापुढें सत्ताधिकाऱ्यांचा व धनिकांचा उन्माद् कमी होण्याचीं चिन्हें नाहींत, तो बळावणार. सत्ता टिकविण्याकरितां, असंतोषाचीं चिन्हें दडपून टाकण्याकरितां हरतऱ्हेचे प्रयत्न होणार. या सर्व लढ्यांत कोणास कांहींहि तत्कालिक यश येवो अगर न येवो एकंदर मनांतल्या आढ्या व असंतोष, वर्गावर्गांतील, ज्ञातीज्ञातींतील अप्रीति व कलह वाढणार व आधींच कारभारांत आलेल्या ढिलाईचें पर्यवसान वाढत्या अराजकांत होणार असा धोका आज उघड दिसत आहे. परिणामीं या मंथनांतून हलाहल निघो वा अमृत निघो मध्यंतरींचा काळ कठीण जाणार हें सचित.

# १७. साखरेची कटु कहाणी*

स्वतंत्र हिंदुस्थानांतील साखरेच्या पुरवठ्याबाबतच्या गेल्या २–३ वर्षांतील स्थूल घटना सर्वांस परिचित आहेत. ८ डिसेंबर १९४७ रोजीं हिंदुस्थान-सरकारनें साखरेवरील सर्व निर्बंध उठविले. साखरेची नियंत्रित किंमत दर मणास रु. २२–१४ आणे होती. वि-नियंत्रण झाल्याबरोबर ती दर मणास रु. ३५–७ आणे इतकी वाढविण्यांत आली. यानंतर एक वर्षपर्यंत साखरेच्या किंमती या पातळीवर अगर तिच्या जवळपास होत्या. डिसेंबर १९४८ मध्यें हिंदुस्थान-सरकारनें हिंदी साखर-कारखानदार-संघ ( Indian Sugar Syndicate ) व प्रांतिक सरकारें यांच्याशीं विचारविनिमय करून साखरेची किंमत दर मणास रु. २८-८ आ. इतकी कमी केली. १९४९ च्या मे-जूनपासून साखरेच्या किंमती वाढूं लागल्या व साखरेची सर्वत्र हांकाटी झाली. परिस्थिति सांवरण्यासाठीं हिंदुस्थान सरकारास सप्टेंबरमध्यें पुन्हां साखरेवर नियंत्रण बसवावें लागलें, तें अद्यापिहि जारी आहे. या स्थूल घटनांमागें ज्या अनेक घडामोडी दडलेल्या आहेत, त्यांचा तपशीलवार विचार या लेखांत करावयाचा आहे. हिंदी साखर-कारखानदारांच्या संघाचा इतिहास व त्याची कामगिरी यांपासूनच या विवेचनास प्रारंभ केला पाहिजे.

१९३२ सालीं हिंदी साखरेच्या धंद्यास संरक्षण मिळून परदेशाहून येथें आयात होणाऱ्या साखरेवर दर हंड्रेडवेटास रु. ९–१–० इतकी संरक्षक जकात बसविण्यांत आली. या संरक्षक जकातीमुळें हिंदुस्थानांतील साखर-कारखान्यांच्या वाढीस उत्तेजन मिळालें व २–३ वर्षांतच त्यांत खरोखरच क्रांति घडून आली. १९३१ ते १९३५ या काळांत १०४ नवीन साखर-कारखाने हिंदुस्थानांत निघाले व साखरेचें प्रतिवार्षिक उत्पादन १,५८,००० टनांपासून ९,१९,००० टनांपर्यंत वाढलें व जवळ जवळ त्या प्रमाणांतच परदेशी साखरेची आयात कमी झाली. १९३५ मध्यें हिंदुस्थानांत एकंदर १३५ साखर-कारखाने होते; त्यांपैकीं १०० हून थोडे अधिक बिहार व संयुक्तप्रांत यांमध्यें होते. एकंदर देशांत तयार होणाऱ्या साखरेपैकीं साधारणपणें $\frac{3}{4}$ साखर

---

* नवभारत मासिक, सप्टेंबर १९५०

या दोन प्रांतांतील कारखान्यांतून तयार होत असे. कारखाने व उत्पादन यांचें हें प्रमाण आजतागायत साधारणपणें तितकेंच राहिलें आहे. १९३६-३७ मध्यें साखरेचें उत्पादन निरनिराळ्या कारणांमुळें आदल्या वर्षापेक्षां २ लाख टनांनीं वाढलें. आयात मात्र त्या मानानें कमी झाली नाहीं. त्यामुळें साखरेचा सर्वत्र सुकाळ होऊन तिच्या किंमती पडूं लागल्या. १९३५-३६ च्या हंगामांत दर मणीं रु. ८-२-१० असलेली किंमत १९३७ जूनमध्यें रु. ६-१-६ पर्यंत उतरली व साखर-कारखान्यांवर आपत्ति कोसळली. यांतून मार्ग काढण्यासाठीं मे १९३७ मध्यें प्रथमतः साखर-कारखानदारांचा संघ काढण्यांत आला. कारखान्यांत तयार झालेल्या साखरेच्या विक्रीचें व किंमतीचें नियंत्रण करण्याच्या उद्देशानें संघ स्थापन करण्यांत आला. त्याप्रमाणें संघानें साखरेच्या विक्रीच्या किंमती ठरविल्या व प्रत्येक कारखान्याच्या उत्पादनापैकीं किती भाग कोणत्या वेळीं बाजारांत आणण्यासाठीं "मोकळा" करावयाचा हें नियंत्रित करून १९३६-३७ च्या साखर-हंगामाच्या शेवटीं शेवटीं साखरेच्या किंमतीं जवळ जवळ दर मणीं रु. १ नें वाढविण्यांत यश मिळविलें. पुढच्या हंगामांत परिस्थिति सुधारल्याबरोबर बऱ्याच साखर-कारखान्यांनीं संघाचें सभासदत्व सोडलें. तेव्हां संघानें बिहारच्या व युक्त प्रांताच्या सरकारांकडे मदतीसाठीं मागणी केली. त्या सरकारांनीं साखर-कारखान्यांच्या नियंत्रण-कायद्यान्वयें नियमांत जरूर तो फरक करून संघाचे सभासद असल्याशिवाय त्या दोन प्रांतांतील साखर-कारखान्यांना ऊंस गाळण्यास परवानगी देण्याचें नाकारलें. त्यामुळें त्या प्रांतांतील सर्व साखरकारखान्यांना संघाचें सभासदत्व सक्तीचें झालें. युक्त आणि बिहार प्रांताबाहेरील जे साखर-कारखाने संघाचे सभासद होते, त्यांनीं यानंतर आपलें सभासदत्व सोडलें व संघ ही त्या दोन प्रांतांतील साखर-कारखान्यांचीच संस्था झाली.

संघास अशा रीतीनें कायदेशीर मान्यता देतांना साखर-कारखाने, उसाची लागवड करणारे शेतकरी व साखरेचे सर्वसामान्य गिऱ्हाईक यांच्या हिताकडे लक्ष देऊन साखरेच्या किंमती व पुरवठा यांचें योग्य तें नियंत्रण संघ करील अशी युक्त प्रांत व बिहार सरकारांची अपेक्षा होती. तथापि, लवकरच त्यांचा भ्रमनिरास झाला. साखरेचा बाजारांत येणारा सांठा मर्यादित ठेवून साखरेच्या किंमती वाढविण्याचें धोरण संघानें पुढें अविरत चालू केलें. सप्टेंबर १९३७ मध्यें दर मणीं रु. ६-७-० असलेली साखरेची किंमत डिसेंबर १९३८

मध्यें दर मणीं रु. १०–५–० पर्यंत वाढली व १९३९ च्या पहिल्या कांहीं महिन्यांतच ती दर मणीं रु. १२–०–० पर्यंत चढली. साखर-कारखान्यांमधील स्पर्धा नाहींशी करून संघानें साखर-बाजारांत आपली मक्तेदारी स्थापन केली व तिचा उपयोग फक्त साखरेच्या किंमती वाढविण्याकडे करण्याचा उपक्रम आरंभिला. तेव्हां जून १९४० मध्यें युक्त प्रांत व बिहार सरकारांनीं संघास दिलेली कायदेशीर मान्यता काढून घेतली. त्याबरोबर पुष्कळ साखर-कारखाने संघांतून बाहेर पडले. साखर-बाजारांत पुन्हां प्राणान्तिक स्पर्धा सुरू झाली. कारखानदार वाटेल तितक्या कमी भावानें साखर विकूं लागले; त्यामुळें सर्वत्र गोंधळाची परिस्थिति निर्माण झाली व कांहीं साखर-कारखाने बंद पडण्याच्या बेतांत आले. याच सुमारास संघाच्या उरलेल्या सभासदांनीं सरकारकडे शिष्टमंडळ नेऊन संघाची काढून घेतलेली मान्यता त्यास पुन्हां द्यावी अशी विनंति केली. तेव्हां युक्त प्रांत व बिहार यांचीं सरकारें, हिंदुस्थान-सरकार, इंपीरियल बँक आणि संघ यांच्या प्रतिनिधींची एक संयुक्त बैठक जुलै १९४० च्या शेवटीं बोलावण्यांत आली. या बैठकींत चर्चा होऊन कांहीं अटींवर संघास पुन्हां सरकारी मान्यता द्यावी असें ठरलें. १ ऑगस्ट १९४० रोजीं काढलेल्या सर्व प्रतिनिधींच्या संयुक्त पत्रकानें खालील अटींवर संघास मान्यता देण्यांत येत आहे असें जाहीर करण्यांत आलें: (१) साखरेची विक्री करण्याचें काम संघानें करावयाचें. सरकार वेळोवेळीं साखरेच्या किंमती ठरवील व साखरेच्या एकंदर सांठ्यापैकीं किती भाग कोणत्या वेळीं बाजारांत आणण्यास परवानगी द्यावयाची हेंहि ठरवील. या दोन्ही मर्यादा पाळूनच संघानें साखर-विक्रीचें काम करावयाचें. (२) संघाचा अध्यक्ष संघाच्या संचालकांनीं निवडावा; परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी युक्त प्रांत व बिहार या दोन सरकारांकडून नेमण्यांत येईल. (३) साखरेसंबंधीच्या सर्व प्रश्नांवर सरकारी निर्णय घेण्यासाठीं व नियंत्रणाच्या अंमलबजावणीसाठीं सरकारमार्फत एक साखर–नियंत्रण–मंडळ नेमण्यांत येईल. या मंडळाचे अध्यक्ष व सभासद सरकारी नोकर असतील. ते संघाच्या संचालकमंडळाचे पदसिद्ध सभासद होतील. तथापि, संघास केव्हांहि दोन्ही प्रांतिक सरकारांकडे परस्पर दाद मागण्याचा अधिकार राहील. (४) सभासद असलेल्या प्रत्येक साखर-कारखान्यांत उत्पन्न होणाऱ्या साखरेची किंमत व त्याच्या एकंदर उत्पादनापैकीं वेळोवेळीं बाजारांत आणावयाचा भाग हीं संघानें ठरवावीं. तथापि, त्यास साखर नियंत्रण-मंडळाची संमति असावी लागेल. (५) यासंबंधींची सर्व माहिती

नियंत्रण मंडळानें प्रसिद्ध करीपर्यंत गुप्त ठेवण्यांत येईल. (६) नियंत्रण-मंडळास जरूर ती सर्व माहिती संघ पुरवील.

या नवीन व्यवस्थेप्रमाणें ऑगस्ट १९४० पासून एप्रिल १९४२ पर्यंत संघानें आपलें नियुक्त काम बिनबोभाट केलें. एप्रिल १९४२ मध्यें हिंदुस्थान सरकारनें सर्व देशभर साखर व साखरेचे पदार्थ यांचें नियंत्रण जारी केलें. मध्यवर्ती सरकारनें एक साखर-नियंत्रक अधिकारी या कामावर नेमला व तो आपल्या दुय्यमांसह साखर-नियंत्रणाचें सर्व काम करूं लागला. त्यामुळें आंकडे गोळा करणें, संघाचें मासिक चालविणें व वेळोवेळीं आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्यासाठीं सरकारकडे शिष्टमंडळें पाठविणें एवढींच कामें संघाकडे राहिलीं.

एप्रिल १९४२ पासून ८ डिसेंबर १९४७ पर्यंत साखरेवरील नियंत्रणें अस्तित्वांत होतीं व हिंदुस्थान-सरकारतर्फेंच त्याची अंमलबजावणी होत होती. साखरेवरील सर्व नियंत्रणें उठविण्याचा निर्णय स्वतंत्र हिंदुस्थानच्या सरकारनें अधिकारावर आल्याबरोबर थोड्याच दिवसांत केला. नियंत्रणें उठल्याबरोबर ऑगस्ट १९४० मधील संयुक्त पत्रकांत ठरल्याप्रमाणें युक्त प्रांत व बिहारमध्यें होणाऱ्या साखरेची विक्री करण्याचें काम संघाकडे क्रमानेंच आलें. १९४० च्या संयुक्त पत्रकांत उल्लेखिलेल्या कराराप्रमाणें युक्त प्रांत व बिहार यांनीं नेमलेल्या साखर-नियंत्रण-मंडळानें घालून दिलेल्या मर्यादांत राहूनच हें काम करावयाची संघावर जबाबदारी होती. संघानें या मर्यादा कशा झुगारून दिल्या व आपली शक्ति अयोग्य रीतीनें कशी वापरली यांतच स्वतंत्र हिंदुस्थानांतील साखरेची कटु कहाणी सामावलेली आहे.

वि-नियंत्रणानंतर साखरेची किंमत भरमसाट वाढली असती तर त्याचा ठपका सरकारवर आला असता. यासाठीं युक्त प्रांत, बिहार व हिंदुस्थान-सरकार यांचे व साखर-कारखानदारांच्या संघाचे प्रतिनिधी यांमध्यें वाटाघाट होऊन वि-नियंत्रणानंतर साखरेची किंमत दर मणीं रु. २२-१४-० पासून रु. ३५-७-० पर्यंत वाढवावी व संघानें साधारणपणें त्याच्या वर किंमती जाऊं देऊं नयेत असें ठरलें. ही नवीन किंमत नियंत्रित किंमतीपेक्षां ७० टक्क्यांनीं अधिक होती. ती ठरवितांना संघानें ऊंस खरेदीची किंमत दर मणीं रु. १–४–० पासून रु. २–०–० इतकी म्हणजे ६० टक्के वाढविण्याची सूचना केली. युक्त सरकारचा त्यास विरोध होता, परंतु आपण होऊन कारखानदार शेतकऱ्यांस जास्त भाव देण्यास तयार झाल्यावर त्यास विरोध करणेंहि अवघड झालें व युक्त प्रांत

सरकारनें त्यास मान्यता दिली. अर्थात् यांत आंवळा देऊन कोहळा काढण्याचा डाव होता. कारण संघानें त्याचबरोबर साखरेच्या दर मणास रु. २ जादा नफा व रु. ०–५–६ इतकी उत्पादनखर्चांत वाढ मिळण्याची मागणी केली. ही मागणी अत्यंत गैर होती, असें सर्व चौकशीअंतीं हिंदी जकातमंडळानें (Indian Tariff Board) साखर-धंद्यावरील आपल्या ताज्या अहवालांत नमूद केलें आहे व दर मणीं रु. ३५–७–० ही नवीन किंमत ठरवितांना युक्त प्रांत व बिहार सरकारांनीं आणि संघानें सामान्य जनतेच्या हिताकडे पुरेसें लक्ष दिलें नाहीं असा स्पष्ट शेरा मारला आहे.

१९४७–४८ च्या हंगामांत तयार होणाऱ्या साखरेस ही नवी किंमत लागू झाली. तथापि संघाजवळ मागील हंगामांतील ८०,००० टन साखर शिल्लक होती. ती या वाढलेल्या किंमतीसच विकून दर मणीं रु. १४–९–० जादा फायदा मिळवण्याचा संघानें घाट घातला. याची कुणकुण बाहेर लागली व त्याबद्दल बरीच आरडाओरड झाली. तेव्हां हिंदुस्थान-सरकारनें हा सांठा ७ डिसेंबर १९४७ रोजीं एक हुकूम काढून गोठविला. त्या साखरेची विक्री नवीन दरानें करतांना दर मणीं रु. ९–३–० सरकारला द्यावे व ठरलेले रु. ५–६–० कारखानदारांनीं घ्यावे असें ठरवून दिलें. तरी सुद्धां कारखानदारांना एकंदर रु. १,२०,००,००० इतका फायदा मिळालाच व तोहि कोणतेहि कष्ट न करतां! यासंबंधीं सर्वत्र पुष्कळ टीका झाली, तेंव्हा उत्तर देतांना संघातर्फे असें सांगण्यांत आलें कीं, या एकंदर फायद्यापैकीं बराच भाग प्रांतीवरील कर व मजुरांना जादा बोनस देण्यांत खर्च झाला. त्यामुळें प्रत्यक्षांत कारखानदारांच्या पदरीं दर मणास रु. १–१४–० इतकाच फायदा पडला. हेंहि मान्य केलें तरी साखर-कारखान्यांना एकंदर रु. ४० लक्षांहून जास्त विनासायास वद्द फायदा झाला हें उघड आहे. हा सर्व पैसा गरीब जनतेच्या खिशांतून साखर-कारखानदारांच्या खिशांत उतरला हें निराळें सांगावयास नकोच.

८ डिसेंबर १९४७ पासून नवीन भावानें साखरेची विक्री सुरू झाली. १९४७–४८ च्या हंगामांत साखरेचें उत्पादन १०,७७,००० टन झालें. त्याच्या मागच्या हंगामांत तें ९,०३,००० टन इतकेंच होतें. जादा उत्पादनामुळें साखरेचा पुरवठा वाढला. शिवाय पाकिस्तान झाल्यामुळें साखरेचा खप पूर्वीपेक्षां जवळजवळ २½ लक्ष टनांनीं कमी झाला. जादा उत्पादन व घटलेला खप यांमुळें साखरेचा सुकाळ झाला तर कदाचित् किंमती घसरतील या भीतीनें कांहीं साखर हिंदुस्थानांतून निर्यात करण्याचें संघानें ठरविलें.

अर्थात् मणास रु. ३५–७–० ही किंमत फार असल्यामुळें त्या किंमतीस परदेशांत साखर खपणें शक्य नव्हतें. यासाठीं हिंदुस्थानांतील किंमतीपेक्षां कमी किंमतीस साखर निर्यात करणें संघास भागच आलें. मुंबईच्या साखर-व्यापाऱ्यांनीं २ ऑगस्ट १९४८ रोजीं जें पत्रक काढलें त्यांत संघानें थोड्या दिवसांपूर्वीं ५००० टन साखर प्रत्येक पोत्यामागें रु. ५ कमी घेऊन पाकिस्तानास विकली व आणखी ५०,००० टन साखर अशाच कमी किंमतीनें विकण्यासंबंधीं संघाच्या वाटाघाटी चालू आहेत असें जाहीर केलें व त्याचा निषेध केला. या पत्रकास संघातर्फे जें अधिकृत उत्तर देण्यांत आलें, तें सर्वच दृष्टींनीं वाचनीय आहे. म्हणून त्यांतील महत्त्वाचा भाग येथें थोड्या विस्तारानें देतों.

"सामान्य हिंदी जनतेचा तोटा करून संघानें पाकिस्तानास अंतर्गत भावापेक्षां कमी भावांत साखर विकली, असा साखर–व्यापाऱ्यांच्या पत्रकांत संघावर आरोप करण्यांत आला आहे. वि–नियंत्रणानंतर साखरेची किंमत योग्य पातळीवर स्थिर ठेवण्याची जबाबदारी संघावर पडलेली आहे. उत्पादन वाढवून व साखर सर्वत्र योग्य प्रमाणांत पुरवून ही जबाबदारी संघानें पार पाडली आहे. तथापि पाकिस्तान–निर्मितीमुळें एकंदर साखरेचा खप २½ लक्ष टनांनीं घटला आहे. त्यामुळें होणारा तोटाहि संघासच सोसावा लागणार आहे. वि–नियंत्रणानंतर हिंदुस्थानांतील साखरेचा खप १ लक्ष टनांनीं वाढला; त्यामुळें पाकिस्तानांतील साखरेची बाजारपेठ गेल्यामुळें होणारा तोटा थोडाफार भरून निघाला आहे. तथापि, या हंगामांतील १½ लक्ष टन साखर शिल्लक राहील असा अंदाज आहे. त्यामुळें युक्त प्रांत व बिहारमधील साखर–कारखान्यांना इथल्यापेक्षां कमी भावानें, नुकसान सोसून सुद्धां पाकिस्तानला साखर विकणें भाग आहे."*

वरील पत्रकाचा अर्थ सरळ आहे. नुकसान सोसून सुद्धां पाकिस्तानास कमी किंमतीनें साखर विकावयास संघ तयार होता; परंतु हिंदुस्थानांत मात्र कमी किंमतीनें साखर विकण्यास त्याची तयारी नव्हती, हें यावरून उघड दिसतें. साखरेची किंमत मणास रु. ३५–७–० पेक्षां कमी केली असती तर हिंदुस्थानांत साखरेचा खप अधिक वाढला असता व १½ लक्ष टन साखर शिल्लक राहण्याचा प्रश्न पुष्कळ अंशीं सुटला असता. परंतु सर्वच साखरेची किंमत कमी झाली असती व त्या प्रमाणांत संघांतील साखर-कारखान्यांच्या अनन्वित

*—टाइम्स ऑफ इंडिया, १८ ऑगस्ट १९४८.

फायद्यांत कपात झाली असती ! हें होऊं नये म्हणून संघानें पाकिस्तानास कमी भावानें साखर विकण्याचा उपक्रम केला. यावरून त्याची दानत, स्वदेशाभिमान, तत्त्वज्ञान हीं काय दर्जाचीं व प्रकारचीं होतीं व आहेत याचा उलगडा होतो.

१९४७–४८ चा साखरेचा हंगाम ऑक्टोबर १९४८ मध्यें संपला. १९४० मध्यें साखर-कारखानदारांच्या संघास पुन्हां सरकारी मान्यता देतांना त्यानें संयुक्त प्रांत व बिहार सरकारांनीं नेमलेल्या साखर नियंत्रण-मंडळानें ठरवून दिलेल्या मर्यादांत राहूनच साखरेची विक्री करावयाची असा करार झाला होता हें वर सांगितलेंच आहे. वि–नियंत्रणानंतर जरी मध्यवर्ती सरकारचें नियंत्रण उठलें, तरी युक्त आणि बिहार प्रांतिक सरकारांनीं नेमलेल्या साखर-नियंत्रण-मंडळाच्या संघावरील नियंत्रणास बाध येण्याचें कारण नव्हतें. कानपूरच्या साखर-संशोधन-संस्थेच्या संचालकानें ९ फेब्रुवारी १९४८ रोजीं साखर-नियंत्रण-मंडळास पत्र लिहून १९४० च्या पत्रकाप्रमाणें संघाच्या कार्यावर मंडळानें नियंत्रण पुन्हां चालूं करावें असें सुचविलें होतें. तथापि १९४७–४८ च्या हंगामांत मंडळाकडून या बाबतींत कांहींच हालचाल झाली नाहीं. संघाचे चाललेले सर्व उद्योग मंडळ निमूटपणें पाहात उगी राहिलें होतें. ऑक्टोबर १९४८ मधल्या मंडळाच्या वार्षिक सभेंत संघाविरुद्ध पुष्कळ तक्रारी पुढें मांडण्यांत आल्या. त्यानंतर मंडळानें या तक्रारींची चौकशी सुरू केली. त्यास संघानें वाटाण्याच्या अक्षता कशा लावल्या हा इतिहास आतां पाहावयाचा आहे. तत्पूर्वी १९४८–४९ च्या हंगामांतील साखरेच्या किंमतीसंबंधीं झालेल्या घटना नमूद करणें आवश्यक आहे.

१९४८–४९ च्या हंगामाच्या प्रारंभीं हिंदुस्थान सरकार, युक्त व बिहार प्रांतीय सरकारें व संघ यांच्यामध्यें वाटाघाटी होऊन नवीन साखरेची किंमत दर मणीं रु. २८–८–० पर्यंत उतरविण्यांत आली. साखरेप्रमाणेंच उसाची किंमतहि दर मणीं रु. २ वरून युक्त प्रांतांत रु. १–१०–० व बिहारमध्यें रु. १–१३–० इतकी उतरविण्यांत आली. नवीन साखरेच्या या किंमतीपैकीं मणामागें रु. ४–१–३ निरनिराळ्या करांच्या रूपानें हिंदुस्थान व प्रांतिक सरकारांना मिळावयाचे होते. मागच्या हंगामाची शिल्लक साखर तिच्या मूळ किंमतीनें म्हणजे मणास रु. ३५–७–० या भावानें विकण्याचा संघानें घाट घातला व तो यशस्वी होण्यासाठीं जुनी शिलकेंतील साखर संपल्यासेरीज नवीन साखर बाजारांत आणण्यासाठीं मोकळी करावयाची

नाहीं असें त्यानें ठरविलें. तथापि, मागच्या उदाहरणावरून शहाणे होऊन कीं काय कुणास ठाऊक, सरकारनें जुनी शिलकी साखरहि नवीन कमी केलेल्या भावानेंच विकली पाहिजे असा आग्रह धरला. तेव्हां 'आमचा होणारा तोटा भरून काढण्यासाठीं निदान नवीन किंमत वाढवून द्या' अशी संघानें मागणी केली. शेवटीं नवीन साखरेची किंमत रु. २७–८–० प्रथम ठरली होती. ती रु. २८–८–० इतकी वाढवून द्यावयाची व त्या भावानें नवी व जुनी साखर संघानें सरसकट विकावयाची असें ठरलें.

तथापि, पुढें झालेल्या घटनांवरून झालेला करार व ठरलेल्या किंमती संघास मान्य नव्हत्या, असें दिसतें. संघानें, नवीन ठरलेली किंमत साखरेची किमान किंमत होय, अशी आपली सोईस्कर समजूत करून घेतली व आपल्या परंपरागत धोरणाचा अवलंब करून किंमती वाढवावयाचें ठरविलें, असें नंतर बाहेर आलेल्या पुराव्यावरून दिसतें. त्याचप्रमाणें साखर–नियंत्रण–मंडळाच्या नियंत्रणास झुगारून द्यावयाचें असेंहि धोरण ठरलेलें पुराव्यावरून दिसतें.

१९४८–४९ च्या हंगामांतील घटनांपर्यंत आपण येऊन पोंचलों. या घटना कोणत्या व कशा घडल्या व त्या सर्वांचें पर्यवसान साखरेच्या दुर्भिक्षांत कसें झालें हा इतिहास आतां पाहावयाचा आहे. त्यासाठीं प्रथम या हंगामांतील साखरेच्या पुरवठ्याची परिस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. १ नोव्हेंबर १९४८ रोजीं युक्त प्रांत आणि बिहारमधील साखर-कारखान्यांतील २$\frac{3}{4}$ लक्ष टन साखर शिल्लक होती. १९४८–४९ च्या हंगामांत हिंदुस्थानांत १० लक्ष टन साखर नवीन तयार झाली. म्हणजे या हंगामांत एकंदर १२$\frac{3}{4}$ लक्ष टन साखर हिंदुस्थानांत उपलब्ध होती. १९४७–४८ च्या हंगामांत ९,२०,००० टन साखर हिंदुस्थानांत खपली होती. या काळांत साखरेवरील निर्बंध काढण्यांत आले होते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. १९४८–४९ च्या हंगामांतील एकंदर साखरपुरवठा या खपाच्या मानानें जवळजवळ ३$\frac{1}{2}$ लक्ष टनांनीं जास्त होता. असें असूनहि साखरेचें दुर्भिक्ष ज्या संघानें निर्माण केलें त्या संघाचें किती कौतुक करावें!

ऑक्टोबर १९४८ च्या साखर–नियंत्रण-मंडळाच्या वार्षिक सभेंत संघाबद्दल बऱ्याच तक्रारी करण्यांत आल्या व चौकशी नियंत्रण-मंडळानें सुरू केली, याचा उल्लेख वर केलाच आहे. १७ जानेवारी १९४९ रोजीं साखर–

नियंत्रकानें संघाच्या चिटणिसास पत्र लिहून त्यांत "प्रत्येक साखर-कारखान्याच्या उत्पादनापैकीं किती भाग साखर-बाजारांत नेण्याची परवानगी संघानें दिली व त्यापैकीं किती साखर प्रत्यक्ष खपली याची तपशीलवार माहिती आगाऊ साखर-नियंत्रण-मंडळाकडे पाठवावी" असें कळविलें. २४ जानेवारी १९४९ रोजीं संघाच्या अध्यक्षांनीं या पत्रास उत्तर धाडलें व त्यांत "साखरेच्या पुरवठ्याचे भाग बाजारांत नेण्यासाठीं 'मोकळे' करतांना संघास फार तांतडीनें निर्णय करावा लागत असल्यामुळें त्याची माहिती आगाऊ कळवितां येणार नाहीं" असें कळविलें. त्यावर २७ जानेवारीस साखर-नियंत्रकानें पत्र पाठवून आक्षेप घेतला व १९४० च्या संयुक्त पत्रकान्वयें या बाबतींतील संघावर पडणाऱ्या जबाबदारीची त्यास जाणीव करून दिली. त्याला ७ फेब्रुवारी रोजीं संघाच्या अध्यक्षांनीं उत्तर धाडून वरील संयुक्त पत्रकाची आपणांस माहिती नाहीं असें कळविलें व इतर नाना बयादी काढून कालहरणाचा डाव मांडला. बरीच पत्रापत्री झाल्यावर ८ मार्च रोजींच्या पत्रांत संघाच्या अध्यक्षांनीं अशी सूचना केली कीं, कारखान्याच्या उत्पादनापैकीं किती भाग बाजारांत नेण्यासाठीं 'मोकळा' करावयाचा, हें संघ ठरवील व त्यास साखर-नियंत्रकानें नंतर औपचारिक मान्यता द्यावी. या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती वेळोवेळीं युक्त प्रांत सरकारकडे धाडण्यांत येत होत्या. शेवटीं १२ मे १९४९ रोजीं युक्त प्रांत-सरकारनें संघास पत्र लिहून १९४० च्या संयुक्त पत्रकांतील सर्व अटी संघानें पाळल्या पाहिजेत व तसें न केल्यास संघाची कायदेशीर मान्यता सरकारला काढून घ्यावी लागेल अशी सक्त ताकीद दिली. तथापि, संघानें तीस जुमानलें नाहीं. १२ मे पर्यंत साखर-कारखान्यांच्या उत्पादनापैकीं ५० टक्के साखर बाजारांत नेण्यासाठीं संघानें 'मोकळी' केली होती. युक्त प्रांत-सरकारनें वरीलप्रमाणें ताकीद दिल्यावरहि संघानें १४ मेला १० टक्के, १७ जूनला १० टक्के व २८ जूनला आणखी १० टक्के साखर साखर-नियंत्रण-मंडळाच्या परवानगीशिवाय 'मोकळी' केली. म्हणजे एकंदर उत्पादनापैकीं ८० टक्के साखरेची अशी विल्हेवाट लागली! २० जुलै रोजीं वर उल्लेखिलेल्या कृत्यांना साखर-नियंत्रण-मंडळानें औपचारिक संमति द्यावी असें संघानें सुचविलें. लगेच २२ जुलैला संघाच्या चिटणिसानें साखर-नियंत्रकाकडे "कारखान्यांकडे उरलेली २० टक्के साखर बाजारांत नेण्यासाठीं 'मोकळी' करण्यास आगाऊ मान्यता द्यावी" अशी मागणी केली. त्याच वेळीं

संघाच्या अध्यक्षांनीं युक्त-प्रांत सरकारच्या औद्योगिक खात्याच्या चिटणिसांची गांठ घेऊन उरलेली २० टक्के साखर 'मोकळी' करण्याची परवानगी त्यांच्याकडून मिळविली व त्याप्रमाणें साखरनियंत्रकास कळविलें. तथापि, उरलेल्या २० टक्के साखरेंतून पुढच्या हंगामापर्यंत सर्व जनतेस साखर मिळण्याची संघानें काय व्यवस्था केली आहे ती आपल्यापुढें आल्याखेरीज उरलेली २० टक्के साखर 'मोकळी' करण्याचें साखर-नियंत्रकानें नाकारलें. यानंतर त्याच्यावर संघाकडून युक्त प्रांत-सरकारनें दिलेल्या परवानगीच्या आधारावर बरेंच दडपण आणण्यांत आलें. त्यामुळें २९ जुलै १९४९ रोजीं उरलेल्यापैकीं निम्मी म्हणजे १० टक्के साखर मोकळी करण्यास त्यानें परवानगी दिली. १९ ऑगस्टला आणखी ५ टक्के साखर मोकळी करण्याबद्दल संघानें साखर-नियंत्रकास तारेनें विनंति केली ती त्यानें अमान्य केली. २३ ऑगस्ट रोजीं संघाच्या अध्यक्षांनीं त्यास पुन्हा तार करून उरलेली सर्व साखर 'मोकळी' करण्याची विनंति केली. तीहि धुडकावण्यांत आली. यानंतर लवकरच साखरेवर पुन्हां नियंत्रण बसविण्यांत आलें.

वरील तपशीलवार हकीगतीवरून सरकारी नियंत्रण झुगारून देऊन आपली तुंबडी भरण्याचा उद्योग संघानें कसा पद्धतशीर रीतीनें केला हें उघड होईल. तथापि, एवढ्यानेंच भागलें नाहीं. आणखी कितीतरी गैरकायदा गोष्टी संघानें केल्या होत्या. २६ ऑगस्ट १९४९ रोजीं युक्त प्रांत-सरकारनें सर्व साखरेचे सांठे गोठविले. त्यानंतर सुद्धां पुष्कळ कारखान्यांनीं साखरेची विक्री केली असें नंतर आढळून आलें. त्याचप्रमाणें साखरेची किंमत दर मणीं रु. २८–८–० ठरली होती. ती साखर-नियंत्रण-मंडळाच्या परवानगीशिवाय संघानें प्रथमपासूनच रु. २८–१२–० इतकी वाढविली. साखरेची कमी दरानें हिंदुस्थानबाहेर निर्यात करण्यामुळें जो तोटा होईल तो भरून काढण्याच्या हेतूनें संघानें दर मणास ४ आणे या दरानें एक फंड जमा करण्यासाठीं ही किंमत वाढविण्यांत आली होती, असें संघाच्या प्रतिनिधींनीं हिंदी जकातमंडळानें केलेल्या चौकशीच्या वेळीं सांगितलें.

संघानें आपल्यावरील नियंत्रणें झुगारून देण्यासाठीं कोणत्या कारवाया केल्या, याची ही हकीगत झाली. आतां प्रत्यक्ष व्यवहारांत साखरेचें दुर्भिक्ष कसें निर्माण झालें याकडे वळलें पाहिजे. १९४८–४९ च्या हंगामांत मागील हंगामापेक्षां जवजवळ ३½ लक्ष टन जास्त साखर उपलब्ध होती याचा वर उल्लेख केलाच आहे. असें असून सुद्धां साखर दुर्मिळ कशी झाली?

१९४८–४९ च्या हंगामांत साखर बाजारांत नेण्यासाठीं 'मोकळी' करण्यांत संघानें आपला हात फार ढिला सोडला होता. १९४७–४८ च्या हंगामाच्या सुरुवातीपासून २१ जून १९४८ पर्यंत संघानें १,७४,००० टन साखर 'मोकळी' केली होती. परंतु १९४८–४९ च्या हंगामाच्या सुरुवातीपासून १८ जन १९४९ पर्यंत संघानें ७,७५,००० टन साखर 'मोकळी' केली म्हणजे मागल्या हंगामाच्या मानानें त्याच मुदतींत चौपटीहून अधिक साखर संघानें 'मोकळी' केली. बाजारांतील वाढत्या खपामुळें इतकी साखर 'मोकळी' करावी लागली, असें त्याचें संघानें समर्थन केलें आहे. परंतु वास्तविक प्रकार निराळा दिसतो. जून १९४९ पर्यंत हंगामाच्या एकंदर उत्पादनापैकीं ८० टक्के साखर संघानें 'मोकळी' केली होती याचा वर उल्लेख केलाच आहे. हिंदी जकात-मंडळानें केलेल्या चौकशीच्या वेळीं संघाच्या अध्यक्षांनीं सांगितलें कीं, एप्रिल, मे व जून (१९४९) या महिन्यांत साखरेस कमी मागणी असल्यामुळें ठरलेल्या दरा-(म्हणजे मणास रु. २८–८–०) पेक्षां सुद्धां कमी भावानें कांहीं वेळां साखर विकली जात होती. या विधानाचा आणि वाढत्या मागणीमुळें पुष्कळ साखर 'मोकळी' करावी लागली या समर्थनाचा मेळ कसा घालावयाचा? इतर पुराव्यावरून मागणी फार नव्हती, नेहमींप्रमाणेंच होती, असें दिसतें. हा पुरावा नीट समजण्याच्या दृष्टीनें साखर "मोकळी" करण्याच्या पद्धतीचा अर्थ प्रथम विशद केला पाहिजे. कारखान्यांत तयार झालेल्या साखरेपैकीं किती भाग बाजारांत नेण्यासाठीं "मोकळा" करावयाचा हें ठरवावयाचा संघास अधिकार होता. संघानें भाग "मोकळा" करावयाचा याचा अर्थ तितकी साखर कारखान्यांना विकण्यास परवानगी द्यावयाची. अशी परवानगी मिळेपर्यंत कारखान्यांना साखर विकण्याची परवानगी नव्हती. संघानें उत्पादनाचा विशिष्ट भाग "मोकळा" केला म्हणजेच तो भाग कारखान्यांना विकण्याची मुभा दिली; म्हणजे त्यापैकीं प्रत्यक्ष किती साखर विकावी वगैरे बाबतींत कारखान्यांस संपूर्ण स्वातंत्र्य मिळे. अर्थात् संघानें ठरविलेल्या किंमतीस ती विकण्याचें त्यांजवर बंधन असे (अर्थात् तें संघानें घातलें तर!). साखरेस वाढती मागणी असती, तर संघानें साखर "मोकळी" केल्याबरोबर कारखान्यांनीं ती बाजारांत रवाना केली असती व ती विकली गेली असती; परंतु तसें झालेलें दिसत नाहीं. मार्चअखेर ५० टक्के व जूनअखेर ८० टक्के साखर संघानें "मोकळी" करून सुद्धां त्या मुदतींत अनुक्रमें २२ टक्के

५५ टक्के साखरच बाजारांत रवाना झालेली होती. यावरून प्रमाणाबाहेर साखर मोकळी करण्यामागें संघाचा दुसराच हेतु असावा हें स्पष्ट दिसतें. साखरेचें दुर्भिक्ष निर्माण करून किंमती वाढविणें हाच तो हेतु. गरजेपेक्षां जास्त "साखर" मोकळी करण्यांत हा हेतु होता, असें म्हणणें कदाचित् 'वदतो व्याघातां'चें उदाहरण वाटण्याचा संभव आहे. परंतु तें तसें नाहीं. कारखान्यांत असलेली साखर संघानें मोकळी केलेली नसेल तर ती किती आहे, कोठें आहे, कोणत्या प्रतीची आहे याची माहिती संघाकडे असावी लागे. तसाच प्रसंग आला तर सरकारला ती तशा परिस्थितींत ताब्यांत घेणें सोपें व सोईचें असतें. परंतु एकदां ती "मोकळी" केली कीं तिची माहिती फक्त कारखानदारालाच ! तो आपल्या मर्जीप्रमाणें तिची विक्री करणार, अगर सांठा करणार. त्याच्यावर कांहींच बंधन नव्हतें व त्यानें प्रत्यक्षांत साखर विकली, कीं सांठविली, किती विकली, हें समजण्यास मार्ग नव्हता. थोडक्यांत, 'मोकळी' झालेली साखर वेळप्रसंगीं सरकारला मिळणें अगर ताब्यांत येणें अशक्य. संघानें गरजेपेक्षां पुष्कळच जास्त साखर 'मोकळी' करून साखर-कारखानदारांना भरपूर सांठे करून ठेवण्यास सवड व आंतून उत्तेजनाहि दिलें.

तथापि, येवढ्यानें संघाचा कार्यभाग पूर्णपणें साधला नसता. यासाठीं साखर दुर्मिळ होणार आहे अशा तऱ्हेची हांकाटी करून व्यापाऱ्यांना त्यांच्या नियतकर्तव्याप्रमाणें सांठेबाजी करण्यास प्रवृत्त करणें आवश्यक होतें. म्हणजे सांठेबाजी करून किंमती वाढविण्यांत त्यांची मदत संघास हमखास मिळणार होती. शिवाय साखर-व्यापाऱ्यांचा किंमत वाढविण्यांत व दुर्भिक्ष निर्माण करण्यांत थोडाफार हात असला म्हणजे त्या सर्व प्रकाराची जबाबदारी त्यांच्या माथीं मारून संघास पुन्हां उजळ माथ्यानें वावरणें सहज शक्य होतें संघाचे एक प्रसिद्ध व वजनदार सभासद लाला करमचंद थापर यांनीं साखर-गोंधळा-बाबत लिहिलेल्या आपल्या पुस्तकांत "जूनपासून साखरेचा तुटवडा पडेल व जुलैपासून तो विशेष जाणवेल" असें साखर-कारखानदारांच्या एका शिष्टमंडळानें युक्त प्रांताच्या शेतकीमंत्र्यास बजावलें होतें अशी माहिती दिली आहे. ही भविष्यवाणी खरी करण्याच्या दृष्टीनेंच संघाचें धोरण आंखण्यांत आलें होतें असा हिंदी जकात-मंडळानें आपला अभिप्राय नमूद केला आहे.

मे-जूनपासून बहुधा संघानें साखरेच्या भावीं टंचाईबद्दल व्यापारी वगैरेंना सूचना देण्यास प्रारंभ केला असावा. १८ जून १९४९ रोजीं साखर-कारखान्यांजवळ संघानें न मोकळी केलेली जवळ जवळ २,१४,००० टन,

हंगामाच्या एकंदर उत्पादनापैकीं ३० टक्के, साखर होती व या पुरवठ्यांतून पुढच्या हंगामांतील साखर येईपर्यंत ५-६ महिने सर्व देशांतील साखरेची मागणी भागवावयाची होती. ही गोष्ट साखर बाजारास माहीत होती. त्यामुळें साखरेचा तुटवडा पडण्याचा संभव आहे, अशी तेथील व्यापाऱ्यांनीं खूणगांठ बांधलीच होती व साखरेचे सांठे करण्यासहि सुरुवात केली होती. २८ जूनला संघानें आणखी १० टक्के साखर "मोकळी" केल्याची बातमी आली. त्यामुळें वरील तर्कास बळकटी आली व अधिक मोठ्या प्रमाणांवर सांठे करण्यास व्यापाऱ्यांनीं सुरुवात केली. यासाठीं त्यांना साखर-कारखान्यांनीं पूर्वींच "मोकळी" केलेली साखर भरपूर प्रमाणांत पुरविली व आगगाड्यांच्या अधिकाऱ्यांनीं या साखरेच्या वहातुकीसाठीं "वाघिणी" या काळांत पुरवून ती व्यापाऱ्यांच्या गुदामांतून पोंचविण्यास सढळ हातानें मदत केली.

परंतु येवढ्यानेंच झालें नाहीं. वर वर्णन केलेल्या परिस्थितींत जुलै १९४९ मध्यें हिंदुस्थानांतून ५०,००० टन साखर पाकिस्तान व इंग्लंड या देशांत निर्यात करण्याची हिंदुस्थान-सरकारनें परवानगी द्यावी अशी खटपट संघानें सुरू केली. हिंदुस्थानांतील भावानें बाहेर साखर खपण्यासारखी नसल्यानें निर्गत साखरेची किंमत कमी करण्यासंबंधींची एक योजना संघानें सरकारपुढें मांडली. ती अशी: हिंदुस्थान-सरकार दर मणीं रु. २–१२–० कर घेतें तो व प्रांतीय सरकार रु. १–१४–० कर घेतात तो–हे कर निर्यात साखरेवर माफ करावे. मणामागें रु. २ इतकी किंमत साखर-कारखाने नुकसान सोसून कमी करतील व शिवाय दरमणीं ४ आणे प्रमाणें जो फंड संघानें जमविला होता त्याचाहि किंमत कमी करण्याकडे उपयोग केला जाईल. म्हणजे, निर्यात साखरेची किंमत जवळजवळ मणास रु. २०–२१ पर्यंत होईल व साखरेच्या परदेशांतील किंमतींबरोबर येईल. मग साखर निर्यात करणें शक्य होईल.

साखर निर्यात करण्याची खटपट संघ करीत आहे ही बातमी बाहेर फुटल्याबरोबर साखर-बाजारांत चलबिचल झाली. साखरेचा शिल्लक सांठा फक्त २० टक्के व त्यांतून ही निर्गत होणार असा रागरंग पाहतांच घबराट निर्माण झाली. व्यापाऱ्यांनीं प्रचंड प्रमाणावर साखरेचे सांठे करण्यास सुरुवात केली व साखरेचे भाव सर्वत्र वाढूं लागले. जून ते जुलै १९४९ मधल्या काळांत साखरेच्या किंमती १३–१४ टक्क्यांनीं वाढल्या आणि १५ ऑगस्टच्या, स्वातंत्र्यदिनाच्या वेळीं त्यांनीं उच्चांक गांठला! त्या वेळीं मुंबईत साखरेची

किंमत दर मणास रु. २८–८–० होती व कानपुरास रु. ३६–०–० होती. साखरेच्या किंमती वाढूं लागतांच सरकारनें संघास किंमती स्थिर ठेवण्याच्या करारार्ची आठवण दिली तेव्हां संघानें सरकारास कळविलें कीं, "आम्ही साखरेची किमान किंमत ठरवूं शकतों ती मणास रु. २८–८–० आहे. परंतु त्यापेक्षां जास्त किंमतीनें साखर विकण्यावर आमचें कांहींच नियंत्रण नाहीं. तेव्हां आम्हांस यांत कांहींच करतां येत नाहीं."

जुलैपासून साखरेची परिस्थिति बिघडत चालली होती व त्यावर काय उपाय करावा अशी वरवर चर्चा हिंदुस्थान-सरकार, युक्त व बिहार-प्रांतीय सरकारें यांच्यांत चालली होती असें दिसतें; तथापि, परिस्थिति इतकी बिकट होईल असें त्यांपैकीं कोणासच वाटलें नसावें. या तिघांनीं एकमुखानें कांहीं ठरविण्याच्या दृष्टीनें चर्चाच झाली नाहीं. किंबहुना संपूर्ण परिस्थितीची त्यांपैकीं एकालाहि स्पष्ट कल्पना नव्हती. अशा स्थितींत ऑगस्टमध्यें परिस्थिति निकरावर आली तेव्हां युक्त प्रांत सरकारनें २६ ऑगस्ट १९४९ रोजीं एक हुकूम काढून आपल्या प्रांतांतील साखरेचे सर्व सांठे गोठविले! तथापि, बिहार व इतर प्रांत यांमध्यें अशा तऱ्हेचे हुकूम त्याच वेळीं काढले गेले नाहींत. त्यामुळें तेथील कारखानदार व व्यापारी यांना बरीचशी साखर 'भूमिगत' करतां आली. सर्वत्र एकसमयावच्छेदेंकरून साखरेंचे सांठे सरकारनें कसोशीनें गोठवून आपल्या ताब्यांत घेतले असते तर जवळजवळ १ ते १½ लक्ष टन साखर 'भूमिगत' न होतां सरकारच्या हातीं आली असती. आणि ती व कारखान्यां-तून शिलक असलेली व इतर साखर मिळून जनतेस नेहमीं लागते तितकी साखर सरकारला आपल्या नियुक्त दुकानांतून पुरवितां आली असती असें हिंदी जकात-मंडळानें आपल्या अहवालांत म्हटलें आहे.

वर नमूद केलेल्या गोष्टी व घटना यांवरून साखरेचें दुर्भिक्ष कां निर्माण झालें याची स्पष्ट कल्पना येऊं शकते. साखरेचें दुर्भिक्ष मुख्यतः सांठेबाजीमुळें निर्माण झालें. ही सांठेबाजी करण्यास संघानें उत्तेजन दिलें व सहकार्य केलें. युक्त प्रांत, बिहार येथील सरकारांनीं व हिंदुस्थान-सरकारनें यावर उपाययोजना करण्यांत दिरंगाई केली व जी केली ती सर्वत्र एकदम न केल्यामुळें व्यापा-ऱ्यांच्या सांठेबाजीस साहाय्यच केलें. आगगाड्यांच्या अधिकाऱ्यांनीं वाहतुकीची व्यवस्था प्रमाणाबाहेर "वाघिणी" पुरवून केली व सांठेबाजीस मदतच केली. या सर्वांचा परिणाम साखरेच्या दुर्भिक्षांत झाला.

हिंदी साखरेस संरक्षण देण्यासंबंधींच्या आपल्या अहवालांत हिंदी जकात मंडळानें साखरेचें दुर्भिक्ष निर्माण करण्याची जबाबदारी बहुतांशीं संघावर घातली व त्याची कायदेशीर मान्यता काढून घ्यावी अशी शिफारस केली. त्याचप्रमाणें साखरेच्या धंद्यास सध्यां संरक्षणाची जरूर नसल्यामुळें परदेशी साखरेच्या आयतीवरील संरक्षक जकाती रद्द कराव्या असेंहि सुचविलें. या दोन्ही सूचना सरकारनें मान्य केल्या व त्याप्रमाणें कृतीहि करण्यांत आली. शिवाय साखर-गोंधळाची सरकारनें स्वतंत्र चौकशी करावी असेंहि हिंदी जकात मंडळानें सुचविलें होतें. त्यासंबंधीं बरीच टाळाटाळ व कालहानि करून शेवटीं एक चौकशीसमिति नुकतींच नेमण्यांत आली आहे. या चौकशींत आणखी कित्येक गोष्टी बाहेर येण्याचा संभव आहे.

साखरेचें दुर्भिक्ष कां व कसें निर्माण झालें याचा जो इतिहास वर दिला आहे त्यावरून हें दुर्भिक्ष निर्माण करणारा मुख्य गुन्हेगार संघ, असें सहज वाटण्यासारखें आहे. परंतु सरोखर पाहतां त्याचा मुख्य दोष सरकारलाच दिला पाहिजे. संघाचें धोरण किंमती वाढविण्याचें आहे ही गोष्ट सरकारला अज्ञात नव्हती. संघाची पूर्वपीठिका व इतिहास लक्षांत घेतां सरकारनें त्यावर कडक नियंत्रण ठेवणें जरूर होतें. या आपल्या कर्तव्यास सरकार मुळींच जागलें नाहीं. संघानें कमी भावानें पाकिस्तानांत साखर विकली. तथापि सरकारनें त्यास कोणताच विरोध केला नाहीं हें कसें समर्थनीय ठरेल ? आपण नेमलेल्या साखर-नियंत्रण-मंडळानें दिलेल्या हुकुमाची चौकशी न करतां त्याच्या विरुद्ध हुकूम युक्तप्रांत सरकारनें दिला यास अनागोंदी कारभार म्हणावा कीं मूर्खपणा म्हणावा ? साखरेच्या किंमती ठरवितांना सरकारनें सामान्य गिऱ्हाइकाच्या हिताकडे दुर्लक्ष करावें, यावरून लोकनियुक्त सरकारच्या शीलासंबंधीं कोणता तर्क बांधावा? या सर्व प्रश्नांचा विचार केल्यास मुख्य दोष सरकारकडेच जातो. त्याच्या खालोखाल संघास दोष दिला पाहिजे. संघाच्या एकंदर वागणुकीवरून देशांतील उद्योगपतींच्या तत्त्वज्ञानाची व त्यांच्या धोरणाची स्थूल मानानें कल्पना येण्यास हरकत नाहीं. कापड-गिरण्यांचें उदाहरण आपल्यापुढें आहेच. साखर-कारखानदारांचें अलीकडे प्रकर्षानें लोकांच्या समोर आलें आहे. " नफा, अधिक नफा आणि जास्तींत जास्त नफा " हेंच त्यांचें मुख्य सूत्र. मग त्यासाठीं कोणतीहि अयोग्य, निंद्य अगर नीच गोष्ट करण्यास ते मागेंपुढें पाहणार नाहींत. सामान्य जनतेचें हित, देशाचें कल्याण या गोष्टी त्यांच्या वर्शीवगींहि नाहींत. त्यांच्या बेबंद कारभारावर व व्यवहारावर योग्य नियंत्रण घालण्यास या देशांतील

आपणांस जनतेचें म्हणविणारें सरकार दुर्बल ठरलें आहे; इतकेंच नव्हे तर गेल्या २-३ वर्षांतील त्याचें धोरण वगैरे पाहतां तें अधिकाधिक या गटांच्या हिताला पोषक व त्यामुळेंच सामान्य जनतेच्या हितास मारक होत चाललेलें दिसतें. अशा स्थितींत दुर्भिक्षें निर्माण न होतील तरच नवल! एका सुभाषितांत म्हटलेंच आहे :

अपूज्या यत्र पूज्यन्ते पूज्यानां तु विमानना।
त्रीणि तत्र प्रवर्तन्ते दुर्भिक्षं मरणं भयम्॥

---

# भाग ३ : संकीर्ण

## १८. हिंदी अर्थशास्त्राचा पाया *

एकोणिसशें बेचाळीस सालीं न्यायमूर्ति रानडे यांच्या जन्मास १०० वर्षें लोटतात व त्याच सालीं त्यांनीं हिंदी अर्थशास्त्र या विषयावर केलेल्या विवेचनाला ५० वर्षें पुरीं होत आहेत. 'हिंदी अर्थशास्त्र' या विषयावरील निबंधांतील विचार न्यायमूर्तींनीं प्रथम १८९२ सालीं डेक्कन कॉलेजांतील एका व्याख्यानप्रसंगीं पुढें मांडले. याच्या आधीं विशिष्ट आर्थिक विषयावर जरी त्यांनीं बरेच लेख लिहिले होते व नंतरहि कांहीं विवेचनें केलीं, तरी वरील व्याख्यानांत ज्या पद्धतीनें त्यांनीं अर्थशास्त्र व आर्थिक धोरण यांच्या मूल तत्त्वांचा विचार केला आहे ती पद्धत इतरत्र आढळत नाहीं. या निबंधांत आपल्या अर्थशास्त्राच्या व्यापक वाचनाचें व हिंदी आर्थिक परिस्थितीच्या अभ्यासाचें व अवलोकनाचें सर्व सार रानडे यांनीं ओतलें आहे. यामुळें त्यांच्या अर्थशास्त्रविषयक विचारांची बैठक या लेखावरूनच समजून येते. तसेंच नवीन पद्धतीच्या हिंदी आर्थिक प्रश्नांच्या विचाराचा उगमहि येथूनच झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

रानडे यांच्या या लेखाची व्याप्ति आणि त्यांतील विचारांचें मूलगामित्व इतकें आहे कीं, त्यांचें विस्तारानें विवेचन एका लेखांत करणें अशक्य आहे. म्हणून या निबंधांतील प्रमुख विचार सारांशानें देणें व त्यांचें आजतागायत महत्त्व थोडक्यांत दाखविणें एवढेंच आम्हीं येथें करण्याचें योजलें आहे.

या निबंधाच्या सुरुवातीसच रानडे यांनीं आपली एकंदर भूमिका स्पष्ट केली आहे. सर्व प्रकारच्या समाजशास्त्रांत निश्चित, सनातन, सर्व काळीं व सर्व स्थळीं लागू पडणारीं प्रमेयें कोणासहि मांडतां येणार नाहींत, हाच या लेखांतील पहिल्या परिच्छेदांत मांडलेला मुख्य सिद्धान्त होय. समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र या सर्व शास्त्रांतर्गत प्रश्नांचा कालपरिस्थित्यनुरूप सापे-

---

* सह्याद्रि, जानेवारी १९४२

क्षतेनें विचार करावा लागतो. म्हणून इंग्रज अर्थशास्त्रज्ञांच्या पुस्तकांतून प्रतिपादिलेल्या तत्त्वांचा पुरस्कार आपल्याकडे बिनधोक करतां येणें शक्य नाहीं. कारण इंग्लंडमधील परिस्थिति व हिंदी परिस्थिति यांत अनेक दृष्टींनीं जमीन-अस्मानाचें अन्तर आहे. हिंदुस्थान व इंग्लंड यांमधील या भिन्नत्वामुळें समाजविकास किंवा समाजधारणेचीं तत्त्वें या दोन देशांत एक असणें शक्य नाहीं, असें रानडे यांनीं अनेक उदाहरणें देऊन दर्शविलें. ज्यांचे मूलभूत सिद्धान्त त्रिकालाबाधित आहेत अशा पदार्थविज्ञान अथवा खगोलशास्त्राप्रमाणें जर अर्थशास्त्र असतें तर गोष्ट निराळी. परंतु वेळ, परिस्थिति, व्यक्तींची कुवत व त्यांच्या आकांक्षा, समाजसंस्थांचीं व शासनसंस्थांचीं बंधनें या सर्वांचा जेथें निकट संबंध येतो, तेथें सर्वच ठिकाणीं व नेहमींच सारखे सिद्धान्त लागू पडणें शक्य नाहीं. या प्राथमिक विवेचनावरूनच रानडे यांची भूमिका किती व्यापक आणि त्यांची विचारसरणी किती शुद्ध होती हें दिसून येईल. यानंतरच्या विवेचनांत तपशिलांत शिरून एकंदर इंग्रजी अर्थशास्त्राचा इतिहास व त्या शास्त्रांतील सिद्धान्तांचीं गृहीत प्रमेयें यांची छाननी त्यांनीं केली आहे.

जरी सुरुवातीचे कांहीं इंग्रज लेखक आपले सिद्धान्त मांडतांना प्रत्यक्ष परिस्थितीचा सतत विचार आपण करीत आहों असें समजत तरी मिल्ल, केरन्स इत्यादि आधुनिक लेखकांस या बाबतींतील उणेपणा कांहींसा कळून आला आहे असें रानडे यांनीं दर्शविलें आहे. परंतु या सर्वच इंग्रज अर्थ-शास्त्रज्ञांनीं आपल्या विवेचनांत कांहीं गोष्टी स्वतःसिद्ध मानल्या आहेत. या बाबी जरी इंग्लंडपुरत्या गृहीत धरणें योग्य वाटलें, तरी हिंदुस्थानांत त्यांचें अस्तित्व केव्हांहि गृहीत धरतां येणार नाहीं. बेझंट, जेव्हन्स, सिजिक इत्यादि आधुनिकांना सनातन इंग्रजी अर्थशास्त्राची बैठक सदोष वाटते व तिची व्याप्ति प्रचलित इंग्रजी परिस्थितीपुरतीच आहे हेंहि त्यांस कळून चुकलें आहे. परंतु इंग्रजेतर लेखकांतच एकंदर सनातन इंग्रजी विचाराविरुद्धचा प्रवाह इंग्रज लेखकांपेक्षां अधिक स्पष्ट दिसतो. ॲडम स्मिथ व त्याचे समकालीन लेखक यांच्या विचारांच्या ओघाची दिशा ज्याप्रमाणें पूर्वकालीन परिस्थितीविरुद्ध प्रतिक्रिया अशा स्वरूपाचीच उघड दिसते, त्याचप्रमाणें नवीन जर्मन—विशेषतः लिस्ट—व अमेरिकन अर्थशास्त्रज्ञांच्याहि भूमिकेचें स्वरूप आहे. सर्व प्रकारें नियंत्रित व निर्बंधित आर्थिक व्यवस्थेचे दुष्परिणाम जेव्हां विशेष भासूं लागले, तेव्हां निसर्गसिद्ध हक्क व वैयक्तिक स्वातंत्र्य यांचें महत्त्व प्रत्येक क्षेत्रांतील

तत्त्वज्ञ प्रतिपादूं लागले. याच्या उलट अनिर्बंध व्यवहार, खुला व्यापार, पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य हीं जेथें देशकालपरिस्थितीस पोषक नाहींत असें दिसून आलें, तेथें त्यांच्याविरुद्ध राष्ट्रव्यवस्थेचर जोर देण्यांत येऊं लागला. इंग्रज अर्थशास्त्रज्ञांनीं आपले सिद्धान्त कांहीं गृहीत प्रमेयें धरून त्यापासून परिस्थितीचा विचार न करतां केवळ तर्कानें काढले, तर आतां इतर अर्थशास्त्रज्ञ इतिहास-परिस्थितीचा अभ्यास व आंकडेशास्त्र यांची जोड घेऊनच अर्थशास्त्रीय सिद्धान्त बसविले पाहिजेत असें प्रतिपादूं लागले आहेत. हें सर्व विवेचन रानडे यांनीं निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांचीं नांवें देऊन व त्यांचे प्रमुख सिद्धान्त चोटकपणें सांगून सजविलें आहे. या सर्व विवेचनाचा पुढीलप्रमाणें निष्कर्ष रानडे यांनीं काढला आहे — अर्थशास्त्र हें व्यापक समाजशास्त्राचेंच एक उपांग असल्यामुळें त्याचा विचारहि मुख्यतः मानवेतिहासदृष्ट्या प्रत्यक्ष परिस्थिति अभ्यासून केला पाहिजे. त्यांतील सिद्धान्तांची सापेक्षता सतत लक्षांत ठेवली पाहिजे व या सर्व अभ्यासाचें ध्येय मुख्यतः समाजहित साधणें हें आहे हेंहि विसरतां उपयोगी नाहीं. म्हणूनच आपणास हिंदुस्थानच्या परिस्थितीस अनुरूप असाच विचार करणें प्राप्त आहे.

रानडे यांनीं हिंदी परिस्थितीबद्दल विचार करतांना मुख्यतः दोन — तीन सिद्धान्त परीक्षिले. भूपृष्ठाच्या भिन्न खंडाखंडांतील आर्थिक व्यवसाय-विभागणीबाबतचा सिद्धान्त हा त्यांतील पहिला होय. उष्ण प्रदेशांतील लोकांनीं कृषिव्यवसाय नेहमीं करावा व समशीतोष्ण प्रदेशांतच आर्थिक धंदे चालावे, असें यांत्रिक युगांतील कांहीं इंग्रज अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादीत. त्यांच्या मतें हा जणु एक निसर्गसिद्ध नियमच होता. रानडे यांनीं याविरुद्ध जुना इतिहास व पुढील शक्यता यांकडे बोट दाखवून सद्यःकालीन परिस्थिति ही कशी तात्कालिक आहे हें स्पष्ट केलें आहे. केवळ अलीकडील यांत्रिक उत्पादनाच्या स्पर्धेमुळें व तेंहि परकीय राज्यकर्त्यांनीं या देशाच्या हिताचा दूरदृष्ट्या विचार न केल्यामुळेंच हिंदुस्थान व तत्सम देश हे फार मोठ्या प्रमाणांत शेतकीप्रधान झाले. कोणाचाहि तात्पुरता फायदा कितीहि असला तरी ज्यांत सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवसायांचें अस्तित्व योग्य प्रमाणांत टिकून राहतें अशा प्रकारची व्यवस्थां: शाश्वत व हितावह आहे. आणि म्हणून नवीन परिस्थितीमुळें जुने व्यवसाय बुडाले, कांहीं जुनीं पिकें बिनफायदेशीर झालीं तर हा परिस्थितीचा दोष असें मानून असहाय्यपणें स्वस्थ न बसतां, नवीन वसाहती वसविणें व कृषिव्यवस्थेस पद्धतशीर नवीन

वळण लावणें हें शासनसंस्थेचें कर्तव्य आहे, असेंच केव्हांहि खरा अर्थ-शास्त्रज्ञ मानील. तसेंच खंड हा जमीनदाराचा निसर्गसिद्ध हक्क आणि त्यांचे कुळाचे किंवा धनकोचे व ऋणकोचे संबंध हे नेहमीं अनियंत्रित असले पाहिजेत असें न मानतां, व्यापक समाजहिताचा विचार करून संपत्तीची न्याय्य विभागणी करणें व जेथें शिरजोर जुलूम करीत आहेत तेथें गरीब व दुबळ्यांचें संरक्षण करणें हेंच सरकाराचें खरें कर्तव्य ठरतें. यापुढें जाऊन एकंदर सरकारी अधिकाराच्या अगर जबाबदारीच्या मर्यादेचा विचार केला असतां त्याबद्दल कोणताच शाश्वत सिद्धान्त मांडतां येत नाहीं असें रानडे स्पष्ट लिहितात. हा प्रश्न व्यक्तिगत हक्क अगर आचारस्वातंत्र्य याबद्दलचा विचार करून सुटण्यासारखा नाहीं. काल व परिस्थिति, युक्तता व व्यवहार्यता यांकडे पाहूनच तो सोडवावा लागेल. इंग्लंडांतहि सरकारनें बऱ्याच नवीन जबाबदाऱ्या अलीकडे पत्करल्या आहेत व हिंदुस्थानांत तर त्यास अनेक क्षेत्रांत प्रवेश करणें प्राप्त आहे. या बाबतींत अमेरिका व युरोप खंडांतील कांहीं देश यांतील परिस्थितीशीं हिंदुस्थानचें इंग्लंडपेक्षां पुष्कळच जास्त साम्य आहे, म्हणून तेथील अनुभव व तेथील विचार आपणास जास्त लागू पडतात असें समजून आपलें राष्ट्रीय धोरण आंखणें आवश्यक आहे.

रानडे यांच्या या लेखाचा मथळा 'इंडियन पोलिटिकल इकॉनमी' असा आहे. याचें भाषांतर 'हिंदी अर्थशास्त्र' असें केलें तर तें पूर्णपणें यथार्थ होत नाहीं. ॲडॅम् स्मिथच्या ग्रंथाचा प्रमुख विषय राष्ट्रांच्या संपत्तीची वाढ असा होता व त्याच्यानंतर जवळजवळ १०० वर्षेंपर्यंत या स्मिथप्रणीत शास्त्रास नुसतें 'अर्थशास्त्र' किंवा 'संपत्तिशास्त्र' न म्हणतां 'राष्ट्र-संपत्तिशास्त्र' (पोलिटिकल इकॉनमी) असेंच म्हणण्याचा प्रघात होता. त्या वेळीं अर्थातच एकंदर राष्ट्रसंपत्तीचा साकल्यानें विचार करणें व सरकारी धोरणाचा विशेषानें ऊहापोह करणें हें या शास्त्राचें प्रमुख अंग समजलें जात असे. अलीकडे समाज, राष्ट्र व सरकार यांवर जुन्या काळीं देण्यांत येणारा भर कमी करण्यांत आला असून सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांचा सर्वसामान्य विचारच विशेषानें केला जातो. म्हणूनच राष्ट्रसंपत्तिशास्त्राचेऐवजीं केवळ संपत्तिशास्त्र अथवा अर्थशास्त्र हें नांव आज या शास्त्रास जास्त अन्वर्थक वाटतें. हें अलीकडील नांव रानड्यांच्या काळीं तितकेंसें रूढ झालेलें नव्हतें. शिवाय रानड्यांची दृष्टि समाजहित व राष्ट्रहित यांजवरच जास्त होती. त्यामुळें त्यांनीं आपल्या निबंधास 'इंडियन इकॉनॉमिक्स' — हिंदी अर्थशास्त्र —

असें नांव न देतां, 'इंडियन पोलिटिकल इकॉनमी' – हिंदी राष्ट्रीय अर्थशास्त्र–असें नांव दिलें असावें. या निबंधांत रानडे यांनीं ज्याप्रमाणें हिंदी परिस्थिति ध्यानांत घेतली असतां आर्थिक व्यवहाराबाबत कोणत्या प्रकारचे सिद्धान्त बांधतां येतात याचा विचार केला, त्याचप्रमाणें हिंदी राष्ट्रास कोणतें आर्थिक धोरण स्वीकारणें युक्त ठरेल याबद्दलहि आपले विचार मांडले आहेत. अलीकडे इंग्लंडांतहि कारखाने, मजूरसंघ इत्यादींच्या व्यवहारावर सरकारी निर्बंध घालण्यांत येऊन निर्भेळ अनिर्बंध व्यवहाराच्या तत्त्वास बाध आला आहे. हिंदुस्थानांतील परिस्थिति फार मागसलेली. तेथें स्वयंस्फूर्तीनें नवीन गोष्टी करण्याची ऐतद्देशीयांत प्रथा नाहीं. तेव्हां येथील शासनसंस्थांना–विशेषतः इंग्रज सरकाराला–स्वतः पुष्कळच बाबतींत पुढाकार घेणें जरूर आहे. कापूस, कोळसा, चहा इत्यादिकांच्या उत्पादनाविषयीं सरकारनें थोडे प्रयत्न केले आहेत; पण या देशाचें एकंदर क्षेत्र व येथील विविध उत्पादनसाधनें यांच्या मानानें ते फारच अपुरे पडतात. जरी राजकीय कारणांमुळें संरक्षक जकाती लादणें सरकारास शक्य नसलें तरी नवीन धंद्यांचा उपक्रम करणें अगर त्यांना हरतऱ्हेनें मदत करणें हें सरकारास खचित करतां येईल. त्याचप्रमाणें आधुनिक पद्धतीची राष्ट्रीय पतपेढी व्यवस्था ( Banking system ) उभारणें किंवा सरकारास लागणाऱ्या सर्व जिनसांच्या पुरवठ्यासाठीं स्थानिक मालाचा उपयोग करून घेणें या गोष्टी सरकारी कर्तव्याच्या मर्यादेंत येतात.

रानडे यांनीं या निबंधांत मांडलेल्या प्रमुख विचारांचें येथवर दिग्दर्शन झालें. हे मुद्दे ५० वर्षांनंतर पारखले असतां त्याबाबत काय म्हणतां येईल एवढेंच अतां थोडक्यांत सांगावयाचें.

रानड्यांची दृष्टि फार व्यापक होती. यामुळें त्यांनीं आपल्या विचारांची बैठकच अशी मांडली आहे कीं, एवढ्या कालावधीनंतर तींत कोठेंहि जुनेपणा दिसून येत नाहीं. जो लेखक केवळ आपल्या काळापुरता अगर परिस्थिती-पुरता विचार करून लिहितो त्याचें लिखाण तत्कालिक परिणामी ठरलें तरी तें पुढील पिढीस उद्बोधक वाटत नाहीं. रानड्यांच्यासारख्या द्रष्ट्याचें असें नसतें. एखाद्या केवळ तात्पुरत्या महत्त्वाच्या बाबीसंबंधीं जरी त्यांनीं लिहिलें तरी तें असें मूलभूत सिद्धान्त मांडून लिहिलेलें असावयाचें कीं, त्यांचे सिद्धान्त परिस्थिति पूर्ण बदलल्यावरहि भावी पिढीस मार्गदर्शक व्हावे. हा निबंध लिहि-तांना तर रानडे बुद्ध्याच मूलभूत सिद्धान्तांबद्दल लिहीत होते. तेव्हां त्यांतील

लिखाण आजहि मौलिक ठरल्यास आश्चर्य नाहीं. या निबंधांतील सिद्धान्त क्रमाक्रमानें घ्यावयाचे तर पहिला सिद्धान्त समाजशास्त्राच्या मूलभूत विचाराची काल-परिस्थिति-सापेक्षता हाच घ्यावा लागेल. १९ व्या शतकांत भौतिक-शास्त्राची जी अद्भुत प्रगति झाली त्यामुळें सर्व लोकांचे डोळे दिपून गेले व त्या शास्त्रांत अवलंबिलेल्या पद्धतीनें समाजविषयक प्रश्नांचा विचार केल्यास निरनिराळ्या समाजशास्त्रांतहि अशीच प्रगति होऊन आपणास मूलगामी शाश्वत सिद्धान्त बसवतां येतील असें कित्येकांस—विशेषतः इंग्रज शास्त्रज्ञांस—वाटत होतें. हा ग्रह आतां फारा दिवसांच्या अनुभवानें बदलला आहे. भौतिक शास्त्रानें अवलंबिलेली विचारपद्धतिहि खरें पाहतां कांहीं नवीन नाहीं. पाश्चात्य विचारौघांतहि ग्रीक तत्त्ववेत्त्यांनीं अवलंबिलेल्या विवेचनपद्धतीहून निराळें असें तींत कांहींच नव्हतें. फक्त, इतक्या व्यापक क्षेत्रांत व सतत इतका कालपावेतों या पद्धतीचा उपयोग पूर्वी करण्यांत आला नव्हता एवढाच त्यांतील फरक होय. १५ व्या शतकापासून पुढें विशिष्ट अनुकूल परिस्थिती-मुळें युरोपांत सृष्ट जगाच्या निरीक्षणाबाबत तो करण्यांत आला व त्याचें फळहि फार चमत्कृतिजनक असें आलें.

भौतिकशास्त्राची करामत आणि त्यांतील शास्त्रज्ञांनीं आपापल्या क्षेत्रांत मिळविलेला निर्विवाद अधिकार हीं पाहून समाजशास्त्रज्ञांस आपणहि तसेंच प्रगत व्हावें असें वाटणें साहजिक होतें. परंतु अनेक मूलभूत अडचणींमुळें त्यांस तें शक्य झालें नाहीं व आजहि शक्य होईलसें वाटत नाहीं. अर्थशास्त्र हें सर्वसामान्य अर्थव्यवहाराबद्दलचें त्रिकालाबाधित सिद्धान्त बांधणारें शास्त्र आहे असा आव अगदीं अलीकडील कांहीं अर्थशास्त्रज्ञ आणतात. परंतु या त्यांच्या प्रतिपादनाचा फोलपणा त्या सर्वांच्या लिखाणाकडे पाहिलें असतां सहज दिसून येतो. भौतिक शास्त्रांतील प्रगतीचीं मुख्य साधनें म्हणजे व्यापक निरीक्षण व नियंत्रित प्रयोग. यांपैकीं, दुसरें साधन समाजशास्त्रज्ञांस उपलब्ध नाहीं असें म्हटलें तरी चालेल. व्यापक निरीक्षणाबाबतहि अनेक अडचणी आहेत. केवळ माहिती मिळवण्याच्या अडचणी जरी सोडून दिल्या तरी निर्हेतुक व निर्विकार निरीक्षणाच्या शक्यतेची अडचण ही खरोखर मूलगामी आहे. विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट लोक विशिष्ट रीतीनें वर्ततात याबद्दल त्यांच्या बाह्य वर्तनाचे सूचक म्हणून जरी कांहीं कांहीं माहिती व आंकडे गोळा केले, तरी जेव्हां कार्यकारणसंबंध दाखविण्याची वेळ येते तेव्हां त्यांचे मनोव्यापार कसे चालतात याचा विचार

केल्याशिवाय गत्यंतर उरत नाहीं. कारण मनुष्याची वागणूक ही निर्जीव पदार्था-सारखी किंवा बहुतेक सजीव प्राण्यांसारखी अमुक परिस्थितींत अमुकच असावयाची असें गृहीत धरून चालणें शक्य नाहीं. आणि या मनोव्यापारांबद्दल विचार केला म्हणजे एक तर निरीक्षकाच्या स्वतःच्या मनोवृत्तींचा निरीक्षणा-वर परिणाम होत नाहीं असें निश्चित सांगतां येत नाहीं. कोणी कितीहि म्हटलें तरी त्याचें परीक्षण अगर निरीक्षण हें निर्हेतुक असतें, म्हणजे स्वतःच्या मनोवृत्तींशीं त्याचा कांहीं संबंध नसतो, असें म्हणणें कठीण आहे.

याचें एक ताजें उदाहरण म्हणजे नवीन निरपेक्ष सिद्धान्तपक्षीय अनेक इंग्रज अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांचेंच देतां येईल. अर्थशास्त्रज्ञास इष्ट अगर साध्य काय याचा विचार कर्तव्य नाहीं, त्यानें फक्त निर्हेतुक निरीक्षण करावें व त्यावरून निरक्षेप सिद्धान्त बांधावे असें यांतील बहुतेक जण नेहमीं म्हणतात. पण या सर्वांचें लिखाण पाहिलें म्हणजे तें सगळेंच इतकें पूर्वग्रहयुक्त प्रमेयांनीं दूषित दिसतें कीं ज्या गोष्टी टाळाव्या असें ते म्हणतात त्या टाळणें त्यांना स्वतःलाच शक्य नाहीं हें उघड होतें. अनिर्बंध व्यवहार, व्यक्तिस्वातंत्र्य, खुला व्यापार इत्यादि इंग्रज रक्तांत मुरलेल्या सिद्धान्तांचा प्रच्छन्न पुरस्कार शास्त्रीय लिखाणाचे नांवाखालीं केलेला पाहिला म्हणजे या शास्त्रीयतेच्या संभाव्यतेची मर्यादा चटकन कळून येते.* निर्विकार व निर्हेतुक निरीक्षण हें जसें दुरापास्त आहे, तसेंच आजच्या परिस्थितींतील व्यक्तींचें आचरण अथवा समाजाची वृत्ति ही पूर्वीं अशीच होती अगर पुढें अशीच राहील असें समजणेंहि योग्य नाहीं. मनुष्याच्या मनोव्यापारावर बाह्य परिस्थितीइतकीच त्याच्या डोक्यांतील कल्पनांची पकड असते. वैचारिक चळवळींच्या या काळांत हा सिद्धान्त जास्त स्पष्ट करावयास नको. पण त्याचा समाजशास्त्रीय सिद्धान्तांच्या शाश्वततेशीं फार निकट संबंध आहे. एवंच रानड्यांनीं समाजशास्त्रांतील सिद्धान्तांच्या मर्यादा ज्या ५० वर्षांपूर्वीं निर्देशिल्या त्या त्या वेळेस जरी अनेकांस पटण्यासारख्या नव्हत्या तरी आज बहुतांशीं सर्वमान्य झाल्या आहेत. जरी मानवी मनोव्यापाराबद्दलच्या थोड्या प्रमेयांवर अगदीं तर्कशुद्ध रीतीनें मोठी इमारत उभारली तरी ती शुद्ध पायावर रचलेली व स्थिर आहे किंवा नाहीं हें वेळोवेळीं व ठिकठिकाणीं

*या नवीन पक्षाचे प्रातिनिधिक लेखक म्हणून प्रो. रॉबिन्स यांचें सर्वच लिखाण परीक्षणीय आहे.

प्रत्यक्ष परिस्थितीशीं पडताळून पाहिल्याखेरीज ठरविणें शक्य नाहीं. हा विचार नवीन पक्षांतील कांहीं अर्थशास्त्रज्ञ सुद्धां आज मान्य करूं लागले आहेत.†

समाजशास्त्रांतील सिद्धान्तांच्या सापेक्षतेस धरूनच रानडे यांनीं इंग्रजी अर्थशास्त्राच्या विकासाबद्दल विस्तृत विवेचन केलें आहे व इंग्रज लेखकांचे विचार कसे परिस्थितिजन्य होतें हें त्यांत दाखविलें आहे. ऐतिहासिक दृष्ट्या विचार करणारे इंग्रज लेखकहि ही गोष्ट आज कबूल करतात. रानडे यांच्या या व्याख्यानानंतर चार वर्षांनींच डॉ. कॅनन यांनीं आपला 'उत्पादन व विभाजन विचारांचा इतिहास' हा मोठा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांत माल्थस्, रेकार्डो, मिल इत्यादिकांचे बरेच सिद्धान्त ठिकठिकाणीं कसे तर्कदुष्ट आहेत हें त्यांनीं विस्तृतपणें दाखविलें आहे. त्याबरोबरच त्यांनीं जे सिद्धान्त मांडले ते सभोंवारच्या परिस्थितीस कसे अनुरूप होते व त्या लेखकांच्या स्वतःच्या आर्थिक धोरणाबद्दलच्या ग्रहांना कसे अनुकूल होते, हेंहि त्यांनीं स्पष्टपणें दाखविलें आहे. आज अर्थातच मार्क्सवादाची पकड जिकडे तिकडे एवढी बसलेली असतां मनुष्याचे विचार हे त्याची परिस्थिति, त्याचे पूर्वग्रह व त्याचे हितसंबंध यांच्याशीं कसे निगडित असतात हें विशेषानें सांगण्याची जरूरी नाहीं. विचारवंतांची भूमिका ही परिस्थितिजन्य असते व त्यांच्या विचारांचा रोख हा त्यांच्या भोंवतालच्या घडामोडींवरून बहुतांशीं ठरतो असें मार्क्सवादांतील आत्यंतिक सिद्धान्तांचा पुरस्कार न करणाऱ्यासहि सहज म्हणतां येईल. यांत्रिक युगाच्या आर्थिक परिणामाविषयीं जी मीमांसा युरोपिय अर्थशास्त्रज्ञांनीं केली तिचा इतिहास या दृष्टीनें फार उद्बोधक आहे. यांत्रिक युगाच्या अगदीं सुरुवातीस यांत्रिक उत्पादनामुळें जुन्या कारागिरीच्या धंद्यावर अनिष्ट परिणाम घडून बेकारी व असंतोष यांचीं कांहीं दृश्यें दिसलीं; परंतु थोड्याच काळांत यांत्रिक उत्पादनाच्या खपाची मर्यादा जशी जशी वाढूं लागली तसतसे या अनिष्ट परिणामांऐवजीं वाढते उद्योग व वाढती मजुरी हींच जास्त ठळकपणें डोळ्यांत भरूं लागलीं. त्यामुळें जरी प्रारंभीं प्रत्येक युरोपीय देशांत अर्थशास्त्रज्ञांनीं यांत्रिक उत्पादनाच्या प्रसाराच्या अनिष्ट परिणामाकडे लक्ष दिलें तरी शेवटीं सर्वांचा भर त्याचे हितावह परिणाम काय झाले याजवरच मुख्यतः राहिला. यांत्रिक उत्पादनाच्या प्रसाराचे

---

†Hicks : 'Value and Capital' या ग्रंथाची प्रस्तावना पाहा.

अनिष्ट परिणाम पुढारलेल्या औद्योगिक देशांत फार थोडा काल आणि अत्यल्प प्रमाणांत भासल्यामुळें संक्रमणावस्थेंतील परिस्थितीचा विचार फारसा महत्त्वाचा नाहीं असेंच सर्व अर्थशास्त्रज्ञांनीं मानलें. यांत्रिक उत्पादनानें बेकारी होतच नाहीं; झाली तरी ती तात्पुरतीच असते आणि तिच्याबरोबरच उद्योगधंद्याची वाढ फार होते असे सिद्धान्त इंग्लंड, जर्मनी, अमेरिका या देशांतून मांडले गेल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कारण तेथील परिस्थिति व हे सिद्धान्त यांत विशेष विरोध दिसून येत नव्हता. पण त्याचे उलट एखाद्या हिन्दी अर्थशास्त्रज्ञानें जर या प्रश्नाचा विचार केला तर त्यास अनिष्ट परिणामच प्रामुख्यानें दिसतील व संक्रमणावस्था ही अल्पकालीन नसून आपल्या देशापुरती तरी निदान कायमचीच आहे कीं काय असा भास होईल. तेव्हां या बाबतींतील त्याचे सिद्धान्त हे निराळेच असणार. अगदीं सर्वसामान्य असें कांहीं थोडें सारखेंच लिहिलें तरी आर्थिक धोरणाबाबतचे विचार व एकंदर विवेचनाचा भर यांविषयीं या निरनिराळ्या परिस्थितींमुळें युरोपीय व हिन्दी अर्थशास्त्रज्ञांचे लिखाणांत महदंतर पडणारच. ( येथें एक गोष्ट प्रांजलपणें नमूद करणें आवश्यक आहे. प्रस्तुत लेखक जेव्हां सुमारें १८ वर्षांपूर्वीं विलायती पदवी संपादून हिंदुस्थानांत परत आला तेव्हां त्याचे विचार याहून भिन्न होते; त्यामुळें डॉ. केतकर यांनीं ज्ञानकोशांत स्वतंत्र हिन्दी अर्थशास्त्र स्थापण्याची आवश्यकता प्रतिपादिली असतां तिस विद्यासेवकांत आपला मराठींतील पहिला लेख लिहून त्यानें कसून विरोध केला. आज मात्र त्याचे विचार स्वतःच्या जुन्या लेखापेक्षां डॉ. केतकरांशींच जास्त जुळते आहेत. )

ऐतिहासिक दृष्ट्या विचार करतां अर्थशास्त्रज्ञांचे सिद्धांत कसे प्रतिक्रियारूप असतात हें पटलें, म्हणजे कोणत्याहि एका सिद्धान्ताची महती व युक्तता हीं सदैव टिकणें शक्य नाहीं हें उघड होतें. १९ व्या शतकांत इंग्रज अर्थशास्त्रज्ञांचें सर्व लिखाण अनिर्बंध व्यवहाराच्या तत्त्वाच्या पायावर उभारलेलें होतें. अनिर्बंध व्यवहार ही आर्थिक व्यवस्थेची मूळ प्रकृति, व तो सुटला म्हणजे ती विकृति झाली असें हे अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादीत. या प्रतिपादनाचा फोलपणा रानडे यांनीं ऐतिहासिक व व्यावहारिक विवेचन करून दाखविला. ऐतिहासिक दृष्ट्या स्मिथ व तत्कालीन लेखकांचे सिद्धान्त हे तत्कालीन परिस्थितिजन्य होते हें आज सर्वच कबूल करतात. यांत्रिक क्रांतीच्या आघाडीवर असलेल्या, विशेषतः इंग्लंडसारख्या, राष्ट्रांच्या प्रगतीस अनिर्बंध

व्यवहार पोषक ठरला हेंच त्याची पकड इतका वेळ टिकण्याचें मुख्य कारण होय. अर्थात् इंग्रजांनीं अनिर्बंध व्यवहाराचा पुरस्कार केला, म्हणून तो सर्वांसच सर्व कालीं हितावह होईल असें म्हणणें केवळ हास्यास्पद आहे. किंबहुना रानडे यांनीं लिहिल्याप्रमाणें आत्यंतिक अनिर्बंध व्यवहाराचा पक्ष धरणें, म्हणजे मूलतः समाजधारणेचे फायदे घालविणें असेंच ठरेल. कोणत्याहि समाजाच्या अस्तित्वास व प्रगतीस, ज्या अर्थीं समाज-नियंत्रण हें आवश्यक असतें, त्या अर्थीं नियंत्रणास प्रकृति मानणें हेंच केव्हांहि श्रेयस्कर होय. अर्थात् नियंत्रणाची शक्यता व त्याची व्याप्ति हें देशकालमानास अनुसरूनच ठरवावें लागतें. पण नियंत्रणाच्या मर्यादा ठरवावयाच्या त्या केव्हांहि शाश्वत सिद्धान्तांच्या रूपानें मांडतां येत नाहींत. एकंदर परिस्थितीचा विचार करून इष्ट काय व शक्य काय या दृष्टीनें त्या दरवेळीं निश्चित कराव्या लागतात. असें म्हटलें म्हणजे या मर्यादा वेळोवेळीं बदलतील व त्या प्रत्येक देशाच्या परिस्थितीवर अवलंबून राहतील, हेंहि कबूल करावें लागतें. मागें उल्लेखिलेल्या नवीन इंग्रज अर्थशास्त्रज्ञांच्या गटापैकीं कांहीं आग्रही लेखक वगळल्यास आज हे सिद्धान्त सर्वमान्य झालेले आहेत. रानड्यांनीं दर्शविल्याप्रमाणें इंग्रज अर्थशास्त्रज्ञ नेहमीं अनिर्बंध व्यवहाराचा पुरस्कार करीत आलेले आहेत. परंतु गेलीं १५।२० वर्षें त्यांच्यांतील प्रमुखांसहि अनिर्बंध व्यवहाराबद्दलच्या जुन्या सिद्धान्तांतील उणेपणा दिसून आला आहे. जगभर नाणावलेले इंग्रज अर्थशास्त्रज्ञ मि. केन्स यांनीं सुमारें १५ वर्षांपूर्वीं 'अनिर्बंध व्यवहाराची इतिश्री' या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यांत सरकारानें काय करावयाचें अथवा काय करावयाचें नाहीं याबाबत अर्थशास्त्रज्ञ कांहीं चिरकालिक नियम घालूं शकत नाहींत असेंच मुख्यतः प्रतिपादिलें आहे. अलीकडे प्रो. व्हायनर यांनीं अमेरिकन अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना या प्रतिपादनासच निराळ्या तऱ्हेनें पुष्टि दिली. अनिर्बंध व्यवहार इत्यादि गेल्या शतकांत उदारमतवादी मानलेल्या सिद्धान्ताबद्दल ते म्हणाले कीं, त्यांचा पुरस्कार करतांना ते शास्त्रीय सिद्धान्त असें म्हणून चालणार नाहीं, त्यांस विचारांची अगर मनाची एक प्रवृत्ति असेंच मानावें लागेल. तेव्हां आज तरी रानडे यांच्या याबाबतच्या सिद्धान्तांतील अचूकपणा व दूरदर्शीपणा याविषयीं जास्त लिहावयास नको.

या निबंधांत रानडे यांनीं मांडलेल्या व्यापक व सूचक सिद्धान्तांपैकीं एक महत्त्वाचा सिद्धान्त अगदीं जातां जातां व ओझरता मांडला आहे. या सिद्धान्ताची व्याप्ति त्यांनीं सर्व क्षेत्रांत विशद करून दाखवली नाहीं.

तरी त्या सिद्धान्ताचें महत्त्व फार मोठें असल्यामुळें त्याकडे येथें विशेष लक्ष दिलें पाहिजे. इतर अनेक ठिकाणीं इंग्रजी राज्यापासून झालेले फायदे रानडे यांनीं विवेचिले. या निबंधांत मात्र त्यांचें लक्ष तोट्यावरहि गेलेले आहे. इंग्रजी विचार व इंग्रजी अनुभव हे हिंदुस्थानास गैरलागू आहेत. त्यांचा पुरस्कार केला व सर्व बाबतींत इंग्रजी उद्दिष्टेंच आपल्या डोळ्यासमोर ठेवलीं, तर अनर्थावह परिस्थिति उत्पन्न होते. इंग्लंडसारख्या संपन्न, बलवान व जगन्मान्य राष्ट्राचें अनुकरण करणें आपणास साधावयाचें नाहीं व तसें करणें योग्यहि नाहीं. रानडे यांच्या या मताची सत्यता पटण्यास आर्थिक धोरणाचांच विचार केला पाहिजे असें नाहीं. सर्व समाजजीवनांत त्याची यथार्थता वेळोवेळीं पटते. आपल्याकडे आज जे अनेक प्रश्न बिकट होऊन बसले आहेत, त्यांची उकल इंग्रजी उद्दिष्टें व इंग्रजी साधनें यांचें आपल्या मनावरील दडपण काढून टाकल्याविना व्हावयाची नाहीं. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराचा प्रश्न घेतला, तरी तेथेंहि जोंपर्यंत इंग्रजी उद्दिष्टें आपल्या डोळ्यासमोर आहेत, तोंपर्यंत आपणास कधींच कांहींहि करतां येण्यासारखें नाहीं, असेंच वाटेल. पण जपानसारख्या राष्ट्राचा अनुभव लक्षांत घेतला, म्हणजे ही गोष्ट तितकी दुःसाध्य वाटत नाहीं. किंवा नवीन प्रान्तरचनेच्या प्रश्नाच्या चर्चेंतहि विचार असाच नेहमीं उलट्या दिशेनें चाललेला आढळून येतो. पगाराचें व एकंदर नोकरसंख्येचें प्रमाण हें आधीं गृहीत धरून मग प्रान्तमर्यादा ठरवावयाच्या कीं इष्ट मर्यादा ठरवून मग त्यांत आपणास काय पगारमान झेंपेल हें पहावयाचें. पण आपल्याकडे सर्वांचीच इंग्रजी सिद्धान्त व अनुभव यांनीं दिशाभूल झालेली आढळते. त्यामुळें अनेक क्षेत्रांत खाईन तर तुपाशीं नाहीं तर उपाशीं अशा अविचारी धोरणाचा पुरस्कार विचारवंतहि करतांना आढळतात. इंग्लंडसारख्या संपन्न राष्ट्राचें अनुकरण आमच्यासारख्या दरिद्र्यांनीं करणें हें बैलबेडूक न्यायानें किती हास्यास्पद आहे हें आपण नेहमीं लक्षांत बाळगणें जरूर आहे.

हिन्दी आर्थिक धोरणाबाबत रानडे यांनीं उल्लेखलेल्या बाबी आज नवीन वाटणार नाहींत. त्यांच्या कालापासून ह्या गोष्टींचा पुरस्कार बहुतेक हिंदी पुढारी व लेखक करीत आले व त्यांपैकीं बहुतेक आज सरकारानें निदान तत्त्वतः स्वीकारल्या आहेत. किंबहुना आजचे लेखक रानडे यांच्याहि बरेच पुढें जात आहेत असें वाटण्यासारखें आहे. पूर्ण अनिर्बंध व्यवहाराच्या साम्राज्याच्या काळांत मांडलेले हे विचार आजच्या पूर्ण नियोजित व्यवस्थेच्या

पुरस्काराच्या काळांत कांहींसे अपुरेहि वाटतील. परंतु आम्हीं वेळोवेळीं म्हटल्याप्रमाणें खरा मुद्दा तपशिलाचा नसून तात्त्विक भूमिकेचा आहे. आणि त्याबाबत रानडे यांनीं स्वीकारलेला पक्ष आजहि निर्दोष वाटतो. अनिर्बंध व्यवहार किंवा पूर्ण नियोजन या दोनहि पक्षांत आत्यंतिक आग्रह हा आढळतोच. तो टाळावयाचा असल्यास रानडे यांनीं घालून दिलेल्या व्यवहार्यतेच्या कसोट्याच योजल्या पाहिजेत.

शेवटीं हिंदी अर्थशास्त्राची रानडे यांच्यानंतरची प्रगति याविषयीं दोन शब्द लिहिणें आवश्यक आहे. ही प्रगति बरीच व अनेक दिशांनीं झाली आहे. आज अर्थशास्त्र महत्त्व पावलें असून, त्याचे अध्यापक व अभ्यासक ठिकठिकाणच्या शिक्षणसंस्थांत असतात. विशिष्ट हिन्दी आर्थिक प्रश्नांकडे या अर्थशास्त्रज्ञांचें लक्ष गेलें असून, गेल्या २०।२५ वर्षांत याबाबतचें संशोधन व लिखाण पुष्कळच बाहेर पडलें आहे. तसेंच सरकारी कमिट्या व कमिशनें यांनीं हिंदी आर्थिक परिस्थितीचीं निरनिराळीं अंगें अभ्यासिलीं. एकंदर हिंदी आर्थिक जीवन व धोरण यांबाबत बराच विचार झाला, व झाला त्याहूनहि बारकाव्याचा विचार चालू आहे. हें सगळें झालें, तरी रानडे यांनीं या निबंधांत स्वीकारलेल्या भूमिकेवरून अर्थशास्त्रीय विचारांची स्वतंत्र मांडणी करण्याचा उपक्रम केलेला मात्र कोठें दिसून येत नाहीं. क्वचित् प्रसंगीं हिंदी समाजरचना अगर संस्था यांचा पुरस्कार करण्याच्या अभिनिवेशानें कांहीं लिहिलें गेलें असलें, तरी तें केवळ आग्रही दिसतें. अशा लिखाणांत शास्त्रीयतेचा बहुशः अभावच असतो. हा उणेपणा आजतागायत राहण्याचीं कारणें अनेक असूं शकतील. एक तर, हिंदुस्थानाचें अफाट क्षेत्र व विविध परिस्थिति या मानानें अभ्यासकांची संख्या आजहि अपुरी आहे. आणि या अभ्यासकांस उपलब्ध असलेलीं साधनें व वेळ हींहि फार मर्यादित आहेत. परंतु खरें महत्त्वाचें कारण, म्हणजे हिंदी अभ्यासकांच्या मनावर बसलेली इंग्रजी विचारांची पकड हेंच असावें. इंग्रजी विश्वविद्यालयीन पदव्यांस सर्वच क्षेत्रांत जो विशेष मान अलीकडे प्राप्त झाला आहे, याचाच हा परिणाम असावा. स्वतंत्र विचाराचा प्रवाह काय तो तिकडेच चालणार व तेथील सिद्धान्तनास अनुसरूनच आपल्या परिस्थितीप्रमाणें आम्ही लिहिणार असेंच बहुतांशीं अलीकडे होऊन बसलें आहे. प्रत्यक्ष विलायतेहून नुकत्याच आलेल्या ताज्या पदवीधरास येथील मुरलेल्या अभ्यासकांहूनहि जास्त कळतें अशा प्रकारची वृत्ति अनेक ठिकाणीं दिसून येते. यामुळें येथील अभ्यासकांचा निरु-

त्साह होतो. इतकेंच नव्हे, तर इंग्लंडमधून शिकून आलेल्यांतहि तेथील किनारा सुटला कीं, आपली वाढ थांबते अशी भावना उत्पन्न होते. रानडे यांच्याइतक्या स्वतंत्र प्रज्ञेचीं माणसें केव्हांहि विरळाच असणार. परंतु शिवाय आपल्या अभ्यासकांत विचारांचा व्यापकपणा व आत्मविश्वास हीं दोन्हीं कमी पडतात, असें कष्टानें म्हणावें लागतें. नाहीं म्हणावयास आपल्याकडे स्वतंत्र रीतीनें विचार करून धडाडीनें सिद्धान्तन करण्याचा प्रयत्न म्हणजे समाजशास्त्रांत डॉ. श्री. व्यं. केतकर यांचाच समजावयाचा. त्यांनीं आर्थिक व्यवहाराबद्दलहि थोडें सूचक असें लिहिलें, याबद्दल मागें एका ठिकाणीं उल्लेख केलाच आहे. केतकरांच्या कार्यक्षेत्राचें स्वरूप व त्यांतील अनेक अडचणी यांमुळें त्यांस नवीन सिद्धान्तनाकडे विशेष लक्ष देतां आलें नाहीं व त्यांत तित केसें यशहि आलें नाहीं. परंतु रानड्यांनीं दाखविलेल्या व डॉ. केतकरांनीं अंशतः आक्रमिलेल्या मार्गानेंच आपणांस पुढें जावयाचें आहे. आपलें अर्थशास्त्र हें केव्हांहि गरीब व मागासलेल्यांचें अर्थशास्त्र आहे. त्याचें एकंदर रूप व रंग हीं केव्हाहि संपन्न व प्रगत राष्ट्रांच्या अर्थशास्त्रापेक्षां निराळीं असणार* आणि या दृष्टीनें हिंदी अर्थशास्त्राचा विकास झाल्यावरच आपल्या राष्ट्रीय आर्थिक धोरणाबाबत भरीव कामगिरी अर्थशास्त्रज्ञांस करतां येईल.

---

*याच्या पुष्ट्यर्थ एकच उदाहरण पुरेसें आहे. गेलीं दहाबारा वर्षे आर्थिक जीवनांत मुख्य प्रश्न उत्पादनाचा उरलेला नसून, केवळ विभागणीचाच उरला आहे असें सर्व पाश्चात्य अर्थशास्त्र-मि. केन्स धरून-प्रतिपादितात. त्यांना हिंदुस्थान व चीन यांमधील अर्धपोटी असलेल्या असंख्य जनतेची दखलच नाहीं असें दिसतें.

# १९ हिंदुस्थानची लोकसंख्या बेसुमार नाहीं काय ?*

हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या प्रश्नासंबंधीं ज्याला मतें नाहींत असा हिंदी मनुष्य क्वचितच आढळेल! लोकसंख्येसंबंधींचे प्रश्न दिसावयास फार सोपे दिसतात. त्यामुळें प्रत्येकास ते आपल्याला संपूर्णतया समजतात असें वाटतें व त्यांवर "अधिकृत" मत देण्यास त्याची कधींच ना नसते. तथापि वस्तुस्थिति अगदीं निराळी आहे. या विषयाचे अभ्यासक हे प्रश्न फारच गुंतागुंतीचे व समाजशास्त्रामधील अत्यंत जटिल व कठीण असें मानतात. या प्रश्नांना अनेक बाजू असतात व त्यांचा सांगोपांग विचार करून त्यासंबंधीं फार काळजीपूर्वक विधानें करावीं लागतात. ही गोष्ट सामान्य मनुष्यास अर्थातच पटत नाहीं व त्या प्रश्नांसंबंधीं अभ्यासकांनीं व्यक्त केलेल्या विचारांची उपेक्षा करण्याकडेच त्याची प्रवृत्ति असते. आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांची वृत्ति याहून निराळी नाहीं. अशा परिस्थितींत या प्रश्नांचा अभ्यास करीत राहून आपले त्यासंबंधींचे विचार वेळोवेळीं मांडत राहणें व त्याचा कधीं तरी उपयोग होईल अशी आशा बाळगणें, येवढाच मार्ग अभ्यासकांना मोकळा असतो.

हिंदुस्थानची लोकसंख्या बेसुमार आहे कीं नाहीं हा प्रश्न फार जुना आहे व यावरील वादहि फार तीव्र व जुने आहेत. या वादाची पार्श्वभूमि बरीचशी भावनात्मक असल्यामुळें त्यासंबंधीं अभ्यासकाच्या निःपक्षपाती वृत्तीनें विचार करणें या देशांतील बहुतेकांस अशक्य झालेलें आहे. हिंदुस्थानची लोकसंख्या फार झपाट्यानें वाढली आहे व हिंदी जनतेचें दारिद्र्य पुष्कळ अंशीं या वाढीमुळेंच निर्माण झालेलें आहे, असे विचार इंग्रज राज्यकर्त्यांनीं पूर्वी व अलीकडेहि बरेच वेळा प्रकट केलेले होते. हीं व अशा तऱ्हेचीं विधानें हिंदुस्थानला बदनामीकारक आहेत, असें राष्ट्रीय पुढाऱ्यांस नेहमीं वाटत आलेलें आहे. "इंग्रजी राज्यानें द्रव्यशोषण केल्यामुळें हिंदी जनतेचें दारिद्र्य वाढत आहे, या खऱ्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष व्हावें म्हणून इंग्रज राज्यकर्ते बेसुमार लोकसंख्येचें हें खोटें लिगाड हिंदुस्थानच्या माथीं चिकटवूं पाहात आहेत" असा विचार राष्ट्रीय गोटांतून

---

* सह्याद्रि, फेब्रुवारी १९४९

पुरस्कारिला गेला व त्याच्या पूर्ततेसाठीं हिंदुस्थानची लोकसंख्या बेसुमार नाहीं असें सिद्ध करण्याची राष्ट्रीय अर्थशास्त्रज्ञांची अहमहमिका सुरू झाली. जो कोणी हिंदुस्थानची लोकसंख्या बेसुमार आहे असें म्हणेल तो इंग्रज-धार्जिणा व हिंदहितविरोधी असें मानलें जाऊं लागलें व या उलट विधान करणें हा राष्ट्रीयत्वाचा व स्वदेशाभिमानाचा परवाना होऊन बसला. अर्थातच निःपक्षपाती चर्चा अशक्य झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तरी ही परि-स्थिति निवळेल असें वाटत होतें. परंतु पंतप्रधानांच्या गेल्या वर्षांतील दोन तरी ठिकाणच्या भाषणांवरून त्यांचे यासंबंधींचे राष्ट्रीय पूर्वग्रह अद्यापि कायम आहेत असें दिसतें. इतरांचीहि तीच स्थिति आहे.

वास्तविक वर उल्लेखिलेल्या वादाच्या दोन्ही बाजू ह्या एकेका अर्ध-सत्यावर उभारलेल्या आहेत. हिंदी जनतेचें वाढतें दारिद्र्य हें लोकसंख्येची वाढ व इंग्रज राज्यकर्त्यांचें आर्थिक शोषण या व इतर अनेक कारणांतून उद्भूत झालेलें आहे. तें यांपैकीं कोणत्या एकाच कारणामुळें अजिबात नसून दुसऱ्याच कारणामुळें आहे असें म्हणणें हें अतिरेकी वादपद्धतीचें लक्षण आहे. खऱ्या निःपक्षपाती चर्चेस त्याचें वावडें असतें. वास्तविक हिंदुस्थानची लोकसंख्या बेसुमार आहे असें म्हणणें म्हणजे हिंदुस्थानचा अपमान अगर अधिक्षेप करण्यासारखें आहे, असें मानण्याचें कांहींहि कारण नाहीं. तें फक्त एक वास्तव विधान आहे. तें मान्य करणें म्हणजे फक्त त्यामुळेंच हिंदुस्थानचें दारिद्र्य वाढतें आहे असें कबूल करणेंहि नव्हे.

पुढील लेखांत या प्रश्नाचा विचार अभ्यासकाच्या निःपक्षपाती भूमिके-वरून केलेला आहे. अशा तऱ्हेची चर्चा करण्यांत फार अडचणी असतात. प्रश्नास अनेक बाजू असल्यामुळें सर्वांचा सांगोपांग विचार करावयाचा तर चर्चा फार मोठी होते व त्यास ग्रंथाचें स्वरूप येतें. त्यामुळें एका लेखाच्या मर्यादेंत असा सांगोपांग शास्त्रीय विचार करतां येत नाहीं, म्हणून पुष्कळ गोष्टींकडे दुर्लक्ष करून कांहीं मुख्य मुद्यांच्या अनुषंगानें चर्चा करणें भाग पडतें. ही चर्चाहि फार न लांबावी म्हणून पुष्कळशीं विधानें पुरावा देण्यास अवकाश नसल्यामुळें त्याशिवायच करावीं लागतात. पुढील चर्चेत अशा प्रकारचीं पुष्कळ विधानें केलेलीं आहेत. तथापि तीं भरपूर पुराव्यावर आधार-लेलीं आहेत. स्थलाभावामुळें पुरावा दिलेला नाहीं, म्हणून तीं लेखकाचीं कपोलकल्पित आहेत असें मानूं नये. लेखांत अविभाज्य हिंदुस्थान देशा-संबंधीं विचार केला आहे. कारण फाळणीनंतर झालेल्या दोन भागांसंबंधीं

निरनिराळी अशी आंकडेवार माहिती अद्यापि फारशी उपलब्ध झालेली नाहीं. ती माहिती उपलब्ध झाल्यावर या दोन्ही भागांबद्दल पृथक्‌रीतीनें विचार करतां येईल. तथापि त्यामुळें पुढील चर्चेतून निघालेलीं अनुमानें फारशीं बदलावीं लागतील असें उपलब्ध पुराव्यावरून वाटत नाहीं.

एखाद्या देशांतील लोकसंख्या बेसुमार आहे किंवा नाहीं हें ठरविणें पुष्कळ वेळां फार दुर्घट असतें. कारण बेसुमार लोकसंख्येचें गमक कोणतें यासंबंधीं त्या विषयावरील तज्ज्ञांमध्यें पुष्कळ वाद आहेत. त्यासंबंधीं सर्वसंमत अशा तऱ्हेचें गमक उपलब्ध नाहीं असें स्थूलमानानें म्हणतां येईल. तथापि यासंबंधीं झालेल्या चर्चेमध्यें लोकसंख्या बेसुमार आहे कीं नाहीं, हें ठरविण्याचें गमक बहुतांशीं आर्थिकच असावें यासंबंधीं बहुतेक सर्व तज्ज्ञांमध्यें एकमत्य आहे. एखाद्या देशांतील लोकसंख्या व तेथील संपत्युत्पादन यांच्या परस्पर प्रमाणावरूनच बेसुमारपणाचें गमक सिद्ध करण्याची खटपट सर्वत्र दिसते. देशांतील लोकसंख्येच्या व उत्पादनाच्या वाढीच्या एकमेकांवर होणाऱ्या परिणामावरून बहुतेक तज्ज्ञ बेसुमारीचें गमक व्युत्पादितात. यांत पुष्कळ पर्याय आहेत. या अनेक पर्यायांपैकीं पुष्कळांस मान्य असलेलें असें एक गमक घेऊन त्या अनुरोधानें चर्चा करण्यास हरकत नाहीं. या गमकाप्रमाणें एखाद्या देशांतील एखाद्या काळची लोकसंख्या होती त्यापेक्षां कमी असती, तर त्या वेळीं तेथें होत असलेलें संपत्तीचें उत्पादन कमी झालें असतें काय? हा प्रश्न बेसुमारी ठरविण्याच्या कामांत निर्णायक मानला पाहिजे; या प्रश्नाचें उत्तर होकारार्थी असल्यास त्या देशांतील त्या वेळची लोकसंख्या बेसुमार नव्हती असें सांगतां येईल.

हिंदुस्थानांतील सध्याच्या अगर गेल्या ३०—४० वर्षांतील परिस्थितीची या गमकानुसार परीक्षा केल्यास हिंदुस्थानांतील लोकसंख्या सध्या व गेल्या तीस–चाळीस वर्षांच्या काळांत बेसुमार आहे व होती यासंबंधीं दुमत होणार नाहीं. या देशांतील शेतकी अगर औद्योगिक उत्पादन शेतकऱ्यांच्या अगर मजुरांच्या तुटवड्यामुळें घटलें आहे, असें सध्या अगर पूर्वीं झाल्याचें ऐकिवांतहि नाहीं. कांहीं भागांत दळणवळणाच्या अपुऱ्या सोयींमुळें शेत- ासाठीं लागणाऱ्या मजुरांची चणचण, ती सुद्धां हंगामापुरती, भासते; ापि ती चणचण मजुरांची संख्या अपुरी असल्यामुळें भासते असें नाहीं. ोगिक कारखान्यांतूनहि पुष्कळ वेळां कसबी मजुरांचा तुटवडा पडल्याची कधीं कधीं ऐकूं येते. परंतु हा तुटवडा मजुरांच्या अल्पसंख्येंतून न

उद्भवतां असंख्य सामान्य मजुरांपैकीं कसब शिकण्याची संधि फार थोड्यांना मिळत असल्यामुळें होतो, यांत शंका नाहीं. या देशांतील नैसर्गिक संपत्तीचा उपयोग करण्यासाठीं लोक नाहींत म्हणून त्यांतील बराचसा भाग उपयोगांत आला नाहीं, अगर येत नाहीं अशीहि वस्तुस्थिति नाहीं. लोकसंख्येची वाढ या देशांत झाली नसती तर उत्पादनाची वाढहि खुंटली असती असें सूज्ञपणें विचार करणारास तरी म्हणतां येणार नाहीं.

तथापि येवढ्यावरच ही चर्चा संपत नाहीं कारण वर केलेल्या विवेचनाविरुद्ध हिंदुस्थानांत पुष्कळ वेळां असा युक्तिवाद करण्यांत येतो कीं, सध्याच्या काळीं जरी येथील संपत्तीच्या उत्पादनाचें व लोकसंख्येचें प्रमाण व्यस्त असलें तरी येथील नैसर्गिक संपत्ति इतकी विपुल आहे कीं, तिचा पुढील कांहीं वर्षांत जोरानें वापर केल्यास हें प्रमाण पार बदलून जाईल व सध्याच्या पेक्षां कितीतरी पटीनें अधिक लोकसंख्या येथें सुखासमाधानानें व आर्थिक सुस्थितींत राहूं शकेल. या युक्तिवादाची अधिक परीक्षा करणें आवश्यक आहे व त्यासाठीं या देशांतील लोकसंख्या व उत्पादन यांची भावी कालांत कशी वाढ होण्याचा संभव सध्याच्या परिस्थितींत दिसतो याचें विवेचन करणें आवश्यक आहे.

लोकसंख्येची भावी कालांत किती वाढ होईल याविषयीं अंदाज बांधतांना आजपर्यंत तिची किती व कशी वाढ झाली आहे, हें लक्ष्यांत घेणें जरूर आहे. १८८१ पासून १९४१ पर्यंत हिंदुस्थानांतील लोकसंख्येंत झालेल्या चढउताराचे आंकडे खालीं दिले आहेत.

| दशक | टक्के वाढ | दशक | टक्के वाढ |
|---|---|---|---|
| १८८१–९१ | ९·६% | १९११–२१ | १·२% |
| १८९१–१९०१ | १·४% | १९२१–३१ | १०·६% |
| १९०१–११ | ६·४% | १९३१–४१ | १४·७% |

गेल्या साठ वर्षांत लोकसंख्येची वाढ बरीच नागमोडी गतीनें झालेली दिसते. १८९१–१९०१ या दशकांत प्लेगच्या सांथीमुळें व १९११–२१ या दशकांत इन्फ्लुएंझाच्या सांथीमुळें लोकसंख्येची वाढ अगदींच अल्प प्रमाणांत झाली. गेल्या दोन दशकांतच ही वाढ अप्रतिहत झालेली दिसते.

गेल्या ५० वर्षांत हिंदुस्थानांतील लोकसंख्या एकूण ३९ टक्क्यांनीं वाढली. तथापि या खंडप्राय देशांतील सर्वच भागांत सारखी वाढ झालेली नाहीं. निरनिराळ्या प्रादेशिक विभागांतून लोकसंख्या या काळांत निरनिराळ्या

गतीनें वाढलेली अगर कमी झालेली आढळते. कांहीं प्रातिनिधिक अशा प्रादेशिक विभागांमधील या काळांतील लोकसंख्येच्या वाढीसंबंधींचे आंकडे खालीं दिले आहेत.

## निरनिराळ्या प्रादेशिक विभागांतील लोकसंख्येची वाढ
## ( १८८१ ते १९४१ )

**गट १ ला.** ज्या प्रदेशांत या काळांत ९० ते १६० टक्के वाढ झाली तेः– ( १ ) ब्रह्मपुत्रेचें खोरें ( १६०% ), ( २ ) वायव्य–पंजाब ( १६०% ), ( ३ ) त्रावणकोर ( १५४% ), ( ४ ) कोचीन ( १३३% ), ( ५ ) छोटा नागपूरचें पठार ( १२३% ), ( ६ ) पूर्वबंगाल ( १०१% ), सिंध ( ९४% ), सुर्मा नदीचें खोरें ( ६५% ).

**गट २ रा.** ३० ते ५० टक्के वाढीचे प्रदेशः—(१) मुंबई मध्यविभाग (५०%), ( २ ) कोंकण ( ४५% ), ( ३ ) ओरिसा ( ४०%–१८९१ ते १९४१ ), ( ४ ) गुजरात ( ३९% ), ( ५ ) मद्रास समुद्र किनारा उत्तर–भाग ( आंध्र ) ( ३०%–१८९१ ते १९४१ ), ( ६ ) मद्रास समुद्रकिनारा दक्षिण–भाग ( तामिळनाड ) ( ३६% – १८९१ ते १९४१ ), ( ७ ) हिमालयाचा पायथा, पंजाब ( ३४% ).

**गट ३ रा.** १० ते २८ टक्के वाढीचे प्रदेशः—(१) गंगेचें खोरें पश्चिम भाग ( २८% ), ( २ ) उत्तर बिहार ( २८% ), ( ३ ) दक्षिण बिहार (२६%), ( ४ ) गंगेचें खोरें मध्य–विभाग ( २२% ), ( ५ ) गंगेचें खोरें पूर्व–भाग ( १४% ), मध्य हिंदुस्थानचें पठार ( १२% ),

वरील आंकड्यांवरून या निरनिराळ्या प्रादेशिक विभागांतील लोकसंख्येचे चढउतार किती विविध प्रकारचे व एकमेकांशीं विसंगत आहेत हें ध्यानीं येईल. लोकसंख्येच्या भावी वाढीसंबंधीं तपशीलवार विचार करतांना या प्रत्येक प्रदेशाविषयीं निराळा विचार करणें आवश्यक ठरेल, हें निराळें सांगावयास नको. तथापि असें विवेचन करावयास एखादा ग्रंथच लिहावा लागेल. एका लेखानें भागणार नाहीं. यासाठीं या लेखांत सर्व देशासंबंधींच स्थूलमानानें विचार केलेला आहे.

एखाद्या देशांतील लोकसंख्येची वाढ अगर घट तेथील एकंदर जन्म-मृत्यूंची संख्या आणि परदेशांतून तेथें येणाऱ्यांची व त्या देशांतून परदेशांत

जाणारांची संख्या या दोन गोष्टींवर अवलंबून असते. यांपैकीं दुसऱ्या प्रकारानें होणारी वाढ अगर घट हिंदुस्थानांत इतकी अल्प असते कीं, त्यासंबंधीं अधिक विचार करण्याचें कारण नाहीं. जन्ममृत्यूंच्या संबंधींचे आंकडे हिंदुस्थानांत गेले कित्येक वर्षे जमविण्यांत येत असतात. तथापि त्यांच्या वस्तुस्थितिनिदर्शकत्वाबद्दल खात्री देतां येत नाहीं. जन्ममृत्यूंची नोंद व्हावी तितकी बरोबर अगर अचूक होत नाहीं, हें विश्रुत आहे. म्हणून त्यासंबंधीं सामान्यपणें प्रसिद्ध होणाऱ्या आंकड्यांवरून अनुमान बांधणें बरोबर होणार नाहीं. तथापि उपलब्ध आंकड्यांवरून व इतर तदनुषंगिक माहितीवरून सूक्ष्म गणितानें वस्तुस्थितीशीं अधिक जुळते असे आंकडे सिद्ध करणें सांख्यिकांना शक्य असतें. किंग्स्ले डेव्हिस या अमेरिकन सांख्यिकानें हिंदुस्थानांतील जन्ममृत्यूंच्या प्रमाणासंबंधीं सूक्ष्म गणितानें पुढील आंकडे सिद्ध केले आहेत.

| दशक | जन्म | मृत्यु |
|---|---|---|
| | (दर १००० लोकसंख्येशीं प्रमाण) | |
| १८८१–१८९१ | ४९ | ४१ |
| १८९१–१९०१ | ४६ | ४४ |
| १९०१–१९११ | ४९ | ४३ |
| १९११–१९२१ | ४८ | ४७ |
| १९२१–१९३१ | ४६ | ३६ |
| १९३१–१९४१ | ४५ | ३१ |

वरील आंकड्यांवरून हिंदुस्थानांतील जन्मांचें प्रमाण स्थूलमानानें वरील काळांत स्थिर होतें, परंतु मृत्यूंचें प्रमाण मात्र १९२१ पासून फारच झपाट्यानें घटलेलें स्पष्ट दिसतें. गेल्या दोन दशकांतील लोकसंख्येची वाढ मृत्यूंच्या प्रमाणांत घट झाल्यामुळेंच मुख्यत्वेंकरून झाली हेंहि उघड आहे. आतां पुढील काळांत जन्ममृत्यूंची वाढ अगर घट कशी अगर किती होण्याचा संभव आहे यासंबंधीं विचार करावयाचा.

प्रथमतः मृत्युसंख्येसंबंधीं विचार करूं. कारण गेल्या ३०–४० वर्षांतील लोकसंख्येची चढउतार मुख्यतः मृत्युसंख्येच्या चढउतारांच्या अनुरोधानेंच झालेली आहे. शिवाय भावी मृत्युसंख्येचा भावी जन्मसंख्येवर फार परिणाम होण्याचा संभव असतो. यासाठीं मृत्युसंख्येचा विचारच आधीं केला पाहिजे.

गेल्या दोन दशकांत मृत्युसंख्येची बरीच घट झालेली दिसते त्याचें मुख्य कारण या काळांत औषधें व वैद्यकीय सल्ला पूर्वीपेक्षां जास्त लोकांस मिळूं लागला हें होय. त्याचप्रमाणें निरनिराळ्या सांथींच्या रोगांचाहि प्रतिकार सरकार-मार्फत पूर्वीपेक्षां पुष्कळच जास्त प्रमाणांत केला गेला. यापुढील काळांतहि मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें अधिक जोमानें व उत्साहानें याच धोरणाचा पाठपुरावा करतील हें निश्चित. त्यामुळें भावी काळांत आतांपेक्षांहि जास्त लोकांस औषधें व वैद्यकीय सल्ला मिळेल. सांथीच्या रोगांचा अधिक निकरानें प्रतिकार केला जाईल. त्यामुळें भावी काळांत मृत्युसंख्या पूर्वीपेक्षांहि अधिक वेगानें घटेल असें अनुमान करणें चुकीचें ठरणार नाहीं. सरकारनें सार्वजनिक आरोग्य व त्यासंबंधींची व्यवस्था कशी करावी यासंबंधीं सर जोसेफ भोरे यांच्या अध्यक्षतेखालीं १९४५ मध्यें एक समिति नेमिली होती. तिचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यांत म्हटलें आहे कीं, “ हिंदुस्थानांत दरवर्षी सरासरी ६० लक्ष लोक मरतात. त्यांपैकीं निम्मे लोक योग्य औषधपाणी न मिळाल्यामुळें मरतात असें आम्हांस आढळून आलें आहे. आम्ही सार्वजनिक आरोग्यासंबंधीं केलेल्या शिफारसी सरकारनें अंमलांत आणल्या तर दरवर्षी निदान हे ३० लक्ष मृत्यु तरी टाळतां येतील असा आम्हांस विश्वास वाटतो.” (पृ. ४८०, भाग २).

यावरून पाहतां भावी काळांत हिंदुस्थानांतील मृत्युसंख्या कमी होईल असें विधान करण्यास हरकत नाहीं. याचा परिणाम लोकसंख्येवर कसा होईल याचें दिग्दर्शन करतांना भोरे-समितीचा अहवाल म्हणतो :—

“ १९३१ ते १९४१ या दशकांत साधारणपणें हिंदुस्थानांतील लोक-संख्या दरवर्षी ५० लक्ष या प्रमाणांत वाढली असें दिसतें. आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें जर दर वर्षी ३० लक्ष मृत्यु टाळतां आले तर पुढील काळांत दरवर्षी ८० लक्ष या प्रमाणांत लोकसंख्या वाढावयास प्रत्यवाय नाहीं. असें झाल्यास १९२१ ते १९४१ या काळांत लोकसंख्येची जितकी वाढ झाली तेवढी वाढ पुढील १० वर्षांतच होईल.” (कित्ता)

भावी जन्मसंख्येसंबंधीं विचार करतांना हल्लीं त्यासंबंधीं एक गमक सिद्ध करण्याचा प्रघात आहे. यास शुद्ध प्रजननाचें प्रमाण असें नांव देऊं. या-संबंधीं अधिक तपशीलवार विवेचन करण्यास येथें अवकाश नाहीं. या प्रमाणामध्यें भावी पिढ्यांतील स्त्रियांचें वयोमान, त्यांस होणारी संतति व त्यांत त्या वेळच्या मृत्युसंख्येमुळें पडणारे फरक हें सर्व साकल्यानें सामावलेलें

असतें. थोडक्यांत असें सांगतां येईल कीं, एखादी लोकसंख्या वर्धिष्णु आहे किंवा नाहीं हें ठरवावयाचें झाल्यास आपण आपलें लक्ष त्यामधील मातांच्या संख्येवर केंद्रित केलें पाहिजे. मातांच्या संख्येंतील भावी चढउतारावरच भावी जननाचें प्रमाण अवलंबून असल्यामुळें त्यांच्या संख्येंत पुढें कसा बदल होणार आहे, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. थोडक्यांत आजच्या पिढींतील १०० मातांच्या जागीं पुढच्या पिढींत किती माता येण्याचा संभव आहे हें ठरविलें पाहिजे. शुद्ध प्रजननाच्या प्रमाणावरून ही संख्या काढतां येते. इंग्लंडमध्यें हें प्रमाण दर हजारीं ८०० आहे. म्हणजे इंग्लंडमधील सध्यांच्या पिढींतील १००० मातांच्या जागीं पुढील पिढींत फक्त ८०० माता येण्याचा संभव आहे, असें म्हणणें यावरून प्राप्त होतें. हें प्रमाण सिद्ध करण्यास फारच तपशीलवार माहिती गोळा करावी लागते. हिंदुस्थानांत अशा तऱ्हेची माहिती फारशी उपलब्ध नाहीं. तथापि जी थोडीफार माहिती उपलब्ध आहे त्यावरून येथील कांहीं प्रदेशांतील शुद्ध प्रजननाचीं प्रमाणें पुढें दिलीं आहेत —

**शुद्ध प्रजननाचें प्रमाण-दर हजारीं**

| | | |
|---|---|---|
| त्रावणकोर | ( १९४१ ) | –१४०० |
| कोचीन | ( १९३७ ) | –१७०० |
| म्हैसूर | ( १९४१ ) | –१२५० |
| राजपुताना | ( १९४१ ) | –१५०० |

प्रस्तुत लेखकानें १९४६ सालीं कोल्हापूर शहरांत केलेल्या पाहणी-वरून त्या शहरांतील शुद्ध प्रजननाचें प्रमाण दर हजारीं १५०० पडतें असें आढळलें आहे. हीं प्रमाणें देशांतील कांहीं भागासंबंधींचींच आहेत व त्या-वरून सर्व देशाविषयीं विधान करणें बरोबर होणार नाहीं; तथापि या भागां-तील लोकसंख्येच्या भावी वाढीबद्दल या आंकड्यांवरून पुष्कळच निश्चित कल्पना बांधतां येईल.

हिंदुस्थानांतील भावी जन्मसंख्येबद्दल थोड्या निराळ्याच प्रकारानें विचार करतां येईल. एखाद्या देशांतील जन्मसंख्या बहुतांशीं तेथील लोकसंख्येंतील जननक्षम स्त्रियांच्या संख्येवर अवलंबून असते. एकंदर जननक्षम स्त्रियांपैकीं ज्यांचीं लग्नें होतात त्याच स्त्रिया मुख्यत्वेंकरून बालकांना जन्म देत असल्यामुळें जननक्षम स्त्रियांतील विवाहितांच्या प्रमाणाचा जन्मसंख्येवर महत्त्वाचा परिणाम होतो हें निराळें

सांगावयास नको. स्त्रिया साधारणपणें १३ ते ४५ वयोमानामध्यें जननक्षम असतात, असें नेहमींच्या अनुभवावरून दिसतें.

हिंदुस्थानांतील यासंबंधींचे उपलब्ध आंकडे फक्त १५ ते ४५ वयाच्या स्त्रियांसंबंधीं आहेत. त्यामुळें त्या वयोमानाच्या स्त्रियांसंबंधींच विचार करणें भाग आहे. एकंदर स्त्री-लोकसंख्येंतील १५ ते ४५ वयाच्या म्हणजेच जननक्षम स्त्रियांचें प्रमाण १९०१ ते १९३१ या कालांत शेंकडा २३ होतें. १९४१ चे आंकडे उपलब्ध नाहींत. इंग्लंडमध्यें १५–५० वयाच्या स्त्रिया १९३१ मध्यें सर्व स्त्रियांत २८ टक्के होत्या. अमेरिकेंत १९३० सालीं याच वयाच्या स्त्रिया २३·५ टक्के होत्या व आयर्लंडमध्यें १९२६ सालीं २१·१ टक्के होत्या. या तुलनात्मक आंकड्यांवरून हिंदुस्थानांतील जननक्षम स्त्रियांचें प्रमाण इतर देशांतील प्रमाणाच्या पेक्षां सर्वसाधारणपणें कमी नाहीं हें स्पष्ट दिसतें.

जननक्षम स्त्रियांपैकीं लग्न होण्याचें प्रमाण मात्र हिंदुस्थानांत इतर देशांच्या मानानें फार आहे. येथें १५ ते ४० वयाच्या स्त्रियांपैकीं शेंकडा ८० टक्के स्त्रिया विवाहित असतात असें आढळून आलें आहे व विवाहितांचें हें प्रमाण १९०१ पासून १९३१ पर्यंत मुळींच बदललेलें दिसत नाहीं. याउलट इंग्लंडमध्यें १९३१ मध्यें १५–४५ वयोमानांतील एकंदर स्त्रियांपैकीं शेंकडा ५० म्हणजे निम्म्या स्त्रिया विवाहित होत्या. इतर देशांतहि विवाहितांचें प्रमाण याच्या जवळपासच होतें.

यासंबंधीं थोडें आणखी तपशिलांत शिरतां येईल. स्त्रियांच्या जनन-क्षमतेच्या झालेल्या निरनिराळ्या पाहण्यांवरून असें आढळून येतें कीं, १५ ते ३० वयोमानांतील स्त्रियांना ३० ते ४५ वयोमानाच्या स्त्रियांपेक्षां पुष्कळच अधिक मुलें होतात. तरुण वयांत जननक्षमता वाढती असते व वयोमान कांहींएक मर्यादेपलीकडे वाढलें, म्हणजे ती झपाट्यानें कमी होते. ही गोष्ट लक्षांत घेतल्यास ज्या लोकसंख्येंतील १५–३० वयोमानांतील जननक्षम स्त्रियांचें प्रमाण जास्त असेल त्या लोकसंख्येची वाढ हें प्रमाण कमी असणाऱ्या लोकसंख्येपेक्षां जास्त वेगानें होईल. हें उघड आहे. हिंदुस्थानांत १५–३० वयाच्या स्त्रिया, लग्न झालेल्या जननक्षम (१५–४५ वयाच्या) स्त्रियांत शेंकडा ६४ टक्के असतात. इंग्लंडमध्यें हें प्रमाण १९३१ मध्यें फक्त ३३ टक्के होतें.

वर दिलेल्या सर्व गोष्टींचा विचार केल्यास हिंदुस्थानांतील लोकसंख्येची

जननशक्ति इतर देशांतील लोकसंख्येच्या जननशक्तीहून बरीच अधिक आहे हें स्पष्ट होईल. भावी कालांत ही जननशक्ति आणखीच वाढणार आहे. कारण यापूर्वी विवेचन केल्याप्रमाणें जर मृत्युसंख्या कमी झाली तर जननक्षम स्त्रियांची संख्याहि भावी काळांत पूर्वीपेक्षां वाढण्याचा संभव आहे. आपल्याकडील विवाहाच्या प्रमाणांत भावी काळांत दृश्य असा फरक पडेल असें मानावयास फारशी जागा नाहीं. या सर्व गोष्टींवरून भावी काळांत जन्मसंख्या आतांपेक्षां पुष्कळच जास्त असण्याची शक्यता आहे असें स्थूलमानानें विधान करावयास हरकत नाहीं. निदान आतांपेक्षां कमी तरी खास असणार नाहीं. भावी काळांत जन्मसंख्या जास्त अगर स्थिर राहण्याची व मृत्युसंख्येंतील घट होण्याची शक्यता लक्षांत आणली म्हणजे हिंदुस्थानांतील लोकसंख्या पुढील कालांत पूर्वीपेक्षांहि झपाट्यानें वाढेल हें मान्य केलें पाहिजे.

लोकसंख्येच्या भावी वाढीच्या मानानें उत्पादन वाढण्याची कितपत शक्यता आहे या प्रश्नाचा आतां विचार करावयाचा. उत्पादन दोन प्रकारचें— शेतकी व औद्योगिक. त्यांचा वेगवेगळा विचार केला पाहिजे.

शेतीचें उत्पादन दोन गोष्टींवर अवलंबून असतें. शेतीच्या कामीं येणारी जमीन व शेतीच्या उत्पादनाचें तंत्र व त्यास लागणारी पुंजी अगर भांडवल. अविभक्त ब्रिटिश हिंदुस्थानचें क्षेत्रफळ अंदाजें ६७ कोटि एकर होतें. पैकीं जवळजवळ ९ कोटि एकर जंगल व १४ कोटि एकर लागवडीस अनुपलब्ध. उरलेल्यापैकीं ५ कोटि एकर चालू पड, २३ कोटि लागवडीखालीं व उरलेली १६ कोटि एकर लागवडीस योग्य परंतु लागवडीखालीं नसलेली. या देशांतील शेंकडा ७५ टक्के लोक शेतीवर सर्वस्वीं अवलंबून आहेत. म्हणजे दरमाणशीं १ एकर वहीत जमीन असें प्रमाण पडतें. सर्व माणसें न घेतां शेतींत राबणारे कामगार घेतले तर प्रत्येक कामगारास ५ एकरांहूनहि कमी वहीत जमीन पडते. हें सर्वसाधारण प्रमाण झालें. प्रत्यक्षांत दर कामगारामागें १ व २ एकरांचें प्रमाणच देशाच्या पुष्कळ भागांत पडतें असें आढळून आलेलें आहे.

शेतीवर सर्वस्वी अवलंबून असणारी लोकसंख्या व एकंदर वहीत जमीन यांचें परस्पर प्रमाण फारच कमी असल्यामळें किमान जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाचें दरमाणशीं प्रमाण फारच अपुरें पडतें. शेतीचें उत्पादन वाढावयाचें तर प्रथमतः शेतजमीन व त्यावर अवलंबून असलेली लोकसंख्या यांचें प्रमाण वाढलें पाहिजे म्हणजे प्रत्येक कामगारामागें सध्यांपेक्षां जास्त

वहीत जमीन असली पाहिजे. शेतीची जमीन वाढण्यानें अगर शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या कमी होण्यानें ही गोष्ट साध्य होईल. परंतु यांपैकीं कोणतीच गोष्ट होण्याची शक्यता दिसत नाहीं. लागवडीखालीं अधिक जमीन आणतां येणार नाहीं काय? "लागवडीस योग्य परंतु लागवडीखालीं न आलेली" या वर्गांत जी १६ कोटि एकर जमीन आहे ती लागवडीखालीं आणण्यास अगर येण्यास काय हरकत आहे, असा साहजिकच प्रश्न उद्भवतो; आणि या वर्गाच्या जमिनी कशा प्रकारच्या असतात याची कल्पना नसल्यामुळें त्या आंकड्यांनीं पुष्कळ एतद्देशीय व परदेशी विद्वान् चकले आहेत. असली जमीन लागवडीखालीं आणण्यासारखी नसते. पुष्कळ वेळां ती फार खडकाळ अगर रेताड असते व तेथें पाण्याचें दुर्भिक्ष असतें. लागवड करण्यास शेतकरी नाहींत किंवा शेतकऱ्यांनीं त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळें या जमिनी नांगरटीखालीं आल्या नाहींत असें नाहीं. शिवाय या देशांतील पुष्कळसा गवताचा व चाऱ्याचा पुरवठा या जमिनींतच पैदा होतो. भगीरथ प्रयत्नानें या जमिनी लागवडीखालीं आणल्या तरी या देशांतील शेतीचीं व दुभतीं जनावरें पोसण्यासाठीं चारा-गवत उत्पादन करण्याकडेच त्यांपैकीं पुष्कळसा भाग वापरावा लागेल. या वर्गांतील जमिनींची ही अवस्था असल्यामुळें गेल्या ४० वर्षांत शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या सारखी वाढत असून सुद्धां, एकंदर लागवडीखालची जमीन फक्त ६ ते ७ टक्केच वाढली. अधिक जमीन लागवडीखालीं येऊन शेतीचें उत्पादन वाढण्याची शक्यता भावी काळांत फारच अल्प आहे.

शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्याहि कमी होण्याचा संभव नाहीं. कारण औद्योगीकरणामुळें शेतकीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येची फारच थोडी घट होण्याचा संभव आहे. कारण हिंदुस्थानचें संपूर्ण औद्योगीकरण झाल्यावरसुद्धां एकंदर लोकसंख्येपैकीं उद्योगधंद्यांवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचें प्रमाण सध्यांच्या एकंदर लोकसंख्येच्या जास्तींत जास्त १० ते १५ टक्क्यांहून अधिक असण्याचा संभव नाहीं. लोकसंख्या वाढत राहिल्यास हें प्रमाण कमीच होत जाईल. औद्योगीकरणासंबंधीं अधिक चर्चा पुढें केली आहे.

शेतीचें क्षेत्र वाढविण्याची मर्यादा थोडी असली तरी सध्यांच्याच क्षेत्रांत आधुनिक शेतकीतंत्रानें लागवड केल्यास उत्पादन वाढविण्याची शक्यता कितपत आहे? अशा तऱ्हेनें उत्पादन वाढविण्याचे मार्ग म्हणजे जास्त चांगलें बीबियाणें वापरणें, धरणें वगैरे बांधून अधिक जमीन पाटाच्या

पाण्याखालीं आणणें, जास्त खत घालून पीक वाढविणें व यांत्रिक साह्यानें सहकारी शेतीचा फैलाव करून उत्पादन वाढविणें हे होत. अशा प्रकारांनीं उत्पादन किती प्रमाणांत वाढवितां येईल याबद्दल सरकारी व बिनसरकारी तज्ज्ञांनीं बरेंच संशोधन केलें आहे. तें येथें सारांशरूपानें देतां येईल. हिंदुस्थानांतील लागवडीखालील बहुतेक सर्व जमीन शतकानुशतकांच्या लागवडीमुळें व इतर कारणांमुळें कसास इतकी उरलेली आहे कीं, ती याहून अधिक खराब होणें शक्य नाहीं असें संशोधनान्तीं सिद्ध झालें आहे. त्यामुळें या देशांत दर एकरी पैदाशीचें प्रमाण फारच कमी आहे. उत्तम बीबियाण्यांच्या व खतांच्या साह्यानें अन्नधान्यें व गळिताचीं धान्यें यांचें उत्पादन सध्याच्या ३०ते४० टक्क्यांनीं अधिक वाढवितां येईल असें डॉ. बर्न्स यांच्या संशोधनावरून दिसतें. नवीन धरणें वगैरे बांधून पुढील २०–२५ वर्षांत पाटस्थळ ५० लक्ष एकरांनीं वाढवितां येईल असा अंदाज करण्यांत आला आहे व त्यामुळें सध्यांच्या उत्पादनांत १० ते १५ टक्क्यांइतकी वाढ होईल असा अंदाज आहे. जास्त खत घालून उत्पादन वाढवितां येईल; परंतु पाटाखालीं आलेल्या जमिनीचा कस फार झपाट्यानें उतरतो असें सिद्ध झालेलें आहे व त्यामुळें त्या जमिनींत खत पुष्कळच मोठ्या प्रमाणावर घालावें लागतें. हिंदुस्थानांतील उपलब्ध व भावी खताचा पुरवठा लक्षांत घेऊन जास्त खत व पाटस्थळांची वाढ या दोहोंमिळून शेतीच्या उत्पादनांत सरासरी २० ते २५ टक्क्यांची वाढ होऊं शकेल असें म्हणतां येईल. चांगलें बीबियाणें वापरून हें प्रमाण ५।१० टक्क्यांनीं आणखी वाढवितां येईल. यांत्रिक साह्यानें मोठ्या प्रमाणावर शेती केल्यास त्यामुळें शेतकीसाठीं लागणारे कामगार व अवजारें यांत पुष्कळ बचत होईल. परंतु केवळ त्यामुळें उत्पादन वाढणार नाहीं. कामगार पूर्वीपेक्षां पुष्कळच कमी लागतील. म्हणजे आज शेतींत गुंतलेले बरेचसे कामगार बेकार होतील. आधुनिक यांत्रिक साह्यानें मोठ्या प्रमाणावर सर्वत्र शेती केल्यास हिंदुस्थानांतील शेतींत गुंतलेल्यांपैकीं जवळजवळ ३ कोटी कामगार बेकार होतील असा अंदाज आहे. यांना इतर उद्योगधंद्यांत रोजगार अगर कामधंदा न मिळाल्यास त्यांना शेतीवरच अवलंबून राहावें लागेल. औद्योगीकरणामुळें यांपैकीं फारतर १० ते १५ टक्के कामगारांनाच कामधंदा मिळण्याचा संभव आहे. यासंबंधीं अधिक विवेचन पुढें केलें आहे.

शेतकीच्या तंत्रांत वर उल्लेखिल्याप्रमाणें सुधारणा झाल्यास पुढील २०–२५ वर्षांत शेतीचें उत्पादन ३० ते ४० टक्केपर्यंत वाढविण्याची शक्यता आहे.

तथापि ही शक्यता प्रत्यक्षांत येण्याच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत. शेतकीच्या तंत्रांत वरील सुधारणा करावयाच्या म्हणजे थोडक्यांत शेतींत अधिक ( भांडवल ) पुंजी गुंतवावयाची. उत्तम बींबियाणें, खतें वगैरे घ्यावयाचीं म्हणजे त्यांस पैसा पाहिजे. आणि त्याचा तर आपल्या शेतकऱ्याकडे खडखडाट. तेव्हां खतें व बीं-बियाणें यांसाठीं सरकारनें खर्च केला पाहिजे. धरणें बांधण्यासाठीं लागणारा प्रचंड खर्च सरकारास करणें भाग आहे. परंतु सरकार झालें तरी खर्च कोठून करणार ? कराच्या आणि कर्जाच्या रूपानें जनतेकडून पैसा घेऊनच सरकार तरी हा खर्च करणार. म्हणजे शेवटीं जनतेच्या एकंदर उत्पन्नापैकीं किती भाग अशा प्रकारानें सरकारास घेतां येईल हें पाहिलें पाहिजे. दारिद्र्यानें जर्जर झालेल्या जनतेकडून अशा प्रकारें फारच थोडा पैसा उभारतां येईल. जनतेचें जीवनमान सध्यांच निकृष्ट आहे, तें अधिक निकृष्ट न करतां सरकारास कर व कर्जाच्या रूपानें फारसा पैसा उभारतां येणार नाहीं. त्यामुळें शेतीच्या सुधारणेस लागणारी ( भांडवल ) पुंजी कमी पडेल व वर उल्लेखिलेल्या शक्य उत्पादनवाढींपैकीं फारच थोडी प्रत्यक्षांत येईल, असा संभव दिसतो.

हिंदुस्थानांतील पुष्कळ लोकांच्या आशा-आकांक्षा शेतकीपेक्षां औद्योगीकरण व त्यामुळें उत्पादनांत होणारी वाढ यावर केन्द्रित झाल्या आहेत. हिंदुस्थानच्या भावी औद्योगीकरणासंबंधीं फार पूर्वीपासून अनेक रम्य चित्रें ( स्वप्नें ) रंगविण्यांत आलेलीं आहेत. अलीकडे त्या प्रश्नाचा अधिक विचार होऊन औद्योगीकरणासंबंधीं अधिक वास्तवदर्शी कल्पना फैलावूं लागल्या आहेत. तथापि त्यांचा फैलाव अजून व्हावा तितका झालेला नाहीं. सर्वसाधारण हिंदी मनुष्यास तीं पूर्वींचींच चित्रें अद्यापहि खरीं वाटतात. औद्योगीकरणाची वस्तुस्थिति खालीलप्रमाणें आहे.

कोणत्याहि देशांतील औद्योगीकरण खालील गोष्टींवर अवलंबून असतें:— ( १ ) औद्योगीकरणास आवश्यक असलेली नैसर्गिक संपत्ति, ( २ ) पुंजी ( भांडवल ), ( ३ ) कामगारांचा पुरवठा, ( ४ ) औद्योगिक बनावटीच्या मालाची बाजारपेठ व त्यास येणारी अन्तर्गत मागणी. पैकीं ( ३ ) व ( ४ ) यासंबंधीं हिंदुस्थानांत फारशी अडचण येणार नाहीं, असें धरून चालूं. अगदीं काटेकोरपणें पाहिलें तर ( ४ ) संबंधीं हें तितकेंसें खरें नाहीं. परंतु विवेचन आटोपतें घेण्यासाठीं हा मुद्दा दुय्यम महत्त्वाचा मानावयास हरकत नाहीं.

औद्योगीकरणास लागणारी नैसर्गिक संपत्ति हिंदुस्थानांत फारच विपुल आहे अशी आपल्याकडे सार्वत्रिक समजूत आहे, पण ती तितकीशी खरी नाहीं. लोकसंख्येच्या मानानें हिंदुस्थानची नैसर्गिक संपत्ति इतर देशांच्या मानानें फारच कमी आहे. यासंबंधीं तपशिलांत शिरल्यास फार विस्तार होईल. म्हणून थोड्या निराळ्या पद्धतीनें या प्रश्नाचा थोडक्यांत विचार करणें आवश्यक आहे.

लोखंड, उद्योगधंद्यास लागणाऱ्या शक्तीच्या निर्मितीसाठीं कोळसा व वीज या तीन गोष्टी औद्योगीकरणाचा कणाच होत. या तिन्ही गोष्टींच्या दर माणशीं पडणाऱ्या प्रमाणावरून एकंदर देशाच्या औद्योगीकरणासंबंधीं स्थूलमानानें कल्पना बांधतां येते. हीं प्रमाणें हिंदुस्थान व इतर देशांत कशी पडतात याचे आंकडे खालीं दिले आहेत.

**दरमाणशीं लोखंड, कोळसा व वीज यांचें प्रमाण**

| देश | कोळशाचा एकंदर सांठा ( टन ) | वीज (अश्वशक्ति) सध्यांची व पुढें होणारी | लोखंड एकंदर सांठा ( टन ) |
|---|---|---|---|
| इंग्लंड | ३,७०० | ०.०१५ | ३८.१ |
| अमेरिका ( क्यूबा ) | १७,००० | ०.२५ | ४८.० |
| रशिया | ६,३०० | ०.४६ | ९४.० |
| जपान | २२७ | ०.१० | ०.४ |
| चीन | ५४६ | ०.०५ | १.४ |
| हिंदुस्थान | ६६ | ०.१० | ५.९ |

या आंकड्यांवरून हिंदुस्थानांतील परिस्थितीची कल्पना येईल. हिंदुस्थानांतील भूगर्भांतील अज्ञात संपत्तीचा सांठाहि वाटतो तितका मोठा नाहीं. त्यामुळें त्यासंबंधीं अधिक माहिती मिळाल्यानें वर दिलेल्या प्रमाणांत फार मोठा फरक पडेल असें वाटत नाहीं. तथापि चीन व जपानचे आंकडे लक्षांत घेतल्यास हिंदुस्थानसारखीच तेथें परिस्थिति आहे असें दिसेल. अशा परिस्थितींत सुद्धां जपानचें फार मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण झालेलें होतें, या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे व त्याचीं कारणें शोधलीं पाहिजेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे नैसर्गिक संपत्तीचा अपुरेपणा इतर देशांतून त्या वस्तु आयात करून भरून काढण्याची शक्यता असते व

जपाननें याच मार्गानें औद्योगीकरणाचा उच्चांक गांठला होता. हा मार्ग अनुसरण्याची शक्यता हिंदुस्थानच्या बाबतींत त्याच्या लघुतर निर्गत शक्तीमुळें मर्यादित झालेली आहे. बाहेरच्या देशांतून माल आणावयाचा तर त्यासाठीं तितक्याच किंमतीचा माल बाहेर पाठवावा लागतो अगर परदेशांत कर्जाची व्यवस्था करावी लागते. घरची गरज भागून उरलेलें उत्पादनच अशा प्रकारें बाहेर पाठवितां येतें. घरची गरज कमी करावयाची म्हणजे आधींच निकृष्ट असलेलें हिंदी जीवनमान आणखीं निकृष्ट करावयाचें ! असें करणें शक्य नाहीं व योग्यहि नाहीं. यासाठीं जपानच्या मार्गानें हिंदुस्थानचें औद्योगीकरण करण्याची शक्यता फार मर्यादित आहे. परदेशांतील कर्जासंबंधीं खालीं उल्लेख केला आहे.

संपूर्ण औद्योगीकरण करण्यास हिंदुस्थानास किती नवीन भांडवल त्यांत गुंतवावें लागेल यासंबंधीं निरनिराळे अंदाज करण्यांत आलेले आहेत. त्यांपैकीं सर्वांत कमी अंदाजाप्रमाणें रु. २० सर्वांचें भांडवल लागेल. यांत वर उल्लेखिलेलें आयातीसाठीं लागणारें भांडवल प्रविष्ट आहे. एकंदर भांडवलाचा पुरवठा हा एकंदर उत्पादनापैकीं किमान गरजा भागवून उरलेल्या भागांतून होत असतो. एकंदर उत्पादनापैकीं भांडवल म्हणून उपयोगिण्यास किती भागाची बचत करतां येते यावर भांडवलाचा पुरवठा अवलंबून असतो. हिंदुस्थानांतील एकंदर उत्पादन लोकसंख्येच्या मानानें फार कमी असल्यामुळें दरवर्षीं उपलब्ध होणारा भांडवलाचा पुरवठाहि फार लहान असतो. हिंदुस्थानांतील एकंदर उत्पादन १९३१ सालीं स्थूलमानानें रु. २० सर्व होतें व त्यापैकीं ६.७ टक्क्याइतकें भांडवल दरवर्षीं उपलब्ध होत होतें असा अंदाज करण्यांत आला आहे. युद्धारंभापर्यंत उत्पादन द्विढीनें वाढलें व त्यापैकीं १५ टक्क्याइतकें भांडवलासाठीं उपलब्ध झालें असें घटकाभर मानल्यास या १० वर्षांत एकंदर रु. ४$\frac{1}{2}$ सर्व भांडवल उपलब्ध झालें असतें. अर्थात् वरील दोन्ही गृहीतकृत्यें खरीं नाहींत व शक्यहि नाहींत.

बचतीचें प्रमाण १५ टक्क्यांइतकें वाढविण्यासाठीं जीवनमान पुष्कळच अधिक निकृष्ट करावें लागेल. तसेंच उत्पादनाची वाढहि भांडवलाच्या भरपूर पुरवठ्याशिवाय वर म्हटल्याइतक्या प्रमाणांत होणें अशक्य आहे. उत्पादन कमी म्हणून भांडवलाचा पुरवठा कमी व तो कमी म्हणून उत्पादनाची वाढ कमी असें हें दुष्ट चक्र आहे. वर उल्लेखिलेला अवास्तव अंदाज जरी खरा मानला तरी सुद्धां एकंदर भांडवलाची गरज पाव हिश्यापेक्षां थोडी कमी

एवढीच भागूं शकते. शेतीच्या सुधारणेसाठीं लागणाऱ्या व घसारा वगैरेसाठीं लागणाऱ्या भांडवलाचा वरील अंदाजांत समावेश केलेला नाहीं. तो केल्यास हिंदुस्थानांतील उपलब्ध भांडवलाचा पुरवठा जरुरीच्या मानानें किती थोडा आहे याची खात्री पटेल.

वरील सर्व चर्चेचा निष्कर्ष असा. हिंदुस्थानांत भावी कालांत शेतकी व औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचें प्रमाण मुख्यतः त्यांत गुंतविण्यासाठीं लागणाऱ्या नवीन भांडवलाचा पुरवठा ज्या प्रमाणांत उपलब्ध होईल त्यावर अवलंबून राहील. हिंदुस्थानांत हल्लीं प्रतिवर्षीं उपलब्ध होणारा भांडवलाचा सांठा फार थोडा असल्यामुळें यावरच अवलंबून राहावयाचें ठरविल्यास उत्पादनाची वाढ फारच लहान प्रमाणांत होईल. नियोजन अगर इतर साधनांनीं प्रतिवर्षीं उपलब्ध होणारा भांडवलाचा सांठा वाढवावयाचा म्हटल्यास त्यामुळें जनतेचें जीवनमान सध्यांपेक्षांहि अधिक निकृष्ट करावें लागेल व तितकें करून सुद्धां उपलब्ध होणारा भांडवलाचा सांठा गरजेच्या मानानें अगदींच तोकडा पडेल. परदेशाहून भांडवल आणण्याच्या मार्गातील अडचणी विश्रुत आहेत. त्यासंबंधीं अधिक लिहिणें अनावश्यक आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला तर भावी काळांत उत्पादनाची वाढ फार अल्प प्रमाणानेंच होणार आहे असें दिसतें.

लोकसंख्या व उत्पादन यांच्या परस्पर वाढीचें भावी काळांतील समीकरण कसें असेल, याची आतां बरीचशी स्पष्ट कल्पना येईल. भावी काळांत लोकसंख्येची वाढ झपाट्यानें व उत्पादनाची वाढ मंदपणें होणार असा रंग दिसतो. उत्पादनाच्या वाढीस लोकसंख्येच्या वाढीमुळें मदत होण्याऐवजीं अपायच होईल. कारण उत्पादन व लोकसंख्या यांचें प्रमाण जसजसें जास्त व्यस्त होईल तसतसें जनतेचें जीवनमान उतरत जाईल. या वाढत्या दारिद्र्यामुळें उपलब्ध भांडवलाचा सांठाहि घटेल व त्यामुळें उत्पादनवाढीस त्या मानानें पायबंद बसेल. हिंदुस्थानची लोकसंख्या सध्यां बेसुमार आहे आणि पुढच्या काळांतहि या परिस्थितींत बदल होण्याचा फारसा संभव दिसत नाहीं हें आतां निराळ्यानें सांगण्याची जरुरी नाहीं.

लोकसंख्या व उत्पादनवाढ यांमधील दुष्ट चक्रांतून मार्ग काढावयाचा तर या दुष्ट चक्राचें अस्तित्व प्रथम आमच्या राज्यकर्त्यांस व जनतेस उमगलें पाहिजे. नजीकच्या काळांत तसें होण्याचा संभव प्रस्तुत लेखकास फारच कमी दिसतो. कांहीं दैवी चमत्कारांमुळें तसें होईल असा आशावाद बाळगल्यास हें

दुष्ट चक्र कसें थांबवितां येईल? यासाठीं लोकसंख्या व उत्पादन या दोन्ही गोष्टींचें नियोजन करावें लागेल. देशाच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें लोकसंख्येचें नियोजन अत्यंत आवश्यक आहे. तें कसें करतां येईल व त्यामार्गांत कोणत्या अडचणी आहेत हा विषय स्वतंत्र आहे.*

* या लेखांत चर्चिलेल्या विषयासंबंधीं अधिक चर्चा जिज्ञासूंना खालील ठिकाणीं आढळेल: ( 1 ) Pressure of Population and Economic Efficiency in India, D. Ghosh, Indian Council of World Affairs, 1946, Price Rs. 3-4-0 या पुस्तकांतील माहितीचा वरील लेखांत पुष्कळ उपयोग केला आहे. (2) Population Planning in India, N. V. Sovani, Indian Journal of Economics, January 1947.

# २०. कोल्हापुरांतील जननसंख्येसंबंधीं कांहीं माहिती*

कोल्हापूर नगरपालिकेनें पुणें येथील गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्थेकडून कोल्हापूर शहराची आर्थिक व सामाजिक पाहणी करवून घेतली. या पाहणीचा अहवाल सध्यां तयार होत आहे. या पाहणींतच कोल्हापूर शहरांतील जननसंख्येच्या पाहणीचा अन्तर्भाव करण्यांत आला होता. त्यांत उपलब्ध झालेली कांहीं माहिती येथें संकलित केली आहे.

कोणत्याहि आर्थिक अगर सामाजिक योजना करतांना एकंदर लोकसंख्या, तिच्यांतील वयवारी, स्त्रीपुरुष प्रमाण यांचा विचार करणें भाग असतें. कारण त्या पुऱ्या होईपर्यंत लोकसंख्येची वाढ अगर घट झाल्यास त्या पुष्कळ वेळां अपुऱ्या अगर फाजील खर्चाच्या ठरण्याचा संभव निर्माण होतो. यासाठींच कोणत्याहि दीर्घकालीन आर्थिक अगर सामाजिक योजना करतांना लोकसंख्येची त्या काळांत वाढ अगर घट होईल याचा अंदाज बांधून त्याप्रमाणें त्यांत फेरबदल करावे लागतात. उदाहरणार्थ, प्राथमिक शिक्षणाचाच प्रश्न घ्या! प्राथमिक शिक्षण पुढील १५ वर्षांत सक्तीचें करावयाची एखादी सरकारनें योजना आंखली तर त्या १५ वर्षांत या कायद्याखालीं येणाऱ्या मुलांची संख्या किती असेल याचा कांहीं अंदाज बांधून त्याप्रमाणें शाळांची व शिक्षकांची संख्या ठरविणें भाग पडेल आणि तितक्या शाळा व शिक्षक या कार्यासाठीं तयार ठेवावे लागतील. तसें न केल्यास मुलांची संख्या त्या मुदतींत सध्यांपेक्षां पुष्कळ वाढेल अगर कमी होईल. संख्या वाढली तर शिक्षक व शाळा कमी पडतील व सर्वच योजना अयशस्वी होईल. मुलांची संख्या कमी झाल्यास शिक्षक व शाळा बेकार होतील व जनतेचा त्यावर खर्च झालेला पैसा व्यर्थ खर्च झाला असें होईल. हाच नियम इतर योजनांसहि लागू पडतो. लोकसंख्येची वाढ अगर घट यासंबंधीं बिनचूक अंदाज बांधण्याच्या कामीं जननसंख्येच्या पाहणीमुळें उपलब्ध झालेल्या माहितीचा फार उपयोग होतो, ही गोष्ट आतां सर्वत्र मान्य झालेली आहे.

---

* पुढारी, दिवाळी अंक, १९४७.

एखाद्या प्रदेशांतील लोकसंख्येची वाढ अगर घट तेथील एकंदर जन्म-मृत्यूंची संख्या आणि परप्रदेशांतून तेथें येणाऱ्यांची व त्या प्रदेशांतून इतर प्रदेशांत जाणाऱ्यांची संख्या या दोन गोष्टींवर अवलंबून असते. यांपैकीं दुसऱ्या गोष्टीसंबंधानें येथें विचार केलेला नाहीं. तो एक स्वतंत्र विषय आहे. येथें पहिल्या गोष्टीसंबंधानेंच विचार करावयाचा आहे.

स्थूलमानानें पाहतां एखाद्या देशांतील प्रतिवर्षींची एकंदर जन्मसंख्या एकंदर मृत्युसंख्येहून जास्त अगर कमी असेल त्याप्रमाणें त्या देशांतील लोकसंख्येची वाढ अगर घट होईल हें सहज समजण्यासारखें आहे. जन्ममृत्यूंची नोंद बहुतेक सर्व सुधारलेल्या देशांतून सक्तीनें केली जाते. पुष्कळ ठिकाणीं ती संपूर्णपणें होत नाहीं. परंतु ती तशी व्हावी अशा तऱ्हेचे प्रयत्न केले जातात. या नोंदणींत उपलब्ध होणाऱ्या माहितीवरूनच लोकसंख्येच्या चढउतारासंबंधीं प्रथमतः अनुमानें बांधण्याची पद्धत रूढ होती. विचार-सौकर्यासाठीं एकंदर जन्ममृत्यूंच्या संख्यांऐवजीं त्यांचें दरहजारीं लोकसंख्येशीं पडणारें प्रमाण वापरण्याची पद्धत असे. या दरहजारीं प्रमाणास आपण अनुक्रमें जननार्घ ( Birth rate ) व मरणार्घ ( Death rate ) अशीं नांवें देऊं. जननार्घ व मरणार्घ यांचे प्रतिवर्षींचे आंकडे आजहि सर्व सुधारलेल्या देशांतून प्रसिद्धिले जातात. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत १९३८ सालीं जननार्घ ३४ व मरणार्घ २५ होता. इंग्लंडमध्यें ते १९३०-३२ सालीं अनुक्रमें १६ व १२ होते. जननार्घ मरणार्घापेक्षां ज्याप्रमाणें जास्त अगर कमी असेल, त्याप्रमाणें लोकसंख्येची वाढ अगर घट होईल यासंबंधीं अनुमानें बांधलीं जात असत.

एखाद्या देशांतील एकंदर जन्मसंख्या त्या देशाच्या लोकसंख्येंतील स्त्रियांचें व त्यांतील जननक्षम स्त्रियांचें प्रमाण यावर अवलंबून असते. त्याचप्रमाणें एकंदर मृत्युसंख्या लोकसंख्येच्या वयोमानावर व आरोग्यावर अवलंबून असते, ही गोष्ट थोड्या विचारान्तीं पटण्यासारखी आहे. यासाठीं भविष्यकाळांतील लोकसंख्येच्या वाढीसंबंधीं अंदाज बांधतांना केवळ सध्यांच्या अगर पूर्वींच्या जन्ममृत्यूंच्या संख्येबद्दल विचार करून चालणार नाहीं हें स्पष्ट आहे. त्यासाठीं भविष्यकाळांत जन्म व मृत्युसंख्या यांची वाढ अगर घट कशी व किती होईल याची कल्पना येणें व त्यासंबंधीं अंदाज बांधणें आवश्यक आहे. तसें करावयाचें झाल्यास वर सुचविल्याप्रमाणें लोकसंख्येंतील स्त्री–पुरुषांचें परस्पर प्रमाण व त्यांचें प्रत्येकीं वयोमान कसें बदलत आलेलें आहे व पुढें बदलण्याचा

संभव आहे, यासंबंधीं निश्चित अंदाज बांधतां आला पाहिजे. पूर्वी वर्णन केलेल्या जननार्धाच्या अगर मरणार्धाच्या आंकड्यांवरून सद्यःस्थितीवर प्रकाश पडला तरी त्यांवरून भाविष्यकाळीं कसकसे फेरबदल होणार आहेत हें कळत नाहीं. त्यामुळें या आंकड्यांवरून भविष्यकालीन लोकसंख्येच्या वाढीबद्दल अगर ऱ्हासाबद्दल कांहींच अंदाज बांधणें शक्य होत नाहीं. असे अंदाज बांधावयाच्या दृष्टीनें जननार्ध व मरणार्ध यांपेक्षां जास्त प्रगत ज्ञापकें निर्माण करण्याकडे या शास्त्रांतील विचारवंतांचें साहाजिकच लक्ष गेलें.

या दिशेनें विचारास चालना मिळाल्यावर जननासंबंधींच्या विचारांत जी प्रगति झाली त्यासंबंधीं प्रथम विचार करूं. एखाद्या देशांतील जन्मसंख्या तेथील लोकसंख्येंतलि जननक्षम स्त्रियांच्या प्रमाणावर अवलंबून असते. कारण त्याच स्त्रियांना मुलें होऊं शकतात. ही गोष्ट लक्षांत आणल्यास जननार्ध काढतांना एका वर्षांत झालेल्या सर्व जन्मांची सर्व लोकसंख्येशीं जी सांगड बांधण्यांत येते ती तितकीशी अन्वर्थक नसते ही गोष्ट विचारवंतांच्या प्रथम लक्षांत आली. सर्व जन्मांची सर्व लोकसंख्येशीं सांगड घालण्याऐवजीं एकंदर जन्मसंख्येचें लोकसंख्येंतील जननक्षम स्त्रियांच्या संख्येशीं किती प्रमाण पडतें हें पाहिल्यास त्यामुळें त्या लोकसंख्येच्या चढउताराबद्दल अधिक निश्चित कल्पना बांधतां येईल असा विचार स्टुइक या डच सांख्यिकानें पुढें मांडला. ही कल्पना बहुतेकांना तत्काळ मान्य झाली. स्त्रिया साधारणपणें १३ ते ४५ वर्षांपर्यंत जननक्षम असतात ही गोष्ट आपल्या नेहमींच्या अनुभवांतील आहे. युरोप–अमेरिकेंत ह्या वयांच्या मर्यादा १५ ते ५० अशा असतात. देशकाल-परिस्थितीप्रमाणें त्या बदलतात हें उघडच आहे. स्टुइक यांच्या सूचनेप्रमाणें एका वर्षांत होणाऱ्या सर्व जन्मांचे लोकसंख्येंतील १३ ते ४५ वर्षांच्या स्त्रियांशीं दरहजारीं प्रमाण निरनिराळ्या देशांत काढण्यांत येऊं लागलें व त्या प्रमाणाचा लोकसंख्येसंबंधीं अनुमानें करण्याकडे उपयोग होऊं लागला. या प्रमाणास आपण सकल ( Gross ) जननाचें प्रमाण असें नांव देऊ.

हें ज्ञापक जननार्धापेक्षां प्रगत व कर्मदक्ष होतें. परंतु त्यांतहि दोष होते. १३ ते ४५ वयाच्या स्त्रिया जननक्षम असतात हें खरें; परंतु त्या वयोमानाच्या सर्व स्त्रियांची जननक्षमता सारखी अगर एकाच पातळीवर नसते, हेंहि तितकेंच खरें आहे. स्त्रियांच्या वाढत्या वयोमानाबरोबर जननक्षमताहि कमी होते व १३ ते ३० वर्षांपर्यंतच्या स्त्रियांना ३० ते ४५ वर्षांच्या स्त्रियां-

पेक्षां जास्त मुलें होतात ही गोष्टहि नेहमींच्या अनुभवांतली आहे. त्यामुळें एखाद्या देशाच्या लोकसंख्येंत १३ ते ३० वयाच्या स्त्रियांचें प्रमाण ३० ते ४५ वर्षांच्या स्त्रियांच्या प्रमाणाहून कमी अगर जास्त असेल त्याप्रमाणें तेथील जननसंख्येवर त्याचा परिणाम होईल. याकरितां जननासंबंधीं अधिक निश्चित अनुमान बांधावयाचें असेल तर वर उल्लेखिलेल्या गोष्टींचा ज्यांत अन्तर्भाव झालेला आहे असें अधिक शुद्ध ज्ञापक निर्माण केलें पाहिजे, असें ओघानेंच आलें. सकल जननाचें प्रमाण काढतांना १३ ते ४५ वयांच्या स्त्रियांची जननक्षमता एकसारखी आहे असें आपण गृहीत धरतों, ती तशी सारखी नसते या गोष्टीकडे लक्ष पुरवावयाचें तर १३ ते ४५ वयाच्या सर्व स्त्रियांचें एकत्र असें सकल जननाचें प्रमाण न काढतां त्यांतील प्रत्येक वर्षाच्या अथवा ५ वर्षांच्या गटांतील स्त्रियांचें सकल जननाचें प्रमाण काढणें अधिक इष्ट ठरेल. म्हणजे १५ वर्षांच्या बायकांना किती मुले एका वर्षांत झालीं व त्यावरून १५ वर्षांच्या १००० बायकांस किती मुलें होतील हें काढावयाचें. असें १३ ते ४५ यांपैकीं प्रत्येक वर्षाच्या स्त्रियांच्या सकल जननाचें प्रमाण काढावयाचें अगर प्रत्येक वर्षासाठीं न काढतां ५ वर्षांचे गट करून १५ ते २०, २० ते २५ इत्यादि वयांच्या स्त्रियांचे सकल जननाचें प्रमाण काढांवयाचें. या प्रमाणांना आपण वयविशिष्ट जननांचीं प्रमाणें असें नांव देऊं. वयविशिष्ट जननांचीं प्रमाणें काढण्याची कल्पना वॉर्गेन्टिन या स्वीडन-मधील सांख्यिकानें फार पूर्वींच मांडली होती. तिला यामुळें उजळा मिळाला. वयविशिष्ट जननाचीं प्रमाणें काढावयाचीं म्हणजे दरवर्षी जन्मणाऱ्या मुलांचें त्यांच्या मातांच्या वयाप्रमाणें वर्गीकरण करावयाचें व नंतर त्यांचीं दरहजारीं प्रमाणें काढावयाचीं असा अर्थ झाला. हीं प्रमाणें काढावयाचीं तर नुसत्या जन्मांची संख्या व जननक्षम स्त्रियांची संख्या यांचे आंकडे उपलब्ध असून भागणार नाहीं. तर प्रत्येक जन्माची नोंद करतांना प्रसूत झालेल्या स्त्रीचें त्यावेळचें वयाहि नोंदलें पाहिजे हें उघड आहे. अशा तऱ्हेची नोंद हिंदुस्थानांतच काय पण इंग्लंडमध्यें व इतर युरोपियन देशांमध्येंहि केली जात नसे. स्वीडन देशामध्यें मात्र अशा तऱ्हेची नोंद १८ व्या शतकापासून आजपर्यंत होत आलेली आहे. इंग्लंडमध्यें १९३८ सालीं खास कायदा करून अशा तऱ्हेची नोंद करण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. तथापि हिंदुस्थान व इतर पुष्कळ देशांतून अशी नोंद करण्याची पद्धत नसल्यामुळें

त्या देशांतील वयविशिष्ट जननांचीं प्रमाणें काढावयासाठीं खास पाहणी करणें जरूर असतें.

वयविशिष्ट जननांचीं प्रमाणेंहि अधिक सुधारणें आवश्यक आहे असें लवकरच दिसून आलें. एखाद्या लोकसंख्येंतील १६ वर्षांच्या स्त्रिया घेतल्या तर त्यांपैकीं कांहींचीं लग्नें झालेलीं नसतात तर कांहींचीं लग्नें होऊन त्या विधवा झालेल्या असतात. अशा स्त्रिया जननक्षम असल्या तरी त्यांना सहसा संतति होत नाहीं. म्हणून वयविशिष्ट जननाचें प्रमाण काढतांना फक्त लग्न झालेल्या सौभाग्यवती स्त्रियांचाच विचार करण्यांत यावा अशी सूचना पुढें आली. ती स्वीकृत झाली; त्यामुळें विवाहित स्त्रियांचीं वयविशिष्ट जननप्रमाणें काढण्याचा परिपाठ पडला. या सुधारणेमुळें वयोमानाशिवाय लग्नसंस्था, अगर पुनर्विवाहाचा अभाव इत्यादि सामाजिक गोष्टींमुळें जननसंख्येवर होणारा परिणामहि विचारांत घेण्याची सोय झाली. तथापि अनेक वयविशिष्ट जननप्रमाणांचें एकत्रीकरण करून त्याला अधिक सुटसुटीत स्वरूप देण्याची जरुरी आतां भासूं लागली. कारण १३ ते ४५ पर्यंतच्या प्रत्येक वर्षाच्या अशा ३७ जननप्रमाणांवरून जननासंबंधीं अंदाज बांधणें जवळजवळ अशक्यच होऊं लागलें. अशा तऱ्हेचें एकत्रीकरण करण्याचा मार्ग इंग्लंडमधील नामवंत सांख्यिक कुशिन्स्कि यांनीं प्रथम सुचविला. एखाद्या लोकसंख्येंतलि वयविशिष्ट जननप्रमाणांची बेरीज केली म्हणजे १००० स्त्रियांनीं १३ ते ४५ वयापर्यंतचा आयुष्याचा मार्ग अनुक्रमल्यास त्यांना किती मुलें होऊं शकतील हें कळून येईल अशी कल्पना कुशिन्स्कि यांनीं मांडली. म्हणजे १३ ते ४५ वयाच्या विवाहित स्त्रियांचीं ३७ वयविशिष्ट जननप्रमाणें घ्यावयाची व त्यांची बेरीज करावयाची. या गणितानें सिद्ध होणारी संख्या १००० स्त्रिया १३ ते ४५ वयापर्यंत आयुष्य क्रमत्या झाल्या तर त्यांना किती मुलें होतील हे दर्शविते. या संख्येस शुद्ध ( net ) जननाचें प्रमाण असें नांव देऊं.

तथापि सर्व स्त्रिया ४५ वर्षांपर्यंत जगत नाहींत ही गोष्ट निर्विवाद आहे. आज जन्मलेल्या हजार मुलींपैकीं कांहीं १२ वर्षांच्या होण्याच्या आंतच मरून जातात, कांहीं १३ ते ४५ या वयाच्या दरम्यान मरतात. त्यामुळें शुद्ध जननाचें प्रमाण वस्तुस्थितीशीं बऱ्याच अंशीं विसंगतच असणार हें उघड आहे. तें अधिक सुसंगत करावयाचें तर मृत्युसंख्येचा विचार करून त्याच्याशीं याचा मेळ घालणें आवश्यक होतें. या अनुषंगानें आतां मृत्युसंख्येविषयीं विवेचन करणें आवश्यक आहे. सर्व जन्मांचें सर्व लोकसंख्येशीं प्रमाण

बांधण्यांत जे दोष अंगभूत होते तेच दोष सर्व मृत्यूंचें सर्व लोकसंख्येशीं प्रमाण बांधण्यांत होते. जन्माप्रमाणेंच मृत्यूंचें प्रमाणहि वयोमानाप्रमाणें निरनिराळें असतें. उदाहरणार्थ, जन्मलेल्या मुलांपैकीं पुष्कळशीं मुलें एक वर्षाचीं होण्याच्या आंतच हिंदुस्थान व इतर देशांतूनहि मरतात हें व त्याचप्रमाणें ५० वर्षांच्या पुढच्या गटांतील लोकसंख्येंतहि मरणाचें प्रमाण जास्त असतें हें सर्वांच्या परिचयाचें आहे. सर्व मृत्यूंचे सर्व लोकसंख्येशीं प्रमाण बांधण्यांत या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष होतें. वर उल्लेखिलेली गोष्ट लक्षांत घेतली तर एखाद्या लोकसंख्येच्या वयोमानावर त्यांतील मृत्युसंख्या बहुतांशीं अवलंबून असते हें दिसून येईल. एखाद्या लोकसंख्येंत ज्या मानानें ५० व त्या पुढील वयाच्या माणसांचें प्रमाण अधिक त्या मानानें त्यांतील मृत्युसंख्या अधिक असण्याचा संभव असणें अगदीं साहाजिक आहे व ज्याप्रमाणें लोकसंख्येचें वयोमान बदलेल त्याप्रमाणें मृत्युसंख्येंतही बदल होईल हें ओघानेंच प्राप्त होतें. या सर्व गोष्टींचा विचार करावयाचा तर सर्व मृत्यूंचे सर्व लोकसंख्येशीं प्रमाण काढण्यापेक्षां वयविशिष्ट मृत्यूंचें प्रमाण काढणेंच अधिक उपयोगी ठरेल. म्हणजे मृत्यु पावलेल्या लोकांचें त्यांच्या मरणाच्या वेळच्या वयाप्रमाणें वर्गीकरण करून प्रत्येक वयाच्या लोकसंख्येंत मृत्यूचें प्रमाण काय पडतें हें काढावयाचें. यालाच वर वयविशिष्ट मृत्यूंचें प्रमाण असें म्हटलें आहे. अशी प्रत्येक वर्षाचीं प्रमाणें उपलब्ध झालीं म्हणजे जनन-मरणाचा मेळ घालण्याचा वर उल्लेखिलेला प्रश्न सोडवितां येतो. आज जन्मलेल्या १००० स्त्रियांपैकीं १३ व्या वर्षी किती मरतील, १४ व्या वर्षी किती मरतील याप्रमाणें प्रत्येक वर्षाचें गणित करतां येईल. वयविशिष्ट मृत्यूंच्या प्रमाणावरच अधिक संस्कार करून जीवनसारणी (Life Table) तयार करण्यांत येतात. या सारणींवरून एखाद्या देशांतील लोकसंख्येचें वयोमान कसें बदलत आहे व तें पुढें कसें बदलेल यासंबंधीं निश्चित कल्पना बांधतां येते. या सारणींच्या आधारानेंच आगोपांच्या सारणी (Insurance Tables) तयार करण्यांत येतात. मृत्युसंख्येच्या मोजणीबाबत वर उल्लेखिलेली प्रगति फारच झपाट्यानें झाली. गेल्या शतकांत आगोप [विमा] पद्धतीचा फार झपाट्यानें फैलाव झाला. व्यक्तींच्या जीवनांचें आगोपन करतांना व प्रव्याजि ( Premium ) ठरवितांना एखादी विशिष्ट व्यक्ति किती वर्षें जगण्याचा संभव आहे हें ठरविणें अत्यावश्यक होतें. निरनिराळ्या वयाच्या व्यक्ति किती वर्षें जगण्याचा संभव आहे हें वर उल्लेखिलेल्या वयविशिष्ट मृत्यूंच्या प्रमाणावरून काढतां येतें. यासंबंधीं करावयाचें गणित त्या शास्त्रा-

तहि अत्यंत अवघड असें समजलें जातें. त्यामुळें त्यासंबंधीं येथें फारसें विवेचन करणें शक्य नाहीं.

मागें वर्णन केलेलें शुद्ध जननाचें प्रमाण वर उल्लेखिलेल्या आगोप सारणींच्या साह्यानें अधिक शुद्ध केलें तर भविष्यकाळांतील स्त्रियांच्या वयोमानांतील फेरफारांचा जननसंख्येवर काय परिणाम होईल हें ठरविणें शक्य होतें. म्हणजे भविष्यकाळांत जननसंख्येची वाढ अगर घट यासंबंधीं निश्चित अंदाज त्यावरून बांधतां येतात. याला आपण शुद्धतर जननाचें प्रमाण असें म्हणूं. या दृष्टीनें अधिक दूरवर विचार करून वर उल्लेखिलेले सुप्रसिद्ध सांख्यिक कुशिन्स्कि यांनीं असा विचार पुढें मांडला कीं, "वास्तविक पाहतां एखादी लोकसंख्या वर्धिष्णु आहे किंवा नाहीं हें ठरवावयाचें झाल्यास आपण आपलें लक्ष त्यांतील मातांच्या संख्येवर केंद्रित केले पाहिजे. मातांच्या संख्येंतील चढउतारावर मुख्यतः जननाचें प्रमाण अवलंबून असल्यानें ह्यांच्या संख्येंत पुढें कसा बदल होणार आहे हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. थोडक्यांत आजच्या पिढींतील १०० मातांच्या जागीं पुढच्या पिढींत किती माता येण्याचा संभव आहे हें आपण ठरविलें पाहिजे. त्यांची संख्या सध्यांहून कमी असेल तर लोकसंख्या भविष्यकाळीं वाढणार नाहीं हें उघड आहे. त्यांची संख्या जास्त असल्यास या उलट परिस्थिति निर्माण होईल." ही विचारसरणी सहज पटण्यासारखी आहे. मातांच्या संख्येसंबंधीं अंदाज बांधण्यासाठीं वर उल्लेखिलेल्या शुद्धतर जननाच्या प्रमाणांत थोडासा बदल करावा लागतो. शुद्धतर जननाच्या प्रमाणांत जन्मलेल्या सर्व मुलामुलींचा विचार केला जातो. तसें न करतां त्यांतील फक्त मुलींचाच विचार केला तर भविष्यकाळीं १००० जननक्षम स्त्रियांना किती मुली होण्याचा संभव आहे हें पुष्कळअंशीं निश्चितपणें सांगतां येतें. याला आपण शुद्ध प्रजननाचें प्रमाण असे म्हणूं. शुद्ध प्रजननाच्या प्रमाणावरून भविष्यकाळीं लोकसंख्या वाढेल कीं कमी होईल व हे चढउतार किती प्रमाणांत होतील हें पुष्कळ अंशीं निश्चितपणें सांगतां येतें. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्यें शुद्ध प्रजननाचें प्रमाण युद्धापूर्वी दर हजारीं ८०० होतें. म्हणजे सध्यांच्या पिढींतील १००० मातांच्या जागीं पुढील पिढींत त्या देशांत फक्त ८०० माता असतील असें यावरून दिसतें. इंग्लंडमध्यें आजहि जननार्घाचे प्रमाण मरणार्घापेक्षां जास्त आहे. तथापि ही परिस्थिति टिकणारी नाहीं व पुढील काळांत तेथील लोकसंख्या कमी होणार आहे असा याचा अर्थ आहे. पश्चिम युरोपांतील बहुतेक देशांतील शुद्ध

प्रजननाचीं प्रमाणें इंग्लंडप्रमाणेंच कमी आहेत. हिंदुस्थानांतील त्रावणकोर संस्थानांत १९४१सालीं शुद्ध प्रजननाचें प्रमाण दर हजारीं १४०० होतें म्हणजे आजच्या पिढींतलि १०००मातांची जागा पुढच्या पिढींत १४०० माता घेणार आहेत! त्रावणकोरमधील लोकसंख्या सध्यांपेक्षांहि अधिक वेगानें भविष्यकाळीं वाढणार आहे असा याचा अर्थ होतो. सामान्य मानानें प्रत्येक २॥ पिढींत लोकसंख्या आजच्या दुप्पट होईल असें म्हणतां येईल. कोचीनमध्यें १९३७ सालीं शुद्ध प्रजननाचें प्रमाण १७०० होतें असें डॉ. रामवर्मा यांच्या पाहणीवरून दिसतें.

शुद्ध प्रजननाचें प्रमाण काढणें हाच जननसंख्येची पाहणी करण्याचा प्रधान हेतु असतो. अशा तऱ्हेच्या पाहण्या आतांपर्यन्त हिंदुस्थानांत दोन ठिकाणीं झालेल्या आहेत. पैकीं पहिली १९३६–३७ सालीं डॉ. रामवर्मा यांनीं कोचीन संस्थानची केलेली व दुसरी १९४१ सालीं त्रावणकोर संस्थानांतील शिरगणती अधिकाऱ्यांनीं केलेली. डॉ. रामवर्मा यांनीं केलेल्या पाहणीचा अहवाल अद्यापि अप्रकाशित आहे. तथापि त्यांनीं आपल्या प्रबंधाची एक प्रत प्रस्तुत लेखकास वापरण्यासाठीं दिली आहे. त्यांतील कांहीं माहितीचा येथें उपयोग केला आहे. त्रावणकोर संस्थानांतील पाहणीचा अहवाल १९४१ च्या शिरगणतीच्या अहवालांत समाविष्ट करूनच प्रसिद्धिलेला आहे. कोल्हापूर शहरांतील जननसंख्येची केलेली पाहणी ही हिंदुस्थानांतील तिसरी पाहणी होय. त्यासंबंधींचा तपशील आतां सादर करतों.

कोल्हापूर शहराच्या आर्थिक व सामाजिक पाहणींत जननसंख्येची पाहणी अन्तर्भूत करावयाची असें आम्हीं प्रारंभींच ठरविलें होतें. जननसंख्येच्या पाहणींत कोणती माहिती गोळा करावयाची असते यासंबंधीं वर कल्पना दिलेली आहेच. थोडक्यात सांगावयाचें तर जननक्षम स्त्रियांना, म्हणजे १२ ४५ वयाच्या स्त्रियांना, कांहीं विशिष्ट मुदतींत [ ४-५ वर्षांत ] किती मुलं झालीं व त्यावेळीं त्यांचीं वयें काय होतीं यांची तपशीलवार माहिती जमवावयाची. त्याबरोबर त्यांच्या कुटुंबासंबंधीं, त्यांतील माणसांसंबंधींहि माहिती जमवावयाची म्हणजे या इतर गोष्टींचा जननसंख्येवर काय परिणाम होतो हें अजमावतां येतें. ही माहिती जमविण्याच्या दृष्टीनेंच आम्हीं आमची प्रश्नपत्रिका तयार केली. १९४१ ते १९४५ या दरम्यान जन्मलेल्या मुलांबद्दल माहिती जमविण्याचें आम्हीं ठरविलें.

प्रश्नपत्रिका तयार झाल्यावर कोणत्या कुटुंबांबद्दल ही माहिती मिळवावयाची हा प्रश्न पुढें आला. कोल्हापूर शहरांतील एकंदर वीस हजार कुटुंबांकडून ही माहिती जमविणें त्रासाचें व फार खर्चाचें झालें असतें. शिवाय वेळहि पुष्कळ लागला असता. सामाजिक व आर्थिक पाहणी करतांना ही अडचण नेहमींच येते. ती दूर करण्यासाठीं 'न्यादर्श पद्धति' अस्तित्वांत आली आहे. एखाद्या लोकसमुदायाची किंवा शहराची पाहणी करावयाची असल्यास त्यांतील सर्व घटकांची पाहणी करणें नुसतें जास्त खर्चाचें व त्रासाचें असतें असें नाहीं तर अनावश्यकहि असतें असें आतां अनुभवानें ठरलें आहे. त्या लोकसमुदायांतील अगर शहरांतील सर्व घटकांतून योग्य रीतीनें एक न्यादर्श अगर 'नमुना' निवडून घेतला व त्यांत येणाऱ्या घटकांची माहिती मिळविली तर सर्व घटकांची पाहणी करून मिळेल तितकीच बिनचूक माहिती मिळूं शकते असें सिद्ध करतां येतें. यूरोप-अमेरिकेंत केलेल्या असंख्य पाहण्यांतून ही गोष्ट वारंवार प्रत्ययास आलेली आहे. त्यामुळें आर्थिक व सामाजिक पाहणी करतांना ही पद्धति सरसकट सर्वत्र वापरण्याचा हल्लीं प्रघात आहे. कोल्हापूर शहरांतील जननसंख्येची पाहणी करतांना याच पद्धतीचा अवलंब करण्याचें आम्हीं ठरविलें. आर्थिक व सामाजिक पाहणीचेंच एक अंग म्हणून शहरांतील कुटुंबांची एक पुष्कळच तपशीलवार अशी पाहणी आम्हीं ही जननसंख्येची पाहणी सुरू होण्यापूर्वीच चालू केली होती. त्या पाहणीसाठीं कोल्हापूर शहरांतील ११,५०० राहत्या घरांपैकीं प्रत्येक १० वें घर नमुन्यादाखल निवडलें होतें व त्या घरांतून राहणाऱ्या सर्व कुटुंबाबद्दल तपशीलवार माहिती जमविली जात होती. जननसंख्येच्या पाहणींतहि याच कुटुंबांची माहिती घ्यावयाची असें आम्हीं ठरविलें.

वर उल्लेखिलेली माहिती मिळविण्याच्या कामीं येणाऱ्या संभाव्य अडचणींचा निरास करण्याची योजना यानंतर आखणें जरूर होतें. आम्हांस ज्या प्रकारची माहिती जननसंख्येच्या पाहणींत जमवावयाची होती ती पुष्कळच नाजूक प्रकारची व खाजगी स्वरूपाची होती हें उघड होतें, व ती कुटुंबांतील स्त्रीवर्गाकडूनच मिळण्याचा संभव होता. यासाठीं प्रथमतः आमच्या पाहणीबद्दल गैरसमज निर्माण होणार नाहींत अशी खबरदारी घेणें जरूर होतें. त्याचप्रमाणें स्त्री-वर्गाला विनासंकोच व विश्वासानें माहिती देतां येईल अशा तऱ्हेच्या संशोधकांची अगर नोंदणीदारांची या पाहणीसाठीं योजना करणेंहि

आवश्यक होतें. यापैकीं पहिल्या अडचणींचा निरास करण्यासाठीं आम्ही प्रथमच कोल्हापूर शहरांतील प्रमुख स्त्रियांची एक समिति या पाहणीच्या कामांत आम्हास सल्ला देण्यासाठीं व मदत करण्यासाठीं नेमली व या समितीच्या प्रथमच्या एक दोन सभामध्यें ही पाहणी करण्याचे हेतु, ती करण्याची पद्धति, त्यांत येणाऱ्या अडचणी व त्यापासून होणारे फायदे यासंबंधीं विस्तृत माहिती व त्यासंबंधीं विचारण्यांत आलेल्या सर्व शंकांना सविस्तर उत्तरें देण्यांत आलीं. या समितींतील सर्व सभासदांनीं या पाहणीशीं सहकार्य करावयाचें व आम्हांस जरूर ती मदत करण्याचें मान्य केलें. यामुळें गैरसमज निर्माण होण्याचा संभव सुतराम् कमी झाला व सर्व स्त्रिवर्गाचें सहकार्य मिळण्यास अमोल मदत झाली. दुसऱ्या प्रकारच्या अडचणीस तोंड देण्यासाठीं स्त्रीसंशोधक नेमावेत असें आम्हीं ठरविलें व त्या कामासाठीं १० शिक्षकिणींची निवड करण्यांत आली. प्रत्येक बिनचूक भरलेल्या प्रश्नपत्रिकेस ४ आणे याप्रमाणें वेतन त्यांस देण्यांत यावें असेंहि ठरविण्यांत आलें. या सर्व स्त्रीसंशोधकांना पाहणीसंबंधीं तपशीलवार माहिती देण्यांत आली व कशा प्रकारची माहिती आम्हांस गोळा करावयाची आहे याची अगदीं स्पष्ट कल्पना त्यांना देण्यांत आली. त्याचप्रमाणें पश्नपत्रिका कशा भरावयाच्या, त्यांत कश चुका होतात यासंबंधींहि त्यांना सूचना करण्यांत आल्या.

तथापि प्रत्यक्ष पाहणीस सुरवात करण्यापूर्वी आणखी एका अडचणी-संबंधीं विचार करून तरतूद करणें आवश्यक होतें. वर विवेचन केल्याप्रमाणें गेल्या ५ वर्षांतील १३ ते ५० वयाच्या स्त्रियांचीं बाळंतपणें व त्यावेळचीं त्यांचीं वयें यासंबंधींची नोंद आम्हांस करावयाची होती. ही नोंद करतांना बाळंतपणाच्या वेळचें नक्की वय ठरविणें बरेंच कठीण काम होतें आणि वयाची नोंद बिनचूक होण्यावर या पाहणीचें यश अवलंबून होतें. सर्वसाधारण जनतेंत स्वतःच्या वयासंबंधीं किती घोर अज्ञान असतें याची आपणांस सहजासहजीं कल्पना येत नाहीं. तथापि या गाढ अज्ञानाची शिरगणतीचे अधिकारी व लोक-संख्येच्या प्रश्नाचा अभ्यास करणारे विद्यार्थी यांना भरपूर जाणीव आहे. सर्व-सामान्य लोकांना आपलीं वयें फक्त स्थूलमानानें माहीत असतात. २२, २३, २४ वयांची मंडळी आपलें वय २० अगर २५ असें सांगतील. ३७, ३८, ३९ वर्षांची मंडळी आपलीं वयें कधीं ३५ तर कधीं ४० असें सांगतांना आढळतील. वय कमी अगर जास्त सांगण्याची ही प्रवृत्ति खोटें बोलण्याच्या प्रवृत्तींतून निर्माण झालेली नसते. मुद्दाम वय खोटें सांगावें अशी त्यांची इच्छा नसते.

परंतु स्वतःचें खरें वयच त्यांना माहीत नसते. आपण ३१, ३२, ३३, वर्षांचे आहोंत ही स्पष्ट कल्पना नसल्यामुळें वय ३० किंवा ३५ सांगण्याकडे प्रवृत्ति होते. हा अनुभव हिंदुस्थानांत सर्वत्र येतो व त्यामुळें शिरगणतीच्या वेळीं गोळा केले जाणारे वयोमानांचे आंकडे ५, १०, १५, २०, २५, इत्यादि वर्यांच्या ठिकाणीं भरमसाट फुगलेले असतात. या उलट ११, १२, ७, ८, २२, २३ या वयांचे आंकडे फारच कमी असतात. ही अनुभवाची गोष्ट लक्षांत घेतां वयांची नोंद अधिक बिनचूक व्हावी यासाठीं कांहीं प्रयत्न करणें आवश्यक होतें.

यासाठीं एक प्रयोग म्हणून एका मानसशास्त्रांतील प्रमेयावर आधारलेली एक योजना आम्हीं आंखली. सर्वसामान्य लोकांना आपल्या जन्माचें वर्ष अगर लग्नाचें साल पुष्कळ वेळां बिनचूक सांगतां येत नाहीं. परंतु त्यांच्या आयुष्यांताल या व अशा प्रकारच्या महत्त्वाच्या प्रसंगांशीं इतर कांहीं सामाजिक समारंभ, अगर घटना यांच्या स्मृति निगडित झालेल्या असतात. उदाहरणार्थ, एखाद्या मनुष्यास त्याचें जन्मसाल सांगतां आलें नाहीं तरी 'कोल्हापुरास आगगाडी आली त्यावेळीं मी दोन वर्षांचा होतों' असें तो सांगूं शकतो किंवा 'आपले राजाराम महाराज गादीवर बसले त्याच्या म्होरल्या वर्षीच माझं लगीन झालं' असे उद्गार एखाद्याच्या तोंडून सहज निघतात. वयांची नोंद बिनचूक होण्यासाठीं या गोष्टींचा कांहीं फायदा घेता आल्यास घ्यावा असा आम्हीं विचार केला. एखाद्या शहरांत जे कांहीं मोठे समारंभ अगर घटना झालेल्या असतात व ज्याच्याशीं सामान्य लोकांच्या स्मृति निगडित होण्याचा संभव असतो त्या घटनांचे सन अगर वर्ष इतर साधनांनीं बिनचूक ठरवितां येतात. अशाप्रकारें संकलित केलेल्या सनावळीच्या साहाय्यानें सामान्य लोकांच्या स्मृतीस उजळा आणण्याचा प्रयत्न करावा व त्यामुळें वयवारीची नोंद अधिक बिनचूक होण्याची खटपट करावी असें आम्हीं ठरविलें. या कामासाठीं कोल्हापूर शहराच्या ५० वर्षांच्या इतिहासांतील ठळकठळक प्रसंगांची एक यादी करण्यांत आली व तिची एक प्रत प्रत्येक स्त्री-संशोधकाकडे देण्यांत आली. या यादीचा कसा उपयोग करावयाचा हें त्यांना समजावून सांगण्यांत आलें. माहिती जमवितांना त्यांनीं या यादीचा उपयोग पुष्कळ वेळां केला व त्यामुळें वयांची नोंद पुष्कळ वेळां अधिक बिनचूक रीतीनें करता आली असें स्त्री-संशोधकांनीं सांगितलेल्या माहितीवरून म्हणतां येईल. तथापि या युक्तीमुळें सर्व वयांची नोंद बिनचूक होईल अशी

वेडी आशा आम्हीं कधींच बाळगिली नव्हती. प्रत्येक मनुष्याच्या स्मृतींना उजळा देण्याचा प्रयत्न केला तरी त्यामुळें प्रत्येक वेळीं इच्छित साध्य होईलच असें नव्हतें. पुष्कळ वेळां त्याचा उपयोग झाला व त्यामुळें कांहीं ठिकाणीं तरी वयांची नोंद अधिक बिनचूक करता आली इतकेंच त्याचें महत्त्व व उपयोग.

एवंगुणविशिष्ट अशा या पाहणीस डिसेंबर १९४५ मध्यें सुरुवात करण्यांत आली. पाहणीचें काम जानेवारी १९४६ च्या मध्यापासून विशेष जोरानें सुरू झालें. प्रत्येक भरून आलेली प्रश्नपत्रिका अतिशय कांटेकोर-पणानें तपासण्यांत येई व त्यामधलि माहितींत विसंगति असल्यास ती प्रश्न-पत्रिका पुन्हा भरावयास सांगण्यांत येई. भरून आणलेल्या प्रश्नपत्रिकेंतील माहितींत पुष्कळ वेळां फार गमतीदार विसंगती आढळून येत असत. एका प्रश्नपत्रिकेंत १९४१ सालीं एका स्त्रीस मूल झाल्याची नोंद होती· ज्यावेळीं आमची पाहणी चालू होती. म्हणजे १९४६ सालीं, त्या बाईचें वय १५ वर्षांचें होतें. वर उल्लेखिलेली माहिती खरी मानावयाची म्हणजे ९ अगर १० व्या वर्षीं त्या स्त्रीस मूल झालें होतें. या बहुतांशीं असंभाव्य गोष्टीवर विश्वास ठेवा-वयाचा! ती प्रश्नपत्रिका पुन्हां भरून आणण्यास सांगण्यांत आलें आणि नवीन भरून आलेल्या प्रश्नपत्रिकेंत त्या मुलाच्या जन्माचा मागमूसहि नव्हता. त्या-संबंधीं चौकशी करतां असें कळलें कीं त्या बाईच्या थोरल्या बहिणीस १९४१ मध्यें मूल झालें होतें व तें चुकून या बाईचेंच असें नोंदलें गेलें होतें. त्यामुळें दोन चुका दुरुस्त करतां आल्या. हें एक उदाहरण म्हणून सांगितलें. परंतु अशा अनेक तऱ्हेच्या विसंगती व चुका यांकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष द्यावें लागे व शक्य तेथें त्या दुरुस्त करून घेण्याची खटपट करावी लागे.

या पाहणीचें काम १९४६ जूनमध्यें संपलें. एकंदर १९४७ कुटुंबांची माहिती घेण्यांत आली. प्रारंभीं निवडलेल्यांतलि फक्त ५ लोकांनीं माहिती देण्याचें नाकारलें. हीं सर्व कुटुंबें विशेष सुशिक्षित व आर्थिक सुस्थितींतील होतीं हें येथें नमूद करण्यास हरकत नाहीं. प्रश्नपत्रिका भरून झाल्यानंतर त्यांतील माहितीचें वर्गीकरण करून तक्ते बनविण्याचें काम सुरू करण्यांत आलें हें काम पूर्ण होण्यास ४–५ महिने लागले. मध्यंतरीं इतर जरुरीच्या कामामुळें या कामांत खंड पडला; त्यामुळें १९४७ च्या एप्रिल महिन्याचे शेवटीं हें काम पुरें झालें. त्यासंबंधींचा अहवाल सध्यां तयार होत आहे व

लवकरच तो छापावयास सुरवात होईल.* आतां जमविलेल्या माहितीच्या थोड्या तपशिलांत शिरण्यास हरकत नाहीं.

ज्या १९४७ कुटुंबांची माहिती घेण्यांत आली त्यांमध्यें एकंदर जनन-क्षम स्त्रियांची (१३ ते ५० वयाच्या स्त्रियांची) संख्या २८२५ होती. यांपैकीं ६८६ स्त्रिया अविवाहित होत्या, ९० परित्यक्ता, वेश्या इत्यादि होत्या व ३९० विधवा होत्या. या वजा करतां एकंदर १६५९ स्त्रिया उरल्या. त्यांचें निरनिराळ्या वयोमानाप्रमाणें व जातवारीनें केलेलें वर्गीकरण १ ल्या सारणींत ग्रथित केलें आहे.

| वय-वर्षे-जात | १६–२० | २१–२५ | २६–३० | ३१–३६ | ३६–४० | ४०–४५ | ४६–५० | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मराठा | १०३ | २४७ | १७१ | १२८ | ८२ | ६० | ४३ | ८३४ |
| ब्राह्मण | १५ | ५३ | ६७ | ३६ | ४४ | १२ | १८ | २४५ |
| मुसलमान | २३ | ४६ | २९ | २६ | १८ | १२ | १ | १५५ |
| जैन | ९ | २४ | २२ | ७ | ९ | ४ | ० | ७५ |
| इतर मराठे | १७ | ३७ | २३ | २६ | २४ | ९ | ४ | १४० |
| हरिजन | १० | २२ | ३५ | ११ | ११ | ३ | १ | ९३ |
| इतर | १५ | ३६ | २२ | १८ | १० | ८ | ८ | ११७ |
| एकूण ... | १९२ | ४६५ | ३६९ | २५२ | १९८ | १०८ | ७५ | १६५९ |

या १६५९ स्त्रियांना १९४१ ते १९४५ या कालखंडांत एकंदर १६५६ मुलें झालीं. १६५९ स्त्रियांपैकीं कांहीं स्त्रियांना या कालांत मुळींच मुलें झालीं नाहींत तर कांहींना २, ३ सुद्धां मुलें झालेलीं आढळतात. वयविशिष्ट जननांचीं प्रमाणें २ ऱ्या सारणींत दाखविलीं आहेत. त्यांतच तुलनेसाठीं कोचीन व त्रावणकोरमधील आंकडेहि दिले आहेत.

* हा अहवाल १९४८ मध्यें प्रसिद्ध झाला.

प्रत्येक गटांत हजार स्त्रियांना झालेलीं मुलें.

| वयांचे गट | १६-२० | २१-२५ | २६-३० | ३१-३५ | ३६-४० | ४१-४५ | ४६-५० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कोल्हापूर शहर | २२० | २६३ | २४३ | १९२ | ११६ | ४२ | ९ |
| त्रावणकोर | २३० | २४७ | २२२ | १६७ | १४१ | ४५ | १५ |
| कोचीन | २२४ | २४९ | २५३ | २४६ | १८२ | १२० | ... |

कोचीन व त्रावणकोरमधील वयांचे गटांत आणि कोल्हापूरच्या वयांचे गटांत १ वर्षाचा फरक आहे. परंतु वरील कोष्टकांत सोईसाठीं ते निराळे दाखविलेले नाहींत.

वर दिलेल्या आंकड्यांवरून कोल्हापूर शहर, कोचीन व त्रावणकोर या तिन्ही ठिकाणीं जननसंख्येची सर्वसाधारण पातळी सारखीच आहे हें चटकन ध्यानांत येईल. निरनिराळ्या वयांच्या गटांतून कांहीं फरक दिसून येतात. उदाहणार्थ, कोल्हापूर व त्रावणकोरमध्यें २०-२५ या वयांच्या गटांत जननसंख्या जास्तींत जास्त असते व ३०-३५ गटांत ती झपाट्यानें कमी होऊन ४०-४५ व ४५-५० या गटांत फारच अल्प असते. या उलट कोचीनमध्यें जननसंख्या २६ ते ३० या वयांच्या गटांत सर्वांत अधिक असते व ४०-४५ या गटांत झपाट्यानें कमी होते असें दिसून येईल. याच्या संभाव्य कारणमीमांसेंत शिरण्यास येथें अवकाश नाहीं.

वर दिलेल्या २ ऱ्या सारणींत वयविशिष्ट जननांचीं प्रमाणें सोईसाठी वयांचे पांच वर्षांचे गट करून त्याप्रमाणें दिलीं आहेत. कोल्हापुरांतील या प्रमाणांची (गटांच्या प्रमाणांची नव्हे तर प्रत्येक वर्षाच्या प्रमाणांची) बेरिज केली म्हणजे आपणास सकल जननाचें प्रमाण मिळतें. प्रत्येक वर्षाच्या प्रमाणांची बेरीज केली तर ती ५५३० येते. म्हणजे कोल्हापूर शहरांतील आज जन्मलेल्या १००० मुलींनीं विवाह करून आपला १३ ते ५० वर्षाचा आयुष्यक्रम पार पाडला तर त्यांना ५५३० मुलें होतील म्हणजे होण्याचा बहुतांशीं संभव आहे. आतां यावरून शुद्धतर प्रजननाचें प्रमाण काढावयाचें

म्हणजे या १००० मुलींपैकीं कोणकोण किती वयापर्यंत जगतील व त्यामुळें जननसंख्या किती कमी होईल हें काढावयाचें. या कामासाठीं मुंबई इलाख्यासाठीं तयार केलेल्या जीवनसारणी ( Life Tables ) वापरल्यास तें प्रमाण २,४४० असें येतें. म्हणजे आज जन्मलेल्या १००० मुलींपुढील काळांत मृत्यूंचें प्रमाण लक्ष्यांत घेतां २४४० मुलांना जन्म देतील. आतां यावरून शुद्ध प्रजननाचें प्रमाण काढावयाचें म्हणजे त्यांत मुली किती असतील हें काढावयाचें. आमच्या पाहणींत गोळा केलेल्या माहितीवरून १०० जन्मलेल्या मुलांपैकीं ४८ मुली असतात व ५२ मुलगे असतात असें दिसलें. यावरून पाहतां शुद्ध प्रजननाचें प्रमाण ११७१ येतें. म्हणजे कोल्हापूर शहरामध्यें आजच्या पिढींतील १००० मातांच्या जागीं पुढल्या पिढींत ११७१ माता येण्याचा बहुतांशीं संभव आहे. म्हणजेच या शहरांतील लोकसंख्या झपाट्यानें वाढत राहणार व त्या वाढीचें प्रमाण वर दर्शविल्या-इतकें असणार असें म्हणणें प्राप्त होतें.

या पाहणींत जमविलेल्या इतर माहितीविषयींहि पुष्कळ लिहिण्या-सारखें आहे. परंतु या लेखाचा आतांपर्यंतच फार विस्तार झाल्यानें या पाहणीचा विस्तृत अहवाल लवकरच प्रसिद्ध होईल व त्यांत पुष्कळ अधिक माहिती जिज्ञासू वाचकांना मिळेल, एवढेंच आश्वासन तूर्त देणें शक्य आहे.

[ या लेखांतील बहुतेक परिभाषा डॉ. रघुवीर यांची आहे. ]

---